# संशोधन आणि साहित्यप्रवाह

## डॉ. भास्कर शेळके गौरवग्रंथ



संपादक
ज्ञानेश्वर वाल्हेकर
शशिकांत साळवे
धनंजय वाघमारे

AGASTI LIBRARY, AKOLE
40806

पुस्तक जपून वापरावे.

# संशोधन आणि साहित्यप्रवाह

संपादक

प्रा. डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर
प्रा. डॉ. शशिकांत साळवे
प्रा. डॉ. धनंजय वाघमारे

891.4608
WAL

Agasti Arts, Commerce & Dadasaheb
Rupwate Science College, Akole
POST GRADUATE LIBRARY
Acc.No. 40806
Price 250/- Dt. 05/2/2013

शब्दश्री प्रकाशन, जुन्नर

अगस्ति कॉलेज ग्रंथालय
*40806*

Sanshodhan Aani Sahityapravah

संशोधन आणि साहित्यप्रवाह

संपादक : डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर, डॉ. शशिकांत साळवे, डॉ. धनंजय वाघमारे

© प्रकाशकाधीन

प्रकाशक : सौ. तारादेवी भास्कर शेळके
१२१, श्रीदुर्गा, बारव, ता. जुन्नर,
जि. पुणे, ४१० ५०२
मोबा. ९८२२४४८१८१

प्रकाशन क्रमांक : २

801.95
WAL

प्रथमावृत्ती : १२.१२.२०१२

मुखपृष्ठ : भूषण विजय नांगरे

अक्षरजुळणी : भूषण विजय नांगरे
मे. विज्वास सायबरवर्ल्ड,
मंचर (पुणे).

मुद्रक : न्यू भारत बाईंडर्स ॲन्ड प्रिंटर्स,
नारायण पेठ, पुणे-३०.

मूल्य : ₹ २५०/-

ISBN No.: 978-81-924997-0-3

# संशोधन आणि साहित्यप्रवाह
# (प्रा.डॉ. भास्कर शेळके गौरवग्रंथ)


## संपादक मंडळ

१) प्रा. डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर (घोडेगाव)
२) प्रा. डॉ. शशिकांत साळवे (घोडेगाव)
३) प्रा. डॉ. धनंजय वाघमारे (पुणे)
४) प्रा. डॉ. दत्तात्रय डुंबरे (औरंगाबाद)
५) प्रा. डॉ. ज्ञानेश्वर थोरात (मंचर)
६) प्रा. रामदास टेकाळे (अहमदनगर)
७) प्रा. डॉ. विलास थोरात (मनमाड)
८) प्रा. डॉ. बाळासाहेब सोनवणे (पुणे)
९) डॉ. श्रीप्रकाश वाघमारे (वर्धा)
१०) प्रा. राजेश्वर दुडूकनाळे (देगलूर)
११) प्रा. डॉ. सीताराम निघूट (अहमदनगर)
१२) प्रा. छाया बारवे (निमगावसावा)
१३) प्रा. सुवर्णा खोडदे (पुणे)
१४) प्रा. सुनिता पावडे (बारामती)
१५) प्रा. नरेंद्र वाव्हळ (अहमदनगर)
१६) प्रा. डॉ. अनिल गर्जे (कडा)
१७) प्रा. डॉ. दिलीप कसबे (चाकण)
१८) प्रा. संदीप घोडे (अहमदनगर)
१९) प्रा. डॉ. अनिल उगले (आळे)
२०) प्रा. नितीन भालेराव (गंगापूर बु.।।)

# संपादकीय

'संशोधन आणि साहित्यप्रवाह' या प्रा. डॉ. भास्करराव शेळके यांच्या गौरवग्रंथाचे संपादन करताना मनस्वी आनंद होत आहे. मायमराठीच्या साहित्यसेवेबरोबरच एका कृतज्ञ जाणिवेचा हा शाब्दिक आविष्कार आहे. जुन्नर येथील श्री शिवछत्रपती महाविद्यालयाच्या मराठी विभाग प्रमुख पदावर कार्यरत असणाऱ्या प्रा. डॉ. भास्करराव शेळके यांच्या सहवासात, त्यांच्या सततच्या मार्गदर्शनाखाली संशोधनाचे कार्य पूर्ण करणाऱ्या व संशोधन कार्यरत असणाऱ्या आम्ही सर्व विद्यार्थ्यांनी गौरवग्रंथ संपादनाचा संकल्प सोडला आणि विषय निवडीपासून ग्रंथ पूर्णत्वाला येईपर्यंत कामाला लागलो. आज खऱ्या अर्थाने त्यास पूर्णत्व आले आहे. या संकल्पपूर्तीचा आनंद काही आगळावेगळा आहे.

भारतीय स्वातंत्र्य व लोकशाही गणराज्य प्रणालीमुळे संपूर्ण देशामध्ये विविध राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, वाङ्मयीन, कृषी, औद्योगिक घडामोडींचा परिणाम महाराष्ट्रीय ग्रामीण जीवनावर झाला. महात्मा जोतिराव फुले यांचे कार्य, सत्यशोधक समाजाचे कार्य, सत्यशोधक चळवळ, ब्राह्मणेतर चळवळ, नंतर म. गांधीजींचे कार्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य व धर्मांतर या सर्व वैचारिक चळवळींचा प्रभाव ग्रामीण जनजीवनावर झालेला दिसून येतो. या प्रभावातूनच स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण माणसांचे आत्मभान जागे झाले. दलित समाजाला अस्मिता प्राप्त झाली. यातूनच दलित साहित्य, ग्रामीण साहित्य हे पुरोगामी भूमिका धारण करणारे साहित्यप्रवाह मराठी साहित्यात दाखल झाले. या प्रवाहाबद्दल आस्था, जाणीव, तळमळ, प्रेम, आपुलकी असणारा एक वर्ग महाराष्ट्रात उदयास आला. आपली नोकरी, व्यवसाय सांभाळून या साहित्य प्रवाहासाठी आपआपल्या परीने वेळ देणारा, या प्रवाहाबद्दल निरीक्षण करणारा, या प्रवाहांची दखल आपल्या कृती-उक्तीतून घेणारा एक वर्ग उदयास आला. या वर्गाचे प्रतिनिधित्त्व करणारे म्हणून आम्ही सर्व विद्यार्थी प्रा. डॉ. भास्करराव शेळके या व्यक्तींकडे पाहतो.

ग्रामीण साहित्य चळवळीचे भाष्यकार आणि समीक्षक म्हणून डॉ. शेळके मराठी वाचक-रसिकांना सुपरिचित आहेत. कारण ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, आदिवासी साहित्य, हे साहित्य वाचणाऱ्या रसिकाशी, अभ्यासकांशी, अध्ययन-अध्यापन करणाऱ्या विद्यार्थी-शिक्षकांशी त्यांचे जिव्हाळ्याचे नातेसंबंध आहे. शेती, शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर, दलित, पीडित या वर्गाबद्दल डॉ. शेळके यांच्या मनात विलक्षण प्रेम आहे. या प्रेमापोटी

बहुजन समाजातून शिक्षण घेऊन पुढे आलेल्या तरुणांबद्दल, बहुजन शिक्षकाबद्दल त्यांच्या मनात नितांत प्रेम आहे. बहुजन समाजातून शिक्षण घेऊन महाविद्यालय व विद्यापीठीय स्तरावर उच्च शिक्षणात अध्यापनाची भूमिका करणारा तरुण प्राध्यापक डॉ. शेळके यांच्याकडे आकर्षित होतो, तो याच प्रेमापोटी. त्यांच्या मार्गदर्शनासाठी, ज्ञानाची देवाण-घेवाण करण्यासाठी आसुसलेला असतो. मार्गदर्शकांपेक्षाही वडीलकीची, थोरल्या भावाच्या नात्याप्रमाणे ते संशोधन कार्यरत असणाऱ्या विद्यार्थ्यांना सतत मदत करतात. स्वतःच्या ग्रंथालयातील संदर्भ पुस्तके, संदर्भ नियतकालिके स्वतःहून स्वखर्चाने विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचे कार्य करतात. सतत नवीन संदर्भ, नवी माहिती, नवे ज्ञान, नवे विषय विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याची त्यांना मनापासून आवड आहे. या सर्व कार्यात त्यांची पत्नी गुरुमाउली सौ. तारादेवी शेळके, मुलगा डॉ. अविनाश, भाऊ प्रा. सयराम शेळके व मित्रमंडळी या सर्वांचा मोलाचा व उत्साहवर्धक सहभाग असतो. सरांच्या संशोधन कार्यात कधीही आडकाठी येणार नाही, याचीच दक्षता कुटुंबातील सर्वजण घेतात. यामुळे प्रा. डॉ. भास्करराव शेळके यांच्यासारखा प्रेमळ, सहृदय मार्गदर्शक लाभणे आम्हां सर्व विद्यार्थ्यांचे भाग्य आहे. अशा सहृदयी, मनस्वी मार्गदर्शकाबद्दल कृतज्ञता व्यक्त व्हावी, या उद्देशाने या गौरवग्रंथाचे संपादन करण्यात आले आहे.

'संशोधन आणि साहित्यप्रवाह' या गौरवग्रंथात विविध विषयांवरील २५ अभ्यासकांचे लेख आहेत. संत साहित्य, दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य, लोकसाहित्य, आधुनिकता, स्त्रीवादी साहित्य, संज्ञाप्रवाह इ. विषयी जाणकार, बहुश्रुत आणि तरुण अभ्यासकांनी आपआपल्या अभ्यास विषयाबद्दल व्यासंगीपणे लेख लिहिलेले आहेत. या सर्व लेखामधून मराठी साहित्य संशोधनाचे क्षेत्र किती विस्तारले आहे व व्यापक झाले आहे याची जाणीव होईल. स्वातंत्र्योत्तर साहित्यप्रवाहाबद्दल नवे तरुण अभ्यासक, संशोधक किती सजग आहेत, याचेही भान या गौरवग्रंथातून येते.

या गौरवग्रंथाच्या संपादनासाठी विशेषतः ज्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त होते आहे, त्याच प्रा. डॉ. भास्करराव शेळके यांनीच विशेष मोलाचे सहकार्य, मार्गदर्शन केले आहे. प्रा. डॉ. भास्करराव शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली एम.फिल., पीएच.डी.चे संशोधन करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी वेळेत लेख उपलब्ध करून दिले आणि सहकार्य केले त्या सर्वांबद्दल ऋण व्यक्त करतो. या गौरवग्रंथाच्या निर्मितीमागे आमच्या ज्या अपेक्षा होत्या, त्या पूर्ण होणार आहेत. मराठी संशोधक, अभ्यासक, वाचक वर्गाला हा गौरवग्रंथ निश्चितच मार्गदर्शक ठरेल असा विश्वास वाटतो. या ग्रंथाला प्राचार्य रा. रं.

बोराडे यांची प्रस्तावना लाभली, हे आमचे भाग्यच आहे. त्यांच्या ऋणात आम्ही कायमच आहोत. हा गौरवग्रंथ प्रकाशित करण्यात शब्दश्री प्रकाशनाच्या सौ. तारादेवी शेळके यांनी आम्हांस मोलाचे सहकार्य दिल्यामुळे हे काम आज पूर्णत्वास आले आहे. तसेच विज्वास सायबरवर्ल्ड, मंचर येथील श्री. भूषण नांगरे आणि श्री. प्रसाद नांगरे यांनी संगणकीय टंकलेखनाचे, मांडणीचे काम उत्कृष्टरित्या पूर्ण केल्याबद्दल त्यांचेही आभार.

मराठी वाचकांनी या गौरवग्रंथाबद्दलचे आपले अभिप्राय जरूर कळवावेत. काही त्रूटी असतील तर त्या संपादक मंडळाच्या नवखेपणामुळे झाल्या असतील. त्या वाचकांनी लक्षात आणून द्याव्यात. संपादक मंडळ त्याचे निश्चितच स्वागत करेल.

संपादक

दि. १२/१२/१२

डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर
डॉ. शशिकांत साळवे
डॉ. धनंजय वाघमारे

# प्रस्तावना

पुरोगामी विचारांचा स्वीकार करून बहुजन समाजातील तरुणांना संशोधनाच्या प्रवाहात सामील करून घेणारे डॉ. भास्कर शेळके यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने त्यांच्या विद्यार्थीगणाने गौरवग्रंथ सिद्ध करण्याचा स्तुत्य उपक्रम हाताशी घेतला आणि पूर्ण केला त्याबद्दल त्यांना माझा आशीर्वाद.

डॉ. भास्कर शेळके हे माझे वाचक, हितचिंतक आणि तरुण मित्र आहेत. पुणे विद्यापीठाच्या एम.ए. मराठी वर्गासाठी 'विशेष लेखकाचा अभ्यास' या पेपरसाठी 'प्राचार्य रा. रं. बोराडे' या विषयावर सलग तीन वर्षे चर्चासत्रांचे आयोजन केले. एवढे प्रेम केवळ जुन्नरच्या श्री शिवछत्रपती महाविद्यालयातच मिळावे, स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे म्हणून दोन वेळा सन्मानित केले, राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे एक चर्चासत्रही घेतले. एकूण अर्धा डझन वेळा जुन्नरच्या कॉलेजमध्ये डॉ. शेळके व त्यांच्या सहकाऱ्यांमुळे जाता आले याचा विशेष आनंद आहे. वय थांबत नाही. हा तरुण प्राध्यापक एम.फिल., पीएच.डी. झाला. मार्गदर्शक झाला. १३-१४ मुलं पीएच.डी. व एम.फिल. झाली. पाच-सहा जण संशोधन करीत आहेत. सतत विद्यार्थ्यांच्या, संशोधकांच्या आणि चर्चासत्रांच्या गराड्यात असणारा विद्यार्थीप्रिय प्राध्यापक म्हणजेच डॉ. शेळके होय. अनेकांना वेड असते, छंद असतात. डॉ. शेळकेंचा छंद दरवर्षी चर्चासत्र आयोजित करायचे, अनेक थोरामोठ्यांना निमंत्रित करायचे. साहित्य, समीक्षा, संशोधनावर विद्यार्थीहित लक्षात घेऊन विचारमंथन घडवून आणायचे, चर्चा करायच्या, हाच त्यांचा छंद. उपस्थितांची संख्या अपेक्षेपेक्षा नेहमीच जास्त. सर्वांची आस्थेने चौकशी करायची, त्यामुळे स्नेह वाढला. मित्र परिवार वाढला. महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठ कार्यक्षेत्रातील अनेक प्राध्यापक शिवनेरीच्या पायथ्याशी चर्चासत्रांच्या निमित्ताने जमा होतात. हा एक अविस्मरणीय अनुभव असतो. आता डॉ. शेळके यांनी पन्नाशी पार केली. कर्तृत्ववान विद्यार्थ्यांचा हात मदतीला आहेच. त्यांच्या विद्यार्थ्यांना मेजर रिसर्च प्रोजेक्ट, गाईडशीप, पोस्ट डॉक्टरल स्कॉलरशीप मिळावी म्हणून डॉ. शेळकेंचे प्रयत्न चालूच असतात. प्राथमिक, माध्यमिक शिक्षक, प्राध्यापक ते पोलीस आयुक्तांपर्यंतचे त्यांचे विद्यार्थी एकत्र आले आणि संशोधनावरच 'संशोधन आणि साहित्यप्रवाह' हा गौरवग्रंथ सिद्ध झाला. त्यात विषयांचे नावीन्य आहे. केवळ स्तुतिसुमने उधळणे, फोटो छापणे असे गौरवग्रंथाचे स्वरूप नाही. तर संशोधनाचे विविध रंगतरंग यामध्ये आहेत. ग्रामीण दलित

साहित्याचा अभ्यासक असलेल्या शेळके यांच्या विद्यार्थ्यांनी दलित, ग्रामीण, आदिवासी, स्त्रीवादी, लोकसाहित्य, लेखकाचा अभ्यास, बुद्ध तत्त्वज्ञान, संतसाहित्य, आधुनिक साहित्य आदि विषयांवर केलेल्या संशोधनाच्या धारा 'संशोधन आणि साहित्यप्रवाह' हा ग्रंथ वाचताना अनुभवास येतील. यासाठी डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर आणि डॉ. शशिकांत साळवे यांनी पुढाकार घेतला. प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रबंधातील एक-एक सैद्धांतिक प्रकरण निवडले. दुरुस्त्या, संपादन संस्कार केले, नीटपणे मांडणी केली आणि जोड दिली ती डॉ. शेळके यांच्या कुटुंबीयांच्या मनोगताची, चिरंजीव डॉ. अविनाश, पत्नी सौ. तारादेवी आणि प्राध्यापक भाऊ सयराम, विद्यार्थीमित्रांचे आणि सहकारी प्रा. साहेबराव दरेकर यांचे मनोगत, त्याचबरोबर काही निवडक महत्त्वाचे फोटो असलेला हा ग्रंथ वाचनीय असाच आहे.

'संशोधन आणि साहित्यप्रवाह' या गौरवग्रंथात एकूण २५ लेख आहेत. हे लेख लिहिणाऱ्या लेखक-संशोधकांनी आपापल्या विषयात व्यासंग, बहुश्रुतपणा, जिज्ञासुपणा, संशोधन-अभ्यासाचे सर्वच निकष पाळलेले दिसून येतात. या ग्रंथात संतसाहित्य, दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य, लोकसाहित्य, आधुनिकता, संज्ञाप्रवाह इ. वाङ्मयीन साहित्य प्रवाहांची संकल्पना, स्वरूप, वैशिष्ट्ये या सर्वांचीच यथायोग्य वस्तुनिष्ठ, प्रकारनिष्ठ चर्चा संबंधित लेखकांनी घडविलेली आहे.

डॉ. दत्तात्रय डुंबरे यांनी 'संत साहित्याचे आंतरविद्याशाखीय संशोधन' या लेखातून ललित कला व ललितेतर कला, वैचारिक व शास्त्रीय वाङ्मयाशी संत साहित्याचा अनुबंध असल्याचे उदाहरणासहित डॉ. डुंबरे यांनी अधोरेखित केले आहे. अर्थात जीवनाच्या सर्वच अंगांना आणि ज्ञानशाखा व विषयांना स्पर्श करणारे संत वाङ्मय आहे.

महाराष्ट्राच्या आध्यात्मिक व सांस्कृतिक जीवनात संत ज्ञानदेव व एकनाथकृत हरिपाठाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. हे या ग्रंथात प्रा. डॉ. ज्ञानेश्वर थोरात यांनी सप्रमाण सिद्ध केले आहे. या लेखामुळे या गौरवग्रंथाची सांस्कृतिक उंची वाढण्यास मदत झालेली आहे. 'तुकारामांचा संघर्ष' या लेखातून श्री. रामदास टेकाळे यांनी संत तुकारामांच्या जीवनातील बहुविध संघर्षाचे चित्रण केलेले आहे.

'दलित साहित्य' या विभागांतर्गत प्रा. डॉ. विलास थोरात यांनी दलित साहित्याची संज्ञा, संकल्पना व स्वरूप विशद करून दलित साहित्याचे सामर्थ्य व मर्यादा अधोरेखित केल्या आहेत. दलित साहित्याने विश्वव्यापक जाणीव निर्माण केल्याचा प्रत्यय यातून जाणवतो. दलित साहित्याच्या

संशोधनासाठी नवीन दिशा व विषय सूचित केलेले आहेत. हा लेख दलित साहित्याच्या अभ्यासक व संशोधकांना चिंतन करायला लावणारा आहे. प्रा. डॉ. बाळासाहेब सोनवणे यांनी 'दलित कादंबरीच्या वाङ्मयीन मूल्यमापना'ची गरज प्रतिपादन केली आहे. प्रा. डॉ. धनजंय वाघमारे यांनी दलित वाङ्मयाला दलित वाङ्मय न संबोधता 'आंबेडकरी साहित्य' म्हणावे, ही डॉ. यशवंत मनोहरांची भूमिका सप्रमाण विशद केल्यामुळे दलित साहित्याच्या प्रवाहाला हा विचार समृद्ध करणारा आहे. डॉ. श्रीप्रकाश वाघमारे यांनी आपल्या लेखातून आधुनिक काळातील महाराष्ट्रातील समाजसुधारक व वैचारिक निबंधकारांवर गौतमबुद्धांच्या विचारांचा पडलेला प्रभाव व त्यातून निर्माण झालेल्या साहित्याचा विचार केला आहे. मराठी वाचक, अभ्यासक, संशोधकांना बौद्ध तत्त्वज्ञानाचं वैचारिक बळ देणारा हा लेख ठरेल, असा मला विश्वास वाटतो. प्रा. राजेश्वर दुडुकनाळे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या विविध वाङ्मयप्रकारातील भाषा आविष्काराचे चिंतन घडविले आहे. एकूण या विभागातील सर्वच लेख चिंतनीय, उद्बोधक असेच आहेत.

'ग्रामीण साहित्य' या विभागांतर्गत चार लेख ग्रामीण साहित्याबद्दल मौलिक विचार मांडणारे आहेत. विशेषतः नव्या पिढीतील ग्रामीण कथाकार, कादंबरीकार यांच्याबद्दल मूलभूत स्वरूपाचे विचार स्पष्ट झालेले आहेत. मराठीतील नवे अभ्यासक, संशोधक ग्रामीण साहित्याकडे मोठ्या आस्थेने, जाणीवपूर्वक, आपुलकीने बघतात. या साहित्याचे चिंतन करतात, हेच यातून सिद्ध होते.

'तिसरा भारत' आदिवासी भारताच्या संवेदना, आदिवासी साहित्याची संज्ञा, संकल्पना, वैशिष्ट्ये व प्रेरणा विशद करून प्रा. डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर यांनी या समाजाबद्दलची व पर्यायाने या साहित्याबद्दलची आपली प्रखर संवेदनाच प्रकट केली आहे. दलित, ग्रामीण साहित्यापासून प्रेरणा घेऊन आदिवासी साहित्याने आज आपला स्वतःचा ठसा उमटविलेला आहे.

मराठी लोकसाहित्य 'बंजारा लोकसाहित्या'ने अधिक विकसित केल्याची जाणीव या ग्रंथातून प्रा. डॉ. अनिल गर्जे यांच्या लेखातून होते.

स्त्रीवाद, आधुनिकता, नवता या परिप्रेक्ष्यातून मराठी लेखिकांच्या कादंबरीतील भावजीवन अधोरेखित करून आधुनिकतेचे मूल्य, या मूल्याची चिकित्सा या ग्रंथात प्रा. डॉ. शशिकांत साळवे यांनी केली आहे. आधुनिकता या मूल्याची चर्चा, चिकित्सा अत्यंत मौलिक स्वरूपाची आहे.

याशिवाय या ग्रंथात प्रा. डॉ. दिलीप कसबे, प्रा. डॉ. अनिल उगले, प्रा. संदीप घोडे इ. लेखकांनी मौलिक विचार आपापल्या लेखातून मांडले आहेत.

विशेषतः या गौरवग्रंथात प्रा. डॉ. भास्करराव शेळके यांच्या कौटुंबिक परिवारातील सदस्यांनी डॉ. शेळके यांची कौटुंबिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक भूमिका विशद केली आहे. दूरच्या माणसांपेक्षा आप्त स्वकीयांना डॉ. शेळके यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल जो आदर आहे, तो या भागातून अधोरेखित होतो आहे. या सर्वांच्याच मनोगतातून असे स्पष्ट होते की, डॉ. शेळके हे स्वतःसाठी, स्वतःच्या कुटुंबासाठी तर धडपड केलीच, परंतु सर्वाधिक धडपड, त्याग, वेळ, तन, मन, धनाने ते इतरांसाठी अधिक. यातच त्यांचे मोठेपण आहे, असे मला वाटते. विद्यापीठीय संशोधनात स्वतःच्या कर्तृत्वाने, मार्गदर्शनाने डॉ. शेळके यांनी अभ्यासकांमध्ये, संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये एक संशोधनाची वृत्ती, संशोधनाची शिस्त, प्रबंध लेखनाची शिस्त रुजविण्याचे अत्यंत मोलाचे कार्य केल्याचे या ग्रंथाच्या सिद्धतेवरून लक्षात येते.

आज जागतिकीकरणाच्या युगात व्यक्तींचे श्रेष्ठत्व मोजण्याचे निकष व्यावहारिक व आर्थिक स्वरूपाचे झाले आहे. परंतु या गौरवग्रंथाच्या माध्यमातून प्रा. डॉ. भास्करराव शेळके या व्यक्तिमत्त्वावर प्रेम करणाऱ्या असंख्य विद्यार्थ्यांनी ग्रंथसंपादन रूपाने कृतज्ञता शब्दबद्ध केली आहे.

काही शिक्षक भाग्यवान असतात. काहींचे भाग्य आड येते. ह्यातीत गौरवग्रंथ सिद्ध होण्याची अलीकडे खातरी नाही. अनेकांना हे भाग्य लाभले नाही. पण भास्कर या बाबतीत भाग्यवान आहे. साधारण 'युज ॲन्ड थ्रो'च्या जमान्यात शिक्षकांना विद्यार्थी भेटत नाहीत. पण भास्करचे विद्यार्थी त्यांच्या कायम संपर्कात असतात. त्याचे घर या सर्वांचेच घर आहे. सतत चर्चा, मार्गदर्शन चालू असते. म्हणूनच त्या सर्वांचे कौटुंबिक जिव्हाळ्याचे संबंध मी अनुभवले आहेत. त्याचाच परिपाक म्हणजे 'संशोधन आणि साहित्यप्रवाह' हा गौरवग्रंथ आहे. अन्यथा पदरमोड करून आज कोणी पुढे येत नाही. ही त्यांची मुलं आहेत, त्यांचे हे कुटुंब आहे. त्याला कुटुंब नियोजनाची मर्यादा नाही. त्यांचा परिवार वाढत जावो, वाचक त्यांच्या गौरवग्रंथाचे स्वागत करतील, अशी खातरी आहे. माझे आशीर्वाद या सर्व परिवाराच्या पाठीशी सदैव आहेतच.

**प्राचार्य रा. रं. बोराडे**

# अनुक्रमणिका


संपादकीय ............................................................................४-६
प्रस्तावना ............................................................................७-१०

**विभाग 'अ' – संतसाहित्य..................................................१३-५२**

१. संत साहित्याचे आंतरविद्याशाखीय संशोधन/डॉ. दत्तात्रय डुंबरे/१३
२. संत ज्ञानदेवकृत हरिपाठावरील साहित्यातील तत्त्वज्ञान/डॉ. ज्ञानेश्वर थोरात/३२
३. तुकारामांचा संघर्ष/प्रा. रामदास टेकाळे/४९

**विभाग 'आ' – दलित साहित्य..............................................५३-११४**

१. दलित साहित्य आणि संशोधनाच्या दिशा/डॉ. विलास थोरात/५३
२. दलित कादंबरीचे वाङ्मयीन मूल्यमापन/डॉ. बाळासाहेब सोनवणे/७०
३. आंबेडकरवादी कवितेची समीक्षा/डॉ. धनंजय वाघमारे/८५
४. भगवान गौतम बुद्धांच्या विचारधारेतून आविष्कृत झालेले वैचारिक लेखन/डॉ. श्रीप्रकाश वाघमारे/९१
५. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याची भाषाः एक आकलन/प्रा. राजेश्वर दुडूकनाळे/१११

**विभाग 'इ' – ग्रामीण साहित्य.............................................११५-१६४**

१. वि. शं. पारगावकर यांच्या कथांचे वाङ्मयीन मूल्यमापन/डॉ. सीताराम निघूट/११५
२. नव्वदोत्तर ग्रामीण कांदबरी स्वरूप आणि वैशिष्ट्ये/प्रा. छाया बारवे/१३०
३. सदामुख देखमुख यांचे वाङ्मयीन मूल्यमापन/प्रा. सुवर्णा खोडदे/१३६
४. प्रा. अप्पासाहेब खोत यांचे कादंबरी वाङ्मय/प्रा. सुनिता पावडे/१४८
५. 'तणकट' कादंबरीतील कृषिजीवन/प्रा. नरेंद्र वाव्हळ/१५६

**विभाग 'ई' – आदिवासी साहित्य.........................................१६५-१८१**

१. आदिवासी साहित्याची संकल्पना, वैशिष्ट्ये व प्रेरणा/डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर/१६५

**विभाग 'उ' – लोकसाहित्य...................................................१८३-२०८**

१. मराठी लोकसाहित्यात लमाण (बंजारा) लोकसाहित्याचे स्थान/डॉ. अनिल गर्जे/१८३
२. बशीरभाई मोमीन यांच्या काव्यातील विविधता/डॉ. दिलीप कसबे/१९२

विभाग 'ऊ' - आधुनिकता/स्त्रीवादी साहित्य........................२०९-२३०
१. आधुनिकतेचे स्वरूप/डॉ. शशिकांत साळवे/२०९
२. अरुण साधू यांच्या कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखा/प्रा. संदीप घोडे/२२३

विभाग 'ए' - संज्ञाप्रवाह ..............................................२३१-२४०
१. संज्ञाप्रवाहाची पार्श्वभूमी व संकल्पना/डॉ. अनिल उगले/२३१

विभाग 'ऐ' - चरित्र वाङ्मय............................................२४१-२५२
१. संत गाडगेबाबांची विज्ञाननिष्ठा/प्रा. नितीन भालेराव/२४१

विभाग 'ओ' - व्यक्तिविशेष.............................................२५३-२८४
१. डॉ. भास्करराव शेळके - एक व्यक्ती आणि वल्ली/प्रा. एस.ई. दरेकर/२५३
२. प्रा. डॉ. भास्करराव शेळके/प्रा. सयराम शेळके/२५७
३. अभिचे पप्पा/सौ. तारादेवी शेळके/२६३
४. माझे पप्पा - माझे फ्रेंड, फिलॉसॉफर आणि गाईड/डॉ. अविनाश शेळके/२६५
५. बाप माणूस/श्री. विठ्ठल पांडे/२६९
६. छायाचित्रे/२७१
७. डॉ. भास्कर शेळके (गौरवमूर्ती) यांचा परिचय/२७९

# विभाग 'अ'

# संतसाहित्य

# संत साहित्याचे आंतरविद्याशाखीय संशोधन

प्रा. डॉ. दत्तात्रय डुंबरे

मध्ययुगीन कालखंड हा समूहजीवनाला प्राधान्य देणारा होता. या काळात निर्माण झालेले संत वाङ्मय समाजाच्या सर्व स्तरापर्यंत पोहचून अवघ्या मराठी मनावर आपला ठसा उमटवणारे आहे. संतांची चिकित्सक वृत्ती व निखळ आत्मप्रत्ययातून आलेला बुद्धिप्रामाण्यवाद हा आधुनिक तत्त्वांची पायाभरणी करणारा ठरला. म्हणून तर संतांचे अभंग वाङ्मय अनेक शतके लोटली तरी 'अभंग' स्वरूपात आहे. आज सातशे वर्षे लोटल्यानंतरही संत वाङ्मयाची लोकप्रियता कमी झालेली नाही. साहित्य हा समाजमनाचा आरसा असतो. संतांनी समाजाला देवभोळे न बनविता समाजमनाची मशागत करून त्यात सद्‌विचारांची, जीवनमूल्ये पेरली. त्याचाच परिपाक म्हणून नंतरच्या काळात भागवत धर्माच्या नेतृत्वाखाली अवघा महाराष्ट्र संघटित झाला. त्याचा उपयोग पुढे शिवछत्रपतींना स्वराज्य स्थापनेसाठी झाला. संतांनी मराठी मनाची मशागत केली नसती तर स्वराज्याची बीजे त्यात रुजली नसती म्हणून तर गं. बा. सरदार त्यास 'संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रृती' मानतात तर बा. र. सुंखठणकर महाराष्ट्र संतमंडळाचे ऐतिहासिक कार्य' म्हणून गौरवितात.

संस्कृत भाषेत एकवटलेले ज्ञान प्राकृतात आणून पंरपरेला छेद देणारे व सामान्य माणसाची भाषा हीच ज्ञानभाषा असू शकते ही प्रतिज्ञा करणारे ज्ञानदेव आद्यक्रांतिकारक ठरतात. ज्ञानाला भाषेच्या भिंतीत आम्ही डांबून ठेवू शकत नाही. ज्ञान हे सर्वथैव पवित्र व प्रवाही असते. कोणत्याच एका ठरावीक भाषेच्या बंधनात ते अडकू शकत नाही हे ज्ञानदेवांपासून ते तुकोबांपर्यंत सर्वच संतांनी दाखवून दिले. सामान्य माणूस केंद्रस्थानी मानून मानवतावादी दृष्टीने समता, बंधुता आदी जीवनमूल्यांची पेरणी करून भेदाभेद भ्रम अमंगळ ठरविला. त्याचबरोबर सद्‌सद्‌विवेकबुद्धी जागृत करून उघड्या डोळ्यांनी समाजाला जगण्याचा संदेश देणारे संत हे समाजशास्त्रज्ञही ठरतात.

संत परंपरा म्हणजे केवळ वारकरी संतपरंपरा एवढ्यापुरता हा विषय स्तिमित होऊ शकत नाही. महानुभाव, दत्त, वैष्णव, शैव, सुफी, जैन, बौद्ध आदि सर्व स्तरांतून समाजाला नवचेतना देणारे, अंधश्रद्धेची जळमटे झटकणारे, नवविचारांची प्रेरणा देणारे संत उदयाला आले आहेत. परिवर्तनाचे सामर्थ्य या चळवळीत असल्यामुळे केवळ भक्तिमार्गापुरतीच ही चळवळ न राहता सर्वांगाने परिपूर्ण ठरली आहे.

ज्ञानदेवांच्या अगोदर काही काळ महानुभाव संप्रदाय उदयाला आला. विचारांचे व्यासपीठ त्यासोबत कृतीचा आदर्श त्यामुळे महाराष्ट्रीय समाजात ही चळवळ चांगलीच रुजली. केवळ पुरुषांनीच लेखन केले असे नाही तर महदंबे सारख्या महिलाही लेखनात आघाडीवर होत्या. स्त्री-पुरुष समानतेचे नारे २१व्या शतकात आम्ही देतो तेव्हा 'स्त्रीवादाचे' मूळ आम्हाला १२व्या शतकात शोधावे लागते. गद्य-पद्य क्षेत्रांत रचनेच्या अंगाने विविधता महानुभावीय साहित्यात दिसते तशीच ती वारकरी वाङ्मयातही दिसते. वृथा पंथाभिमान, धर्माभिमान, वर्णाभिमान यांना तिलांजली देऊन माणसाकडे माणूस म्हणून पाहायला या चळवळींनी शिकविले म्हणून संत चळवळीचा अभ्यास केवळ 'धर्मसुधारणावादी चळवळ' एवढ्यापुरता मर्यादित न ठेवता सर्वथैव, सर्वांगाने होणे गरजेचे ठरते. या सर्वच संतांनी तेथील लोकबोली, लोककथा, दैवतकथा यांचा आपल्या साहित्यात ठायीठायी वापर केला. 'जनसामान्यांच्या परिवर्तनवादी आकांक्षेस सिद्ध करीत असते. त्या त्या प्रदेशाच्या संताशी त्यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे असे संबंध होते.'[१]

संत चळवळीचे मूल्यमापन करताना डॉ.र.बा.मंचरकर हे न्या.म.गो.रानडे यांच्या Rise of the Maratha Power या ग्रंथाचा संदर्भ देऊन स्पष्ट करतात की,[२] आपल्या चारित्र्याने, शिकवणीने व साहित्याने संतांनी जातिसंघटनेची दृढता शिथिल केली. स्त्री-पुरुष समानतेसोबत परस्पर संबंधात सहिष्णुता आणली. हिंदू-मुस्लीम संबंधात जवळीक निर्माण करून कर्मकांडांना विरोध केला. ईश्वरोपासनेचा उत्कृष्ट मार्ग प्रेम व श्रद्धा हाच आहे हे पटवून देताना बहुदेवतावाद नियंत्रित केला.

सेंदरी हेंदरी दैवते कोण पुजिती भूते खेते।'

असे सांगून 'आम्ही त्याचे दास। ज्याचा पंढरीये वास' हा दृढभाव अधोरेखित केला. अज्ञान, अंधश्रद्धा, जातीयता, धर्मभेद, वर्गभेद, यांना विरोध तर केलाच पण व्यसनमुक्तीचेही मोठे काम केले आहे.

'सेवी भांग अफू तंबाखू उदंड ।
परि तो अखंड निद्रेमाजी ।।

तुका म्हणे ऐसा सर्वस्वे बुडाला ।
त्यासी अंतरला पांडूरंग ।।

(सार्थ तु.गा.-जोगमहाराज प्रत)

म्हणून महाराष्ट्राचेच नव्हे तर संपूर्ण भारताचे सांस्कृतिक संचित म्हणून या पंरपरेकडे पाहताना या परंपरेचा येथील जीवन, साहित्य, विचार, मूल्य यांच्यावर मोठा प्रभाव पडल्याचे निदर्शनास येते.

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म।
भेदाभेद भ्रम अमंगळ।। (तुकाराम गाथा, ४६)

हे सांगून 'भिक्षापात्र अवलंबणे। जळो जिणे लाजिरवाणे।' ही स्वाभिमानी वृत्ती अंगी बाणवली. गाजराच्या पुंगी सारखे बाह्य वेशधारी, ढोंगी बैरागी झाले आहेत. अंगाला राख फासून कुणी साधू होतो का? गुहेत राहून काय अर्थ? बिळात राहणारे उंदीर थोडे आहेत का? अशा बाह्य सोंगांना तुकोबांनी फटकारले ते म्हणतात, [३]

'भाव नाही काय मुद्रा वाणी।
बैसे बगळा निश्चळ ध्यानी।।' (तु.गा.१७६७)

ज्याच्या मनात भाव नसतो त्याने ध्यान लावून बसू नये. त्याचे ध्यान बगळ्याप्रमाणे होत असते. समर्थ रामदास म्हणतात -

'हाती द्रव्याची जपमाळ। कांताध्यान सर्वकाळ।
सत्संगाचा दुष्काळ । या नाव बद्ध।। (दासबोध ५.७.३९)

सदासर्वकाळ द्रव्याचा हव्यास, स्त्रीचे ध्यान आणि संतसंगतीचा अभाव ही बद्धाची लक्षणे आहेत. अशा बद्धाला आत्मस्वरूपाची जाणीव करून देऊन भवनदीची दुस्तर पायवाट सोपी करण्याचे काम संतचळवळीने केले. 'भक्तिपंथ बहु सोपा' म्हणून मनाने विषण्ण व सैरभर झालेल्या समाजाला संतांनी भक्तीची सोपी वाट दाखविली मात्र त्यासोबत सद्सद्विवेक बुद्धी, बुद्धिप्रामाण्यवाद जागृत करून डोळस बनविले. अज्ञानरूपी चक्षुत ज्ञानरूपी अंजन घालून दृष्टीला नवे तेज देण्याचे कार्य संतचळवळीने केले आहे. म्हणून या चळवळीचा अभ्यास केवळ सामाजिक अंगानेच करता येणार नाही तर त्यांनी विविधांगी भूमिकेतून मार्गदर्शन केल्यामुळे ही विचारधारा बहुआयामी ठरली आहे. त्यांच्या एकेका पैलूचा सविस्तर विचार होणे गरजेचे वाटते. डॉ. निर्मलकुमार फडकुले म्हणतात, 'संत हे जीवनाचे भाष्यकार आहेत. त्यांनी जीवनाचे निरीक्षण आणि परीक्षण तटस्थपणानं करून त्यावर आपली अर्थपूर्ण प्रतिक्रिया व्यक्त केलेली असते.[४] सर्वच संत ठरावीक एका वर्गातून आले नाहीत. येथील विविध जाती, पंथ, वर्ग, यांतून आले आहे. येथील समाज,

संस्कृती, ग्रामजीवन यांच्याशी त्यांच्या विचारांची घट्ट नाळ जुळलेली आहे. गं.बा.सरदार म्हणतात की, 'वारकरी संतांनी बहुजन समाजाला आपल्या आंतर्जीवनाचा साक्षात्कार घडविला. त्यामुळे लक्षावधी शूद्रांच्या दुःखमय जीवनात एक नवी अशा निर्माण झाली. आपल्या मन:सामर्थ्यांचा त्यांना प्रथमच प्रत्यय आला आणि त्याच्या विकासाला स्वतंत्र क्षेत्रही सापडले. खेड्यापाड्यातील या गरीब व कष्टाळू लोकांना प्रवृत्तीचा प्रयत्नवादाचा उपदेश करण्याची गरजच नव्हती. ते पिढ्यानपिढ्या आपल्या व्यवसायात खपतच होते. तरीही त्यांचे दैन्य कधी फिटले नाही. ज्या समाजरचनेने त्यांचे दैन्य कधी दूर केले नाही. ज्या समाजरचनेने त्यांचे भौतिक जीवन जखडून टाकले होते. ती आरपार बदलून टाकण्याचा प्रश्नच त्या विशिष्ट परिस्थितीत उत्पन्न होण्याचा संभव नव्हता. त्यांच्यातील मनुष्यत्व मेले होते. भागवतधर्माने ते मनुष्यत्व त्यांना परत मिळवून दिले.'[५]

येथील संत चळवळीचे प्रमुख योगदान म्हणजे मध्ययुगीन कालखंडात सामान्य माणूस जेव्हा सैरभैर झाला होता त्यावेळी त्याला सुयोग्य दिशा दाखविण्याचे कार्य या चळवळीने केले आहे. माणसाकडे माणूस म्हणून पहा. ही मानवतावादाची शिकवण देताना 'दया तिचे नाव भूतांचे पाळण । आणिक निर्दाळण कंटकांचे।' ही सजगता निर्माण केली. काम सोडा व राम म्हणा असा भाबडा उपदेश या चळवळीने केला नाही. 'पोटापुरते काम। परि अगत्य तो राम।' किवा 'कामा मध्ये काम। काही म्हणा रामराम' ही शिकवण दिली. स्वकर्माला स्वधर्माचे अधिष्ठान दिले. कर्मच्यूत न होता कर्मरत हो! असा उपदेश केला. म्हणून सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, ऐतिहासिक, वैज्ञानिक आदी कोणत्याही अंगाने अभ्यास केला तर 'आम्हा घरी धन। शब्दांचीच रत्ने।' ही शब्दरत्ने विधायकतेकडे वळवून वास्तवता, सद्सदविवेकता, बुद्धिप्रामाण्य, आधुनिकता, नैतिकता, आदी पैलूंनी नटविली, म्हणून तर संतवाङ्मयाचा कोहिनूर आज महाराष्ट्र सारस्वताच्या कोंदणात गेली सातशे-आठशे वर्षे आपल्या तेजाने तळपत आहे. या चळवळीचे दुसरे वैशिष्ट्य असे की या संत मंडळींचा प्रत्येक गोष्टीचा बारीक सारीक अभ्यास होता. कीर्तनसंस्थेचा जनक ज्या नामदेव महाराजांना मानतात त्यांच्या कीर्तनाला पूर्णपणे शिक्षणशास्त्रीय अधिष्ठान आहे. ज्ञानेश्वरीतील मन, बुद्धी, चेतना, भावना, वासना अवधान, अध्ययन या संकल्पना मानसशास्त्राशी निगडित आहेत. मानसशास्त्राची पहिली प्रयोगशाळा जर्मनीतील लाईपझिंग येथे १८६९ मध्ये स्थापन झाली. त्यापूर्वी ५०० वर्षे ज्ञानदेवांसारखे मानसशास्त्रज्ञ मानसशास्त्राच्या मूलभूत संकल्पना मांडतात हे अलौकिकत्व नव्हे काय?

म्हणून संत साहित्याचा अन्य भाषांशी जसा संबंध आहे. तसा अन्य विषयांशीसुद्धा अनुबंध आहे. संतांनी मांडलेल्या विचारांकडे जिज्ञासुवृत्तीने व संशोधकीय अंगाने पहिले तर हे चटकन ध्यानात येते म्हणून संत साहित्याचे आंतर्विद्याशाखीय संशोधन होणे गरजेचे ठरते. शिक्षणशास्त्रात ज्या प्रमाणे एका विषयाचा अन्य विषयाशी अनुबंध जोडला जातो. त्याप्रमाणे अभ्यास केला तर संत साहित्य सुद्धा इतिहास, भूगोल, समाजशास्त्र, ललितकला, अर्थशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र आदी सर्व विषयांना स्पर्श करते. एवढेच नव्हे तर संत साहित्याने ७०० ते ८०० वर्षांपूर्वी अनेक सिद्धांत मांडले आहेत. त्यावरही संशोधन होणे गरजेचे आहे. 'संत साहित्यातील विज्ञान' 'गणेश विज्ञान', वेदांतील विज्ञान' असे ग्रंथ दिशादर्शक म्हणून विचारात घेता येतील. ह.भ.प.वै. रामदासबोवा मनसुख' नावाचे एक मोठे कीर्तनकार होऊन गेले. त्यांनीच पंढरपूर बडवे विरोधी आंदोलन केले व वारकरी महासंघ स्थापन केला. या रामदासबोवांचे काही लेखन यादृष्टीने तपासता येईल. ज्ञानेश्वरीत किंवा संतविचारात वैज्ञानिक दृष्टिकोण कसा आहे हे पटवून देताना विज्ञानातील काही शोध जगासमोर येण्यापूर्वी संतचळवळीने आपल्या साहित्यात त्यावर भाष्य केल्याचे प्रतिपादन मनसुख महाराजांनी केले आहे.[६] हेच वेदांतील विज्ञान या ग्रंथात धनंजय देशपांडे यांनी सप्रमाण पटवून दिले आहे. म्हणून संत साहित्य किंवा तत्पूर्वीचे प्राचीन वाङ्मय हा आमचा अमूल्य ठेवा आहे. त्यात आंतरविद्याशाखीय अभ्यास पहायला मिळतो. म्हणून संत साहित्याचे आंतरविद्याशाखीय संशोधन होणे गरजेचे आहे.

**अ) भूगोल :** भूगोल विषयाशी संबंधित बहुविध घटकांवर संत साहित्यात चिंतन आढळते.

अ) **उदा.**[७]

१) का परमाणूमाजी सामावे। भूगोल हा।। (ज्ञाने.१०/७०)

२) उत्तमाते धरिजे। अधम तरी अव्हेरिजे।
हे काहिच नेणिजे। वसुधा जेवी।। (ज्ञाने. १२/१४५)

**ब) वायू :** वायू म्हणजे वारा या विषयी रा.शं.नगरकर यांनी आपल्या संत सुभाषित कोशात ज्ञानेश्वरीतील २४ ओव्यांचा निर्देशित केल्या आहेत.
उदाहरणादाखल पुढील काही ओव्या[८]

१) नाना पवनाचा साटू।वाजीनलिया नीटू।
आंगेरी बोभाटू।सांडिती मेघ।। (ज्ञा. १८/७३४)

२) वारा आभाळाचे फेडी।वांचूनि सूर्याते न घडी।। (ज्ञा.१८/१२३१)

क) जल :

संत सुभाषित कोशात जलतत्त्वाची विभागणी जल, समुद्र, नदी, मेघ, जलचर, अशी विविधांगी केली.९ त्यापैकी ज्ञानदेवांच्या फक्त पाणी या विषयावर भावार्थदीपिकेतील १०७ ओव्यांत संदर्भ आढळतात. तर ढगांबाबत ०५ ओव्यांचे संदर्भ नगरकर नोंदवितात याशिवाय अमृतानुभव, ज्ञानदेवांची अभंगगांथा यांतीलही काही संदर्भ त्यांच्या कोशात आहेत. नाथांच्या भागवतातील १६ ओव्यांचा संदर्भ तर दासबोधातील ०७ ओव्यांचा संदर्भ त्यांनी दिला आहे. तुकाराम गाथेतील १५ अभंगांचा संदर्भ नगरकर 'पाणी' या एका विषयाशी नोंदवितात. उदाहरणादाखल पुढील 'पाणी' या विषयावरील संतवचने नोंदविता येतील -

**१) संत ज्ञानदेव**

१) जरी उदके उदकी बुडीजे। (ज्ञा.२/३३६)

२) गाईची तृषा हरूं।कां व्याघ्रा विष होऊनी मारू।
ऐसे नेणेचि का करूं।तोय जैसे।। (ज्ञा.१२/१४७)

(टीप - अलीकडे पाण्याला आपण संपत्ती म्हणू लागलो आहे. पाण्याचे महत्त्व समजल्यामुळेच भारतीय जलसंपत्ती मंडळ, पुणे सारख्या किंवा राजेंद्र सिहांच्या जोहाड सारख्या संस्था उभ्या राहिल्या. जलसाहित्य संमेलन हा त्यापैकीच एक भाग मात्र पाण्याचे महत्त्व ७५० वर्षांपूर्वीच संत परिवाराने अधोरेखित करून ठेवले होते. याकडे निर्देश करावा लागेल.९

**२) नामदेव महाराज**

१) जळाचा जळबिंदू जळीच तो विरे। (नामदेव गाथा-६४८)

२) वाचे म्हणता गंगा गंगा।सकळ दोष जाती भंगा।। (नामदेव गाथा)

**३) एकनाथ महाराज**

१) सागरी भरे भरते। ते भरतें भरे तरियांते।। (ए.भा.१/९४)

२) जेवी मिळता लवणपणी। अभिन्नपणी समरसे।। (ए.भा.९/३९०)

**४) समर्थ रामदास**

१) पाणी पाणवटे जैसे।आपण चि धांवे (दास ७.९.११)

२) ओघ निवडीला निवडेना।गंगेमध्ये।। (दास.९.३.३५)

**५) तुकाराम महाराज**

१) मेघवृष्टी काही न विचारी ठाव। (तु.गा.३३१४)

२) उदक भिन्न असे काई।
वाहळ, बावी सरिता नई।। (तु.गा.३४६१)

**आकाश** - "अणू रेणू या थोकडा । तुका आकाशाएवढा ।।'

हे तुकोबारायांचे वचन सर्वश्रृत आहे. अणू-रेणू-आकाश या संकल्पना संतवाङ्मयात पदोपदी वाचावयास मिळतात. भूगोल किंवा भौतिकशास्त्र, अवकाश संशोधक यांच्या चिंतनाचा हा विषय आहे. जयंत नारळीकर, संत विचारांचा धागा पकडून 'आकाश' या विषयावर संशोधनास वाव आहे. गरज आहे ती शोधक नजरेची.

संत सुभाषित कोशात नगरकरांनी 'आकाश' या विषयावर पृ.क्र.वर १८, १९, २० वर ज्ञानदेवांच्या सुमारे ३० ओव्यांचे संकलन केले आहे. वर निर्देशिल्याप्रमाणे तुकोबांच्या अभंगातही 'आकाशा' बाबत चिंतन आहे याशिवाय नामदेव, एकनाथ, जनाबाई, आदिंच्या रचनांतही शोध घेता येईल आकाश/अवकाश यासंबंधी पुढील काही महत्त्वांच्या ओव्यांची नोंद घेता येते.

१) देखे आकाश आणि अवकाश।भेदू नाही जैसा। (ज्ञा.५/३०)

२) जगा एकुचि अवकाशु। आकाश जैसे।। (ज्ञा.१३/३५५)

याशिवाय सूर्य, मेघ, पर्जन्य, नद्या. ओहोळ, समुद्र, जलचर, भूचर इ. सर्वांविषयी सखोल चिंतन संत साहित्यात पाहावयास मिळते. 'पर्जन्याची सुटीका जैसी।' या सारख्या ओव्या यासंबंधी पुरेशा बोलक्या आहेत. तुकोबारायांच्या अभंगांत तर पदोपदी नदी, ओहोळ, पाणी, वारा यांचे उल्लेख आढळतात. कारण संतांनी 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे।' हा स्थायिभाव टिकवून ठेवला होता. म्हणून तर त्यांना पक्ष्यांचे गुंजन सुस्वर गीत वाटते. 'येणे सुखे रुचे एकांताचा वास।' तो याच साठी; कारण लोकांतापेक्षा एकांतात निसर्गाचा सहवास सृष्टीरूपाने भरून नटलेला पांडुरंग त्यांना ठायीठायी दृष्टीस पडत होता. म्हणून तर या भूतलावरील प्राणिमात्रांच्या दयेबाबत ते आग्रही आहे. परिसंस्था टिकली पाहिजे ही पर्यावरणीय संवेदना त्यांच्या ठायी होती म्हणून Environment किंवा Biodiversity च्या अभ्यासकांना आपले संदर्भ संत साहित्यात मिळतील न जाणो नवसंकल्पना त्यातून पुढे येतील.

**२) विज्ञान**

विज्ञान विषयात भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र या प्रमुख शाखा आहेत. याशिवाय त्या-त्या शाखांमध्ये विविध नवीन प्रवाह आल्यामुळे त्यांतही आणखी उपयोजित शाखा निर्माण झालेल्या आहे. उदा. नॅनो टेक्नॉलॉजी, सूक्ष्मजीवशास्त्र, जैवतंत्रज्ञान, जैवरसायनशास्त्र, जैवविविधता, हरित तंत्रज्ञान, इ. मात्र. या सर्व शाखांना संत साहित्य स्पर्श करताना दिसते.

जीवशास्त्रातील जलचर, भूचर यातील जीवांचा संदर्भ संत साहित्यात येतो. आरोग्य, इंद्रिये, इ. सर्वांविषयी संतचळवळीने भरभरून लिहीले आहे.

रा.शं.नगरकरांच्या संत सुभाषित कोशात याविषयी ओव्यांचे वर्गीकरण पाहायला मिळते.

### जीवशास्त्र

**१) कीटक :** ज्ञानदेवांनी कीटकांविषयी सुमारे ३१ ओव्यांमधून विचार ज्ञानेश्वरीत मांडले आहे. नामदेवांच्या ०६ अभंगांचा संदर्भ नगरकर नोंदवितात तर नाथांच्या २७ ओव्यांमधील फक्त कीटकांबद्दल माहिती नोंदविली आहे. तुकोबांच्या सुमारे १६ अभंगाच्या संदर्भ ते देतात.१० याशिवाय जनाबाई, चोखोबा, सेना महाराज, बहिणाबाई, निळोबा आदिंच्या वचनांत संदर्भ सापडतात परिसंस्थेतील एक छोटा घटक म्हणजे कीटक त्यावर सविस्तर चर्चा विषयप्रतिपादनाच्या माध्यमातून दृष्टांताधारे केली आहे.

### कीटकांसंबंधी काही नोंदी

१) ढेकणाच्या बाजे सुखाची कल्पना (तु.गा.१५६४/३)

२) तुका म्हणजे आळी। जीवे नुरेचि वेगळी ।। (तु.गा.२३२७/४)

३) मुंगिये निघालिया पांख। तिसी मरण ये अचूक। (ए.भा.१/३६२)

४) जैशी गुळी माशीवर माशी। (ए.भा.१/२९२)

**पशुपक्षी :** पशुपक्ष्यांविषयी संतकवितांमध्ये पुढील काही संदर्भ पाहावयास मिळतात.

१) जैसे कां हिरवे चारी। भांबावे पशु।। (ज्ञा.१३/११८)

२) जै वासरुंचि गाय दुहे । तै वेळू कायसा ।। (ज्ञा.१८/८४)

ज्ञानेश्वरीत तर गाय, बैल, म्हैस, शेळी, कुत्रा, उंदीर मांजर, उंट, ससा, माकड, हरिण, हत्ती, कोल्हा, वाघ, सिंह, हे प्राणी तर कावळा, चिमणी, पारवा, पोपट, मोर, घुबड, चकोर, टिटवी, बगळा, राजहंस, आदी पक्ष्यांचे सुंदर वर्णन ज्ञानेश्वरी करतात. साधारणत: शंभरहून अधिक नोंदी पशु पक्ष्यांविषयी ज्ञानेश्वरीत आले आहे. याशिवाय साप, नाग, अजगर, सरपटणारे प्राणी यांचेही अनेक संदर्भ सापडतात.

### पक्षी विषयक ओव्या[११]

### संत ज्ञानदेव

१) व्याधाहातोनि सुटला।विहंगमु जैसा।। (ज्ञा.१२/१८१)

२) मोराचा आंगी असोसें। पिसे आहाति डोळसे।
परी एकली दिठी नसे।तैसे ते गा।। (ज्ञा.१८/७१८)

### संत नामदेवांच्या अभगांतील संदर्भ [१२]

१) तान्हे वत्स घरी धेनू चरे वनी।हंबरे क्षणक्षणा परतोंनि।। (ना.गा.९१८)

२) ताहाना फुटे परी उदक नेघे।मेघाची वाट पाहे रे।। (ना.गा.८३७)

**संत एकनाथ**

**१) जीवसृष्टी :** संत एकनाथांनी सुद्धा वर्ण्य विषयात शेळी, रेडा, गाय, मांजर, सिंह, चकोर, घुबड, मोर, मांजर, कावळा, वाघ, कुत्रे, गाय, साप, कोकीळ आदि पशुपक्ष्यांचे दृष्टांताआधारे वर्णन केले आहे.

उदा.

१) श्वानाचा धर्म करी वसवस। (एक गाथा - ३०६३/१)

२) का देखानि चंद्रकर। डोलो लागे चकोर (ए.भा.१/६४)

**२) भौतिकशास्त्र :** जड वस्तूंचा अभ्यास करणाऱ्या शास्त्रला भौतिकशास्त्र म्हणतात. Matter आणि spirit पैकी matter चा अभ्यास भौतिकशास्त्रात होतो. महर्षी कणादांनी अणुपेक्षाही सूक्ष्म घटकांचा अभ्यास मांडला होता तोच धागा तुकीबांच्या 'अणुरेणू या थोकडा तुका आकाशा एवढा।' या उक्तीत सापडतो.

भौतिक जगातील अनेक बाबी वर्ण्य विषयात येऊन जातात. कारण साहित्य हा समाजमनाचा आरसा असतो. समाजातील सर्व व्यवहारांचे चित्रण साहित्यात होते. संत चळवळीच्या साहित्यातही भौतिकशास्त्रातील अनेक सिद्धांत अनाहुतपणे येऊन जातात. उदा. 'आरसा' हा घटक घेतला तर संत चरित्रकोशात केवळ आरसा या विषयावर ज्ञानेश्वरांच्या २२ ओव्या, नाथांच्या ०४, समर्थांच्या ०२ तर तुकोबांच्या गाथेतील ०८ अभंग श्री. नगरकर नोंदवितात. सूक्ष्मदृष्टीने पहिले तर यापेक्षाही अधिक संदर्भ सापडतात.१४

**संत एकनाथ** - संत एकनाथांच्या एकनाथी भागवत व भावार्थ रामायणातील ०४ ओव्या कोशात नगरकरांनी नोंदविल्या आहेत. उदा.१५

१) आरसा काय प्रतिबिंब असे।
जो पाहे तोचि आभासे।। (एक.भा.३/५६)

२) आरशासी सहाणी तोडिजे।
तेणे स्वमुखा शुद्धत्व जोडिजे ( एक.भा.३/३८५)

वरील अभंग/ओव्यांशिवाय संत नामदेवराय, जनाबाई, नरहरी महाराज, सेना महाराज, गोरोबा काका आदिच्यांही रचना अभ्यासता येतील. या प्रत्येक संताने स्वकर्मात स्वधर्मरूपी विठ्ठल पहिला म्हणून दैनंदिन कामातील साधनांचा उल्लेख त्यांच्या रचनांत सापडतो. नरहरी सोनार आपल्या व्यवसायातील साधनांचा उल्लेख करतात. सेनामहाराज, नामदेवराय, गोरोबाकाका यांच्याही रचनात नित्यउपयोगी वस्तूंचा उल्लेख आढळतो. मात्र त्यांच्याकडे वर वर न पाहता वैज्ञानिक दृष्टिकोणातून पाहिले तर त्यातील विज्ञान सहज नजरेसमोर येते.

याशिवाय वाहने, मोती, शस्त्रास्त्रे आदिंबाबत सखोल पण दृष्टांतासाठी वापरलेली माहिती या साहित्यात मिळते. मध्ययुगीन कालखंडात जी दळणवळणाची साधने उपलब्ध होती त्यांची चर्चा करताना आर्किमिडीजचे तत्त्व पुढील ओवीतून दिसते. 'सांगे प्लवेचि काय बुडिजे।' (ज्ञाने २/२२३) याशिवाय समुद्राच्या लाटा, तरंग, पाण्याचे प्रवाहित्व काम, काळ, वेग याविषयीही सविस्तर माहिती सूक्ष्म निरीक्षण केल्यास दृग्गोच्चर होते. वाहनातून प्रवास करणाऱ्याला त्या वाहनाची गती प्राप्त होते हा भौतिकशास्त्रीय विचार माउलींच्या पुढील ओवीत सामावला आहे. ते म्हणतात.

'देखे रथी आरुढिजे।मग जरी निश्चळा बैसिजे।
तरी चळा होऊन हिंडिजे।परतंत्रता। (ज्ञा.३/३६०)

'धातू' या विषयाशीही निगडित अनेक अभंग। ओव्यांमधील दाखले सापडतात. तुकोबाराय एकदा देवालाच प्रश्न करतात की, हे देवा! मी तुझी कशाने पूजा करू? पाणी, पान-फुल की धातू ही तर सर्व तुझीच रूपे आहे. या सर्वांठायी तू व्यापकपणे आहे. महर्षी कणादांनाही matter सोबत spirit अभिप्रेत होते. पाश्चात्त्य विचारवंतांनी हा 'कणाद सिद्धांत' नाकारला मात्र जागतिक महायुद्धानंतर अणुबाँबच्या वापरातून जी भीषणता प्रसवली तेव्हापासून अलीकडच्या काळात 'कणाद सिद्धांत' मानायला सुरुवात झाली. तुकोबाराय किंवा अवघी संतचळवळ केवळ जडत्व मानत नाही तर प्रथमतः त्या matter चे अस्तित्व मानते. 'धातू' ही संकल्पना मांडताना विवेचनातून लोह, परीस, वज्र, हिरे, मोती, अशा अनेक बाबींचे वर्णन पाहावयास मिळते. परीस या धातूचे वर्णन माउली जितके भरभरून करतात. तितकेच वास्तवाचे आत्मभानही ठेवतात. जगाचे भरणपोषण, व्यवहार सोन्यात होतात परिसात नाही हे वास्तवदर्शन ते घडवितात उदा.

कनकत्व दीक्षा गुरु । लोहा परिसु होय किरू।
परि जगा पोसिना व्यवहारू। तें चि जाणे। (ज्ञा.१८/१६४९)

(अर्थ - लोखंडाला सुवर्णत्व देणारा परीस आहे पण जगाचे व्यवहार सोन्यात चालतात परिसात नव्हे.)

'धातू' या विषयावर ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकोबाराय यांच्या रचनांतील काही ठळक नोंदी पुढील प्रमाणे.

**संत ज्ञानदेव :**

१) विदळ बहु चोखा।मीनालिया वाला एका।
कसु होय पंचिका।जयापरी।। (ज्ञाने.१३/१००८)

२) कां मीनलेनि कीडे।जंव जंव तुक वाढे।

तंव तंव सोने हीन पडे।पांचिका कसी।। (ज्ञा.१४/१४१)

**संत नामदेव :**

हिऱ्याला पाण्यात टाकले तरी हिरा भिजत नाही. सोने हा धातू वापरून नाना अलंकार तयार केले तरी आकार बदलते, धातुत्व नाही. धातूची मूळ संरचना बदलत नाही असे अनेक विषय नामदेवराय हाताळतात.[१६]

उदा. १) सुवर्णाच्या पोटी जाला अलंकारू।
वानिती साचारण येकी भला।। (ना.गा.१००३)

२) हिरे जळामाध भिजतील कधी। (ना.गा.७५२)

**संत एकनाथ :**

नाथांच्या समग्र वाङ्मयात ठायीठायी परीस, सोने, लोखंड, हिरा, मोती, चुंबक, रत्ने यांचे उल्लेख आढळतात. ते म्हणतात. सोने कितीही काळ ठेवले तर ते कुजत नाही. चालू घडामोडीतील एका घटनेकडे लक्ष वेधणे गरजेचे ठरते. उदा. दक्षिणेतील पद्‌मनाभ, मंदिरात शेकडो वर्षांपूर्वीचे काही टन सोने सापडले. ते गंजलेले, कुजलेले, सडलेले नव्हते. सोने या धातूला गंज चढत नाही हा भौतिकशास्त्राचा सिद्धांत आहे. त्याचा सहजपणे वापर संत एकनाथ करतात. मग या संतांना विज्ञानवादी दृष्टी नाही? असे कसे म्हणता येईल. यासाठी पुढील दृष्टांत अभ्यासता येतील.

१) बहुकाळ ठेविले सुवर्ण। त्यासी म्हणजे कोण कुहजकु।। (ए.भा.१३७७३०)

२) जरी जाले अनर्घ्य रत्न। ते नव्हे शालिग्राम समान।। (भावार्थ रामायण असख्य १८/८१)

**समर्थ रामदास :**

समर्थांच्या दासबोध, मनाचे श्लोक, स्फुट रचना यांतही विविध धातूंचा उल्लेख आढळतो. सुवर्ण, शिंपले, मोती, लोह, लाख, रत्न, आदिंबाबत चर्चा आहे- याशिवाय मिठाच्या स्पर्शाने मोती कळाहीन होतो. लाखेची अभिक्रिया झाल्यामुळे सोने हिणकस होते. एखाद्या धातूवर धूळ बसली तर त्याचे तेज नाहीसे होते या आशयाची काव्यरचना पाहायला मिळते.[१८]

१) खाराचे संगती नासे मुक्ताफळ। (राम कवि.स्फु.ओ.५४/)

२) लाखेचे संगती सोने होय उणे। (राम.कवि.१स्फु.ओ.५४/८)

**संत तुकाराम :** इतर संतकविंप्रमाणे तुकोबांच्या रचनांतही वास्तववादी चित्रण आले आहे. परिसरातील जडवस्तूंची आकाश- अवकाशाचा विचार करणारे महाराज अणू-रेणूच्याहीपेक्षा सूक्ष्मतेचे चिंतन नोंदवितान दिसतात. धातूंना मुलामा देणे, शुद्ध धातू, अशुद्ध धातू, हिरे, रत्न मोती काच, अशी विविधांगी

चर्चा ते करतातच पण त्यासोबत उष्णता व विद्युत सुवाहक, दुर्वाहक यासंबंधीही सोने व खापर यांच्यातील तुलना ते करतात. सोन्याचे दागिने तयारा करताना त्यात इतर धातू मिश्र करण्याची सोनाराची पद्धती यावरही ते भाष्य करतात उदा.[१९]

१) सोने शुद्ध होते अविट ते घरी।
नासिले सोनारी अळंकारी।।२।। (तु.गा.१४९५)

२) हिऱ्या ऐशा गारी दिसती दुरोन।
तुका म्हणे घन न भेटे तो।।४।। (तु.गा. ५५१)

अशुद्ध धातू शुद्ध करण्याच्या प्रक्रियेला धातूचे 'परिष्करण' म्हणतात.[२०]

हा ही संदर्भ सहज दिसतो. एकूणच भौतिकशास्त्राच्या अभ्यासकांनी संदर्भ शोधताना प्राचीन, मध्ययुगीन साहित्याचा आधार घेतला तर त्यांना नवनवीन माहिती नजरेसमोर येईलच पण आमची संस्कृती, पूर्वी झालेला अभ्यास याविषयीही ओळख होईल. राईट बंधुंनी विमानाचा शोध लावला तत्पूर्वी रामायण, महाभारतात विमानाचे संदर्भ सापडतात. अलीकडील अभ्यासात ओंकार, श्वसन, अनुलोम- विलोम इ. चे भौतिकशास्त्राने नवीन प्रयोग करून आपला पूर्व ठेवा किती समृद्ध आहे याकडे लक्ष वेधले. याविषयीही ज्ञानेश्वरी, गाथा, दासबोध, एकनाथी भागवत यांत चर्चा पाहावयास मिळते. अलीकडे डॉ. बी. एच. पवार यांनी डॉ. बा. आं. म. विद्यापीठात हे स्पष्ट केले की, आम्ही कसे अन्न खातो, आमची जीवनशैली कशी यावर तुमचे आरोग्य अवलंबून आहे. श्वासावर लक्ष केंद्रित करून सकाळी अनुलोम- विलोम, प्राणायाम, योगा केले तर ते आरोग्याला कसे पोषक आहे हे भौतिकशास्त्रीय विचारांतून पटवून दिले.[२१] हे पटवून देताना व्यसनांचा मानवी आरोग्यावर किती दुष्परिणाम होतो व हृदयाला ते कसे हानिकारक आहे यावरही उहापोह केला. याच विचारांचा धागा तुकोबांच्या

''सेवी भांग अफु।तंबाखू उदंड।
परि तो अखंड।निद्रेमाजी।।''

या उक्तीशी जोडता येतो. संत साहित्य विज्ञानाप्रमाणेच मानवकल्याणाचा पुरस्कार करते. विज्ञानाचा वाईट वापर झाला तर दुष्परिणाम आहेत, पण संत विचारांचे मात्र तसे नाही. म्हणून ज्यांनी संत साहित्य वाचलेच नाही त्यांनी केवळ विज्ञानवादाचा पुरस्कार करून संत साहित्याबद्दल गरळ ओकू नये. संत साहित्य ही केवळ कविता नाही तर मानवी जीवनाचे कल्याण इच्छिणारे वास्तववादी साहित्य आहे. विज्ञानाच्या सर्वांगाला ते स्पर्श

करते मात्र मानव कल्याणापासून ते कणभरही बाजूला हटत नाही. ज्ञान आणि विज्ञानाचा पवित्र संगम या वाङमयात आहे गरज आहे ती आमच्या चोख व अविकारी दृष्टीची.

**रसायनशास्त्र :**

"Chemistry is brach of material science which deals with the study of composition (constitution) structure, & properties of material."[२२]

अशा या रसायन शास्त्रात अलीकडे प्रमुख पाच शाखा आहेत.,

1) Organic 2) Inorganic 3) physcial 4) Analytical chemistry 5) Bio-chemistry या पाच शाखांमध्ये विविध उपविषय आहेत. धातू अधातूवरील अभिक्रिया संयुग, कार्बनी आणि अकार्बनी संयुग पोषद्रव्ये, अन्नातील बिघाड, जैव तंत्रज्ञान, मृदा, क्षपण, भाजणे, वायू संमिश्र, रासायनिक अभिक्रिया अशुद्ध मृदा, शरीराची वाढ, रोग, विकार, कुपोषण, गलगंड, असमतोल पोषण, अपचन, अतिताण, प्रदूषण, जैव-उपचार आदि घटक ठळकपणे रसायनशास्त्राशी निगडित आहेत. हे सर्व घटक संतवाङ्मयात दृष्टांतरूपाने डोकावताना दिसतात. पाणी व त्यातील मिश्रणे, वास, चव, रंग, निद्रा, निद्रानाश, याविषयीही चिंतन संतवाङ्मयात आहे. उदा. कापुराचे ज्वलन याविषयी ज्ञानदेवांच्या हरिपाठात 'कापुराचे वाती। उजळल्या ज्योती। ठायीच समाप्ती झाली जैसी।' किंवा अमृतानुभवात

'कापुराचे थळीव। नुरेचि आगीची बरव' (अमृ. २/४२)

'नाना कापुरू आणि परिमळु।कापुरचि केवळु।। (अमृ.२/६३)

असे आहेत. गंधाबाबत 'गंधचा सुगंध।पुष्पाचा परिमळ' किंवा 'कुमुदिनी काय जाणे तो परिमळु।' किंवा 'मृगचिये अंगी कस्तुरीचा वास।' अशी अनेकविध संतवचने आहेत.

मद्य प्राशन केल्याने शरीरावरील ताबा सुटतो. अपेय पानात सुख नसते. मद्यपीचा विवेक नष्ट होतो. आदि सूक्ष्म चिंतन ज्ञानदेवांच्या, नाथांच्या, तुकोबांच्या रचनांत सापडते. वैशिष्ट्य हे की या प्रत्येक विधानाचे मूळ जरी विज्ञानात असले तरी लक्ष्य मात्र लोकोद्धार आहे. कारण 'बुडते हे जन न देखवे डोळा' ही त्यांची अंत:प्रेरणा होती. म्हणून उपदेशाच्या माध्यामातून समाजजागृती केली. मात्र ज्ञानदान करताना त्या ज्ञानाला विवेक व विज्ञानाची सुस्पष्ट बैठक होती. त्यामुळे संत वाङ्मय गेली कित्येक वर्षे मराठी मनावर अधिराज्य गाजवत होते, आहे आणि राहील कारण ते अभंग आहे. ऊर्जा अक्षय्यतेचा नियम असो की पायथागोरस किंवा न्यूटनचा सिद्धांत असो या

सर्वांना संतसाहित्य स्पर्शून जाते संत साहित्याचा प्रतिपाद्य विषय जरी लोकजागृती असला तरी अंधश्रद्धेला त्यांनी कधीच थारा दिला नाही. 'नवसे कन्यापुत्र होती। तरी का करणे लागे पती।' ही तुकोक्ती वास्तववादी व विज्ञानवादी दृष्टी अधोरेखित करते.

**वैद्यकशास्त्र । औषधनिर्माणशास्त्र । सूक्ष्मजीवशास्त्र :**

संत चळवळ विज्ञानाधिष्ठित आहे. वैद्यकशास्त्राचे मूळ आमच्या आयुर्वेदात आहे. आयुर्वेद ही भारतीय संस्कृतीने जगाला दिलेली देणगी आहे. येथील वैद्यकशास्त्रातील अनेक संदर्भ संतवाङ्मयात पाहायला मिळतात. संताच्या लोकजागृतीत, लोकशिक्षणात 'आरोग्य शिक्षण' अंतर्भूत होते म्हणून तर ज्ञानेश्वरीत ३७ ओव्यांत आरोग्य, औषधांचे वर्णन असल्याचे नगरकर नोंदवितात. तसेच नामदेवांचे ०४, नाथांचे ०८, समर्थ -०१, तुकोबारायांचे ११ संदर्भ नगरकरांनी 'आरोग्य' या विषयात समाविष्ट केले आहेत.२५

ज्ञानदेवांनी रोग व रोग्याची लक्षणे मांडलीत पण उपचार व चुकीचे उपचार, पथ्य व कुपथ्य यांवरही भाष्य केले आहे. चांगल्या वैद्याची लक्षणे कोणती हे सांगून चांगला वैद्य रोग दूर करण्यासाठी कधीच आपपर भाव करीत नाही हे सोळाव्या अध्यायातील ओवी क्र. १४१ मध्ये नमूद केले आहे. त्रिदोष, कुष्ठरोग, त्वचारोग, कोड, रक्तपिती, तापांचे विविध प्रकार, कावीळ, विषमज्वर, मूर्च्छा, पोटदुखी, आदी आजारांबाबत भाष्य करताना पथ्य व औषध यासंदर्भातही चर्चा ज्ञानोबाराय करतात.

**संत नामदेव :**

नामदेवराय प्रश्न करतात की रोग, व्याधी पीडा जर लोकांना नसत्या तर लोकांनी वैद्याला विचारलेच नसते. शीतज्वर झाला तर नदपुंडी नावाचे औषध खावे लागते. ज्याला कफ, पित्त, वात हे त्रिदोष झाले आहेत त्याला मौन पाळायला सांगून काय उपयोग? असे नामदेवराय नमूद करतात.[३४]

सीतज्वरामुळे खावी नदपुंडी। (ना.गा.१०८१)

रोगमुळे पाहे वैद्याचे कारण। (ना.गा.१०८१)

**संत एकनाथ :**

नाथांनीही रोग्याचीं लक्षणे, उपचार, रोगांचे विविध प्रकार, उत्तम वैद्य यांविषयी भाष्य केले आहे. रा.शं.नगरकर यांनी संतसुभाषित कोशात 'आरोग्य' शीर्षकाखाली नाथांच्या आठ ओव्या नोंदविल्या आहेत. 'विंचू चावला' या भारुडाची लक्षणे लक्षात घ्यायची असल्यामुळे कदाचित नगरकरांनी ती नोंद घ्यायची नसल्यामुळे कदाचित नगरकरांनी ती नोंद केली नसावी. संत एकनाथांनी अल्पोपहाराला महत्त्व दिले आहे. अलीकडे लोकांनी

डाएटींगच्या नावाखाली कमी खाणे किंवा दिवसभर चरत राहणे या गोष्टी संत चळवळीला मान्य नव्हत्या. प्रमाणशीर आहार असावा हे असे नाथांना मान्य आहे तेच तुकोबांनाही अभिप्रेत आहे. तुकोबाराय म्हणतात–

'युक्त आहार विहार।नेम इंद्रियासी चाड।
नसावी बांसर। निद्रा बहु भाषण।।'

तर संत एकनाथ भागवतात म्हणतात –

अल्पभोजन। ते पथ्य जाण रोगियाचे।। (एक.भा.११/९४२)
अल्पाहार या नाव पथ्य। (एक.भा.२५/३७१)
रोग गेलियाची लक्षणे।।
रोग नेणे, वैद्य जाणे।। (एक.आठ ग्रं.च.भा.६७४)

याशिवाय ताप आपलेल्या माणसाला दूध कडू विषाप्रमाणे असते, रोग झालेला माणूस दु:ख हाल भोगतो, कानदुखी थांबविणारे औषध पोटात घेतले तर अत्यंत बाधक होते, प्राण जाण्याचाही धोका असतो या आशयाच्या ओव्या नाथांच्या भागवतात सापडतात.

**संत तुकारामांचे आरोग्यविषयक विचार** – परस्त्रीकडे तुकोबाराय माता म्हणून पाहतात. तुकोबांकडे शरीरसुखाच्या मागणीसाठी गेलेल्या स्त्रीला "जाई ये वो माते न करी सायास। आम्ही विष्णुदास तैसे न हो।" असे समजावून सांगितले. परस्त्रीगमन, वेश्यागमन यांना तुकोबा कडाडून विरोध करताना दिसतात. आज एचआयव्ही सारख्या आजारांमुळे सामाजिक आरोग्य बिघडले आहे. तेव्हा विषयी माणसाचे डोके ताळ्यावर आणण्यासाठी 'काम' विकार आवरा असा उपदेश करतात. यादृष्टीने तुकोबाचे पुढील अभंग अभ्यासणे गरजे आहे.

परद्रव्य परकांता। नातळे जयाचिया चित्ता।
आणिक कर्मी तो तत्त्वता।बांधला नवजाय।।१।। (तु.गा.२३५८)

तुकोबाराय म्हणतात ज्याच्या चित्तात परद्रव्य, परकांता यांचे आकर्षण नाही तो पापाने बांधला जात नाही. शिळे आंबलेले अन्न शोधून सेवन केले तर ते दारू पिण्यासारखे होते.[२७] सूक्ष्म जीवशास्त्र (Microbilogy) या विषयाशी निगडित हे विचार आहेत. अन्नात शर्करा, प्रथिने, स्निग्ध पदार्थ असतात हे शिळे झाले तर ते आंबतात व नंतर त्यापासून Acid तयार होते. वातावरणातील जिवाणुंमुळे अन्नातील हे घटक कुजतात. अन्न तयार झाल्यानंतर ६ ते ८ तासानंतर आंबण्याची प्रक्रिया सुरू होते. असे शिळे अन्न खाल्ले तर पित्तदोष होतो. शर्करेचे रूपांतर आम्लात व आम्लाचे रूपांतर मद्यात होते म्हणून तुकोबा म्हणतात,

सकट आंबले ते अन्न। शोधी तेचि मद्यपान
विषमाने भिन्न। केले शुद्धाशुद्ध।।३।। (तु.गा.२३५८)

तुकोबाराय अंधश्रद्धेला कधीच खतपाणी घालत नाहीत. याउलट ते विज्ञानवाद, वास्तववादाचा पुरस्कार करतात, हे वरील उदाहरणावरून सहज लक्षात येते. 'तुका आकाशा एवढा' याची प्रचिती वारंवार येते कारण तुकोबांचे सूक्ष्म निरीक्षण, सूक्ष्म चिंतन व भविष्यातील वेध हे गुण त्यांच्या अंगी होते. तत्कालीन समाजातही पैशाच्या मागे लागलेले वैद्यराज होतेच. स्वत:ला धन्वंतरी म्हणून घेणाऱ्या अशा पोटार्थी वैद्यांचा तुकोबांनी समाचार घेतला आहे. तत्कालीन विचार मात्र आजच्याही काही पोटार्थी डॉक्टर मंडळींना लागू होतात. तुकोबा म्हणतात, 'काही धन्वंतरी लोभाने औषध देण्याच्या निमित्ताने रुग्णास भलतेच औषध देतात, वनस्पती पैशाच्या लोभाने देतात. असे धन्वंतरी पैशाच्या लोभामुळे रोग्याला आवडेल ते खायला परवानगी देतात पथ्य सांगत नाहीत यात फजिती वैद्याची होत नाही तर रोग्याची होते. हा एक प्रकारचा घात होय. रोग्याशी अकारण (लोभापायी) स्नेह करणे, भीड धरणे काही कामाचे नाही. कारण गळवे झाले तर त्याला डागणे, लासणे असे उपाय करणे चांगले.[२९]

नव्हे वैद्य आम्ही अर्थाचे भुकेले। भलते द्यावे पाले भलत्यासी।।१।।
कुपथ्य करुनी विटंबावे रोगी। काय हे सलगी भीड त्याची।।२।।
तुका म्हणे लासू फासू देऊ डाव। सुखाचा उपाव पुढे आहे।।३।।

भोगामुळे रोग निर्माण होतात. त्याग करायला शिकले पाहिजे. मोह संपला की शरीर साथ देते. तुकोबारायांच्या अभंगात औषधी गुणधर्म असलेल्या कडुलिंबासारख्या वनस्पतींचा उल्लेख सापडतो. मुळात तुकोबाराय हे केवळ संत नव्हते तर ते आरोग्याशास्त्राचे उत्तम जाणकार होते. समाजनिष्ठा व लोकोद्धाराची तळमळ ही त्यांची अंत:प्रेरणा होती म्हणून तुकोबारायांच्या अभंगात अनेक ठिकाणी सूक्ष्मजीवशास्त्र (Microbilogy), वैद्यक शास्त्र (Medical Science), औषधनिर्माणशास्त्र (Pharmacy) यांचे संदर्भ आढळतात.

शरीरशास्त्राच्या अभ्यासकांसाठी तुकोबारायांचा पुढील अभंग चिंतनीय आहे.[३०]

शरीर दु:खाचे कोठार । शरीर रोगाचे भांडार।
शरीर दुर्गंधीची थार । नाही अपवित्र शरीरा ऐसे।।१।।
शरीर उत्तम चांगले । शरीर सुखाचे घोसुले।
शरीरे साध्य होय केले । शरीरे साधले परब्रम्ह।।२।। (तु.गा.४११३)

तुकोबाराय शरीराच्या दोन्हीही बाजूंचे वर्णन करतात. नाथ ज्याप्रमाणे 'शरीराचे भाडीयाचे घोडे । आणिले निजधामा रोकडे।' असे वर्णन करतात त्याचप्रमाणे तुकोबाराय शरीराच्या ईष्ट व अनिष्ट बाबी नजरेसमोर ठेवतात. एकीकडे ते म्हणतात शरीर दु:खाचे कोठार, रोगाचे भांडार, घाणीचे ठिकाण अशी अपवित्र घाणेरडी वस्तू कोणतीच नाही असे वर्णन करतात तर दुसरीकडे त्याच अभंगाच्या दुसऱ्या चरणात विरुद्ध विचार मांडतात. समत्वदृष्टीने पाहणे म्हणजे काय त्याचे दर्शन याठिकाणी घडते. शरीर उत्तम, चांगले आहे, सुखाचा घडा आहे. शरीराने असाध्य गोष्ट साध्य करता येऊ शकते. एकीकडे शरीराला विटाळ, मोहपाशाने ग्रस्त, अध:पतनाचे कारण, काळाचे खाद्य मानतात तर दुसरीकडे त्यास शुद्ध, शरीरनिधीचा साठा, भगवंताचे राहण्याचे ठिकाण मानतात. इतके उत्कृष्ट पद्धतीने द्वंद्व दाखवून विचारांनी विकार घालवले तर शरीर चांगले असा भाव प्रकट करतात. शरीराला विषयोगभोगात अडकवून न ठेवता त्याचा त्याग न करता ईशप्राप्तीचे साधन म्हणून त्याच्याकडे पहा असा सल्ला देतात. नाथांच्या विचारांचा धागा जुळतो तो इथेच नाथ शरीराकडे ममत्त्व व माझे माझे म्हणून न पाहता शरीर हे आम्हाला अंतिम उद्दिष्टापर्यंत जाण्यासाठी दिलेले साधन आहे असे मानतात. संत शरीराला साध्य मानत नाहीत तर साधन मानतात. साधन चांगले असेल तर साध्यापर्यंतचा प्रवास चांगला होईल. म्हणून हे साधन व्यसन, निद्रा, रोग, पीडा, भय, मैथुन, विषय यांच्या आहारी न जाता चांगल्या अवस्थेत राहणे गरजेचे आहे.

समर्थांची बलोपासना याच विषयाशी निगडित आहे. समर्थांनी गावोगावी व्यायामशाळा, हनुमान मंदिरे बांधली ती शरीर संवर्धनासाठीच "sound mind in a sound body" हे तत्त्व सर्वच संत मंडळींना मान्य होते. मन, मनगट आणि मेंदू यांना बळकटी असेल तरच तो क्षात्रधर्म गाजवू शकतो. यावर संतांचा विश्वास होता म्हणून संतांनी केवळ नामपर अभंग लिहिले नाहीत तर त्यांच्या अभंगाद्वारे सामाजिक आरोग्याची बीजे पेरणारी उपदेशपर तिफण कार्यरत ठेवली.

'प्रमाणामध्ये सर्व काही असावे।' हा समर्थांचा दंडक वैद्यकशास्त्र किंवा शरीर शास्त्रांच्या अभ्यासकांना दिशादर्शक आहे. प्रमाणामध्ये जेवण, फिरणे, निद्रा, असावी,बहुभाषण नसावे हा तुकोबांचा आग्रहसुद्धा संतुलित व्यक्तिमत्त्वाच्या वाटेने नेणारा आहे. समर्थ व्यायामाचा आग्रह धरतात कारण त्यामुळे शरीराची कार्यक्षमता वाढते. शरीर निरोगी राहते. चयापचय क्रिया, रक्ताभिसरण व्यवस्थित होते परिणामी दिनक्रम चांगला होतो. समर्थांचे किंवा

एकूण संत चळवळीचे विचार अलीकडे लोकांना पटू लागले आहेत. पूर्वी व्यायामशाळा हनुमान मंदिरात होत्या. आता त्या 'जिम' च्या रूपात उभ्या आहेत. लाखो लोक योगगुरू रामदेवबाबा, श्री श्री रविशंकर यांच्या विचारांनी प्रभावित होऊन योग व व्यायामाचे धडे घेत आहेत. ते शरीराविषयी जागृत झाल्यामुळेच.

तात्पर्य हे की संतांच्या रचनांकडे आम्ही केवळ भक्तिभावापुरतेच पाहतो. त्यांतील उपदेश केवळ तत्त्वज्ञानापुरताच अभ्यासतो मात्र त्याचे सखोल चिंतन घडत नाही. म्हणून तर संतचळवळीला नाव ठेवणारे अविचारी लोक समाजाची दिशाभूल करतात. संतांनी केवळ उपदेश केला नाही तर त्या उपेदशाला आचरणाची जोड होती म्हणून तर मेणाहून मऊ असणारे तुकोबा वज्राहून कठीण होऊ शकतात. समर्थ हनुमान मंदिरांच्या माध्यमातून येथील युवाशक्ती जागृत, शक्तिशाली करू शकतात. ते वैज्ञानिक जाणिवेमुळेच.

शरीराला संतांनी घोंगडे म्हटले आहे. संत तुकाराम गाथेत घोंगडीचे अभंग म्हणून एक स्वतंत्र प्रकरणच आहे.[३१] कबीरजी तर म्हणतात -'उत्तम नरदेह पाया आदमी।उसीका हेत बहुत कर ले।' वारकरी संतांनी 'कान्होबा तुझी घोंगडी चांगली। आम्हासी का दिली वांगु ली रे।' यासारख्या रचनांच्या माध्यमातून शरीर या विषयावर लेखन केले आहे. तोच समान धागा कबीरजींच्या 'चदरीया' मध्ये दिसतो. ते म्हणतात.

चदरीया झिनी रे झिनी।
राम नाम रस दिनी।।धृ।।
अष्ट कमल का चरखा बनया
पाँच तत्व की गुनी।
नौ दस मास गुनन को लागे
मुरत नैनी दिनी।।१।।

**संदर्भ टीपा**


१) सामाजिक परिवर्तन आणि मराठी साहित्य - (संपा) र. बा. मंचरकर - परिवर्तन आणि मराठी साहित्य (लेख) सूर्यनारायण रणसुभे पृ.क्र.११८-पद्मगंधा प्रकाशन-पुणे

२) तत्रैव - लेख - मराठी संतकविता आणि परिवर्तनाच्या जाणिवा - र.बा.मंचरकर -पृ.क्र.१२९

३) संत सुभाषित कोश - (संपा) रा.शं.नगरकर-डायमंड पब्लिकेशन - पृ.क्र.२६,२७,२८

४) संत तुकारामांचा जीवनविचार- निर्मलकुमार फडकुले- सुविद्या प्रकाशन, सोलापूर, प्रस्तावना.
५) संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रृती -गं.बा.सरदार-लोकवाङ्मय गृह - पृ.क्र.१३५
६) 'जुन्नर तालुक्यातील वारकरी संत परंपरा चिकित्सक अभ्यास' - पीएच.डी. प्रबंध - द.प्र.डुंबरे-पुणे विद्यापीठ, पुणे
७) संत सुभाषित कोश-पृ.क्र.१६०
८) तत्रैव - पृ.क्र.२१०,२११
९) जलसंवाद (मासिक) - अंक - १२ वा. डिसें. २०११
१०) संत सुभाषित कोश पृ.क्र.५४,५५, ५६, ५७
११) तत्रैव पृ.क्र.१४८, १४९
१२) तत्रैव -पृ.क्र.१५२
१३) तत्रैव -पृ.क्र. १५२
१४) तत्रैव पृ.क्र. २९,३०,३१
१५) तत्रैव पृ.क्र.३१
१६) तत्रैव पृ.क्र.१२४
१७) तत्रैव पृ.क्र.१२
१८) तत्रैव पृ.क्र.१२७
१९) तत्रैव पृ.क्र.१२८, १२७
२०) विज्ञान आणि तंत्रज्ञान इ.१०वी- म.रा.मा.शि.मं.पुणे. पृ.क्र.५
२१) डॉ.बी.एच.पवार-अमरावती - व्याख्यान डॉ.बा.आं.म.विद्यापीठ, Acadamic Staff College, A'bad. date 1/11/2011
२२) Wikipedia Encyclopedia - Chemistry Defination व रसायनशास्त्र परिभाषा कोश - भाषा संचानालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, द्वितीय आवृत्ती - जुलै १९९५, पृ. १४ ते १६.
२४) संत सुभाषित कोश -पृ.क्र.२१८
२५) मुलाखत -डॉ. एस.जे.चंद्रात्रे -जळगाव दि.८/३/१२
२६) संत सुभाषित कोश - पृ.क्र.३३ ते ३६
२७) तत्रैव पृ.क्र.३४'
२८) श्रीसार्थ तुकारामाची गाथा (संपा.), डॉ. बेणारे जोगमहाराज प्रत, पृ.क्र. ५०६, अभंग क्र. २३५८.
२९) तत्रैव पृ.क्र.५०६ अभंग क्र. २३५९
३०) तत्रैव पृ.क्र.५२६. अ.क्र.२४६१
३१) तत्रैव पृ.क्र.९४३. अ.क्र.४११३
३२) तत्रैव पृ.क्र.७८५,७८६, ७८७

# संत ज्ञानदेवकृत हरिपाठावरील साहित्यातील तत्त्वज्ञान

**प्रा. डॉ. ज्ञानेश्वर थोरात**

**प्रास्ताविक :**

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनावर संत ज्ञानदेवकृत हरिपाठाचा विलक्षण प्रभाव आहे. चारवेद, सहा शास्त्र आणि अठरा पुराणांचे सारतत्त्व हरिपाठ असल्याने अत्यंत संक्षेपाने संत ज्ञानदेवांनी 'हरिपाठ' या प्रकरण ग्रंथामध्ये नामतत्त्वाचे साक्षेपी विवरण केले आहे. आकार-आविष्काराने लहान परंतु आशयाने महान असलेल्या या हरिपाठाचे आध्यात्मिक जगात खूप महत्त्व आहे. संत ज्ञानदेव समग्र साहित्यात या हरिपाठाचा प्रसार आणि अंगीकार सार्वकालिक आणि सार्वत्रिक झालेला पाहावयास मिळतो. हरिपाठाचे सादरीकरण, पठण आणि कीर्तन-प्रवचनादी सांस्कृतिक कार्यक्रमांतून जाहीर विचार मंथन होत आले आहे. त्याचप्रमाणे या हरिपाठावर अनेक विचारवंत लेखकांनी, अनुयायांनी विपुल विस्तृत लेखन केले आहे. साहित्याच्या प्रांतात ललित साहित्य आणि त्यावरील समीक्षेच्या पलीकडे जाऊन तत्त्वज्ञानाचा, संतवाणीचा सूक्ष्म अर्थ विशद करणारी वैचारिक साहित्य निर्मितीची प्रक्रिया मराठी भाषेत आजही अखंडपणे चालू आहे. इ.स. १९६० नंतर वेगाने आणि विस्ताराने मराठी साहित्याच्या कक्षा रुंदावल्या आणि अध्यात्माच्या क्षेत्रातही कसदार तत्त्वचिंतनपर साहित्याची भर पडली; हे विज्ञानयुगातही साहित्याच्या जगातील आशादायक चित्र आहे. यावरून हरिपाठाचे वस्तुसामर्थ्य अभिजात असल्याचे जाणवते. त्याचा शोध घेण्यासाठी हरिपाठावरील साहित्यातील तत्त्वज्ञानाचे आकलन होणे आवश्यक आहे.

**हरिपाठावरील साहित्यातील तत्त्वज्ञान अभ्यासाची आवश्यकता :**

संत ज्ञानदेवकृत हरिपाठामध्ये प्रतिपाद्य विषयाचा विलक्षण संक्षेप केल्यामुळे तात्त्विक आशयाचे केवळ दिग्दर्शन होते परंतु तपशील विवरण अभावामुळे संदिग्धताही निर्माण होऊन प्रतिपाद्य विषयाचे यथार्थ आकलन होत नाही. उदा. 'देवाचिये द्वारी उभा क्षणभरी। तेणे मुक्तिचारी साधियेल्या।।'[१] येथे देवाचे द्वार म्हणजे काय? क्षणभर उभे राहिल्याने चार मुक्तीचा लाभ कसा

घडतो ? चार मुक्तीचे स्वरूप काय? त्यांची आवश्यकता आहे का? इत्यादी कितीतरी गोष्टींचा हरिपाठात केवळ निर्देश होतो परंतु तपशील मिळत नाही. त्याचा शोध आणि बोध हरिपाठावरील उपलब्ध साहित्यातच घ्यावा लागतो. नाहीतर हरिपाठाची दुर्बोधता प्रकर्षाने जाणवते. म्हणून या साहित्यातील तत्त्वज्ञानाचे आकलन हरिपाठाच्या आकलनासाठी अत्यंत आवश्यक आहे. हरिपाठातील तत्त्वज्ञान आणि त्यावरील उपलब्ध साहित्यातील तत्त्वज्ञानामध्ये खूप साधर्म्य आहे. त्याचप्रमाणे वैधर्म्यही पुष्कळ आहे; याचा अभ्यासही होणे आवश्यक आहे.

हरिपाठाचे पठण परिपाठाच्या आस्थेने करणारे वारकरी संप्रदायातील अनुयायी महाराष्ट्रात असंख्य आहेत. हरिपाठाचे पाठ पाठांतर करण्यातही मंडळी निष्णात आहेत परंतु हरिपाठातील अनेक संकल्पनांचा त्यांना अर्थबोध होत नाही. उदा. संत ज्ञानदेवकृत हरिपाठातील 'अजपाजप, सात-पाच-तीन दशकांचा मेळा, त्रिगुणांचे असारत्त्व इत्यादी संकल्पनांचे आकलन बहुसंख्यांनाही होत नाही; असे संशोधनाअंती लक्षात आले आहे. मग या संकल्पना हरिपाठावरील साहित्यात स्पष्ट झाल्या आहे का? त्यांची समर्पकता, अभ्यासणे आवश्यक आहे. अन्यथा समाज हरिपाठ ग्रंथ तात्पर्यापासून दूर जाईल आणि अंधश्रद्धांना वाव मिळेल म्हणून हरिपाठावरील साहित्यातील तत्त्वज्ञानाची उकल करून त्याची श्रेष्ठता असाधारण असल्याचे सप्रमाण सिद्ध करणे आवश्यक आहे.

संत साहित्याचे व्यासंगी अभ्यासक डॉ. श्रीकृष्ण देशमुख यांनी म्हटल्याप्रमाणे, ''हरिपाठाची रचना बऱ्याच ठिकाणी संदिग्ध आहे. त्यामुळे या रचनेत काही शब्द मिळविण्याशिवाय अर्थबोध होत नाही. उदा. 'जेथोनि चराचर प्रगटे त्या हरिसी तू भजे' अशी तीन पदे अधिक घ्यावी लागतात. तसेच 'सारा सार विचार हरिपाठ' येथेही सार व असार या विचारात हरिपाठ हा साररूप आहे; असे लावून घ्यावे लागते. काही ठिकाणी अनुप्रासासाठी अभंगातील शब्द मागे पुढे केलेले आहेत. उदा. सगुण निर्गुण गुणाचे अगुण। हरिवीण मन व्यर्थ जाय।। येथे सगुण व निर्गुण गुणाचे आहे. हरिवाचून मन व्यर्थ जाते; असा अर्थ लावून घ्यावा लागतो. त्रिगुण व निर्गुण निरपेक्ष अगुण हा शब्द ज्ञानदेवांनी नव्याने स्वीकारला आहे.''[२] हरिपाठ काव्यरचनेतील संदिग्धता आणि अर्थाकलन प्रक्रियेतील हरिपाठ अधिकाऱ्यांच्या भाषाज्ञानाची मर्यादा लक्षात घेऊन या साहित्यातील तत्त्वज्ञान अभ्यासणे काळाजी गरज आहे; असे प्रतित होते.



40806

नामभक्ती ज्ञानमूलक असावी अन्यथा ती आपल्या मूळ हेतुपासून दूर जाते; अशी वास्तविकता आपल्याला दिसून येते. या विषयी प्रकर्षाने सप्रमाण स्पष्टीकरण करताना संतसाहित्याचे अभ्यासक गं. बा. सरदार म्हणतात, ''भक्ती म्हटले की द्वैत हे ओघानेच आले अशी पुष्कळांची समजूत आहे. पण वारकरी संप्रदायाच्या भक्तिकल्पनेत द्वैतभावाला थारा नाही. 'हे आतु बाहिरि मिया कोंदले । जग निखिल माझेचि ओतले ।' अखिल विश्वात एकच एक चैतन्य तत्त्व भरून राहिले आहे तेंव्हा उपास्य व उपासक यात भेद करणारी द्वैत बुद्धी म्हणजे अज्ञान होय.''[३] अशी संत ज्ञानदेवादी संताची धारणा होती. या पार्श्वभूमीवर हरिपाठांवरील साहित्यातील तत्त्वज्ञानाचे महत्त्व पटते. अज्ञानमूलक भक्तीचा तत्त्वज्ञानाच्या बळावर निषेध आणि नामसाधनेला तत्त्वजिज्ञासेची जोड दिली की देश-काल-व्यक्ती सापेक्ष हरिपाठ साधनेची गरज आजच्या माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगातही प्रकर्षाने जाणवते.

संत ज्ञानदेवकृत हरिपाठांनतर संत एकनाथांचा हरिपाठ वारकरी संप्रदायात आणि साहित्यात प्रसिद्ध आहे. संत एकनाथांनी संत ज्ञानदेवकृत नामस्मरणाचा पंथराज पुढे चालविला आणि नामभक्तीच्या परंपरेचा अभिमान हरिपाठ ग्रंथ लिहून सिद्ध केला. 'ज्ञानाचा एका' ही बिरुदावली संत ज्ञानदेवांच्या पाऊलखुणांचा मागोवा घेत सार्थक केली. या दोन हरिपाठांमध्ये देश-काल-व्यक्तींचे अंतर आहे. त्याचा परिणाम आशय आणि आविष्कारावर झाला आहे का? याचा शोध घेणे आवश्यक आहे. ''ज्ञानेश्वर-एकनाथादी संत हे स्वतंत्र प्रज्ञेचे विचारवंत होते. पण त्यांची दृष्टी उदार व समन्वयशील होती. आपल्या संप्रदायाची उभारणी करताना त्यात कालमानाचे अवधान राखले पण त्याचबरोबर लोकांचा बुद्धिभेद होऊ नये म्हणून जुन्या परंपरेचे अनुसंधानही कायम ठेवले. पूर्वसुरीचा मागोवा घेत आणि भाष्यकाराने वाट पुसत त्यांनी आपला मार्ग चोखाळला. प्राचीन धर्म ग्रंथांच्या प्रतिष्ठेला धक्का न लावता त्यांनी मोठ्या कुशलतेने आपल्या साहित्यामधून नव्या जाणिवांना वाट करून दिली.''[४] या आदर्शांची आधुनिकता आधुनिक माणसांच्या गरजा आणि विचारांच्या प्रकाशात हरिपाठावरील साहित्यातील तत्त्वज्ञानाची परंपरा आणि प्रवाह अभ्यासणे आवश्यक आहे.

**तत्त्वज्ञानाची संकल्पना :**

संत ज्ञानदेवांनी वारकरी संप्रदायाचा पाया घातला. 'ज्ञानदेवे रचिला पाया' म्हणजे तत्त्वचिंतनाचा पाया घातला, महाराष्ट्राच्या सारस्वताचा पाया घातला आणि समतेच्या सिद्धांताचाही पाया घातला. 'जे जे भेटे भूत। ते ते मानिजे भगवंत। हाचि भक्तियोग निश्चित। जाण माझा।' अशी भक्तियोगाची

व्यापक व्याख्या करून जीव ब्रह्माच्या अद्वैताबरोबरच विषमता त्यागून सामाजिक स्तरावर अद्वैत उभे केले.''[५] संत ज्ञानदेवांचे कार्य पुढे चालविण्यासाठी संत एकनाथांनी ज्ञानेश्वरी प्रमाणे भागवत ग्रंथांची रचना केली आणि या भक्तिमंदिराला 'खांब दिला भागवत' म्हणजे भक्कम आधार दिला. ज्ञानेश्वरी म्हणजे तत्त्वज्ञान अर्थात वारकरी संप्रदायाचा तत्त्वाधार तर भागवत म्हणजे प्रेमभक्ती अर्थात वारकरी संप्रदायाचा प्रेमाधार आहे. परस्परपूरक अशा दोन गोष्टींचे अधिष्ठान या संप्रदायास पोषक ठरले. तत्त्वज्ञानाधारावर आणि भक्तिप्रेमाधारावर वारकरी संप्रदायाची वृद्धी झाली कारण ''नुसते तत्त्वज्ञान रूक्ष असते. पंडितांचीही प्रज्ञा ते जिंकून घेते पण माणसाच्या काळजाला ते स्पर्श करू शकत नाही. नुसते प्रेमही तसेच असमर्थ ठरते; ते माणसाचे अंत:करण मोहून घेते. त्यामुळे भाबडेपण पंथाला दुबळेपण आणते. भोळ्या भक्तीला परंपरेचे बळ लाभू शकत नाही. म्हणूनच ज्ञानेश्वरांनी भक्तिपंथाला जसे तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान प्राप्त करून दिले.''[६] या विचारांच्या पार्श्वभूमीवर तत्त्वज्ञानाची संकल्पना समजावून घेणे आवश्यक आहे.

'तत्त्वज्ञान' ही संकल्पना भारतीय प्राचीन आणि आधुनिक साहित्यात खूप व्यापक अर्थाने वापरली जाते. ''तत्त्वज्ञान या मराठीतील संकल्पनेसाठी इंग्लिशमध्ये 'फिलॉसफी' अशी संज्ञा रूढ आहे. तिचा शब्दार्थ 'चिकित्सकपणाची आवड' असा आहे. 'शास्त्राचे शास्त्र' या अर्थानेही 'फिलॉसफी' हा शब्द वापरला जातो. 'प्रत्येक बाबतीत जे सत्यस्वरूप असते त्यावर प्रेम करणारा तो तत्त्ववेत्ता होय. असे प्लेटो यांनी आपल्या 'रिपब्लिक' नामक ग्रंथात म्हटले आहे. आपल्याकडील 'तत्त्वज्ञान' ही संज्ञा कोणत्याही वस्तूच्या मुळाशी जाऊन पाहणे; हा अर्थ सुचविते. 'तत्' = (ते) + त्व = (पण), तत्त्व = ते पण किंवा पदार्थाचे आद्यस्वरूप होय. वस्तूचे मूळ शोधणे व त्याचा विकास होऊन पदार्थ कसा बनला याचे ज्ञान करून घेणे म्हणजे तत्त्वज्ञान अभ्यासणे होय. जीव, जगत व जगतात्मा यांचे स्वरूप व त्यांचे परस्परसंबंध यांचा विचार करणारे शास्त्र हा भारतीयांचा तत्त्वज्ञानविषयक दृष्टिकोण आहे.''[७] केवळ वर्णनात्मक साहित्यकृतीचा अभ्यास केल्यावर मनुष्याला नुसती माहिती मनात साठवून ठेवण्याचा कंटाळा येतो या सर्व गोष्टींचा अर्थ काय? साहित्यकृतीचा हेतू, रचना, स्वरूप, अंतिम मूल्य इत्यादी बाबींचा शोध घेण्यासाठी त्याला तत्त्वज्ञानाची कास धरावी लागते.

हरिपाठांवरील साहित्याचा अभ्यास करताना त्यातील तत्त्वज्ञानाचे आकलन आवश्यक ठरते. एकाचवेळी तत्त्वगंभीर आणि सुलभ रमणीय अशा हरिपाठावरील साहित्यातील तत्त्वज्ञानाचे धावते अवलोकन तत्त्वविचारांच्या

अंगाने असो वा प्रतिभेच्या उन्मेषामुळे असो; समाजहिताचे ठरते. संत साहित्याचे अभ्यासक प्रा. र. रा. गोसावी म्हणतात, "संप्रदाय म्हटले की त्याचे तत्त्वज्ञान आणि आचार याची एक चौकट तयार होतेच."[८] वारकरी संप्रदायात हरिपाठ हे साधना ग्रंथ आहेत तर हरिपाठांवरील विविध भाष्यग्रंथ साधनग्रंथ आहेत. त्यामुळे त्यांचे महत्त्व विशेष आहे. हरिपाठाच्या अभंगात ज्ञानदेवांनी नामसंकीर्तनाच्या साधनाचे महत्त्व आणि त्याची फलश्रुती परोपरीने वर्णन केली आहे. 'हरिमुखे म्हणा, हरि मुखे म्हणा। पुण्याची गणना कोण करी', 'रूप पाहता लोचनी सुख जाहाले वो साजणी','एकतत्त्व नाम दृढधरी मना', इत्यादी अभंग वारकऱ्यांना मुखोद्गत झालेले असतात कारण हरिपाठाचे अभंग म्हणजे त्यांच्या दैनंदिन संध्योपासनेतील अंगच होत."[९] सारांश, या उपासना पद्धतीमागील विज्ञान हरिपाठांवरील उपलब्ध साहित्यातील तत्त्वज्ञानाच्या आधारे ज्ञात होते.

**संत ज्ञानेदवकृत हरिपाठावरील साहित्यातील तत्त्वज्ञान :**

संत ज्ञानेदवकृत हरिपाठाचे महत्त्व वारकरी संप्रदायात आणि मराठी साहित्यात विशेष आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात हरिपाठाचे नित्य पठण करणारे भाविक पुष्कळ आहेत. "भावनेने पठण करणे योग्य असले तरी अर्थज्ञानपूर्वक पठण करणे हे त्यापेक्षांही श्रेष्ठ आहे ; हे कोणासही मान्य करावे लागेल. 'अर्थावीण पोथी वाचुनि काय' हे श्री एकनाथ महाराजांचे वचन प्रसिद्धच आहे. अर्थज्ञानाने पाठक ग्रंथाच्या अंतरंगात प्रवेश करून त्याचा आनंद भोगू शकतो. शब्द हा अर्थ व्यक्त करण्याचे साधन जरी आहे तरी योग्य अर्थामुळेच शब्दासही महत्त्व आहे."[१०] हरिपाठाच्या अंतरंगात प्रवेश व्हावयाचा असेल तर हरिपाठाच्या अनुबंध चतुष्ट्याचा विचार हरिपाठावरील साहित्यातील तत्त्वज्ञानाच्या आधारे करावा लागतो.

**अनुबंध चतुष्ट्य :**

हरिपाठाचा अनुबंध पूर्वापार शास्त्रग्रंथांच्या अभ्यासचौकटीत बसणारा असल्याने हरिपाठ ग्रंथांच्या यथार्थ आकलनासाठी हरिपाठातील अनुबंध चतुष्ट्य समजावून घेणे अत्यंत आवश्यक आहे. "ग्रंथामध्ये प्रवृत्तीला कारण असणाऱ्या ज्ञानाचा विषय म्हणजे अनुबंध कारण कोणत्याही ग्रंथांचे अनुबंध जाणल्या वाचून बुद्धिमान पुरुषाची त्या ग्रंथांच्या पठण-पाठण किंवा अध्ययन-अध्यापनात प्रवृत्ती होत नसते."[११]

अनुबंध चार प्रकारचा आहे. चार अनुबंधांनाच अनुबंध चतुष्ट्य असे म्हणतात. धुंडा महाराज देगलूरकर, गुजेबा वाघ, डॉ. श्रीकृष्ण देशमुख आणि किसन महाराज साखरे यांनी आपल्या हरिपाठावरील विवरण ग्रंथांमध्ये १.

अधिकारी २. विषय ३. प्रयोजन आणि ४. संबंध असे चार अनुबंध विस्तारपूर्वक सप्रमाण स्पष्ट केले आहेत.

**१. अधिकारी :** हरिपाठाचा अधिकारी कोण आहे ; याचे विवेचन करताना धुंडा महजाराज देगलूरकर म्हणतात, 'असोनि संसारी जिव्हे वेगु करी' असे या पहिल्या अभंगाच्या तिसऱ्या चरणात सांगितले आहे. यावरून संसारी बद्धजीव हाच हरिपाठाचा अधिकारी ठरवावा लागतो.''[१२] किसन महाराज साखरे ''सर्व दु:ख संबंध रहित सुखाची ज्यास इच्छा आहे तो या ग्रंथाचा अधिकारी आहे.''[१३] असे प्रतिपान करतात. श्रीकृष्ण देशमुख यांनी संसारी हा हरिपाठाचा अधिकारी असल्याचे सांगितले आहे. खास त्याच्यासाठीच ह्या ग्रंथांची रचना असल्याचे स्पष्ट केले आहे. मुख्यत: सर्व सामान्य मनुष्यमात्राच्या उद्धाराची तळमळ या ग्रंथात जाणवते. गुजोबा वाघ मात्र सकाम उपासकच हरिपाठाचा अधिकारी असल्याचे प्रतिपादन करतात.

**२. विषय :** अधिकाऱ्यावरून विषय किंवा विषयावरून अधिकारी ठरवावा लागतो. विषय 'हरिमुखे म्हणा हरिमुखे म्हणा' हा आहे. हरिनामाचा प्रकट उच्चार हाच हरिपाठाचा विषय आहे. ''हरिनाम-भक्तियोग हा या हरिपाठ ग्रंथाचा मुख्य प्रतिपाद्य विषय आहे. किंबहुना नामभक्तियोगाची स्वानुभव, प्रमाण आणि युक्ती यांच्याद्वारा प्रतिपादन करणे हा हरिपाठ ग्रंथाचा प्रतिपाद्य विषय आहे.''[१४]

**३. प्रयोजन :** हरिपाठ ग्रंथाचे प्रयोजन सांगताना किसन महाराज साखरे म्हणतात, ''सर्व सुख गोडी या हरिपाठाच्या शेवटच्या अभंगामध्ये सर्वसुख हे हरिपाठाचे परम प्रयोजन वा मुख्यफल ध्वनित केले आहे.''[१५] प्रसिद्ध कीर्तनकार विठ्ठल चौधरी हरिपाठाचे प्रयोजन सांगताना म्हणतात, ''तेणे मुक्ती चारी साधियेल्या -चार मुक्ती आणि मोक्ष मिळेल असे प्रयोजन आहे.''[१६] प्रयोजनासंबंधी निश्चित अशी भूमिका कोणाचीच नाही त्यामुळे हरिपाठाच्या प्रयोजनाची विविधता भाष्यकारांच्या विवरणात आपणाला प्रतीत झाल्यावाचून राहत नाही.

**४. संबंध :** संबंध विवरणाविषयी खूप विस्तृत आणि मार्मिक विवेचन या साहित्यात पाहावयास मिळते. ''विषयाचा व ग्रंथांचा प्रतिपाद्य-प्रतिपादक भाव संबंध असतो म्हणजे विषय प्रतिपाद्य व ग्रंथ प्रतिपादक तसेच अधिकारी व प्रयोजन प्राप्त म्हणजे प्राप्त होणारे असा प्राप्य-प्रापक-भावरूप संबंध असतो.''[१७] असे धुंडा महाराजांनी विवरण केले आहे. डॉ. श्रीकृष्ण देशमुख ग्रंथ व अभ्यासक यांचा वाच्यवाचक संबंध मान्य करून मोक्ष व अधिकारी यांचा प्राप्यप्रापक संबंध प्रतिपादन करतात.[१८] किसन महाराज साखरे यांचे

संबंधाविषयीचे विवरण वेदान्तपर असून तपशीलवार आहे. ''सर्व सुख आणि नामभक्तियोग यांचा निश्चित असा साध्य साधन भाव-संबंध आहे. सर्व सुखाचा आणि सर्व सुखेच्छु असलेल्या अधिकाऱ्याचा प्राप्य-प्रापक भाव संबंध आहे. पाप आणि हरिनाम भक्तियोग यांचा निवर्त्य-निवर्तक भावसंबंध आहे. पुण्य आणि हरिनामभक्तियोग यांचा जन्म-जनक भाव संबंध आहे.''[१९]

सारांश, अधिकारी, विषय, प्रयोजन प्रतिपादन केल्यावर संबंध आपोआपच कळून येतो. म्हणून संबंधाचा संत ज्ञानदेवांनी उल्लेख केला नाही. तरीही हरिपाठावरील उपलब्ध साहित्यात संबंधाचे स्वरूप आणि विविध प्रकार तपशीलवार सांगण्यात आले आहेत.

**वस्तुनिर्देश मंगल :**

भारतीय विचार साधनेत ग्रंथारंभी मंगल करण्याची ग्रंथकर्त्यांची प्राचीन श्रेष्ठ परंपरा आहे. 'हरिपाठ-भाष्य' ग्रंथामध्ये शंकर महाराज खंदारकरांनी हरिपाठ ग्रंथारंभीच्या मंगला संबंधी भाष्य करताना म्हटले आहे, ''मंगलाचे प्रकार तीन आहेत. १) आशीर्वाद २) नमस्कार ३) वस्तु-निर्देश मंगल करण्यापाठीमागे ग्रंथकर्त्याचे सर्वसाधारण पुढील हेतू असतात. १. ग्रंथ निर्मितीचे कार्य निर्विघ्नपणे अर्थात अशुभ (पाप) निवृत्ती होऊन पार पडावे आणि शुभाची (पुण्य) वृद्धी होऊन ग्रंथाच्या पठण श्रवण अर्थज्ञानाने साधकाला सुखाचा लाभ व्हावा. २. मंगलादीनि ही शास्त्राणि प्रथन्ते ॥ व्या. महा. १/१/३, ज्या शास्त्रामध्ये मांगलिक शब्द प्रथम उच्चारला आहे अशी शास्त्रे प्रसिद्धीस पावतात.''[२०]

या परंपरेला अनुसरून संत ज्ञानदेवांनी हरिपाठ ग्रंथारंभी 'देव' या मंगल शब्दाची योजना करून वस्तुनिर्देश मंगल केले आहे. देव शब्दाला अनेक अर्थ आहेत त्यापैकी 'प्रकाश' असा एक अर्थ आहे. येथे प्रकाश शब्दाने सूर्य चंद्रादिकांचा भौतिक प्रकाश विवक्षित नसून वेदान्त शास्त्रात प्रकाश हा शब्द ज्ञान, सवित, चित्त, स्फूर्ती या अर्थाचा आहे आणि जेथे सत्य आणि सुख असते तेथे प्रकाश असतो. देव शब्दाने सत्ता-प्रकाश-सुखरूपता सूचित होते.

१. यत्साक्षाद परीक्षात् ब्रह्म । बृ. ३/४/१.
२. विज्ञानमानन्द ब्रह्म । बृ ३/९/२८
३. सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म । तै ३/१/१[२१]

श्री ज्ञानेश्वर महाराजांनी प्रकाशार्थक देव शब्दाचा प्रयोग करून अबाधित सत्य, अपरोक्षभूत ज्ञान आणि शाश्वत आनंद हे ज्याचे स्वरूप आहे; अशा श्रुतिप्रतिपाद्य ब्रह्माचा निर्देश केला आहे. ब्रह्म व देव शब्द एकाच अर्थाचे

असल्याने ग्रंथारंभी वस्तू निर्देश मंगल केले आहे. संत ज्ञानदेवांच्या दृष्टीने गुरू आणि देव तत्त्वत- अभेद असल्यामुळेच देव शब्दाने गुरूचाही निर्देश होतो. त्याचे कारण स्पष्ट करताना शंकर महाराज खंदारकर ज्ञानेश्वरीतील समर्पक संदर्भ देतात ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायाच्या आरंभी श्री गुरूचे वर्णन देव शब्दाने केले आहे.

जय जय देव निर्मळ । निजजनाखिल मंगळ ।
जन्मजराजल दजाळ । प्रभंजन ।। ज्ञा.अ. १८.१[२२]

म्हणून हरिपाठग्रंथारंभी एकाच देव शब्दांने ब्रह्म आणि श्रीगुरू या दोघांचाही निर्देश करून मंगल केले आहे. संत ज्ञानदेवांच्या देव शब्दाची हरिपाठारंभी योजना करण्यामागची कारणमीमांसा करताना लेखकाचा युक्तिवाद मार्मिक आणि वस्तुस्थितिनिर्देशक असल्याचे स्पष्ट होते. त्यावेळी 'देव' शब्दातून हरीच निर्देशित होतो. याचे अनुमान हरिपाठाच्या पहिल्या अंभगाच्या द्वितीय चरणात 'हरि मुखे म्हणा हरि मुखे म्हणा' या वरून स्पष्ट होते. हेच औचित्य संत एकनाथांनीही आपल्या हरिपाठाच्या प्रारंभी 'हरिचिये दासा हरि दाही दिशा' असा करून संत ज्ञानदेवाच्या देव शब्दातील हरीचा उल्लेख करून वस्तुनिर्देश मंगलाची परंपरा अबाधित राखली; असे ही आपणाला चिंतन करता येते.

**हरिपाठ- षडलिङ्गे:**

हरिपाठावरील उपलब्ध साहित्यात डॉ. श्रीकृष्ण देशमुख, डॉ. सौ. यमुना कंकाळ आणि वारकरी संप्रदायाचे कीर्तनकार गुजेबा वाघ यांनी आपल्या साहित्यात हरिपाठातील षडलिङ्गाचा विचार विस्तारपूर्वक मांडला आहे. कोणत्याही ग्रंथाचे तात्पर्य निश्चित करून निष्कर्षाप्रत येण्यासाठी हरिपाठाच्या अभंगामध्ये आलेल्या सहा लिंगाचा शोध घेऊन त्याची तर्कसंगत मांडणी करणे, आवश्यक आहे.

**१. उपक्रमोपसंहाराची एकवाक्यता :** उपक्रम म्हणजे प्रारंभ आणि उपसंहार म्हणजे शेवट. ज्या प्रतिपाद्य विषयाने ग्रंथाचा प्रारंभ होतो त्याच विषयाने ग्रंथाचा उपसंहार व्हावयास हवा व तो तसा झाला पाहिजे. तेव्हा उपक्रमोपसंहाराची एकवाक्यता झाली असे म्हणतात. डॉ. श्रीकृष्ण देशमुख यांच्या मतानुसार 'तेणे मुक्तिचारी साधियेल्या' हा हरिपाठाचा उपक्रम असून 'हरिउच्चारणी पाही मोक्ष सदा' हा उपसंहार आहे. त्याची एकवाक्यता आहे. डॉ.सौ. यमुना कंकाळ यांनी 'पहिल्या अभंगात 'हरिमुखे म्हणा' असा उपक्रम करून शेवटच्या अभंगात 'कृष्ण नामी संकल्प धरूनि राहे' असा उपसंहार केला आहे.

**२. अभ्यास :** एकच गोष्ट पुन्हा पुन्हा करणे म्हणजे अभ्यास होय. प्रतिपाद विषयाच्या दृढीकरणासाठी अभ्यासाचे महत्त्व खूप आहे. 'हरि मुखे म्हणा हरि मुखे म्हणा' हे हरिपाठाचे अभ्यासलिंग आहे. रामकृष्ण वाचा भाव हा जीवाचा, ज्ञानदेव म्हणजे नाम जपा हरिचे, हरि उच्चारण मंत्र हा अगाध, रामकृष्ण उच्चार अनंतराशी तप, वाचेशी सुलभ रामकृष्ण, हरिपाठ कीर्ती मुखे जरी गाय, अशा जवळ जवळ सर्वच अभंगात नामस्मरणाचा अभ्यास प्रतिपादन केला आहे.

**३. अपूर्वता :** जी गोष्ट कोणत्याही प्रमाणाने कळत नाही; ती ज्या प्रमाणाने कळते ती त्या प्रमाणांची अपूर्वता होय. हरिपाठातील अपूर्वता डॉ. श्रीकृष्ण देशमुख 'करतळी आवळे तैसा हरि' गुजेबा वाघ 'नामापरते तत्त्व नाही रे अन्यथा। वाया अणिक पंथा जाशील क्षणी,' तर डॉ. यमुना कंकाळ वेदशास्त्र' उभारी बाह्या सदा, वेदशास्त्र प्रमाण श्रुतीचे वचन अशी प्रतिपादन करतात.

**४. फल :** अंतिम निष्कर्ष, तात्पर्य, मुख्य फल, प्राप्त झालेला लाभ असा फल लिंगाचा अर्थ आहे. तेणे मुक्ती चारी साधियेल्या, हरि उच्चारणी अनंत पापराशी । जातील लयासी क्षणमात्रे, पुण्याची गणना कोण करी, कळीकाळ त्यासी न पाहे दृष्टी, द्वैताचे बंधन न बाधिजे, हरिउच्चारणी पाहे मोक्ष सदा, असा फळाचा विचार करता येतो.

**५. अर्थवाद :** ज्या विषयाचे प्रतिपादन करावयाचे आहे त्याची स्तुती करणे व ततव्यतिरिक्तपासून अधिकाऱ्यास परावृत्त करण्यास त्यांची निंदा करणे यास अर्थवाद म्हणतात. यमेकुळगोत्र वर्जियेले, योगयागविधी येणे नोव्हे सिद्धी, वायाची उपाधी दंभधर्म, सत्वर उच्चार प्रल्हादी बिंबला, पुराण प्रसिद्ध बोलिले वाल्मिक, हरि हरि हरि मंत्र हा शिवाचा इ. प्रमाणातून हरिपाठाचा अर्थवाद स्पष्ट होतो.

**६. उपपत्ती :** प्रतिपाद्य विषयाच्या आकलनासाठी, एखादी युक्ती, दृष्टान्त, प्रमाणभूत संदर्भ सांगणे यास उपपत्ती असे म्हणतात. 'तृणअग्निमेळ समरस झाले, पापाचे कळप पळती पुढे, गगनाहूनि वाड नाम आहे, भ्रमर गुंतले सुमन कळीके, द्वारकेचा राणा पांडवा घरी, सत्वर उच्चार प्रल्हादी बिंबला, उद्धवा लाधला कृष्णदाता, हरि हरि हरि मंत्र हा शिवाचा; इत्यादी प्रमाणावरून हरिपाठातील उपपत्ती स्पष्ट होते.

**नामभक्तियोग :**

संत ज्ञानदेवकृत हरिपाठांवरील उपलब्ध साहित्यातील नामभक्तियोग ऐहिक आणि आध्यात्मिक अशा दोन्ही पातळ्यांवर अलौकिक आहे. सर्व सामान्य भक्तभाविकांना तो अलौकिक वाटतो; हे स्वभाविक आहे. परंतु संत

ज्ञानदेवकृत हरिपाठांवरील विपुल आणि विस्तृत साहित्यातील त्याच्या व्याप्तीवर बुद्धिवादी दृष्टिकोणातून एक नजर टाकली तरी त्यातील अलौकिकत्व मनात भरल्यावाचून राहत नाही.

नामभक्तियोग बहिरंगाच्यादृष्टीने सौंदर्यालंकृत झालेला आहे तर अंतरंगाच्या दृष्टीने तत्त्वज्ञानपर आशयाने समृद्ध आहे. त्यातील आशय ज्ञानाच्या पातळीवर समजून घ्यावा लागतो तर अभिव्यक्ती भक्तीच्या पातळीवर व्यवहारात उतरावावी लागते तेव्हा त्याची सुलभता आणि श्रेष्ठता लक्षात येते.

जगातील सर्वच वस्तूंना नाम असते. नसेल तर ठेवावे लागते आणि असेल तर घ्यावे लागते. त्याशिवाय त्या वस्तू संबंधीचा व्यवहार सुरळीत होत नाही. लौकिक अर्थाने एखाद्याने एखाद्याला नाव ठेवले तर तो त्याच्यापासून दूर जातो आणि एखाद्याने एखाद्याचे नाव घेतले तर दूरची व्यक्ती जवळ येते; हा व्यवहारातील नित्याचा अनुभव असतो. ईश्वराचे नाव अर्थात नाम घेणे हाच नामभक्तियोग आहे. या योगाचा अंगीकार भारतीय नव्हे तर विश्वातील सर्वच भक्तिसंप्रदायांनी केलेला आपणास पाहावयास मिळतो. काहीजण प्रणवाची साधना करतात. प्रणव म्हणजे ओंकार परंतु ओंकार देखील एक ईश्वराचे नामच आहे. असे असले तरी संत ज्ञानदेव एकनाथादी वारकरी संतांनी नामभक्तियोगाचा पुरस्कार प्रकषाने केला आहे.

नामाची एक व्याख्या अशी आहे की ज्या अक्षरातून (शब्दातून) भगवंत प्रतीत होतो. त्याचे सामर्थ्य, त्याची कृपा, त्यावरील श्रद्धा भाव जागृत होतो तो शब्द म्हणजे नाम.''[२३] ईश्वराचे नामकरण मात्र मानवकृत आहे. या संबंधीची समीक्षा शंकर महाराज खंदारकरांनी अत्यंत उत्कटतेने केली आहे. एरवी विचार केल्यास ब्रह्माला नावच नाही. जी एक सच्चिदानंद वस्तू आहे. तिला 'ब्रह्म' म्हणणे सुद्धा अव्यापक वस्तूचा व्यावृत्तीकरता होय. कारण चैतन्य वस्तू वाच्यवृत्तीचा कधीच विषय होत नाही. पण त्या त्या अव्यवहार्य वस्तूशी व्यवहार होण्याकरता श्रुतीने नामाच्या रूपाने खूण केलेली आहे.

तरी अनादि परब्रह्म । जे जगदादि विश्रामधाम ।
तयाचे एक नाम । त्रिधा पैं असे ।।
ते कीर अनाम अजाती । परि अविद्या वर्गाचिये राती ।
माजी ओळखावया श्रुती । खूण केली ।।
उपजलिया बाळकासी । नाव नाही तयापासी । ज्ञा.अ.१७.३२८-३१

नाम जातिरहित असलेल्या ब्रह्माला अविद्येच्या रात्रीत ओळखण्याकरीता जी श्रुतीने खूण केली आहे. तिलाच 'नाम' म्हणतात. उत्पन्न झालेल्या बालकाला उपजत नाव नसते. जे नाव आपण ठेवावे त्या

नावाने हाक मारली असता ते बालक 'ओ' देत असते त्याप्रमाणे संसारतापाने शिणलेले जीव कष्टी होऊन दु:खाची गाऱ्हाणी सांगण्याकरिता जेव्हा परमात्म्याजवळ येतात, तेव्हा त्या जीवांना ज्या नावाने परमात्मा 'ओ' देतो; तेच हे संकेतात्मक नाम आहे.''[२४]

अशा प्रकारे देवाचे नामकरण करून पुन्हा त्या नामाचे स्मरण आणि उच्चारणातून नामभक्तियोगाला प्रारंभ होतो. आपल्या पुराणांदी प्राचीन वाङ्मयात शिवशतनाम स्तोत्र, श्री दुर्गाष्टोत्तरशतनाम स्तोत्र, श्रीकृष्णशतनाम स्तोत्र, शिवप्रोक्तश्रीरामशत नामस्तोत्र, विष्णू सहस्त्रनाम, दत्तसहस्त्रनाम, गणेश सहस्त्रनाम, शिवसहस्त्रनाम आणि ललितासहस्त्र नाम स्तोत्रे संक्षेपाने आणि विस्ताराने उपलब्ध आहेत. त्याची छंदबद्ध रचना आणि गेयतेमुळे या नामाचे नित्यपाठ करणारी त्या त्या संप्रदायाची अनुयायी मंडळी खूप आहेत. हरिनामभक्तियोगाची परंपरा प्राचीन आहे. संत ज्ञानदेवांनी तिचा निर्देश हरिपाठात केला आहे. धुंडा महाराज म्हणतात,

हरि हरि हरि मंत्र हा शिवाचा
म्हणती जे वाचा तया मोक्ष ।। ज्ञा. हरि. १४.३

हरि हरि मंत्र हा सामान्य मंत्र आहे असे समजू नये. शिव ज्या मंत्राचा सतत जप करतात असा हा मंत्र आहे. एकनाथ महाराज म्हणतात,'कैलासराणा शूळपाणी। ब्रह्मा लागे ज्याचे चरणी। तो निजराज्य सांडोनी। महास्मशानी हरिचरण चिंती।।'[२५] ए.भा २.७५४

संत ज्ञानदेवांना श्रीगुरू निवृत्तिनाथांकडून या नामभक्तियोगाची प्राप्ती झाली. त्या परंपरेचा प्रारंभ अनादी आहे.

आदिनाथ गुरू सकळ सिद्धांचा ।
मच्छिंद्र तयाचा मुख्य शिष्य ।।१।।
मच्छिंद्राने बोध गोरक्षासी केला ।
गोरक्ष वोळला गहिणी प्रती ।।२।।
गहिनी प्रसादे निवृत्ती दातार ।
ज्ञानदेवा सार चोजविले ।।३।।

ही जसी गुरू परंपरा आहे. तशी नाम भक्तियोगाची मंत्र परंपराही आहे. संत ज्ञानदेवांनी हरिनामाचा मंत्र अवघ्या जगाला दिला आणि 'प्रगट गुह्य बोले विश्वब्रह्माची केले' हे वचन सार्थक केले. संत ज्ञानदेवांचे वारकरी संप्रदायातील हे सर्वात मोठे सांस्कृतिक योगदान आहे.

**हरिपाठ साधना - नामसाधनेतील त्रिपुटी :**

'हरिपाठ साधना' हा एक प्रमुख विषय हरिपाठांवरील साहित्यात विस्ताराने मांडला आहे. अध्यात्मविद्येने प्रतिपादन केलेली जीवनातील मोक्ष अथवा मुक्ती ही उच्च अवस्था प्राप्त करून ईश्वरत्वाच्या वैश्विक अनुभूतीसाठी केलेली मौखिक, शारीरिक आत्म उन्नतीची वाटचाल म्हणजे हरिपाठ साधना होय. बुद्धीच्या निकषावर आणि अत:करणाच्या प्रामाण्यावर पारमार्थिक विचार या साधनेच्या मागे असतो. बुद्धी आणि श्रद्धा म्हणजेच बौद्धिक आणि मानसिक विकास येथे अपेक्षित आहे. संसारी जीवनातही ही साधना सहजसाध्य आहे. 'कर्मे ईशु भजावा' या भावनेचा परिपाक या साधनेचे मूर्तरूप आहे. साधना हा कृतियुक्त शब्द आहे.

साधक साधन-साध्य या त्रिपुटीचा समावेश या साधनेत होतो.

**१. साधक** : साधक-साधना करणारी व्यक्ती, साधनेचा कर्ता, अधिकारी, उपासक असे साधक शब्दाचे अर्थ आहेत. हरिपाठाचे अधिकारी सर्व सामान्य असे संसारी जीव आहेत. सर्व सामान्य जीवांना केंद्रस्थानी ठेवून या साधनेची मांडणी झाली आहे. 'सकळांसी येथे आहे अधिकार' या संत तुकारामांच्या वचनाप्रमाणे हरिपाठ साधनेचे सर्वच जीवभाग साधक होऊ शकतात.

**२. साधन** : हरिपाठ साधनेचा महत्त्वाचा घटक म्हणजे साधनेचे साधन. साधना सिद्ध होईपर्यंत साध्याइतकेच साधनांवर प्रेम करावे लागते. या साधनेत 'हरि मुखे म्हणा, हरि मुखे म्हणा, सत्वर उच्चार प्रल्हादी बिंबला, हरि उच्चारणी अनंत पापराशी। जातील लयासी क्षणमात्रे, वाचेसि सुलभ रामकृष्ण, काळवेळ नाम उच्चारिता नाही, रामकृष्ण टाहो नित्य फोडी, नारायण हरि उच्चार नामाचा, वाचेसी सद्‌गद जपे आधी, आणि रिकामा अर्धघडी राहू नको.' इत्यादी हरिपाठातील प्रमाणांच्या आधारे हरिनामाचा उच्चार हेच हरिपाठ साधनेचे प्रमाणभूत साधन आहे. अर्थात 'चित्तशुद्धीचे साधन असलेले नाम, नामधारकांच्या जिव्हेंद्रियाचा विषय आहे आणि साक्षात ज्ञानाला साधन असलेले नाम, साधकाच्या श्रवणेंद्रियाचा विषय आहे. साधकाने स्वत: उच्चारलेला रामकृष्णहरि हा नाममंत्र कर्मत्वावच्छेदाने चित्तशुद्धी, साधनसंपत्ती, विविदिषा यास कारण आहे.[३६]

**३. साध्य** : साधनेने सिद्ध करावयाचे साध्य जर कोणते असेल तर मोक्ष किंवा मुक्ती हेच आहे. हरिनामाचा उच्चार हे साधन, नामाच्या बळावर निर्गुण निराकार परब्रह्म नाम धारक साधकासाठी सगुण साकार होते. जो नामरूपरहित आहे त्याचे नामस्मरण कसे करता येईल. निर्गुणोपासकाकरिता एक सायुज्यमुक्तीच आहे. बाकीच्या तीन मुक्ती सलोकता, समीपता व सरूपता

या निर्गुण ज्ञानाने मिळणाऱ्या नसून सगुण उपासनेनेच प्राप्त होणाऱ्या आहेत.''[२७] नामाने चारीही मुक्तीचा लाभ होतो. हे नामाचे ज्ञानाहून वेगळेपण आहे.

**चारमुक्तींची प्राप्ती :**

नामधारकास ईश्वरत्वाची अनुभूती सर्वत्र येते 'भरला घनदाट हरि दिसे' म्हणून सर्वत्र वैकुंठ केले असे' असा त्याच्या नामभक्तियोग साधनेचा साक्षात्कार असतो. जेथे परमात्मा आहे तो देहच वैकुंठ म्हटला जातो म्हणून मंदिर वैकुंठच आहे अशी उदात्त धारणा नामधारकाची असल्यामुळे 'हरिपाठ रहस्य' या ग्रंथात बाबाजी महाराज पंडित चार मुक्तीचे स्वरूप स्पष्ट करताना म्हणतात,

१. मंदिरात गेलेले पुरुष देवदर्शनाचे वेळी वैकुंठातच असतो. ही सलोकता मुक्ती होय.
२. देवळातील देवाच्या, तो दर्शन घेणारा, समीपही असतो म्हणून त्याला समीपता मुक्तीही प्राप्त होते.
३. त्या क्षणापुरते त्याचे मन तदाकार होते ही त्याची सरूपता मुक्ती असते.
४. क्षणभर देहाचा विसर पडल्यास ती सायुज्यमुक्ती होते. अशा रीतीने नामधारकास चारी मुक्तींचा लाभ होतो.[२८]

या चार मुक्तींच्या प्राप्तीसाठी श्रद्धापूर्वक नामभक्तियोगाची साधना आवश्यक आहे. अश्रद्धावान पुरुषाला मुक्ती प्राप्तीचा अनुभव येत नाही.

नामभक्तियोगाची साधना करताना चार मुक्तीचे स्वरूप आणि त्यांचे हरिपाठातील स्थान याचा आढावा हरिपाठाच्या अभ्यासकांस उद्बोधक आहे.

डॉ. अनुराधा कुलकर्णी मुक्तींचा व्यापक आणि वास्तववादी अर्थ प्रतिपादन करतात. सलोकतेचा अर्थ परमेश्वराच्या प्रांतात जाणे, संकुचिततेला सोडून विशालतेकडे जाणे, फक्त स्वत:चा विचार न करता सर्वांचा विचार करणे, ज्याने स्वत:ला विश्वाच्या अणुरेणूत सामावून घेतले, इतका जो अनंत बनलाय त्या परमेश्वराच्या गावी जाण्यासाठी नामरूपात्मक 'स्व'ला विसरून सर्वात्मक बनण्याचा प्रयत्न करणे, ही सर्वात्मकता साधली की सलोकता मुक्ती मिळते. नामस्मरणात तल्लीन झालेल्या भक्तास, वैविध्याने भरलेल्या विश्वामधल्या ब्रह्मैक्याचे दर्शन होते. भगवद्गीतेतील वर्णिलेल्या साम्ययोगाप्रमाणे.

विद्याविनय संपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि ।
शुनि चैव श्वापाकेच पंडित: समदर्शिन: ।। गीता ४.१८।।

ज्ञानी पुरुष हा नेहमीच विद्याविनय संपन्न ब्राह्मण, गाय, हत्ती, कुत्रा तसेच चांडाळ या सर्वांमध्ये एक साम्यच अनुभवतो, साधक भक्ताला सर्वत्र कृष्णरूप दिसते. या साम्यदृष्टीमुळे सरूपता मुक्ती प्राप्त होते.[२९] मी सुद्धा या सृष्टीचा एक अविभाज्य घटक असून माझ्या रूपानेही तो श्रीहरीच सर्वत्र विलसत आहे; असा त्या नामधारकाचा दृढविचार असतो म्हणून सत्य-ज्ञान-आनंद हेच श्रीहरीचे स्वरूप आहे. त्या स्वरूपाशी नामधारकाचे पूर्ण तादात्म्य म्हणजे सायुज्यता मुक्ती आहे. परिसाचा स्पर्श ज्या प्रमाणे एका क्षणात लोखंडास सुवर्ण करतो त्याप्रमाणे परमेश्वराच्या अनन्य भक्तीच्या घरात उभ्या राहिलेल्या भक्तास एका क्षणात चारही मुक्ती साधतात.[३०] या मुक्ती अशा प्रकारे जिवंतपणी उपभोगावयाच्या असतात. हे या मुक्ती चिंतनाचे वेगळेपण आहे.

संतसाहित्याचे व्यासंगी अभ्यासक डॉ. व. दि. कुलकर्णी यांनी 'हरिपाठ : अंतरंगदर्शन' या आपल्या हरिपाठावरील प्रवचन ग्रंथामध्ये चार मुक्तीच्या संबंधाने आधुनिक काळाच्या संदर्भात वास्तववादाच्या पातळीवरून केलेले विवेचन खूप समर्पक आहे. ''आपण पाहिले आहे की हे संबंध विश्व जे आहे, ते त्याचा (ईश्वराचा) विलास आहे. जी गाभाऱ्यात मूर्ती तसे विश्वही त्याची मूर्तीच आहे. त्या चैतन्याची मूर्ती म्हणजे विश्व होय अन् त्या विश्वात मी असतो म्हणजे त्याच्याच लोकात मी आहे ही सलोकता[३१] सलोकतेलाच ते समीपता असे म्हणतात त्याचे कारण त्यांनी सोदाहरण स्पष्ट केले आहे. फुल पाहिलं, चोळामोळा केलं, फुलपाखरू पकडलं, पंख तोडले तर ही सलोकता नव्हे. मी त्याच्या जवळ जात नाही. मी त्याचा नाश करतो. माझ्या प्राणाचा मी नाश करतो. हे जेव्हा आपणाला वाटते तेव्हा त्या सलोकतेमध्ये हळूहळू सरूपता यायला लागते ते आणि मी एकच .... तुझ्या पायात काटा मोडला तर माझ्या डोळ्यात पाणी येते हा जो अनुभव असतो तो सरूपतेचा अनुभव आहे.... शेवटी जेव्हा हे सत्पुरुष आपण पाहतो की ह्या सगळ्यांचे दु:ख निरसन करत असतात; अन स्वत:ला काहीच घेत नाहीत तेव्हा या विश्वासी त्यांची सायुज्यता झाली.[३२] मानवी मनाच्या क्रमविकासातून या श्रेष्ठ अवस्था म्हणजे चार मुक्तींचा विचार आहे. अशी भाग्यवान व्यक्ती जगाकडे सकारात्मक भावनेने पाहते; हेच यातून प्रतीत होते.

**सर्व साधनांचे सार : एक तत्त्व नाम :**

हरिपाठावरील उपलब्ध साहित्यात परोपरीने हरिनाम सर्व साधनांचे सार असलेले एकतत्त्व म्हणून प्रतिपादन केले आहे.

सार हा शब्द हरिपाठ साहित्यात 'तात्पर्य' या अर्थाने वारंवार आलेला आहे. त्याची परिभाषा स्पष्ट करताना धुंडा महाराज देगलूरकरांनी

लिहिले आहे. सार म्हणजे सर्व साधनांचा पूर्ण विचार करून त्यातून काढलेला निष्कर्ष. तो निष्कर्ष सामान्य बुद्धीच्या एखाद्या व्यक्तीने काढला नसून सर्वज्ञ अशा वेदाने काढला आहे.

**संत संगतीची नामसाधनेतील अपरिहार्यता :**

हरिपाठ साधनेची सिद्धी होण्यासाठी तुकाराम शास्त्री यांनी संतसंगतीमध्ये साधना हाच भगवत्प्राप्तीचा सोपा उपाय प्रतिपादन केला आहे. संतांनी दाखविलेल्या मार्गाने गेल्यावर कोणतही अडथळे येत नाही. 'मार्ग दाऊनी गेले आधी। दया निधी संत ते।। तेणेचि पंथे चालू जाता। न पडे गुंता कोठे काही।।''[३३] या संत निळोबांच्या वचनाचा आधार घेऊन ते स्पष्ट करतात की सिद्ध पुरुषांना या मार्गाचे खरे स्वरूप, त्यातील अडथळे, मार्गस्थमनाचा स्वभाव, त्याला मार्गारूढ ठेवण्याचा व गतिमान बनविण्याच्या युक्त्या इत्यादी गोष्टींचा त्यांना अनुभव असतो. अनुभवाचे ज्ञान प्रतिपादन करून साधकाविषयी त्यांच्या मनातील करुणाबुद्धी साधकाला मार्गदर्शन करण्यास भाग पाडते.

हरिपाठांवरील साहित्यात संत व साधू हे शब्द समानार्थाने योजले आहेत. दृष्टान्ताची मात सांगताना 'साधूचे संगती तरणोपाय' असे संत ज्ञानदेवांनी सांगितले आहे. त्यांची अनुभूती प्रतिपादन करताना ते म्हणतात. 'ज्ञानदेवा गोडी संगती सज्जनी। हरि दिसे जनी वणी आत्मतत्त्वी।' या दोन्ही पदांचे विवेचन हरिपाठावरील सर्वच भाष्यकारांनी करताना संत संगतीची आवश्यकता आणि संतसंगतीची फलश्रुती अत्यंत बहारतेने सांगितली आहे. व्यक्तिगत आणि सामाजिक जाणिवांची प्रगल्भता संताच्या संगतीत घडून येते.

**हरिनामाची सुलभता व सर्वाधिकार सेव्यता :**

संतांना आणि हरिपाठांवरील भाष्यकारांनी नामाची सुलभता प्रतिपादन केली आहे. कर्म, ज्ञान, योग इ. साधनापेक्षा नाम अत्यंत सुलभ आहे. कर्म मार्गातील सूक्ष्मता, योगाची दुस्तरता, तपाची कठोरता यात नाही असे सौ. सुनंदा शाळिग्राम यांनी 'हरिपाठ चितन', या आपल्या हरिपाठ भाष्य ग्रंथांत म्हटले आहे.

ज्ञानदेव 'नाम हे सुलभ' कोणत्या अर्थाने म्हणतात, हे या संबंधी सौ. सुनंदा शाळिग्राम यांचे निष्कर्ष अत्यंत महत्त्वाचे आहेत.[३४] त्यांचे थोडक्यात विवेचन करावयाचे झाल्यास नामाची सुलभता व सर्वाधिकार सेव्यता सहज स्पष्ट होईल असे प्रतीत होतो.

१. प्रत्येकाला साधन करता आले पाहिजे. तसे कोणालाही नाम घेता येते. मुकी माणसे सुद्धा मनात घेतात.

२. साधनाला स्थळकालाची अट असता कामा नये. भगवंताचे नाम कोठेही व केव्हाही घेता येते.
३. कोणत्याही परिस्थितीत साधन करता आले पाहिजे. परिस्थिती कशीही असली तरी नाम घेता येते.
४. मार्गदर्शकाची साधनेत वरचेवर आवश्यकता लागते. भगवंताच्या नामात ते सामर्थ्य आहे. 'नकळो ते कळो येईल उगले। जपता या विठ्ठले एकाचिया।।' अशी संत ज्ञानदेवाची आदेशवाणी आहे.
५. साधनेने होणारे आंतरिक बदल सहज, स्वाभाविक हवेत. नामाने नकळत व सहज मनात बदल घडून येतो.
६. संसारात राहून साधन करता आले पाहिजे. नाम घेण्यासाठी संसार सोडावा लागत नाही.
७. साधनेने प्राप्त झालेल्या सिद्धीबद्दल आसक्तिभाव नामाने मावळतो. त्यामुळे सिद्धीला साधक विचारत नाही.
८. शरणागती स्वाभाविकपणे घडते कारण नामाच्या सामर्थ्याचा प्रत्यय अनुभवजन्य असतो.
९. इतर साधनात साधन व साध्य यांच्यात अंतर असते. नामसाधनेत साधन साध्यरूपच असते.
१०. नामाचा उच्चार, वाचन, पठण लेखन सुलभ असते.

सारांश, नामाची सुलभता आणि सर्वाधिकारसेव्यता व्यक्ती व समाज यांच्या संपूर्ण सुखांची आणि ते साधण्याच्या मार्गाची सूत्रबद्ध समग्रविचारांची ही मालिकाच आहे.

**संदर्भ टीपा :**

१. संत ज्ञानदेव 'हरिपाठ' अभंग १.१
२. देशमुख डॉ. श्रीकृष्ण 'श्री ज्ञानदेवांचा हरिपाठ - एक अभ्यास, श्रीकृपा प्रकाशन, मुरगुड, कोल्हापूर, प्रथमावृत्ती २००२, प्रस्तावाना पृ.४.
३. पंडित डॉ. वा.ना. 'आद्य शंकराचार्यांचे भक्तितत्त्व' पंचलिका ग्रंथ न्यास, नवी मुंबई ६. द्वितीय आवृत्ती २००६, प.९.
४. तत्रैव पृ. १०
५. काळे रजनी (संपादक) 'कल्याणी ज्ञानदेव विशेषांक' विसावा अनिकेत सोसायटी क्र. १ बिबवेवाडी, पुणे७, पृ.१५९
६. तत्रैव पृ.१५९
७. तत्रैव पृ. १६०
८. गोसावी प्रा. र.रा. 'पाच भक्तिसंप्रदाय', मेहता पब्लि. पुणे ३०. द्वितीयावृत्ती १९९८, पृ.१४०.

९. तत्रैव पृ.१८३
१०. देगलूरकर धुंडा महाराज 'हरिपाठ विवरण', देगलूरकरांचा मठ, पंढरपूर, आवृत्ती पाचवी शकते १९१०, पुनर्मुद्रण शके, १९२७ पृ.२.
११. तत्रैव पृ. ३
१२. तत्रैव पृ. ३
१३. साखरे किसनमहाराज 'सार्थ हरिपाठ' यशोधन प्रकाशन, आळंदी आवृत्ती चौथी, १९९८ पृ. २३
१४. तत्रैव पृ.२३
१५. तत्रैव पृ.२३
१६. राजपूत नथुसिंगमहाराज, 'सार्थ हरिपाठ नामामृत' वारकरी शिक्षण संस्था, आळंदी, प्रथमावृत्ती, १९९९, पृ.४८.
१७. देगलूरकर धुंडा महाराज, उनि., पृ ४.
१८. देशमुख डॉ. श्रीकृष्ण, उनि, प्रस्तावना पृ.४
१९. साखरे किसनमहाराज, उनि, पृ.२४
२०. खंदारकर शंकरमहाराज, 'हरिपाठ भाष्य', वै. शंकरमहारज खंदारकर विश्वस्त संस्था, उदगीर, द्वितीय आवृत्ती, २००० पृ.८,९.
२१. तत्रैव. पृ. ९
२२. तत्रैव. पृ. १०
२३. कंकाळ डॉ. सौ. यमुना, 'भागवत संप्रदायातील पाच संत आणि त्यांच्या नामभक्तियोग', पीएच.डी. प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, २००१, पृ.१०.
२४. खंदारकर, उनि., पृ ३६
२५. देगलूरकर, उनि. पृ.३३८.
२६. खंदाकर, उनि. पृ.३६
२७. देगलूरकर, उनि.पृ.९
२८. पंडित बाबाजी महाराज, 'हरिपाठ रहस्य', श्री. ज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ, अमरावती. आवृत्ती ११ युगाब्द ५१०३ पृ.७
२९. कुलकर्णी डॉ. अनुराधा, 'श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठाचे अमृतमंत्र', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे ३०, प्रथमावृत्ती २००८ पृ.१२
३०. तत्रैव. पृ.१३
३१. कुलकर्णी डॉ. व. दि., 'हरिपाठ : अंतरंगदर्शन', उत्कर्ष प्रकाशन, पुणे ४, प्रथमावृत्ती, २००६, पृ. १५
३२. तत्रैव. पृ.१६
३३. तुकाराम शास्त्री, 'हरिपाठ-चिंतन', अध्यात्म शांतीपीठ आळंदी, द्वितीय आवृत्ती, २००६, पृ.१०५
३४. शाळिग्राम सौ. सुनंदा, 'हरिपाठ-चिंतन', प्रकाशन - स्वत: लेखिका, दत्तवाडी, पुणे ३०. प्रथमावृत्ती २००५, पृ.७५, ७६.

# तुकारामांचा संघर्ष

प्रा. रामदास टेकाळे

तुकाराम महाराजांनी जो जीवनपथ निवडला होता तो काही साधा सोपा सरळ मार्ग नव्हता. तुकारामांना केवळ बाह्य संघर्षच नाही तर आंतरिक संघर्षही करावा लागला होता. एकीकडे त्यांना पारिवारिक, सामाजिक आणि धार्मिक विरोधाशी झगडावे लागत होते. तर दुसरीकडे काम, क्रोध, मद, लोभ, अहंकार इत्यादी चित्तप्रवृत्तींशीही सामना करावा लागत होता. ते म्हणायचे की, आत मनाशी आणि बाहेर जगाशी अशा दोघांशी आम्हाला रात्रंदिवस युद्ध करण्याचा प्रसंग आहे. जीवावर कठीण आघात पडतात. ते आले म्हणजे त्याचे रोज सारखे निवारण करावे लागते यथा-

''रात्री दिवस आम्हां युद्धाचा प्रसंग।
अंतर्बाह्य जग आणि मन।।
जीवाही अगोज पडती आघात ।
येऊनियां नित्य निय वारू ।।
तुका म्हणे तुझ्या नामाचिया बळें ।
अवघियांचे काळे केले तोंड ।।''

तुकाराम महाराजांनी याचे निवारण विठ्ठलाच्या नामस्मरणात शोधले. व्यापाराचे दिवाळे निघाल्याने आणि महाराष्ट्रात भयंकर दुष्काळ पडल्याने आपल्या व्यवसायाप्रती अरुची निर्माण झाली. आता ईश्वर चिंतन आणि अलौकिक आनंदाची प्राप्ती होऊ लागली. अजून त्यांनी संसाराचा त्याग केला नव्हता. परंतु 'कुटुंबाविषयी पूर्वीप्रमाणे प्रेम' आणि 'जबाबदारीच्या निर्वाहाचा आग्रह' क्षीण होत चालला होता. कुटुंबाविषयी त्यांच्या असलेल्या उदासीनतेपुढे कंटाळून त्यांची पत्नी जिजाई त्यांना बरे वाईट बोलू लागली. परंतु तुकाराम आपल्या पत्नीला हाच उपदेश देत की, तिने आपल्या हृदयातून हे विचार काढून टाकले पाहिजे.

"किंचित हे सुख टाकी वो थुंकोनी
पावसील धणी परमानंद ।।
तुका म्हणे थोर चुकती सायास ।
भवबंधपाश तुटोनिया ।।"

कौटुंबिक संघर्षाव्यतिरिक्त तुकारामाला समाजातील काही अनेक प्रहार सहन करावे लागले. शूद्र वर्णात जन्मल्यामुळे त्यांना वेद स्मृती ग्रंथाच्या वाचनापासून वंचित रहावे लागले. तुकारामाला सनातनी वर्गाकडून अनेक प्रकारे छळ सहन करावा लागला. त्यांची काव्यरचना इंद्रायणीत बुडविण्यास भाग पाडले. त्यांना लाभांचा मार सहन करावा लागला. या प्रसंगावरून तुकारामाची सहनशीलता व क्षमाशील वृत्ती दिसून येते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात उदारता आणि विनम्रता पुरेपूर आढळते. त्याचबरोबर निर्भयता आणि दृढतेचा ही आविष्कार दिसतो. समाजातील ढोंग आणि दांभिक वृत्तीवर तुकारामाने अत्यंत परखडपणे कोरडे ओढले आहेत.

तुकारामाला जेवढा बाह्य संघर्ष करावा लागला तेवढा काम, क्रोध, मद, मोह, मत्सर, अहंकार या विकारांवर विजय मिळविण्याचा अंत:संघर्षही प्रखरपणे करावा लाभला आहे. माणसाचे मन मोठे चंचल आहे. त्यावर विजय प्राप्त करणे कठीण आहे. मन हे काम - क्रोधही विकारांच्या आहारी जाते. त्यामुळे त्यावर अंकुश ठेवणे आवश्यक आहे. ते म्हणतात,

"तुका म्हणे मना पाहिजे अंकुश
नित्य नवा दिस जागृतीचा ।।"

तुकारामाला ह्या मनावर अंकुश ठेवण्यासाठी खूप अभ्यास करावा लागला. ते असे म्हणायचे की, काम क्रोधाच्या पर्वतांना पार केल्यानंतरच विठ्ठलाची प्राप्ती संभव आहे. परंतु यांना पार करणे काही सोपे काम नाही.

"काम क्रोध आड पडले पर्वत
राहिला अनंत पलीकडे ।।
नुलंघवे मज्ञ न सापडे वाट ।
दुस्तर हा घाट वैरियांचा ।।"

मनात या विकारांचे पर्वत उभे असतात. हे पर्वत ओलांडल्याशिवाय परमेश्वर भेटणार कसा? ईश्वराने या जन्मी मूल्यवान शरीर दिले पण ते व्यर्थ गेले हे मला आता कळून आले. अशी कबुली ते देतात. पण हे लक्षात आल्यावर ते स्वस्थ बसले नाहीत. देवावर किंवा संचितावर त्यांनी हवाला दिला नाही. ते प्रयत्नपूर्वक साधनेला लागले. "काम, क्रोध, मोह, मद, मत्सर या अंत:करण भ्रष्ट करणाऱ्या मनुष्याला स्वार्थमूलक विकृती त्यांनी प्रयत्नपूर्वक

दूर केल्या तेव्हा त्यांच्या निर्मळ झालेल्या अंत:करणातच अनंत प्रकट होऊन त्याचा त्यांना साक्षात्कार झाला. कारण विकार नसलेले शरीर, निर्मळ असते आणि निर्मळ शरीर हे ईश्वराचे अधिष्ठान असते.''

तुकारामाचा स्वत:चा शरीर वासनेविरूद्ध असाच अंत:संघर्ष सुरू होता. ते स्वत:च याचे वर्णन करताना म्हणतात की, ''माझ्या अंत:करणात अज्ञानाचा अंधार आहे. त्यामुळे न कळता मी संसारात अडकलो. जन्माला येऊन मी काय मिळविले हाच विचार सारखा माझ्या मनात येतो. थोर संतांना जे अनुभव आले ते माझ्या अंतरी यावेत म्हणून माझा जीव तळमळतो. आतापर्यंत माझी वाचा खूप बोलली परंतु ती कोरडी व निष्फळ ठरली. संतांच्या ओळीत बसण्यास माझा जीव बळी देण्यास मी तयार आहे. मी निकरावर आलो आहे. पण स्त्रीपुत्रादिकांवर मी प्रेम करतो. माझी वासना अनावर असून मन विषयाकडे ओढ घेते व गांजते. माझा प्रयत्न काही चालत नाही. माझे मन विषय वासना सोडीत नाही. आदराने मनाची प्रार्थना केली तरी ते पतनाकडेच जाऊ पाहते. आशा, तृष्णा, वासना यांनी माझा घात मांडला आहे.''

याप्रमाणे तुकाराम महाराज स्वत:च्या मनाची पुन्हा पुन्हा समजूत घालतात की, परक्याचे धन आणि दुसऱ्याची पत्नी विषासमान आहे. यांच्यापासून दूर राहणेच योग्य आहे. ते म्हणतात-

''परद्रव्य परनारी । जाली विषाचिये परी ।
तुका म्हणे फार । नाही लागत व्यवहार ।।''

तुकाराम महाराजांवर कौटुंबिक संस्कारामुळे त्यांना परद्रव्य आणि परनारी यावर विजय मिळविणे विशेष कठीण वाटले नाही. त्यांनी वैराग्य आणि अभ्यासाच्या बळावर ते दुर्गुण नष्ट केलेत.

अहंकाराशिवाय तुकारामाचे असेच मत होते की, अहंकाराव्यतिरिक्त सर्व विकार ज्ञानाच्या ज्योतीत निस्तेज होऊ शकतात. परंतु अहंकार तर ज्ञानाच्या प्रकाशात कधी कधी अजून प्रखर होतो कारण ज्ञानी माणसाला धनसंपत्ती, रूपसौंदर्य, आदी भौतिक वस्तुंबद्दल दंभ नसतो. परंतु आपल्या ज्ञानाचा मात्र त्याला अहंकार होतो. तुकाराम म्हणतात, 'तुका म्हणे जेव्हा गेला अहंकार । तेव्हा आपपर बोलविणे ।।' अर्थात जो पर्यंत जीव आणि ब्रह्मामध्ये अहंकाराचे आवरण आहे, तो पर्यंत परमेश्वर प्राप्ती शक्य नाही. स्वत: तुकारामांनी मात्र या अहंकाराला यामुळे जवळपासही भटकू दिले नाही. तो स्वत:ला निमित्तमात्र मानत होते आणि काही परमेश्वराचे अशी त्यांची

धारणा होती. यासाठी अशा परमेश्वराच्या प्राप्तीसाठी सर्वस्वाचा त्याग केल्याशिवाय तो प्राप्त होणार नाही.

तुकारामाचे जीवन असे अंतर्बाह्य संघर्षाने भरून राहिले नाही. सातत्याने भोगावा लागलेला बाह्य संघर्ष आणि त्याहून परमेश्वर प्राप्तीसाठी केलेल्या अंत:संघर्षाने तुकारामाने हृदय स्वच्छ धुतले गेले आणि ते परमेश्वर भक्तीत आनंद प्राप्ती उपभोगू लाभले. परिणामी उच्चनीच असा भेद बाळगू नका असे सांगताना भेदाभेद कसा अमंगल आहे हे त्यांनी घटवून दिले. रंजल्या गांजलेल्यांना मदत करावी आपआपला प्रपंच नेटका करावा, दंभ, अहंकार दूर ठेवावा असा अत्यंत सोप्या भाषेतील उपदेश त्यांनी लोकांना दिला.

तुकारामाचे अभंग वाचल्यानंतर हे लक्षात येते की, तुकाराम हे अत्यंत विनयी व सरळ स्वभावाचे गृहस्थ होते. त्यांच्या चेहऱ्यावर सतत शांतभाव असे आणि दुसऱ्याला उदार अंत:करणाने मदत करण्याची वृत्ती त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येते. तुकारामाबद्दल असाही एक लोकापवाद आहे की, ते अशिक्षित होते परंतु त्यांच्या अभंग रचनेवरून मात्र हे काही खरे वाटत नाही. कारण अभंगात त्यांचे ग्रहण, ज्ञान प्रतिबिंबित झाले आहे. एरव्ही सतत शांत असणारे तुकाराम कधी कधी खूप रागावत, संतापत आणि त्या भरात भलेबुरे कटू वचनही बोलत, परंतु मुळात ते शांत स्वभावाचे होते. आपल्या प्रत्येक कृतीवर ते अंतर्मुख होऊन विचार करीत. आपल्या विकास मार्गाचे ते स्वत:चे मोठे वाटाडे होते. त्यांना कोणी मार्गदर्शन करणारा नव्हता की सहानुभूती व्यक्त करणारा कोणी सखाही नव्हता. त्यांचे कवित्व हे त्यांच्या स्वयंप्रेरणेतून आणि स्वयंप्रयत्नातूनच सिद्ध झाले. असंख्य काव्य ग्रंथांच्या वाचनामुळे आणि पाठांतरामुळे त्यांची बुद्धी तीक्ष्ण झाली. ती वास्तव घटनांना सुंदर रूप देऊ लागली. परमेश्वरालाच आपला गुरू बनविल्यामुळे त्यांनी सर्व काही ईश्वरार्पण केले. त्यांचे चरित्रकार महिपतींनी त्यांना त्यांच्या 'भक्तविजय' या ग्रंथात त्यांना आजाऱ्याची सेवा करताना, दु:खी पीडितांचा भार वाहताना, अपंगांना सहारा देताना आणि जे भुकेने आणि तहानेने व्याकूळ असतील त्यांची ते गरज भागवितांना चित्रित केले आहे.

तुकारामानंतर त्यांचे समकालीन चरित्रकार, शिष्य यांनी त्याला 'संतत्व' बहाल केले. त्यांच्या गुणांचे अतिशयोक्तीपूर्ण वर्णन केले. मुळात तुकाराम हा जीवनाच्या प्रती अत्यंत प्रामाणिक आणि मानवीय करुणेने ओतप्रोत होता. परंतु या समकालीन चरित्रकार शिष्यांनी तुकारामाच्या जीवनातील महत्त्वपूर्ण घटनांभोवती चमत्काराचे जाळे उभे केलेले आहे. त्यांच्या ऐतिहासिक प्रामाणिकतेची उचित व्याख्या करणे अपेक्षित आहे.

# विभाग 'आ'
# दलित साहित्य

# दलित साहित्य आणि संशोधनाच्या दिशा

प्रा. डॉ. विलास थोरात

मराठी साहित्य संशोधनाच्या परंपरेचा विचार करताना काही मैलाचा दगड असणारी नावे सहजपणे लक्षात येतात. डॉ. शं.गो. तुळपुळे, डॉ. रा.चिं. ढेरे, डॉ. वि. भि. कोलते, इतिहासाचार्य वि.का. राजवाडे, सेतुमाधवराव पगडी; स्त्रीसंशोधकांमध्ये दुर्गा भागवत, इरावती कर्वे, तारा भवाळकर इ. सर्व साहित्यकारांनी, संशोधकांनी आपल्या अथक परिश्रमातून मराठी साहित्य संशोधनाचे विशुद्ध नि मूलभूत दालन समृद्ध केलेले आहे, यात शंका नाही. संशोधनाची उज्ज्वल परंपरा आणि शिस्त मराठी साहित्य संशोधनाला लाभली, हे मराठी मातीचे भाग्य! मला दिलेल्या विषयाच्या अनुषंगाने मी जेव्हा सद्यस्थितीतील संशोधन, संशोधक विद्यार्थी, मार्गदर्शक, विद्यापीठीय यंत्रणा, संशोधनानंतर प्रदान झालेल्या पदव्या, संशोधनातील मौलिकता यांचा विचार करू लागलो, तेव्हा मी कधीतरी ऐकलेली सर्वसाधारण टीका-टिप्पणी मला आठवली. एम.फिल., पीएच.डी. करू इच्छिणारे विद्यार्थी जेव्हा विषय निवडीसंदर्भात आपल्या मार्गदर्शकांशी चर्चा करतात, तेव्हा सामान्यपणे पुढील विधाने तो विद्यार्थी करीत असतो.

"सर, एखादा सोपा विषय सूचवा ना."

"असा एखादा विषय द्या ना की, ज्यामुळे माझे काम लवकर नि सहजपणे पूर्ण होईल."

"माझा एम.फिल. चाच विषय एक्स्टेंड केला तर चालेल ना?"

"मी मागे अमूक-अमूक विषय घेऊन आर. आर. कमिटीपुढे सादर केला परंतु तो रिजेक्ट झाला. का तर तो विषय इतर दोन-तीन विद्यापीठात झालेला आहे."

वरीलप्रमाणे व्यवहारवादी दृष्टिकोण बाळगून 'संशोधन' करण्यासाठी उत्सुक असणारे विद्यार्थी जेव्हा संशोधनातली पदवी प्राप्त करतात, तेव्हा-

त्यांच्या मित्रांकडून, सहकारी प्राध्यापकांकडून, समाजातील शिक्षित-अशिक्षित घटकांकडून खालीलप्रमाणे प्रतिक्रिया व्यक्त होताना दिसतात.

''आम्हांला माहितयं, कशी डिग्री मिळवली ती.''

''इकडंच-तिकडंच आयतं मटेरिअल एकत्र सांधलं की झाली यांची प्रबंधाची गोधडी तयार.''

''पीएच.डी. सारख्या पदव्यांची विद्यापीठांनी नुसती खिरापत वाटण्याचं काम सुरू केलंय.''

संशोधक विद्यार्थ्यांचा संशोधनाकडे वळण्याचा उद्देश आणि संशोधन पूर्ण झाल्यानंतर मिळणारी 'विद्यावाचस्पती' पदवी यांबद्दल अनेकप्रकारची उलटसुलट चर्चा नेहमीच ऐकायला मिळते. याविषयी खालील दोन साहित्यिक विचारवंतांची मते पाहिल्यास या उलट-सुलट चर्चेत बऱ्याच अशी सत्यता असावी हे नाकारता येत नाही.

पहिले मत व्यक्त केले आहे, डॉ. ऋषीकेश कांबळे यांनी चौथ्या मराठवाडा युवा साहित्यसंमेलनाच्या औरंगाबाद येथे भरलेल्या आपल्या अध्यक्षीय भाषणात ते म्हणतात- ''अलीकडचे संशोधन आणि मार्गदर्शक हे डोंब झालेल्या हरिश्चंद्राच्या रांजणात पाणी भरणारे भोई आहेत. म्हणून त्यांच्याकडून मराठी भाषेच्या जतनाची अपेक्षा 'मेलियाच्या रांडा इच्छिती लेकरू' असे ठरेल. विद्यापीठ अनुदान आयोगाने काढलेले सजीव माणसांच्या निर्जीव संशोधनाचे हे कारखाने आहेत.'' [१]

दुसरे मत आहे डॉ. शं.रा. राणे यांचे, ते म्हणतात, ''विद्यापीठात चालणारे बरचसे संशोधन हे जिज्ञासेतून किंवा स्वयंप्रेरणेतून निर्माण झालेले नसते. व्यावसायिक प्रेरणा त्यामागे असते, हे संशोधन पुष्कळदा पोटार्थी संशोधन असते. अपप्रवृत्तीतून जन्माला आलेले असे व्याजसंशोधन हे खरे संशोधन नसते. त्या संशोधनात गुणात्मक कस कमी असतो. केवळ ज्ञानप्राप्तीच्या हेतूतून विद्यापीठाबाहेर चालणारे संशोधन पुष्कळदा खरे संशोधन असते.'' [२]

उपरोक्त दोन मतांचा विचार केल्यास असे तीव्रतेने जाणवते, ते हे की, विद्यापीठात संशोधनामध्ये यांत्रिकता आलेली असल्याने असे संशोधन हे कसदार असत नाही. या यंत्रणेमध्ये काही अपप्रवृत्ती शिरल्या असून जोपर्यंत संशोधनाची उत्स्फूर्तता नि उर्मी संशोधकाच्या उरात निर्माण होत नाही तोपर्यंत ते वांझोटेच ठरणार. असे असले तरी विद्यापीठीय संशोधन हे होतच राहणार. काही अपप्रवृत्ती वगळता संशोधन क्षेत्रात मूलभूत, मौलिक, विशुद्ध संशोधन करणारे संशोधक आढळतात. मात्र ''सब घोडे बारा टक्के'' या

उक्तीप्रमाणे प्रत्येकाला एकच न्याय लावणे अन्यायाचे ठरू शकते. संशोधनक्षेत्रातील व्यावसायिक घोडे कोणते नि स्वामिनिष्ठ घोडे कोणते याचा शोध विद्यापीठीय यंत्रणांनी घेऊन व्यावसायिक घोड्यांना वेळीच लगाम लावला तर खऱ्या संशोधनाचा गळा घोटला जाणार नाही. यासाठी संशोधकाने उत्स्फूर्तपणे, ज्ञानलालसेपोटी केल्या जाणाऱ्या विद्यापीठाबाहेरील संशोधनाकडून विद्यापीठीय संशोधनाकडे आणि विद्यापीठीय संशोधनाकडून विद्यापीठाबाहेरील संशोधनाकडे, असा प्रवास केल्यास असे संशोधन खऱ्या संशोधनाच्या कसोटीला उतरल्यावाचून राहायचे नाही हे निश्चित.

विषय निवडीबाबत बऱ्याच संशोधक विद्यार्थ्यांची अवस्था भृंगावर्तनी स्वरूपाची दिसते. विशिष्ट लेखक, विशिष्ट कवी, विशिष्ट कलाकृती, कालखंड इ. भोवती त्यांचे गुंजन चाललेले दिसते. त्यांची ही मानसिकता बदलण्याची जबाबदारी. या प्रक्रियेतील सर्वच घटकांनी उचलावयास हवी. संशोधक विद्यार्थ्याने साहित्य व्यवहाराची व्यापकता तपासून बघण्याची प्रथमत: काळजी नि दक्षता घेऊन संशोधन विषयांच्या शक्यतांचा शोध घेणे गरजेचे आहे. त्यासाठी संशोधन विषयावर लिहिल्या गेलेल्या तात्त्विक, चर्चाप्रधान ग्रंथांचा अभ्यास करणे अपरिहार्य ठरते. संशोधनामागील उद्दिष्ट कोणते? संशोधनाची प्रयोजने कोणती? संशोधनाच्या पद्धती कोणत्या? संशोधन प्रक्रिया पार पाडण्यासाठी विविध टप्पे कोणते? साहित्याचे संशोधन कोणकोणत्या अंगाने, प्रकाराने, वर्गीकरणाने होऊ शकते? या सर्व प्रश्नांचे मूलभूत थिअरॉटिकल अध्ययन करणे आवश्यक असते. उदा. साहित्यविषयांचे आपण पुढील चार प्रकारात वर्गीकरण करू शकतो.

**१) शास्त्रीय स्वरूपाचे साहित्य :**

यामध्ये व्याकरण, व्युत्पत्ती, परिभाषा, लोकसाहित्य, भाषाशास्त्र, लोककला, छंद, अलंकार, सूचिकोश, पाठसंशोधनात्मक सटिक संपादन इ. चा समावेश होईल.

**२) अनुवादात्मक साहित्य :**

अनुवाद, भाषांतर, रूपांतर

**३) तात्त्विक स्वरूपाचे साहित्य :**

साहित्यशास्त्र, तत्त्वज्ञानात्मक,सौंदर्यमीमांसात्मक, तत्त्वसिद्धांतात्मक, समीक्षा, साहित्य आणि इतर ललितकला.

**४) उपयोजित स्वरूपाचे साहित्य :**

यामध्ये विशिष्ट वाङ्मयप्रकार, ग्रंथकार, कालखंड, प्रवृत्ती, संप्रदाय, इतिहास, तौलनिक, लोकसाहित्य, वाङ्मयीन वाद, संस्कृती, चरित्रे, आत्मचरित्रे इ. चा समावेश करता येईल.

वरील स्वरूपाच्या साहित्यापैकी बहुसंख्य संशोधक विद्यार्थी उपयोजित स्वरूपाच्या साहित्यप्रकारावर संशोधन करताना आढळतात. याचे कारण म्हणजे अशा संशोधनासाठी एक मळवाट तयार झालेली असते. मळवाटेने निर्माण केलेला फॉर्म वापरला की संशोधन कार्यामध्ये सुलभता, निर्विवादपणा, बचावात्मकता येते. मात्र हेही लक्षात घेतले गेले पाहिजे की, कोणतेही संशोधन हे एक प्रकारचे बौद्धिक आव्हान असते. या आव्हानाचे शिवधनुष्य पेलल्यानंतरचा आनंद हा ब्रह्मानंद सहोदर स्वरूपाचा असतो. कृतकृत्य झाल्यासारखे वाटते. निव्वळ पदवीप्राप्तीचा आनंद आणि त्या पदवीची झूल पांघरूण राहण्याची नशा ही क्षणिक असते, हे विसरता कामा नये.

उपयोजित साहित्यावरचे संशोधन हे उपयुक्त, मौलिक असते हे निश्चित. मात्र या संशोधनापेक्षा विशुद्ध किंवा मूलभूत संशोधन हे सर्जनशील असते. ती एक 'स्व'तंत्र निर्मिती ठरते. म्हणून उपयोजित स्वरूपाच्या साहित्याशिवाय इतर तीन प्रकारच्या साहित्याकडे दृष्टी वळविली तर नवा आणि आवश्यकता असणारा एखादा अलक्षित विषय हाती लागण्याची शक्यता निर्माण होऊ शकेल.

**दलित साहित्यातील संशोधनाच्या दिशा :**

दलित साहित्य परंपरा एकूण पन्नास वर्षांची. त्यामुळे उपरोक्त शास्त्रीय स्वरूपाच्या साहित्याचे संशोधन त्या संदर्भात संभवण्याची शक्यता धूसर असली तरी उर्वरित तीन स्वरूपाच्या साहित्यानुषंगाने संशोधन करणे सहजशक्य आहे. अर्थात एवढ्या पन्नास वर्षाच्या अल्प कालखंडात इतक्या स्वरूपाचे साहित्य दलित साहित्यासंदर्भात कसे संभवते असा प्रश्न सुज्ञास पडणे शक्य आहे. यासाठी नि दलित साहित्याच्या संशोधनाच्या नव्या दिशा शोधण्यासाठी प्रथमत: दलित साहित्य म्हणजे काय? त्याच्या प्रेरणा कोणत्या? प्रयोजने कोणती? स्वरूप कसे आहे? कोणते प्रकारनिष्ठ साहित्य लिहिले गेले? त्याच्यावर कोणते आक्षेप घेतले गेले? त्याचे वेगळेपण कशात आहे? मराठी साहित्याला, वैश्विक साहित्याला त्याने कोणते योगदान दिले? त्याची तात्त्विक चर्चा-चिकित्सा, समीक्षा कशी केली गेली? इ. सर्व प्रश्नांची उत्तरे

शोधणे हेही एक प्रकारचे संशोधन ठरेल. ही सर्व उत्तरे शोधली की त्यातून संशोधनाच्या प्रतिक्षेत असणाऱ्या विषयांच्या हाका आपणास ऐकू येतील.

**दलित व दलित साहित्य :**

बऱ्याचदा 'दलित' हा शब्द जातिवाचक म्हणून अज्ञानमूलक मानसिकतेतून विचारात घेतला जातो. यामागे पुष्कळदा पूर्वग्रहदूषितता, संकचित दृष्टिकोण कार्यरत असतो. मात्र दलित साहित्याच्या अनेक विचारवंतांनी, साहित्यिकांनी या शब्दामध्ये समाविष्ट असणाऱ्या अर्थाची उकल केलेली आहे. 'दलित' हा शब्द 'दळलेला' या अर्थाचा वाहक आहे. समाजव्यवस्थेच्या, वर्णव्यवस्थेच्या जात्यात दळला-भरडला गेलेला असा तो दलित. डॉ. गंगाधर पानतावणे यांनी दलित या शब्दाचे व्यवच्छेदकत्व ज्या विविध घटकांमध्ये सामावलेले आहे, या घटकांचा निर्देश केलेला आहे 'दलित ही जात नव्हे अवस्था होय, दलित हा शब्द घृणास्पद नाही' असे सांगून त्यांनी दलित म्हणजे- ज्याला कधीही व्यक्त होता आले नाही, जो तुडवला गेला, जो अत्याचारित, चिरडला गेलेला, अस्तित्व नाकारलेला, दुभंगलेला, अन्यायाच्या चरकात सापडलेला. डॉ. प्रभाकर मांडे यांनी - ''दलित म्हणजे एक विशिष्ट सामाजिक स्थिती अनुभवीत असलेला समूह किंवा समाजगट''[३] अशी व्याख्या केलेली आहे. त्यांच्या या व्याख्येतही डॉ. पानतावणे यांनी विशद केलेले घटक समाविष्ट होतात. डॉ. मांडेंच्या मते - १) हिंदू समाजव्यवस्थेत अस्पृश्य समजला गेलेला. २) अस्पृश्य असल्याने अवहेलनामय जीवन जगत असलेला. ३) दास्यत्व लादलेला. ४) स्वत:च्या कर्तृत्वास वाव मिळवून सामाजिक दर्जा मिळवण्यापासून वंचित झालेला. ५) अन्याय, अत्याचार, गुलामगिरी, दारिद्र्य, शोषण यांनी भरडला गेलेला. गांजलेला, पिचलेला, दळला गेलेला. असा तो दलित. बाबुराव बागुलांनी तर दलित या शब्दाच्या अर्थघटकांना आणखीनच व्यापकता देऊन चातुर्वर्ण्यातील जे घटक दळले-भरडले गेले त्या सर्वांनाच दलित संबोधले. यात शेतकरी, मजूर, कष्टकरी, हमाल, स्त्रिया इ. चा समावेश केला.

अशा या दलित समाजाच्या साहित्यात 'दलित साहित्य' म्हणून संबोधले गेले. तशाप्रकारचा ठराव १९५८ साली मुंबई येथे भरलेल्या पहिल्या दलित साहित्य संमेलनात मंजूर करण्यात आला. अर्थात यानंतर या साहित्याची आंबेडकरावादी साहित्य, फुले - आंबेडकरवादी साहित्य, बौद्ध साहित्य, प्रबुद्ध साहित्य, विद्रोही साहित्य, परिवर्तनवादी साहित्य अशी अनेक नामांतरे करण्याचे प्रयत्न झाले. मात्र विद्यापीठीय अभ्यासंस्था, विविध

साहित्यसंस्था, संमेलने इ. मधून दलित साहित्य हाच शब्दप्रयोग स्वीकारला गेल्याने आज दलित साहित्य हाच शब्दप्रयोग रूढ झालेला आहे.

**दलित साहित्याची प्रेरणा :**

'आंबेडकरवाद' हा दलित साहित्याचा कणा असल्याचे सर्वच दलित साहित्यिकांनी मान्य केलेले आहे. डॉ. गंगाधर पानतावणे यांनी या प्रेरणेसंदर्भात म्हटले आहे की, ''केवळ बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजात आत्मजाणीव निर्माण केली. त्यांच्यापूर्वी कोणालाही ती निर्माण करता आली नाही. हे सूर्यसत्य आहे. म्हणूनच डॉ. बाबासाहेबांनी निर्माण केलेल्या आत्मजाणिवेचेच नाव दलित साहित्य आहे.'' [४] दलित साहित्याचे अभ्यासक, विचारवंत अर्जुन डांगळे यांनी प्रेरणेचे स्वरूप स्पष्ट करताना म्हटले आहे की, ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांची विचारधारा हा दलित साहित्याचा मूलभूत प्रेरणास्त्रोत आहे, हे निर्विवाद होय. क्रांतिकारी जीवननिष्ठेचे सामूहिक भान हे दलित साहित्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारलढ्यामुळे मिळाले.'' [५]

एकूणच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार, त्यांच्या चळवळी, त्यांनी केलेले सत्याग्रह, त्यांची विज्ञाननिष्ठा, त्यांनी केलेले धर्मांतर या त्यांच्या सर्व कृतींमधून दलित साहित्याने प्रेरणा घेतलेली आहे.

**प्रयोजन :**

दलित साहित्याच्या केंद्रस्थानी मानवता हे मूल्य असल्याने स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय यांनी युक्त असलेल्या मनुष्यत्वाची प्रतिष्ठापना करणे हे दलित साहित्याचे मुख्य प्रयोजन होय. मराठी साहित्याची मम्मटाने सांगितलेली प्रयोजने आणि दलित साहित्याची प्रयोजने यात प्रकृती नि प्रवृत्तीने मूलत:च भेद आहे. यश, कीर्ती, आनंद, कांतासंमित उपदेश वगैरे प्रयोजने दलित साहित्याला कशी लागू पडावीत? कारण दलित साहित्य हे निर्माण झालेले साहित्य नसून ते प्रयोजन असलेले साहित्य आहे. ते एक हत्यार आहे. शस्त्र आहे. सामाजिक जाणिवा व्यक्त करणे, वाचक श्रोत्यांच्या मनावर विशिष्ट परिणाम घडवून आणणे, स्वकीयांना क्रांतीसाठी उद्युक्त करणे, अन्यायाविरूद्ध लढण्याची युयुत्सुवृत्ती तयार करणे अशी प्रयोजने या साहित्याची सांगता येतील. सर्व प्रकारच्या शोषणातून मानवमुक्ती हा दलित साहित्यप्रवाहाचा ध्यास आहे. दलित साहित्यातील विद्रोह घाव घालून रक्तपात करू पाहणारा लाल रंगाचा नाही, तर मानव्याची प्रतिष्ठापना करण्याचा हेतू केंद्रवर्ती असणाऱ्या मानवतावादाची निळाई अभिव्यक्त करणारा आहे. दलित साहित्य माणसाला माणूस म्हणून जगण्याचा आग्रह धरते. अस्तित्वशून्य नि

अस्मिताशून्य अशा कणा मोडलेल्या माणसाला स्वातंत्र्य, समता, बंधुता देऊन त्याला माणूस म्हणून जगण्याची आणि त्याच्या सामाजिक-सांस्कृतिक अस्तित्वाचा, अस्मितेचा हुंकार दलित साहित्याच्या आशयकेंद्री आहे.

**दलित साहित्याचे स्वरूप :**

दलित साहित्यप्रवाहात सर्वच प्रकारनिष्ठ साहित्यलेखन झालेले आहे. कथा, कविता, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र, नाटक, समीक्षा, वैचारिक लेखन इ. या साहित्याचे स्वरूप विचारात घेता असे दिसून येते की, हे साहित्य दलित समजल्या जाणाऱ्या व्यक्तींच्या अनुभवांना आविष्कृत करीत असले तरी त्या अनुभवाचे स्वरूप व्यक्तिनिष्ठ नसून ते सामाजिक आहे. विशेषतः दलित आत्मकथनांतील अनुभवविश्व त्या विशिष्ट लेखकाचे न राहता ते प्रातिनिधिक स्वरूपात त्या समाजाचे अनुभवविश्व असते. या संदर्भात प्रा. प्रभाकर मांडे म्हणतात. ''या साहित्यात निर्मात्याच्या व्यक्तिगत जीवनाला महत्त्व नसते तर तो त्या समाजगटाचा घटक असल्यामुळे त्याला जे अनुभव येतात त्यांना प्रामुख्याने स्थान असते.'' [६] अर्थात दलित साहित्य हे त्या समाजगटाचे प्रतिनिधित्व करीत असले तरी त्याच्या निर्मात्याच्या मनाचे, वैयक्तिक अनुभवाच्या वेगळेपणाचे प्रतिबिंब त्यात उमटलेले असते. एका अर्थाने दलित साहित्य हे लोकवाड़मयही ठरते, कारण लोकवाङ्मय हे एका लोकसमूहाच्या भावविश्वाचा आविष्कार असते. एकूणच दलित साहित्य हे शोषित पीडित माणसाच्या जीवन-जाणिवेशी एकरूप असणारं साहित्य आहे. या साहित्याने परिवर्तनाची अपेक्षा बाळगलेली आहे. हे परिवर्तन प्रबोधनातून घडणारे असून प्रबोधन साहित्यविषयक चळवळींमधून होत असते. विज्ञान, विद्रोह, विश्वमयता या जाणिवा दलित साहित्याने स्वीकारून मराठी साहित्यात एक क्रांतिकारक पाऊल टाकले. नव्या जीवन जाणिवा आणि नवा जीवन आशय यांमुळे समाजातल्या दुर्लक्षित अशा जीवनानुभवांचे सुंदर असे साहित्य होऊ शकते, हे दलित साहित्याने सिद्ध करून दाखविले. या साहित्याच्या मुळाशी बुद्ध, फुले, आंबेडकरी विचारांची जाणीव आहे.

**दलित साहित्य संशोधनाच्या दिशा :**

१९६० नंतर मराठी साहित्यात दलित साहित्य हा एक शक्तिशाली क्रांतिकारक प्रवाह निर्माण झाला. या साहित्याने मराठी साहित्यात खळबळ उडवून दिली. सुरुवातीच्या काळात अनेक आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी या साहित्यासंदर्भात झाडल्या गेल्या. त्यांपैकी काही अशा-

''दलित साहित्य' नावाचे वेगळे दालन उभे राहू शकत नाही''- भालचंद्र नेमाडे.

''ह्या लेखनात बुजरेपणा आहे,'' प्रा.वा.ल. कुलकर्णी.
''दलित लेखकांनी परंपरा नाकारू नयेत. त्या समृद्ध कराव्यात''- कुसुमाग्रज.
''दलित कवी हे एकाच वॉर्डातील पेशंट आहेत.''- दि.पु. चित्रे.

वरील प्रकारचे आरोप-प्रत्यारोप आणि टिंगल-टवाळी दलित साहित्याची केली गेली. याबरोबरच दलित साहित्य हे आक्रस्ताळे, उरबडवे, आरडाओरड करणारे, टूम म्हणून विशिष्ट शब्द वा घोषणा उच्चरवाणे घुमविणारे; असेही आरोप या साहित्यावर केले गेले. मात्र मराठी साहित्य व दलित साहित्य यांच्या परंपरांचा विचार करता, मराठी साहित्याच्या कित्येक परंपरा खंडित झाल्या, किंवा मराठीपुरत्याच त्या सीमित राहिल्या. दलित साहित्याची पन्नास वर्षांची परंपरा जरी असली तरी ती अखंडितपणे, सीमा ओलांडून हा प्रवाह वैश्विक पटलावर गतिमान झालेला आहे. आज हा प्रवाह भारतीय साहित्याचा मुख्य प्रवाह झालेला दिसतो. ग्रामीण साहित्याला दलित साहित्य चळवळीने जाणीव दिली. हे प्राचार्य रा.रं. बोराडे यांनी मान्य केले. मराठी साहित्याला साहित्यनिर्मितीची विशिष्ट दिशा देण्याचे कार्य दलित साहित्याने केल्याचे गौरवोद्‌गार काढले.

दलित साहित्याच्या अशा प्रभावीपणातून, वेगळेपणातून, त्याच्या विशिष्ट भूमिकेतून, गुणवैशिष्ट्यांतून, त्याच्या स्वरूपावरून, त्याच्या वेगळ्या प्रयोजन-प्रेरणेमधून काही प्रश्न निर्माण झाले. हे प्रश्न साहित्य समीक्षक, विचारवंत, संशोधक यांना चिंतनीय वाटू लागले. दलित साहित्याच्या मूल्यमापन कसोट्या कोणत्या? मराठी समीक्षा दलित साहित्याची समीक्षा करण्यास समर्थ आहे का? दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र कोणते? एकूणच दलित साहित्याची समीक्षा, मूल्यमापन, सौंदर्यविचार करण्यासाठी मराठी साहित्यातील कसोट्या तोकड्या किंबहुना असमर्थ ठरू लागल्याचे मत डॉ. पानतावणे, डॉ. मांडे, डॉ. यशवंत मनोहर, डॉ. शरणकुमार लिंबाळे अशा अनेक विचारवंतानी व्यक्त केले. त्यामुळे त्या महत्त्वपूर्ण बाबींचा प्रभाव दलित साहित्य संशोधनावर पडल्यावाचून राहात नाही, हे स्पष्ट झाले. यासाठी डॉ. शरणकुमार लिंबाळेंनी 'दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र' आणि 'साहित्याचे निकष बदलावे लागतील' असे दोन मूलभूत संशोधनपूर्ण ग्रंथ लिहून या साहित्याच्या समीक्षेच्या, मूल्यमापनाच्या, सौंदर्यशास्त्राच्या कसोट्या कोणत्या ते समप्रमाण मांडण्याचा प्रयत्न या ग्रंथांमध्ये केलेला दिसतो. दलित साहित्याची समीक्षा बौद्धविचारप्रणाली आणि आंबेडकरी विचारप्रणाली यांमधून व्हावी असे मत डॉ लिंबाळे मांडतात. याबरोबरच त्यांनी दलित साहित्यविचारासाठी आतापर्यंत जी दलित साहित्य संमेलनाध्यक्षांची भाषणे

झाली व त्या भाषणांमधून त्यांनी जे विचार व्यक्त केले त्याचा उपयोग करावा असे म्हटले आहे. यासाठी त्यांनी 'शतकातील दलित विचार' ह्या ग्रंथ संपादित करून साधनसामग्रीची उपलब्धता करून दिली आहे. दलित सौंदर्यशास्त्रांचा विचार त्यांनी अनेक दलित-दलितेतर समीक्षकांच्या मतांचा चिकित्सकरीत्या अभ्यास करून मांडलेला आहे. दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र हे आंबेडकरी विचारात आहे. हे सौंदर्यशास्त्र प्रबोधनावर आधारलेले आहे. समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता ही सामाजिक मूल्ये दलित साहित्याची सौंदर्यमूल्ये आहेत. अशी दलित सौंदर्यशास्त्राची मांडणी डॉ. लिंबाळे यांनी करून दाखवलेली आहे.

एकूणच दलित साहित्याच्या संशोधनासाठी या साहित्याच्या प्रेरणा, प्रयोजने, स्वरुप, प्रकारनिष्ठ लेखन, समीक्षा, सौंदर्यशास्त्र या घटकांच्या वेगळेपणाला दृष्टिसमोर ठेवणे मूलभूत संशोधनाच्या दृष्टीने फायदेशीर ठरेल. मराठी साहित्याच्या स्वरूप आणि प्रकृतीवरून त्याच्या संशोधनाची उद्दिष्ट्ये, कक्षा निश्चित करण्यात आलेल्या आहेत. साधारणत: ''भावनात्मक सृष्टीचे मूळ शोधणे आणि त्याच्या शब्दरूप आविष्काराच्या सौंदर्याचे स्वरूप पकडणे हे साहित्यसंशोधनाचे अंतिम उद्दिष्ट''[७] असल्याचे मत डॉ. शं.रा. राणे यांनी व्यक्त केलेले आहे. अर्थात डॉ. राणे यांनी सांगितलेले साहित्याच्या संशोधनाचे उद्दिष्ट वरील डॉ. लिंबाळे यांचे विचार लक्षात घेता दलित साहित्याच्या संशोधनाला कितपत लागू पडेल याविषयी शंका वाटते.

दलित साहित्य संशोधनासाठी शास्त्रीय स्वरूपाचे साहित्य जरी आजपावेतो सिद्ध झालेले नसले तरी इतर अनुवादात्मक, तात्त्विक आणि उपयोजित स्वरूपाच्या साहित्यासंदर्भात संशोधनास वाव आहे. दलित साहित्यपरंपरेचा इतिहास अवघा पन्नास वर्षांचा असल्याने शास्त्रीय स्वरूपात त्याची मांडणी करण्यासाठी ज्या प्रदीर्घ कालखंडाची साहित्यपरंपरा असावी लागते ती नसल्याने इतर साहित्य स्वरूपाच्या शक्यता संशोधनासाठी विचारात घेणे उपयुक्त ठरू शकेल.

**१) अनुवाद- भाषांतर- रूपांतर :**

दलित साहित्याला वैश्विक परिमाण लाभल्याने या साहित्यातील अनेक कलाकृती भारतीय व जागतिक भाषांमध्ये अनुवादित, रूपांतरित झालेल्या आहेत. या साहित्याने घेतलेली झेप त्याच्या उर्जस्वलतेचे प्रतीक आहे. त्यामुळेच मराठीतील दलित साहित्य हे भारतातील इतर प्रांतातील दलित साहित्याचे प्रेरणास्थान झालेले आहे. मराठी दलित साहित्याची प्रेरणा घेऊन गुजराती, हिंदी, पंजाबी, कानडी, तेलगू तसेच काही प्रमाणात बंगाली भाषेत दलित साहित्य निर्माण होऊ लागले आहे. याविषयी हिंदी साहित्यिक

ओमप्रकाश वाल्मिकी म्हणतात, "दलित साहित्य और दलित आन्दोलन की अनुगुंज आज सिर्फ महाराष्ट्रतकही सिमित नही है, बल्कि ये चिंगारी जो महाराष्ट्र में शुरु हुई अब आग बन चुकी है. हिंदी प्रांतोसे लेकर पंजाब, हरियाण, गुजरात, दक्षिण भारत, दिल्ली, बंगाल में फैल चुकी है. आज दलित साहित्य पूरे विश्व में मानवीय संवेदना का पक्षघर बनकर अपनी प्रतिबद्धता सिद्ध कर चुका है." [८] या साहित्याची वैश्विक पातळीवर जी दखल घेतली जात आहे. त्याविषयी प्रा. केशव मेश्राम म्हणतात, "अनेक गोष्टींच्या वादळातूनही दलित साहित्य इतके विकसित पावले की, देशविदेशातल्या विचारवंत, चिकित्सकांना ते समजून घेण्याची गरज निर्माण झाली...... अमेरिकेमध्ये डॉ. एलिनॉर झेलियट आणि डॉ. जयश्री टर्नर; कॅनडामध्ये बार्बारा जोशी, मायकेल महर, फिस्के; जर्मनीत गुन्थेर सोम्थायर व डॉ. पॉलिन कोलेंडन; इंग्लंडमध्ये मार्क ग्लॅटर, ओवोन लीच, उस्कीन, रॉबर्ट मिलर, डीथबॉशम; जपानमध्ये डॉ. हिदेआकी इशिरा अशा काही अभ्यासकांनी आणि येथल्या डॉ. भालचंद्र फडके, प्रा. रा.ग. जाधव, दि.के. बेडेकर, प्रा. शरश्चंद्र मुक्तिबोध, डॉ. गंगाधर पानतावणे, डॉ. म.ना. वानखेडे, बाबुराव बागूल वगैरेंनी सातत्यपूर्ण कुतूहल, लेखन, चळवळी आणि प्रकाशनाच्या माध्यमाद्वारे दलित साहित्याला मूलवैशिष्ट्य आणि अनोखेपण प्राप्त करून दिलं." [९]

अशाप्रकारे दलित साहित्याचे वैश्विक योगदान अनेक अभ्यासकांनी मान्य केलेले असल्याने मराठी साहित्यातील दलित कलाकृतींची अन्य भारतीय भाषांत जी भाषांतरे झाली, विश्वभाषांमध्ये भाषांतरे, रूपांतरे झाली त्याचा संशोधक विद्यार्थ्यांनी आपल्या संशोधनासाठी विचार करणे उपयुक्त ठरेल. ऑक्सफर्ड पब्लिकेशनने डॉ. शरणकुमार लिंबाळे यांचे 'अक्करमाशी' हे आत्मकथन 'द आऊट कास्ट' या नावाने २००३ मध्ये प्रकाशित केले. या आत्मकथनाचा इंग्रजी अनुवाद प्रा. संतोष भूमकर यांनी केलेला आहे. या पुस्तकाला आदिवासींच्या बोलीभाषेचे अभ्यासक व दलित चळवळीचे एक मार्गदर्शक डॉ. गणेश देवी यांची प्रस्तावना असून त्यांनी अतिशय तपशीलाने दलित आत्मकथनांचे वेगळेपण नोंदविलेले आहे.

अलीकडेच नामवंत अर्थतज्ज्ञ आणि पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांचे गाजलेले 'आमचा बाप आन् आम्ही' हे आत्मकथन 'आऊट कास्ट' या नावाने फ्रेंच भाषेत प्रसिद्ध झाले. हे पुस्तक देशविदेशी अन्य भाषांत रूपांतरित झाले. मराठी, हिंदी, उर्दू, पंजाबी, कन्नड, तामिळ या

भारतीय भाषांमध्ये तसेच इंग्लिश, फ्रेंच, स्पॅनिश, कोरियन या परदेशी भाषांमध्ये हे पुस्तक प्रकाशित झाले.

साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त पुस्तकांचे अनुवाद इंग्रजीसह सुमारे १४ ते १६ भारतीय भाषांत प्रसिद्ध केले जातात. 'उपरा' आणि 'उचल्या' या पुस्तकांना अकादमीचे पुरस्कार मिळाल्याने त्यांचे इंग्रजी अनुवाद प्रकाशित झाले. मराठीतील दलित आत्मकथने हिंदीमध्ये अनुवादित करण्याचे श्रेय डॉ. सूर्यनारायण रणसुभे, डॉ. निशिकांत ठकार, डॉ. दामोदर खडसे या नामवंत अनुवादकांना दिले जाते. डॉ. शरणकुमार लिंबाळे यांच्या 'दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र' या ग्रंथाचा अनुवाद 'दलित साहित्य का सौंदर्यशास्त्र' या नावाने रमणिका गुप्ता यांनी हिंदीमध्ये केलेला आहे. शिवाय हा ग्रंथ इंग्रजीमध्येही भाषांतरित झालेला आहे.

अशा भाषांतरित, रूपांतरित, अनुवादित दलित साहित्याचा संशोधनात्मक विचार मराठीच्या अभ्यासकसंशोधकांनी केला तर संशोधनाला नवा आयाम प्राप्त होऊ शकतो. याशिवाय इतर भाषातील साहित्याचा व दलित साहित्याचा तुलनात्मक दृष्टिकोणातून अभ्यास केल्याने संशोधनाच्या कक्षा विस्तारल्या जाऊ शकतात. अशा अभ्यासाची व संशोधनाची आवश्यकता विशद करताना कवी डब्लू कपूर म्हणतात- ''भिन्न-भिन्न भाषेत दलित साहित्यनिर्मिती होत आहे. प्रकाशनेही मोठ्या प्रमाणावर होत आहेत. परंतु एका भाषेतील वाचक दुसऱ्या भाषेत नेमके काय लेखन चालले आहे यापासून वंचित आहेत. म्हणून अनुवाद होण्याची गरज आहे.'' [१०] कवी कपूर यांच्या मते विविध भाषांमधील साहित्याची देवाणघेवाण ही साहित्यव्यवहाराच्या दृष्टीने अपरिहार्य झालेली असून तसे झाल्यास त्याचा फायदा अभ्यासक-संशोधकांना झाल्यावाचून राहणार नाही.

### २) दलित साहित्य आणि इतर ललितकला :

दलित साहित्यातील सर्वच वाङ्मयप्रकार समृद्ध झालेले दिसतात. कथा, कविता, कादंबरी, नाटक, आत्मचरित्र इ. वाङ्मयप्रकारातून भरपूर लेखन झालेले असून त्यावर संशोधनही झालेले आहे. असे असले तरी या साहित्याची पन्नास वर्षाची परंपरा व या कालखंडात लिहिले गेलेले साहित्य यांचा विचार करता साहित्यनिर्मितीपेक्षा चर्चा व तात्त्विक मीमांसाच जास्त झाली असे मत बाळकृष्ण कवठेकरांनी व्यक्त केलेले आहे. ते म्हणतात ''दलित साहित्यासंबंधाने विचार करतांना जाणवते की, दलित साहित्याच्या निर्मितीपेक्षा दलित साहित्यासंबंधी विचार करणारे लेखनच अधिक झालेले आहे.'' [११] मात्र प्रत्यक्ष साहित्यनिर्मितीविषयीचा आशावादही त्यांनी व्यक्त

केलेला आहे. या आशावादाचा परामर्श घेताना प्राचार्य रा. रं. बोराडे म्हणतात. ''अलीकडच्या काळामध्ये दलित साहित्याचा प्रवाह थोडासा मंद झाल्यासारखा झाला आहे, असा सूर ऐकू येतो. परंतु प्रवाह जेव्हा सुरू होतो तेव्हा त्यात गती असते. बेभानपणा असतो कालांतराने गती कमी होत असते. परंतु हे मंदावणे नव्हे. कुठे तरी अंतर्मुख होऊन, वेगळ्या प्रकारचं काही करता येईल का - कादंबरीच्या क्षेत्रामध्ये, कथेच्या क्षेत्रामध्ये तर अंतर्मुख होण्यासाठी थोडं थांबावं लागत किंबहुना थोडीशी गती कमी करावी लागते. झेप घेण्यासाठी थोडं थांबावं लागतं. त्याच्याशिवाय किती झेप आपल्याला घ्यायची आहे, आपण किती झेप घेऊ शकतो, स्टार्ट होण्यासाठी म्हणून जे काही अंदाज घेऊन उभं रहावं लागलं हा उभे राहण्याचा प्रकार सध्या दलित साहित्यामध्ये आलेला आहे. ह्या गतीनं दलित साहित्यिकांनी झेप आता घेतली पाहिजे.'' [१२] प्राचार्य रा. रं. बोराडे यांनी व्यक्त केलेला दलित साहित्याविषयीचा आशावाद निश्चितच या साहित्याच्या भवितव्याची उज्ज्वल स्वप्ने साकार करणारा आहे.

दलित साहित्यात आतापर्यंत कथा, कविता आणि आत्मकथने विपुल प्रमाणात लिहिली गेली. त्यावर संशोधन घडून या प्रकारांना एक तात्त्विक, वैचारिक बैठकही प्राप्त झाली. या तुलनेतं दलित कादंबरी म्हणावी तितकी निर्माण होऊ शकली नाही. मात्र प्राचार्य रा. रं. बोराडेंचे मत विचारात घेता ती झेप घेण्याच्या पवित्रात असलेली दिसते. हे प्रमुख वाङ्मयप्रकार सोडले तर अजून दुर्लक्षित राहिलेले दलित साहित्यातील इतर क्षेत्रे म्हणजे दलित लोकसाहित्य, दलित चित्रकला, दलित चळवळींना सामर्थ्य प्राप्त करून देणारे जलसे इ. दलित लोकसाहित्यात नां.ब. जाधव यांचा 'मोत्याचा कंठा' हा एक ग्रंथ सोडला तर लक्षणीय असा ग्रंथ आढळत नसल्याची खंत प्रा. रा.ग. जाधव यांनी व्यक्त केलेली आहे. दलित चित्रकला वैशिष्ट्यपूर्ण आहे. ती दलित जीवनाचा, जगण्याचा, अस्मितेचा उद्घोष करणारी आहे. या कलाप्रांतात आज भ.सा. परसावळे, श्रीधर अंभोरे, केतन पिंपळापुरे, सुनिल अवचार इ. नावे झळकत आहेत. दलित चित्रकलेच्या आशयघनतेविषयी व सामर्थ्याविषयी रा.ग. जाधव यांनी गौरवोद्गार काढून या ललित कलेचे दलित जाणिवेतून संशोधन होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन केलेले आहे. दलित जलशांनी डॉ. आंबेडकरांच्या चळवळींना विचारांना ग्रास-रूटपर्यंत पोहचविण्याचे महत्कार्य केलेले आहे. असे असले तरी डॉ. कृष्णा किरवले, डॉ. रवींद्र ठाकूर यांसारख्या हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या संशोधकांनी यात लक्ष घातलेले दिसते.

दलित साहित्यामध्ये चरित्र हा वाङ्मयप्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्र वगळल्यास इतर थोर समाजसुधारकांची व प्रबोधकारांची चरित्रे संशोधनात्मक दृष्टिकोणातून कुणी लिहिलेली दिसत नाहीत. मराठीमध्ये डॉ. आंबेडकरांची जवळपास १०० चरित्रे प्रकाशित झालेली आहेत. इतर अन्य भारतीय व परकीय भाषांतील वेगळी. याच अनुरोधाने बाबासाहेबांच्या चळवळींना पार्श्वभूमी तयार करून देणारे, त्यांच्या खांद्याला खांदा भिडवून त्यांची विचारप्रणाली तळागाळातील दलित समाजात रुजवणारे व लोककलावंत, जलसाकार होऊन गेले. आंबेडकरी विचारांचे प्रबोधन करणारे असंख्य समाजसुधारक अद्याप अज्ञात आहेत. संशोधनात्मक मार्गाने त्यांच्या चरित्रांचे संशोधन झाल्यास अशा व्यक्ती प्रकाशात तर येतीलच शिवाय त्यांना ग्रंथरूपाने जन्मास घालण्याचे सार्थ समाधानही संशोधनकर्त्यास मिळू शकेल. असे काही समाजसुधारक पुढीलप्रमाणे–

१) **गोपाळबाबा वलंगकर :** (१८९४) हे कोकणातील अस्पृश्य समाजातील पहिले समाजसुधारक. सामाजिक कार्यासाठी त्यांनी 'अनार्य दोष परिहार मंडळ' नावाची संस्था स्थापन केली. म. फुल्यांचा सहवास त्यांना लाभला होता. अस्पृश्यांची पुन्हा ब्रिटिश सैन्यात भरती व्हावी यासाठी त्यांनी आटोकाट प्रयत्न केले होते.

२) **किसन फागू बंदसोडे पाटील (१८ फेब्रु. १८६९-१९४६)** दलित समाजातील हे विद्रोही कवी, पत्रकार, संपादक, संशोधक, समाजसुधारक. यांचा 'प्रदीप' हा कवितासंग्रह प्रकाशित झाला. यांना छत्रपती शाहू महाराजांचा सहवास लाभला.

३) **शिवराम जानबा कांबळे :** पुण्यातील हे अस्पृश्य समाजाचे समाजसुधारक अस्पृश्यांवरील अन्याय दूर करण्यासाठी यांनी 'सोमवंशीय मित्र' नावाचे मासिक काढले. बडोद्याच्या सयाजीराव महाराजांनी यांचा समाजकार्याबद्दल सत्कार केला.

४) **हरि भाऊ तोरणे :** पेशाने शिक्षक असलेल्या तोरण्यांनी सत्यशोधक चळवळीच्या प्रभावाने जलसे लिहिले. 'चावडीतील बैठक' हा १९२३ मध्ये लिहिलेला त्यांचा जलसा. यानंतर त्यांनी आंबेडकरांच्या चळवळीत स्वत:ला झोकून दिले. त्यांची शाहिरी रचना प्रसिद्ध पावली.

५) **अनंतराव ऊर्फ भाई चित्रे :** चवदार तळ्याच्या सत्याग्रहात हे बाबासाहेबांचे सहकारी होते. जातीने कायस्थ समाजाचे. कायस्थांनी यांच्यावर बहिष्कार टाकला. तरीही त्यांनी शेवटपर्यंत बाबासाहेबांची साथ सोडली नाही.

**६) सीताराम नामदेव शिवतरकर :** बाबासाहेबांच्या चळवळीतील एक सहकारी होते. २० जुलै १९२४ रोजी 'बहिष्कृत हितकारिणी सभा' स्थापन झाली त्यावेळी शिवतरकर सभेचे कार्यवाह होते. महाड, नाशिक येथील सत्याग्रहात यांचा सहभाग होता. (कालखंड १५ जुलै १८९१ ते २९ मार्च १९६६- मुंबई)

वरील समाजसुधारकांनी प्रसंगोपात्त जे लेखन केलेले आहे. त्या लेखनाचे काही नमुने डॉ. पानतावणे यांनी अस्मितादर्श वार्षिक विशेषांक २००९ मध्ये दिलेले आहेत. या समाजसुधारक पुरुषांच्या चरित्रांचे संशोधन करून त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन कार्याचे मूल्यमापन करणे हे संशोधक विद्यार्थ्यांना निश्चितच फलदायी ठरू शकते.

डॉ. आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे आपल्या लक्षावधी बांधवांसमवेत बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. त्यानंतर बौद्ध जीवनप्रणालीचा दलित-अस्पृश्य समाजाने अंगीकार केला. दलित साहित्यात बौद्ध विचारप्रणालीची, बुद्धाच्या सम्यक तत्त्वज्ञानाची, शांती, अहिंसा, बंधुभाव, विज्ञाननिष्ठा इ. ची बीजे पडलेली आढळून येतात. बौद्ध तत्त्वज्ञानाचा दलित साहित्यावर जो प्रभाव पडलेला आहे त्याचे आविष्करण दलित कलाकृतींमधून पडलेले पाहावयास मिळते. उदा. दलित कवींनी आपल्या कवितेत पुढील बौद्ध प्रतीकांचा वापर केलेला दिसतो-

१) पांढरा हत्ती (बुद्धमाता निद्रिस्त असताना तिच्या गर्भात एक शुभ्र हत्ती प्रविष्ठ झाला अशी प्रचलित कथा. तसा उल्लेख बौद्ध ग्रंथात आहे.) २) कमळ ३) घोडा ४) वज्रासन ६) गंधकुटी ७) भिक्षापात्र ८) प्रभामंडळ ९) धर्मचक्र १०) पदचिन्हे ११) त्रिरत्न १२) स्तूप इ.

दलित साहित्य आणि त्याची तत्त्वज्ञानात्मक मांडणी करण्यासाठी अशा प्रतीकांचा संशोधकांनी विचार केल्यास आपल्या मौलिक संशोधनात त्यामुळे भर पडू शकते.

दलित साहित्याच्या संशोधकांनी काही अलक्षित विषयांकडे वळणे गरजेचे वाटते. उदा. बौद्ध लेण्यांमधील शिल्पकला, या शिल्पकलेच्या अभ्यासातून तत्कालीन सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक संदर्भ शोधता येऊन त्यांचा बौद्ध परंपरेसंदर्भात अन्वयार्थ लावता येऊ शकतो. त्यातूनच नव्या सौंदर्यशास्त्राची मांडणीही संभवते. सिंधू संस्कृतीला प्राचीन संस्कृती गणले जात असले तरी संस्कृतीमधील बदलाची प्रक्रिया बुद्ध तत्त्वज्ञानात सापडते. हाच धागा पकडून संशोधकांना संशोधन करण्यास वाव आहे. दलित साहित्याच्या संशोधकांना पाली भाषेतील अनेक विषयांवर

संशोधन करता येऊ शकेल. या संदर्भात डॉ. कृष्णा किरवले म्हणतात, "त्रिपिटिकांचा अभ्यास करीत असताना ९ व्या शतकामध्ये १३ बौद्ध कवी आढळून आले. १० व्या शतकात ३ बौद्ध व ४ जैन कवी आढळून आले आहेत. भारतीय संस्कृतीचा पाया खऱ्या अर्थाने बौद्ध तत्त्वज्ञान आणि धम्माने घातलेला आहे. अशा अलक्षित विषयांकडे नव्या संशोधकांनी वळायला हवे. यातून संशोधन भक्कम होईलच परंतु साहित्य चळवळींना प्रज्ञावादी अधिष्ठानही प्राप्त होईल." [१३]

अस्मितादर्श साहित्य संमेलन २००७ सांगली येथे आयोजित केलेल्या शोधनिबंध वाचन कार्यक्रमात जे शोधनिबंध मान्यवरांनी वाचले ते नवीन संशोधकांना खचितच नवदृष्टी देणारे ठरावेत. यांची शीर्षके व निबंधवाचक खालीलप्रमाणे-

१) स्वातंत्र्यपूर्व काळातील महार लावणी - डॉ. रुस्तुम अचलखांब
२) दलित स्त्रीच्या काव्यातील बुद्ध चिंतन - डॉ. आशा थोरात
३) आधुनिक हिंदी कादंबरीतील दलित चेतना - डॉ. अरुणा लोखंडे
४) आंबेडकरवादी साहित्य आणि सौंदर्यशास्त्र - डॉ. शशिकांत लोखंडे

या चर्चासत्राचा समारोप करतांना डॉ. कृष्णा किरवले यांनी म्हटले की, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संशोधनदृष्टी आणि संशोधन अभ्यासावे आणि न स्पर्शिलेल्या अनेक विषयांना संशोधनविषय करावा... त्यासाठी परिश्रम, चिकाटी आणि निष्ठा अभ्यासकांजवळ असणे अगत्याचे आहे." [१४]

अस्मितादर्शचे संपादक डॉ. गंगाधर पानतावणे हे आपल्या अंकात अधूनमधून अलक्षित, अस्पर्शित आणि आवश्यकता भासणाऱ्या शोधविषयांची संशोधकांकडून मागणी करीत असतात. त्याकडेही नवीन संशोधकांनी लक्ष पुरवल्यास नवीन संशोधन विषयांकडे वळता येऊ शकते. त्यांनी मागणी केलेले शोधविषय असे-

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची समीक्षा
२) दलित चित्रशैलीचे विशेष
३) डॉ. आंबेडकर यांच्या प्रस्तावना
४) दलित रंगभूमी अस्तंगत झाली आहे काय?
५) दलित नियतकालिकांचे वाङ्मयीन व सांस्कृतिक कार्य
६) दलित कवितेतील प्रतिमा आणि मिथके
७) दलित कवितेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर
८) अण्णाभाऊ साठे यांची लोकनाट्ये
९) शंकरराव खरातांचे वैचारिक लेखन

१०) दलित आत्मकथनांतील प्रादेशिकता
११) बंधुमाधव यांचे कथालेखन
१२) बाबुराव बागुलांची भाषाशैली

उपरोक्त विषय हे दिशादर्शक असून त्यातून संशोधन करणाऱ्या एम.फिल., पीएच.डी. च्या विद्यार्थ्यांना फायदा होऊ शकतो. या विषयांमध्ये बदल करून, संकोचविस्तार करून प्रबंधलेखनाइतपत स्वरूप त्यांना देता येऊ शकते.

याशिवाय दलित साहित्याची समीक्षा करणारे संशोधन विचारात घेताना 'समाजशास्त्रीय पद्धत' वापरल्यास संशोधनाला नवदृष्टी आणि मूलगामित्व प्राप्त होऊ शकते. अनेक अभ्यासक-विचारवंतांनी दलित साहित्याच्या संशोधनासाठी, समीक्षेसाठी 'सामाजिक मानववंशशास्त्री' (Socio-Anthropological) पद्धत वापरण्याची आवश्यकता विशद केलेली आहे.

एकूणच संशोधनाच्या क्षेत्रात नव्याने पदार्पण करणाऱ्या संशोधक विद्यार्थ्यांनी संशोधन विषयाच्या पृष्ठभूमीची कसदारपणे मशागत केल्यास, परिश्रम, चिकाटी, जिद्द, अभ्यासाची योग्य दिशा निश्चित केल्यास आणि विद्यापीठाबाहेरील संशोधनाची दृष्टी बाळगल्यास संशोधनाची गोड फळे मिळाल्याशिवाय राहावयाची नाहीत. त्यातून आजन्म संशोधनवृत्ती टिकून तर राहिलच पर्यायाने मराठी साहित्याला, त्यामुळे तात्त्विक अधिष्ठान मिळाल्यावाचून राहणार नाही, असा विश्वास वाटतो.

**संदर्भ टीपा -**

१) कांबळे (डॉ.) ऋषीकेश, 'चौथे मराठवाडा युवा साहित्य संमेलन, औरंगाबाद' अध्यक्षीय भाषण, 'अस्मितादर्श - एमेजू २००८, संपा. डॉ. गंगाधर पानतावणे, पृ. ९'.
२) राणे (डॉ.) शं. रा., 'मराठी साहित्य संशोधन : स्वरूप आणि दिशा', का.स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे, पहिली आवृत्ती - १९९५, पृ. ५.
३) मांडे (डॉ.) प्रभाकर, 'मराठी वाङ्मयातील नवीन प्रवाह', संपा. शरणकुमार लिंबाळे, मधुराज पब्लिकेशन्स प्रा.लि. पुणे, प्रकाशन दिनांक १५ ऑक्टो. १९९३, पृ. ६५.
४) पानतावणे (डॉ.) गंगाधर, 'साहित्य : शोध आणि संवाद', संपा. डॉ. मनोहर जाधव, सुविद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती - २००५, पृ. ३२,३३.
५) डांगळे अर्जुन, 'दलित साहित्य : बदलते प्रवाह', अस्मितादर्श; वार्षिक विशेषांक - २००९, संपा. डॉ. गंगाधर पानतावणे, पृ. १९.
६) मांडे (डॉ.) प्रभाकर, तत्रैव, पृ. ६७.

७) राणे (डॉ.) शं.रा. तत्रैव, पृ. १३.
८) वाल्मिकी ओमप्रकाश, 'अध्यक्षीय भाषण', अठ्ठावीसावे अस्मितादर्श साहित्य संमेलन, चंद्रपूर-१२ व १३ एप्रिल २००८, अस्मितादर्श-एमेजू-२००८, संपा. डॉ. गंगाधर पानतावणे, पृ. ३३.
९) मेश्राम (प्रा.) केशव, 'दलित साहित्याचा उद्‌गम' लोकराज्य, 'धम्मचक्र प्रवर्तन' सुवर्णमहोत्सवी विशेषांक, संपा. मनिषा पाटणकर- म्हैसकर, ऑक्टो. २००६, पृ. ६०.
१०) कपूर डब्लू. 'अस्मितादर्श' एमेजू २००८, तत्रैव, पृ. ३९.
११) कवठेकर बाळकृष्ण, 'वाड्‌मयीन चर्चा आणि चिकित्सा', नवसाहित्य प्रकाशन, बेळगांव, प्रथम आवृत्ती - २६ ऑगस्ट १९७८, पृ. ९.
१२) बोराडे रा.रं. 'उद्‌घाटकीय भाषण' २६ वे अस्मितादर्श साहित्य संमेलन, अलिबाग, अस्मितादर्श जाफेमा - २००४, संपा. डॉ. गंगाधर पानतावणे, पृ. ३५.
१३) किरवले (डॉ.) कृष्णा, शोधनिबंधवाचन व चर्चा; २६ वे अस्मितादर्श साहित्य संमेलन, जाफेमा - २००४, तत्रैव, पृ. ५१.
१४) तत्रैव, पृ. ५१.

# दलित कादंबरीचे वाङ्मयीन मूल्यमापन

**प्रा. डॉ. बाळासाहेब सोनवणे**

दलित जीवनचित्रणामुळे मराठी कादंबरी आशयदृष्ट्या समृद्ध झाली. या कादंबऱ्यांमधून वेदना, विद्रोह, नकार, दुःख यांचे प्रतिबिंब प्रस्तुत लेखकांच्या लेखणीतून ध्वनित झाले आहे. कादंबरीकार त्याला आकलन झालेल्या जीवनानुभवाचे स्वरूप त्याच्या अंगी असलेल्या कल्पना सामर्थ्यासह कादंबरीत प्रकट करीत असतो. हे करीत असताना वास्तवानुभवापेक्षा, कल्पनासामर्थ्य, रंजकता, अतिरंजकता, अद्‌भुतता, चमत्कृतिजन्यता, कल्पनारम्यता, स्वप्नरंजकता या घटकांचाही लेखकांच्या लेखन पद्धतीनुसार आविष्कार झालेला असू शकतो. तरीही मदलित कादंबरीचे स्वरूपः आणि चिकित्साफ हा संशोधनाचा विषय असल्यामुळे कादंबरीतील घटना प्रसंग आणि व्यक्तिरेखाटनाच्या अनुषंगाने त्या लेखकाच्या लेखनात ध्वनित झालेले दलित जीवनचित्रण, त्याची वैशिष्ट्ये चिकित्सकपणे स्पष्ट करणे गरजेचे आहे.

दलित कादंबरीकारांनी वैशिष्ट्यंपूर्ण कादंबरीलेखन करून दलित समाजालाच नव्हे तर समग्र समाजव्यवस्थेला आत्मभान, आत्मजाणीव, आत्मशोध घेण्यास प्रवृत्त केले आहे. इतर समाजव्यवस्थेपेक्षा दलित समाजव्यवस्थेचे जीवनानुभव हे वेगळे आहेत. म. फुले, डॉ. आंबेडकरी विचारधारेमुळे दलित कादंबरीला एक वैचारिक बैठक प्राप्त झाली आहे. या वैचारिकतेतूनच ती सकस झाली आहे. म्हणूनच दलित लेखकांची कादंबरी निर्मिती इतर लेखकाच्यापेक्षा वरचढ आणि श्रेष्ठ ठरते आहे.

दलित कादंबरीमध्ये वेदना, विद्रोह, नकार, दुःख, स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, धर्मनिरपेक्षता यांचे प्रतिबिंब उमटताना दिसते. वेदनेतूनच विद्रोहाचा जन्म होतो आणि विद्रोहातून नकाराची भाषा पुढे येते. हा नकार येथील समाजव्यवस्थेलाच आहे. दलित कादंबरी नुसते दलिताचे जीवन चित्रण करीत

नाही तर गावकुसाबाहेरच्या समाजाला माणूस म्हणून वागणूक द्या हा टाहो फोडताना दिसते. एवढेच नव्हे तर जो समाज पूर्वी साहित्याचा विषयच होत नव्हता त्या गावकुसाबाहेरच्या समाजाला या निमित्ताने साहित्य विश्वाच्या केंद्रस्थानी आणले. त्याच्या भाव भावना कादंबरीतून मुक्रर केल्या. प्रस्थापित मराठी कादंबरीत सामान्य माणसाचे जीवनचित्रण होत नव्हते. परंतु मराठी दलित कादंबरीने पहिल्यादांच सर्वसामान्य माणूस साहित्याच्या केंद्रस्थानी आणला. देव, धर्म, देश यांच्यापेक्षा माणूस सर्वश्रेष्ठ आहे. हे अवघ्या विश्वाला बाबुराव बागूल यांच्या 'सूड' या कादंबरीने पटवून दिले.

काळाला समांतर असे दलित कादंबरीचे विषय व आशय बदलत गेलेले दिसतात. दलित कादंबरीत वास्तव जीवनाचे भान अधिकाधिक गडद होताना दिसते. वास्तव जीवनचित्रण ही दलित कादंबरीची प्रधान प्रेरणा आहे. दलित जीवनात आलेल्या आत्मभानातून दलित कादंबरी व दलित समाज आत्मशोध घेताना दिसतो. परिवर्तन आणि दलित कादंबरीत झालेल्या स्थित्यंतराबरोबरच तिचे आशय बदलत गेले. अभिव्यक्तीमध्येही बदल झालेला दिसून येतो. सर्वच दलित कादंबरीकारांनी सामाजिक समस्यांचे चित्रण वास्तववादी भूमिकेतून केले आहे. जनसामान्य, पददलित आणि उपेक्षितांच्या जीवनचित्रणामुळे ती अधिक वास्तव आणि सामाजिक झाली. दलित कादंबरी म्हणजे काय? तिचे घटक, निर्मिती प्रेरणा, कादंबरीचे स्वरूप आणि विकास, सामाजिक बांधिलकी प्रकट करणारी कादंबरी, स्त्री समस्या प्रधान कादंबरी, चरित्रात्मक कादंबरी, दलित चळवळीचे चित्रण करणारी कादंबरी, भूक आणि गरिबीचे चित्रण करणारी कादंबरी, रंजनप्रधान कादंबरी आणि संकीर्ण स्वरूपाची दलित कादंबरी असे विषयवार वर्गीकरण केले आहे. अर्थात कादंबरीचे कथानक म्हणजे कादंबरीचा विषय नव्हे. कादंबरीचा विषय गुंतागुंतीचा असतो. त्यामुळे कादंबरीच्या विषयाचे केवळ एका विषय वर्गात वर्गीकरण करणे अशक्य असले तरी प्रमुख विषयानुसार हे वर्गीकरण केले आहे. कादंबरीतून पूर्णतः आणि अंशतः आलेल्या विषयांचा विचार सविस्तरपणे केला आहे. त्याचबरोबर तत्कालीन समाज व्यवस्थेशी प्रस्तुत कादंबऱ्याचा काय अनुबंध आहे तेही सविस्तर स्पष्ट केले आहे.

**१. सामाजिक बांधिलकी प्रकट करणारी दलित कादंबरी:**

सामाजिक बांधिलकी प्रकट करणारी कादंबरी म्हणून आपल्याला अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, केशव मेश्राम, सुधाकर गायकवाड, भीमसेन देठे, नामदेव ढसाळ, माधव कोंडविलकर, अशोक व्हटकर, उत्तम बंडू तुपे यांच्या कादंबऱ्याचा विचार करावा लागतो.

ज्यांचे अस्तित्वच नाकारण्यात आले अशा दलित समाजातील मातंग जातीत अण्णाभाऊंचा जन्म झाला. गुन्हेगार जमात, उपेक्षित जमात म्हणून या जमातीची ओळख. अगदी बालपणापासून अस्पृश्यतेचे चटके अण्णाभाऊंना सहन करावे लागले. जवळ-जवळ सर्वच वाङ्मयामुळे सर्वांच्याच लक्षात राहतात. 'फकिरा', 'वारणेचा वाघ', 'वैजयंता', 'माकडीचा माळ', या कादंबऱ्यामधून त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे भाव स्पष्ट होतात. 'फकिरा' (१९५९) ही कादंबरी मातंग जमातीच्या जीवनावरील एक प्रभावी कथाशिल्प आहे. एका स्वाभिमानी समाजाच्या संघर्षपूर्ण आंदोलनाची ही कादंबरी परामर्श घेते. फकिरा हा मुळात सज्जन पण अन्यायाविरोधात भडकून उठणारा माणूस. जाणीवपूर्वक प्रसंगी कायदाही हातात घेणारा आहे. अन्यायाच्या विरोधात बंड उभारतो. गुन्हेगार जमातीसाठी धान्य लुटतो, स्वार्थी सत्तेचा त्याग करणारा हा माणूस शेवटी सरकारच्या स्वाधीन होतो. स्वातंत्र्य मिळाले, थोडे फार समाजपरिवर्तन झाले पण समाजाच्या अंतःप्रवृत्ती बदलल्या नाहीत. आजही खेड्यातील माणसावर अन्याय अत्याचार होतोच 'वारणेचा वाघ' या कादंबरीत अण्णाभाऊंनी याच गुन्हेगारी प्रवृत्तीचा वेध घेतला आहे. 'वैजयंता', 'माकडीचा माळ' याही कादंबरीमधून दलित जीवनाचा वेध घेतला आहे. अण्णाभाऊंनी आपल्या कादंबऱ्यामधून माणसानं जगलं पाहिजे हाच संदेश दिला व तो स्वतः आचरून दाखविला. शंकरराव खरातांनी आपल्या कादंबरीमधून सम्यक दलित जीवनदर्शन घडविले आहे. अण्णाभाऊंनी दलितांच्या भीषण दुरावस्थेचे व उपासमारीचे चित्र प्रामुख्याने पुढे आणले तर खरातांनी दलित जीवनाचा सुटू पाहणारा तळ धरून ठेवला. झोपडपट्टीतील बकाल जीवन अनेकांनी चित्रित केले. पण अस्सल जीवनचित्रण खरातांप्रमाणे कोणाला करता आले नाही. 'मी मुक्त! मी मुक्त!' या कादंबरीतून शंकरराव खरातांनी अनाथश्रमात वाढलेल्या एका मुलाच्या जीवनाची कथा सांगितली आहे. पण अनाथ मुलाच्या जीवनातले नाट्य त्यांना पकडता आले नाही. त्यामुळे विषय चांगला असूनही कादंबरीमध्ये प्रभावीपणा दिसत नाही. शिक्षण खात्यातील भ्रष्टाचारावर लिहिलेली 'गावचा टिनोपाल गुरुजी' ही कादंबरी बऱ्यापैकी नावारूपाला आली. परंतु दलित समाजाच्या जीवनातील, दलित मास्तरच्या जीवनातील खळबळजनक घटना, विषय कादंबरीत प्रभावीपणे आले नाहीत. तरी सामाजिक बांधिलकी बऱ्यापैकी प्रस्तुत कादंबरीमधून चित्रित होताना दिसते. फासेपारधी लोकांची अवहेलना आणि दुःख 'पारधी' या कादंबरीमध्ये लेखक मांडताना दिसतात. एकूण सौम्य भाषेत शंकरराव खरात आपल्या समाजाच्या व्यथा वेदना ध्वनित करतात. अर्थातच दलित

जीवनाची अनुभूती त्यांच्यामध्ये असल्यामुळे दलित जीवनाचे चित्रण त्यांच्या कादंबऱ्यामधून आलेले दिसते. केशव मेश्राम यांनी 'हकिकत', 'जटायू', व 'पोखरण' या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. 'हकिकत' या कादंबरीमध्ये कथानायकाच्या शालेय आणि महाविद्यालयीन जीवनाचे चित्रण आलेले आहे. हा मुलगा आपल्या चुलतभावाकडे राहतो. त्याला वाचनाचा छंद आहे. अनेक बऱ्या वाईट माणसांशी त्याचा संबंध येतो. रिक्षा चालविणे, मोजमजुरी करणे, अशीही कामे त्याला करावी लागतात. शोषित जीवनाचे चित्रण उपरोक्त कादंबरीमध्ये केलेले दिसते. 'जटायू'मध्ये देखील रामायणातील रक्तबंबाळ होणारा 'जटायू' हा मिथ घेऊन त्यांनी दलित जीवनविषयक कादंबरीचा भाग उभा केला आहे. 'पोखरण' या कादंबरीमध्ये दलित जीवन चित्रण येते. आर्य आणि अनार्य शब्दांच्या आधीच्या कालखंडांची ही पार्श्वभूमी या कादंबरीमध्ये आलेली आहे. नामदेव ढसाळ यांनी 'हाडकी हाडवळा' या कादंबरीतून दलित स्त्रीचे जीवन आणि शोषणाचे अनेक प्रसंग आलेले आहेत. सुधाकर गायकवाड यांनी 'शूद्र' या कादंबरीमधून जुन्या काळचे ज्यावेळी वर्णभेद कसोशीने पाळले जात असत त्याकाळचे शूद्र अशूद्र हा भेद अत्यंत कठोर व आत्युग्र स्वरूपाचा होता हेच स्पष्ट होते. भीमसेन देठे यांच्या 'इस्कोट' मध्ये खेड्यांतून मुंबई सारख्या शहरातील महाविद्यालयात प्रवेश करणारा नायक आहे. पण अशा तरुणाला शहरी जीवनाशी मिळते जुळते घेताना अनेक मानसिक आंदोलनातून जावे लागते. काही प्रमाणात ना. सी. फडक्यांच्या तंत्रवादाची छाप त्यांच्या कादंबरीवर पडलेली दिसून येते. अशोक व्हटकर यांनी ममेललं पाणीफ या कादंबरीत दलित जीवनातील विविध गुंतागुंतीचे ताण तणाव दलित व अदलित जीवन संदर्भात प्रत्ययकारी दर्शन घडविले आहे. कादंबरीत मानवी नात्याची विविधरंगी गुंफण व नाट्य दिसून येते. विशेषतः धरण फुटल्यानंतरच्या जलप्रलयाचे चित्रण तर विराटतेला स्पर्श करते. मानव व निसर्ग यांच्या संबंधाबाबत नव्याने विचार करण्यास ते प्रवृत्त करते. माधव कोंडविलकरांच्या 'अजून उजडायचं आहे' यातही दलित जीवन चित्रण येताना दिसते. वरील सर्वच लेखकांच्या कादंबरी लेखनातून सामाजिक बांधिलकी अशी प्रकट झाली आहे ते लक्षात येते.

**२. स्त्री समस्याप्रधान दलित कादंबरी :**

स्त्रीच्या जीवनात निर्माण झालेल्या समस्या आणि तिला समाजव्यवस्थेत असलेले स्थान स्त्री समस्याप्रधान दलित कादंबरीत स्पष्ट जाणवते. अण्णाभाऊ साठे यांच्या 'चंदन' आणि 'चित्रा' या कादंबरीमधून स्त्री समस्या चित्रण झालेले दिसते. अण्णाभाऊंची 'चंदन' या कादंबरीमध्ये

मुंबईतील एका झोपडपट्टीत राहणाऱ्या चंदन नावाच्या गरीब आणि होतकरू स्त्रीचे साहस चित्रित केले आहे. चंदनच्या पतीच्या मृत्युनंतर तिच्यावर अत्याचार करण्यासाठी टपलेल्या काही दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांविरुद्ध तिने आपल्या शील रक्षणासाठी केलेला संघर्ष प्रस्तुत कादंबरीत चित्रित केला आहे. समग्र मराठी साहित्यात कामकरी स्त्रीचे असे चित्रण बहुधा प्रथमच 'चंदन'मध्ये करण्यात आले आहे. मुळातच अण्णाभाऊंची पात्रेच अन्यायाविरोधात पेटून उठताना दिसतात. 'चित्रा' कादंबरीतील मुख्य व्यक्तिरेखा चित्राच असून ही कादंबरी एका सत्य घटनेवर आधारित आहे. १९४५-४६ च्या मुंबई सारख्या शहरांच्या औद्योगिकीकरणाचे दोष व त्यांचे लोकांच्या लैगिंक नीतिमत्तेवर होणारे परिणाम दाखवते. औद्योगिकीकरणाच्या वाढीबरोबरच शरीरविक्रयाचा व्यवसायही कसा वाढला आणि कशा प्रकारे हजारो निष्पाप स्त्रियांना दलालाकडून बळी बनविण्यात आले. याचे लक्षवेधी चित्रण ही कादंबरी करते. पैशाच्या आकर्षणामुळे काही अगदी जवळचे नातेवाईकही आपल्या नात्यातील स्त्रियांना या व्यवसायात जाण्यासाठी भाग पाडीत होते हेच येथे लक्षात येते.

बाबुराव बागूल यांची 'सूड' ही कादंबरी देखील स्त्री समस्यांचा वेध घेणारी आहे. स्त्रीत्वाचे शोषण, माणूस म्हणून जगण्याचा अधिकार आणि मानवतावादाचे दर्शन त्यांनी 'सूड' या कादंबरीतून घडविले आहे. स्वतः बाबुराव बागुलांशी चर्चेच्या ओघात या कादंबरीतील 'जानकी' विषयी बोलले असता, ते म्हणाले होते की हिंदू समाजात स्त्रीला अशी हीन वागणूक दिली जाते याचे प्रत्ययकारी चित्रण प्रस्तुत कादंबरी करते. ही फक्त कादंबरीच नाही तर 'सूड' म्हणजे हिंदू धर्माचा समीक्षा ग्रंथ आहे. जानकीवर अनेकांकडून अन्याय, अत्याचार होतो म्हणून ती पुरुषीवेश परिधान करते आणि या समाजाचा सूड घेण्याच्या इराद्याने ज्वालाप्रसाद बनून फिरते. तेथे एका स्वामीजींशी तिची भेट होते. पण स्त्री कशी महान आहे हे तिला स्वामींच्या वर्तनातून समजते. देव-धर्म-देश यांच्यापेक्षाही माणूस श्रेष्ठ आहे हे स्वामीजींमुळे तिला समजते. स्वातंत्र्यातही स्त्रीच्या वाट्याला आलेले दुःख याचे चित्रण ही कादंबरी करते. अशोक व्हटकर यांची '७२ मैल' ही कादंबरी आहे. एका विशिष्ट कालावधीमध्ये घडलेल्या सत्य घटना मांडणारी ही कादंबरी आहे. एखाद्या स्त्रीच्या वाट्याला येणारे दुःख हे कल्पनेपलीकडील असते. या कादंबरीतील नायिका राधाक्काला कशाचाही आधार नाही. आभाळ हेच छप्पर आणि धरती हाच निवारा आणि तिची सहा छोटी मुले एवढीच तिची खरी संपत्ती आहे. त्यातही ती अस्पृश्य समाजातील आहे. त्या

स्त्रीच्या जीवनात येणारे दुःखाचे वर्णन अशोक व्हटकर यांनी मार्मीकपणे केले आहे.

उत्तम बंडू तुपे यांनी 'झुलवा' या कादंबरीत जोगतिणीच्या जीवनाची परवड मांडण्याचा प्रयत्न केला आहे. तो स्थूल असला तरी सच्चा आहे. मराठी कादंबरी विश्वात स्त्रीजीवनदर्शनाला तसे प्राधान्य नाही, हेही नमूद करावेसे वाटते. बदलत्या 'स्त्री' जीवनाचा मध्यवर्ती मराठी कादंबरीवर भला वा बुरा बराच परिणाम झालेला आढळतो. परिवर्तनाच्या विविध लाटांच्या नव्या दलित स्त्रीमनावरही काही परिणाम झालेलाच आहे. एकूणच व्यवस्थेत स्त्रीला कसे दुय्यमस्थान दिले जाते त्यात जोगतिणीच्या वाट्याला तर भयंकर दुःख आलेले दिसते. अत्यंत प्रभावीपणे तुपेंनी स्त्रीचे दुःख मराठी कादंबरीत अगदी चपखलपणे चित्रित केले आहे. तर 'खाई' या कादंबरीमधून ही स्त्री समस्यांचा वेध तुपेंनी घेतला आहे. पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्री एक उपभोग्य वस्तू आहे असा एक स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोण २१ व्या शतकातही आढळतो हे आदिम सत्य मांडण्याचा प्रयत्न कादंबरीकार उत्तम बंडू तुपे यांनी मखाईफ या कादंबरीत केला आहे. स्त्रीच्या जीवनातील दुःखाची संघर्षाची पाळेमुळे कशी आणि किती खोलवर रुजलेली असतात याची जाणीव प्रस्तुत कादंबरी वाचताना होते. 'स्त्री' जीवनातील आदिम सत्य मांडण्याचा एक स्तुत्य प्रयत्न लेखकाने केला आहे. एक सामाजिक प्रश्न हाताळून वाचकाला त्यातून मार्ग काढण्यास प्रवृत्त केले आहे.

**३. चरित्रात्मक कादंबरी :**

चरित्रात्मक कादंबरी हा वाङ्मय प्रकार असा आहे की, तो व्यक्तीला जीवन जगण्यासाठी प्रेरणादायी असा आहे. दलितांच्या मनामध्ये आत्मविश्वास निर्माण करणारे महान नायक महात्मा जोतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गौतम बुद्धांचे तत्त्वज्ञान यांना अनन्यसाधरण महत्व आहे. या व्यक्तिरेखांच्या बद्दल असणारा अपार आदर, अभिमान, यातून दलित चरित्रात्मक कादंबरी फुललेली दिसते. विशेषतः तथागत गौतम बुद्ध, महात्मा जोतिराव फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, रमाबाई आंबेडकर या महान व्यक्तींना आदर्श मानून त्यांच्यातील असामान्य कर्तृत्वाचे दर्शन दलित चरित्रात्मक कादंबरीमध्ये घडलेले आहे. हरिभाऊ पगारे यांची 'युगप्रवर्तक', रमाकांत जाधव यांची 'सोनबा', डॉ. दा. स. गजघाटे यांची 'क्रांतिज्योती' सावित्री या कादंबऱ्यांचा येथे परामर्श घेणे महत्वाचे ठरते.

'युगप्रवर्तक' या कादंबरीमधून हरिभाऊ पगारे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन चरित्र रेखाटले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा

जन्म १४ एप्रिल १८९१ ला झाला आणि महानिर्वाण ६ डिसेंबर १९५६ ला झाले. या युगपुरुषाने दलित समाजातील सर्वच बांधवांना एक वेगळी पहाट दाखविली. विज्ञानाने साधने दिली परंतु बाबासाहेबांनी त्यांना जगण्यासाठी त्यांच्या अस्तित्वासाठी नवा विचार दिला. लेखकाने आपल्या लेखणीच्या माध्यमातून बाबासाहेबांचे वेगवेगळे पैलू प्रस्तुत कादंबरीमधून चित्रित केले आहेत. बाबासाहेब आंबेडकर इतर राजकारणी, अर्थकारणी विचारवंत यांच्यापेक्षा बुद्धिमान आणि व्यासंगी कसे होते ते स्पष्ट केले आहे. तर 'झुंजार' या कादंबरीमधून जोतिराव फुले यांचे चरित्र हरिभाऊ पगारे यांनी रंगवले आहे. महात्मा फुलेंनी आपले संपूर्ण आयुष्य सामाजिक सुधारणा करण्यासाठी वेचले. महात्मा फुले हे बाबासाहेब आंबेडकरांना गुरुस्थानी होते. आपल्या गुरूंचे गुरू म्हणून लेखकाच्या मनात फुलेंविषयी अपार आदर आहे. पेशवाईच्या सरत्या काळात सामान्य माणसाचा आतोनात छळ होत होता, तेव्हा या सामान्य माणसाला धीर देण्याचे काम फुलेंनी केले. त्यांनी 'सार्वजनिक सत्यधर्म', 'सत्यशोधक समाज' या ग्रंथाद्वारे समाजाला नवीन दिशा दिली म्हणूनच एक आदर्श व्यक्तिरेखा म्हणून हरिभाऊ पगारे फुलेंचे चरित्र स्पष्ट करतात.

बंधुमाधव यांनी 'वगसम्राट' या कादंबरीमध्ये भाऊ फक्कड नावाच्या एका महान तमासगीराचे जीवन रेखाटले आहे. भाऊ फक्कड यांचे पूर्ण नाव भाऊ मालोजी भंडारे. साधे सरळ असे या कादंबरीचे कथानक आहे. एक दलित जीवनचित्रण करणारी ही कादंबरी आहे. त्याचबरोबर एका दलित कलावंताचे ही कादंबरी जीवनचित्रण करते. तमाशा लोककला तळागाळातील समाजात कशी जोपासली गेली. मेहनत घ्यावी लागते, आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागते. कलेच्या जिवंतपणासाठी अपार कष्ट करावे लागतात. त्या कलेचे आणि भाऊ फक्कड यांच्या जीवनाचे अत्यंत प्रभावी चित्रण प्रस्तुत कादंबरी करते.

यशवंत मनोहर यांनी 'रमाई' ही कादंबरी लिहिली आहे. 'रमाई' या चरित्रात्मक कादंबरीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्नी रमाबाई यांचे जीवनचरित्र रेखाटले आहे. बाबासाहेब आंबेडकर हे महान युगपुरुष तर होतेच त्यांच्या कार्याची जगावर छाप होती पण रमाबाई सुद्धा स्वकर्तृत्वाने असामान्य ठरल्या रमाई अगदी सावलीप्रमाणे बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रत्येक कार्यामागे उभ्या होत्या. त्यामुळेच या महान महामाता असामान्य अशा रमाईचा परिचय यशवंत मनोहर रमाई या कादंबरीतून करून देतात.

'सोनबा' ही रमाकांत जाधव यांची कादंबरी आहे. प्रस्तुत कादंबरीमध्ये एका सामान्य दलित व्यक्तीची डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रती असणारी पराकोटीची श्रद्धा मांडली आहे. जशी एखाद्या भक्ताची ईश्वरावर अपार प्रीती असते, क्षणभरही तो ईश्वराचे नामस्मरण करण्याचे टाळत नाही, अगदी त्याच पद्धतीने सोनबाची बाबासाहेबांबद्दलची अपार श्रद्धा दिसून येते. याचे चित्रण या कादंबरीतून केले आहे.

'जोतिकांता सावित्री' ही डॉ. दा. स. गजघाटे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित चरित्रात्मक कादंबरी आहे. सावित्रीबाई फुलेंचे नाव घेताच आपल्यासमोर त्यांच्या अनेक प्रतिमा उभ्या राहतात. सार्वजनिक कामासाठी घराबाहेर पडणारी पहिली भारतीय स्त्री, आद्य शिक्षिका, स्त्रीमुक्ती आंदोलनाच्या प्रणेत्या, स्त्री-पुरुष समानता प्रतिपादन करणाऱ्या प्रथम महिला अशी अनेक बिरुदे त्यांच्या कार्यामुळे त्यांना लागलेली आहेत. स्त्री ही परप्रकाशी नसून स्वयंसिद्ध आहे हे नवे तेजस्वी मूल्य सावित्रीने भारतीय स्त्री जीवनाला दिले. हेच या कादंबरीतून स्पष्ट केले आहे. एकूणच दलित समाजालाच नव्हे तर भारतीय समाजाला आदर्शात्मक जीवन जगता यावे म्हणून या महान व्यक्तींची चरित्रे कादंबरी या वाङ्मय प्रकारातून रेखाटण्याचे कार्य या लेखकांनी केले आहे.

**४. दलित चळवळीचे चित्रण करणारी कादंबरी :**

केवळ दलित कादंबरीच नव्हे तर समग्र दलित साहित्य हे चळवळीतून निर्माण झालेले आहे. दलित चळवळ हीच दलित कादंबरीची महत्त्वाची प्रेरणा आहे. असेच म्हणावे लागेल. 'बलिदान' ही ज.वि.पवार यांची चळवळीचे चित्रण करणारी कादंबरी आहे. या कादंबरीचा नायक जगन्नाथ पेणेकर आहे. काव्यात्म शैली या कादंबरीचे एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. त्याचबरोबर राजकीय पक्षांमध्ये असलेल्या दुहीचेही वर्णन प्रस्तुत कादंबरी मध्ये केले आहे. दलित किंवा बौद्ध समाजातील अंतर्गत संघर्षाचे कलह-भांडणाचे त्यांनी अंतर्मुख होऊन केलेले चित्रण प्रत्ययकारी आहे.

'युगंधर' ही बा.स. हाटे यांची एक महत्त्वाची कादंबरी आहे. या कादंबरीत बा.स.हाटे यांनी बाबासाहेबांचे जीवनकार्य रेखाटले आहे. ही कादंबरी तीन टप्प्यात विभागली असून महाडचा सत्याग्रह, बाबासाहेबांचे समाजकार्य आणि अन्यायाविरुद्ध लढ्यापूर्वीचा काळ प्रस्तुत कादंबरीत आला आहे. या कादंबरीतील भाषेत स्वाभाविकता, सहजता, कथानक वाचनीय आहे. पाना-पानामधून बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू ही कादंबरी स्पष्ट करते.

मुरलीधर जाधव यांनी देखील आपल्या 'कार्यकर्ता' या कादंबरीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निर्वाणानंतर आंबेडकरी चळवळ ज्यांच्या लोखंडी, पोलादी खाद्यांवर उभी आहे त्या कार्यकर्त्याला समाजात कोणते स्थान आहे त्याची जीवनव्यथा 'कार्यकर्ता' या कादंबरीत मांडली आहे. बाबासाहेबांची चळवळ तळागाळातील सामान्य माणसांपर्यंत पोहचविण्याचे प्रयत्न प्रस्तुत कादंबरी करते.

'भारत सेल होताना' या कादंबरीत सिद्धार्थ रामटेके यांनी जागतिक पर्यावरण आणि बड्या भांडवली साखळी वृत्तपत्रांची पार्श्वभूमी अशा दोन टोकांवर उभी आहे. तर बाबुराव बागूल यांनी 'कोंडी' कादंबरीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने प्रभावित झालेला नायक पावन पगारे याला केंद्रस्थानी ठेवून अन्याय अत्याचाराविरूद्ध हा तरूण कसा पेटून उठतो याचे चित्रण केले आहे. वास्तवदर्शी लेखन करण्याचा बाबुराव बागूल यांनी कादंबरीच्या कथावस्तुपेक्षा जीवन महत्त्वाचे आणि जीवनातील ताण तणावही मानवी मनाचे कशी चिरफाड करतात. मनातील ध्येयवादाला- आणि प्रत्यक्षातील उग्र भीषण परिस्थिती कशी कोंडी करून व्यक्तीला भोवऱ्यात अडकवते याचे वेधक चित्रण केले आहे.

'उपल्या' ही शरणकुमार लिंबाळे यांची एक राजकीय कादंबरी आहे. दलित चळवळीतील काही वृत्तींवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न या कादंबरीतून केला आहे. तर लिंबाळे यांच्या हिंदू कादंबरीतही असेच चित्रण दिसून येते. एकनाथ साळवे यांनी 'एनकाऊन्टर' ही कादंबरी लिहिली असून भामरागड परिसरातील कुडकेली गावच्या आदिवासींची कहाणी सांगितली आहे. एकूण आठ भागात ही कादंबरी विभागली आहे. या कादंबरीमधून परिवर्तनाची अपेक्षा ठेवलेली दिसून येते. परिवर्तन हे चळवळीचे पहिले पाऊल आहे. असे या कादंबरीत सूचित केले आहे.

**५. भूक आणि गरिबी यांचे चित्रण करणारी दलित कादंबरी :**

'भूक' हे दलित कादंबरीचेच नव्हे तर समग्र मराठी दलित साहित्याचे मूलभूत वैशिष्ट्य आहे. भूक आणि गरिबी ही दलितांच्या पाचवीला कशी पुजलेली आहे व भुकेसाठी चालणारी धडपड आणि त्यातून जगण्याची उत्कटता शंकरराव खरात यांच्या 'झोपडपट्टी' आणि नामदेव चं. कांबळे यांच्या 'राघववेळ', 'ऊनसावली' या कादंबऱ्यातून स्पष्ट होताना दिसते. शंकरराव खरात यांनी 'झोपडपट्टी' या कादंबरीमध्ये झोपडपट्टीमधील जीवनाचे वास्तववादी चित्रण रेखाटले आहे. झोपडपट्टीतील वातावरण आणि जगण्याची पद्धती हे कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. मुंबईसारख्या महाकाय शहरातील

झोपडपट्टी हीच या कादंबरीची नायिका आहे. भूक आणि दारिद्र्यामुळे माणसाला अनेक प्रसंगांना कसे सामोरे जावे लागते हे ही कादंबरी स्पष्ट करते. मानवी जीवनाने गाठलेल्या पशुपातळीबद्दल शिक्षित संवेदन मने, माणसे ही बोथट बनने कसे वेदनादायक आहे हेच ही कादंबरी स्पष्ट करते. तर नामदेव कांबळे यांच्या 'राघववेळ' कादंबरीमध्ये समाजामध्ये आजही बलुतेदारी अस्तित्वात आहे. गावपांढरीतल्या मातंग समाजाची परवड लेखकाने शब्दबद्ध केली आहे. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडातही या समाजाला जगण्यासाठी कसे अपार कष्ट करावे लागते याचेच चित्रण आहे. या समाजाला केवळ भुकेची चिंता नाही तर ज्ञानाची चिंता आहे. मराठी साहित्यामध्ये 'राघववेळ' ही एक उत्कृष्ट अशी कादंबरी ठरली आहे. 'राघववेळ' नंतर 'ऊनसावली' ही नामदेव कांबळे यांची दुसरी महत्त्वाची कादंबरी. 'राघववेळ' मध्ये रघू या नायकाचे शालेय जीवन प्रत्ययास येते. तर 'ऊनसावली' या कादंबरीत रघूचे व्यक्तिमत्त्व फुलवत गेलेले दिसते. या कादंबरीमध्ये आंबेडकरी चळवळ व तिचे चित्रण दिसते पण रघू ही चळवळ समजून घेण्यास कसा अपयशी ठरतो याचे चित्रण प्रस्तुत कादंबरीत दिसून येते.

**६. रंजनप्रधान कादंबरी :**

दलित कादंबरीत सकस आणि दर्जेदार कादंबऱ्यांच्या तुलनेने मनोरंजन करणाऱ्या हलक्याफुलक्या कादंबऱ्यांचीच निर्मिती दलित लेखकांनी मोठ्या प्रमाणावर केली आहे. या लेखनात रंजनाचा भाग असला तरी त्यातील कथाबीज, कोणाची तरी चित्तर कथा, परवड व फरपट सांगणारी दिसते. जीवनातील चांगल्या गोष्टींचे लाभ कसे होतात, ह्याचाही सूचक उपदेश केलेला दिसून येतो. मात्र हे लेखन कादंबरी या साहित्यप्रकारात नवे काहीच देत नाही. कसलीही मूल्यात्मक भर घालीत नाही. साहित्यप्रकाराच्या कसोटीवरही ते टिकत नाही. अशा कादंबऱ्या मोठ्या प्रमाणात लिहिल्या गेल्या आहेत. अण्णाभाऊ साठे यांची 'अलगुज' ही कादंबरी या धरतीची आहे. प्रेमभावनेचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्यापैकी ही एक कादंबरी आहे. रंगू ही गणू मोहिते नावाच्या सधन कुलीन शेतकऱ्याची मुलगी असते. लट, बापू गरीब असतो आणि गणू मोहितेच्या घरी एक नोकर म्हणून काम करीत असतो. पण रंगुला बापूचे अलगूज वाजवण्यातले कौशल्य खूप आवडते. त्यामुळे ती त्याच्या प्रेमात पडते. प्रेमिकांच्या मार्गात येणाऱ्या नेहमीच्या अडचणी पार करून शेवटी रंगू आणि बापू लग्न करण्यात यशस्वी होतात. मज्याचा शेवट गोड ते सारेच गोडफ असे सुचवणाऱ्या अणाभाऊंच्या सुखान्त कादंबऱ्यापैकी

ही पहिलीच कांदबरी होय. 'आवडी' या कादंबरीला थोडासा ग्रामीणतेचा स्पर्श झालेला आहे. खोट्या अहंकारामुळे सुंदर तरुण मुलींच्या स्वप्नांचा चुराडा कसा होतो तसेच पुरुषांचे सरंजामशाही प्रवृत्तीचे मन घरातील मुलींच्या भावजीवनाच्या आड कसे येते व त्यांचा घात करते. याचे चित्रण अण्णाभाऊंनी 'आवडी' या कादंबरीतून केले आहे. आवडी व धनाजी रामोजीच्या प्रेमप्रकरणाची वातावरण निर्मिती अण्णाभाऊंनी अतिशय कसदारपणे प्रस्तुत कादंबरीत केलेली आहे.

'तारा' ही देखील एक मनोरंजनप्रधान कादंबरी आहे. मनात उत्सुकता, गुढता निर्माण व्हावी यासाठी तारा ही रहस्यमय कादंबरी अण्णाभाऊंनी लिहिली. प्रस्तुत कादंबरीतील नायिका बंड्या या दरोडेखोराच्या कृत्याला बळी पडते आणि नाइलाजाने बंड्याच्याच टोळीत सामील होते. तिला बंड्याच्या तावडीतून सुटावेसे वाटते. पुढे ती एका फौजदाराशी लग्न करते. बंड्यापासून अलिप्त राहता यावे म्हणून ती चंद्रकुमारची मदत घेते. तारा सगळी माहिती चंद्रकुमारला सांगते. तिचे सगळे गुन्हे तो माफ करतो. भयकथेचा वेगळा विषय परंतु सामान्य पातळीवर हाताळला आहे. तारा ही एक रहस्यप्रधान कादंबरी आहे. बंड्या वाघ या दरोडेखोराच्या प्रेमात पडलेली तारा पुढे चंद्रकुमार या फौजदाराशी लग्न करून बंड्याला पकडून देते तर तारासाठी वेडा झालेला बंड्या मरणाची पर्वा न करता तिचा शोध घेतो. येथे प्रेमाचे वेगळे रूप प्रकट होते. अण्णाभाऊंची ही एक दर्जेदार रहस्यप्रधान व स्त्रीप्रधान कादंबरी आहे. तारा या नायिकेबरोबरच साठेंनी बंड्या दरोडेखोरही उत्तम रेखाटला आहे.

'गुलाम' ही रंजनात्मक कादंबरी आहे. वासू हा गुलामगिरीचा प्रतिनिधी आहे. तो मालकाचा मिनाक्षीचा व मथीचाही गुलाम आहे. तो गुलामगिरीत पिचून गेला आहे. त्याला स्वतःचे अस्तित्वच नाही. तर मिनाक्षीची ओढ आहे. मथीलाही तो नकार देऊ शकत नाही. 'गुलाम' रंजनप्रधान शृंगारिक कादंबरी आहे. वासू या गुलामाची ही कथा आहे. वासू-मथी-मिनाक्षी यांच्या प्रेमाचा त्रिकोण येथे साधला आहे. याचबरोबर रावसाहेब, दिगंबर, दाजी, बाहू रामोशी, रंगू बाढ ही अन्य पात्रेही यात महत्त्वाची ठरतात.

'रत्ना' या कादंबरीत अण्णाभाऊ साठे यांनी ग्रामीण भागात स्वांतत्र्यसैनिकांच्या बायकांवरही कोणती संकटे येतात. आलेल्या संकटांना त्या कशा प्रकारे सामोऱ्या जातात यांचे चित्रण या कादंबरीत केले आहे. रत्ना ही स्वातंत्र्य सैनिकाच्या पत्नीची व्यथा मांडणारी कर्मकहाणी आहे. रत्नाच्या

वाट्याला आलेले जीवन अशा किती तरी स्वातंत्र्य सैनिकांच्या पत्नीच्या वाट्याला येते त्यापैकीच रत्ना ही एक व्यक्तिरेखा अण्णाभाऊंनी रेखाटली आहे.

'रानबोका' या कादंबरीतून गण्या नाटूला या दरोडेखोराच्या साहसाची आणि दरोड्याची ही कथा आहे. संभाजी जारडेकर मोहना आणि लक्ष्मी यांच्या प्रेमाचा त्रिकोणही या कादंबरीत चित्रित झाला आहे. 'रानबोका' ही रानबोक्याला गुरू मानून चोऱ्या करणाऱ्या चोराच्या जीवनावर आधारित अशी कादंबरी आहे. तर 'रानगंगा' या कादंबरीत रानगंगा नदीच्या काठावर राहणाऱ्या जाधव, पवार घोलप, शिर्के यांच्या मधील नदीच्या पाण्याच्या प्रश्नावरून पिढ्यानपिढ्या चाललेल्या वैराचा चंदर जाधव आणि घोलपाची प्रभा या दोहोंची प्रीतिकथा समन्वय घडवून आणते. ही कादंबरी शृंगारप्रधान असून रंजनाच्या अंगाने लिहिलेली आहे. या कादंबरीत संघर्ष कमी आणि प्रणय अधिक असे चित्रण केलेले दिसते. एकूणच नाट्यपूर्ण आणि उत्कंठावर्धक चित्रण हे रानगंगा या कादंबरीचे वैशिष्ट्य ठरते.

शंकरराव खरात यांची 'मसालेदार गेस्ट हाऊस' ही देखील मनोरंजनावर अधिक भर देऊन मानवी प्रवृत्तीचे दर्शन घडविणारी कादंबरी आहे. या 'मसालेदार गेस्ट हाऊस' मध्ये नीती, अनीतीच्या कल्पना सहज झुगारून दिल्या आहेत. लेखकाने येथे राहणाऱ्या व्यक्तींचे चित्रण खुमसदारपणे केले आहे. तर 'घुसमट' या कादंबरीत भीमसेन देठे यांनी व्यवसायानिमित्त मुंबई शहरामध्ये वास्तवास आल्यानंतर त्यांना आलेले अनुभव कादंबरीत चित्रित केलेले आहेत. एका सामान्य व्यक्तीच्या जीवनामध्ये आलेल्या बऱ्या वाईट प्रसंगाचे भावनिक उलथापालथीचे, ताणतणावाचे चित्रण या कादंबरीत केले आहे.

बा. स. हाटे यांनी 'भोगवटा' या कादंबरीतून आदिम काळापासून स्त्रीच्या वाट्याला येणाऱ्या दुःखाचे अनुभव मांडले आहेत. स्त्रीच्या वाट्याला अनेक भोगवटे आले त्यात बहुजन समाजातील स्त्री तर भरडली गेली. बहुजन स्त्रीला तर अस्तित्वच नाही हेच भोगवटा कादंबरी दाखवून देते. 'नाक्षारी' या कादंबरीत उत्तम बंडू तुपे यांनी स्त्रीचे सौंदर्य हा तिला मिळालेला शाप आहे. तिला मिळालेले सौंदर्य स्त्री जीवनाला उद्‌ध्वस्त करून टाकते. नामदेव व्हटकर यांनी 'अपराधी' १९४३ मध्ये कादंबरी लिहिली तर 'सोळाशिनगार' ही १९६८ मध्ये लिहिली या दोन्ही कादंबऱ्यामध्ये शोषित आणि उपेक्षितांच्या जीवनाचे चित्रण आलेले दिसते. त्यांच्या अपराधी या कादंबरीमध्ये अनाथ

मुलाच्या शोषणाच्या संदर्भातील कथानक आलेले आहे. 'सोळाशिनगार' मध्ये तमाशातील उपेक्षित जीवनाचे चित्रण आलेले आहे.

**७. संकीर्ण स्वरूपाची दलित कादंबरी :**

दलित कादंबरी प्रामुख्याने जीवनवेधी शोषणसुसंबंध आणि आयुष्यातील सांस्कृतिक सुसंगती विसंगतीच्या रेट्यातून आकाराला आली आहे. विशेषत्वाने बांधिलकीचा अंगीकार करणारी ही कादंबरी आहे. वास्तविक कोणत्याही साहित्याला कप्पेबंद करणे म्हणंजे लेखक आणि साहित्यकृतीला हानी पोहचविण्यासारखेच आहे. तरीही अभ्यास विषय चांगल्या पद्धतीने हाताळता यावा म्हणून अशा प्रकारचे वर्गीकरण आवश्यक असते. यामध्ये शंकरराव खरात यांची 'बन्याची दिंडी', उत्तम बंडू तुपे यांची लांबलेल्या 'सावल्या', 'चिपाड', 'इजाळ', उत्तम कांबळे यांची 'अस्वस्थ नायक', बाबुराव बागुलांची 'पावशा', 'पाषाण', बळवंत कांबळे यांची 'जोगव्याचे दिवस', शशिकांत तासगावकर यांची 'घराणं तमासगिराचं' आणि बी. रंगाराव यांची 'सोमां' या कादंबऱ्यांचा संकीर्ण कादंबऱ्यामध्ये समावेश केलेला आहे.

दलित समाजातील गुन्हेगार तरूणाची परिस्थितीशी टक्कर घेत चांगले करण्याची धडपड दिसून येते. कोणतीही व्यक्ती जन्मतः गुन्हेगार म्हणून जन्माला येत नसते तर त्या व्यक्तीला येथील समाज आणि परिस्थिती गुन्हेगार बनविते हे शंकरराव खरात यांच्या बन्याची दिंडी या कादंबरीतून स्पष्ट होताना दिसते. या कादंबरीत गुन्हेगार त्यांचा संघर्ष पांढरपेशा समाज व त्यांचे दुटप्पी धोरण, पोलीस खाते यांचा आडमुठा कारभार, नेता साधुसंत आणि समाज, समाजसेवक यांचा ढोंगीपणा या सगळ्यांच्या दांभिकतेचा स्फोट लेखकाने केला आहे.

'लांबलेल्या सावल्या' या कादंबरीमध्ये ग्रामीण भागातील एका शेतकरी कुटुंबातील मुलगा स्वकर्तृत्वाने विधानसभेची निवडणूक लढून आमदार बनतो. लहानपणापासून बुर्जगांकडून मिळालेले अनुभव गाठीशी बांधून त्यातून शहाणा होतो व स्वतःची प्रगती करतो. प्रस्तुत कादंबरीत ग्रामीण भागातील, खेड्यातली शेतकरी कुटुंबातली मुले जर जिद्द, चिकाटी आणि प्रयत्नांची पराकाष्ठा केली तर उच्चपदस्थ होऊ शकतात हेच कादंबरी सुचविते. मचिपाडफ या कादंबरीतून एका खेड्यातील तरूणाची मुंबईमध्ये नोकरी शोधताना होणारी फरफट दाखविली आहे. शहरातील धकाधुकीचे जीवन हरएक कामाला लागणारा पैसा, तुटपुंजा पगार, आईवडिलांची पैशाची सतत मागणी या सर्व बाबींमुळे प्रस्तुत कादंबरीचा नायक हैराण कसा झाला

आहे याचे चित्रण येथे केले आहे. शहर व खेडे आणि वास्तवदर्शन याचे प्रत्यकारी दर्शन ही कादंबरी घडविते.

'इजाळ' या कादंबरीमधून सर्वांकडून शेतकरी कसा शोषला जातो. ज्या शेतकऱ्याच्या कष्टावर देशातील सर्व जनता अवलंबून असते तोच शेतकरी मात्र दुर्लक्षित केला जातो. देशाला स्वातंत्र्य मिळून जवळ जवळ ६२ वर्षे लोटली देशाच्या औद्योगिक क्षेत्रामध्ये प्रगती झाली खेड्यातला शेतकरी वर्ग नोकरीच्या शोधार्थ शहराकडे आला पण खेड्यांची मात्र सुधारणा झाली नाही व खेडी ओस पडली. यांत्रिकीकरण आले खेड्यातला श्रीमंत शेतकरी भांडवलदार झाला परंतु शेतमजुराच्या जीवनात कोणताच फेरबदल झाला नाही. नव-नवीन असे शास्त्रीय शोध लागले याचा शेतकरी आणि त्याच्या जीवनावर झालेला परिणाम या कादंबरीत चित्रित केला आहे.

बी. रंगराव यांच्या 'सोमा' या कादंबरीत लहान मुलाच्या मनावर झालेला परिणाम किंवा आघात आणि त्यातून त्याच्या हातून घडलेला अपघात याचे वर्णन केले आहे. लहान वय हे संस्कारक्षम असते याच व यात मुलांवर चांगले संस्कार होणे ही काळाची गरज असते तरच ते मूल उत्तम नागरिक बनते. मूल घडावे यासाठी पालकांनी जागरूक असणे गरजेचे आहे. मुलाचे आईवर उत्कट प्रेम असते या प्रेमात आलेला अडसर त्याला खपत नाही. सोमा या किशोरवयीन व्यक्तीच्या जीवनात हेच घडले आहे. परंतु त्याच्याकडून बाल वयातच गुन्हा घडतो पण रिमांडहोम मध्येच त्याच्यावर काही चांगले संस्कार होऊन त्याच्या जीवनाला कशी कलाटणी मिळते हेच मसोमाफ कादंबरी स्पष्ट करते.

'पावशा' कादंबरीमध्ये बागुलांनी महार समाजातील मानसिक द्वद्वांचे चित्रण केले आहे. पुनर्जन्मासारख्या अंधश्रद्धेला महत्व देऊन मानसिक दुर्बलता व्यक्त केली आहे. 'पाषाण' या कादंबरीत बाबुराव बागुलांनी विषमतावादी समाजरचनेतून निर्माण होणाऱ्या संघर्षाचे चित्रण केले आहे. सार्वजनिक विहिरीवर पाणी भरण्यावरून निर्माण होणारा दलित-सवर्णामधील संघर्ष चित्रित केला आहे.

'अस्वस्थ नायक' या कादंबरीमध्ये उत्तम कांबळे यांनी ३० व्या शतकाच्या उत्तरार्धातील नायक चित्रित केला आहे. सध्याच्या खाउजाच्या युगात नुसते पदवीधर असून चालत नाही तर व्यावसायिक शिक्षणही घेणे काळाची गरज ठरते. एवढे असूनही स्वावलंबी जीवन जगता येत नाही कारण अफाट लोकसंख्या जातियता वशिलेबाजी यामुळे प्रस्तुत कादंबरीचा नायक प्रशांत याची फरफट होते याचे चित्रण प्रस्तुत कादंबरीत घडताना दिसते.

'घराणं तमासगीराचं' ही शशिकांत तासगांवकरांची कादंबरी आहे. या कादंबरीत परशुराम सदू महार हे लेखकाचे पंजोबा यांची मुले नामांकित तमासगीर होतात. पठ्ठे बापूराव यांनाही पठ्ठे शिवा शह देतात परंतु सगळे तमासगिर पट्टीचे दाःडे असल्याकारणाने त्यांची कुटुंबात अवहेलना होते. प्रस्तुत कादंबरीत तमाशा कलेचा अनुभव सिद्ध तपशील आणि बारकावे यातून सादर केले आहेत.

'जोगव्याचे दिवस' ही बळवंत कांबळे यांची आत्मचरित्रात्मक पद्धतीची कादंबरी आहे. लेखक आणि त्याचे वडील आई आजी कसे जगले जोगत्याचे घर त्या घराला महार भाऊबंदाकडून, सवर्णांकडून मिळणारी वागणूक व त्यातून येणाऱ्या असंख्य अडचणी यांचे वास्तवदर्शी चित्रण केले आहे. खरे तर आपल्या कुटुंबाची कहाणी मात्र प्रामाणिकपणे वास्तवपणे कांबळेंनी मांडली आहे.

संकीर्ण स्वरूपाच्या कादंबरीमध्ये सर्वच लेखकांनी दलित समाजाला संघर्षमय परिस्थितीला कसे सामोरे जावे लागते याचे चित्रण केले आहे. एकूणच अशा प्रकारच्या लेखनाने एक प्रकारे समग्र मराठी कादंबरी अधिक सकस होण्यास मदतच झाली आहे असे म्हणावे लागेल.

# आंबेडकरवादी कवितेची समीक्षा

प्रा. डॉ. धनंजय वाघमारे

यशवंत मनोहरांनी सुरुवातीच्या काळामध्ये काव्यलेखन केले. त्याचबरोबर काव्यसमीक्षाही केलेली आहे. आंबेडकरवादी हा शब्द नव्याने आला. तत्पूर्वी 'दलित' ह्या प्रचलित शब्दानेच 'दलित साहित्य' ओळखले जायचे. मनोहरांनी त्यांच्या 'स्वाद आणि चिकित्सा' धनंजय प्रकाशन, नागपूर, १९७८ ह्या समीक्षा ग्रंथामध्ये पहिल्यांदा दलित काव्याची समीक्षा केल्याचे आढळते. 'वामन निबांळकरांच्या कवितेच्या निमित्ताने' या लेखाच्याद्वारे मनोहरांनी निबांळकरांच्या कवितेची चिकित्सा केलेली आहे. हा लेख यापूर्वीच वामन निंबाळकरांच्या 'गावकुसाबाहेरील कविताः आस्वाद आणि समीक्षा' ह्या समीक्षाग्रंथामध्ये आलेला आहे. ''वामन निंबाळकर दलित कवींमधील महत्त्वाचे कवी आहेत. त्यांची 'गावकुसाबाहेरील कविता' या त्यांच्या संग्रहात या कवीला आपल्या प्रतिभेचे प्रत्यक्ष काळीज-भेटलेले आहे. निंबाळकरांची मनस्वी कविता खऱ्या अर्थाने युद्धस्वी आहे; आणि स्वभावतःच ती समाजमनस्क आहे. या जगात ईश्वर, आत्मा, कर्मविपाक, अस्पृश्यता, वर्ण, वर्ग, या चमत्कार न मानणाऱ्या खऱ्याच आणि साऱ्याच मानवतावाद्यांच्या समाज मनस्क आणि युद्धमनस्क जीवन स्वप्नाला त्यांच्या कवितेने आपली निष्ठा म्हणून आपले श्रेयस म्हणून स्वीकारलेले आहे.''(स्वाद आणि चिकित्सा, पृष्ठ, ८९)

अशा प्रकारे वामन निंबाळकरांची कविता समाजमनस्क व युद्धस्वी कविता आहे. हेच मनोहरांना येथे सांगावयाचे आहे. पुढे मनोहरांनी या कवितेला विद्रोहाचे वादळ घेऊन येणारी कविता आहे असेही म्हटले आहे. बाळकृष्ण कवठेकरांनी वामन निंबाळकरांच्या कवितेची केलेली चिकित्सा अधिक मौलिक वाटते. बाळकृष्ण कवठेकर ह्या कवितेसबंधी म्हणतात, ''दारिद्र्याची जीवघेणी रूपे आणि तज्जन्य दुःखाचे व्याकूळ करून टाकणारे दशावतार निंबाळकरांच्या कवितेतून जागोजाग साकार झाले आहेत. दारिद्र्य,

दैन्य, दुःख, अस्पृश्यता या साऱ्यांनी पोळून गेलेल्या मनाचे आर्त आक्रंदन हा त्यांच्या कवितेचा (आणि खराखुरा) सूर आहे. आवेशापेक्षा हळुवारपणा, संतापापेक्षा आर्तपणा, प्रतिक्रियात्मक प्रहारापेक्षा दुःखार्द्र आत्माविष्करण आणि नकार, गर्जनेपेक्षा आशावादाचे कोमल स्वप्न चित्रण हीच निंबाळकरांच्या कवितेची खरीखुरी प्रकृती असल्याचे सतत जाणवते.''[१]

बाळकृष्ण कवठेकरांनी केलेली वामन निंबाळकरांच्या कवितेची चिकित्सा अधिक सूक्ष्म आहे, असे वाटते. 'स्वाद आणि चिकित्सा' याच समीक्षा ग्रंथामध्ये शेवटच्या भागामध्ये मनोहरांनी 'दलित कवितेचे निराळेपण' या लेखाद्वारे दलित कवितेची समीक्षा केलेली आहे. तिचा विचार येथे प्रस्तुत ठरतो. या लेखामध्ये त्यांनी दलित कविता प्रस्थापित कवितेपेक्षा कशी वेगळी ठरते याचे विवेचन केलेले आहे. जाणिवेच्या बाबतीत दलित कविता प्रस्थापित मराठी कवितेपेक्षा वेगळी ठरते. मराठी कवितेने कधीही वर्णविग्रहाला हात घातला नाही. पहिल्यांदा दलित कविताच ह्या प्रश्नाला भिडली. अशा पुष्कळ बाबतीत दलित कविता ही मराठी कवितेपेक्षा वेगळी ठरते. हा वेगळेपणा सांगतानाच यशवंत मनोहर दलित कवितेची वैशिष्ट्ये इथे सांगून जातात. मनोहर म्हणतात, ''दलित कविता मानवी सभ्यतेच्या सर्जनाची, शीलनिर्मितीची कविता आहे. दलित कविता इहजीवनाच्या आकृतिबंधाची सर्जना ध्येयवाक्य मानते. घाटाचा ती विचार करीत नाही. या कवितेत घाट साध्य म्हणून येत नाही. फलश्रुती म्हणून येतो. दलित कवितेची जाणीव मराठी कवितेत अपूर्व आहे. ती मानवाला केंद्र कल्पिणारी, इह-भौतिकवादी, निरीश्वरवादी, न्यायवादी अशी जाणीव आहे.''(स्वाद आणि चिकित्सा, पृष्ठ ९९)

अशा प्रकारे मनोहर दलित कवितेची चिकित्सा करताना दिसतात. ही चिकित्सा व्यापक स्वरूपाची आहे असे मला वाटते. यशवंत मनोहरांनी 'आंबेडकरवादी मराठी साहित्य' या समीक्षाग्रंथामध्ये आंबेडकरवादी कवितेची समीक्षा केलेली असून सदर समीक्षा ग्रंथ भीमरत्न प्रकाशन, नागपूर यांनी १९९९ साली प्रकाशित केलेला आहे. या समीक्षा ग्रंथातील आंबेडकरवादी कवितेची समीक्षा येथे अभ्यासावयाची आहे. यापूर्वी मनोहरांनी दलित हा शब्द 'दलित' साहित्यासाठी वापरला आहे. पुढे त्यांच्या भूमिकेमध्ये बदल होत गेलेला दिसतो. ते आता दलित साहित्य ही संकल्पना नाकारून 'आंबेडकरवादी साहित्य' ही संकल्पना किंवा नामाभिधान दलित साहित्याला वापरतात. त्यामुळे यापूर्वीच्या त्यांच्या काव्यसमीक्षेमध्ये दलित कविता हा शब्द वारंवार येतो पण त्यानंतर त्यांनी त्याबदल्यात 'आंबेडकरवादी कविता'

म्हणून येथे स्वीकार केला आहे. आंबेडकरवादी कवितेची चिकित्सा करताना मनोहरांनी तिचे वेगळेपण येथे सांगितलेले आहे. या कवितेचे वेगळेपण सांगताना मनोहर म्हणतात, ''आंबेडकरवादी कवितेने नव्या माणसाच्या आणि समाजाच्या निर्मितीकडे पाठ फिरवून बसलेल्या, अभिजनांच्या भावनांच्या आणि शब्दांच्या वांझोट्या देखणेपणाला विघातक ठरवले. तिच्यातील पलायनवादाला, लैंगिकतेच्या मादक अभिव्यक्तीला, नियतिवादाला आणि निराशवादाला, स्थितिवादाला आंबेडकरवादी कवितेने तीव्र-संतप्त शब्दातून निषेधिले.''(आंबेडकरवादी मराठी साहित्य, पृष्ठ,१७२)

अशा प्रकारे मनोहरांनी आंबेडकरवादी कवितेचे वेगळेपण येथे विशद केलेले आहे. तसेच प्रस्थापित मराठी कवितेच्या मर्यादाही त्यांनी येथे व्यक्त केल्याचे जाणवते. आंबेडकरवादी काव्याची समीक्षा करताना मनोहरांनी तीन विभाग पाडलेले आहेत. पहिल्या विभागात पहिल्या पिढीची कविता त्यांनी विचारात घेतलेली आहे. यामध्ये अण्णाभाऊ साठे, बाबुराव बागूल, वामन निंबाळकर, नामदेव ढसाळ, यशवंत मनोहर, दया पवार, इ. कवींच्या कवितेची समीक्षा ते करताना दिसतात. दुसऱ्या विभागामध्ये मनोहरांनी दलित कवयित्रींच्या कवितेची समीक्षा केलेली आहे. यामध्ये सुगंधा शेंडे, हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार, सुरेखा भगत, प्रज्ञा लोखंडे, उषा किरण आत्राम, कुसुम अलाम, अशा कवयित्रींच्या काव्याची समीक्षा केलेली आढळते. तिसऱ्या व शेवटच्या विभागामध्ये दुसऱ्या पिढीची आंबेडकरवादी कविता या शीर्षकाखाली मनोहरांनी प्रकाश जाधव, भाऊ पंचभाई, लोकनाथ यशवंत, भुजंग मेश्राम, अरुण काळे, केतन पिंपळापुरे, महेंद्र भवरे, जावेद कुरेशी इ.च्या कवितांची समीक्षा केलेली आढळते. अर्थात ही सर्व आस्वादक समीक्षा आहे. पण एक गोष्ट नव्याने येथे आली आणि ती म्हणजे जाणिवांच्या बाबतीत घडलेले स्थित्यंतर. आंबेडकरवादी कवितेत मनोहरांनी आंबेडकरांना प्रमाण मानणाऱ्याच लोकांची, कवींची निवड केलेली आहे. हे विशेष. या काव्यसमीक्षेचा विचारपुढील प्रमाणे आहे.

पहिल्या गटात अण्णाभाऊंच्या काव्याची समीक्षा मनोहरांनी केली आहे. अण्णाभाऊंचे जीवन म्हणजे जळता अंगार आहे. एकाच वेळी मार्क्स आणि आंबेडकरांच्या जाणिवा पोटात वागवित त्यांची शाहिरी कविता साकार होताना दिसते. त्यांच्या कवितेवर मनोहर भाष्य करतात, ''ही कविता जग बदलण्याचे सुंदर धारदार हत्यार झाली आहे. प्रारंभापासूनच जीवन आणि काव्य यांच्यातील सेंद्रियत्वाचा सुरम्य आविष्कार आंबेडकरवादी कविता करीत आहे. अण्णाभाऊंच्या काव्यातून ही बाब लक्षात येते.''(आंबेडकरवादी मराठी

साहित्य, पृष्ठ १७२) अण्णाभाऊंच्या जीवनजाणिवा मनोहर येथे व्यक्त करून जातात. हे अत्यंत मौलिक आहे असे वाटते. मनोहरांनी यानंतर बाबुराव बागुलांच्या काव्याची समीक्षा केली आहे. आंबेडकरवादी कवितेला निश्चित दिशा देणारे, एक तात्त्विक व्यक्तिमत्त्व देणारे कवी म्हणजे बाबुराव बागूल. बागुलांच्या कवितेची चिकित्सा करताना मनोहर म्हणतात, ''बाबुराव बागूल यांनी आंबेडकरवादी कवितेचे महाद्वार प्रकाशाच्या दिशेने आणि सूर्याच्या ध्येयाने उघडून दिले. मित्र कोण? शत्रू कोण? काय नाकारायचे? काय स्वीकारायचे? या सर्वच प्रश्नांच्या संदर्भात बाबुराव बागूल हे आंबेडकरी दर्शनसूत्रांचा एकनिष्ठपणे पाठपुरावा करतात (आंबेडकरवादी मराठी साहित्य ....पृष्ठ १७७)

अशा प्रकारे बागुलांच्या कवितेचे वेगळेपण मनोहर येथे सांगून जातात. ते मार्मिक आहे असे संशोधकाला वाटते. वामन निंबाळकरांच्या कवितेची समीक्षा करताना मनोहरांनी 'गावकुसाबाहेरील कविता' आणि 'महायुद्ध' यातील कवितांची निवड केलेली आहे. या कवितांवर भाष्य करतांना मनोहर म्हणतात, ''गावकुसाबाहेरील कविता' मध्ये यातनांचा तपशील आहे. दु:खाची पर्वे आहेत. क्रांती करून या सर्व माणसांना दु:ख मुक्त केले पाहिजे ही तगमग आहे, पण आंबेडकरवादी जीवन दृष्टीची निश्चिती 'महायुद्ध' मध्ये आहे. आंबेडकरवादी दार्शनिक स्पष्टता इथे कवीने स्वत:शी करून घेतली आहे. त्यांच्या कवितेतील सामाजिक जाणिवेची खोली वाढत आहे. एक परिपक्व आणि समृद्ध मन या कवितेतून आविष्कृत होऊ लागले आहे.'' (आंबेडकरवादी मराठी साहित्य... पृष्ठ १७९)

वामन निंबाळकरांच्या सामाजिक कवितेचा मनोहर येथे वेध घेतात. तसेच आंबेडकरवादी जीवनदृष्टीचा विचार मांडतात. जो महायुद्ध मध्ये पहिल्यांदा आला आहे. नामदेव ढसाळांच्या कवितेची समीक्षा करताना मनोहर म्हणतात, ''ढसाळ आपल्या अनुभवाचे बोल बोलतात. स्वत:चे आक्रदंन मांडतात. त्यांची कविता गद्य होत नाही. या कवितेत विखार, दु:ख, राग, वंचना या गोष्टी आहेतच, पण शिव्या, लैंगिक शब्द या गोष्टी तिच्यात धिटाईने येतात.'' (आंबेडकरवादी मराठी साहित्य .... पृष्ठ १७९). मनोहरांनी ढसाळांच्या गुणांबरोबरच त्यांच्या मर्यादाही सांगितलेल्या आहेत. दया पवारांच्या कवितेची समीक्षा मनोहर खोलात जाऊन करतात. चांगभलं, लोणी, पायरी, महाकवी, स्वातंत्र्य देवतेचा पुतळा या कविता आधाराला घेऊन मनोहर चिकित्सा करतात ते म्हणतात, ''पवारांच्या शब्दकलेत लालित्याचा आणि गेयतेचा लळा आहे. या भाषेला माधुर्याचे मन आणि देह आहे. दया

पवार या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा ठसा या भाषेवर उमटलेला आहे. पण या सर्व काव्यातून प्रगल्भ, समृद्ध आणि संयत भावविश्व मांडणारा हा कवी मूल्यनिष्ठा आणि बांधिलकीचे सुंदर अग्निध्वज आपल्या पुढे उभा करून ठेवतो.'' (आंबेडकवादी मराठी साहित्य ...पृष्ठ१८७).

अशा प्रकारे मनोहरांनी पहिल्या भागामध्ये खऱ्या आंबेडकरी जाणिवेच्या कवींच्या काव्याची समीक्षा केलेली दिसते. या नंतर आंबेडकरवादी कवयित्रींच्या काव्याची समीक्षा केलेली दिसते. हिरा बनसोडे यांच्या कवितेची समीक्षा करताना मनोहर त्यांच्या 'पौर्णिमा' आणि 'फिर्याद' या दोन काव्यसंग्रहांचा उल्लेख करतात. पृष्ठ १९२ वर ते ह्या कवितेबाबत भाष्य करताना म्हणतात, ''हिराबाईंची कविता आंबेडकरवादी कवितेतील जाणीव संपन्न आणि प्रगल्भ कविता आहे. ज्योती लांजेवार, प्रज्ञा लोखंडे, सुरेखा भगत यांच्या काव्याचा धावता आढावा मनोहरांनी येथे घेतलेला आहे.'' प्रज्ञा लोखंडेंच्या कवितेवर भाष्य करताना मनोहर म्हणतात, ''प्रज्ञा लोखंडेंची कविता अतिशय प्रगल्भ आहे. शांत आहे. ती एकसुरी होत नाही. पण आंबेडकर सूत्रेही सोडीत नाही. हे या कवितेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.''(आंबेडकरवादी मराठी साहित्य ...पृष्ठ ९४).

प्रज्ञा लोखंडेच्या काव्याची वैशिष्ट्ये मनोहरांनी येथे सांगितलेली आहेत व ती मूलभूत स्वरूपातील चिकित्सा ठरते. उषा किरण आत्रामांच्या कवितेचे मोठेपण सांगताना मनोहर अभिमानाने म्हणतात की, '''उषाकिरण आत्राम' हा आदिवासी बंधू-भगिनींचा हजारो वर्षांचे अंधाराचे कवच फोडून बाहेर पडलेला पहिला हुंकार आहे. आदिवासींच्या हजारो वर्षांच्या अत्याचारी अंधारातला विद्रोही किरण म्हणजे उषाकिरण आत्रामची कविता होय.''(आंबेडकरवादी मराठी साहित्य ...पृष्ठ २००).

मनोहरांनी दलित कवयित्रींच्या अर्थात आंबेडकरवादी कवयित्रींच्या काव्याची थोडक्यात चिकित्सा येथे केलेली दिसते व ती मूलगामी स्वरूपाची आहे. यानंतर मनोहरांनी शेवटच्या भागामध्ये मदुसऱ्या पिढीची आंबेडकरवादी कविताफ या शीर्षकाखाली काही नवोदित कवींच्या काव्याची समीक्षा केलेली आहे. प्रकाश जाधव यांच्या 'दस्तखत' ह्या काव्यसंग्रहातील कवितेचा विचार करताना मनोहरांनी महानगरीय पर्यावरणाचा विचार येथे केलेला आढळतो. प्रकाश जाधवांची कविता महानगरी जाणिवेची आंबेडकरवादी कविता आहे. या संदर्भात मनोहर म्हणतात, ''प्रकाश जाधव हे मुंबई महानगराच्या वाङ्मयीन आणि सामाजिक सांस्कृतिक पर्यावरणाचा भाग आहेत, आणि या पर्यावरणाचा भाषेसकट तपशील त्यांच्या काव्यात येतो. अर्थात या महानगरीय

जनसामान्यांच्या यातनांशी कवीची बांधिलकी आहे. या यातना समाज संस्थेच्या पोटी जन्माला येतात.'' (आंबेडकरवादी मराठी साहित्य...पृष्ठ २०४).

अशा प्रकारे मनोहर येथे प्रकाश जाधवांच्या काव्याची चिकित्सा करताना दिसतात. महानगरीय जाणिवांचा वेध प्रकाश जाधवांनी कसा अचूकपणे घेतला आहे हे मनोहर सांगताना दिसतात. 'हुंकार वादळांचे' हा भाऊ पंचभाई यांचा काव्यसंग्रह. ह्या संग्रहामधील कविता आंबेडकरांना आपला प्राण मानते. मनोहर कवितेची चिकित्सा करताना म्हणतात, ''पंचभाईची कविता ही स्पष्टपणे आंबेडकरवादी जीवनदृष्टीचे काव्यपूर्ण भाषांतर करते आणि आंबेडकरवादाला कोणी विकृत करू लागले की या कवीचा जीव संतापतो. त्यांच्या काव्याला लोक काव्याचे सौंदर्य आहे आणि ढंगदार गेयतेचे माधुर्य आहे.''(आंबेडकरवादी मराठी साहित्य ...पृ.२०८) अशा प्रकारे मनोहर भाऊ पंचभाईंच्या कवितेची सुंदर अशी चिकित्सा करताना येथे दिसतात. लोकनाथ यशवंताच्या कवितेची चिकित्सा करताना मनोहरांनी त्यांच्या 'आता होऊन जाऊ द्या', आणि 'आणि शेवटी काय झाले?' या दोन काव्यसंग्रहातील कविता विचारार्थ घेतलेल्या आहेत. ह्या कवितेची वैशिष्ट्ये सांगताना मनोहर म्हणतात, ''भोवतीच्या वास्तवाचे एक अत्यंत भेदक, अत्यंत जीवघेणे स्वरूप कवीने आपल्या दोन्ही कवितासंग्रहामधून मांडलेले आहे. हे वास्तव पराकोटीचे कुरूप झाले आहे. विसंगतींनी, ढोंगांनी आणि दंभांनी हे वास्तव बिनधास्त मोहरून आलेले आहे. हे वास्तव जीवन विरोधी आणि सौंदर्यमादक वास्तव आहे.''(आंबेडकरवादी मराठी साहित्य...पृ.२०८).

लोकनाथ यशवंतांची कविताही अशी प्रखर वास्तववादी कविता आहे. भयाण वास्तव समोर ठेवणारी ही कविता मनोहरांना महत्त्वाची वाटते. यानंतर मनोहरांनी अरूण काळे, भुजंग मेश्राम, केतन पिंपळापुरे, जावेद कुरेशी यांच्या कवितेचा धावता आढावा येथे घेतलेला आहे. तो मला महत्त्वाचा वाटत नाही. एकंदर मनोहरांची आंबेडकरवादी काव्य समीक्षा ही अतिशय मौलिक स्वरूपातील आहे. तसेच ती मूलगामी, सूक्ष्म पातळीवरून केली गेल्याचे येथे सहजच जाणवते.

# भगवान गौतमबुद्धांच्या विचारधारेतून आविष्कृत झालेले वैचारिक लेखन

डॉ. श्रीप्रकाश वाघमारे

भगवान गौतम बुद्धांच्या जनकल्याणाच्या विचारधारेचा अनेक विचारवंतावर प्रभाव पडलेला आहे. प्रस्तुत संशोधन विषयात काही प्रातिनिधिक विचारवंतांचा विचार केला आहे. गोपाळ गणेश आगरकर, लोकहितवादी, वि.रा. शिंदे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, ताराबाई शिंदे, महात्मा फुले, साने गुरुजी या विचारवंतानी बुद्ध तत्त्वज्ञानातून आविष्कृत झालेली मानवतावादाची मूल्ये अंगीकारली आहेत. प्रज्ञा, शील, करुणा, सदाचरण, अहिंसा, स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव, मानवतावाद आणि विज्ञाननिष्ठा या विचारमूल्यांना प्रमाण मानून जनकल्याणासाठी आपली लेखणी झिजवली. बुद्ध विचार समाजात रुजविण्याचे प्रभावी कार्य उपरोक्त विचारवंतांनी केलेले आहे. आजच्या युवा पिढीवर स्वातंत्र्य, समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता, बुद्धिप्रामाण्यवाद व विज्ञाननिष्ठा या मूल्यांचा संस्कार व्हावा आणि भारतीय सामाजिक प्रबोधनाची चळवळ गतिमान व्हावी, स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित व्हावी, स्त्री-मुक्तीचा उद्‌घोष व्हावा हा उद्देश या विचारवंताच्या वैचारिक लेखनातून ध्वनित होतो आहे.

**लोकहितवादी :**

गोपाळ हरी देशमुख यांचा जन्म पुणे येथे १८ फेब्रुवारी १८२३ रोजी झाला. महाराष्ट्रात अनेक थोर समाजसुधारक होऊन गेले. त्यापैकी आद्य समाजसुधारक व थोर विचारवंत म्हणून लोकहितवादींचे नाव घेतले जाते. लोकहितवादींनी 'शतपत्रे' मधून समाजजागृतीचे प्रभावी कार्य केले आहे. समाजजागृतीसाठी आपल्या लेखणीचा आणि वाणीचा सतत उपयोग करणारा लोकहितवादी सारखा लोकाभिमुख साहित्यिक आणि विचारवंत त्यांच्या कालखंडात तरी प्रामुख्याने लोकहितवादी हेच आहेत. महात्मा फुले,

आगरकर, रानडे इ. विचारवंत त्यांच्यानंतर सार्वजनिक जीवनात झाले आहेत. म्हणूनच लोकहितवादी महाराष्ट्राचे आद्य प्रबोधनकार असल्याचे मान्य करावेच लागेल. लोकहितवादींनी 'शतपत्रे' मधील पत्र क्र. ९१ मध्ये म्हटले आहे. 'देवळे नको नवी पुस्तके छापा' या पत्रात ते म्हणतात, 'जे पुस्तके लिहितील व लोकांस शहाणे करण्यास मेहनत करतील, जे वर्तमानपत्रे व ग्रंथ इत्यादी उपयोगी वस्तू छापून प्रकट करतील, त्यांस तुम्ही मोठे विद्वान व लोकांचे हितकर्ते समजून त्यांस सलाम जाणून धर्म करा. त्यांचे ग्रंथ घेऊन लोकांमध्ये वाटा व हीच वचने समजा, तीच संक्रांतीची तीळपात्रे, श्रावणीची दीपदाने, माघस्नानाची संपूर्ण, चातुर्मासाची संपूर्णे व तुळशी आणि लाखोल्या त्याच समजा. ज्ञानवृद्धीत पुण्य आहे असे माना.... मरते समयी देऊळ बांधावयास सांगू नका. पण नवे छापखाने व नवी पुस्तके करण्यास सांगा, देवळे पुष्कळ आहेत तितकी पुरेत.'[१]

देवळे बांधण्यापेक्षा छापखाने काढावेत आणि नवी पुस्तके करावीत या विचारात बंडखोरी आहे. ज्ञानाची तहान आहे. 'आहेत तितकी देवळे पुरेत' हे म्हणताना या उद्‌गारांमागे नव्या समाजाची रचना करण्यासाठी देवळांचा उपयोग होणार नाही ही विचारसरणी आहे. याप्रकारचे विचार एकोणिसाव्या शतकात लोकहितवादी म्हणजेच गोपाळराव अभिनिवेशाने मांडत होते.' 'देऊळ नको' हा विचार श्रद्धेपेक्षा ज्ञान अधिक उपयुक्त असते हे सांगणारा आहे. मंदिरात पूजाअर्चा वगैरे नित्याची कर्मकांडे होतात. छापखान्यातून निर्माण होणारी नवीन पुस्तके ज्ञान प्रसाराचे कार्य करतात. गोपाळराव आस्तिक होते, पण ते अंधश्रद्धाळू नव्हते. दीडशे वर्षांपूर्वी त्यांनी देवभोळेपणावर आणि कर्मकांडावर प्रहार केले. यात त्यांचे बंडखोर धैर्य दिसून येते. समाजाच्या मनाला ताजे टवटवीत, प्रगतिकारक विचार विद्वानांनी दिले पाहिजेत. लेखकाने आणि विचारवंताने निरर्थक रूढी आणि भाकड श्रद्धा यांच्यावर विचारपूर्वक आघात केले पाहिजेत. घडवणाऱ्याला काही जुने मोडावे लागते. म्हणूनच गोपाळराव हे प्रबोधन युगाचे एक रचनाकार ठरतात.

'शतपत्रा' सारखा हिंदू समाजाच्या अधोगतीची इतकी कठोर, इतकी विदारक चिकित्सा करणारा दुसरा ग्रंथ मराठीत नाही; 'शतपत्रे' हे सामाजिक रोगांवर प्रहार करणारे धारदार शस्त्र आहे. ज्याला लोकहित साधायचे आहे; त्याने गुळगुळीत लिहून वा बोलून उपयोग होत नाही. गुळगुळीत कागद आणि त्यावर लिहिलेले बुळबुळीत शब्द समाजपरिवर्तनाच्या दृष्टीने निरुपयोगी असतात. लोकहितवादींची 'शतपत्रे' वाचकांच्या मनावर खोल परिणाम

करतात. 'शतपत्रां'तील भाषा प्रबोधन करण्यासाठी अगदी अचूक आहे. एकेक लेख म्हणजे आसूडाचा एकेक फटका आहे.

लोकहितवादींनी आपल्या लेखनातून ग्रंथप्रामाण्याला विरोध केलेला दिसून येतो. 'शतपत्रां'तील ७० क्रमाकांच्या पत्रात लोकहितवादी एक बुद्धिवादी विचार सांगतात, ते म्हणतात. "मनूचे वचन असो, याज्ञवल्क्याचे असो कोणाचे ही असो ब्रह्मदेवांचे का असेना, 'बुद्धिरेवा बलीयसी' असे आहे. शास्त्रास एकीकडे ठेवा आपली बुद्धी चालवा. विचार करून पाहा. घातक वचनावर हरताळ लावा." पुढे ते आणखी तीव्रतेने म्हणतात, "धर्मशास्त्र केवळ कायदा आहे. व्यावहारिक गोष्टी करता त्यातील एका वाक्यास हरताळ लावला म्हणून काय झाले."

बुद्धिवादाची ही घोषणा लेखकाने आत्मविश्वासाने केली आहे. आपले सगळे शास्त्रीपंडित आणि त्यांच्यामुळे सर्वसाधारण लोक पोथ्या-पुराणांच्या व जुन्या ग्रंथाच्या आहारी गेलेले असता काय करावे आणि काय करू नये याचा निर्णय जुन्या झालेल्या पोथ्या पुस्तकात पाहून करायचा हे अत्यंत अज्ञानाचे लक्षण आहे यात संशय नाही. ग्रहण कशामुळे लागते हे शास्त्र ज्ञानाने आता कळले आहे, पण अजूनही ग्रहणकाळात उपासतापास करायचे; राहुकेतूच्या तावडीतून सूर्यचंद्राची सुटका व्हावी म्हणून एखादी भाकड पोथी वाचायची; दान करायचे असले हास्यास्पद प्रकार सुशिक्षितांच्याही घरी पाहायला मिळतात. कारण विचारले तर जुन्या ग्रंथात हा विधी सांगितला आहे, ही आमची परंपरा आहे, हे अमुक आचार्याने म्हटले आहे अशी कारणे देण्यात येतात. जेव्हा शास्त्रीय ज्ञानाचा उदय झाला नव्हता, तेव्हा कुणीतरी, तथाकथित पंडिताने लिहून ठेवले म्हणून त्याचे शब्द प्रमाण मानून त्याला अनुसरून आज शेकडो वर्षांनंतरही त्याच्या आज्ञेप्रमाणे वागायचे, या गोष्टी कोणत्याही अर्थाने शहाणपणाच्या ठरत नाहीत. जीर्ण झालेल्या ग्रंथाच्या पानांवर श्रद्धा ठेवणारी माणसे बौद्धिकदृष्ट्या अपंग असतात. जुन्या लोकांच्या बुद्धीत आणि पायात बळ आले पाहिजे या विचाराने लोकहितवादींनी ग्रंथप्रामाण्याला विरोध केला आहे. मनू, याज्ञवल्क्य आणि मागील काळात होऊन गेलेले स्मृतिकार, ग्रंथकार, आचार्य हे त्या विशिष्ट काळात विद्वान म्हणून गणले गेले असतील पण काळ धावत असतो, परिस्थिती बदलत असते, नवनवीन वातावरण तयार होत असते. अशा वेळी आचारविचारांतही अपरिहार्यपणे बदल करावे लागतात.

जुनाट झालेल्या ग्रंथाचे आधार छातीशी कवटाळून ठेवण्यात कोणते औचित्य आहे? सकाळी सूर्य पूर्वेकडे होता म्हणून छत्री त्या दिशेने मस्तकावर

धरली हे योग्य आहे. पण तो पश्चिमेकडे गेल्यानंतर छत्रीचीही दिशा बदलणे आवश्यक आहे. पण बहुसंख्य लोक प्राचीन ग्रंथाचे दाखले देत असतात. याचा अर्थ स्वतंत्रपणे विचार करण्याची बुद्धी त्यांच्याजवळ नसते. ते नेहमी एखाद्या व्यक्तीवर किंवा भूतकाळातल्या ग्रंथावर अवलंबून असतात. मनुस्मृतीचा अंमल हिंदू समाजावर कित्येक शतके चालू आहे. तो एक अनुकरणीय ग्रंथ मानला जातो, पण या ग्रंथातील अनेक विचार तर्कदृष्ट आणि समाजातल्या काही स्तरांवर अन्याय करणारे आहेत. तरीही हे ग्रंथ पूज्य मानणारी भोळसर प्रवृत्ती कित्येकांच्या ठायी अन्याय करून त्यांना उपेक्षित ठरवले. त्यामुळे अनेक विचारवंतांनी या ग्रंथावर टीका करून तो ग्रंथ प्रमाण मानू नये, असे सांगितले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तर या 'स्मृतीची' जाहीरपणे होळी करून आपला निषेध व्यक्त केला. मनूच्या विचारसरणीला अनेक बंधने पडलेली होती, हे उघड झाल्यावरही मनूचे वचन शिरोधार्य मानणाऱ्यांच्या बुद्धीची कीव येते.

लोकहितवादींनी तर मनू, याज्ञवल्क्य फार काय ब्रह्मदेवालाही बाजूला सारावे आणि आपल्या बुद्धीचा कौल घ्यावा, असे स्पष्टपणे प्रतिपादन केले आहे. जे बुद्धीला पटेल तेच स्वीकारावे आणि जे बुद्धी विरोधी असेल ते पूर्णपणे नाकारावे हा संदेश ते देतात. बुद्धी हीच बलवती असते, धर्मशास्त्रातले शब्द शाश्वत नसतात, हे लक्षात घेऊन धर्मशास्त्राचे बंधन विचारपूर्वक झुगारून देण्याची भूमिका यात स्पष्ट झाली आहे. बुद्धिवादाची पहिली प्रभावी साद घालण्याचे हे रचनात्मक कार्य लोकहितवादींनी केले. त्यानंतर आगरकर, महात्मा फुले, सावरकर इत्यादी समाजसुधारकांनी बुद्धिवादाची शिकवण समाजाला दिली.

प्राचीन धर्मग्रंथाचे अनेक दृष्टांत देऊन जाती कर्मावरूनच ठरत होत्या, त्याचा जन्माशी संबंध नाही. जातिभेदामुळेच हिंदू समाज दुर्दैवी ठरला आणि त्याचा अधःपात झाला. हिंदू समाजाच्या अधःपाताचा संबंध विषमतेवर आधारलेल्या जातिसंस्थेशी त्यांनी जोडला आहे, हे बरोबरच आहे. त्यांची मते विसाव्या शतकातील विचारवंतांच्या मताशी सुसंगत आहेत. जातीय विषमतेचा धिक्कार करून जुने ग्रंथ आणि निरूपयोगी शास्त्रे याबाबतीत प्रमाण मानू नयेत असेही त्यांनी आवर्जून सांगितले.

लोकहितवादींच्या विचारांचा अभ्यास करताना बुद्धिप्रामाण्यवाद व समता या विचारांवर त्यांची नितांत श्रद्धा आढळून येते व त्यावरून असे म्हणता येईल की, लोकहितवादींवर भगवान गौतमबुद्धांच्या बुद्धिप्रामाण्यवाद व समता या विचारांचा प्रभाव अभ्यासाअंती संशोधकाला दिसून येतो. कारण

बुद्धतत्त्वज्ञानात विज्ञानवाद हा महत्त्वाचा समजला जातो व तोच धागा लोकहितवादींच्या वैचारिक लेखनातून मोठ्या प्रमाणात प्रकट होताना दिसतो.

**महात्मा फुले :**

महात्मा जोतिराव फुले यांचा जन्म १८२७ साली झाला. हिंदुस्थानातील सामाजिक गुलामगिरीच्या विरुद्ध बंड पुकारणारे, बहुजन समाजाला आत्मप्रत्यय उत्पन्न करणारे, स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या त्रयीवर नितांत श्रद्धा ठेवणारे, पुरातन काळापासून सुरू असलेल्या वहिवाटीची वाट बदलणारे शेतकरी व कामकरी यांच्या दुःखाचे व दारिद्र्याचे निवारण करण्यासाठी चळवळ उभारणारे चातुर्वर्ण्य व जातिभेद या संस्थांवर कडाडून हल्ला चढवून मानवी समानतेची घोषणा करणारे, सत्यशोधक समाजाची स्थापना करून 'सत्यमेव जयते' या दिव्य मंत्राचा निनाद करणारे, अस्पृश्य गणल्या गेलेल्या पददलितांचे पहिले उद्धारक असणारे, स्त्री शूद्राच्या उद्धार कार्याची सुरुवात करणारे, उभ्या भारतात समाजक्रांतीची तुतारी फुंकणारे, परंपरागत सामाजिक चौकट बदलून धार्मिक पिळवणूक व सामाजिक विषमता या विरुद्ध आवाज उठविणारे, धार्मिक सहिष्णुता, मानवी प्रतिष्ठा आणि मानवी समानता या मूल्यांचा उद्घोष करणारे, विराट समाजपुरुषांच्या डोळ्यात सर्वांगीण सुधारणेचे अंजन घालून त्याला जागविणारे, शब्दप्रामाण्य, जुने आचार-विचार जुन्या रूढी, कर्मकांड, जप-जाप्य, पूर्वसंचित, ईश्वरी संकेत, स्वर्ग-नरक इत्यादी कल्पना प्रस्तृत करणाऱ्या आणि मानवी कर्तृत्व दास्यशृंखलात बद्ध करून टाकणाऱ्या भोळ्या समजुतीवर सर्वप्रथम आघात करणारे, समता व मानवता यावर अधिष्ठित सामाजिक पुनर्रचनेचे निशाण हाती घेणारे महात्मा फुले म्हणजे भारतात बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी टाहो फोडणारे पहिले कर्ते सुधारक होत.

महात्मा फुले यांनी 'गुलामगिरी' (१८७३) , 'सार्वजनिक सत्यधर्म' (१८८१), 'ब्राह्मणांचे कसब' (१८६९), 'शेतकऱ्याचा आसूड', (१८८३), 'सत्सार १' (१८८५), 'सत्सार २' (१८८५), 'इशारा' (१८८५) या वैचारिक साहित्यकृतींमधून रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, देव भोळेपणा, जातीयता, वर्णव्यवस्था यांचा धिक्कार करून समाजामध्ये समता, स्वातंत्र्य, बंधुभाव निर्माण करून समाजात एक शांत, निरामय व सुखी वातावरण निर्माण करणे हे जोतिरावांच्या सामाजिक कार्याचे एक महत्त्वाचे अंग आहे. ज्ञानाची, विद्येची महती सांगताना महात्मा फुले म्हणतात, ''विद्येविना मति गेली; मतीविना नीती गेली; नीतिविना गती गेली; गतिविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.''[२] अर्थात ज्ञानाशिवाय विद्येशिवाय

समाजामध्ये परिवर्तन होणे कसे अशक्य आहे हेच उपरोक्त संदर्भातून स्पष्ट होते.

सदाचार, विवेक, न्यायप्रियता आणि सहिष्णुता ही जोतिरावांच्या जीवनाची चतु:सूत्री होती. मानवतेच्या सेवेसाठी झटणारा, सत्याच्या पालनासाठी आयुष्य वेचणारा, मनुष्याच्या सुखदु:खाचा विचार करणारा सर्वांना समभावाने वागविणारा निर्मळ, निर्दोषी, स्थिर, कनवाळू, शूर, सत्यवचनी. असा मनुष्य मानवाला भूषणभूत ठरतो अशी जोतिरावांची तत्त्वप्रणाली होती. याउलट जो मनुष्य सर्व गोष्टींसाठी अधाशीपणा दाखवितो, स्वार्थासाठी धडपड करतो, आत्मसमर्थनाची कास धरतो, सत्याचा अव्हेर करतो, सुडाची भावना हृदयात बाळगतो, धर्मासंबंधी उतावळा होऊन अविवेकाने चर्चा करतो व परपीडा हाच आपला धर्म मानतो अशा मनुष्याविषयी जोतीराव आपला मनस्वी तिटकाराही व्यक्त करतात.''[३]

उपरोक्त विवेचनातून असे स्पष्ट होते की, सदाचार, विवेक, न्यायप्रियता आणि सहिष्णुता ही जोतीरावांनी स्वीकारलेली जीवनाची चतु:सूत्री आणि मानवतावाद हा बुद्धतत्त्वज्ञानाचा गाभा आहे, तेव्हा महात्मा फुलेंवर बुद्ध तत्त्वज्ञानाचा प्रभाव आहे हे स्पष्ट होते.

महात्मा फुलेंचे सामाजिक कार्यही अनन्यसाधारण असेच आहे त्यांनी ''बालविवाहाची प्रथा, केशवपनासारख्या अनिष्ठ रूढी, बालहत्या, पुनर्विवाहाचा प्रश्न, धार्मिक रूढी, घातक सामाजिक चालीरीती व शूद्रांची सर्वांगीण पिळवणूक जेव्हा चालू होती त्यावेळी ह्या सर्व समस्या सोडविण्यासाठी धैर्याने, चिकाटीने व कधी एकाकीपणे अविश्रांत प्रयत्न करणारे जोतिराव म्हणजे समाजाचे सच्चे सेवक होत. समाजोन्नतीसाठी त्यांनी आयुष्यभर संकटे सोसली, पराकाष्ठेचा त्याग केला, प्रतिगाम्यांचा हल्ला परतविला. समाजासाठी चंदनासारखे झिजले ते! सामाजिक शोषणातून मानवाला मुक्त करणे, सत्याचे खरे स्वरूप स्पष्ट करणे व गुलामगिरीत रखडत पडलेल्या विश्वमानवाला मुक्त करण्याच्या जाणिवेतूनच जोतिरावांनी आपले वैचारिक लेखन केले आहे.''[४]

महात्मा फुलेंनी सामाजिक शैक्षणिक कार्याबरोबर स्त्री शिक्षण आणि स्त्री उद्धाराची चळवळही हाती घेतली होती. सनातन्यांच्या सडलेल्या मतांवर तीव्र आघात करून महाराष्ट्रात प्रथम स्त्रीस शाळेचा दरवाजा उघडून दिला तो जोतिरावांनीच. आपण जर एका पुरुषाला शिक्षण दिले तर ते एखाद्या व्यक्तीला दिल्यासारखे आहे. परंतु एखाद्या स्त्रीला शिक्षण दिले तर ते सर्व कुटुंबाला दिल्यासारखे आहे हे ओळखून जोतिरावांनी स्त्री शिक्षणासाठी व

स्त्री स्वातंत्र्यासाठी प्रथम प्रयत्न केले. 'न स्त्री स्वातंत्र्य मर्हति' या परंपरागत वचनाचे सीमा बंधन प्रथम जोतिरावांनी तोडले. आपल्या देशाचे हित साधावयाचे असेल तर स्त्री शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हे त्यांनी ओळखले होते.

यावरून असे स्पष्ट होते की, महात्मा फुले यांच्या समग्र जीवनावर बुद्ध तत्त्वज्ञानाचा ठसा उमटलेला आहे.

**गोपाळ गणेश आगरकर :**

गोपाळ गणेश आगरकर यांचा जन्म १४ जुलै १८५६ साली झाला. आगरकरांनी 'केसरी', 'सुधारक' या पत्रांमधून समाजसेवा केली. आपल्या धारदार लेखणीने 'सुधारक' या साप्ताहिकामध्ये त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, धार्मिक या विषयांवर विचार मांडले. या विचारातून त्यांचे अलौकिकत्व स्पष्ट होते.

गोपाळ गणेश आगरकर हे १८८१-१८८७ अशी सात वर्षे 'केसरी'चे आणि १८८८-१८९५ अशी सात वर्षे 'सुधारक' या साप्ताहिकाचे संपादक होते. फर्ग्युसन कॉलेजमध्ये अध्यापन करतानाच त्यांनी ही संपादकीय जबाबदारी समर्थपणे पार पाडली. या काळात त्यांनी या दोन वृत्तपत्रांमधून केलेले लेखन हा त्यांच्या मनातील उत्कट प्रेरणांचा आविष्कार होता. तत्कालीन समाजाचे प्रबोधन करून त्यांचे आमूलाग्र परिवर्तन होण्यासाठी नव्या पुरोगामी विचारांचे बीजारोपण समाजमनात करण्यासाठी आगरकरांनी त्यांची लेखनी प्रभावीपणे वापरली. त्यांनी वृत्तपत्रांच्या माध्यमातून समाजाच्या जीवनातील विविध अंगांचे विश्लेषण करून त्यांच्यामधील दोष सडेतोडपणे दाखवून देऊन समाजजीवन सुखी होण्यासाठी कोणत्या सुधारणा केल्या पाहिजेत, हे स्पष्टपणे सांगितले. आगरकरांनी 'सुधारक' मधून मांडलेले विचार त्यांच्या बहुसंख्य समकालीनांनी स्वीकारले नाहीत. सनातनी वृत्तीच्या, प्रतिगामी विचारांच्या लोकांना आगरकरांचे टीकास्त्र इतके झोंबले की, सनातनी समाजाने त्यांचा शक्य तितका छळ केला. १८८७ पर्यंत आगरकरांचे सहकारी असलेल्या टिळकांनीही लोकानुनय करीत सनातन्यांनाच पाठबळ दिले. आगरकरांवर 'केसरी'तून कठोर टीका केली. परंतु आगरकरांची सत्यनिष्ठा व तत्त्वनिष्ठा प्रखर असल्यामुळे ते त्यांच्या विचारापासून यत्किंचितही विचलित झाले नाहीत.

धर्म ही जीवन जगण्याची कला आहे. धर्म हा मानवासाठी आहे, हे आगरकरांनी ओळखले होते. भारतात हिंदूधर्मीय लोकांमध्ये धर्मश्रद्धा होती, परंतु धर्माबाबतची चिकित्सा फारशी झाली नव्हती. धर्माची चिकित्सा सर्व

प्रथम आगरकरांनीच केली. आगरकरांनंतर श्रीधर व्यंकटेश केतकर, महर्षी वि. रा. शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदींनी जे धर्मविषयक लेखन केले आहे. त्यामध्येही प्रगल्भ समाजशास्त्रीय विश्लेषण आढळून येते. डॉ. भा. ल. भोळे यांनी त्यांच्या पुस्तकाच्या सुरुवातीसच आगरकरांच्या धर्मचिंतनाला १९ व्या शतकातील सर्वांगीण परिवर्तनाची पार्श्वभूमी होती हे स्पष्टपणे मांडले आहे. आगरकर हे तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक होते. धर्माच्या तत्त्वज्ञानाची चर्चा करण्याचे बुद्धिसामर्थ्य त्यांच्याजवळ खासच होते. तत्कालीन समाजात पसरलेला अंधार दूर करणे हे आपले आद्यकर्तव्य आहे, असे ते मानत. समाजपरिवर्तन झाले पाहिजे ही त्यांच्या मनाची मुख्य ओढ होती. यासाठी समाजात रूढ असलेल्या धर्मविषयक कल्पनांचे भेदक विवेचन करून धर्माचे योग्य आचरण कोणते हे लोकांना समजावून सांगितले पाहिजे, असे त्यांना तीव्रतेने वाटत असे. धर्म, समाजरचना इत्यादी विषयांकडे पाहण्याचा आधुनिक दृष्टिकोण त्यांच्या मनात विकसित झाला होता.[५]

रानडे, फुले आणि आगरकर यांच्या धर्मचिंतनात अनेक बाबतीत मतभिन्नता असली तरी पारंपरिक दृष्टिकोण सोडून आधुनिक विचारांच्या आधारे धर्माचा विचार आणि धर्माचे आचरण केले पाहिजे हे समान मध्यवर्ती सूत्र या तिघांमध्ये दिसून येते. चिपळूणकर, टिळक यांच्या पुनरुज्जीवनवादी विचारांपेक्षा आणि आक्रमक हिंदुत्ववादी विचारांपेक्षा, रानडे, फुले आणि आगरकर यांची सुधारणावादी भूमिका मूलतः भिन्न होती. किंबहुना ती दुसऱ्या टोकाची होती हे भोळे यांनी सांगितले आहे. ते योग्यच आहे. या संदर्भात प्रा. भोळे म्हणतात, ''लौकिकदृष्ट्या धर्म म्हणून ज्याला ओळखले जाते, त्यावर आगरकरांनी आवश्य कोरडे ओढले आहेत. अनिष्ठ प्रथा, खुळचट धर्मश्रद्धा, दुष्ट रूढी आणि कालबाह्य परंपरा यांचा त्यांनी खास समाचारही घेतला आहे.''[६]

आगरकरांनी ज्याप्रमाणे हिंदू धर्मसंस्थेवर टीका केली त्याचप्रमाणे सुप्रसिद्ध विचारवंत आणि नाटककार जॉर्ज बर्नार्ड शॉ यांनी सेंट पॉलने संघटित केलेल्या ख्रिस्ती धर्मसंस्थेवर टीका करताना 'पॉलच्या चर्च्यानिटीचा ख्रिश्चॅनिटीशी काडीचाही संबंध नाही' असे कठोरपणे लिहिले. आगरकरांनी हिंदू धर्मातील खुळचट समजुतीवर टीका केली. तेव्हा सनातनी लोकांनी आगरकरांवर गलिच्छ शब्दांमध्ये टीका केली. ते जिवंत असताना त्यांची प्रेतयात्रा काढली. त्या वेळी 'आगरकर हे देव न मानणारे देवमाणूस आहेत' असे सांगून कोणीतरी आगरकरांची बाजू घेऊन धर्ममार्तंडांना धार्मिक

लोकांनीही जे धैर्य दाखविले तसे धैर्य एकाही सुशिक्षिताने महाराष्ट्रात दाखविले नाही.

सत्यशोधन करताना बुद्धी हेच सर्वश्रेष्ठ साधन आहे. बुद्धीच्या आधारेच त्यांनी वेद हे अपौरुषेय आहेत, देवापासून आलेले आहेत या समजुतीवर कडाडून टीका केली. ग्रंथप्रामाण्य, शब्दप्रामाण्य, बाबावाक्यप्रामाण्य या प्रवृत्तींशी बुद्धिप्रामाण्याचा उभा दावा असतो, हे सांगून भोळे यांनी विचारशक्तीला प्राधान्य देणे हे आगरकरप्रणीत बुद्धिप्रामाण्यवादाचे मुख्य सूत्र आहे हे आग्रहपूर्वक सांगितले.[७]

बुद्धीच्या साह्याने ज्या परमेश्वराचे अस्तित्व सिद्ध होत नाही, त्याच्या मानीव इच्छेवर माणसांनी आपले निर्णय न सोपवता स्वतःच्या बुद्धीने चालावे, या आगरकरांच्या भूमिकेमुळे जनमानसातील परमेश्वराच्या प्रतिमेवरच आघात झाला.

आगरकरांनी कर्मकांड, प्रेतसंस्कार वगैरे रूढ समुजती हास्यास्पद आहेत हे दाखवून दिले. अस्पृश्यता, वर्णभेद, ब्राह्मण वर्चस्व यांचा निषेध केला. धर्मक्षेत्रातील ढोंगीपणावर प्रखर हल्ला केला. त्यामुळे त्यांनी शास्त्री-पंडितांच्या तत्कालीन समाजातील वर्चस्वालाच सुरुंग लावला. आगरकरांची टीका झोंबल्यामुळे तत्कालीन धर्ममार्तंडांनी आणि आंधळ्या श्रद्धावंतांनी आगरकरांवर कडाडून हल्ला केला.

आगरकरांचे वर्णन वि. स. खांडेकर यांनी 'देव न मानणारा देवमाणूस' असे केले होते. हे वर्णन कसे यथार्थ होते, हे सांगताना 'सुधारक'मध्ये आगरकरांनी देवाच्या उत्पत्तीसंबंधी मांडलेले मूलभूत विचार हिंदू धर्मातील अज्ञानावर त्यांनी केलेले प्रहार आणि भोवतालच्या समाजातील देवभोळेपणा नाहीसा करण्यासाठी त्यांनी केलेले सडेतोड लेखन यांचा उल्लेख करून प्रा. ढोंबरे यांनी त्याचवेळी आगरकरांच्या निष्कलंक चारित्र्याचा व सुजाणतेचा गौरव केला आहे. आगरकरांनी रूढी परंपरा व अंधश्रद्धा यावर तुफानी हल्ला केला. आगरकरांनी लोकांना समजेल अशा भाषेत क्रमाक्रमाने व्यवहारातील उदाहरणे घेऊन सविस्तरपणे देवाचे अस्तित्व पुसून काढले. म्हणूनच त्यांना 'देव न मानणारा देवमाणूस' हे विशेषण खऱ्या अर्थाने शोभून दिसते.[८] आगरकरांच्या वाङ्मयात व विचारात बुद्धिप्रामाण्य, व्यक्तिस्वातंत्र्य, सामाजिक समता, ऐहिक जीवनसमृद्धी आणि विज्ञाननिष्ठा या मूल्यांचा समावेश होतो. या सर्वांतून एक व्यापक मानवतावादी दृष्टी त्यांच्या विचारातून व्यक्त होते. मात्र त्यांचा मानवतावाद, दया बुद्धी अथवा धर्मवादावर आधारलेला नव्हता. तर त्याला समतेची व विज्ञाननिष्ठेची भक्कम बैठक

होती. आगरकरांचे तत्त्वज्ञान सत्य, नीती व स्वातंत्र्य या तीन तत्त्वांवर आधारलेले होते. त्यात समाजाचे हित, मानव जातीच्या उन्नतीचा अनुभव आणि व्यक्तीचे ऐहिक सुखसंवर्धन यांना महत्त्वाचे स्थान होते. आगरकर व्यक्तिस्वातंत्र्याचे आणि विचारस्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. आगरकरांनी व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार व्यक्ती विकासासाठी केला. व्यक्तिस्वातंत्र्यामुळेच विश्वात्मकता निर्माण होऊ शकते हे आगरकरांना पक्के माहीत होते, म्हणून आगरकर द्रष्टे विचारवंत ठरतात.

उपरोक्त विवेचनातून आगरकरांचे तत्त्वज्ञान स्पष्ट करताना असे निदर्शनास आले की, भगवान बुद्धांनी जे बुद्धतत्त्वज्ञान सांगितले त्यातील सदाचरण, नीती, स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, अंधश्रद्धा निषेध, बुद्धिप्रामाण्यवाद, विज्ञाननिष्ठा या तत्त्वांचा आगरकरांच्या विचारांवर प्रभाव दिसून येतो आणि म्हणूनच बुद्ध विचारांचा आगरकरांवर प्रभाव आहे हे सप्रमाण सिद्ध करता येते.

**महर्षी विठ्ठल रामजी शिंदे :**

महर्षी वि. रा. शिंदे एक थोर समाजसुधारक, अस्पृश्यता निवारणाचे पुरस्कर्ते, निरनिराळ्या धर्मातील तत्त्वांचे संशोधक आणि ध्येयवादी विद्वान गृहस्थ होते. यांचा जन्म २३ एप्रिल १८७३ रोजी जमखिंडी येथे झाला. यांचे घराणे मूळचे सधन सुखवस्तू होते. पण विठ्ठलरावांच्या वडिलांचे संसारात लक्ष नसल्यामुळे त्या कुटुंबाला दीनदशा प्राप्त झाली, असे असतानाही त्यांनी शिष्यवृत्या मिळवून त्यांनी बी.ए.एल.एल.बी. पर्यंतचे शिक्षण दारिद्र्याशी झगडून आणि प्रतिकूल परिस्थितीवर मात करून केले. विश्वविद्यालयीन जीवनातच विठ्ठलराव सार्वजनिक कार्यात थोडे थोडे लक्ष घालू लागले. इ. स. १८९५ साली डॉ. सेंडर लंड या अमेरिकन गृहस्थाशी त्यांची भेट झाली. ते एकेश्वरी मताचे होते. त्यांचे विचार विठ्ठलरावांना आवडले. विठ्ठलरावांनी त्यांच्याशी चर्चा केली व त्यांचे वाङ्मयही वाचून काढले. त्यातून त्यांचे मन एकेश्वरीवादाकडे झुकले. भारतातील प्रार्थना समाज व ब्राम्हो समाज हे एकेश्वरी मताचेच पुरस्कर्ते होते. डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर, न्या. रानडे, न्या. तेलंग, न्या. मंडलिक हे तत्कालीन प्रसिद्ध विद्वान प्रार्थना समाजाचे पुढारी होते. त्यांच्या विचारांची छापही विठ्ठलरावांच्या मनावर पडली आणि थोड्याच काळात ते प्रार्थना समाजाचे सभासद झाले.[९]

विठ्ठलराव ब्राम्हो समाजाचा प्रचार करीत होते, त्याचबरोबरच मानवता धर्माचाही पुरस्कार करीत होते. तसेच ते संकुचित धर्म-कल्पना व जुन्या दुष्ट रूढी यांवर कठोर प्रहार करीत होते. अशा प्रकारे जे जे मानवी

उन्नतीला पोषक असेल, ते ते त्यांनी पुरस्कारिले व जे जे अवनतीला कारण झाले असेल, ते ते धिक्कारिले. विठ्ठलरावांची दृष्टी विशाल होती. विचारसरणी सडेतोड होती. त्यांनी आपले सर्व कुटुंब समाजसेवेसाठी उभे केले. आपल्या बहिणीला व पत्नीला त्यांनी शाळेत घालून शिकविले. त्यांची निरीक्षणशक्ती सूक्ष्म होती. पांडित्य सखोल व चिकित्सक होते. 'भारतीय अस्पृश्यांचा प्रश्न' हा त्यांचा अद्वितीय ग्रंथ होय. भारतातील सर्व प्रदेशांतल्या व निरनिराळ्या नावांनी ओळखल्या जाणाऱ्या अस्पृश्यांची तत्कालीन परिस्थिती ह्या ग्रंथावरून कळून येते. अस्पृश्यतेविषयीचे मूलभूत विवेचनही त्यात आढळते. हा ग्रंथ म्हणजे त्यांच्या संशोधक वृत्तीचा परिपाकच होय. 'माझ्या आठवणी व अनुभव' हा त्यांचा दुसरा ग्रंथ आहे. अलीकडे त्यांच्या सर्व लेखांचा संग्रह 'शिंदे लेखसंग्रह' या नावाने प्रकाशित झाला आहे.

अस्पृश्यता हा भारतीय समाजावरचा कलंक आहे आणि तो धुवून काढलाच पाहिजे. या तळमळीने भारतात जे पुरुष झटले, झगडले, त्यांच्या मालिकेत वि. रा. शिंदे हे नाव खूप वरचे आहे. वि. रा. शिंदेंनी अस्पृश्यतेच्या प्रश्नाला सर्वाधिक महत्त्व दिले. त्यासाठी त्यांनी 'अस्पृश्यता निवारक संघ' नावाची संस्था स्थापन केली. पण नुसत्या संस्था काढून काही साधण्यासारखे नाही. अस्पृश्यतेसारखा राष्ट्राच्या स्थैर्याला हानिकारक असणारा रोग नाहीसा करण्यासाठी देशपातळीवर काही करणे त्यांना आवश्यक वाटत होते. म्हणून अस्पृश्यता निवारणासाठी काँग्रेसने पुढाकार घ्यावा असे त्यांना वाटत होते. परिणामी ॲनी बेझेंट यांच्या अध्यक्षतेखाली कलकत्ता येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात अस्पृश्यतेविरुद्ध ठराव पास करण्यात आला.[१०] ऑक्सफर्ड येथे बौद्ध धर्मवाङ्मयाचे व्यासंगी विद्वान डॉ. कार्पेण्टर यांच्या देखरेखीखाली बुद्ध धर्माचा अभ्यास करण्याची संधी त्यांनी मिळविली. परिणामी त्यांच्या मनात बौद्ध तत्त्वज्ञानाविषयी अधिक जिज्ञासा निर्माण झाली. त्यांनी बौद्ध दर्शनाचा अभ्यास केला होता. अधिकाधिक ग्रंथ मिळवून त्यांनी धम्मपदाचा अभ्यासही सुरू केला होता. मुळातच शोषित, पीडित, दलित यांच्याविषयी मनापासून कळवळा असलेल्या विठ्ठलरावांना करुणामूर्ती बुद्धाच्या तत्त्वज्ञानाविषयी अधिकच ओढ वाटली. बौद्धांचा दैनंदिन व्यवहार प्रत्यक्ष पाहण्यासाठी १९२७ मध्ये ते ब्रह्मदेशाच्या दौऱ्यावर गेले. यावरून असे स्पष्ट होते की, वि. रा. शिंदेंच्या वैचारिक लेखनावर बुद्ध तत्त्वज्ञानाचा पगडा होता. म्हणूनच तळागाळातील समाजातील लोकांविषयी त्यांच्या मनात कणव होती. याचाच परिणाम त्यांनी समाजातील तळागाळातील विशेषतः दलित वर्गात आणि स्त्री वर्गात आमूलाग्र बदल घडवून आणण्याचे कार्य केले. समाजातील

अज्ञान, दारिद्र्य, अंधश्रद्धा नष्ट करून समाजात समता प्रस्थापित करण्याचे महत्त्वाचे कार्य वि. रा. शिंदे यांनी केले आहे. म्हणूनच ते बुद्ध तत्त्वज्ञानाचे अनुयायी ठरतात.

**ताराबाई शिंदे :**

१८८२ साली ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री पुरुषः तुलना' हे पुस्तक लिहिले. स्त्री वर्गाचे सर्वच स्तरावरील शोषण आणि पुरुषप्रधान संस्कृतीचा पगडा या संदर्भात वरील पुस्तकात विचार मांडले आहेत. त्या म्हणतात, ''स्त्री धर्म म्हणजे काय? निरंतर पतीची आज्ञा पाळणे, त्याचे मर्जीप्रमाणे वागणे, त्यांनी लाथा मारल्या, शिव्या दिल्या, दुसऱ्या रांडा ठेवल्या, नवरोजी दारू पिऊन, जुवा खेळून, कफल्लक होऊन, शंख करीत, चोरी करून, कोणाचा प्राण घेऊन, फितुरी, चहाडी, खजिना लुटून, लाचखाऊ व जरी घरी आले; तरी स्त्रियांनी आपले कोणी जसे काही कृष्ण महाराज गौळ्यांचे दही-दूध चोरून चंद्रवळीला कलंक लावून आलेत असे समजून; परमात्मा सारखेच त्यांची मोठी हसत मुखाने देवा सारखी पूजा करावी, सेवेत हजर रहावे हा स्त्री-धर्म?''[११]

आपल्याकडे पती हा परमेश्वर अशी संकल्पना रूढ करावी, सेवेत हजर रहावे ह्या पतीला परमेश्वराचे स्थान लाभले आहे. परंतु त्या पतीची वागणूक परमेश्वरासारखी आहे का? या संदर्भात ताराबाई शिंदे आपले मत परखडपणे मांडतात, ''जर बायकोला नवराच देव तर नवऱ्याची वागणूक देखील देवासारखी पाहिजे. बायकांनी भक्ताप्रमाणे जशी भक्ती करावी, तशी नवऱ्याने देवाप्रमाणेच ममता करून त्यांचे सुख-दुःख जाणावे की नाही? जसे देव भक्ती पाहून सदा प्रसन्न राहतात, भक्तांचे गुणदोष आढळले तर ते कसे तेव्हाच खरे खरे कारण सांगून त्यांचा अपराध त्यांचे पदरात घालून ममतेने शासन करतात, तसे यांनी करू नये. तर नवरा कसाही दुर्गुणी असला तरी त्याला देवाप्रमाणेच मानून कोण वागेल बरे?''[१२]

यावरून असे दिसते की, पुरुषांचे स्वातंत्र्य म्हणजे बाईची पराधीनता अशी स्थिती नसावी. या काळात ताराबाई शिंदे पुरुषी वर्चस्वाला विरोध करताना दिसतात. स्त्री आणि पुरुष या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत हे स्पष्ट करतात. या काळात जहाल विचार मांडतात म्हणून त्या आधुनिक ठरतात. स्त्री-पुरुषांमधील विषमता त्यांनी दाखवून दिली.

त्या आपल्या 'स्त्री पुरुषः तुलना' या पुस्तकात म्हणतात, ''अरे, तुमचे देव देखील दगाबाज, मग तुम्ही असालच असाल, यात नवल काय? इंद्राने गौतमाचे रूपाने जाऊन अहिल्येसारख्या साध्वीला कलंक लाविला.

चंद्रावळ महापतिव्रता होती, तेथे कृष्णमहाराजांनी राहीरूपाने तिचे व्रताचा भंग केला की नाही? असे जर कपट करून तुम्ही घर बुडवू लागला तर तेथे पतिव्रता धर्म का रडेल?"[१३]

उपरोक्त विवेचनावरून असे निदर्शनास येते की ताराबाई शिंदे देव ही संकल्पना नाकारतात यासाठी पुराणातले दाखले देतात हे देवच कसे चारित्र्यहीन आहेत हे ते सप्रमाण दाखवून देतात. येथे बुद्धांच्या शील या तत्त्वाला ते विशेष महत्त्व देतात शिवाय स्त्री-पुरुष समानतेचा विचार मांडतात, हे सर्वच विचार बुद्ध तत्त्वज्ञानात अधोरेखित झालेले आहेत. म्हणून संशोधनाअंती असे म्हणावे लागते की, ताराबाई शिंदे या बुद्ध तत्त्वज्ञानाच्या अनुयायी होत्या.

**साने गुरुजी :**

'खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे' असे म्हणणाऱ्या साने गुरुजींचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील पालगड या गावी झाला. ते जातिवंत शिक्षक होते. त्यामुळे शिक्षण, संस्कार, संस्कृती, तत्त्वज्ञान, अध्ययन-अध्यापन, पत्रलेखन, संगीत, साहित्य, संमेलन, काव्य, निसर्ग, विद्यार्थी, स्वयंसेवक, लोकशिक्षक आणि संशोधक अशा शिक्षणाच्या अनेकविध शाखांना स्पर्श करून जाणारा ठोस विचार त्यांनी मांडला. साने गुरुजी म्हणजे मातृप्रेमाचा, कारुण्याचा, पावित्र्याचा, समतेचा, चैतन्याचा, निर्भयतेचा, ज्ञान-विज्ञानाचा, साधुवृत्तीचा, सेवाभावाचा, देशप्रेमाचा, भक्तिभावाचा, ऋजुतेचा, सौजन्याचा, माणुसकीचा, लालित्याचा आणि जीवनस्पर्शी शिक्षणाचा सूर्यच होय. शाळेत ते मुलांचे शिक्षक होते, शाळेबाहेर पडल्यावर ते लोकांचे शिक्षक झाले. त्यांनी साऱ्या महाराष्ट्राला 'मुक्त विद्यापीठ' बनविले.

सामाजिक न्याय, सामाजिक समता आणि सामाजिक बंधुभाव वाढवायचा असेल तर शिक्षणातून राष्ट्रीय एकात्मतेचा धडा शिकविला पाहिजे. ज्ञान काय किंवा विज्ञान काय या दोहोंच्या शिक्षणातून मानवजात जिवंत राहिली पाहिजे. ज्ञानाची परिणती मानवतेच्या प्रेमात झाली पाहिजे. विज्ञानाची परिणती मानवतेच्या संरक्षणात झाली पाहिजे. मानवी जीवन सुंदर आणि सुरक्षित करावयाचे असेल तर त्यास ज्ञान-विज्ञानाचा पाया बळकट पाहिजे असा गुरुजींचा विचार होता.

'माणुसकी' या विचाराभोवती गुरुजींचे शिक्षणविषयक विचार केंद्रिभूत झालेले दिसतात. गुरुजींना माणूस घडविणारे शिक्षण पाहिजे होते. गुरुजींच्या साऱ्या शिक्षणविषयक विचारांना प्रेमाचा स्पर्श आहे. हे सारे जग प्रेमाच्या

सावलीत वाढावे, सुखी समृद्ध व्हावे; असे गुरुजींना वाटत असे. प्रेमाच्या स्थैर्यातून जीवनाचा वटवृक्ष फुलत राहावा असे त्यांना वाटत असे. समाजाला अशा प्रेमाची कशी गरज आहे, हे सांगताना गुरुजी म्हणतात की, "मनुष्य अन्नाशिवाय जगू शकेल, पण प्रेमाशिवाय कसा जगेल? प्रेम हे जीवनाचे जीवन आहे. जे प्रेम स्थिर आहे, ते जीवनाच्या वृक्षाला पोसते. वृक्षाच्या पानापानात, फांद्याफांद्यांत, सर्व खोडात आमूलाग्र जसा जीवनरस भरलेला असतो, तसे प्रेम पाहिजे. क्षणभर उतू जाणारे प्रेम जीवनाला टवटवी, सौंदर्य, उल्हास देऊ शकत नाही." गुरुजींचे शिक्षणविषयक विचार जेवढे प्रेमपूर्ण आहे, तेवढेच स्फूर्तिदायक आहेत.

साने गुरुजींना लोकमनात स्वातंत्र्यप्राप्तीची ओढ निर्माण करावयाची होती, लोकजीवन ओजस्वी-तेजस्वी करावयाचे होते, समाजाचा सर्वांगीण विकास करावयाचा होता, समाजवादी तत्त्वप्रणालीवर आधारलेली समाजरचना निर्माण करावयाची होती. यासंदर्भात गुरुजी म्हणतात की, "समाजवादी समाजरचना निर्माण व्हायला हवी. सर्वांना शाश्वती हवी. सर्वांची जीवने मोलाची आहेत. आजची समाजरचना मानवभक्षक आहे. ती मानवरक्षक करावयाची आहे. समाजवाद येईल तेव्हा मानव सुखी होईल." गुरुजी अनुभवसंपन्न लोकशिक्षक होते, द्रष्टे लोकशिक्षक होते, जाणते लोकशिक्षक होते, समाजवादी लोकशिक्षक होते. आदर्श समाजरचनेचे चित्र रेखाटताना ते म्हणतात की, "माझ्या गावात भांडण नाही, तंटा नाही, द्वेष नाही, कोणी कोणाला हीन समजत नाही. सारे उद्योग करतात. एकमेकांना मदत करतात, लोकांची मने प्रेमाने भरलेली असतात. नद्या, विहिरी पाण्याने भरलेल्या असतात. शेते-भाते धान्याने भरलेली असतात. माझ्या गावात रोग नाही, दुष्काळ नाही, दास्य नाही." खरे तर गुरुजी नवसमाजनिर्मितीसाठी धडपडणारे लोकशिक्षक होते. त्यांना लोकशिक्षणातून लोकजीवन सुखी आणि समृद्ध करावयाचे होते. त्यामुळे गुरुजींमधील एक विचारवंत शिक्षक आणि विचारवंत लोकशिक्षक ही दोन्ही रूपे विद्यार्थ्यांना आणि लोकांना भावली. एक समाजवादी, समाजसेवी लोकशिक्षक म्हणून साने गुरुजींचे नाव सदैव लोकमनात चिरंजीव राहील."[१४]

जगात जोपर्यंत हिंसा आहे, स्वार्थ आहे, तोपर्यंत जगाचे असेच स्वरूप राहावयाचे. माझ्या पोळीवर तूप पाहिजे, मला माडी पाहिजे, दुसऱ्याचे काही का होईला, ही वृत्ती जोपर्यंत आहे, तोपर्यंत सारे भयभीतच राहणार. हिंसा ही भित्री आहे, हिंसेला आपली कोणी हिंसा करील का अशी सदैव भीती असते. जगात प्रेमच निर्भय असते.[१५]

ही मानवी ऐक्याची भव्य कल्पना भारतीय संस्कृतीचा प्राण आहे. कोणतेही कर्म करताना ही दृष्टी हवी. भक्ती म्हणजे अद्वैत ज्ञानच. दुसऱ्याबद्दल तेव्हाच प्रेम व भक्ती वाटेल, ज्या वेळेस तो माझ्या सारखाच आहे, एकच सत्त्व सर्वात आहे असे समजेल तेव्हा! तो म्हणजे मीच आहे आणि म्हणूनच त्याच्यावर मी प्रेम केले पाहिजे. मी दुसऱ्यावर प्रेम करतो, म्हणजे स्वत:वरच प्रेम करतो.[१६]

पाश्चिमात्यांत केवळ आध्यात्मिकतेची वाण आहे. परंतु आपण दोन्ही दृष्टींनी दिवाळखोर आहोत, ज्ञान-विज्ञान दोन्ही येथे मरून पडली आहेत. आर्यभट्टांच्या व भगवान बुद्धांच्या या भारतभूमीत पुनरपि ज्ञान-विज्ञानाची जोपासना नाही का सुरू होणार? अध्यात्मविद्या व भौतिक विद्या यांचा संगम नाही का होणार?[१७]

एकूणच साने गुरुजींची वैचारिक जडणघडण पाहता त्यांच्यावर बुद्धविचारांचा प्रभाव दिसून येतो. कारण बुद्धांनी सांगितलेले सदाचरण, मानवतावाद, विज्ञानवादी दृष्टिकोण आणि समता या तत्त्वांचा उद्घोष साने गुरुजींच्या लेखनात प्रतिबिंबित झालेला दिसतो. 'खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे', हे त्यांचे जीवनकार्याचे सारच आहे.

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी :**

धुळे जिल्ह्यातील पिंपळनेर नामक खेड्यात २७ जानेवारी १९०१ या दिवशी शास्त्रीजींचा जन्म झाला. जुन्या रूढी जातिपातीचे निर्बंध, सोवळ्या-ओवळ्याचे विधिनिषेध यांना अत्यंत पवित्र मानणाऱ्या सनातनी वातावरणात सुरवातीच्या काळात शास्त्रीजींची जडणघडण झाली. प्राज्ञ पाठशाळेत एक तप त्यांनी आचार्य परंपरेच्या प्राचीन पद्धतीप्रमाणे सखोल अध्ययन केले. वेदोपनिषदे, ब्राह्मणे-आरण्यके, सकळ पुराणग्रंथ सर्व स्मृतिसंहिता, महाभारत-रामायणादी आर्ष महाकाव्ये, धर्मनिबंध यासारख्या सर्व प्राचीन ज्ञान-विद्यांना या एकपाठी शिष्याने आत्मसात केले. पुढे कलकत्त्याच्या संस्कृत पाठशाळेची 'तर्कतीर्थ' ही पदवीही त्यांनी १९२३ साली संपादन केली.[१८]

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्रींची ग्रंथसंपदा खालीलप्रमाणे आहे.

शुद्धिसर्वस्वम (संस्कृत) (१९३४), आनंदमीमांसा (१९३८), हिंदुधर्माची समीक्षा व सर्वधर्मसमीक्षा (१९८१), जडवाद (१९४१), ज्योतिनिबंध (१९४७), वैदिक संस्कृतीचा विकास (१९५१, १९७२), आधुनिक मराठी साहित्याची समीक्षा व रससिद्धांत (१९७३), लेखसंग्रह

(श्रीविद्या प्रकाशन) (१९८१), संपादित - राजवाडे लेखसंग्रह (१९६४), टिळक लेखसंग्रह (१९६९).

या लेखनातून त्यांचा वैचारिक दृष्टिकोण दिसून येतो. शास्त्रीजींनी लेखनापेक्षा आपल्या भाषणांमधूनच महाराष्ट्रातील लहान मोठ्या गावातील विचार भुकेल्यांना ज्ञानाचे सकस अन्न पुरविले आहे. ज्ञानाला त्यांनी हस्तिदंती मनोऱ्याबाहेर आणले व समाजाच्या भर प्रांगणात खडे केले. खासगी चर्चा हे तर शास्त्रीजीचे विद्वानप्रिय असे विद्यापीठच या विद्यापीठात ज्यांना-ज्यांना प्रवेश लाभला ते ते नव्या विचारांनी उजळून निघाले. शास्त्रीजींचे विचार समाजातल्या सामान्य माणसापर्यंत झिरपत गेले म्हणून ते आधुनिक थोर विचारवंत ठरतात. ''आधुनिक पाश्चिमी ज्ञानविज्ञानांच्या ज्ञानसागरात परिश्रमपूर्वक विहार करून त्यांनी भारतीय ज्ञानपरंपरेला आधुनिक अन्वर्थकता आणण्याचा प्रयत्न केला. परंपरा व आधुनिकता या दोहोंनाही आपल्या अगाध व्यासंगाने खराखुरा डोळसपणा दिला. मराठी विश्वकोशाची निर्मितीप्रेरणा यातूनच त्यांना लाभली. सामाजिक प्रगतीचे लक्ष्य ठेवणाऱ्या विचारवंताला पारंपरिक विद्वता व आधुनिक ज्ञान यांचा मेळ घालावाच लागतो. हा मेळ कसा घालावयाचा, याचा आदर्श शास्त्रीजींनी घालून दिला.''[१९] आधुनिक समाजाला जे प्रेरक ठरेल ते जाणून घेणे व तेच विचारांती प्रकट करणे ह्या नव्या विचार कार्याचा वस्तुपाठ शास्त्रीजींनी घालून दिला. आंधळी परंपरा भक्ती रूढी परंपरा, अंधश्रद्धा, व्यक्तिपूजा या गोष्टींना त्यांनी तिलांजली दिली. यासाठी त्यांनी समाजात सातत्याने विचार मंथन व्हावे यासाठी प्रयत्न केले.

शास्त्रीजींच्या विचारांवर मानवेंद्रनाथ रॉय व महात्मा गांधी या असामान्य महापुरुषांच्या विचारांचा पगडा दिसून येतो. परंतु शास्त्रीजींनी काळानुरूप आपल्या विचारांत परिवर्तन घडवून आणलेले आहे. ''परिवर्तनाचा ध्येयवाद समता हाच असावा लागतो. सामाजिक न्याय आणि बंधुता हाच परिवर्तनाचा आशय असावा लागतो. इष्ट मूल्ये म्हणजे सकलांना समान लेखणारी मूल्ये! उपकारक संबंध म्हणजे कोणावरही अन्याय होणार नाही असे संबंध! अशा इष्ट आणि उपकारक मूल्यांची प्रस्थापना म्हणजे परिवर्तन होय असे म्हटले पाहिजे.''[२०]

भगवान गौतमबुद्धांना देखील मानवी जीवनात परिवर्तन ही बाब अत्यंत महत्त्वाची वाटत होती. परिवर्तन हा मानवी विकासाचा पाया आहे. वैचारिक परिवर्तन होत नसेल तर त्या विचारांना साचलेपण येते आणि कालानुरूप ते विचार कालबाह्य ठरले जातात. भगवान बुद्धांच्या निर्वाणानंतर

अडीच हजार वर्षापेक्षा आज जास्त कालावधी झाला आहे. परंतु तरी आजही बुद्धांचे विचार समाजाला प्रेरक आहेत. अगदी त्याच पद्धतीने शास्त्रीजींनी आपल्या विचारांत कालानुरूप बदल घडवून आणले. म्हणूनच ते द्रष्टे विचारवंत ठरतात. म्हणूनच सतत परिवर्तनशीलता हा त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू ठरला.

शास्त्रीजींनी विपुल वैचारिक लेखन केले नाही. परंतु जे वैचारिक लेखन केले आहे ते केवळ विद्वता मिळविण्यासाठी नाही तर सामाजिक जबाबदारीची निष्ठा म्हणून केले आहे. भारतीय ज्ञानपरंपरेला आधुनिक अन्वर्थकता प्राप्त करून देण्याचे मोठे कार्य त्यांनी केले आहे. शास्त्रीजींनी सतत सामाजिक प्रगतीचे लक्ष्य ठेवले. अखिल मानव जातीच्या उद्धारासाठी ध्येयप्रेरित होऊन सुधारणावादी लेखन केले. शास्त्रीजींनी कोणतीच एक वैचारिक भूमिका अंधपणाने स्वीकारली नाही, कोणत्याच एका तत्त्वप्रणालीची बांधिलकी त्यांनी स्वीकारली नाही. जे जे समाजाला उपकारक आहे अशा बाबींचा त्यांनी स्वीकार केला.

वैदिक संस्कृतीचा विकास या ग्रंथावर एक दृष्टिक्षेप टाकला असता शास्त्रीजींच्या विद्वत्तेची आपणाला महती पटते. या ग्रंथाच्या उपसंहारात ते म्हणतात. ‘‘हे राष्ट्र तत्त्वज्ञान शून्य बनण्याची शक्यता वाढत आहे. केवळ बौद्धिक विचार संपत्ती म्हणून तत्त्वदर्शनाची आवश्यकता नाही; तर अस्तित्वाच्या सर्व भागांवर प्रकाश टाकून मार्गक्रमणास उत्साहित करणारे तत्त्वदर्शन आवश्यक आहे. संस्कृती ही अनुभवांचे आणि विचारांचे संचयस्थान असते. तत्त्वज्ञान अनुभवांच्या आणि विचारांच्या समग्र आकलनाने निर्माण होत असते. म्हणून ही वैदिक संस्कृतीच्या विकासाची समीक्षा आम्ही केली आहे. परंपरेने प्राप्त झालेली परलोकपरायण विचारसरणी जशीच्या तशी स्वीकारून या जगात जगण्याचे सामर्थ्य मिळणार नाही. या जगाचा अर्थ समजला तरच जगात यशस्वीपणे जगता येते. हे जग अधिक चांगले कसे बनवता येईल हा खरा प्रश्न आहे.’’[२१]

उपरोक्त विवेचनातून शास्त्रीजींची वैचारिक भूमिका स्पष्ट होते. शास्त्रीजींची वैचारिक घडण अशा पद्धतीने झालेली आहे. त्यांनी ‘‘भारतीय पारंपरिक तत्त्वज्ञान अभ्यासूनही नव्या काळात ते कुचकामी आहे, याचा साक्षात्कार त्यांना झाला. ‘हिंदुधर्माची समीक्षा’ या प्रेरक प्रबंधात पारंपरिक धर्ममूल्यांची परखड चिकित्सा करून आधुनिक काळातील विज्ञान मूल्यांचा व सामाजिक मूल्यांचा पुरस्कार केला पहिजे हे त्यांनी प्रतिपादन केले. ’’[२२]

शास्त्रीजींनी ख्रिश्चन, जैन, इस्लाम, बौद्ध, हिंदू या प्रमुख धर्मग्रंथांचा अभ्यास करून सारासार विवेकबुद्धीने आपले मत मांडताना म्हटले आहे. ते पुढीलप्रमाणे, ''बुद्धधर्मानेच विश्वव्यापनशील धर्म प्रथम मानवी इतिहासात स्थापन केला. त्यानंतर ख्रिश्चन धर्म आणि इस्लाम हे विश्वव्यापनशील धर्म झाले. बुद्धधर्मापूर्वीचे सर्वच धर्म हे विशिष्ट समाजपरंपरेच्या विशिष्ट संस्कृतीच्या मर्यादेतच राहात होते. त्या संकुचितपणाला रजा प्रथम बुद्धधर्माने दिली. बुद्धधर्म जंगलातील वनव्याप्रमाणे जगात पसरला. त्यांच्या प्रसाराच्या मर्यादा पाहावयाच्या, तर पृथ्वीचा नकाशा पुढे ठेवावा लागतो. होल्गा नदीपासून जपानपर्यंत आणि पामीरपासून सिलोनपर्यंत त्या धर्माच्या प्रसाराचा प्रयत्न दिसतो. आज जगातील एक तृतीयांश लोकसंख्या बौद्धधर्मीय आहे. भटक्या तुराणी, तुर्क, मोगल लोकांपासून तो अत्यंत सुधारलेल्या चिनी आणि जपानी लोकांपर्यंत सगळ्या संस्कृतीच्या थरांत हा धर्म शिरला.''[२३]

यावरून असे निदर्शनास येते की, बुद्ध धर्माचे तत्त्वज्ञान तर्कतीर्थांना प्रेरित करणारे ठरले आहे. म्हणून संशोधनाअंती असे लक्षात येते की, भगवान गौतमबुद्धांच्या विचारसरणीचा प्रभाव शास्त्रीजींवर पडलेला दिसून येतो.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी मानवतावादाला अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे. ते म्हणतात, ''मानवी जीवनमूल्ये ही अंतिममूल्ये होत, हे मानवतावादाचे प्रथम सूत्र आहे. मानव हा शिक्षणाने स्वत:ला बदलणारा आणि विकसित होणारा असा प्राणी आहे. स्वत:चे हित साधणे अथवा न साधणे या बाबतीत त्याला स्वातंत्र्य आहे; मानवाच्या हातातच त्याचे भवितव्य आहे; या जगातील त्याचे जीवन म्हणजे इतिहास; ऐतिहासिक परिस्थिती निर्माण करण्याचे अथवा बदलण्याचे त्याला स्वातंत्र्य म्हणजे शक्ती आहे. सत्यासत्य, हिताहित, नीतिअनीती, पवित्रापवित्र आणि व्यापक अर्थाने योग्य आणि अयोग्य काय, याचा निर्णय होत असतो तो मानवीच असतो; मानवच सर्व अस्तित्वाचा मानदंड आहे. अशा प्रकारच्या विचारांनी प्रेरित झालेले आंदोलन मानवतावादी होय; आणि विचारसरणीचे मूलगामी समर्थन करणारे तत्त्वज्ञान मानवतावाद होय.''[२४]

मानवतावादी तत्त्वज्ञानाची जगाला पहिली ओळख भगवान गौतम बुद्धानेच करून दिलेली आहे. मानवाने अस्तित्व आणि मानवाचे स्वातंत्र्य या बाबींना बुद्धतत्त्वज्ञान महत्त्व देते. हा मानवतावाद व्यापक स्वरूपात मांडण्याचे कार्य तर्कतीर्थांनी केलेले आहे. एकूणच बुद्ध तत्त्वज्ञानाचा शास्त्रींजींवर प्रभाव पडलेला आहे हे संशोधनाअंती लक्षात येते.

चिपळूणकर, म. फुले, लोकहितवादी, गो. ग. आगरकर, शि. म. परांजपे, वि. का. राजवाडे, न. चिं. केळकर, वि. दा. सावरकर, श्री. म. माटे, विनोबा भावे, द. वा. पोतदार, आचार्य जावडेकर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी या आणि इतर निबंधकारांनी वैचारिक लेखन करून समाज घडविण्यात महत्त्वाचे योगदान दिले आहे. सर्वांनीच गौतम बुद्धांच्या विचारांचा अभ्यास केला असा माझा दावा नाही. परंतु मानवकल्याण, स्वातंत्र्य, समता, बंधुता या सर्वांनी ते झपाटलेले होते. म्हणूनच ते कृती-उक्ती-लेखणीतून झिजत होते. त्यांच्या विचारांवर समकालीनांचा जसा प्रभाव होता, तसाच पूर्वाश्रमीच्या विभूतींच्या विचारांचा प्रभाव होता याकडे दुर्लक्ष करता येत नाही. शिवाय पाश्चात्त्यांच्या विचारांचाही प्रभाव असलेला स्पष्ट दिसतो. अगदी अलीकडच्या अनेकांच्या वैचारिक लेखनाचाही विचार करता येईल. परंतु विस्तारभयास्तव मोह टाळला आहे.

**संदर्भटीपा :**


१) लोकहितवादी, 'शतपत्रे', पृष्ठ क्र. ९१.
२) संपा. धनंजय कीर, 'महात्मा फुले समग्र वाङ्मय', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, सहावी आवृत्ती नोव्हें. २००६, पृष्ठ क्र. २६३.
३) भगत रा. तु., 'शिक्षणातील थोर विचारवंत', चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, प्र.आ. ६ सप्टें. २००१, पृष्ठ क्र. २६.
४) तत्रैव : पृष्ठ क्र. २८.
५) भोळे भा. ल., 'आगरकर विचार', लोकवाङ्मयगृह मुंबई, प्र.आ. जाने. २००७, पृष्ठ क्र. ७.
६) तत्रैव : पृष्ठ क्र. ८, ९.
७) तत्रैव : पृष्ठ क्र. १०.
८) तत्रैव : पृष्ठ क्र. १६.
९) संपा. जोशी महादेवशास्त्री, 'भारतीय संस्कृतीकोश - खंड ९', भारतीय संस्कृतीकोश मंडळ पुणे, तृ.आ. जाने. २०००, पृष्ठ क्र. २७६.
१०) केणेकर मुक्ता, 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे', गोकुळ मासिक प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९९९, पृष्ठ क्र. २६.
११) शिंदे ताराबाई, 'महात्मा फुले पुरस्कृत स्त्री पुरुष तुलना', मैत्रिका प्रकाशन, वर्धा, २००२, पृष्ठ क्र. ७.
१२) तत्रैव : पृष्ठ क्र. ९.
१३) तत्रैव : पृष्ठ क्र. ५१.
१४) भगत रा. तु., ऊ.नि., पृष्ठ क्र. २६३, २६४.
१५) कांबळे अरुण, 'मराठी वैचारिक गद्य', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ. जून २००४, पृष्ठ क्र. १०८.
१६) तत्रैव : पृष्ठ क्र. १०९.

१७) तत्रैव : पृष्ठ क्र. १११.
१८) जाधव रा. ग., 'विचारशिल्प', कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र.आ. १९७५, पृष्ठ क्र. १.
१९) जाधव रा. ग., 'माझे चिंतन', मनोविकास प्रकाशन पुणे, प्र.आ. डिसें. २००६, पृष्ठ क्र. ४६.
२०) मनोहर यशवंत, 'परिवर्तनवादी जीवनमूल्ये आणि वाङ्मयीन मूल्ये', ठिय्या प्रकाशन, नागपूर, प्र.आ. १ मे १९९९, पृष्ठ क्र. ७.
२१) जोशी लक्ष्मणशास्त्री, 'वैदिक संस्कृतीचा विकास', विठ्ठल गणेश जोशी, प्राज्ञपाठ शाळा मंडळ ग्रंथमाला, वाई, प्र.आ. १९५१, पृष्ठ क्र. २६०.
२२) जाधव रा. ग., उ.नि., पृष्ठ क्र. १२.
२३) तत्रैव : पृष्ठ क्र. ५२.
२४) तत्रैव : पृष्ठ क्र. ११८.

# अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याची भाषा : एक आकलन

प्रा. राजेश्वर दुडूकनाळे

कला म्हणजे मानवी मनाचा सहजसुंदर आविष्कार! कोणत्याही प्रकारच्या कलेतून मानवी जीवनातले सौंदर्यच अभिव्यक्त होत असते. साहित्य याला अपवाद नाही. भावसौंदर्य, विचारसौंदर्य आणि कल्पनासौंदर्य शब्दबद्ध करणे हे कलावंताचे-लेखकाचे काम असते. साहित्याच्या क्षेत्रात सौंदर्याचा आविष्कार घडवून आणताना 'भाषा' हा घटक अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतो. लेखकाच्या मनातील अनुभूतीला मूर्त रूप प्राप्त करून देण्याचे काम भाषा करते. लेखक भाषिक दृष्टीने श्रीमंत असल्याशिवाय त्याच्या लेखनाला साहित्यमूल्य प्राप्त होत नाही. म्हणून भाषा हा साहित्याच्या क्षेत्रातला अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्न करू ।। अशी लेखकाची-कवीची भूमिका असल्याशिवाय अक्षर कलाकृती निर्माण होऊ शकत नाही. प्रस्तुत लेखामध्ये अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यभाषेची काही ठळक वैशिष्ट्ये नोंदवली आहेत.

अण्णाभाऊ साठे हे मराठी साहित्यातील एक महत्त्वाचे लेखक आहेत. कथा, कादंबरी, नाटक आणि काव्यलेखन करून त्यांनी मराठी साहित्याला समृद्ध केले आहे. नव्या जीवनजाणिवा, नवी भाषा घेऊन अण्णाभाऊ साठे मराठी साहित्याच्या दालनात उभे आहेत. त्यांच्या साहित्यभाषेचे अनेक विशेष सांगता येतात.

**लालित्यपूर्ण भाषा :**

अण्णाभाऊ साठे हे अत्यंत संवेदनशील लेखक आहेत. त्यांचे मानवी जीवनातील मांगल्यावर-सौंदर्यावर प्रेम आहे. त्यामुळे त्यांचे संवेदनशील मन सतत मानवी जीवनातील, निसर्गातील सौंदर्याच्या शोधात असते. निसर्ग सौंदर्याचे अनेक रंग घेऊन अण्णाभाऊंची भाषा अवतरते. कथा, कादंबरी, नाटक, कवितांमधून त्यांनी वापरलेली भाषा अत्यंत लालित्यपूर्ण आहे. व्यक्तिगत जीवनामध्ये अत्यंत उपेक्षित असणारा हा कलावंत साहित्यात मात्र

अत्यंत श्रीमंत आहे. निसर्गातील तरलता, विविधता अण्णाभाऊंच्या मनाला मोहरून टाकते. 'रवि आला लावुनी तुरा' हे गीत आशयाच्या दृष्टीने तर सुंदर आहेच. त्याचबरोबर भाषेच्या दृष्टीनेही अत्यंत रम्य आहे.

पानापानांत नाचे हा वारा ।
भूप रागाच्या छेडीत तारा ।
हासे कोकीळ मनी द्य मोर नाचे वनी ।
सप्तरंगांचा फुलवून पिसारा ।

अशी मनाला मोहून टाकणारी निसर्गचित्रे त्यांच्या साहित्यात अनेक ठिकाणी येतात. साध्या-सरळ शब्दातून अण्णाभाऊ निसर्गसौंदर्य टिपतात. एकूणच त्यांची भाषा निसर्गाच्या लालित्याने नटलेली आहे.

**उत्कटता आणि काव्यात्मकता :**

अण्णाभाऊंचे मानवी जीवनावर उत्कट प्रेम आहे. 'माणूस' म्हणून जगण्याचा हक्क प्रत्येकाला मिळाला पाहिजे, असे त्यांना मनापासून वाटते. 'बरबाद्या कंजारी' या कथा संग्रहाच्या प्रस्तावनेत अण्णाभाऊ म्हणतात, माझी जीवनावर फार निष्ठा असून मला माणसं फार आवडतात. ती जगतात, जगाला जगवितात. त्यांच्या बळावर हे जग चालतं. त्यांची झुंज नि यश यावर माझा विश्वास आहे. या त्यांच्या भूमिकेमुळेच त्यांचे साहित्य उत्कट बनले आहे. भाषेमध्ये सहजता आली आहे. 'माझी मैना गावावर राहिली!' या लावणीची भाषा अशीच उत्कट आहे.

माझी मैना गावावर राहिली ।
माझ्या जीवाची होतीया काहिली ।।
ओतीव बांधाद्य रंग गव्हाळा । कोर चंद्राची ।
उदात्त गुणाची ।

ही भाषेची उत्कटता रसिकाला प्रभावित करून जाते. शाहिरी काव्यातच ही उत्कटता आहे, असे नाही. कथा, कादंबरीच्या किंवा त्यांच्या इतर साहित्यामध्येही हा भाषेचा गुण दिसून येतो. डॉ. माधव गादेकर यांनी 'अण्णाभाऊ साठे : साहित्यमूल्यमापन' या ग्रंथात अण्णाभाऊंच्या भाषेचे विशेष सांगताना 'मयूरा' कादंबरीचे उदाहरण दिले आहे. सूर्य मावळतीची वाट चालत होता आणि त्याची सोनेरी किरणं त्याच्यामागून पळत होती आणि त्यामुळं चौत्रपालवीनं बिलवरी बहार आलेली वनरात्री मनाला भुरळ घालीत होती. गिरिकंदरांत चौतन्यमय वातावरण पसरलं होतं. वारा वाहत होता. त्याच्या पाठीवर पाखरं सुरकांडीचा खेळ खेळत होती आणि तो खेळ पाहून वृक्षांची पानं टाळ्या पिटीत होती, तर करवंदीच्या जाळ्या गिरक्या मारीत

होत्या आणि उंचच्याउंच सागवानाची झाडं माना डोलावत होती. तो सारा प्रदेशच आनंदानं भरला होता. अशी ही अण्णाभाऊंची भाषाशैली अत्यंत काव्यमय आहे. लोकभाषेतून येणाऱ्या संवादामुळेही कथा, कादंबरीतील काव्यात्मकता अधिकच प्रत्ययकारी बनते.

**चित्रात्मकता :**

दृश्यात्मकता किंवा चित्रात्मकता हा अण्णाभाऊंच्या भाषेचा अत्यंत महत्त्वाचा विशेष आहे. एखादा चित्रकार ज्याप्रमाणे विविध रंगातून चित्र साकार करतो त्याप्रमाणे अण्णाभाऊ शब्दातून भावचित्र साकार करतात. 'माझा रशियाचा प्रवास' या त्यांच्या प्रवासपर लेखनातही ही चित्रात्मकता दिसून येते. बाकू शहराचे वर्णन करताना ते लिहितात, बाकूतील आल्हाददायी वातवरणात आमचा थकवा केव्हाच दूर झाला होता. आम्ही लगेच निघालो. बाकू शहराच्या पुढे कास्पियन समुद्र नि मागे एक उंच टेकडी आहे आणि त्या टेकडीवर कॉ. किरोव यांचा भव्य पुतळा समुद्राकडे हात रोखून उभा आहे. जणू ते भाषण करीत आहेत की, - आझरबैझान, ह्या कास्पियन समुद्रात तेलरूपी अपार संपत्ती दडली ती बाहेर काढा.

त्या पुतळ्याच्या पायाजवळून संपूर्ण बाकू नगरी दिसते. ते पाहून असं वाटते की, आकाशातील इंद्रधनुष्य मानवानं वाकवून जमिनीवर अंथरले असून, त्याचंच नाव बाकू ठेवले आहे. इतकं ते शहर अप्रतिम, सुंदर दिसते नि मन थक्क होऊन जाते. या वर्णनामुळे वाचकाच्या डोळ्यासमोर बाकू शहराचे चित्रच तरळून जाते.

**दुधारी भाषाशैली :**

वरील विवेचनातून अण्णाभाऊंच्या भाषेतील लालित्य, उत्कटता, काव्यात्मकता आणि चित्रमयता समजून घेतली आहे. हे तर अण्णाभाऊंच्या भाषेचे महत्त्वाचे गुण आहेतच. त्यांच्या भाषेचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे ते भाषेला दुधारी शस्त्राप्रमाणे वापरतात. एकीकडे त्यांची भाषा अत्यंत नम्र, कोमल, नाजूक आहे. कारुण्यभावाने ओथंबून वाहते आहे. तिच्यात संगीतातील माधुर्य जसे आहे, तसा उमलत्या फुलातील सुगंधही आहे. तर दुसरीकडे हीच अण्णाभाऊंची भाषा अत्यंत बंडखोर, विद्रोही आहे. समाजपरिवर्तनासाठी ती सज्ज आहे. हातामध्ये बंडाचा झेंडा घेऊन ती विषमता संपवू इच्छिते. शत्रूवर ती तुटून पडते. अन्याय, अत्याचार करणाऱ्यांचा ती धिक्कार करते. विषमतेवर घाव घालते. 'महाराष्ट्राची परंपरा' या कवितेत ते म्हणतात,

आम्हाला चीड दास्याची। जुलमी सत्तेचीच परचक्राची ।
इतिहास साक्ष देत याला । करुनि आम्ही जबरदस्त हल्ला ।
अन्यायाचा कडेलोट केला ।।

समाजातील शोषण, अन्याय, अत्याचार पाहून अण्णाभाऊ साठे यांची भाषा आक्रमक होते. अशावेळी ही भाषा विद्रोही जाणिवा घेऊन येते. 'यादृष्टीने जग बदल घालुनी घाव!' ही रचना अतिशय लक्षणीय आहे.

जग बदल घालुनी घाव । सांगून गेले मला भीमराव ।
गुलामगिरीच्या या चिखलात। रुतून बसला का ऐरावत ।
अंग झाडुनी निघ बाहेरी । घे बिनीवरती धाव ।।
धनवंतांनी अखंड पिळले । धर्मांधांनी तसेच छळले ।
मगराने जणू माणिक गिळिले । चोर जाहले साव ।।

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध-कबीर-फुलेंचा विचारच समाजाला उन्नतीकडे घेऊन जाऊ शकतो हे आपल्या उक्ती-कृतीतून दाखवून दिले. हा बाबासाहेबांचा विचार प्रेरक मानून अण्णाभाऊ साठे यांनी समाजातील विषमतेवर घाव घातले आहेत. कथा-कादंबरी मधूनही अशी विद्रोही भाषा अनुभवायला मिळते. थोडक्यात, अण्णाभाऊंची भाषा मानवी जीवनातील सौंदर्याची जशी अनुभूती देते, तशीच ती संघर्षाची, लढण्याची प्रेरणाही देते.

अण्णाभाऊ साठे यांची भाषा शोषितांच्या ह्रदयातील वेदना घेऊन येणारी आहे. उपेक्षित, पीडित समाजाचे भावविश्व रेखाटणारी आहे. माणसाबद्दल तिच्या अंतरंगात अपार कारुण्य आहे. आणि गुलामीबद्दल तिच्या मस्तकात चीड आहे. त्यामुळेच सामाजिक क्रांतीचे स्वप्न उराशी .बाळगून ती वर्तमानाचा वेध घेत भविष्याची दिशा अधोरेखित करते. एकूणच, अण्णाभाऊंचे साहित्य नवा आशय, नव्या भाषिक जाणिवा घेऊन येणारे आहे.

# विभाग ‘इ’
# ग्रामीण साहित्य

# वि.शं. पारगावकर यांच्या कथांचे वाङ्मयीन मूल्यमापन

प्रा. डॉ. सीताराम निघूट

पारगावकर यांच्या कथा ग्रामीण आणि नगर जीवनातील लोकविलक्षण माणसे व प्रसंग यावर आधारित आहेत. खेड्यात काळाच्या ओघात झालेले बदल, उद्ध्वस्त झालेले वाडे, शहरातील नोकरी करणारा सामान्य माणूस त्यांचे कौटुंबिक जीवन यांचे ते चित्रण करतात. निसर्गाच्या सान्निध्यात ग्रामीण माणसाला द्यावा लागणारा संघर्ष ते विविध व्यक्तीच्या मनस्थितीतून व्यक्त करतात. त्यांच्या कथातून दिसणारे माणसे त्यांच्या कृती उक्तीतून चालण्या-बोलण्यातून डोळ्यासमोर उभी राहतात. त्यासाठी निसर्गातील आणि कौटुंबिक जीवनातील अनेक घटनांचा ते वातावरणासाठी उपयोग करतात. ग्रामीण भागात राहणाऱ्या, ब्राह्मण कुटुंबातील माणूस हा त्यांचा कथेचा केंद्रबिंदू आहे. कथेतील पात्रे कधी आत्मनिवेदन करतात, तर कधी मनमोकळेपणाने आपले दु:ख व्यक्त करतात. त्यामुळे त्याचे ग्रामीण आणि नागर भाषेतील संवाद अतिशय उत्कट आहेत. आपले भाव व्यक्त करताना ते कधी प्रथमपुरुषी तर कधी तृतीयपुरुषी निवेदनपद्धतीचा अवलंब करतात. कथेची सुरुवात आकर्षक असते. वाचकाचे मन वेधून घेण्याचे सामर्थ्य तिच्यात आहे. त्यासाठी त्यांनी कथा आशयाला समर्पक अशी शीर्षके दिली आहेत. ती उत्कंठा वाढविणारी आहेत. शैलीदार निवेदन आणि ग्रामीण भागातील ब्राह्मण कुटुंबातील छोटे-छोटे प्रसंग याद्वारे ते आपल्या कथा फुलवित नेतात.

**पात्र चित्रण :**

वि.शं. पारगावकर यांच्या कथातून प्रकट होणारी मानवी व्यक्तिचित्रे ही अतिशय प्रभावी आणि अविस्मरणीय अशी आहेत. त्यांच्या कथासृष्टीत असंख्य माणसे जिवंत होताना दिसतात. त्या त्या व्यक्तीच्या जीवनातील नाट्य हेरून ते आपल्या कथातून साकार करतात. त्यांच्या कथेतून मोजकीच पात्रे आपल्या स्वभाव, चेहरेपट्टी, चाल इ. वैशिष्ट्यांसह आली आहेत. 'बापूची

वहिनी' कथेतील दिनूचे व्यक्तिचित्रण पहा, ''दिनूचा तो गबाळा अवतार, अघळपघळ बोलणं, भर लग्नाच्या बैठकीत वात्रट मित्राचं कोंडाळं जमवून मूर्खासारखं काहीतरी गप्पा मारीत बसणं, वेळी-अवेळी पान खाऊन गाल फुगवून तोतरं बोलणं'' (पंचरंगी स्वप्न, पृ.२)

''कोणत्याही श्रेष्ठ साहित्यिकाच्या साहित्यातील पात्रे, वय, लिंग, व्यवसाय, स्थिती, स्वभाव, वृत्ती इत्यादी दृष्टींनी विभिन्न, विविध व विपुल असतात. अशा पात्रांमुळे त्यांच्या साहित्यात वैचित्र्य व रंजकता उत्पन्न होते. शिवाय असे साहित्य वाचकाच्या जीवनविषयक जाणिवा रुंदावते. वाचकाचा जीवनविषयक अनुभव समृद्ध आणि विविधांगी बनविते, साहित्यात असे वैचित्र्य जणू परीसस्पर्शासारखे असते, ते साहित्याचे सोने बनविते,'' [२] हे सुनंदा दास यांचे मत दिनूच्या पात्राविषयी तंतोतंत लागू पडते (य.गो.जोशी, 'व्यक्ती व वाङ्‌मय', सुनंदा दास, पृष्ठ १६८).

मानवी स्वभावाचा एक नमुना म्हणून दिनूची व्यक्तिरेखा डोळ्यासमोर उभी राहते. पात्राच्या कृतीतून चालण्या-बोलण्यातून त्यांच्या स्वभावाची कल्पना वाचकांना येते. 'मंतरलेले मांजर' कथेतील मालन रात्रभर भविष्यकाळाची स्वप्ने रंगवत राहते सकाळी ती अमाप उत्साहाने कामे उरकू लागते आणि त्याचवेळी आल्पूत आपल्याशी एखाद्या मांजराशी वेळ घालवण्याकरता तात्पुरते तसे खेळत आहे हे तिला अचानकपणे कळते आणि ती भ्रमनिराश होते, तर 'रक्त' या कथेतील संस्कारशील आणि मध्यमवर्गीय सदाशिवराव हा माणूस आणि त्याच्या सोबत प्रवास करणारी खेडवळ, असंस्कृत सखू यांच्या मानसिक आंदोलनाचे अतिशय उत्कट चित्र ते रेखाटतात. त्यामुळे प्रवासातील त्यांची सोबत रसिकवाचकाच्या मनाला चटका लावून जाते. 'चक्रवाक' कथेतील कमला व देविदास मोरे कथेतील पती-पत्नी, 'कळ' कथेतील सुधीर आणि शिला, 'वळखन' कथेतून नाना, 'पंचरंगी स्वप्न' मधील चंदू, 'मंतरलेले मांजर' मधील मालन आणि अच्युत, 'उजळती लकेर' मधील सुधा 'लंबक' कथेतील उषा, 'पेपर फार सोपा होता!' कथेतील माणिक मनोहर, वीज कथेतील तुका वाघ व ध्रुपदा, 'दामूची राणी' कथेतील दातू, 'खळे' कथेतील रामू, 'पिवळे उन' कथेतील रोहिणी आणि विश्वास, 'मरवा' कथेतील सुहास आणि नीला ही चांगल्या वाईट प्रवृत्तीची पात्रे वाचकांच्या डोळ्यांपुढे उभी राहतात. कथेची सुरुवात पात्राच्या माहितीतून होते. 'वीज' कथेतील तुका हा शेतीत काबाडकष्ट करणारा सामान्य माणूस आहे. शेतीचे नुकसान करणाऱ्या आपल्या बांधावरच्या वडाच्या झाडावर रामराम करतो. परंतु ते झाड वीज पडून कोसळल्यावर त्यांच्या बुंध्याकडे बघून त्याला

कवटाळून ढसाढसा रडतो. 'रक्त' कथेतील सदाशिवरावांचे वर्णन कथेच्या सुरुवातीसच आले आहे. ''सदाशिवराव आय.सी.एस. यांनी अगदी नाइलाजाने आपलं अत्यंत तलम आणि संस्कारक्षम शरीर त्या बारभाईंच्या सार्वजनिक मोटारीत कोंबले, तेव्हा त्यांची शुद्धबुद्ध पार हरपून गेली होती'' (पृ.१६, पंचरंगी स्वप्न). कधीही सार्वजनिक वाहनाने प्रवास न करणाऱ्या सदाशिवरावांच्या संस्कारशील मनाची होणारी घुसमट कथेच्या सुरुवातीपासून वाचकांच्या मनावर परिणाम करते. प्रवासातील वातावरण, तेथील गर्दी, हवेतील उष्णता यामुळे कथाशय अधिक परिणामकारकपणे साकार होतो. स्त्री व्यक्तिरेखाही अतिशय उठावदारपणे त्यांनी रेखाटल्या आहेत, 'जलाशयातील एक वादळ' कथेतील कमलचे असे रेखीव व्यक्तिचित्रे रेखाटले आहे. 'गोरी गोब्री, पाणीदार डोळ्यांची, नेहमी लायब्ररीत बसून अभ्यास करणारी, कुठल्याही मुलांच्या किंवा मुलींच्या गोळक्यात न मिसळता एकटी एकटीच फिरणारी ती शिष्ट कमल'' ('चंद्र आणि चिमणी', 'जलाशयातील एक वाद', पृ. ६८) अशी विविधवृत्तीची पात्रे त्यांच्या कथांमधून दिसतात. ही पात्रे सोशीक मनाची आहेत. वाट्याला आलेले दुःख ती निमूटपणे सोसतात. प्रियकर-प्रियशी, मित्र-मित्र, वडील-मुले, आई-मुले, भाऊ-बहीण अशा विविध नात्यांचे चित्रण या कथांमधून येते. ग्रामीण भागातील वैभवात जगलेली ब्राह्मण कुटुंबे काळाच्या ओघात दारिद्र्याशी सामना करताना दिसतात. गावगाड्यातील जमीनदार आणि त्यांच्या आश्रयाने जगणारे शेतमजूर येथे दिसतात. या पात्रांचे स्वभाव आचार-विचार वैविध्यपूर्ण आहे. परंतु ती या मातीशी इमान राखणारी आहेत. समाजात सर्वत्र भेटणारी ही माणसे प्रातिनिधिक स्वरूपात कथांमधून प्रकट झाली आहेत.

डॉ. पंडित टापरे, मराठी ग्रामीण कथेच्या संदर्भात तंत्रदृष्ट्या विधान करतात, की ''तंत्रदृष्ट्या मराठी नवकथा ही अधिक प्रगत झालेली आहे, पण ग्रामीण मराठी कथेला हे स्थान लाभले नाही, याचे आणखी एक कारण ग्रामीण वास्तवाचा तपश्चर्येच्या बळावर वेध घेण्याचा प्रयत्न झालेला नाही. त्यामुळे (ग्रामीण कथेच्या) तंत्रविकासाला आपोआप मर्यादा पडल्या असे दिसते.'' [३] वि.शं. पारगावकरांच्या पात्रचित्रणाला हाच अडसर झाल्याचे जाणवते त्यामुळे त्यांची ग्रामीण कथातील पात्रे अधिक उठावदार झालेली नाहीत.

**निसर्गचित्रण :**

ग्रामीण भागात राहणाऱ्या माणसाचे निसर्गाशी अत्यंत जवळचे नाते असते. तो त्यांचा सखासोबती असतो. पारगावकरांच्या कथेमधून निसर्ग विविधरूपात प्रकट झाला आहे. ग्रामीण भागातील सूक्ष्म तपशील, व्यक्ती,

घटना, निसर्ग इ. घटक घेऊन पारगावकर आपले अनुभव व्यक्त करतात. जुनी माणसं, जुन्या स्मृती या कथेत लेखकाने आपल्या वाड्याच्या परसदारातील फळा-फुलांचे अतिशय आकर्षक असे चित्रण केले आहे, ''जाई-जुईचे नाजूक वेल, जास्वंदीच्या करवतीसारखी पानाची आणि गर्द तांबड्या रंगाच्या फुलांची रोपटी, शेवंतीचे ताटवे आणि निशिगंधाची पातेदार पानांची, परंतु बहरदार सुगंधाची शुभ्र आणि पिक्कट गुलाबी फुल असलेली रोपं,'' असे परदारी लावलेल्या फळा-फुलांचे वर्णन ते भरभरून करतात; तसेच 'वीज' कथेतील धुवांधार पावसाचे आणि विजेचे वर्णन करताना पारगावकर लिहितात, ''मोठ्या देवळात नगारा बडवल्याप्रमाणे आभाळ गर्जत होतं आणि आषाढाच्या महिन्यात हातात जलती पोत आणि कपाळावर भंडारा माखून अंगाभोवती कडाकड आसूड वाजवीत फिरणाऱ्या पोतराजाप्रमाणे विजा फिरत होत्या आणि कडाडत होत्या'' ('मरवा', पृ. ७८). अशा निसर्गवर्णनातून वातावरणातील भेसूरता अधिक गडद होत जाते व कथा योग्य परिणाम साधते. अशा निसर्गाच्या चित्रणातून अधिक परिणामकारक झालेला दिसतो. 'खळे' कथेत शेतकऱ्याच्या जीवनातल्या सुगीतल्या हंगामाचे चित्रण येते. जोंधळा चांगला आलेला आहे. त्यामुळे तो शेताची राखण करतो. तो सगळा परिसर चैतन्यमय झाला होता. त्याचे रसमय वर्णन पारगावकर करतात, ''रामूचं शेत असलेलं सारं शिवार आणि लाख दुभागून गेलेली नदी पलीकडचा माळदेखील आता हिरवागार दिसत होता. रानांत धान जेवढं चमकत होतं, तेवढंच नदीच्या काठाला आणि डोंगरांच्या पायथ्याला गवताचं रान डुलत होतं. घरात दिवाळीचा सण आल्यावर जसे उत्साहाचे, आनंदाचे वारे वाहावेत आणि सारं वातावरण आल्हादमय होऊन जावं, तसं आता देवगावच्या शिवाराचं झालं होत'' (पृ. ११०, 'खळे', 'मरवा'). दामूचा जोंधळा लोकांचे लक्ष वेधून घ्यावे असा बहरला होता. पण ऐन भरात आलेल्या त्याच्या जोंधळ्यावर चिकट्या रोग पडतो. शेतकऱ्याच्या पाचवीला पूजलेली ही नियती त्याला मनोमन मोडून काढीत असते. त्याचे वर्णन अशा निसर्गचित्रणातून त्यांनी बहारदारपणे साकार केले आहे. कथेतील अनेक प्रसंग ते निसर्गातील घटनांच्या वर्णनाने परिणामकारक करतात. कधी निसर्गाचे रौद्रभीषण रूप दाखवतात, तर कधी पौर्णिमेच्या शीतल चांदण्याची बरसात ते अशा वर्णनातून करतात. निसर्ग हा मानवी जीवनातील अविभाज्य घटक आहे. विशेषत: ग्रामीण जीवन तर निसर्गावर अवलंबून असते. शेती व्यवसाय निसर्गाच्या लहरी पणामुळे अनेकदा तोट्यात येतो. तरीही शेतकरी निसर्गाच्या प्रकोपाला तोंड देत असतात. त्याच्या मनस्थितीचे विविधांगी दर्शन घडवताना उत्कट अशी

निसर्गवर्णने पारगावकरांच्या कथांमधून दिसतात. हा निसर्ग वाचकांच्या अंतकरणाशी संवाद साधतो, श्रावणातील सर, हिरवा परिसर, ऊनपावसाची पाठशिवण, डोंगरदऱ्या, ओढ्यांना येणारे पूर तर कधी दुष्काळामुळे हवालदिल झालेला शेतकरी आणि जनावरे यांची होणारी होरपळ त्यांच्या काही कथांमधून दिसते. मानवी भावभावनांचे दर्शन परिणामकारक होण्यासाठी त्यांच्या कथेतील निसर्ग विविध रूपात साकार होतो.

**वातावरण निर्मिती :**

वातावरण निर्मिती हा कथेचा महत्त्वाचा घटक असतो. यासाठी पारगावकर आपल्या कथांची सुरुवात आकर्षक रीतीने करतात. कथेच्या सुरुवातीलाच एक-दोन परिच्छेदांतून पुढील घटना प्रसंगांचा सूक्ष्मसा बोध वाचकाला होतो. काही कथांच्या सुरुवातीलाच विशिष्ट परिसराची माहिती करून देऊन त्यानंतर कथानकाचा धागा जोडला जातो. माणसाचे वय झाले की त्याला नैराश्य येते. 'निष्ठा' कथेतील नानाने वयाची सत्तरी गाठलेली आहे. घरात असून, नसल्यासारखे त्यांच्याकडे कोणी लक्ष देत नाहीत. त्यांच्या स्थितीचे वर्णन कथेच्या सुरुवातीलाच येते, वय सत्तरीच्या वर झालेलं. जवळजवळ सारंच संपलेलं खाणंपिणं आणि हरि हरि करीत बसणं. क्वचित कधी मित्रमंडळी जमली, तर पत्ते खेळणं. मित्रमंडळी तरी कोण? आमच्याच वयाची त्यातली अर्धीअधिक हे जग सोडून गेलेली. राहिलेल्यांपैकी कोणी पायानं अधू, तर कुणी डोळ्यानं, कुणाला ऐकू येत नाही, तर कुणी अर्धांगवायूनं अंथरुणाला खिळून. त्यातून राहिलेली थोडीफार माझ्यासारखी'' ('राणी', पृ. २८). नानाच्या एकूणच थकलेल्या प्रकृतीचे दर्शन कथेच्या सुरुवातीलाच घडते. त्यानंतर मग नानाच्या मनोवस्थेचे चित्रण लेखक करतात. त्यामुळे कथाशयाला गती मिळते व कथा आवश्यक तो परिणाम साधते. कधी कथेच्या सुरुवातीलाच विशिष्ट परिसराची माहिती करून देऊन त्यानंतर कथानकाचा धागा जोडला जातो. 'हिकमत' कथेत गावात रोगाची साथ येते. त्यासाठी काही लोक तालुक्याला डॉक्टर आणायला जातात. त्यावेळी संध्याकाळचे गावाचे ते भयसूर वातावरण कथेच्या सुरुवातीलाच येते, ''रात्रीचे दहा वाजून गेले होते. चहूकडे सामसूम झाली होती. पंचायतीचे दिवेसुद्धा विझून गेले होते. एक अर्ध-रिकामटेकडं माणूस गावातल्या उभ्या रस्त्यातून खडाखडा चढाऊ जोडा वाजवीत रस्त्यानं जात होतं. अशा वातावरणातून गावातील (राणी पृ. ३६) स्थिती जाणून घेण्याची वाचकाची उत्सुकता वाढत जाते, तो कथा वाचत जातो. असेच 'वर्षाव' कथेच्या सुरुवातीस वेणू आणि विश्वनाथ यांच्या वैवाहिक जीवनातील विसंवादाचे

चित्रण आले आहे. विश्वनाथ कामावरून घरी उशिरा येतो. त्यांत त्यांना अपत्य नाही. त्यामुळे वेणूला घरात एकटे-एकटे वाटते. कशात लक्ष लागत नाही याचे चित्रण करताना पारगावकरांनी कथेच्या सुरुवातीस वेणूच्या अस्वस्थ मानसिक स्थितीचे चित्रण केले आहे. ते लिहितात, मागच्या परसात आरामखुर्ची नेऊन ठेवतानाच वेणू चिडली होती. जवळजवळ एक तास तिने विश्वनाथची वाट पाहिली होती. दुपारचा चहा तिने तो आल्यानंतरच करायचे ठरवले होते; परंतु पाच वाजून गेले आणि त्याची नेहमीप्रमाणे येण्याची वेळदेखील टळून गेली,'' (पृ. १३०). या वर्णनातून तिच्या विरही मन: स्थितीचे सुरुवातीस वर्णन आल्यामुळे पुढे काय घडले असेल, अशी उत्कटता वाचकाला लागून राहते व तो कथा वाचत जातो व कथाशय योग्य परिणाम साधतो. त्यामुळे कथेच्या निर्मितीत सुरुवातीस उत्कृष्ट वातावरणनिर्मिती केल्यामुळे ती आवश्यक तो परिणाम साधते. मध्यमवर्गीय कौटुंबिक जीवनातील एकटेपणाची खंत ही कथा परिणामकारकपणे साकार करते. पारगावकरांच्या अशा कितीतरी कथा आहेत की ज्यात आशय आणि अभिव्यक्तीचे रसायन सहजपणे साधले आहे. छोट्या कुटुंबात मुलांचा सांभाळ करण्यासाठी कोणी नसते. पती-पत्नी नोकरी करतात. नोकरीतील ताणतणाव सहन करीत ते सहजीवन व्यतीत करीत असतात. अशाच घरात एखादे मूल असेल तर त्यांना तारेवरची कसरत करावी लागते. मुलाकडे लक्ष द्यायला वेळ नसतो. त्यामुळे एका दडपणाखाली ते मूल सतत वावरताना दिसते. याचे चित्रण करताना कथेची सुरुवात अतिशय उत्कट अशा वातावरणनिर्मितीसाठी त्रिकोण, कथेची सुरुवात पाहण्यासारखी आहे. ''पायऱ्या चढून वर दाराशी येईपर्यंत मोहन आपल्याच नादात होता. दार बंद होते, तेव्हा आपोआप त्याचा हात कॉलबेलपाशी सरकला; परंतु त्याच्याही अगोदर त्याचे लक्ष वर गेले आणि दाराला असलेले कुलूप त्याला दिसले. ('चंद्र आणि चिमणी', पृ. ९४). मोहन एकुलता एक मुलगा आहे. आई-वडील नोकरी करतात. घरात सर्व सुखसोयी आहेत, पण त्याला आपले आई-वडील, त्यांचे प्रेम हवे आहे. नोकरीधंद्यानिमित्त आज कुटुंबातील जिव्हाळा संपुष्टात येत आहे. याचे निरागस बालमनावर विपरीत परिणाम होतात. त्याला सतत असुरक्षिततेची भावना वाटत असते. त्याचा होणारा कोंडमारा दाखवण्यासाठी कथेची सुरुवात पारगावकरांनी आकर्षक केली आहे. त्यामुळे योग्य वातावरणनिर्मिती होऊन कथा योग्य तो परिणाम साधते. पारगावकरांच्या 'जुनी माणसं, जुन्या स्मृती' या कथेत आपले घर नात्यातली माणसं सोडून कथानायक मुंबईला नोकरीनिमित्त स्थिरावलेला आहे. पत्नीही शहरातील केली. त्यामुळे कधीतरी आपल्या गावी जावे, याची ओढ

त्याला लागते. पंधरा वर्षांनंतर आपल्या पत्नीला घेऊन आपले बालपण ज्या वाड्या-घरात गेले तेथे तो जाण्याचे ठरवतो, आई-वडील देवाघरी गेले. फक्त एक जुना धागा म्हणून काकी तेवढी मागे होती. वाडा ती सांभळत होती. त्या स्मृती साकार करताना पारगावकर योग्य असे वातावरण कथेतून निर्माण करतात. ते लिहितात, बराच वेळ टांग्याचा प्रवास करून आम्ही आमच्या घरी पोचलो, तेव्हा माझी वृद्ध चुलती डाव्या हातात दिवा आणि उजव्या हातात दहीभात घेऊन आम्हाला ओवाळण्याकरिता दारात आली! आमच्याकडे पाहून ती प्रसन्न हसली आणि पदर सावरीत भात ओवाळून जात जाण्याकरीता हातातल्या दिव्याचा उजेड आम्हाला दाखवू लागली! ('पंचरंगी स्वप्न', पृ. २८) यातून ग्रामीण संस्कृती, तेथील वातावरण, माणसांमधील जिव्हाळा या गोष्टींचे दर्शन जसे घडते; तसे आपल्या माणसांमधील प्रेम, जिव्हाळा, आपुलकी या भावना या प्रसंगातून दृगोचर होतात. पारगावकरांच्या कथांमधून आवश्यक त्या प्रसंगांना अनुरूप अशी वातावरणनिर्मिती तयार झाल्यामुळे ते प्रसंग दीर्घकाळ वाचकाच्या भावभावनांना आव्हान करतात. त्याची उत्कटता टिकवून ठेवतात, आणि कथा वाचत जातो. आपल्या अवतीभोवतीच्या अनेक घटना-प्रसंगांतून लेखकाने वातावरणनिर्मिती केली आहे. त्यामुळे कथा अधिक परिणामकारक झाल्या आहेत.

**निवेदनपद्धती :**

लेखक आपल्या अनुभवाला आलेले अनेकविध घटनाप्रसंग रेखाटत असतो; परंतु या सर्वच घटना तो प्रत्यक्ष अनुभव नसतो, तर काही घटना त्याने इतरांकडून ऐकलेल्या असतात, तर काही प्रसंगांना त्याने प्रत्यक्ष तोंड दिलेले असते. या घटना-प्रसंगांना शब्दबद्ध करताना तो विविध निवेदनपद्धतीचा अवलंब करत असतो. लेखक सर्व प्रसंग वाचकाला स्वत: सांगतो तेथे प्रथमपुरुषी निवेदनपद्धतीचा तो अवलंब करत असतो किंवा घटनाप्रसंग ज्या क्रमाने घडले, ते त्रयस्थ पद्धतीने सांगतो, तेथे तृतीयपुरुषी निवेदनपद्धती वापरत असतो, तर कधी स्मृतिचित्रात्मक पद्धतीचा अवलंब करतो, कथानकाची परिणामकारकता निवेदनपद्धतीवर अवलंबनू असते.

पारगावकरांच्या कथेतील निवेदनपद्धती परिणामकारक आहे. मोजक्या शब्दांचा वापर ते करतात. आपल्याला जाणवलेले अनुभव अभिव्यक्त करण्यासाठी ते कथा शीर्षकापासून दक्ष असतात. त्यांच्या कथांची शीर्षकेही मोठी आकर्षक आहेत. उदा. 'फुंकर', 'डोळे', 'प्रतीक', 'त्रिकोण', 'खळे', 'अस्थी', 'लंबक', 'ओल', 'कवच', 'शतक', 'रक्त' इ. ही कथाशीर्षके वाचकाला प्रथम आकर्षित करतात. कथा वाचल्यावर त्याची समर्पकता ते

पटवून देतात. या कथाचा आरंभ आकर्षक, उत्कंठा वाढविणारा आहे. कथेची सुरुवात कथागत पात्राच्या माहितीतून होते. उदा. 'संधिकाल' या कथेतील प्रौढवयातील प्रेमाचे चित्रण करताना वसंतरावाच्या स्वभावाचे चित्रण कथेच्या सुरुवातीस आले आहे ते असे, भराभरा पावले टाकीत वसंतराव घरात येऊन पोचले, खुर्चीवर टेकून त्यांनी बुटाचे बंद सैल केले आणि पायापासून अलग झालेले बूट लाथेनंच त्यांनी कोपऱ्यात सारले. वसंतरावाचे वर्णन तृतीयपुरुषी निवेदनशैलीत पारगावकर साकार करतात. पत्नीपेक्षा शेजारी राहणाऱ्या कर्णिकांच्या लीलाचा स्वभाव त्यांना आवडतो. ते कथा वाचताना सुरुवातीसच त्यांच्या वर्तनातून त्यांचा स्वभाव लक्षात येतो. पारगावकरांनी कथाशयानुसार निवेदनपद्धती वापरली आहे. 'मंतरलेले मांजर', 'पाण्याची कात', 'उजळती लकेर', 'ओल', 'पेपर पार सोपा होता!', 'जाग', 'वीज', 'दामूची राणी', 'खळे', 'पिवळे ऊन', 'मरवा', 'चंद्र आणि चिमणी', 'फुंकर', 'विरापता', 'मुक्ती', 'त्रिकोण', 'जलाशयातील एक वादळ', 'डोळे', 'शिखर', 'सात सत्तावनची लोकल' या कथा तृतीयपुरुषी निवेदनपद्धतीतून साकार झाल्या आहेत. लेखक त्रयस्थाच्या भूमिकेतून कथाप्रसंग पाहत आहे व सांगत आहे, असे चित्रण कथेच्या सुरुवातीस येते. 'सात सत्तावनची लोकल' या कथेची सुरुवात पहा, नेहमीप्रमाणे कागदाची आवराआवर करून टेबलावरचा सारा पसारा सदाशिवनं कपाटात कोंबला. कपाटाला कुलूप लावलं आणि नेहमीच्या ठराविक वेळेला तो ऑफिसमधून बोहर पडला ('चंद्र आणि चिमणी', पृ. ९२). वसंतरावांचे लोकलच्या वेळेला बांधलेले जीवन गाडी चुकली तर आपण घरी वेळेत पोचू शकणार नाही. त्यामुळे तो दररोज ठरावीक वेळी कितीही काम असले, तरी ऑफिस आणि लोकल दोन्ही ठिकाणी वेळेला बांधला गेला होता. त्याचे त्रयस्थपणे पारगावकर चित्रण करतात. त्याचबरोबर 'लंबक', 'गंधानं कोरलेली वाट', 'दीपमाळ', 'डोळे', 'अस्थि' इ. कथा या प्रथमपुरुषी निवेदनपद्धतीतून साकार झाल्या आहेत.

'अस्थी' या कथेची सुरुवात पहा, ''अंथरुणावर पडण्याचा कंटाळा येत होता. कंटाळा येणारच. उभ्या आयुष्यात चार-पाच तासांच्यावर झोपायची सवय नाही. कधी आजारपण नाही, कधी आळस नाही. प्रकृती ठणठणीत. डोक्यात विचार आणि शरीर कामाकरिता नेहमी आसुसलेलं. इतक्या वर्षात आताच असं घडलं. अंग थोडं गरम झालं. हातापायांना थकवा आला'' ('मरवा', पृ.९७). वडिलांच्या अस्थीचे आपण धार्मिक पद्धतीने विसर्जन करू शकलो नाही, याची रुखरुख मनात राहून गेलेला कथानायक कथेच्या सुरुवातीस दिसतो. प्रथमपुरुषी निवेदनातून साकार झालेली ही कथा

उत्कटपणे साकार झाली आहे. एकूणच कथेच्या आशयानुसार त्यांनी निवेदनशैली वापरली आहे. ही शैली आकर्षक आणि परिणामकारक आहे. अनुभवाला साक्षात वाचकांच्या डोळ्यांपुढे उभे करण्याचे सामर्थ्य त्यांच्या निवेदनशैलीत आहे.

**कथेतील संवाद :**

वि.शं. पारगावकर यांनी समाजातील विविध स्तरातील लोकजीवनाचे चित्रण आपल्या कथांमधून केले आहे. कथेतील पात्रानुसार कथेत संवाद आले आहेत. ग्रामीण भागातील अडाणी स्त्री-पुरुषांच्या तोंडी त्यांची रोजच्या जगण्याची भाषा आणि संवाद येतात तर निवेदन प्रमाणभाषेत येते. 'खळे' कथेत ग्रामीण जीवनाचे चित्रण आले आहे. रामूच्या शेतात जोंधळ्याचे पीक चांगले आले आहे. त्याची राखणं करण्यासाठी तो रोज जातो. त्यावेळी शेजारचा शेतकरी धोंडिबा आणि रामूचा संवाद पहा -

''जमीन पर निस्ती लोणी हाय लोणी नव्ह धोंडिबा?''

''तर व्हं मालक! पूर्वेजांची पुन्यायी हाय ती आपल्या!''

''खडं पेरलं तरीबी उगवून वर येतील, पर कष्ट कराया पायजेल बघ!''

''कष्टाला म्हेनतीला काय डरतो व्हय आपुन मालक।'' ('मरवा', पृ. ११०)

वरील संवादातून कथाआशयाला गती मिळते. पात्रानुरूप संवाद असल्यामुळे पात्रांच्या मनातील भावाशय अनुभवाशी एकरूप असे उतरले आहेत. 'जळातला मासा' या कथेतील रंभाजी पाटील आपल्या कुटुंबासाठी राबतो. घराला नावारूपाला आणतो. त्याला पत्नीची साथ होती. मुले-सुना शब्दाच्या बाहेर नव्हत्या. एकदा त्याचा थोरला मुलगा गणपा आणि त्याची पत्नी यांच्यात वाद होतो. त्यावेळी तो जेवताना मुलाला याबाबत विचारतो, तेव्हा गणपा खजील होऊन निमूटपणे जेवण करतो, तो संवाद पाहा-

''काय बेत गणपतराव?''

गणपतला पाटलाच्या विचारण्याचा अर्थच कळला नाही. तो आपला सहजपणे म्हणला,

''काय बी न्हाई!''

''न्हाई, उगी आपलं ताटात परतीबिंब बघून जेवन चाल्लंय आज?''

''तसं काही आबा? भूक लई लागलीय!''

''त्योच मी मंतोय! लईच थकल्यावनी दिसतोय! हगामा लईच जोरात झाला जनुं?''

''छा,छा! कुस्ती त म्या आसांत केलीबी न्हाई?''

''मग कोपरं अन नगड्या कसानं पुटलीत रं?''

हा बापलेकांचा संवाद मोठा रंजक आहे. पारगावकर यांच्या कथांमधील संवादातून तो प्रसंग हुबेहूब डोळ्यासमोर उभा राहतो. कथेतील निवेदन हे प्रमाणभाषेत आले आहे. तरी त्यांचे ग्रामीण भाषेतील संवाद अधिक परिणामकारक झाले आहेत. ग्रामीण कथा तशा अत्यल्प आहेत. मध्यमवर्गीय कौटुंबिक जीवनाचेच अधिकतम् चित्रण त्यांच्या कथांमधून येते. त्या कथांमधील संवाद हे पात्रानुरूप आले आहेत. 'संधिकाळ' कथेतील वसंतराव व समुजी या मध्यमवयीन पती-पत्नीचा संवाद त्यादृष्टीने पाहण्यासारखा आहे. वसंतरावांना आपल्या शेजारी राहणारी कर्णिकांची पत्नी लीला आवडते. खिडकीतून ते तिच्या हालचाली टिपत असतात. ती शेजारी राहत होती. बदलीमुळे दुसऱ्या शहरात ती जाते. त्यावेळी वसंतरावांना एकदम उदास वाटते. एकांत निवांतवेळी पती-पत्नीमध्ये आपल्या प्रेमासंबंधी संवाद होतो. त्यावेळचा संवाद मोठा रोचक आहे. वसंतराव आपल्या पत्नीला आपली विरहावस्था सांगाताना म्हणतात-

"तसा त्यामुळं तुझ्यावर मी कसलाच अन्याय केला नाही. त्याची मला कधी खंत वाटणार नाही! उलट, त्यामुळं तर तुझ्यावर मी अधिक प्रेम केलं आहे!"

"मग झालं तर! आणि माझी कुठं तक्रार आहे! उलट मला तर कसली जाणीवदेखील नाही!"

"त्यामुळे तर अस्वस्थता वाढलेली आहे. त्यामुळं तुझ्या प्रेमाला मी पात्र राहिलो! आणि दुसरं म्हणजे लीलेचं माझ्यावर कधीच प्रेम नव्हंत!" ('पंचरंगी स्वप्न', पृ. ८६) आपल्या पतीचे हे प्रेमासंबंधीचे विचार ऐकून ती चकित होते. आणि पतीबद्दल एकप्रकारचा दुरावा तिला वाटतो. हा मध्यमवर्गीय जोडप्याचा संवाद कथाआशयाशी समर्पक असा आहे. त्यात प्रमाणभाषेचा वापर केला आहे. त्यांच्या 'राणी' या कथासंग्रहातील 'ओटीभरण' या कथेतील संवादही असेच प्रमाणभाषेत कथाआशयाची एकरूप असे आहेत. एका मध्यमर्गीय मुलीचे लग्न बापू मोठ्या थाटात लावून देतात. सासरी मुलीचा ओटीभरण समारंभ होतो आणि दुसऱ्या दिवशी आपल्या लाडक्या कन्येला यमूला-जावईबापू घरातून बाडबिस्ताऱ्यासह गड्यासोबत काढून देतात. यमूबरोबर चिठ्ठीही देतात. जावईबापूची समजूत कशी काढावी म्हणून बापू आपल्या मुलाकडे चिठ्ठी पाठवून देतात. त्यावेळी मुलीच्या एकाएकी घरी येण्याने चिंताग्रस्त झालेल्या आई-बाबाचा संवाद मोठा रंजक आहे. तो प्रमाणभाषेत आला आहे. तो असा :

"काय लिहिलंय पत्रात?"

"म्हणतात, तुमच्या मुलीला तुमच्याकडे ठेऊन घ्या. पुन्हा केव्हाही आमच्याकडे पाठवू नका!"

"हे काय नवीनच खूळ निघालंय म्हणते मी?"

"नानासाहेबांचा स्वभाव का तुला माहीत नव्हता. तरी मी म्हणत होतो, मुलीला त्या घरी नको द्यायला. पण तूच म्हणलीस आपल्या नात्यातले आहेत ते!" ('राणी', पृ. २२) शेवटी चिठ्ठीचे उत्तर चिठ्ठीनेच देतात. पहाटे केव्हा एकदाचे जावईबापू यमूला न्यायला येतात. पण एकमेकांच्या चिठ्या पोचवण्यात राजाची रात्र जागून निघते. मध्यमवर्गीय कौटुंबिक जीवनातील प्रसंग रेखाटन करताना ते पात्रानुरूप प्रमाणभाषेतील संवाद वापरतात. वि.शं. पारगावकर यांच्या कथांमधून येणारे संवाद प्रभावी आहेत. अनुभवातील नाट्य संवादातून साकार होते, तसेच हे संवाद स्वाभाविक आणि त्या-त्या व्यक्तीची मन:स्थिती स्पष्ट करणारे आहेत. आवश्यक तेथे त्यांनी प्रमाणभाषा आणि ग्रामीण भाषा संवादासाठी वापरली आहे. त्यांच्या कथेतील संवाद नेमके आणि अनुभवाला समर्थपणे प्रकट करणारे आहेत.

**भाषाशैली :**

साहित्याचे माध्यम भाषा आहे. आपले अनुभव व्यक्त करण्यासाठी लेखकाला भाषेचा वापर करावा लागतो. वि.शं. पारगावकर हे ग्रामीण भागातून नोकरीनिमित्ताने पुण्यात स्थिरावले. तरी त्यांचे बालपण बीडसारख्या मराठवाड्यातील ग्रामीण वातावरणात गेले. त्यामुळे मराठवाड्यातील बोलीभाषेतील अनेक शब्द त्यांच्या लेखनात येतात. विविध स्तरातील समाजजीवनाचे चित्रण त्यांनी आपल्या कथेतून केले आहे. त्यामुळे कधी प्रमाणभाषा, तर आवश्यक तेथे संवादासाठी त्यांनी ग्रामीण भाषा वापरली आहे. यासंदर्भात डॉ. वासुदेव मुलाटे लिहितात, "जीवनातील वास्तवाचे प्रकटन साहित्यातून व्हायचे असेल, तर त्या-त्या जीवनातील भाषेचा विचार आणि वापर लेखकाला करावाच लागतो."[३] (मुलाटे वासुदेव, 'ग्रामीण कथा स्वरूप आणि विकास', साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. १९९२, पृ. २३९) त्यामुळे कथानुभवाला अनुरूप अशी भाषा पारगावकरांच्या कथांमधून दिसते.

भाषेचा वाचकावर जो परिणाम होतो तो दुहेरी असतो. शब्दांचा अर्थाचा त्याच्या संस्कारवश वृत्तीवर नकळत परिणाम होत असतो. ना.सी. फडके म्हणतात, "भाषेचे कार्य दुहेरी आहे. ती अर्थवाहक व ध्वनिवाहक आहे. तिची ही दोन्ही अंगे एकमेकांस अनुरूप असली, म्हणजे अंत:करणास सुखविणारे असे काही एक अवर्णनीय माधुर्य तिच्या ठिकाणी उत्पन्न होते, या

शोभेसच भाषाशैली म्हणतात.''[४] ('प्रतिभासाधन', ना.सी. फडके देशमुख आणि कंपनी, पुणे, प्र.आ.पृ. २२३, सोळावे पुनर्मुद्रण, १९९५) भाषा ही शब्दाची बनलेली असते. व्यक्ती तितक्या प्रकृती त्याप्रमाणे प्रत्येक लेखकाची लेखनशैली वेगळी असते. पारगावकरांनी स्वत:ची शैली लेखनासाठी वापरली आहे. तिच्यात कमालीचा सहजपणा आहे. पांडित्य किंवा संस्कृतप्रचुरता नाही. ती खास अशी त्यांची शैली आहे. प्रसंग उभे करण्याचे सामर्थ्य त्यांच्या भाषेत आहे. त्यांच्या 'वीज' कथेतील भाषेचा नमुना पाहिला तर हे आपल्या सहज लक्षात येईल, मोठ्या देवळात नगारा बडवल्याप्रमाणे आभाळ गर्जत होतं आणि आषाढाच्या महिन्यात हातात जळती पोत आणि कपाळावर भंडारा माखून अंगाभोवती कडाकडा असूड वाजवीत फिरणाऱ्या पोतराजाप्रमाणे विजा फिरत होत्या आणि कडाडत होत्या''[५] ('मरवा', पृ. ७८). या वर्णनातून समर्पक अशा प्रतिमांतून पावसाळी वातावरणातील धुवांधार पाऊस आणि विजांचा भयकारी आवाज यातून कथाशय वाचकांच्या मनावर नेमका परिणाम करतो आणि कथानुभव अधिक परिणामकारक होतो. पारगावकरांनी निवेदनासाठी प्रमाणभाषेचा वापर केला आहे. त्यांच्या कथेतील वाक्य अतिशय आशयसमृद्ध आहेत. 'दामूची राणी' या कथेतील दामूच्या असाहाय्य वृत्तीचे चित्रण करताना पारगावकर लिहितात, ''मुकं जनावर विकायला काढावं, तसा दामू घरातून बाहेर पडला'' ('मरवा', पृ. ९४). असे आशयसमृद्ध वाक्य त्यांच्या कथांमधून आढळतात. छोट्या-छोट्या वाक्यांतून ते आपला कथाशय फुलवत नेतात. त्यांच्या 'बापूची वहिनी' या कथेत लग्नानंतर सर्व पाहुणे मंडळी निघून जातात. त्यावेळी घरात एकट्या वहिनीचे वर्णन करताना पारगावकर लिहितात, ''लग्नाला आलेली पाहुणे मंडळी निघून गेली होती. घरात एक पाहूणी होती, ती म्हणजे त्याची वहिनी. वहिनी आता पाहुणी राहणार नव्हती, तरीही ती अजून पाहुण्यासारखंच वागत होती'' ('पंचरंगी स्वप्न', पृ. ३). नव्या घरात आलेल्या वहिनीची मानसिक स्थिती चित्रण करताना तिच्या एकटेपणाची पार्श्वभूमी अशा छोट्या-छोट्या वाक्यांतून ते अतिशय परिणामकारकपणे साकार करीत जातात. त्याबरोबर कितीतरी ग्रामीण शब्दही त्यांच्या कथांमधून आले आहेत उदा. लुगडे, धिलांग, नग, काड, आगुदर, हेद्र्यावाणी, वाडूळ, रंडुलपण, सबुद, औंदा येतात. ते कथाशयाशी एकरूप असे आहेत, तसेच विविध ठिकाणी आवश्यक असे वाक्प्रचारही आले आहेत. उदा. अवंडा गिळणे, डागण्या देणे, पांग फेडणे, दिशा फरफटणे, चाहूल लागणे, डोळ्यात हास्य उमलणे, खाली मान घालणे [३०] हे वाक्प्रचार

कथाआशयाला फुलवण्यात परिणामकारक ठरले आहेत. त्याबरोबरच काही नाट्यानुगामी शब्दही येतात. छे छे! बरं बरं!

आवश्यक त्या ठिकाणी इंग्रजी शब्दांचा वापर केला आहे. कारण आज कितीतरी शब्द आपण इंग्रजी भाषेतून स्वीकारले आहेत. तेही त्यांच्या कथांमधून येतात. उदा. कॉलेज, ऑफिस, नर्स, नोट्स, ओव्हरकोट अशा शब्दांबरोबरच इंग्रजी वाक्येही येतात. कारण त्यांच्या बहुसंख्य कथा या मध्यमवर्गीय कौटुंबिक जीवनाचे चित्रण करणाऱ्या आहेत. त्यामुळे नोकरीनिमित्त व्यावहारिक पातळीवर इंग्रजीचा वापर होतो. एवढेच नव्हे, तर त्यांची मुले इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेत आहेत. त्यामुळे साहजिक अशी वाक्ये मुलांच्या तोंडी येतात. उदा. गुड इव्हिनिंगज्, व्हेरी गुड बॉय. त्यामुळे अशी वाक्यरचना ही कथाआशयाची अपरिहार्य बाब म्हणून ती येणे साहजिकच आहे. त्यामुळे कथाशय उठावदारच होतो. एकूणच पारगावकरांच्या कथांतून साकार होणाऱ्या भाषाशैलीचा विचार करता ती शैलीदार आहे. जीवनातील वैविध्यपूर्ण अनुभव समर्थपणे उभे करताना ते पात्रानुरुष भाषाशैली वापरतात निवेदनासाठी प्रमाणभाषा वापरतात. त्यांचे बालपण मराठवाड्यात गेले असल्यामुळे त्या भाषाशैलीचा काहीचा परिणाम म्हणून मराठवाड्यातील प्रादेशिक शब्दही येतात. कथेतील पात्रांची सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक स्थितीप्रमाणे त्यांच्या कथेतील पात्रांची भाषा साकार होते. त्यामुळे त्यात कृत्रिमता जाणवत नाही. साधी, सरळ भाषा व छोट्या-छोट्या वाक्यांतून ते आपले कथानुभव सांगतात. त्यामुळे कथा अधिक परिणामकारक झाल्या आहेत.

**निष्कर्ष :**

वि.शं. पारगावकर यांनी मराठी लघुकथेला ताकद प्राप्त करून दिली. मराठी लघुकथेला समृद्ध व सशक्त केलेले आहे. त्यांच्याकडे अनुभव हेरण्यासाठी असादी लागणारी तरबेजपणा कलात्मक निर्मितीशील नजर त्यांच्या एकूण कथांच्या अभ्यासातून दिसते. कथांची मांडणी करताना ते नेमक्या अनुभवकेंद्राची ओळख पटवून देतात. हे अनुभव सखोल आणि विषयाची खोली प्रकट करणारे आहेत. वाचकांच्या हृदयाला हे अनुभव भिडतात. त्यांनी आजवर अलक्षित राहिलेला जीवनार्थ वाचकमनात संक्रमित केला आहे. हे त्यांचे महत्त्वपूर्ण असे योगदान मराठी कथेमध्ये आहे. त्यांनी आपली कथा वाचकांवर लादलेली नाही, म्हणजे त्यांना काय म्हणायचे आहे असा प्रश्न कथा वाचून संपल्यावर वाचकाला पडत नाही. हा कथानुभव काय म्हणतो आहे, याच एका प्रश्नात वाचक कथा संपल्यावर बुडून जातो. पारगावकरांच्या कथेचा मुख्य यशोबिंदू हाच आहे. त्याची कथा केवळ

वाचकाची भावावस्था ढवळून टाकत नाही, तर.त्याची बौद्धिक प्रक्रिया चलित करते. आवश्यक तेथे ग्रामीण भाषा त्यांनी वापरली आहे. साधारणपणे मध्यमर्गीय जीवनाचे आशयद्रव्य त्यांच्या कथेचा केंद्रबिंदू आहे. तरीही उपेक्षित जगणेही त्यांनी तितकेच समर्थपणे कथेतून मांडले आहे. एकूणच नवकथेची शक्ती ज्यांनी मराठी कथेत स्थिरपद केली अशा कथाकारांमधील एक जबाबदार कथाकार म्हणून त्यांच्या कथेकडे पाहणे रास्त ठरेल. मराठी कथेच्या इतिहास त्यांच्या कथांची नोंद घेणे आवश्यक आहे. एवढे समृद्ध आणि वैविध्यपूर्ण अनुभवविश्व त्यांच्या कथांचे आहे.

''१९६० नंतर खेड्यापाड्यातून आणि शिक्षणाने डोळस बनलेली समाजाच्या सर्व स्तरातील मंडळी, कथालेखन करू लागलेली दिसते. त्यामुळे बहुसंख्येने निर्माण होणारी कथा ही ग्रामीण मनाच्या संवेदना, जाणिवा व्यक्त करणारी कथा आहे. या तुलनेत नागर अनुभवविश्व चितारणारी कथा कमी आहे. तरीही या कथेतून येथील समग्र प्रवेशाचे, जीवनाचे चित्रण होते आहे असे म्हणता येणार नाही. ''मात्र एका मर्यादेत येथील नागर-ग्रामीण जीवनाचे संमिश्र दर्शन ही कथा घडविते. एकूण मराठी कथेच्या जडणघडणीचा, विकासाचा आणि समृद्धीचा विचार करू जाता येथील कथा निश्चितपणे काही महत्त्वाचा सहभाग देत आहे, एवढे निश्चित'' हे 'मराठवाड्याची कथा' यासंदर्भात वासुदेव मुलाटे यांनी काढलेले उद्गार वि.शं. पारगावकर यांच्या कथेच्या संदर्भात लागू पडतात.

**संदर्भ :**


१) मराठवाड्याची कथा - संपा. डॉ. वासुदेव मुलाटे, साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद प्र.आ. १९९४.

२) य.ग.जोशी व्यक्ती आणि वाङ्‌मय - सुनंदा दास - व्हिनस प्रकाशन पुणे - ३०, प्र.आ. १९८०.

३) कथा रूप आणि आस्वाद - डॉ. पंडित टापरे, निहार प्रकाशन पुणे - प्र.आ. १९९९.

४) ग्रामीण कथा - स्वरूप आणि विकास - डॉ. वासुदेव मुलाटे स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. २००५.

५) आनंद यादव व्यक्ती आणि वाङ्‌मय - डॉ. रवींद्र ठाकूर, मेहता प्रकाशन, पुणे, प्र. आवृत्ती १९९३.

६) वि.शं. पारगावकर की कहानियाँ - अनुवादक - राजमल बोरा, प्रथम आवृत्ती १९९०, प्रतिमा प्रकाशन, पुणे ३०.

७) मराठी कथा - रूप आणि परिसर - म.द. हातकणंगलेकर संपूर्ण प्रकाशन, पुणे ३०, प्र.आ. १९८६.

८) आधुनिक मराठी वाङ्‌मयाचा इतिहास (भाग २) अ.ना. देशपांडे, व्हिनस प्रकाशन पुणे, पुनर्मुद्रण १९७९.
९) मराठी कथा स्वरूप आणि आस्वाद - रा. कि. कुलकर्णी, स्वाध्याय प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९७६.
१०) कथा संकल्पना आणि समीक्षा - सुधा जोशी, मौज प्रकाशन गृह, मुंबई, प्र.आ. २०००.
११) अर्वाचीन मराठी वाङ्‌मयाचा इतिहास - प्र.न. जोशी (१८००-१९६०) स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती २०००.
१२) प्रदक्षिणा - संपा. अनिरूद्ध कुलकर्णी - कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे - ३०, आवृत्ती पाचवी, १९७२.

# नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरी स्वरूप आणि वैशिष्ट्ये

**प्रा. छाया बारवे**

१९६० नंतर मराठी साहित्यात ग्रामीण साहित्याचा प्रवाह दाखल झाला. येथून पुढे खऱ्या अर्थाने ग्रामीण साहित्य व ग्रामीण कादंबरी लेखनाला सुरुवात झाली, असे असले तरी म. फुले यांनी शेतकऱ्यांचे दु:ख-दैन्य 'शेतकऱ्यांचा असूड' (१८८३) या ग्रंथातून मांडले आहे. या पुस्तकाचे लेखन कादंबरी वजाच आहे. याविषयी स.ग. मालशे म्हणतात. 'शेतकऱ्यांचा असूड'चा नावीन्यपूर्ण भाग म्हणजे शेतकऱ्यांच्या अवनत् स्थितीचे वास्तव चित्र त्या अवनत् स्थितीची केलेली मूलग्राही चर्चा आणि ती स्थिती सुधारण्यास्तव सुचविलेली उपाययोजना हा होय. शेतकऱ्यांच्या वास्तव स्थितीचे चित्र रेखाटताना फुले यांनी त्यांच्या हीन-दीन गृहस्थितीचे जे वेधक वर्णन केले आहे ते एखाद्या ग्रामीण वास्तववादी कादंबरीला लाजवील इतके प्रत्ययकारी आहे. थोडक्यात ग्रामीण जीवनचित्रणाचा स्पर्श मराठी साहित्याला म. फुले यांनी घडवला ही वस्तुस्थिती आहे. अशा प्रकारे ग्रामीण जाणिवेतून ग्रामीण वास्तव लेखनाची परंपरा फुले यांनी निर्माण केली. मात्र, मध्यमवर्गाचा प्रभाव असलेल्या मराठी साहित्याने फुल्यांची व त्यांच्या साहित्याची उपेक्षाच केली. काही अपवाद वगळता म.फुले यांच्या लेखनाची प्रबळ परंपरा निर्माण होऊ शकली नाही. यामुळे ग्रामीणच नव्हे तर एकूणच मराठी साहित्याचे प्रचंड नुकसान झाले, असे म्हणावे लागते. तेव्हापासून आजतागायत ग्रामीण कादंबरी लेखन होत आहे. या लेखनाच्या स्वरूपामध्ये काळानुरूप स्थित्यंतरे झाल्याचे दिसून येते.

१९२३ नंतर गांधीवादी, मार्क्सवादी प्रेरणेतून ग्रामीण कांदबरीचे लेखन झाले पण या लेखकांना ग्रामीण जीवनाची फारशी जाण नसल्यामुळे वास्तव चित्रण न करता वरवरचे व उथळ स्वरूपाचेच लेखन केले. र.वा.दिघे, श्री. ना. पेंडसे, गो.नी. दांडेकर, व्यंकटेश माडगूळकर यांनी ग्रामीण/प्रादेशिक

कादंबऱ्या लिहिल्या पण बनगरवाडीचा सन्माननीय अपवाद वगळता त्याच्यांही कादंबरी लेखनाला मर्यादा या होत्याच. १९६० पर्यंतच्या ग्रामीण कादंबरीचा विचार करता ही कादंबरी ग्रामीण वास्तवापासून चार हात लांब असल्याचे चित्र दिसून येते. केवळ वाचकांच्या रुचीपालटासाठी म्हणून त्यांनी आपल्या कादंबरी लेखनासाठी ग्रामीण पार्श्वभूमीचा अवलंब केला असे म्हणावे लागते. १९६० पर्यंतची ग्रामीण कादंबरी रंजक स्वरूपाचीच होती.

१९६० नंतर मराठी साहित्यात ग्रामीण साहित्याचा प्रवाह दाखल झाला आणि उपेक्षित-वंचित असलेला ग्रामीण माणूस साहित्याच्या केंद्रभागी आला. आनंद यादव, रा.रं. बोराडे, उद्धव शेळके यांनी अस्सल ग्रामीण लेखनाला सुरुवात केली. या मंडळींना ग्रामीण जीवनानुभव असल्यामुळे त्यांच्या कादंबऱ्या ग्रामीण कादंबरी लेखनाचा लक्षणीय टप्पा ठरला येथून पुढे वास्तववादी कादंबरी लेखनाला सुरुवात झाली. १९६० नंतर औद्योगिकीकरण, यांत्रिकीकरण यामुळे मोठे स्थित्यंतर घडून आले मात्र, हे स्थित्यंतर ग्रामीण माणसासाठी वरदान न ठरता शापच कसे ठरले याचे चित्रण या मंडळीनी केले.

१९६७ मध्ये ग्रामीण साहित्य चळवळ सुरू झाली. याचा परिणाम ग्रामीण कादंबरी लेखनावर निश्चित काही प्रमाणात झाल्याचे दिसून येते. येथून पुढची ग्रामीण कादंबरी अधिक वास्तववादी, मूलगामी स्वरूपाची ठरली. १९९० नंतर संपूर्ण देशातच मोठे स्थित्यंतर घडून आले. या स्थित्यंतराचा परिणाम ग्रामीण कादंबरीवरही झाला. या स्थित्यंतरातूनच नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीचे स्वरूप बदलले. १९९० नंतर आपण जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण याचा स्वीकार केला. वर वर ही गोष्ट विकासास पोषक ठरली असली तरी खेड्यांच्या पडझडीस, नाशास कारणीभूत ठरली. १९९० नंतर ग्रामीण भागात वेगाने बदलाचे वारे वाहू लागले. वीज, रस्ता, शाळा, महाविद्यालये, आरोग्यकेंद्र दळण-वळणाच्या सुविधा आल्या. त्याचप्रमाणे राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रातही बदल घडून आले, हे बदल ग्रामीण माणूस पचवू शकला नाही. या सर्व बदलांचा परिणाम गावचे गावपणच हरविले. राजकारणाने संपूर्ण गावच नासविले. गटा-तटाच्या राजकारणाला सुरुवात झाली. सत्तेच्या हव्यासापोटी जातीयता संपण्याऐवजी उग्र झाली. स्त्रियांवरील अन्याय-अत्याचार कमी होण्याऐवजी वाढू लागले. भ्रष्टाचाराने संपूर्ण गावच पोखरून काढला.

१९९० नंतर हरितक्रांतीचे दुष्परिणाम अधिक उग्र झाले. खते, पाणी, कीटकनाशके, संकरित बी-बियाणे याच्या अतिरिक्त वापरामुळे

एकीकडे जमिनी नापीक होऊ लागल्या तर दुसरीकडे उत्पादन खर्च वाढला मात्र, वाढत्या उत्पादन खर्चाच्या तुलनेत बाजारभाव नगण्य मिळू लागला. व्यापारी-दलाल संगनमताने शेतकऱ्याचे शोषण करू लागले. याबाबत मात्र शासनाने निष्क्रियतेचे धोरण स्वीकारले. भरीत भर निसर्गही शेतकऱ्याचा महत्त्वाचा शत्रू ठरला. या सगळ्यामुळे बागायतदार असणाऱ्या शेतकऱ्याला शेतीवर पोटा पाण्याचा मेळ घालणे अशक्य होऊ लागले. कोरडवाहू, अल्पभूधारक, शेतमजूर यांची स्थिती अत्यंत वाईट झाली.

भ्रष्टाचार, महागाई, सेझ, दुष्काळ यामुळे तो अधिकच हतबल झाला. या सगळ्यामुळे ग्रामीण माणूस मुळातूनच उद्ध्वस्त झाला. आत्महत्येशिवाय दुसरा पर्याय त्याच्यापुढे शिल्लक राहिला नाही. या सगळ्या पार्श्वभूमीवर नवदोत्तर ग्रामीण कादंबरीची निर्मिती होऊ लागली.

नव्वदोत्तर अनेक कादंबरीकारांनी शेतकऱ्याचे जीवन कसं दु:खमय, संघर्षमय आहे याविषयीचे चित्रण केले आहे. यामधून ग्रामीण वास्तव चित्रित होते. याविषयी जयश्री नाफडे म्हणतात, "ग्रामीण जीवनात घडणारी स्थित्यंतरे, धरणामुळे उठणारी गावे, यांत्रिकीकरणाने माणूस व माती यांचे दुरावलेले संबंध, शहरीकरणामुळे ढासळत जाणारे ग्रामीण व्यावसायिक, श्रीमंत प्रतिष्ठितांकडून होणारे भूमिहीन मजुरांचे शोषण, सुशिक्षित ग्रामीण तरूणांची बेरोजगारी, त्यातून वाढणारा दहशतवाद व वाढती गुंडगिरी, राजकारणातील भ्रष्टाचार अशा प्रकारचे बदलते ग्रामजीवन प्रकट करण्यात आले आहे." जयश्री नाफडे यांचे अवलोकन यथार्थच आहे.

१९९० नंतर ग्रामीण साहित्यात कादंबरी या वाङ्मय प्रकारामध्ये इतर वाङ्मय प्रकाराच्या तुलनेत अधिक लेखन होताना दिसते. मात्र नव्वदोत्तर कादंबरीवर ग्रामीण साहित्य चळवळीपासून दोन हात लांब राहिलेल्या कादंबरीकारांच्या लेखनाचा प्रभाव अधिक स्पष्टपणे जाणवतो. याचा अर्थ १९९० नंतर ग्रामीण साहित्याची चळवळ थंडावली असली, तिचा प्रभाव कमी झाला असला तरी नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरी अधिक सशक्त व संख्येनेही जास्त आहे.

नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरी राजकारण, शिक्षण, बेकारी, भ्रष्टाचार, अन्याय-अत्याचार, शेतकरी आत्महत्या, सेझ, शेतकरी चळवळ, दलित-सवर्ण संघर्ष, तणाव यावर आधारलेली आहे. रंगनाथ पठारे यांची 'ताम्रपट' (१९९४) राजकारणी व्यक्तिमत्त्व साकारते. 'ताम्रपट' मधून पठारेंनी राजकारणाचा एक प्रदीर्घ कालखंड उलगडण्याचा प्रयत्न केला आहे.मधू सावंत 'राहूकेतू' मधून ग्रामीण नेतृत्व विकासाऐवजी राहूकेतू होऊन भ्रष्ट्राचार

करीत असल्याचे चित्रण केले आहे. राजकारणातील स्त्रीचं स्थान नेमकेपणाने ही कादंबरी दाखवून देते. 'नामदार सौभाग्यवती' (२००७) रा.रं. बोराडेंची ही कादंबरी ग्रामीण स्त्रीच्या राजकारणाचा वेध घेते. आजही राजकारणावरील पुरूषाचं वर्चस्व संपलेलं नाही याचा प्रत्यय या कादंबरीमधून येतो. कुठल्याही एका स्त्रीचं राजकारण संपलं असेल तर ते तिच्या स्वभावामुळे, वागण्यामुळे संपलेले आहे असे समजले जाते. सत्तेच्या राजकारणात केवळ महत्त्वकांक्षा असून भागत नाही तर कर्तृत्वदेखील तेवढंच जबरदस्त असावयास हवं. काहीच नेतृत्व नसलेल्या तुझ्यासारख्या स्त्रियांनी केवळ स्वत:चं राजकारणच संपविलेलं आहे असं नाही तर स्वत:चे संसारदेखील उकिरड्यावर फेकलेले आहेत.[५] चिमंणरावांचे सुमित्राविषयीचे हे उद्‌गार राजकारणातील पुरुषी वर्चस्वाचे द्योतक आहे.

बाबाराव मुसळे यांची 'पाटिलकी' (२००५) राजकारणामुळे खेडी कशी उद्‌ध्वस्त होत आहे हे नेमकेपणाने टिपते. बाजीराव त्याचा मित्र पुरसिंग या दोन्ही व्यक्तिरेखाद्वारे खेड्याचे नैतिक ढासाळलेपणही ही कादंबरी अधोरिखित करते. गावात आपल्याला फारशी किंमत उरली नाही याची सल म्हणून परबत दुकानदार उचापत्या, लावालाव्या, जाळपोळ, भानामती, याचा आधार घेऊन संपूर्ण गाव कसा वेठीस धरतो याचं चित्रण केले आहे.

भारत काळे यांची 'ऐसे कुणबी भूपाळ' (२००१) ही प्रदीर्घ अशी कादंबरी आहे. या कादंबरीमधून शेतकऱ्याच्या दिवाळखोरीचे चित्रण अतिशय वास्तवरीत्या रेखाटले आहे. या कादंबरीमध्ये भारत काळे यांनी शेतकरी कुटुंबातील मालकी विषयीचा संघर्ष विश्वनाथ व बाजीराव या दोन्ही भावांच्या आधारे रेखाटला आहे. या मालकीच्या संघर्षातूनच एकत्र कुटुंबाचे विभाजन कसे होते हेही ही कादंबरी अधोरेखित करते. त्याचप्रमाणे कुटुंबातील मालकाचा बाहेरख्यालीपणा त्यानिमित्ताने कुटुंबातील स्त्रीच्या वाट्याला आलेलं दु:ख याचे चित्रण 'समर्थपणे' या कादंबरीत केले आहे.

ग्रामीण भागातील तरूण आज शिकून उच्चशिक्षित झाला आहे पण त्याला नोकरी मिळत नाही. याचे चित्रण सदानंद देशमुख यांनी 'बारोमास' मध्ये केले आहे. या कादंबरीचा नायक एकनाथ उच्चशिक्षित होऊनही बेकार कसा राहतो याचे उत्तम चित्रण केले आहे. एकनाथ ग्रामीण भागातील सुशिक्षित बेकार तरूणांचे प्रतिनिधत्व करतो. बेकारीप्रमाणेच शेतकरी आत्महत्या, शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचार यासारख्या तत्कालीन गंभीर प्रश्नावर प्रकाश टाकतो. शंकर सखाराम यांच्या 'एसईझेड' मध्येही वाढत्या बेकारीचा प्रश्न हाताळला आहे.

'तहान' (१९९५) मध्ये सदानंद देशमुखांनी पाण्याचा प्रश्न हाताळला आहे. राघोजीचा मुलगा बबन पाणी विकून पैसा मिळविल्याचे समर्थन करतो. मात्र राघोजीचा याला विरोध आहे. या निमित्ताने दोन पिढ्यांमधील संघर्ष या कादंबरीत चित्रित केला आहे. गावातील राजकारण, स्वार्थी नेतृत्व, भ्रष्ट अधिकारी यावरही ही कादंबरी प्रकाश टाकते.

अशोक कौतिक कोळी यांची 'पाडा' (२००६) या कादंबरीतून शेतकऱ्याच्या जीवनाचे दु:ख, त्याची होणारी वाताहत चांगदेव तापकीर या शेतकऱ्याद्वारे प्रभावीपणे मांडली आहे. या कादंबरीत व्यापारी, दलाल संगनमताने बाजारभाव पाडून शेतकऱ्याची लूट कशी करतात हे पाहावयास मिळते. शेतकऱ्यांच्या हितासाठी सहकार तत्वावर निघालेले खरेदी-विक्री संघही शेतकऱ्याची कशी फसवणूक करतात हे दाखवून दिले आहे. 'कापूसकाळ' कैलास दौंड यांनी शेतकऱ्यांनी पोटच्या मुलाप्रमाणे वाढविलेला कापूस मात्र शेतकऱ्याचा काळ कसा ठरतो याचे चित्रण केले आहे. व्यापारी, दलाल शेतकऱ्यांनी पिकविलेले सोनं मातीमोल कसे ठरवितात याचे हृदयद्रावक चित्रण केले आहे. 'पाडा' आणि 'कापूसकाळ' या दोन्ही कादंबऱ्यांमधून शेतकरी योग्य भावासाठी एकत्र येऊन लढा देत आहे याचे प्रभावी चित्रण केले आहे. या कादंबऱ्यावर शेतकरी चळवळीचा प्रभाव असल्याचे दिसून येते

आपल्याकडे विकासाच्या नावाखाली शेतकऱ्याच्या जमिनी कधी धरणासाठी तर कधी सेझसाठी त्याला न विचारता संपादित केल्या जात आहेत. यामुळे विस्थापिताचं जिणं, दु:ख शेतक-याच्या वाट्याला कसे येत आहे याचं चित्रण विश्वास पाटील यांच्या 'झाडाझडती' मधून येते, 'एसईझेड' ही शंकर सखाराम यांची सेझवरील मराठीतील एकमेव कादंबरी आहे. प्राण गमवावा लागला तरी काळी आई देणार नाही हा संदेश' गुरुजी, चंदू तरुणांना देऊन सेझ विरोधी लढा देतात.

राजन गवस यांच्या 'तणकट' या कादंबरीतून दलित-सवर्ण यांच्यामधील ताण-तणाव समर्थपणे चित्रित केला आहे. राजकारणामुळे ग्रामीण भागात मूल्यभ्रष्टता, भ्रष्टप्रवृत्ती कशी आली याचं विदारक चित्रण बाळासाहेब शेंडबाळे या व्यक्तिरेखेद्वारे केले आहे. गणेश आवटे यांची 'भिरूड' ही कादंबरीही दलित - सवर्णामधील संघर्षाचा वेध घेते.

**नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीची वैशिष्ट्ये**

१. नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीने विषय आणि आशय या दोन्ही पातळयांवर आमूलाग्र बदल घडवून आणला आहे.

२. इतर वाङ्मय प्रकाराच्या तुलनेत कादंबरी या वाङ्मय प्रकारांमध्ये लेखन अधिक होत आहे.

३. राजकारण, शिक्षण, भ्रष्टाचार, बेकारी, सेझ जागतिकीकरणाचे दुष्परिणाम, दलित-सवर्ण संघर्ष या ग्रामीण प्रश्नाचं चित्रण नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीत आले आहे.

४. ढासळत्या, ओस पडलेल्या खेड्याचं समर्थ चित्रण ही कादंबरी करते.

५. नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरी लेखनावर शेतकरी चळवळीचा प्रभाव दिसून येतो.

६. राजकारणामुळे खेड्याचे उद्ध्वस्तीकरण कसे झाले याचे समर्थ चित्रण ही कादंबरी घडविते.

७. जागतिकीकरण, वाढते औद्योगिकीकरण यामुळे खेड्यांचे बकालीकरण कसे झाले याचे चित्रण नव्वदोत्तर कादंबरीतून येते.

८. भ्रष्टाचारामुळे ग्रामीण जीवन कसे पोखरले गेले याचेही चित्रण येते.

९. विस्थापितांचे दु:ख, प्रश्न नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरी घडविते.

१०. नव्वदोत्तर कादंबरी पूर्वीच्या कादंबरीपेक्षा विद्रोही स्वरूपाची आहे.

**संदर्भ**

१) मालशे, स.गं. तारतम्य, परचुरे प्रकाशन मंदिर मुंबई, आवृत्ती पहिली. १९८७, पृ.७

२) कोत्तापल्ले, नागनाथ : ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे आवृत्ती पहिली, १९८५ पृ.१०२

३) मदन कुलकर्णी गौरव ग्रंथ, साहित्य ग्रामीण आणि दलित.

४) शेळके भास्करराव : शोधनिंबंध, नव्वदोत्तर काळातील ग्रामीण कादंबरी (२०१० मध्ये रेणापूर येथील चर्चासत्रात वाचलेला शोधनिबंध)

५) बोराडे रा.रं. नामदार सौभाग्यवती, साकेत प्रकाशन औरंगाबाद, दुसरी आवृत्ती २००७ पृ.७

# सदानंद देशमुख यांचे वाङ्मयीन योगदान

प्रा. सुवर्णा खोडदे

## अ) कवितासंग्रह :

सदानंद देशमुखांचा 'गावकळा' हा कवितासंग्रह सुविद्या प्रकाशन, पुणे यांनी १५ डिसेंबर २००५ रोजी प्रकाशित केला आहे. हा कवितासंग्रह प्रकाशित होण्यापूर्वी यातील कविता अनुष्टुभ, कवितारती, वाङ्मयवृत्त, अस्मितादर्श, युगवाणी, स्त्री, किर्लोस्कर, महाराष्ट्र टाईम्स (दिवाळी अंक), लोकमत (दिवाळी अंक), सकाळ (दिवाळी अंक), दीपावली, लोकप्रभा, ललित, साप्ताहिक सकाळ, अंतर्नाद, उर्मी, इ. नियतकालिकांतून व दैनिकातून प्रसिद्ध झाल्या आहेत.

'कथा कादंबऱ्यांनंतर कवितासंग्रह आला असला तरी त्यांचा पिंड कवीचा आहे' असे आनंद यादव म्हणतात.[१] त्यांच्या कविता अर्थपूर्ण आहेत. त्यांच्या कवितांतून सामाजिक अधःस्तराचे दर्शन घडते. त्यांच्या 'गावकळा' या कवितेत गावाचे पूर्वीचे वैभव जाऊन त्यास भकास दिवस आल्याचे वर्णन ते पुढील ओळींत करतात.

''अशी कशी आली बाप्पा गावी आवकळा
भर हंगामात सुके पाटलाचा मळा
पाटलांचा तोरा गेला झाला चिंधी चोळा
हळुवार कोंभाळते वासनेचा बोळा...
वासनेत गढूळलं बायकोचं रिणं
पाटलाचा तोरा गेला झाला हीन दीन...''[२]

पूर्वीच्या समाजव्यवस्थेत मानाचे स्थान जगलेल्या वतनदारांची आता काय अवस्था झाली याचे वर्णन सदानंद देशमुख असे करतात.

''वतनदारी घर झालं पत्त्याचा अड्डा
घरामधी बसू बसू हातभर खड्डा
ज्याला त्याला लुटावाटे हारामाचा माल

मेहनत नको हवे गोरे गोरे गाल''[३]

ही वेळ त्यांच्यावर काम करण्याची मानसिकता नसल्यामुळेच आली आहे, असे सदानंद देशमुखांना वाटते. त्यांच्या कवितांमधून समाजातील 'हुंडा' पद्धतीवर अचूकपणे बोट ठेवले आहे. हुंड्यामुळे मुलींच्या बापाची काय अवस्था होते, याचे वर्ण 'हुंडा' या कवितेत ते करतात.

''व्हते मागणी लाखाची वरी टी.वी. न् कुलर
वाऱ्यासंग उधळाया मागे पोरगा कुटर
व्हते दुमता तिमता, बाप त्याले महाघोर
मोठ्या बहिणीच्या पायी ज्यानं इकलं वावर''[४]

देशमुखांच्या बहुतेक कविता शेतकरी जीवनाशी निगडित आहेत. शेतकरी शेतावर कर्ज घेतो. ते परतफेड करता आले नाही तर बँक मॅनेजर शेतीचा लिलाव करतो. तेव्हा शेतकरी पुन्हा सावकाराकडे जातो. याचे वर्णन 'शेतकऱ्याच्या कुळात' या कवितेत ते पुढीलप्रमाणे करतात.

''तुह्या वावराची पाह्यं कशी हर्रासी म्या केली
असं मॅनेजर बोले तवा इलाज खुटला
सावकाराच्या दारात पायगुमान वळाला
माह्या हिजडेपणाची त्याले वळख पटली
हाती कुऱ्हाड घेऊन त्यानं जिंदगी छाटली''[५]

विदर्भातील शेतकरी कर्जाने गांजला आहे. त्याच्या पिकाला हमीभाव मिळावा म्हणून शासनाने 'हमीभाव' योजना सुरू केली. सरकारी अधिकारी माल लवकर मोजून घेत नाहीत. चार पैसे जास्त मिळणार पण अधिकारी ते मिळू देत नाहीत. त्यातच शेतकऱ्याचे दैन्य दिवसेंदिवस वाढतच जाते. याचे वर्णन ते असे करतात.

''पोत्या मागं शंभराचा व्हा व्हनार फायदा
आला साहेब आडवा, त्याच्या मनाचा कायदा
काय करायचं आता इथं तुंबल्या मालाचं
कसं फेडायचं देणं पळत्या व्याजाचं''[६]

दिवसेंदिवस पाणी समस्या भीषण होत चालली आहे. आता तिचे उग्र स्वरूप निर्माण झाले आहे. त्यामुळे वाडवडिलांनी लावलेली झाडे सुकून चालली आहेत. याविषयी विचार मांडताना 'आंबराई' या कवितेत ते लिहितात.

''शिवारात दिवसागणिक तीव्र होणाऱ्या
ह्या पाणी टंचाईच्या दिवसात

सुकून चालले
बापजाद्यांनी लावलेल्या
आंबराईतले एक झाड''[७]

अशा प्रकारे सदानंद देशमुखांच्या कविता ग्रामीण व शेतकरी जीवनाशी निगडित आहेत, हेच स्पष्ट करतात.

**ब) कथासंग्रह :**

सदानंद देशमुखांचे 'अंधारबन', 'उठावण', 'महालूट' व 'लचांड' हे कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. या चार कथासंग्रहातील कथा ग्रामीण जीवनाशी संबंधित आहेत.

**१) अंधारबन :** 'अंधारबन' ह्या कथासंग्रहातील व्यक्ती रात्रंदिवस कष्ट करणाऱ्या आहेत. त्या रोजचे अन्न रोज मिळविणाऱ्या आहेत. त्यांचे जीवन चाकोरीबद्ध आहे, पण त्यांच्या या जीवनाची वाटचाल सरळ साधी व सोपी नाही. त्यांच्या दैनंदिन वाटचालीत खाच-खळगे, दगड-धोंडे, चरे-ओगळ्या येतात. त्यांचे जीवन उलटे पालटे करतात. दिवसभर काबाडकष्ट करावे लागत असल्यामुळे माणसांतील सगळा दम त्यांच्या शरीरातून निघून जातो. संध्याकाळी ते चिपाडाप्रमाणे होऊन घरी परततात. पुष्कळदा त्यांची उपासमारही घडते. त्यामुळे ते स्वभावानी सरळ गरीब लवचीक होतात. त्यांच्यासमोर असलेल्या समस्यांपुरता विचार त्या करणाऱ्या आहेत. आजचे दु:ख कसे विसरायचे आणि आजचा दिवस कसा पार पाडावयाचा एवढाच विचार त्यांना पडतो. सततचे कष्ट, अज्ञान, दारिद्र्य आणि निसर्गाची अवकृपा यामुळे ते दैववादी बनले आहेत. शकुन-अपशकुन, मांत्रिक-तांत्रिक, पाप-पुण्य, रूढी-परंपरा यावर त्यांची खूप श्रद्धा आहे. त्यामुळे त्यांना विचार आणि विकार, भावना व चिंतन, तात्कालिकता आणि शाश्वतता यातील फरक त्यांना कळत नाही.

ज्या त्या वेळेला जसे वाटेल तसे ते जगतात. मग पश्चाताप करतात. त्यांचे जीवन हे दिशाहीन असल्यामुळे घडते आणि बिघडते. बऱ्याचदा वाट्याला विपरीत येते. या व्यक्तिरेखांच्या वाट्याला खूप कष्ट आणि दु:ख आल्यामुळे ते अधिक शोषित बनले आहेत. त्यात एखादा बुद्धिवान निपजला तर तो या गरीब, शोषित लोकांचे आणखी शोषण करतो. ते भोळे आहेत. त्यांना व्यवहार कळत नाही. ते हातोहात फसतात. सदानंद देशमुख 'अंधारबन' या कथासंग्रहात स्त्रियांची कुचंबणा समर्थपणे चित्रित करतात. तरुण विधवेकडे समाजाचा व घरातील लोकांचा पाहण्याचा दृष्टिकोण कसा भिन्न-भिन्न आहे; याचे चित्रण या कथासंग्रहातील कथेत आले आहे. तरुण

विधवेचे दीर, जावा तिल्या कुत्र्यासारखे हीन दर्जाची वागणूक देतात. तिच्या प्रत्येक अडचणीचा फायदा उठवायला टपलेले दिसतात. त्यामुळे अशा तरुण विधवेला आपले कष्टमय व असहाय्य जीवन संपवून टाकावेसे वाटते.

सदानंद देशमुखांच्या 'अंधारबन' या कथासंग्रहातून ग्रामीन जीवनाचे यथार्थ दर्शन घडते. ते प्रतिनिधिक स्वरूपात असले तरी थोड्याफार फरकाने उभ्या महाराष्ट्राच्या समाज जीवनाचे दर्शन त्यातून घडते. खेड्यातील वास्तव जीवनाचे दर्शन 'अंधारबन' मधून झाले आहे.

त्यांच्या कथांतील मुख्य व्यक्तिरेखा काहीतरी अधिक चांगले घडविण्याचे प्रयत्न करतात. परंतु विपरीत घडते. ते त्यामुळे आणखीनच अडचणीत येतात. 'आसवांचं आभाळ', 'बोळवण', 'जांभळाचं झाड' 'अंधारबन' अशा उत्तम कथा त्यांच्या या कथासंग्रहात आल्या आहेत. त्यांच्या कथाँ वरवर पाहता साध्या सरळ वाटत असल्या तरी आंतरिक वाङ्मय गुणांनी युक्त आहेत. त्यांच्या कथांतून विपरीततेचे दर्शन घडते. या कथासंग्रहातील कथा वेधक आहेत. ते माणसाला घेरून राहिलेल्या परिस्थितीचा भीषण आंधळेपणा, निष्ठुरता नि क्रौर्य यांचे उत्तमपणे चित्रण करतात.

त्यांच्या कथातील प्रसंग, घटना, साध्या सरळ नेहमीच्या आहेत. पण विपरीत घडण्यामुळे त्या विलक्षण होतात. सदानंद देशमुख कथांतील पात्रांचे वर्णन सहजतेने करताता. ते पात्राच्या अंतर्मनात सहजतेने प्रवेश करतात. 'आसवांचं आभाळ' मधील शोभा, 'बोळवण' मधील नारायण, 'जांभळाचं झाड' मधील भानुदास तात्या, 'वारूळ' मधील नरसू, 'अंधारबन' मधील बाळू पगार, 'मरणवाट' मधील दिनकर, 'जतावणी' मधील सीताराम, 'झंझावात' मधील किसन, 'तिखटकुटी' मधील शेवंता, 'उलंगवाडी' मधील सारजा, 'तुले ना मले' मधील मन्या, 'परतीचा प्रवास' मधील लहानग्या यांची अंतर्मने अचूकपणे टिपली आहेत. एकूणच 'अंधारबन' हा कथासंग्रह साहित्याच्या दृष्टिकोणातून उत्तम साहित्यकृती आहे.

**२) लचांड :** 'लचांड' या कथासंग्रहातील कथा वेगळ्या वळणावरच्या आहेत. लेखकाला बेकारीच्या काळात जे चटके बसले, जो मनस्ताप झाला, ज्या वेदना सहन कराव्या लागल्या; त्यातून या कथा साकार झाल्या आहेत. तसेच शहरी, ग्रामीण माणसाची तुलना करताना अन्यायग्रस्तांची असाहाय्यता त्यातून मांडली गेली. एकूणच समाज व्यवस्थेतील चीड आणणाऱ्या ज्या गोष्टी होत्या; त्या अधिक समजावून घेऊन त्यातून कथा आकार घेत होत्या. लेखकाचा लेखनातील हौसेचा भाग संपला होता. लेखन ही एक गरज झाली होती.[८]

'लचांड' हा सदानंद देशमुखांचा दुसरा कथासंग्रह आहे. तो नोव्हेंबर १९९३ मध्ये प्रकाशित झाला. या साहित्यकृतीवर निर्मितीच्या काळाचा, भोवतालच्या परिस्थितीचा, वातावरणाचा, तत्कालीन वृत्ती-प्रवृत्तींचा परिणाम झालेला दिसत नाही. या साहित्यकृतीत फक्त स्वरूपाचा विचार केलेला दिसतो. आजचे ग्रामीण साहित्य संवेदनशील, सर्जनशील, सृजनक्षम मनाचा आविष्कार घडविते. हे कार्य सदानंद देशमुखांसारख्या साहित्यिकाने केले आहे. खेडी बदलली आहेत. त्यात होणारा भौतिक, राजकीय, सामाजिक आणि मानसिक पातळीवरचा बदल, धर्मकारण, अर्थकारण व राजकारण यांनी ग्रामीण भागात घातलेल्या धुडगुसामुळे ग्रामीण भागातील परिवर्तनाबरोबरच आलेले नवीन प्रश्न व जुन्या समस्या यामुळे ग्रामीण जीवन गुंतागुंतीचे बनले आहे. हे सर्व साहित्यिकाला कमी अधिक प्रमाणात भोगावे लागते. त्यातून त्यांची साहित्यकृती आकार घेते. त्यामुळे त्या साहित्यकृतीत जिवंतपणा जाणवतो.

'लचांड' मधील शासनकर्ती मंडळी ग्रामीण व शेतकरी समाजातील असली तरी शेतकऱ्यांचे शेतीविषयक प्रश्न सोडविण्याची त्यांची मानसिकता दिसत नाही. एवढेच नाही तर शेतकऱ्यांचे दारिद्र्य, सामान्य माणसांचे, शेतमजुरांचे जगण्याचे प्रश्न सुटत नाहीत. शेतीसाठी आवश्यक असणारी अवजारे, बी-बियाणे, औषधे, खते, शेती-मालाला मिळणारा बाजारभाव, शेतीव्यवसायाला पूरक असणारे जोडधंदे व कुटीरउद्योग, त्यांना लागणारे बीज भांडवल, कच्चा माल व त्याची विक्री करण्याची व्यवस्था, समाजातील बेकारी हे प्रश्न आजतागायत सुटत नाहीत.

एकीकडे भौतिक सुधारणा होऊन रेडिओ, टी.व्ही., फ्रीज किंवा मोटार गाड्या येत असताना मानवी मानवी जीवन जिवंत ठेवण्यासाठी असणारी मूल्ये जोपासली जात नसतील तर अशा बेगडी सुधारणेचा फायदा समाजाला कसा काय होणार? आधुनिकीकरणामुळे खेडे सुखाच्या दिशेने वाटचाल करत असतानाच ते आपले स्वयंपूर्णता हरवत चालले आहे. ग्रामीण जीवनाच्या आर्थिक नाड्या कुणाच्या तरी हातात असतात. त्यामुळे ग्रामीण भागात जगणाऱ्या प्रत्येक घटकाचे पूर्वी होणारे शोषण थांबत नाही. शोषण करणारे घटक मात्र बदलतात. शोषणाचे स्वरूप बदलते, पण शोषण कायम जागेवर राहते. आजही समाजात शेतकऱ्यांचे व शेतमजुरांचे शोषण होताना आढळते.

ग्रामव्यवस्थेसाठी ग्रामपंचायती आल्यावर ग्रामाची योग्य व्यवस्था होईल, असे वाटत असतानाच ग्रामविकासातील ग्रामपंचायत मोठा अडथळा ठरावा ही दुर्दैवी बाब असल्याचे त्यातून निदर्शनास येते. त्यातून ग्रामीण

माणसांच्या पदरी आत्मवंचना येते. सामान्य माणसाची अवस्था मुक्या, बिचाऱ्या मेंढरासारखी होते. ग्रामीण जीवनातील माणसांचे प्रश्न नागरी जीवनातील माणसांच्या प्रश्नापेक्षा भिन्न आहेत. त्या अनुषंगाने प्रा. सदानंद देशमुखांनी आपल्या कथांचे लेखन केले आहे.

शासकीय धोरणे चांगली असतात. प्रशासकीय वर्ग त्याची अंमलबजावणी कशा प्रकारे करतात, यावर त्याचे यशापयश अवलंबून असते. याचा फायदा नोकरशहा, समाजकंटक, धनदांडगे उठवितात. शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण होण्यासाठी विनाअनुदान तत्त्वावर लोकांनी शिक्षण संस्था काढाव्यात आणि समाजाचे कल्याण व्हावे यासाठी शासनाने अशा संस्थांना मान्यता दिली. परंतु अशा मंडळींनी संस्था काढून शिक्षणाचा बाजार मांडला. अशा संस्थांमुळे काही सुशिक्षित बेकारांना रोजगार मिळून बेकारी कमी होण्यास मदत होण्याऐवजी भ्रष्टाचाराचे नवीन साधन मिळाले. गरीब आडलेल्या बेकार परंतु हुशार अभ्यासू तरूणांचे शोषण यातून होते. हे शोषण नेते, कार्यकर्ते व समाजसुधारक असे मुखवटे धारण करून वावरणारे समाजकंटक करतात.

'लचांड' या कथासंग्रहातील 'भोगवटा' या कथेमधील इंग्रजीच्या शिक्षकाला ५००-६०० रूपये पगारावर काम करावे लागते. 'कडकी' या कथेतील बबन हा दारिद्र्याने गांजलेला आहे. नोकरीला असणाऱ्या आपल्या मित्राची असुया त्याला वाटते. तो मित्राला चहा पाजत नाही. उलट मित्राकडूनच चहा पितो. तो मित्राकडे बायकोच्या साडीसाठी लाचार होऊन पैसे मागतो. 'चिरोटी' या कथेत दारिद्र्यामुळे एकमेकांच्या जीवावर उठणारी व वाटणीवरून होणारी मारामारी आणि गोड बोलून आणखी भांडणे वाढवणारी माणसे आढळतात. 'भणकं' या कथेत वाडवडिलांची शेती विकून जास्त पैसा मिळविण्याच्या उद्देशाने घेतलेला ट्रॅक्टर कसा त्रासदायक ठरतो, त्यामुळे प्रगतीऐवजी अधोगतीकडे होणाऱ्या वाटचालीचे चित्रण आले आहे. 'कुरण' या कथेत कावले नावाचे प्राध्यापक मुलाखतीचे नाटक करून हुशार, गुणी, अभ्यासू उमेदवार डावलून नात्यागोत्यातील सामन्य कुवतीच्या उमेदवाराची निवड करतात. 'कमाई' कथेमध्ये स्वतः शिक्षकच बोर्डाचे पेपर तपासणीसाठी मिळाल्यावर त्याचा बाजार मांडतात. 'इळद' या कथेमध्ये रम्शा नावाच्या शाळकरी मुलाची शिक्षणासाठी चाललेली धडपड आणि त्याला येणारे अपयश या गोष्टीचे चित्रण केले आहे. 'सारवण' या कथेत विधवा असलेल्या कौशल्याबाईची व तिच्या दोन मुलांची जगण्यासाठी चाललेल्या धडपडीचे चित्रण आले आहे. तर 'लचांड' कथेतील शोकांतिका शासनाचे दुर्लक्ष आणि

वारंवार पडणारा दुष्काळ यामुळे निर्माण होते. पाणी समस्या गंभीर बनते. पाणी समस्येमुळे त्रासलेला जयराम रांजणातील पाणी पिण्यासाठी गाढव आले आहे असे समजून रांजणातील पाणी घेणाऱ्या बायकोच्या ढोपरात काठी मारतो. त्यातच त्याची बायको मरण पावते.

'लचांड' या कथासंग्रहात सदानंद देशमुखांनी रेखाटलेली पात्रे जिवंत वाटतात. त्यांच्या लेखनाचे हे एक वैशिष्ट्य आहे. ही सर्व पात्रे प्रातिनिधिक स्वरूपाची आहेत. कथांमधून केलेले वर्णन त्या काळातील व आजच्या समाजाचे सत्यरूप आहे.

**३) उठावण :** 'उठावण' हा सदानंद देशमुखांचा तिसरा कथासंग्रह. या कथासंग्रहात खेड्यातील अलीकडच्या काळात होत असलेला बदल भौतिक, सामाजिक, राजकीय पातळीवरचा आहे. तसाच तो मानसिक पातळीवरचा आहे असे चित्रण त्यांनी कथासंग्रहात केले आहे. दैनंदिन जीवन सरळमार्गाने जगू इच्छिणाऱ्या माणसांच्या मनाचा होणारा कोंडमारा, त्यातून निर्माण होणारा गुदमरलेपणा, जाणवणारी दाहकता, परिस्थितीच्या वणव्यात होरपळून जाणारे माणसांचे आक्रोश, आतल्या आत स्फुंदणारे मन आणि दाटून येणारे हुंदके, उसासे आणि निःश्वास हे आविष्कार बनून या कथासंग्रहात आले आहे. धर्मकारण, राजकारण, अर्थकारण यांनी ग्रामीण भागात घातलेला धुडगूस, ग्रामीण भागातील परिवर्तनाबरोबरच, नव्याने निर्माण झालेल्या नव्या समस्या आणि परंपरेने चालत आलेले जुने प्रश्न त्यातून बनलेली जटिल व गुंतागुंतीची परिस्थिती या सर्वांचे चित्रण 'उठावण' मधील कथांतून आले आहे. त्यातून ग्रामीण जीवनातील शोषित घटक उठावाच्या दिशेने वाटचाल करू लागला आहे, असे वर्णन या कथासंग्रहातील कथांतून आले आहे.

या कथासंग्रहात 'उठावण', 'चुलखांड', 'दावण', 'गुपितघाला', 'डूखं', 'धतिंग', 'पोटमारा', 'पतन', 'वाघरूळ' अशा नऊ कथा आल्या आहेत. यातील 'डूखं' ही कथा 'अंधारबन' मध्ये 'रक्तथेंब' या नावाने आलेली आहे. 'उठावण' या कथेत सरकारी कर्मचाऱ्यांच्या मनमानीविरुद्ध शेतकऱ्यांनी उठाव केलेला आहे. हे बदलणारे विचार या कथेतून मांडले आहेत. ग्रामीण भागातील शेतकरी जसा सरकारी अधिकाऱ्याच्या विरोधात उठाव करतो. तसाच तो ग्रामीण जीवनामध्ये आलेल्या आळशी, ऐतखाऊ रीतीने जगणाऱ्या तरुण पिढीच्या विरुद्ध बंड करण्याची भाषा 'चुलखांड' मध्ये करतो. ग्रामीण भागात नेहमीच मोठे शेतकरी छोट्या शेतकऱ्यांना आपली बरोबरी करू नये म्हणून त्याला सदैव कोणत्या ना कोणत्या कारणाने आपल्या कह्यात ठेवण्याचा प्रयत्न करतात. एखादा शेतकरी आपल्या बरोबरीने विकास

करू लागला तर मोठा शेतकरी त्याला अडचणीत आणण्याचा प्रयत्न करतो. असाच प्रयत्न बाळासाहेब नावाचा शेतकरी करतो. तेव्हा अशा प्रवृत्तीच्या विरोधात शिवा नावाचा लहान शेतकरी बंड पुकारतो. याचे दर्शन 'गुपित घाला' या कथेत घडते. 'धतिंग' या कथेत तरुण पिढी भौतिक सुखाच्या मागे लागते. त्यावेळी ते कर्तव्य विसरतात. त्यामुळे त्यांना नोकरी मिळविण्यासाठी लाच द्यावी लागते. लाच देण्यासाठी पैसा नाही. लाच देण्यासाठी जमीन विकण्याची भाषा बोलणाऱ्या मुलाच्या आणि नातुच्या विरोधात आबाराव उठाव करतो. 'पोटमारा' या कथेत गीता ही आपल्या चारित्र्यावर शिंतोडे उडू नयेत म्हणून प्राणत्याग करून आपले पावित्र्य सिद्ध करते. 'पतन' या कथेत आपल्याकडून स्वतःच्या मुलीवर झालेल्या अत्याचाराबद्दल नानासाहेब आत्महत्या करून प्रायश्चित करतात. 'वाघरूळ' या कथेत गैरमार्गाने रूपचंद ठेकेदाराने मिळविलेला पैसा हिसकावून घेण्यासाठी गावातील चांडाळचौकडी टपून असते. ती संधी रूपचंद ठेकेदाराच्या मोटारसायकलच्या अपघाताने त्यांना मिळते. या अपघातानंतर अपघातग्रस्त इसमाचा नातू देविदास हा आजोबाच्या अपघाताचे कारण दाखवून अपघात घडविणाऱ्या रूपचंदकडून भरपूर पैसे मिळविण्याचा प्रयत्न करतो. या कामी त्याला गावातील डॉक्टरही मदत करतो.

'उठावण' या कथासंग्रहातील शेषराव, शिवा, भाऊराया, गीता, देविदास या व्यक्तिरेखा प्रस्थापित परिस्थितीत त्या त्या ठिकाणी बंड पुकारणाऱ्या आहेत. आपल्यावर होणाऱ्या अन्यायाचा जाब विचारण्याचा प्रयत्न ते आपापल्या परीने करतात. खरे तर या कथासंग्रहातील सर्व व्यक्तिरेखा प्रातिनिधिक स्वरूपाच्या आहेत. ग्रामीण भागातील माणसाची मानसिक पातळीही बदलू लागली आहे. आता ते आपल्या समस्या, अडचणी, प्रश्न आपापल्या पद्धतीने सोडविण्याचा प्रयत्न करू लागले आहेत. त्यांचा प्रयत्न म्हणून अंतिम उत्तर नाही. किंबहुना त्यांच्या या प्रयत्नामुळे ग्रामीण जीवनातील प्रश्न सुटण्याऐवजी ते जटिल व गुंतागुंतीचे बनत चालले आहेत. अशा संघर्षाचे चित्रण सदानंद देशमुख 'उठावण' या कथासंग्रहात करतात.

**४) महालूट** : 'महालूट' हा सदानंद देशमुखांचा चौथा कथासंग्रह सप्टेंबर १९९५ मध्ये प्रकाशित झाला. या कथासंग्रहात आलेल्या कथा प्रकाशनपूर्व काळात किर्लोस्कर (मासिक), हेमांगी (वासंतिक अंक), तरुण भारत, लोकमत, विशाखा, जनवाद, नागपूर पत्रिका, विचार भारती यांच्या दिवाळी अंकातून प्रसिद्ध झाल्या आहेत. या कथासंग्रहात १० कथा आहेत. या कथांतून स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण परिसरातील बदल हा केवळ

भौतिकदृष्ट्याच झाला नाही; तर तो सांस्कृतिक, राजकीय आणि मुख्यत्वेकरून आर्थिक आहे. खेड्यांमधून विकासाची गंगा धो-धो वाहू लागणार अशी स्वप्ने बघणाऱ्या पिढीच्या वाट्याला प्रत्यक्षात घोर उपेक्षा आली, हे वास्तव आहे. नवी पिढी या बदलाला निर्ढावलेली, संवेदनाशून्य, प्रसंगी मुर्दाड बनून वास्तवाला भिडणारी, परंतु त्या आधीची आज वयाची पन्नाशी गाठलेली मागची पिढी मात्र या बदलाने गांगरून गेली आहे. जुनी मूल्ये डोळ्यांसमोर बघता बघता नष्ट झाली. परंतु नवी जीवनदृष्टी मात्र आली नाही. एक प्रकारची विषण्ण पोकळी समस्त ग्रामीण परिसरात भरून राहिलेली जाणवते. मूल्यहीन सत्ता आणि त्या पाठोपाठ येणारी मत्ता यांना सोकावलेला ग्रामीण शोषक वर्ग, त्यांच्या अत्याचारामुळे भरडून निघालेल्या शोषणकर्त्यांचा प्रचंड जमाव आणि भागधेय म्हणून कष्टमय दरिद्री जीवन जगणारी ग्रामीण स्त्री यामुळे ग्रामीण जीवनाविषयी गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे.

'महालूट' या कथासंग्रहातील 'महालूट' या कथेत तुकारामबुवा हा प्रातिनिधिक शेतकरी सरकारच्या हमीभावाप्रमाणे आपल्या ज्वारीला चांगला भाव मिळेल, या आशेने हमीभाव केंद्रात ज्वारी विकण्यासाठी घेऊन जातो. तेथील अधिकाऱ्यांच्या अडवणुकीमुळे मन्नुशेठला कवडीमोल भावाने विकतो. सरकारी अधिकारी व व्यापारी संगनमताने शेतकऱ्यांची लूट करतात. 'काऊस' या कथेत गावात सुधारणेचे वारे वाहू लागले, त्यामुळे ग्रामीण भागातील तरुण सुधारण्याऐवजी वाईट मार्गाला लागलेले दिसतात. त्याचा फायदा प्रवीणशेठसारखी मंडळी लक्ष्मणबुवासारख्या सामान्य शेतकऱ्याची कशी लूट करतात. याचे चित्रण आले आहे. 'बरास' या कथेत वामन सारख्या अडलेल्या मजुराच्या अडचणीचा फायदा गजानन बापू सारखी मंडळी घेऊन त्यांची एकप्रकारे लूट करतात, याचे चित्रण या कथेत आले आहे. 'करंट' या कथेत सालाने शेतमजुरी करणाऱ्या शेतमजुराच्या बायकांकडे धनदांडगे शेतकरी वासना भागविण्याचे साधन म्हणून कसे पाहतात, वेळप्रसंगी त्यांचे सर्वस्व लुटण्याचा प्रयत्न करतात. हा अन्याय सहन न झाल्याने विहिरीतील पाण्यात करंट सोडून शेतमजूर शेतकऱ्याने केलेल्या अन्यायाचा बदला घेतो. 'भगदाड' या कथेत नंदू हा श्रीमंत व्यापारी आपल्या आपल्या गरीब मित्राच्या गरिबीचा फायदा घेऊन मदतीच्या बदल्यात मित्राच्या बायकोशी शरीरसंबंध प्रस्थापित करतो. मैत्रीच्या नात्याला तो दुष्ट कर्माने भगदाड पाडतो. 'हेळणा' या कथेत आपल्या कौटुंबिक दारिद्र्याला ठिगळ लावण्यासाठी लाकडाची मोळी विकून संसाराला हातभार लावण्याचा प्रयत्न करणाऱ्या गरीब स्त्रीचे शोषण

वनाधिकाऱ्याकडून कसे होते, याचे चित्रण आले आहे. 'कचाटा' ही कथा 'अंधारबन' या कथासंग्रहात 'बोळवण' या नावाने आली आहे. ती 'महालूट' कथासंग्रहात पुन्हा आली आहे. 'कुरघोडी' व 'गव्हाण' या कथांमधून हुंडा पद्धतीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. यातून मार्ग म्हणून नोंदणी पद्धतीचा विवाह स्वीकारण्याचा विचार सांगितला आहे.

**क) कादंबरी :**

**१) तहान :** 'तहान' या कादंबरीत पाणी टंचाईची समस्या हा विषय हाताळला आहे. लेखकाने लहानपणापासून पाणी टंचाईची जी झळ सहन केली आहे. त्या सत्यावर आधारित कथानक आहे. पाण्याच्या संदर्भात समाजाने चिंतनशील झाले पाहिजे, त्याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे असे त्यांना वाटते.[१] 'तहान' कादंबरी म्हणजे समाज मनाचा आक्रोश व्यक्त करणारे सामूहिक आक्रंदन आणि कल्लोळ आहे. ही कादंबरी राघोजी शेवाळे या शेतकरी कुटुंबाचा आधार घेऊन लिहिलेली असली तरी ते कुटुंब प्रातिनिधिक स्वरूपाचे आहे. या कादंबरीत दोन पिढ्यांतील मूल्य संघर्ष, विचारभिन्नता, त्यातून निर्माण होणारे मतभेद यामुळे खिळखिळी होणारी कुटुंब संस्था इ. गोष्टींचा विचार मांडला आहे.

'तहान' या कादंबरीत मानवी जीवनाचा आक्रोश, सृष्टी-पर्यावरणातील घटक, गुरे-ढोरे, पशू-पक्षी, इ. घटक प्रसंगानुरूप आले आहेत. या कादंबरीतील प्रत्येक व्यक्तीचे वर्तन अर्थपूर्ण आहे. त्याची मनोवृत्तीही त्याला साजेशी आहे. कादंबरीतून अनेक महत्त्वपूर्ण विचार व जीवनविषयक तत्त्वज्ञान सहजतेने मांडले आहे. कादंबरीतील भाषा प्रादेशिक आहे. कादंबरीत वारंवार म्हणी व वाक्प्रचार यांचा वापर केला आहे. कादंबरीतील व्यक्तिरेखा बेगड्या वाटत नाही.

'तहान' या कादंबरीत पाणी समस्येबरोबरच लोकसंख्यावाढीची समस्या, बेकारीची समस्या, भ्रष्टाचाराची समस्या, इ. समस्यांना प्रसंगपरत्वे स्पर्श करण्याचा प्रयत्न केला आहे. आजची तरुण पिढी चित्रवाणीच्या वेगवेगळ्या वाहिन्यांवरून प्रसारित होणाऱ्या कार्यक्रमातून भडक, उत्तान, अर्धनग्न स्त्रीच्या मालिका, सिनेमातील प्रेमप्रकरणे, भपकेबाज जीवनशैली याकडे झुकलेली दिसते. त्यामुळे आपल्या देशातील जनता मोठ्या प्रमाणात भोगवादी बनली आहे. वाहिन्यांवरील सुखाचे जग भोगण्यासाठी आर्थिकदृष्ट्या आम्ही सक्षम नाही, त्यामुळे अतृप्ती, क्लेष, वैफल्य, गुन्हेगारी, अनैतिकता, फसवेगिरी वाढू लागली आहे. या कादंबरीतून तरुण पिढीला जीवनविषयक वास्तवाचे भान येण्याच्या दृष्टीने मदत होईल. आज देशाला स्वातंत्र्य मिळून

६५ वर्षे झाली, तरी ग्रामीण भागातील लोकांना पिण्याचे पाणीही मिळत नाही. पाणी टंचाईच्या मुद्याचा गावकरी, राजकीय नेते, सरकारी अधिकारी आपापल्या स्तरावर वेगवेगळ्या पद्धतीने फायदा उठविण्याचा प्रयत्न करतात. यातून त्यांनी आजच्या राजकीय व्यवस्थेची शोकांतिका मांडली आहे.

**२) बारोमास :** 'बारोमास' या कादंबरीत भारतीय शेतकऱ्यांच्या जीवनातील दुःखाचे चित्रण आले आहे. आर्थिक सुबत्ता नसेल तर शिकून देखील शेतकऱ्यांच्या मुलांना कष्टाचेच काम करावे लागते. भारतीय समाज व्यवस्थेत शेतकरी हा घटक महत्त्वाचा खरा, पण इथली शेतीव्यवस्था तशी सुदृढ कधीच नव्हती. २१ व्या शतकात प्रवेश करताना स्वातंत्र्य, लोकशाही, मानवी हक्क, उदारीकरण इ. अनेक बाबतीत ऐतिहासिक घडामोडी झाल्या; परंतु आपला शेतकरी तिथेच आहे. शहरांपासून मैलोनमैल दूर खेड्यात तो सतत राबतो आहे. व्यापारी आणि सरकारी नोकरशाही यांच्या अरेरावी आणि उद्दाम वर्तणुकीमुळे तो कनिष्ठ दर्जाचा ठरला. त्याचे जगणे मागासलेपणाचे ठरले. सदानंद देशमुख यांनी या शेतकऱ्यांच्या जीवनाला, त्यातील दुःख, समस्यांना त्यातही फुलणाऱ्या नव्या विचारांना शब्दबद्ध केले आहे. 'बारोमास' मध्ये गरीब शेतकरी कुटुंब आहे. शेतकी समस्या आहेत. विकेंद्रित समाजव्यवस्था आहे. जुलमी नोकरशाही व छंदी सावकारशाही आहे. आधुनिकतेच्या नव्या मूल्यांची जाण असलेल्या माणसांबरोबरच गुप्तधनाचा शोध घेणारी सोनेरी टोळी आहे. भांडण, वैर, अन्याय, दुःख दारिद्र्य आणि हे सर्व असताना जगू पाहणारे, जगण्याची दिशा शोधणारेही आहेत.

सांजोळा नावाच्या एका खेड्यातील सुभानराव या शेतकऱ्याची ही एक प्रातिनिधिक कथा आहे. त्याचा मुलगा एकनाथ हा कादंबरीचा नायक आहे. त्याचे एम.ए.बी.एड. पर्यंत शिक्षण झालेले असताना शेतीचे काम करण्यास तो नाइलाजाने तयार झाला आहे. नोकरी मिळविण्यासाठी लागणारा पैसा त्याच्याकडे नाही. म्हणून तो शेतीमध्येच नवनवीन संकल्पना राबविण्याचा प्रयत्नात असतो. परंतु पुरेशा पैशाअभावी त्याला ते नीट जमत नाही. वडील वारकरी पंथाचे व आई महानुभावी भक्तीत रमलेली आणि अभ्यासक्रमातील संतसाहित्याचा प्रभाव यामुळे तो एक सज्जन माणूस आहे. जे आपल्या वाट्याला आले आहे, ते स्वीकारण्याची वैचारिक शक्ती त्याच्याकडे आहे. त्याला आपल्या मर्यादा कळलेल्या आहेत. पैसा नसेल तर आपण काहीच करून शकत नाही, हे त्याने ओळखले आहे. शेत विकून मिळालेल्या पैशातून नोकरी मिळविण्याचा तो प्रयत्न करू शकला असता;

परंतु सात्त्विक वृत्तीचा असल्यामुहे एकनाथ आपल्या आईवडिलांच्या शब्दाबाहेर जात नाही.

उच्च शिक्षण घेऊनही नोकरी न मिळू शकणाऱ्या तरुणांचा तो एक प्रतिनिधी आहे. तो शेतात राबतो, पुस्तके वाचतो. तीच तीच पुस्तके वाचून कंटाळतो. पूर्वी तो कविता करायचा. पण तो आता कधी कधी वैफल्यग्रस्तेत त्या कविता नष्ट करण्याचा विचार करतो. त्याची बायको शहरी संस्कृतीत वाढलेली आहे. ती आधुनिकतेच्या सर्व मूल्यांना गोंजारणारी आहे. भौतिक सुख म्हणजेच जीवन असे तिचे ठाम मत आहे. एकनाथशी लग्न करून स्वतःच्या पायावर धोंडा मारून घेतला आहे, असे तिला वाटते. तिची मानसिकताही वैफल्यग्रस्त झाली आहे.

शेतकऱ्यांच्या जीवनात महत्त्वपूर्ण स्थान असणारे सावरकर, राजकीय धोरणे व नेते शेतकऱ्यांच्या आत्महत्येस कसे कारणीभूत ठरतात; याचे विवेचन कादंबरीत आले आहे. वैफल्यग्रस्त अवस्थेत ग्रामीण भागातील तरुण गुप्तधन, अचानक पैसा मिळविण्याचे मार्ग शोधण्याचे प्रयत्न करतात. त्यातून आर्थिक दैन्याबरोबरच नैतिक दैन्य जन्मास येते. 'बारोमास' कादंबरीत अनेक छोट्या छोट्या कहाण्या स्वतंत्रपणे येतात. बारोमास म्हणजे बाराही महिने शेतकऱ्यांच्या वाट्याला येणाऱ्या दुःखाची, वेदनामय जीवनाची ओळख या कादंबरीतून करून देण्याचा प्रयत्न केला आहे.

**संदर्भ :**


१) देशमुख सदानंद, 'अंधारबन', कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, प्रस्तावना, पृ. क्र. ३
२) देशमुख सदानंद, 'गावकळा', सुविद्या प्रकाशन, पुणे, २००५, पृ. क्र. ७.
३) तत्रैव, पृ. क्र. ८.
४) तत्रैव, पृ. क्र. ३०.
५) तत्रैव, पृ. क्र. ३१.
६) तत्रैव, पृ. क्र. ३५.
७) तत्रैव, पृ. क्र. १०४.
८) महाराष्ट्र साहित्य पत्रिका, क्र. ३०१, एप्रिल मे जून २००२, पृ. क्र. ७५.
९) सार्वेकर कैलास (डॉ.) (संपा.), तहानः स्वरूप आणि समीक्षा, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, २००३, पृ. क्र. १३१.

# ग्रामीण कथाकार - अप्पासाहेब खोत

प्रा. सुनिता पावडे

मराठी ग्रामीण कथाविश्वात आप्पासाहेब खोत यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. चौथ्या पिढीतील साहित्यिक जाण असणारा आघाडीचा ग्रामीण कथालेखक म्हणून संपूर्ण महाराष्ट्र त्यांना ओळखतो आहे. समाजात जे परिवर्तन होत आहे. माणसा-माणसांमध्ये दुरावा वाढतो आहे याचे प्रभावी चित्रण आप्पासाहेब खोतांच्या कथांतून घडते. माणुसकीची कणव असलेल्या त्यांच्या कथा काळजाला भिडतात. असे मत प्रा. चंद्रकुमार नलगे यांनी मांडले आहे. प्रा. नलगे यांचे मत अतिशय सार्थ आहे. कारण वाढत्या शहरीकरणामुळे ग्रामीण भागातील जीवन बदलले. त्याचा परिणाम लोकांच्या मानसिकतेवर झाला. प्रा. खोत यांनी बदललेल्या माणसांचे व त्यांच्या मानसिकतेचे चित्रण कथांमधून केले. मराठी ग्रामीण कथाविश्वात स्वत:ची खोतीशैली निर्माण करणाऱ्या प्रा. आप्पासाहेब खोत यांच्या कथा मुख्यत: शेतकरी जीवनाभोवतीच फिरतात. 'गवनेर' पासून 'माती आणि कागुद' पर्यंत त्याची कथा कशाप्रकारे विकसित होत गेली, त्यातील आशय याचा आढावा या प्रकरणात घेतला आहे.

**'गवनेर' :-**

'गवनेर' हा आप्पासाहेब खोत यांचा पहिला कथासंग्रह मे १९९१ साली प्रकाशित झाला. ७ जून १९९२ च्या लोकसत्ता या दैनिकात सूर्यकांत आजगावकर यांनी तर, ५ जानेवारी १९९२ च्या दैनिक 'कृषिवेल' या अंकात शशिकांत चौधरी यांनी या कथासंग्रहाचे परीक्षण केले आहे.

'गवनेर' या कथासंग्रहात एकूण १५ कथांचा समावेश असून प्रत्येक कथा वेगळ्या धाटणीची आहे. सुशिक्षित बाळासाहेब इनामदार घराण्याच्या गोषा पद्धतीला विरोध करून विधवा बहिणीच्या पुनर्विवाहाचा निर्णय घेतात. हा नवविचार 'गोषा' या कथेत सांगितला आहे. 'दसऱ्याची कडाकणी' मधून

नवऱ्याच्या माघारी काबाडकष्ट करून आपल्या मुलाला शिकवणारी एक दलित स्त्री गिरिजा हिची कहाणी आहे. 'गवनेर' या शीर्षक कथेत मळ्यात अत्यंत त्रास देणारी पण जीव लावणाऱ्या वानरांची कथा आहे. ही लेखकाच्या आयुष्यातील सत्य घटना असल्याने त्यात जिवंतपणा आला आहे. सखू ह्या ग्रामीण स्त्रीच्या अबोल व भाववेड्या प्रेमाची कथा 'रानतुळस' मध्ये आहे. 'पान्हा'. या कथेत सुशिक्षित नवरा आपल्या बायकोचे सौंदर्य जपण्यासाठी तान्हुल्याला अंगावर पाजू देत नाही. भुकेने व्याकूळ झालेले बाळ टाहो फोडते तेव्हा तिला पान्हा फुटतो व ती बाळाला जवळ घेते. वात्सल्यरूपी ही माता पाहून शिवाजी महाराजांच्या काळातील हिरकणीची आठवण होते. 'जोजंकार' या कथेत ग्रामीण जीवनातील ताण.तणाव, हेवेदावे प्रकटले आहेत. भाऊ बहिणीच्या प्रेमाची गुंफण 'वाट' या कथेत आली आहे. आईच्या निधनानंतर तिच्या दागिण्यासाठी जेव्हा भावजयी दावा करते तेव्हा भावा-बहिणीच्या नात्याचा उलगडा या कथेत होतो. 'नाचारगत' ही जावा-भावात काबाडकष्ट करून मोठ्या जिद्दीने आपल्या मुलीला मास्तरीण करणाऱ्या स्त्रीची कथा आहे. 'तोड' ही कथा बदलत्या सामाजिक परिस्थितीचा वेध घेणारी आहे. विधवा सासू.सुना आपली जमीन हडप करणाऱ्या बापू मोहित्याला कशाप्रकारे वठणीवर आणतात हे यात चित्रित केलेले आहे. तसेच आकू म्हातारी आपल्या विधवा सुनेचा पुनर्विवाह करण्याचा निश्चय करते. या कथेत नव्या विचाराच्या बदलत्या सामाजिक मनाचा वेध घेण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. 'गुतापा' या कथेत गावगाड्यातील भुजंग पाटलासारख्या अत्याचारी माणासाच्या वासनेला बळी पडणाऱ्या चिमणीला कोर्टात न्याय मिळत नाही. तेव्हा ती स्वत:च भुजंगरावाचा खून करून गुंता सोडवते. 'पाळणा' या कथेतून काबाडकष्ट करणाऱ्या बना आणि बबन्याच्या संसारात बऱ्याच वर्षानंतर पाळणा हालणार असतो. त्याचे आल्हाददायक वर्णन लेखकाने केलेले आहे. 'भोग' या कथेचा इयत्ता आठवीच्या पाठ्यपुस्तकात समावेश करण्यात आलेला आहे. अंधश्रद्धेला फाटा देताना स्त्री ने भोगलेल्या भोगाचे हृदयद्रावक चित्रण यात आहे. 'जू' ही कथा तरुण शेतकऱ्याची व्यथा प्रकट करणारी आहे. 'उद्ध्वस्त' या कथेत बदलत्या सामाजिक परिस्थितीचा वेध घेतला आहे. अडाणी आई बापाने आपल्या मुलाला शिकवून खूप मोठा होण्याची स्वप्ने पाहिलेली असतात. पण हुशार असणाऱ्या वसंताला जेव्हा बेकारच रहावे लागते तेव्हा त्याच्या आई वडिलांचे स्वप्न उद्ध्वस्त होते. 'गवनेर' या कथासंग्रहातील सर्वच कथा आशयदृष्ट्या संपन्न आहेत.

**'महापूर' :-**

माणसाला केंद्रस्थानी ठेवून १९९६ साली 'महापूर' हा कथासंग्रह प्रकाशित झाला. या कथासंग्रहात एकूण १५ कथा असून त्याचे परीक्षण प्रा. श्याम माने यांनी केले. आजच्या समाजाचे बदलते दारुण चित्र रेखाटताना लेखक येथे दिसतो. भुकेसाठी भाकरी आणि जीवन समजून घेण्यासाठी त्यांची कथा शब्दरूप होताना आढळते. प्रा. माने यांनी 'महापूर' च्या संदर्भात केलेले मतप्रदर्शन सार्थ वाटते. प्रत्येक कथेचा आशय उलगडण्यासाठी त्याचा उपयोग होतो. 'महापूर' ही पहिलीच कथा आहे. या कथेत बहीण भावाच्या नात्यात दारिद्र्यामुळे दुरावा निर्माण होतो. विधवा बहिणीला आपल्या मुलांचे पालनपोषण करताना अनेक अडचणी येतात. त्यात तिचा दुर्दैवी मृत्यू होतो. याचे हृदय हेलावून टाकणारे वर्णन आले आहे. अदावत म्हणजे आरोप. एकत्र कुटुंबपद्धतीत सासूचा सुनांवर वचक असतो. सासू जेव्हा सुनांवर चोरीचा आळ घेते तेव्हा सुनांची होणार त्रेधातिरपिट 'अदावत' या कथेत रेखाटली आहे. 'लेकावळा' या कथेत गणपाला जातीचा असून देखील जातीबाहेर ठेवले जाते. कारण त्याने लग्नाशिवाय संसार मांडलेला असतो. त्याच्या मुलांना त्यामुळे अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. श्रीमंत घरात दिलेल्या आपल्या मुलीच्या संसाराचा गाडा नीट चालावा, तिला माहेरकडून काही कमी पडून अपमानित होऊ न देणे यासाठी रोजगार करून पोट भरणारी व स्वत:च्या संसाराला ठिगळ लावणाऱ्या मातेची ससेहोलपट 'ऐपत' मध्ये लेखकाने सांगितली आहे. 'वाटणी' मध्ये म्हाताऱ्या आई वडिलांची दोन भावांनी वाटणी करून घेतली. त्यावेळी विरहामुळे आईवडिलांना होणारे दु:ख या कथेमधून रेखाटले आहे. 'परवड' या कथेत दुष्काळी कामावर पोट भरणाऱ्या लोकांचे जीवघेणे दारिद्र्य पाहायला मिळते. 'तोडगा' मध्ये सासरकडून होणाऱ्या छळाला पायबंद घालण्यासाठी केलेली युक्ती यात पाहायला मिळते. सासुरवासाला कंटाळून माहेरी निघून गेलेल्या बायकोच्या विरहामुळे नवऱ्याला लागलेले वेड, याची करूण कहाणी 'जोसरा' मध्ये रंगविली आहे. कुमारी मातृत्वाची समस्या 'पाण्याविना मासोळी' या कथेत चित्रित केली आहे. 'भारत' या तीन अक्षरी देशाचा संसार हिरिरीनं करणाऱ्या केशवनानाला आपल्या तीन दगडांच्या चुलीचा संसार सावरता आला नाही. तो आपल्या संसारी रिताच राहिला. याचे रोमांचकारक वर्णन 'नात्यानं बाप' या कथेत आले आहे. मुलगा व्हावा म्हणून मुलाने सुनेवर केलला अन्याय पाहून मनोमन तळमळणारी, तडफडणारी आई 'कोंडमारा' मध्ये पाहायला मिळते. प्रेमाच्या नात्यामध्ये निर्माण होणारा दुरावा 'घर व बंगला' मध्ये लेखकाने जिवंत केला आहे. दारूचे दुष्परिणाम चित्रित करणारी करुण कहाणी म्हणजे 'ऊन सावली'

होय. इगत म्हणजे युक्ती होय. लाचखोर व काम टाळणाऱ्या तलाठ्याला धडा शिकविण्यासाठी केलेली युक्ती 'इगत' मध्ये आहे.

**'रानगंगा' :-**

१९९६ ला मॅजिक प्रकाशन, पुणे यांनी 'रानगंगा' हा कथासंग्रह प्रकाशित केला. या कथासंग्रहात एकूण पंधरा कथा समाविष्ट केलेल्या आहेत. या कथा १९९५ ते १९९७ या कालावधीत दै. महासत्ता पुरवणी, धवलश्री दिवाळी अंक, स्वच्छंद दिवाळी अंक, चरणधैर्य दिवाळी अंक, महासत्ता दिवाळी अंक यामधून प्रकाशित झालेल्या आहेत. त्या सर्व कथांचा संग्रह 'रानगंगा'त केला आहे.

'रानगंगा' या शीर्षक कथेत सावत्र आई व वडील असून देखील पोरक्या झालेल्या नातीची जबाबदारी उचलताना आजीला होणाऱ्या यातना, माणसा.माणसातील प्रेमापेक्षा प्राण्यांचे माणसांवरील प्रेम याचे जिव्हाळापूर्ण वर्णन लेखकाने केले आहे. 'मुक्ता' या दुसऱ्या कथेत एड्स विषयक जनजागृती करण्याचा प्रयत्न केला आहे. साळुता म्हणजे केरसुणी. सुमनच्या गरीब आई वडिलांना घरात साळुत्याप्रमाणे स्थान असून देखील आपल्या एकुलत्या एक मुलीच्या अपेक्षा पूर्ण करताना त्यांची होणारी घालमेल विदारकपणे 'साळुता' या कथेत चित्रित केली आहे. चुलती व पुतण्याच्या नात्याचे जिव्हाळापूर्ण हृदय हेलावून टाकणारे दृश्य 'थोरली आई' या कथेत रेखाटले आहे. 'देवीचा कोप' या कथेत शालाबाई आणि बापुशा या जोडप्याला अशिक्षितपणा व अंधश्रद्धेवर विश्वास ठेवल्यामुळे सामोऱ्या जाव्या लागणाऱ्या प्रसंगाचे वर्णन केले आहे. स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी झेंडावंदन करताना स्वातंत्र्य मिळविण्यासाठी कोणते कष्ट झेलले याचा भूतकालीन चित्रपट अण्णासाहेब देशमुखाच्या पुढे उभा राहतो. त्याचे वर्णन 'काडतूस आण्णा' या कथेत आले आहे. 'डव्हाळं' मध्ये डोहाळे लागल्यानंतर पोटासाठी भाकरीची चोरी होते. तेव्हा समाजातील प्रतिष्ठा व सासूकडून मिळणारी अपमानास्पद वागणूक यामुळे चोरीची कबुली देताना होणारा मनःस्ताप याचे हृदय हेलावून टाकणारे वर्णन आले आहे. एकुलत्या एक मुलाच्या फाटक्या संसाराला हातभार लावताना आईला होणाऱ्या यातना, यातच एड्स सारख्या भयंकर रोगाची लागण झाल्यानंतर त्यातून प्राण वाचविण्यासाठी होणारी तिची धडपड असे मातृत्वाचे, प्रेमाचे चित्रण 'लागण' या कथेत आले आहे. स्वतःचे घर असावे ही प्रत्येकाची इच्छा असते. पण पैशांची कोणतीही तरतूद न करता जेव्हा घर बांधले जाते तेव्हा होणारी फरफट 'गारवा' या कथेत लेखकाने रेखाटली आहे.

'जोडणी' या कथेत दारिद्र्याने पैशांची जोडणी न झाल्यामुळे शासकीय योजनांपासून कशाप्रकारे दूर केले जाते, याचे वर्णन आहे. बायकांचा रोजगार बुडविणाऱ्या गणपाला बनाकाकूने कशाप्रकारे धडा शिकवला हे 'वचपा' या कथेत आले आहे. उपकाराच्या ओझ्याखाली दाबल्या गेलेल्या लक्सुला लग्नापासून दूर रहावे लागते. तेव्हा त्याच्या मनाची होणारी घालमेल 'फेसाटी' या कथेत आली आहे. पाऊस नसल्याने पैशा अभावी लोकांची तडफड होते. तर दुसरीकडे निवडणुकीसाठी लोक पैसे उधळत होते. अशा दोन टोकाचे वर्णन 'वाळवण' या कथेत आले आहे. मुक्या प्राण्यांना बोलता येत नसले तरी माणसांच्या प्रेमाखातर ते माणसावर आपला जीव उधळतात, याचे विनोदी पण मार्मिक वर्णन 'कोंबडी' या कथेत आले आहे.

खानदानी घराण्यातील रीतिरिवाजांच्या ओझ्याखाली वावरणाऱ्या गौरीने पती निधनानंतर पुनर्विवाह करून चिरेबंदी वाड्यातील प्रथांना ठोकर मारली. गौरीच्या परखड व सर्जनशील विचारांचे चित्रण 'चिरेबंदी' या कथेत आले आहे.

बदलत्या ग्रामीण जीवनाचा आलेख समाजप्रबोधनासाठी मांडण्याचा प्रयत्न प्रा. खोत यांनी केला आहे.

**'कळवंड' :-**

'कळवंड' हा कथासंग्रह २००० साली प्रकाशित झाला. यामध्ये एकूण १२ कथा आहेत. या कथासंग्रहातील कथांची शीर्षके काढून सलगपणे वाचल्यास कादंबरी होऊ शकते. बापू आणि बाबू या दोन मोठ्या जिद्दीने जगणाऱ्या व येणाऱ्या आव्हानांना सामोऱ्या जाणाऱ्या व्यक्तिरेखा प्रत्येक कथेत आपल्याला दिसतात. ग्रामीण जीवनाच्या चित्रणाचा नमुना म्हणजे 'कळवंड' होय.

बाबू व बापूच्या संसाराला हातभार लावणारी तानी नावाची शेळी. तिला दोन्ही कुटुंबात महत्त्वाचे स्थान आहे. ती पोट फुगून मरते. याचे हृदयद्रावक चित्रण 'तानी' या कथेत आले आहे. 'घालमेल' या कथेत अतिपावसामुळे हातात आलेले पीक जाणार म्हणून बापूच्या जीवाची होणारी घालमेल लेखकाने मोठ्या खुबीने टिपली आहे. 'पोटावरचं पोट' या कथेत जीवसृष्टीतला प्रत्येक जीव हा दुसऱ्या जीवावर अवलंबून असतो. हे सूत्र सांगितले आहे. यामध्ये बापू आणि बाबू स्वत:बरोबरच काका बामणाचा मळा फुलवतात. त्यासाठी शेतातली उंदराची घरे उद्ध्वस्त करतात व उंदरांची पिल्ले मात्र मारत नाहीत. कारण त्यांना कावळ्यांनी मारलेले असते आणि

उंदरांना सापाने पकडलेले असते. म्हणून 'पोटावरचं पोट' असे समर्पक शीर्षक दिले आहे.

बापू आणि बाबू ने आपल्या घरी पाळलेल्या कोंबड्याात रुबाबदार असलेला भला थोरला कोंबडा म्हणजे गब्रू. सर्वांचा जीव त्याच्यात गुंतलेला होता. पण गावात मानमोडीच्या रोगाने थैमान घातल्यांनतर आपला गब्रू देखील आपल्याला सोडून जाईल आणि ते दु:ख पचविता येणार नाही. तेव्हा आधीच त्यांची विक्री करायचे ठरवितात. प्राण्याविषयी लळा लावणारी व प्रसंगी भावनिक कोंडीत पकडणारी 'गब्रू' नावाची कथा आहे. बापू आणि बाबू सोसायटीचे प्रकरण करून म्हैस विकत घेतात. त्यासाठी सरकार सबसिडी देते. एकूण होणाऱ्या व्यवहारात फसवेगिरी आणि शेतकऱ्याची होणारी अगतिकता लेखकाने सूचकपणे मांडली आहे. बदलत्या प्रवाहाचा परिणाम म्हणजे 'सबसिडी' ही कथा होय. 'सुगरण' या कथेत हायब्रीडचे पीक जोरात आले. चिमण्या कणसावर बसून ते खाऊन टाकणार म्हणून बापू सुगरणीची घरटे काढून टाकतो. तेव्हा बाबूच्या जीवाची होणारी घालमेल व चिमणीच्या सर्व हालचाली बारकाईने लेखकाने टिपल्या आहेत. 'राऊंड' या कथेत बैलांच्या शर्यतीत नानाच्या 'चिकण्या' बैलाचा जीव जातो. माणसांचा खेळ हुतुया खरं मुक्या जनावरांचा जीव जातुया. आसलं राऊंड बंदच कराय पाहिजेत. (पृ.६७) अशी पश्चातापाची भावना शिवराम व्यक्त करतो. बापू, बाबू आणि सर्जा जिवाभावाचं त्रिकूट सर्जा सोडून गेल्याने ते विसकटते, याचे करुण वर्णन 'सर्जा' या कथेत आहे. या कथेत सर्जा हा पाळीव कुत्रा आहे. 'गवनेर' या कथेत अत्यंत त्रास देणारी पण जीव लावणाऱ्या वानरांची, लेखकाच्या आयुष्यातील सत्य घटना रेखाटली आहे. कळवंड म्हणजे संघर्ष. रामायण, महाभारतापासून आज कलियुगापर्यंत अशीच कळवंड सगळीकडं सुरू आहे. जन्मापासून सरणापर्यंत कळवंड. माणूस, घर, दार, जमीन, गांव, शिवार, समा:ज, देश सगळीकडं कळवंडच कळवंड. (पृ. १०७) सत्ता संघर्षासाठी माणसा.माणसात जसा संघर्ष होतो तसा वन्यप्राण्यांच्या ठिकाणीही होतो, याचे चित्रण 'कळवंड' कथेत झालेले आहे. 'आ. ना. घोळ' ही या संग्रहातील एक वेगळीच कथा आहे. बाबूचा मित्र आकाराम नारबा नाव्ही स्वत:चे घोळ आडनाव सांगतो. त्यामुळे सर्वजण त्याला आण्णा घोळ या नावाने संबोधतात. लेखकाने या कथेत शाळा तपासणी, शिक्षक, शाळा, विद्यार्थी, साहेब यांच्या माध्यमातून शिक्षण व्यवस्थेवर प्रकाश टाकला आहे. 'वाटा' या कथेत बापू आणि बाबू काका बामनाची जमीन राबराब राबून वाट्याने फुलवतात. पण काका बामनाच्या मृत्युनंतर ती जमीन त्याचा मुलगा

विकण्याचा विचार करतो. तेव्हा बापूंच्या होणाऱ्या स्वप्नांचा चक्काचूर आणि बाबूने धरलेली शिक्षणाची वाट, अशी जीवनाला कलाटणी देणारी ही कथा आहे. प्राणी, माणूस आणि माती यांच्याशी एकनिष्ठ झालेला कथासंग्रह म्हणजे 'कळवंड' होय.

**'माती आणि कागुद' :-**

आप्पासाहेब खोत यांचा 'माती आणि कागुद' हा कथासंग्रह २००३ साली प्रकाशित झाला. या कथासंग्रहात एकूण १६ कथा आहेत. 'गळफास' या पहिल्याच कथेत जमीन गहाण ठेवून कर्जबाजारी होऊन मद्यधुंद अवस्थेत नाचणाऱ्या तामजाई खोऱ्यातील तरुण पिढी व त्यांच्यामुळे इतरांना भोगाव्या लागणाऱ्या यातना याचे चित्रण आले आहे. 'माती आणि कागुद' या शीर्षक कथेत काळ्यामातीत राबून देखील शेतकऱ्याच्या डोक्यावर कर्जाचा डोंगरच असतो. त्यापेक्षा शिक्षणाने शहाणे व्हा, अशी शिक्षणाची महती सांगणारी ही कथा आहे. 'पदराआडची माया' या कथेत आई आणि मुलगी यांच्या देखरेखीत होणारे बळीरामचे हाल आले आहेत. पण मुलाची ससेहोलपट पाहून त्याचे ओझे कमी व्हावे म्हणून स्वत:च्या प्राणाचे त्याग करणारी माउली, ही करूण कहाणी लेखकाने रंगविली आहे. प्राणी व पक्षी यांची त्यागी वृत्ती मानवावरील प्रेम पण स्वार्थापोटी जगणारी माणसाची जात यांचे चित्रण 'चिमणीचं घरटं' या कथेत आहे. रक्ताची नाती श्रेष्ठ असतात. आईच्या मृत्युनंतर मुलाची जबाबदारी ही फक्त मावशीच चांगल्याप्रकारे घेते. या आशयाची कहाणी 'सोन्याची आई' मध्ये आहे. जमीन असून देखील दुष्काळामुळे भूमिहीन झालेल्या नारायणची करूण कथा 'परतफेड' या कथेत आहे. आईबापाचं आतडं निराळं आसतं बाबा. तुमास्नी ताज्या रक्ताच्या पोरास्नी न्हाई कळायचं, आमचं दुक आमास्नी ठावं. (पृ.७४) आई वडिलांचे मुलांवरील असणारे प्रेम 'चकवा' या कथेत आले आहे. 'चुलीचं लाकूड' या कथेत एकत्र कुटुंब पद्धतीत सुनांना होणारा त्रास वर्णन केला आहे. त्यात गरिबा घरची सून असेल तर अतिशय मानहानिकारक वागणूक दिली जाते. याचे वर्णन आले आहे. पैशासाठी रुग्णांची सेवा करणारा डॉक्टर व माणुसकीच्या नात्याने रुग्णांची सेवा करणारा डॉक्टर, अशा दोन विरोधी टोकांच्या डॉक्टरांच्या संदर्भातील 'कसाई' ही कथा आहे. शासनाने शालेय पोषण आहारात खिचडी देण्याची योजना सुरू केली. दुर्गम भागातील लोकांची एकवेळची अर्धवट भूक कशाप्रकारे ती भागवते याचे वर्णन 'खिचडी' या कथेत आले आहे. 'गवळण' ही गवळण नावाच्या म्हशीची आत्मकथनवजा कथा आहे. म्हातारपणात मुलांची साथ न मिळाल्याचे दु:ख 'वठलेलं झाड' या

कथेत लेखकाने सांगितले आहे. शिक्षणामुळे माणूस उच्च पदावर जातो. तो संस्कारित जीवन जगतो. पण अर्धवट शिक्षण सोडलेली माणसे जीवनातून व समाजातून कशा प्रकारे बाजूला फेकली जातात, याचे वर्णन 'सौदा' या कथेत पाहायला मिळते. काळाबरोबर माणसाने बदलले पाहिजे ह्या आशयाची कथा 'मळणी मशीन' होय. शेताला बांधा बिगार आणि बाईला कुंकवा बिगार शोभा न्हाई! (पृ. १६०) स्त्रीच्या जीवनात पतीला असणारे स्थान 'पेरणी' कथेत आले आहे. 'उतावणी' या कथेत महागाई आभाळाला टेकलेली दिसते. काळाबाजार करणाऱ्यांनी गरिबाचं जगणं अवघड करून टाकलेलं आहे. भ्रष्टाचाराला बळी पडलेल्या व्यक्तीची होणारी स्थिती 'उतावणीत' आली आहे. प्रा. आप्पासाहेब खोत यांनी शेती करून देखील दारिद्र्य पदरात पडत असल्याने शिक्षणाने नोकरी मिळवा. संस्कारित जीवन जगा असा शहाणपणाचा सल्ला दिला आहे, कधीकधी त्यांची कथा प्रचारकी झाल्यासारखी वाटते.

सारांश, प्रा. खोत यांची कथा समकालीन वास्तवातून आकार घेते. नवनवीन समस्यांचे चित्रण ते प्रभावीपणे करतात. नवविचारांचे सुतोवाच ते कथांतून करतात.ग्राम जीवनातील प्रतिष्ठेच्या कल्पनांचे चित्रण कथेतून येते. दु:ख, शोषण हे प्रा. खोत यांच्या कथांचा आत्मा आहे. निवडणुकांमुळे बदललेले खेडे ते अधोरेखित करतात. शेतकऱ्यांच्या जीवनातील महत्त्वाच्या प्राणिमात्रांचा गोतावळा ते रेखाटतात. ग्रामीण तरुणांच्या रंगेलपणाचे चित्रण कथेतून येते. शिक्षणाचे महत्त्व ते कथेतून अधोरेखित करतात. भ्रष्टाचाराचे स्वरूप स्पष्ट करणारी त्यांची कथा आहे. आत्मनिवेदन किंवा तृतीयपुरुषी निवेदन कथाकार अनुभवाच्या मागणीनुसार करतात. नवनवीन म्हणी, वाक्प्रचार व खास कोल्हापूरी ढंगाच्या शब्दांचा वापर ते करतात.

# 'तणकट' कादंबरीतील कृषिजीवन

प्रा. नरेंद्र वाव्हळ

'तणकट' कादंबरीतील कृषिजीवन चित्रणाचा विचार करताना ग्रामसंस्कृतीतील क्षमशीलता, सहनशीलता, शेती परंपरेशी असलेल्या लोकांची टिकून राहण्याची वृत्ती समूहप्रधानता, नैतिकता, कौटुंबिक सलोखा, सामंजस्य, माणुसकीवरील निष्ठा, गावगाड्यातील सलोखा यांचा समावेश करता येईल. 'तणकट' मधील समाजवाढ हे केवळ वर्तमानकालीन नाही, तर त्यातून भविष्याच्या दिशाही सूचित झाल्या आहेत. आजची ग्रामव्यवस्था आधुनिकीकरणाच्या विळख्यात कशी सापडली आहे, याचा अनुभवही कादंबरी वाचताना येतो. त्याचबरोबर दलित चळवळीला आलेले अपयश केवळ त्यांच्या आक्रमक भूमिकेत नाही तर आजच्या आधुनिकीकरणाच्या पोटात दडलेले आहे हे वास्तव राजन गवस यांनी अत्यंत तटस्थपणे टिपले आहे. हे वास्तव टिपत असताना गवस यांनी परंपरेतील आधुनिकतेचा अत्यंत गांभीर्याने विचार केला आहे. गावगाडा समजण्यासाठी त्याची अत्यंत गरज आहे. पूर्वी समाजात चार वर्ग होते. ब्राह्मण, क्षत्रीय, वैश्य आणि शूद्र या जातिव्यवस्थेवर समाज चालत असत. त्यावरच संस्कृतीची वाटचाल चालू होते. कृषिजीवनात जातीला महत्त्व होते. आजही ही जात आपण सोडू शकत नाही. त्यातून पूर्वीपासून शूद्र वर्गावर अन्याय, अत्याचार झाले. त्यामुळे हा समाज उच्चवर्णीयांच्या अत्याचाराचा बळी पडत होता. परंतु आता परिस्थिती कशी बदलत आहे. कृषिजीवनात त्याचा विचार मांडण्याचे कार्य राजन गवस यांनी केले. परंतु त्याचबरोबर कृषिजीवनातील सलोखा संपवून संघर्ष निर्माण करण्याचे कार्य दलित चळवळीतील स्वार्थी नेते कशाप्रकारे करतात, याचे वर्णन येथे पाहावयास मिळते.

'तणकट' कादंबरीची सुरुवात कृषिजीवनातील समाजव्यवस्थेने केली आहे. आकाशात काळे ढग जमा होतात, परंतु हे काळे ढग एकत्र येऊन पाऊस पडत नाही. काही काळ अंधार निर्माण करतात व काही वेळाने लख्ख उजेड पडतो. ग्रामजीवनात असे अनेक संघर्षाचे ढग निर्माण होतात. काहीतरी

घडेल असे वाटत असते, परंतु काहीही न होता वाद, संघर्ष मिटतात. ही कृषिजनांची परंपरा आहे. त्यामुळे असे ढग येणारच. गावातील म्हारोड्याची घरे मध्ये एकत्र मोठी इमारत. बाकी सगळ्या ठिकाणी खपऱ्या किंवा पाचरट याची घरे. फक्त भीमा महार व गोपाळा यांची पक्की विटांची घरे. घराचे रंग लालभडक वस्तीत ओळीनं तीस-चाळीस घरं. रस्त्यावर खडी, मध्येच मोठे मोठे खड्डे. या खड्ड्यात पाणी साचलेले. हे ग्रामजीवनाचे वास्तव दर्शन येथे पाहायला मिळते.

कबीर महारवाड्यात राहणारा परंतु एकटाच कॉलेजमार्फत पोहोचलेला विद्यार्थी. कृषिजीवनात आलुते, बलुते, फिरस्ते सर्व येतात. त्याचबरोबर जनावरेही येतात. पूर्वी अनेकांच्या घरी पशुपालन व्यवसाय होता. कबीरच्या घरी शेळी होती. तो घरी पोहोचला व शेळीला सोडवायला लागला. शेळी गपकन् उभी राहिली. कबीरला आश्चर्य वाटलं. मुक्या प्राण्यांना बोलता येत नाही. परंतु त्यांना सगळं कळतं याचं आश्चर्य कबीरला वाटते. लेखकाने मुक्या प्राण्यांच्या भावना येथे व्यक्त केल्या आहेत. शेळी घेऊन कबीर गावच्या बाहेर येतो. शेळी खत असते. पुढे शिंदेंचा मळा लागतो. शिंदे गावातील श्रीमंत व्यक्ती. शेतात ऊस लावलेला असतो. कबीर त्यांच्या शेताच्या बांधावर हिरवेगार गवत होते. शिंदे तसा फार चिकट माणूस. कबीरने इकडेतिकडे पाहिले. कोणीही नव्हते. तेव्हा शेळीला तिथे चरायला सोडतो. परंतु थोड्याच वेळात शिंद्यांची बायको त्याला पाहते व ती म्हणते, ''तुला काय लाजगीज वाटती व्हय रंऽऽ, लाजगिड्या भाड्याऽऽ कापसाची मिळकत असल्यागत शेती बांधावर चारायलास. तेच्यापरास कापून जाऽऽ की गुलामाऽऽ?'' उत्पन्न असूनही ही माणसं अत्यंत चिकट असतात. कृषिजीवनातील शेती व शेतीशी संबंधित माणसाची वृत्ती येथे व्यक्त होते.

सदबा म्हार आपला मुलगा शिकला पाहिजे, ही जिद्द त्याची असते. त्यासाठी त्याची आई त्याला सुट्टी करायला सांगते. परंतु वडील त्यास नकार देतात. कारण आपल्या खानदानीत अजून कुणी शिकलं नाई. त्यांला आपण शिकवायचं हे तो ठरवतो. गावात एखादं असं ठिकाण असतं. तिथं सगळी मुले एकत्र येतात. कबीर त्यांच्यात मिसळतो. त्याला वाटते, मुलांनी अभ्यास करावा. पुढे जावे परंतु गौतम नावाच्या मुलगा त्याचीच फिरकी घेतो. गावातील कोणतेही काम असो, काहीही घडो, सर्व गावातील प्रतिष्ठित व्यक्ती चावडीवर एकत्र येतात. गावातील होणारे वादविवाद हे चावडीवर मिटवले जात. गावातील चांगल्या गोष्टीबद्दल चावडीवर एकत्र येऊन चर्चा करून त्या सर्वांपर्यंत पोहोचविल्या जात. हे गावचे कृषिजीवनाचे वेगळेपण, सलोखा

लेखकाने येथे दाखवून दिले आहे. आधुनिकीकरणामुळे गावात दूध डेअरी निर्माण केली जाते. पैशाची सर्व जबाबदारी शेडबाळे उचलतो. परंतु दूध डेअरी म्हणजे आधुनिक काळात राजकारणी लोकांना पैशाचं कुरण मिळते. त्यातून होणारा भ्रष्टाचार हा सर्व गावाला खालीपणा आणतो. गावात अशीच दूध डेअरी निर्माण केली गेली. या दूध डेअरीत साठ हजार रुपयांचा भ्रष्टाचार होतो. त्यासाठी चावडीत एकत्र येतात. त्यावर चर्चा होते. दादू म्हार व शेडबाळे मिळून डेअरीत भ्रष्टाचार करतात. परंतु डेअरीचा चेअरमन बंडू पाटील व सेक्रेटरी तुळशीदास मिसाळ यांच्यावर ठपका येतो. परंतु सर्व भ्रष्टाचार शेडबाळे संगनमताने करतो. गावातील प्रतिष्ठित व्यक्ती आक्काबा राणे. आक्काबा राणेंचा गावातील सर्वजण मान राखतात. त्यांचा आदर करतात. कृषिजीवनात गावातील अशा प्रतिष्ठित माणसाला आदर होता, हे पाहावयास मिळते. शेडबाळेने पैसे खाल्ले हे समजूनही आक्काबा राणे सर्वांना शांत बसवतात.

कबीर कॉलेजमध्ये जात असतो. कॉलेजात जायला उशीर होतो. दुसरा मुलगा येतो. वर्गाचे दार बंध असते. तेव्हा कुलकर्णी नावाचा मुलगा दाराला लाथ मारतो व आत प्रवेश करतो. नंतर कबीरही आत प्रवेश करतो. प्राध्यापक गजेंद्रकर कबीरवर संशय घेतात. ते त्याला नाव विचारतात. नाव ऐकून म्हणतात, "तुझ्या ते पटकन ध्यानातही येणार नाही. शिक्षणाला एक संस्कृती लागते. ती नसली की असंच होणार. नुसत्या स्कॉलरशिप, सवलती देऊन शिक्षण पोहोचत नाही. त्याला संस्कार असावे लागतात" (पृष्ठ क्रमांक १५). स्वातंत्र्यप्राप्तीनंतर समाजात जाती, रूढी, परंपरा आहे तशा होत्या. १९८४ नंतरही त्या येथे पाहावयास मिळतात. प्रा. गजेंकर सर तू महार आहे. असे असंस्कृत वर्तन तूच करू शकतो हे त्याला दाखवून देतात. ही कृषिजीवनातील जातीयता लेखकाने दाखवून दिली आहे. कबीरच्या घरची गरिबी असते. त्याला वडील कॉलेजात शिकवायला पाठवितात. जवळ घड्याळ व सायकल नसल्याने त्याला कॉलेजमध्ये वेळेवर जाता येत नाही. कृषिजीवनातील दरिद्री अवस्था व अज्ञानीपणा यातून वडिलांची मुलांना शिकवण्याची जिद्द लेखक येथे दाखवून देतात. थळूआजा ही गावातील व म्हारोड्यातील एक वयस्कर व्यक्ती. कबीर शेळी घेऊन गावाच्या बाहेर आला. तेथील उंबराचा व बाभळीचा पाला शेळीस खाऊ घालावा असे त्याला वाटते, म्हणून तो तेथेच थांबतो. थळूआजा त्याला त्याबद्दल विचारतो, "कबरू, आज हितच कसा काय थांबलाय?" त्यावर कबीर त्याला किसना शिंद्यांच्या बायकोचे बोलणे कसे खाल्ले हे सांगतो. तेव्हा थळूआजा सांगतो, आता काळ

बदलला. भोंग्याला माणूस कामावर जातो. भोंगा वाजला की सुटतो. पूर्वी आम्ही शेतीवर कामाला जायचो. पाच-सहा शेळ्या घेऊन गेलो तरी कोणी काही बोलत नव्हतं. परंतु आजकाल अनेकांना एक शेळी आपल्या शेतात आली तरी नकोशी वाटते. काळाप्रमाणे शेतकरी कसा बदलला, याची असणारी सहनशीलता कशी संपत चालली आहे, हे लेखक येथे दाखवून देतो. थळूआजा हा आपल्या म्हारोड्यातील मुलांबद्दल नाराजी व्यक्त करतो. आपल्या मुलांनी शिक्षण घ्यायला पाहिजे, असे थळूआजाला वाटते.

कृषिजीवनात शिक्षण यायला लागले. गावातील मुले शिकायला लागली. त्यात जात-पात न मानता शिक्षण सुरू झाले. डॉ. आंबेडकरांची शिका-संघटित व्हा-संघर्ष करा ही तत्त्वे कृषिजीवनात पोहोचली. त्यामुळे दलित तरुण शिकायला लागली. म्हारोड्यातील तानू आजी याची बळी ठरते. तानू आजीचा नवरा मरण पावलेला, मुलगा कोल्हापूरला पोलिसांत भरती झालेला, दोन मुली सासरी. तानू म्हातारी म्हारोड्यात एकटीच. मुलगा आपल्या बायकोबरोबर कोल्हापूरला मजेत राहातो. त्याला आईची आठवण येत नाही. तानू आजी कबीरला बोलावून त्याच्याकडून पत्र लिहून मुलाला पाठविते. परंतु मुलगा तातोबा गावाकडे येत नाही. त्याला येथे यावेसे वाटत नाही. कृषिजीवनातला तरुण शिकल्याने स्वाभिमानी बनला. परंतु त्याचबरोबर तो स्वार्थी बनला. या बदलामुळे म्हारोडा हळूहळू कसा अस्ताव्यस्त होत गेला हे दाखवून दिले आहे. त्याचबरोबर शिकलेला हा तरुण म्हारोड्यापासून कसा तुटत जातो, त्याला आपल्या बहिणीही नकोशा वाटतात. आई ही नकोशी वाटते.

कबीर कॉलेजमध्ये तास संपल्यावर पाणी प्यायला निघाला असता प्रा. भालेराव सर समोरून आले. पूर्वी अनेक मुलांनी कबीरला सांगितले होते. भालेराव सर जातीजातीत भेदभाव करतात. परंतु त्याला ते पटले नव्हते. ते दलित प्राध्यापक कशाला भेदभाव करतील, परंतु प्रा. भालेराव भेटले तेव्हा ते म्हणाले, ''माझी ही थोडी धावपळ आहे. पुढच्या आठवड्यात आपल्या कॉलेजमध्ये बाबासाहेबांच्या अर्थशास्त्रीय विषयावर एक व्याख्यान आयोजित केले आहे. आता तुला हे कळलं ना? आता तुझ्या समाजाच्या सर्व मुलांना ही माहिती व्यवस्थित कळव. भेटेल त्याला सांग, सांगशील ना? तुमच्या समाजाच्या मुलांनी त्यामध्ये पुढाकार घेतला पाहिजे. करशील ना?'' (पृ.क्र. २७). प्रा. अवचित भालेरावांच्या त्या बोलण्यातून जातीयवाद लेखक दाखवून देतात. प्रत्येक व्यक्ती हा आपली जात श्रेष्ठ. आंबेडकर हे तुमच्या जातीचे

आहेत, हे दाखविण्याचा प्रयत्न करतात. शिक्षणक्षेत्रातही, कृषिजीवनात जातिवाद पाहायला मिळतो.

कृषिजीवनात आधुनिकता येण्यापूर्वी चुकीला महत्त्व होते. सुली रामा म्हाराची पत्नी. तिला चहा प्यावासा वाटतो. परंतु जाळण्यासाठी काहीही नसते. तेव्हा ती घरातून बाहेर पडते. गज्या मुळीकच्या शेतात खोडवी आहेत हे तिला कळते. म्हणून ती मुळीकच्या शेतात जाते. तेथे मोटार चालू असते. उसाला पाणी देणे चालू असते. तिथं पाणी देणार शामा मुळीक तिला भेटतो. सुली ही शेडबाळेची म्हणून प्रसिद्ध असते. तेव्हा तो तिची चौकशी करतो. तू शेतात खांडव गोळा करू नको. आमच्या खोपीजवळ भरपूर आहेत, ती घेऊन जा म्हणतो. शामा मुळीकच्या ह्या स्त्रीलंपटपणाने तिच्या अंगाला घाम फुटतो. ती काहीच न बोलता मुकाट्यानं घरी निघून येते. कृषिजीवनात स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोण येथे पाहायला मिळतो. सुली ही शेडबाळेकडे ओढली गेली. तिचा नवरा रामा महार हा दिवसभर कष्ट करायचा. परंतु त्याच्यापासून तिच्या गरजा भागत नव्हत्या. त्या शेडबाळेकडून पूर्ण होऊ लागल्या. त्यामुळे शेडबाळेच्या चकरा महारवाड्यात वाढल्या. यातून सुलीची अपकीर्ती सर्वत्र पसरली. कृषिजीवनातील स्त्रीला जीवनातील तिच्या गरजा पूर्ण न करणाऱ्या, नवऱ्याकडून सुख न मिळणाऱ्या सुलीच्या वर्णनातून स्त्री वृत्तीचे वर्णन लेखकाने केले आहे.

कृषिजीवनात शेतीला पाणी देणे महत्त्वाचे काम असते. गावाच्या म्हारोड्यातील अनेकजण गावातील लोकांच्या शेतावर कामाला होती. रामा म्हार हा उघडाबंब नुसती लंगोटी घालून आबा पाटलांच्या शेतात उसाला पाणी देत होता. एकेका सरीला तो पाणी सोडत होता. पाणी देताना त्याचा अवतार बघण्यासारखा होता. हातात खोरे, गुडघ्यापर्यंत पाय चिखलाने माखलेले होते. रामा म्हारावर आबा पाटलांचा पूर्ण विश्वास होता. त्यामुळे रामा म्हार कामावर असल्यावर आबा पाटील निर्धोक असायचा. कृषिजीवनातील विश्वसनीयता येथे पाहावयास मिळते.

ग्रामजीवनात जातिव्यवस्था जास्त पाहायला मिळते. शेडबाळे हा दूध डेअरीत भ्रष्टाचार करतो. त्याच्यावर आरोप ठेवले जातात. त्याला मारहाण झाल्यावर गावातील लोकांवर शेडबाळे केस करतो. त्याला मारहाण झाल्यावर त्याला आक्काबा राणे दवाखान्यात घेऊन जातात. परंतु तरीही शेडबाळे त्यांचेही नाव केसमध्ये टाकतो. तेव्हा डंग्या मारुती म्हणतो, ''गेले की न्हाई बेणं जातीवर. शेवटी कडू ते कडूच. त्येला काय कळणार उपकार आणि बिपकार? उफराट्या अवदालीचं! चांगले हातपाय मोडाय पायजे व्हतं म्हणजे

कळालं असतं'' (पृष्ठ ४३). शेडबाळे हा मराठा होता. परंतु तो कडूपैकी एकाच जातीत असे दोन प्रकार या जातिव्यवस्थेत पाहायला मिळतात. परंतु आक्काबा राणे जात मानत नाहीत. ते म्हणतात, ''आगाऽऽ त्येच्या जातीला शिव्या देण्यापरास त्येला शिव्या द्येवा. त्याच्या जातीनं काय केलंय आणि त्योबी किती केलं तरी गावातलाच हाय की'' (पृष्ठ क्रमांक ४३). आक्काबा राणे हा सर्वांना बरोबर घेतो. गावात तो प्रमुख आहे. गावातील तंटे तो मिटवितो. पूर्वी कृषिजीवनात त्याला महत्त्व होते.

शेडबाळे दुखावला जातो. तो जाऊन महारवाड्यातील तरुणांना एकत्र करतो. त्यांना गावातील लोकांविरुद्ध महारवाड्यातील तरुणांच्या मनात विष पेरतो. त्यामुळे गावातील लोकांवर ते बहिष्कार टाकण्याचे ठरवितात. त्यांना शेडबाळे आधार देतो. कारण त्या काळात दलित-सवर्ण असा संघर्ष गावोगावी चालू असायचा. परंतु यांच्या गावात तसा संघर्ष नव्हता. गावातल्या आपुण्या आज्जास गणू पाटलाच्या आण्णानं मारलं होतं. त्यामुळे सर्व म्हारोड्यातील तरुण पुढे आले. त्यांनी पोलिसांत केस दिली. गावात पोलीस आले. आमदार आले. त्यांनी सर्व माहिती मिळविली. आण्णाला अटक केली. गावातील म्हारोड्यातील तरुणांनी अनेकांची नावे त्यात टाकली. कृषिजीवनात जातीचा फायदा घेणारे लोक पाहायला मिळाले.

कारण नसताना त्यांच्यावर केस टाकली जाते. आक्काबा राणे पोलीस ठाण्यात येतात. त्यांनाही झाल्या घटनेबद्दल वाईट वाटते. शेडबाळेने सर्व म्हारोडा एकत्र केला होता. फक्त कबीर त्यांच्यात नव्हता. फौजदार म्हणतो, कायदा त्यांच्या बाजूने आहे. त्याला आपण काही करू शकत नाही. तेव्हा आक्काबा राणे म्हणतात, ''सायेब, खरं बोलायचं तर आशानं आता उलटं व्हयालंय. आदी कधी आमच्या मनात यायचं न्हाई. त्ये आता यायला लागलंय. अशानं काय व्हयाचंय?'' स्वातंत्र्य मिळाले. कायद्यानं दलित समाजाला राखीव जागा निर्माण केल्या. त्याचबरोबर अनेक कायदे त्यांच्या बाजूने केले गेले. त्याचा फायदा दलित लोकांनी घ्यायला सुरुवात झाली. त्यामुळे गावातील समाजात संपूर्ण संघर्ष निर्माण व्हायला लागला. याचे नेमकेपणाने लेखक येथे वर्णन करतो.

स्वातंत्र्यानंतर अनेक दलित चळवळी उभ्या राहिल्या. ह्या चळवळीत काम करणारी अनेक नेतेमंडळी आपली पोटं भरण्यात पुढे आली. आपल्या लोकांच्या अज्ञानीपणाचा फायदा उठवून त्यांना लुटायचे काम करायचे. त्यांनी डॉ. आंबेडकर कळले असे समजून लोकांना एकत्र करायचे. या नेतेमंडळींबद्दल मोहन बल्लाळ कबीरला म्हणतो, ''याच्यापेक्षा आंबेडकर तू किंवा मी अधिक

वाचलेला आहे. असं मला वाटतं, याला महाडच्या संग्रामाची तारीख आठवत नाही आणि म्हणे हा दलित विचारवंत! यानं कसला केलाय विचार? हा तर राजकरणात काँग्रेसच्या पुढाऱ्यांच्या मागनं फिरत असतो. परवा तर मी याला आपल्या राज्यमंत्र्यांच्या सभेत त्यांच्यासमोर आडवा झालेला बघितलाय'' (पृष्ठ क्रमांक ३७). अशा प्रकारचे नेते दलित समाजाला एकत्र आणण्याचा प्रयत्न करताना आपला स्वार्थ साधून घेतात. याचे हे उदाहरण लेखकाने दाखवून दिलेले आहे.

शेडबाळेने सर्व म्हारोडा एकत्र केला. परंतु दलित म्हणून ज्या जाती आहेत, त्या त्यात येत नाहीत. गावातील वडारवाडी, मांग यांच्या वस्ती म्हारोड्याच्या संघर्षात येत नाही. कारण आपण त्यांच्यापेक्षा मोठे आहोत, हे दाखविण्याचा प्रयत्न करतात. म्हणजेच दलित समाज हाही एकत्र येऊ शकत नाही, हे लेखकाने दाखवून दिलेले आहे. कृषिजीवनात प्रत्येक जात कशी वेगळी आहे, हे यातून पाहावयास मिळते. शेडबाळे हा म्हारोड्यात नवनवीन सुधारणा करण्याचा प्रयत्न करतो. कारण मंडळ, पतसंस्था तो म्हारोड्यात निर्माण करतो. म्हारोड्यात वीज नसते. वीज प्रत्येक घरात देण्याचे काम तो करतो. त्यातही पंचवीस रुपये खर्च असताना दोनशे रुपये प्रत्येकाकडून जमा करतो. त्यातही तो भ्रष्टाचार करतो. पर्यायाने म्हारोड्याला फसवण्याचे काम शेडबाळे करतो. कारण शेडबाळे हा उपद्रवी व्यक्तिमत्त्व म्हणून लेखकाने दाखवून दिले आहे. १९८५ नंतरसुद्धा गावातील म्हारोड्यात वीज नसते. कोणत्याही प्रकारच्या सुविधा नसतात, हे लेखक दाखवून देतो.

शेडबाळे म्हारोड्यात सुधारणा करण्याचा आव आणतो. पतसंस्था निर्माण करून अज्ञानी लोकांच्या नावाने कर्ज काढतो. एवढेच नव्हे तर बँकेतूनही त्याच्या नावे कर्ज काढतो. त्यासाठी तो गावातील तलाठ्याला हाताशी करून जमिनीचा सातबारा उतारा मिळवतो व त्याद्वारे त्यांच्या नावे बँकेत कर्ज काढतो. हे सर्व जेव्हा त्याच्या हाताबाहेर जाते, तेव्हा तो म्हारोड्यातील सुलीला घेऊन गावातून पळ काढतो. हां हां म्हणता ही बातमी म्हारोड्यात पसरते. शहरातील अधिकारी गावात येतात. म्हारोड्यातील लोकांच्या नावावर किती कर्ज आहे हे सांगतात, तेव्हा संपूर्ण म्हारोडा अंधारात डुबून जातो. शेडबाळेसारखी स्वार्थी माणसं अज्ञानी लोकांच्या अज्ञानाचा गैरफायदा कसा घेतात, हे लेखकाने कृषिजीवनातील वेगळेपण दाखवून दिले आहे.

म्हारोड्याला पुन्हा अवकाळा येते. म्हारोड्यातील सर्व लोक कबीरला यातून मार्ग काढण्यास सुचवितात. पण कबीरला प्रश्न पडतो, यांना आपण

सांगितले होते की, शेडबाळेच्या नादी लागू नका. परंतु त्यांनी ऐकले नाही. थळूआजा हाही पूर्ण निराश होऊन जातो. तेव्हा कबीर गावातील पाटलांकडे जातो. त्यांना मदत करण्याचे आवाहन करतो. परंतु कोणीही त्यास मदत करीत नाही. आक्काबा राणे झालेला सर्व प्रकार विसरून कबीरला व म्हारोड्यातील लोकांना मदत करण्याचे काम करतात. ते कबीरला घेऊन साळोखे वकिलाला भेटतात. कबीरला सर्व कागदपत्रे गोळा करण्यासाठी एक हजार रुपये देतात. परंतु त्याचवेळी बनसोडे पत्रकबाजी करतो. गावातील म्हारोडा आंदोलनाच्या पावित्र्यात. यामुळे वकील व आक्काबा राणे माघार घेतात. त्या बातमीने कबीर पूर्ण आसाह्य होतो. लेखकाने आक्काबा राणे यांच्या माध्यमातून त्यांच्या सहनशीलनेचे वर्णन केले आहे. कृषिजीवनात जातिभेद न मानणारे आक्काबा राणेंसारखे काही लोक गावाला एकत्र आणू इच्छितात, हे लेखकाने दाखवून दिले आहे.

कृषिजीवनात आलुते, बलुते, फिरस्ते एकत्र येतात. कृषक हा सर्वांना एकत्र ठेवण्याचे कार्य करतात. 'तणकट' कादंबरीतून हेच लेखकाने दाखवून दिले आहे. या कादंबरीत प्रत्येक व्यक्तिरेखा हे स्वत:चा आत्मशोध घेण्याचा प्रयत्न करतात. त्याचबरोबर डॉ. आंबेडकरांनी ''शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा'' हे तत्त्व आजच्या दलित पुढाऱ्यांनी कसे विकृत केले आहे, हे लेखकाने दाखवून दिले आहे. ''आंबेडकर फक्त आपलेच आहेत. अशा महारांच्या आक्रमक भूमिकेमुळे ते मांगांनाही आपले मानावयास तयार नाहीत'' (पृष्ठ क्रमांक ११०), असे डॉ. कदम यांनी आपल्या 'कादंबरी सार आणि विस्तार' या पुस्तकात दाखवून दिले आहे. कृषिजीवनातील जातीयता, त्याचबरोबर कृषिजीवनातील वेगळेपणा येथे राजन गवस दाखवून देतात. दलितवर्ग शिकू लागला, परंतु अनेक दलित तरुण दहावीच्या पुढे शिकत नाही. त्याचबरोबर जे दलित तरुण शिकले, नोकरीला लागले, ते आपल्या मातृभूमीकडे, महारवाड्याकडे पूर्ण दुर्लक्ष करतात. मन्या या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून लेखक दाखवून देतात. एकूण कृषिजीवन, कृषिचित्रण या कादंबरीत राजन गवस करताना दिसतात.

सारांश, 'तणकट' कादंबरीतून कृषिजीवनातील समाजवास्तव दाखविले आहे. आजची ग्रामव्यवस्था आधुनिकीकरणाच्या विळख्यात सापडली आहे. भविष्यकाळात कृषिजीवनाची दिशा कशी असेल हे लेखकाने दाखवून दिले आहे. कृषिजीवनात दलित चळवळीला अपयश आल्याचे दिसून येत. कृषिजीवनात दलित चळवळीला अपयश आल्याचे दिसून येते. कृषिजीवनात आजही जाती, रूढी, परंपरा टिकून आहे. ग्रामसंस्कृतीमधील



40806

क्षमाशील वृत्ती येथे पाहावयास मिळते. कृषिजीवनात सहनशीलता असते. कृषि परंपरेशी टिकून राहण्याची वृत्ती समाजात पाहावयास मिळते. कृषिजीवनात समूहप्रधानता दिसून येते. कृषिजीवनात नैतिकता दिसून येते. कृषिजीवनात कौटुंबिक सलोखा दिसून येतो. कृषिजीवनात समंजसपणा आहे हे दिसून येते. कृषिजीवनातील माणुसकीवरील निष्ठा पाहावयास मिळते. गावगाड्यातील सलोखा दिसून येतो. ग्रामजीवनातील उपद्रवमूल्य पाहावयास मिळते. कृषिजीवनातील जातिव्यवस्थेतील कडू-गोडपणा दिसून येतो. दलित चळवळीचा फोलपणा दिसून येतो.

# विभाग 'ई'
# आदिवासी साहित्य

# आदिवासी साहित्याची संकल्पना वैशिष्टये व प्रेरणा

प्रा. डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर

**प्रास्ताविक :**

भारतीय स्वातंत्र्य व लोकशाही गणराज्य प्रणालीमुळे संपूर्ण देशांमध्ये विविध राजकीय, सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक, वाङ्मयीन घडामोडींचा परिणाम म्हणून प्रथम दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य या वाङ्मयीन प्रवाहाबरोबरच १९७०च्या दशकानंतर मराठी साहित्यात आदिवासी साहित्याचा स्वतंत्र, परिवर्तनवादी आणि जोरकस साहित्य प्रवाह निर्माण झाला. मराठीतील मध्यमवर्गीय, पांढरपेशा समाजातील साहित्यिकांनी आपल्या अनुभवांच्या कक्षा विस्तारित करून कणव व सहानुभूती म्हणून आदिवासी जमातींचा काहीसा जीवनालेख रेखाटण्याचा प्रयत्न प्रारंभी केला आहे. आदिवासी साहित्य प्रवाहातील आदिवासी जमातीत जन्म घेऊन आदिम जमातीचे आत्यंतिक वास्तववादी जीवनचित्रण कथा, कविता, कादंबरी, आत्मकथन या साहित्यप्रकारांत मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणामुळे आदिम जमातीतून संवेदनशील, सर्जनशील, जागृत, आत्मभान प्राप्त झालेली साहित्यिकांची पिढी निर्माण झाली. या पिढीने महाराष्ट्रातील आदिम, आदिवासी, डोंगरी, दुर्गम, अरण्यवासी परिवेशातील अनुभवविश्व आपल्या ललित कलाकृतींचा व पारंपरिक लोकसाहित्याचा विषय केला. आदिम अनुभवविश्वाची जोड मराठी साहित्याला मिळाल्यामुळे मराठी साहित्य अधिक समृद्ध व समाजाभिमुख, जीवनाभिमुख झाले. काव्यानंदापेक्षा समाजाभिमुख आदिम भारतीय जीवन प्रकट करणे हे आदिवासी साहित्याचे प्रमुख प्रयोजन आहे. या प्रस्तुत प्रकरणात महाराष्ट्रातील समाजव्यवस्था आणि आदिवासी, आदिवासीविषयक मध्यमवर्गीय दृष्टिकोण, आदिवासी कोण? आदिवासी साहित्य म्हणजे काय? आदिवासी समाजाची गुणवैशिष्ट्ये, आदिवासी

साहित्याचे प्रकार-भेद, आदिवासी साहित्याच्या प्रेरणा या अनुषंगाने चिकित्सा अभिप्रेत आहे.

**आदिवासी साहित्याचे स्वरूप:-**

अ) स्वातंत्र्यपूर्व काळ :
१) आदिवासी जमातीतील साहित्यिक व विचारवंत
२) आदिवासीतर जातीतील साहित्यिक

ब) स्वातंत्र्योत्तर काळ :
१) आदिवासी जमातीतील साहित्यिक व विचारवंत.
२) आदिवासीत्तर जातीतील साहित्यिक, विचारवंत, अभ्यासक.

**आदिवासी कोण?**

भारतातील आदिवासींची एकच एक निश्चित व्याख्या अभ्यासकांनी केली नाही. या देशातील मानववंशशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, समाजसेवक, देशी-विदेशी अभ्यासकांनी, आदिवासी जमातीतील नव्या अभ्यासकांनी, मराठीतील अभ्यासकांनी 'आदिवासी' या संज्ञेच्या अनेक व्याख्या केलेल्या आहेत. त्यांचा परामर्श घेणे क्रमप्राप्त ठरते. त्याचे भाषांतर डॉ. विनायक तुमराम यांनी येथे केले आहे, ते पुढीलप्रमाणे:-

**अ) पाश्चात्त्य मानववंशशास्त्रज्ञांच्या व्याख्या :**

१. गिलीन आणि गिलीन- ''एका विशिष्ट भू-प्रदेशावर राहणारा, समान बोली बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानीय गटांच्या समुच्चयाला आदिवासी म्हणतात.''[१]

२. डब्ल्यू. जे. पेरी- ''समान बोलीभाषा बोलणाऱ्या व एकाच समान भू-प्रदेशावर वास्तव्य करणाऱ्या समूहाला आदिवासी असे म्हणतात.''[२]

३. डॉ. रिव्हर्स- ''ज्या समूहातील सदस्य एक समान बोली भाषा बोलतात, युद्ध वगैरे सारख्या उद्दिष्टपूर्तीकरिता एक होऊन झटतात अशा सरळ व साध्या सामाजिक समूहाला आदिवासी समाज असे म्हणतात.''[३]

४. बोगार्डस- ''सुरक्षिततेची जरुरी, रक्तसंबंधाचे बंध, समानधर्म ह्यावर आदिवासी समूह आधारलेला असतो.''[४]

५. राल्फ पिडीग्टन- ''आदिवासी हा समाज बोली बोलणाऱ्या, एकाच भू-प्रदेशात वास्तव्य करणाऱ्या आणि सांस्कृतिक एकजिनसीपणा बाळगणाऱ्या लोकांचा गट होय.''[५]

पाश्चात्त्य अभ्यासकांच्या 'आदिवासी' विषयीच्या व्याख्येतून खालील समान सूत्रे लक्षात येतात-

(१) एका विशिष्ट भूप्रदेशावर वास्तव्य करणारी जमात आहे. भारतीय समाजजीवनाची भौगोलिकता व जमातीनिहाय वास्तव्य लक्षात घेतले हे सत्य आहे.

(२) आदिवासी बोली भाषेत देवाण-घेवाण करणारा, दैनंदिन जीवनव्यवहाराने ही बोली टिकविली आहे.

(३) विशिष्ट भू-भागात समूहाने, कळपाने राहणारी जमात.

(४) आदिवासी जमातींचा सांस्कृतिक एकजिनसीपणा टिकवून ठेवणारा हा भारतीय मानव समूह आहे.

**ब) मराठी अभ्यासकांच्या व्याख्या :**

१. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी- "नागर संस्कृतीपासून दूर व अलिप्त राहिलेले संबंधित प्रदेशातील मूळचे रहिवासी म्हणजे आदिवासी होय."[६]

२. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी- प्राथमिक अर्थव्यवस्था असणारे, स्त्रियांचे जबरदस्तीने अपहरण करून त्यांच्याशी पाशवी वर्तन करणारे, वाट्टेल ते भक्षण करणारे किंबहुना नरभक्षणाची ही खंत न बाळगणारे, तसेच जादू-टोण्यावर श्रद्धा ठेवणारे उघडे-नागडे लोक म्हणजे आदिवासी."[७]

३. पंडित महादेवशास्त्री जोशी- "आर्य व द्रविड हे भारतातील दोन मोठे मानवसमाज सोडून त्यांच्याही पूर्वी भारतात राहणाऱ्या किंवा बाहेरच्या देशातून येऊन वने व पर्वत ह्यांच्या आश्रयाने स्थायिक झालेल्या जमातींना वन्य जाती किंवा आदिवासी असे म्हणतात."[८]

४. डी. एन. मुजुमदार- "समान नाव असणारा, एकाच भू-प्रदेशावर वास्तव्य करणारा, एकच भाषा बोलणारा व विवाह, व्यवसाय इत्यादी बाबतीत समान निषेध नियमांचे पालन करणारा व परस्पर उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने एक पद्धतशीर व्यवस्था स्वीकारणाऱ्या कुटुंबाचे किंवा कुटुंब समूहांचे एकत्रीकरण म्हणजे आदिवासी समाज होय."[९]

५. मदन व मुजुमदार- "समान भाषा व समान संस्कृती असणाऱ्या व आर्थिक दृष्टीने परस्पर संबंधित असणाऱ्या ग्रामीण समुदायाच्या समुच्चयाला नेहमी आदिवासी समाज म्हणून संबोधले जाते."[१०]

६. डॉ. बी. एच. मेहता– ''आदिवासी या शब्दाच्या वापरामुळे अडचणी निर्माण होतात. आदिवासी ही पृथक संघटना असून मानवी इतिहासात तिने महत्त्वाची भूमिका निभावली आहे. त्यामुळे मूळ म्हणून तिचा स्वीकार करण्यात आलेला आहे.''[११]

७. डॉ. गुरुनाथ नाडगोंडे– ''माणसाची भ्रमंती अवस्था संपुष्टात आल्यानंतर माणूस कोठे ना कोठे स्थिर होऊ लागला. सतत प्रयत्नशील असणाऱ्या मानवाने उदरनिर्वाहाची विविध साधने शोधून काढली व निश्चित अशी उदरनिर्वाहाची साधने गवसल्यावर त्याच्या आयुष्याला स्थिरता लाभली. आद्य पाषाण युगापासून ते धातु युगापर्यंतचा मानवाचा प्रवास हेच दर्शवितो. जगाच्या कोणत्या ना कोणत्या तरी भूभागावर मानव आपले पाय रोवून स्थिरावू लागला. काहींनी निसर्गाचे वरदान लाभलेल्या मोजक्या लोकवस्तीची खेडी पसंत केली तर काहींनी सुधारलेल्या व उद्योगधंद्यांनी बहरून गेलेल्या शहरात वस्ती केली. पण काही भूमिपुत्रांनी ह्या सर्व लोकवस्तीपासून दूर व दुर्गम असलेल्या डोंगर कपाऱ्यात, नद्या नाल्यात, कडेकपाऱ्यात आपला तळ ठोकला. 'धरतीची लेकरे' म्हणून ज्यांचा सर्वार्थाने उल्लेख करता येईल, अशा आदिवासी समाजाची दुनियाही वेगळी आहे.''[१२]

८. डॉ. गोविंद गारे– ''भौगोलिकदृष्ट्या इतरांपासून नेहमीच दूर म्हणजे गिरीकंदरात राहिल्यामुळे जंगलात राहणारा निसर्गाच्या सानिध्यात वाढलेला म्हणजे आदिवासी.''[१३]

९. प्रा. वामन शेळमाके – ''आदिवासी म्हणजे भूतलावर पहिले पाऊल ठेवणारा माणूस, नागरी संस्कृतीपासून अगदी दूर, जंगलखोऱ्यात, दुर्गम दऱ्याखोऱ्यात राहणारा व स्वत:चे अस्तित्व जपणारा माणूस म्हणजे आदिवासी, आदिवासी म्हणजे दु:खाची समस्त महागाथा.''[१४]

१०. माधव बंडू मोरे – ''पशुपाल जगात, पशुपूजक जगात, पहाडी-जंगली जगात, प्राचीन जगात राहणारे गिरीजन वनवासी म्हणजे आदिवासी.''[१५]

११. डॉ. सुदाम जाधव – ''ज्यांनी शहरे व खेडी या दोन्हीकडे धाव न घेता दूरवर दुर्गम डोंगराच्या कपारीत, जंगलच्या व नद्या नाल्यांच्या सानिध्यात आपले संसार उभे केले. त्यांनाच खऱ्या अर्थाने आदिवासी म्हणता येईल.''[१६]

१२. सोपानदेव चौधरी – ''आदिवासी जनता ही धरित्री मातेचा पहिला गहिवर आहे. वृक्षवल्ली, पक्षी, वनचरे ह्या धरित्रीच्या लेकरांची खरी सोयरी आदिवासी जनताच आहे.''[१७]

मराठी अभ्यासकांच्या 'आदिवासी'बद्दलच्या व्याख्यांमधून खालील निष्कर्ष काढता येतील.

(१) शहरी व आधुनिक युगापासून अलिप्त राहिलेले दऱ्याखोऱ्यात वास्तव्य करणारे हे मूळ निवासी आहे, असे लक्षात येते.

(२) स्त्रियांच्या अन्यायास कारणीभूत असणारी, आदिम जमात, मानव जमात नष्ट करणारी आदिम जमात, अंधश्रद्धाळू आदिम जमात असल्याचे लक्षात येते.

(३) भारतीय संस्कृतिकोशातून ही जमात आर्य व द्रविडपूर्व असल्याचे किंवा बाहेरच्या देशातून येऊन वनस्थित झाल्याचे संदिग्धपणे लक्षात येते.

(४) समान नाव, एक भू-प्रदेश, भाषा, विवाह, व्यवसाय या सर्वांबाबत एकत्वांचा धागा निर्माण करून एकमय जीवनाचा आविष्कार घडविणारा हा मानव समूह असल्याचे स्पष्ट होते.

(५) आर्थिकदृष्ट्या सलोखा असणारी आदिवासी जमात आहे.

(६) इतर मानव समूहापेक्षा आदिवासी ही पृथक संघटना आहे. हे पृथकपण (वेगळेपण, निराळेपण) मान्य केले आहे.

(७) एकूणच या पृथ्वीतलावरील मानवाच्या स्थिरतेबद्दल विचार करता आद्य पाषाण युगापासून ते धातू युगापर्यंत मानवाने स्थिरता मिळवली. यात काहींनी शहरी व उद्योगधंद्याची ठिकाणे निवडून वास्तव्य केले, तर काहींनी निसर्गाचे वरदान लाभलेल्या दूर व दुर्गम असलेल्या डोंगर कपाऱ्यात, नद्या नाल्यांच्या कडेकपारीत आपला तळ ठोकला. हाच मानव समूह नंतरच्या काळात आदिम व वनवासी म्हणून ओळखला जाऊ लागला.

(८) आदिवासी निसर्गप्रिय जमात आहे.

(९) या पृथ्वीतलावर पहिला पाऊल ठेवणारा व निसर्गाच्या सानिध्यात स्वजमातीचे सत्त्व, स्वत्व, स्वाभिमान, संवेदना जागृत ठेवणारा आदिवासी समाज आहे.

(१०) मानवेत्तर प्राण्याची पूजा करून जंगलात राहून आपले प्राचीनत्व, आदिमत्व सिद्ध करणारी आदिवासी जमात असल्याचे लक्षात येते.

(११) डोंगर कपारीत संसाराची व्यथा भोगणारी आदिवासी जमात आहे.

(१२) जंगलातील पशू, पक्षी, प्राणी या सर्वांशी मित्रत्वाचं नातं निर्माण करणाऱ्या आदिवासी जमाती आहेत.

वरील सर्व व्याख्यांमधून सर्वसाधारणपणे असे लक्षात येते की, सर्व अभ्यासकांनी आदिवासी जमातींचे डोंगर सानिध्य, वनवासीपण, शहर व खेडी यापासूनचे जाणीवपूर्वक दुरावलेपण, अलिप्तता दाखविण्याचाच प्रयत्न केला

आहे. जंगलासह जंगलाधिष्ठित आदिवासी जमातींचे अद्वैत नाते असल्याचेच वरील व्याख्यांमधून प्रत्ययास येते.

**'आदिवासी' शब्दाच्या विविध अर्थछटा**

'आदिवासी'बद्दलची एकच एक संज्ञा मान्य झालेली नाही. याबाबत अनेक मानववंशशास्त्रज्ञांनी समाजशास्त्रज्ञांनी आदिवासी जीवनाचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांनी या शब्दांच्या अनेक अर्थछटांवर प्रकाश टाकला आहे. तो खालीलप्रमाणे

१. मराठी विश्वकोशात, ''अनुसूचित जमातींना आदिवासी, मूळवासी, आदिम, आदिमजाती व टोळ्या, वन्यजाती व गिरीजन अशी वेगवेगळी नावे आहेत.''[१८]

२. धरित्रीची लेकरे, जंगलचे राजे, आदिम अथवा आदिवासी म्हणून संबोधले जाते.

३. नागर संस्कृतीचा त्याप्रमाणे वर्गभेद असलेल्या समाजाचा संपर्क न झालेल्या वैशिष्ट्यपूर्ण चालीरीती जपणाऱ्या 'संस्कृती' आदिवासींमध्ये आढळतात.

४. इंग्रजीतील 'ॲबॉरिजिनीस्' या शब्दाचा रूढ मराठी पर्यायी शब्द 'आदिवासी' आहे.

५. इंग्रजीत 'ॲबॉरिजिनीस्' या शब्दाव्यतिरिक्त 'प्रिमिटिव्ह' म्हणजे 'आदिम' किंवा 'अप्रगत लोक' आणि 'सॅव्हेज' म्हणजे 'मागासलेले' किंवा 'रानटी' लोक होय. 'प्रिमिटिव्ह किंवा सॅव्हेज' या शब्दांतून आदिवासींचा मागासलेपणा, अज्ञान किंवा भोळेपणा सूचित होतो. आदिवासी शब्दास नि:संदिग्ध अर्थ प्राप्त करून देणे हे मानववंशशास्त्रातील न सुटणारे कोडे आहे.

६. आंतराष्ट्रीय मजूर संघटनेने आदिवासींना 'एतद्देशीय' संबोधावे असे सुचविले आहे.

कारण आदिवासी संस्कृतीची जडण-घडण इतर संस्कृतीच्या संपर्कावाचून स्वतंत्ररीतीने झाली आहे.

७. 'आदिवासी' हा शब्द विशिष्ट पर्यावरणात राहणारा, विशिष्ट भाषा बोलणारा, विशिष्ट जीवनपद्धतींनी व परंपरांनी नटलेल्या आणि शेकडो वर्षे जंगल-पहाडात जीवन जगत असताना आपली धार्मिक आणि सांस्कृतिक मूल्ये जोपासणाऱ्या मानव समूहाची ओळख करून देण्यासाठी वापरला जातो.

८. 'आदिवासी' कोण? याबाबत आदिवासी साहित्याचे ज्येष्ठ संशोधक डॉ. विनायक तुमराम असे म्हणतात, ''वनवासी, अर्धनग्न राहून, लंगोटी

नेसून शिकार करण्यासाठी रानोमाळ भटकल्यामुळे 'वन्यजमाती' असेही म्हटले जाते. कधी उपहासाने 'जंगली' किंवा 'लंगोट्ये' म्हणतात. सहानुभूतीने 'धरतीची लेकरे' किंवा 'वनराईची लेकरे' याशिवाय 'गिरिराज' (गिरीकुहरातील दीर्घ वास्तव्यामुळे) भारतमातेचे 'आदिसंतान' म्हणूनही उल्लेख होतात. अलीकडे 'आदिपुत्र' किंवा 'वनपुत्र'' जंगलचे अनभिषिक्त राजे' भारतीय राज्यघटनेने त्यांना 'अनुसूचित जमाती' म्हटले आहे.''[१९]

९. 'आदिवासी' कोण? याबाबत इंग्रजांनी शिरगणती करताना १८९१ पासून १९४९ पर्यंत आदिवासी म्हणजे, ''पशुपाल जमात, पशुपूजक जमात, पहाडी-जंगली जमात, प्राचीन जमात,गुन्हेगार जमात असे शब्द वापरले आहेत.''[२०]

१०. आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेने आदिवासींना 'इंडिजिनस' संबोधण्याची शिफारस केली आहे. यांनाच 'नॉनलिटरेट' म्हणजे निरक्षर असेही म्हटले आहे.

अनुसूचित जमाती, आदिवासी, मूळ निवासी, आदिम, आदिम जमाती, टोळ्या व वन्यजमाती, गिरीजन, धरतीची लेकरे, जंगलचे राजे, इंग्रजीत ॲबॉरिजिनस, प्रिमिटिव्ह, अप्रगत लोक, सॅव्हेज, रानटी लोक, एतद्देशीय, वनवासी, उपहासाने जंगली किंवा लंगोट्ये, सहानुभूतीने वनराईची लेकरे, गिरीराज, भारतमातेचे अदिसंतान, आदिपुत्र, वनपुत्र, पशुपाल जमात, पशुपूजक जमात, पहाडी-जंगली जमात, प्राचीन जमात, गुन्हेगार जमात, इंडिजिनस, नॉनलिटरेट, मागासलेले हिंदू. अशा सर्व साधारणपणे विविध अभ्यासकांनी तीस अर्थछटा मांडलेल्या आहेत. या सर्व अर्थच्छटा मधून आदिवासी जमातींची भौगोलिकता, नैसर्गिकताच लक्षात येते. आदिवासी जमाती या आदिम व प्राचीन जमाती आहेत या बाजूने अभ्यासकांचे बहुमत आहे. परंतु मला असे वाटते की या सर्व संज्ञा वापरून आदिवासी जमातीचे एक गोंडस शब्दरूप तयार केले आहे, असे वाटते.

**आदिवासी साहित्य म्हणजे काय?**

आदिवासी जमातींच्या धर्म, परंपरा, रूढी, रीतिरिवाज, विवाहसंस्था, जातपंचायत, सण, उत्सव, त्यांच्या जीवनातील दारिद्र्य, भूक, विषमता, अन्याय, अत्याचार, त्यांचा व्यवसाय, उद्योगधंदा, त्यांचे सांस्कृतिक जीवन, शैक्षणिक व कौटुंबिक जीवन, त्यांची अर्थव्यवस्था, त्यांचे आरोग्य, अंधश्रद्धा या सर्वांबाबत आदिम जमातीमध्ये जन्म घेऊन संवेदनशीलतेने साहित्यनिर्मिती करणारे प्रतिभावंत आदिवासी साहित्यिक आहेत. मानवतावादी दृष्टिकोनातून,

सहानुभूती म्हणून, आदिम जमातींबद्दलचा कळवळा म्हणून अनेक आदिवासीत्तर साहित्यिकांनी आदिवासी जीवनविश्व आपल्या साहित्यकृतींचा विषय केलेला आहेत. आदिवासी साहित्याबाबत अनेक अभ्यासकांची मते खालीलप्रमाणे विचारात घेऊया.

१) आदिवासी साहित्याबाबत डॉ. शरच्चंद्र गोखले म्हणतात, ''दलित व आदिवासींच्या भोवतालची सांस्कृतिक चौकट व वातावरण वेगळे आहे. आदिवासींना समृद्ध संस्कृतीची चौकट आहे. आदिवासींच्या संस्कृतीला मातीचा सुगंध आहे. त्यामुळे आदिवासी साहित्य ही दलित साहित्याची नक्कल न होता त्याला स्वत:चं असं वळण व शैली असली पाहिजे.''[२०] डॉ. गोखले यांच्या व्याख्येतून आदिवासी साहित्याचे पृथक वैशिष्ट्ये स्पष्ट होते आहे. आदिवासी साहित्य हे खास देशी जाणिवेचे वाङ्मय आहे.

२) डॉ. विनायक तुमराम म्हणतात की, ''आदिवासी साहित्य हे वनसंस्कृतीचे नातलग साहित्य आहे. रानावनातील वंचितांचे ते साहित्य आहे. ज्यांच्या प्रश्नांना भूतकाळाने कधी उत्तरेच दिली नाहीत, अशा दुर्लक्षितांचे साहित्य आहे. ज्यांच्या आक्रोशाला इथल्या समाजव्यवस्थेने कधी न्यायच दिला नाही. अशा गिरीकुहरातील अन्यायग्रस्तांचे ते क्रांती साहित्य आहे. येथल्या क्रूर कठोर न्यायव्यवस्थेंने ज्यांच्या शेकडो पिढ्यांना आजीवन वनवास ठोठावला त्या आदिम समूहाचे ते मुक्तिसाहित्य आहे.''[२१] या व्याख्येतून असे निरीक्षणास येते की, सावत्रपणाची वागणूक देणाऱ्या अन्यायी, अमानुष प्रस्थापित व्यव्यस्थेने आदिवासींना हीन लेखले आहे. न्यायाची याचना करणाऱ्या समूहाचे ते क्रांतिप्रवण साहित्य आहे.

३) श्री. लक्ष्मण ढवळू टोपले म्हणतात की, ''आदिवासींच्या व्यथा, वेदना, हर्ष, विहर्ष, ज्यातून प्रकट होतात ते साहित्य आदिवासी होय. ज्यातून त्यांच्या कोंडलेल्या भावनांना वाट मिळेल. त्यांच्या उपेक्षित जीवानाचे अंतरंग प्रकट होईल ते साहित्य आदिवासी असेल. भूमीतून नैसर्गिकरीत्या अंकुर फुटावा तसे हे साहित्य त्यांच्या आत्माविष्कारातून प्रकट झाले पाहिजे.''[२२] सहज व उत्कटपणे आत्मनिष्ठ भूमिकेतून आदिम मनातून प्रसवलेले लेखन म्हणजे आदिवासी साहित्य होय.

४) प्रा. वामन शेळमाके म्हणतात की, ''आदिवासी साहित्य म्हणजे प्रामुख्याने गोंड, राजगोंड, परधान, माडिया, कोलाम, महादेवकोळी, भिल्ल, कोरकूं, वारली, आंध; पारधी, थोटी, बरडा, गामीत, धनवार, पावरा, वसावे, ओराँव अशा विविध जमातींचा समावेश आहे. आदिवासी म्हणविणाऱ्या या जमातीची गुणवैशिष्ट्ये अभ्यासनीय आहेत. यांच्या जीवनावर जे साहित्य आहे.

यासच आम्ही आदिवासी साहित्य म्हणतो.''[२३] महाराष्ट्रातील प्रमुख व उपजमातीचं जीवनचित्रण करणारे वाङ्मय म्हणजे आदिवासी साहित्य होय.

वरील सर्व व्याख्यांच्या आधारे निरीक्षण नोंदवता येईल की, प्रस्थापित, मध्यमवर्गीय, पांढरपेशा जीवन अनुभवविश्वापेक्षा, मध्यमवर्गीय परिघाबाहेरील जीवनविश्वाचा वेध आदिवासी साहित्य घेते. ग्रामीण परिवेशातील वेशीच्या, गावकुसाच्या बाहेरील अतिदूर, डोंगरी, दुर्गम, दऱ्याखोऱ्यात, जंगल-पहाडात, निसर्ग आणि जंगलाच्या सान्निध्यात राहणाऱ्या विविध जाती-जमातींच्या जीवन जगण्याचे विविध पदर म्हणजे आदिवासी साहित्य होय. अर्वाचीन मराठी साहित्याच्या ज्या प्रेरणा-प्रवृत्ती आहेत त्या या साहित्यप्रवाहाच्या नाहीत. इंग्रजी, फ्रेंच, बंगाली इत्यादी विविध भाषेतून अर्वाचीन काळात अनुवाद, भाषांतर, रूपांतर या विविध प्रकारात साहित्यनिर्मिती झाली. आदिवासी साहित्याच्या प्रेरणा-प्रवृत्ती मात्र अस्सल मराठी आहेत. मराठी मातीचा सुगंध, आदिमतेचं भान, आदिमतेची वैशिष्ट्ये प्राप्त झालेले हे साहित्य आहे. शेकडो वर्षांच्या साहित्यपरंपरेमध्ये ज्यांचे जीवन कधी साहित्याचा विषयच झाला नाही, अशा उपेक्षित, वंचित, दुर्लक्षित, आदिमता प्राप्त झालेल्या विविध जाती-जमातीतील जनसमूहांच्या आक्रोशाचा शाब्दिक आविष्कार म्हणजे आदिवासी साहित्य होय असे संशोधकाला वाटते. महाराष्ट्राच्या विविध भू-प्रदेशात ज्या आदिवासी जमाती अतिशय खडतर दु:खदायक, अमानवी, अमानुष, अत्याचारित पद्धतीने शेकडो वर्षे जीवन जगत आलेल्या आदिम जमाती आहेत. त्यांच्या दु:खाला साहित्याच्या माध्यमातून शब्द प्राप्त करून देण्याचा प्रयत्न स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातही झालेला दिसून येतो. असा प्रयत्न मानवतावादी व सहानुभूतीच्या दृष्टिकोणातून मध्यमवर्गीय जाणिवेने तसे प्रयत्न झाले. स्वातंत्र्योत्तर काळात खास अस्सल आदिम जाणिवेतून आदिवासी जमातीतील नवशिक्षित कवी, लेखक, समाजकार्यकर्ते, विविध चळवळीतील अभ्यासकांनी आदिम जाणिवेतून आदिम जमातींचे जीवनचित्रण आपल्या कलाकृतींचा विषय केले आहेत. या प्रकारच्या साहित्यालाच नवशिक्षितांचे लिखित आदिवासी साहित्य म्हणता येईल.

प्राचीन काळापासून आर्य संस्कृतीने दूर डोंगरात लोटलेल्या अनार्य आदिम जमातींचे परिवर्तनाभिमुख, समाजसन्मुख, जीवनवादी साहित्य आदिवासी साहित्य आहे. या साहित्याच्या आशय जाणिवेत क्रांतीची आस, धग आहे. आदिमांच्या नवसमाजनिर्मितीचे फार उच्च, उदात्त कोटीचे योजन या साहित्यामागे आहे. आदिमांना प्रस्थापित व्यवस्थेने डोंगरात वास्तव्य करायला भाग पाडून शहरी सुविधांपासून वंचित ठेवले. या प्रवृत्ती विरोधात बंड

पुकारण्याची भूमिका आदिवासी साहित्यात आहे. शेठ, सावकार, जमीनदार, भांडवलदारवर्ग, शाहू शेतकरी, ग्रामीण भागातील प्रभुत्वशाली शेतकरी या सर्वांच्या अन्याय, अत्याचार, शोषणातून आदिवासींना मुक्तता हवी आहे. या प्रवाहातून राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन, आर्थिक विषमतेतून आदिम जीवनानुभूती प्रकट होते. आर्य संस्कृतीने मुस्कटदाबी केलेल्या लोकांचे हे साहित्य आहे. शेकडो वर्षांच्या आदिम जमातींच्या मौनातून हे साहित्य प्रसवले आहे. नवसमाज निर्मितीसाठी प्रबोधनाचे एक हत्यार म्हणून हे साहित्य विचाराधीन आहे, नव्हे नवसमतावादी क्रांतीचा ध्यासच घेऊन मराठी साहित्याच्या क्षेत्रात या साहित्याने आगेकूच केली आहे. प्रस्थापित मराठी साहित्याचे आशयविश्व, भाषा, अलंकार, प्रतिमा, प्रतीकें यांबाबतचे सर्व मानदंड या साहित्याने मोडीत काढलेले आहेत. आपल्या जीवनाशी निगडित नव्या प्रतिमा, प्रतीकांचा आग्रह धरणारे हे साहित्य आहे. आदिम जमातींच्या नैसर्गिक, अकृत्रिम भावना व्यक्त करणारे हे साहित्य आहे. आदिम जमातींच्या मनात साचलेल्या विविध नैसर्गिक भावनेला मुक्त वाट करून देणारे हे साहित्य आहे. आदिम मनाचे भावतरंग उलगडून दाखविणारे हे साहित्य आहे.

मध्यमवर्गीय जाणिवेतून डोंगराच्या कपारीवर किंवा डोंगरावर भटकंतीच्या निमित्ताने, पर्यटन, प्रवासानिमित्ताने डोंगरावरून मराठी साहित्यिकांची नजर आदिम जीवनाकडे वळली. त्यातून सहानुभूतीने जे साहित्य निर्माण झाले ते सुद्धा या संकल्पनेत गुंफावे लागेल. स्वातंत्र्योत्तर काळात मध्यमवर्गीय जाणिवेतून आणि दलित व आदिम, खास अस्सल जाणिवेतून जे साहित्य निर्माण झाले ते सुद्धा या संकल्पनेत अंतर्भूत आहेत. आदिम जाणिवेने समाजातील द्विस्तरीय रचनेतून आदिवासीविषयक जे लेखन झाले, त्याचा अंतर्भाव या संकल्पनेत होईल. जे परिवर्तन व बदलाला सामोरे जाऊन नवसमाज निर्मितीचा आदर्श घालून देणारे साहित्य आदिवासी साहित्य आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील पहिल्या पिढीतील आदिवासी तरुणांना लोकशाहीमुळे शिक्षण, व्यवसाय, रोजगाराची संधी मिळाली त्यातून आदिवासी तरुणांच्या ठिकाणची निर्मितीशीलता शाबूत राहिली. यातूनच या नवशिक्षित आदिवासी तरुणांनी आपल्या भावनिक, आंतरिक उर्मीला नैसर्गिक व अकृत्रिपणे वाट मोकळी करून जे निर्माण झाले ते म्हणजे आदिवासी साहित्य होय.

आदिवासी साहित्य निर्माणपूर्व महाराष्ट्राच्या विविध भू-प्रदेशातून ज्या विविध संघटना आदिवासींच्या कल्याणासाठी झटतात. त्या चळवळीतून जे कार्यकर्ते आले, त्या 'कार्यकर्ता साहित्यिकां'नी आदिवासी साहित्य लिहिले.

उदाहरणार्थ, महाराष्ट्र प्रांतिक किसान सभा, काही मिशनरी संस्था, आदिवासी सेवा मंडळ, भिल्लसेवा मंडळ, भिल्ल सुधारणा समिती, डांगसेवा मंडळ, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, आदिवासी साहित्य परिषद, ब्रिटिश सत्तेला विरोध करणारी बंडखोर शूरवीरांची चळवळ, गुलाबमहाराज व रामदास महाराजांची चळवळ, भूमिसेना, कष्टकरी संघटना, क्रांतिसेना, ग्राम स्वराज्य समिती, श्रमिक संघटना, मजूर संघर्ष वाहिनी, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, देवीची चळवळ, भुलामहाराज चळवळ, सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाची क्रांतिकारी चळवळ या सर्व प्रमुख व इतर अनेक आदिवासीविषयक समाजकार्य, वाङ्मयीन, सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिकक्षेत्रात काम करणाऱ्या संस्थामधून आदिम जमातींतून व आदिमत्तर जातींमधून स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात अनेकांनी आदिम जाणीव कधी अस्पष्टपणे तर, कधी प्रखर वास्तव भूमिकेतून ज्यांनी मांडण्याचा प्रयत्न केला ते सर्व आदिवासी लेखकांच्या यादीत समाविष्ट होतील.

महाराष्ट्राच्या विविध भू-प्रदेशातील महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या ४७ मुख्य जमाती व १४२ उपजमातींचे वास्तववादी जीवनचित्रण करणारे साहित्य म्हणजे आदिवासी साहित्य होय. गोंड, महादेव कोळी, भिल्ल, कोरकूं, वारली, मावची या प्रमुख आदिम जमातींतून पहिल्यांदा आदिवासी साहित्य निर्माण झाले. या प्रमुख जातींतील लोकांनी लिहिलेले साहित्य म्हणजे आदिवासी साहित्य होय.

**आदिवासी साहित्याची वैशिष्ट्ये :**

साठोत्तरी विविध वाङ्मय प्रवाहांची जी वैशिष्ट्ये आहेत. त्यात आदिवासी साहित्याचा प्रवाहसुद्धा अपवाद नाही. मध्यमवर्गीय, पांढरपेशा, सदाशिव पेठेतील अनुभवविश्वातून सत्य-शिव-सुंदर, परात्मभाव, लालित्य, सौंदर्य, अस्तित्व, विपन्नता, निरागसता, व्यक्तिवाद, आत्मप्रौढी, आत्माविष्कार या सर्व मराठी साहित्यातील वैशिष्ट्यांपेक्षा आदिवासी साहित्याची वैशिष्ट्ये आदिम जीवनाशी नागरी, शहरी, आधुनिक जीवनापासून शेकडो मैल अरण्यात राहणाऱ्या आदिवासी जमातींचे वास्तवजीवन रेखाटणारी वैशिष्ट्ये जाणवतात. ती खालीलप्रमाणे

१) दलित साहित्याच्या वैशिष्ट्याप्रमाणे हजारो वर्षांपासून आदिम जमाती शोषितपणाचे जिणे जगत आहे. उदाहरणार्थ, 'जेव्हा माणूस जागा होतो' या गोदावरी परुळेकरांच्या ग्रंथातून ठाणे जिल्ह्यातील वारली आदिवासी शेतकऱ्यांवर तेथील जमीनदार, भांडवलदार वर्गाकडून होणाऱ्या अन्याय-अत्याचाराचे वर्णन आहे.

२) आदिम जमातींच्या दु:ख, व्यथा चित्रित करणारे हे साहित्य आहे.

३) जुन्या गावगाड्याच्या रचनेत अस्पृश्य जातींसारख्या वेदनाही आदिवासींना सहन कराव्या लागतात.

४) दलित साहित्याप्रमाणेच आदिवासी साहित्यसुद्धा भारतातील प्रस्थापित व्यवस्था नाकारते. भारतीय जातिव्यवस्था, वर्णव्यवस्था, धर्म, संस्कृती नाकारून भेदरहित, धर्म-जातविरहित संस्कृती अपेक्षित आहे.

५) आदिम जमातींचा शेकडो वर्षांचा आक्रोश, संताप, छळ, पिळवणूक अभिव्यक्त करणारा हा साहित्यप्रवाह आहे.

६) वेदना हीच विद्रोहाची, बंडाची जननी आहे हे गृहीतत्त्व या साहित्यप्रवाहालाही लागू ठरते. म्हणून आज सुशिक्षित आदिम जमातींतील तरुणांनी, नवशिक्षित तरुण व आदिवासी लेखकांनी मराठी साहित्यात विद्रोह परिपुष्ट केला आहे.

७) स्वातंत्र्य,समता,बंधुता या नव्या आधुनिक मूल्यांची मांडणी करणारे हे साहित्य आहे.

८) स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडात मानवतावादी, भूतदयावादी, सहानुभूतीने आदिमत्तर विविध संस्था व व्यक्ती आणि समाजसुधारणावादी धुरीणांनी आदिवासी जीवन बदलण्याचा प्रयत्न केला. यातून आदिवासींच्या शोषणमुक्तीची चळवळ निर्माण झाली. आदिवासी मुक्तीचळवळीच्या यशस्वितेसाठी नंतरच्याकालखंडात भारतीय राज्यघटनेने खतपाणी घातले.

९) भारतीय राज्यघटना व लोकशाही स्वातंत्र्यामुळे नवशिक्षित आदिवासी तरुणांना आत्मभान ('स्व'भान) प्राप्त झाले. दलितासारखी त्यांची सुद्धा आदिम अस्मिता जागृत झाली.

१०) आदिम अस्मितेचा शब्दरूप आविष्कार म्हणजे आदिवासी साहित्य होय.

११) हजारो वर्षे मूक, अबोल असलेला धरतीचा पुत्र प्रथमच स्वातंत्र्योत्तर काळात साहित्याच्या माध्यमातून बोलता झाला.

१२) आदिवासी गुलामगिरीच्या बेड्या तोडून टाकावयास हे साहित्य सिद्ध आहे.

१३) आदिवासींच्या अन्यायग्रस्तांच्या, आदिवासी विस्थापितांच्या बाजूने उभे राहणारे हे साहित्य आहे.

१४) वर्ण आणि जातिधर्माचा निषेध करणारे हे साहित्य आहे.

१५) स्वातंत्र्यापूर्व काळापासून युगानुयुगे पिळल्या गेलेल्या व स्वातंत्र्योत्तर काळात जमीनदार, भांडवलदार, शेठ-सावकार, बडे शेतकरी यांच्यापासून

नाडलेल्या, नागवलेल्या आदिमांचे प्रकट मनोगत म्हणजे आदिवासी साहित्य होय.

१६) भारतीय समाजजीवन व्यवस्थेतील आत्यंतिक उपेक्षित जीवनस्तरातील सामाजिक दुर्दशा आदिम साहित्यातून जाणवते.

१७) आदिम जीवन संघर्ष व आदिम जीवनाची वाताहत सांगणारे हे साहित्य आहे.

१८) मराठी साहित्यातील कलावाद, तंत्रवाद, सौंदर्यवाद टाळून समाजाभिमुख, समाजसन्मुख आदिवासी साहित्य आहे.

१९) आदिम समाजाची वेदना, व्यथा, आक्रोश, संताप व्यक्त करणारे हे साहित्य आहे.

२०) आदिवासी जमातींच्या बोलीभाषेत, ग्रामीण बोलीभाषेत हे साहित्य प्रकट होते. हे आदिवासी साहित्याचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे.

२१) दलित साहित्य व आदिवासी साहित्याची वैशिष्ट्ये समसमान आहेत. दोन्ही साहित्य प्रवाहाचं ध्येयही समान आहे.

२२) आदिवासींच्या बोली नागर वाचकांना ज्ञात नसल्याने संवाद आदिवासींच्या बोलीत किंवा प्रदेश विशिष्ट ग्रामीण बोलीत आणि निवेदन मात्र प्रमाण भाषेत केलेले दिसते.

२३) दलित आणि आदिवासी साहित्य प्रवाहांमध्ये मित्रत्वाचं नातं आहे.

**आदिवासी साहित्याच्या प्रेरणा :**

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित कल्याणार्थ विविध वैचारिक सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक लढे देऊन दलितांची मानसिक कोंडी फोडून दलित जनतेला पहिला शाब्दिक हुंकार देऊन त्यांची अस्मिता जागृत केली. त्यापाठोपाठ त्यांची प्रेरणा घेऊन भारतीय राज्यघटनेच्या संरक्षक कवचाखाली आदिमत्तर व आदिवासी जमातीतील विविध संस्था, व्यक्ती, सुधारणावादी मंडळी या सर्वांच्या अथक प्रयत्नातून आदिवासी मुक्तीची चळवळ प्रथम निर्माण झाली. त्यातून चळवळीचे अपत्य म्हणून १९७८-७९ नंतर मराठी साहित्यात आदिवासी साहित्य निर्माण झाले.

आदिवासी साहित्याच्या प्रेरणा

१) महाराष्ट्रातील ख्रिस्ती मिशनरी संस्थांचे शैक्षणिक व आरोग्यविषयक कार्य, उदाहरणार्थ ठाणे जिल्ह्यातील कल्याण चर्च ऑफ दी ब्रेदेरेन मिशन या अमेरिकन संस्थेतर्फे रेव्हरंड ॲडॅम एबी यांनी इ. स. १९०३ साली वारली आदिवासीकरिता दवाखाना उघडला होता. १९२० साली याच

मिशनतर्फे पालघर व डहाणू तालुक्यात शिक्षणाचे कार्य सुरू झाले. याशिवाय ठाणे जिल्ह्यात अनेक ठिकाणी (राणी-शिवगाव, पांचाली, आगवण, मुंडवाली, कैनाड, तळासरी इ.) दवाखाने, प्राथमिक शाळा, वसतिगृह इत्यादी माध्यमांतून आदिवासी जमातींना जागृत करण्याचे कार्य केले आहे. याशिवाय पुणे, नाशिक, धुळे, विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली या सर्व प्रादेशिक भूभागात ख्रिस्ती मिशनरींनी सेवाभावी वृत्तीने आदिम जमातींची सामाजिक गरज लक्षात घेऊन त्यांच्या उत्थानाचे कार्य केले. या सर्व प्रक्रियेतून कळत-नकळत आदिवासी जागृतीची चळवळ अधिक विकसित होत गेली.

२) एतद्देशीयांपैकी नामदार गोपाळ कृष्ण गोखले (भारत सेवक समाज), पू. ठक्करबाप्पा (भिल्ल सेवा मंडळ), पालघरचे वि. वा. ऊर्फ बाबासाहेब दांडेकर, बोर्डीचे आचार्य भिसे (आदिवासी सेवा मंडळ, मुंबई), बाळासाहेब खेर, म. गांधीजींची समाजसेवेची प्रेरणा घेऊन काकासाहेब बर्वे, शंकरराव ठकार, दादासाहेब बीडकर, भाऊसाहेब हिरे, डॉ. ए. के. मोरे, कोंडू मारुती बोकड (जुन्नर), गोपाळराव कडू, ओंकार होळक्या पाडवी, मारोती महादेव केंगले, नागपूर विदर्भाकडील पंचमबाबू मडावी, तुकाराम मडावी, गुंडारामजी मसराम, थोर संत तुकडोजी महाराज, संत व भिडीधर्म प्रचारक पू. राघोबाजी विठोबाजी मडावी, क्रांतिवीर नारायणसिंह उईके, लखुजी गेडाम, बाबुरावजी मडावी, याशिवाय अलीकडील काळात आदिवासी जमातीत जन्म घेऊन समाजसेवेचा वसा घेणारे अनेक समाजसेवक व कार्यकर्ते यांनी आदिम जमातींना शैक्षणिक सुविधा पुरविल्या आहेत. महाराष्ट्रातील शासन संस्थेनेही आदिवासी उपयोजनेच्या माध्यमातून त्यांचा जीवनस्तर उंचावण्याचा प्रयत्न केला आहे. याशिवाय महाराष्ट्रातील डाव्या विचारसरणीच्या आश्रयाखाली येऊन धुळे येथील कॉ. शरद पाटील यांच्या मार्गदर्शनाने नजूबाई गावीत व वाहरू सोनवणेसारखी प्रतिभावंत लेखक मंडळी उदयास आली आहेत. वरील सर्वांच्या अथक परिश्रमातून, समाजसेवेतून आदिवासी मुक्ती चळवळ आणि पर्यायाने आदिवासी साहित्य निर्माण झाले आहे.

३) भारतीय स्वातंत्र्य व लोकशाहीमुळे आदिवासींना सुद्धा राज्यघटनेने काही हक्क व अधिकार दिले, यातूनच आदिम समाज जागृत होऊन संवेदनशीलपणे साहित्यनिर्मितीस धजला आहे.

४) महाराष्ट्रातील डाव्या विचारसरणीपासून मार्क्सवादी जाणिवेतून आदिवासी साहित्यनिर्मिती झालेली आहे.

५) आदिवासी साहित्याच्या प्रेरणेबाबत या साहित्याच्या संशोधिका कुसुम नारगोलकर व संशोधक वसंत नारगोलकर म्हणतात की, ''आदिवासी

हा मानवसमूह निसर्गनिर्भर आहे. गिरीकुहरात त्यांचे स्वत्व दिलखुलासपणे निर्माण होते. त्यांचे निसर्गप्रेम विलक्षण आहे. निसर्गनिष्ठा अधिक दृढ आहे. निसर्गाच्या सान्निध्यातच त्यांना अकृत्रिमपणा जाणवतो.'' उदाहरणार्थ

''बामणाच्या जल्माला जाशी
त लिखून लिखून मरशी
महारवाडी होशी
त तोलून तोलून मरशी
चमार होशी
त नाड्या जोती करून मरशी
पण वारल्याच्या जल्माला जाशी
त जंगलचा राजा होशी !''[२४]

६) निसर्ग हेच आदिवासी जमातींचे जीवनसर्वस्व असल्यामुळे नैसर्गिक प्रेरणा ही पहिली प्रेरणा आहे. यात परिस्थितीसापेक्ष वैशिष्ट्यांची छाप आहे. प्राचीनतम व समृद्ध संस्कृती हा सांस्कृतिक वारसा लाभला आहे. अनके सामाजिक वादळी परिवर्तनामुळे त्यांचे जीवन अविचल झाले आहे. आदिवासी जमातींची संस्कृती हाच त्यांच्या जीवनाचा एकमेव आधार व प्रेरणास्रोत आहे.

७) आदिवासी जमातींचा धर्म व आदिवासी वीरपुरुषांचे ऐतिहासिक कर्तृत्व व बंडखोरी, इंग्रजी सत्तेच्या विरोधातील प्रचंड बंड व त्यांच्या मुक्तिसंग्रामाचे लढे, त्यांचे राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक योगदान आदिवासी साहित्याची प्रेरणा होऊ शकेल असे वाटते. (मराठी वाङ्मयातील नवीन प्रवाह- डॉ. शरणकुमार लिंबाळे, पृ. १५५)

८) नवशिक्षितांच्या नागरीकरणामुळे आदिम समाजाच्या जीवनजाणिवांवर परिणाम होत असल्यामुळे त्यांच्या जीवनसंघर्षाचे व प्रेरणांचे स्वरूप बदलणे स्वाभाविक आहे.

९) धर्म, संस्कृती, वीरपुरुष व त्यांचा मुक्तिसंग्राम याशिवाय आदिवासींची बोलीभाषा ही सुद्धा प्रेरणा होऊ शकेल.

१०) वणी येथील दुसऱ्या आदिवासी साहित्य संमेलनात 'आदिवासी साहित्याची प्रेरणा व दिशा' या विषयावरील परिसंवादात बोलताना जनसाहित्य चळवळीचे प्रणेते प्रा. या. वा. वडस्कर म्हणाले, ''साहित्यक्षेत्रात आज जाणीवपूर्वक आवाज उठविला जात आहे. त्याचा हेतू आपली अस्मिता आणि आयडेन्टिटी तयार करण्याचा आहे. मार्क्सप्रमाणे महात्मा फुले ह्यांनीही

वर्णविरोधी भूमिका मांडली, पण त्याचे स्वरूप बदलून आज केवळ ब्राह्मणद्वेषी बनले आहे. तीच स्थिती दलित साहित्याची झालेली आहे. त्यामुळे मार्क्सवादी आणि समानतावादी विचार विसरून मूठभर लोक आंबेडकरवादी साहित्य निर्माण करत आहेत. समतावादी नवीन समाज निर्माण करण्यासाठी सामाजिक आणि राजकीय क्रांती घडवून आणणारा प्रवाह निर्माण करणे हीच आदिवासी साहित्याची दिशा आहे. आदिवासी साहित्याची प्रेरणा सत्यशोधक आहे. आदिवासी दऱ्याखोऱ्यात फेकला गेला आणि ज्याने फेकणे नाकारले त्याची स्थिती काय आहे? याचा शोध घेण्याची प्रेरणा आदिवासी साहित्याची आहे. समाज परिवर्तनाची, संघर्षाची दिशा साहित्यातून स्पष्ट व्हायला हवी.''[२५]

११) आदिवासी समाजातील एक रसिक श्री. कृष्णाजी मरसकोल्हे आदिवासी साहित्यप्रेरणेबाबत म्हणतात, ''पांढरपेशांना डावलून आम्हाला चालणार नाही. पांढरपेशांकडून मिळालेल्या स्फूर्तीचं स्मरण आपण ठेवलं पाहिजे. अभिजात साहित्याच्या वाचनानेच आपल्याला साहित्यनिर्मितीची प्रेरणा मिळालेली आहे हे प्रांजळपणे मान्य केले पाहिजे. आदिवासी साहित्यिक हा जन्माने आदिवासी असला पाहिजे असं नाही. जी व्यक्ती एका विशिष्ट जीवनानुभूतीशी समरस होते ती त्याच्याशी इमान राखून साहित्यनिर्मिती करू शकते.''[२६]

**सारांश :**

आदिवासी साहित्याची मूळ प्रेरणा निसर्गावलंबी आदिम जमातीचे जीवनचित्रण करणे ही आहे. कार्ल मार्क्स, म. फुले, डॉ. आंबेडकर यांच्या विचाराची वैचारिक बैठक भक्कम आहे. विषय नावीन्य ही नवी प्रेरणा आहे. आदिम संस्कृतीचे दर्शन. स्वतंत्र चेहरा-मोहरा, ओळख असणाऱ्या जीवनाचे दर्शन. जगलं, भोगलं, अनुभवलं त्याला शब्दरूप देण्याची प्रांजळ प्रेरणा आदिवासी लेखकांना आहे. आदिवासी साहित्यनिर्मितीमागे आदिवासी मुक्तीची प्रेरणा आहे.

**संदर्भ टीपा**

१. तुमराम विनायक, **आदिवासी साहित्य : स्वरूप आणि समीक्षा**, नागपूर, प्र. आ. १९९४, पृ. ७.
२. तत्रैव.
३. तत्रैव.
४. तत्रैव.
५. तत्रैव.

६. जोशी लक्ष्मणशास्त्री, **मराठी विश्वकोश खंड पहिला**, म. रा. सा. संस्कृती मंडळ, मुंबई, प्र. आ. १९७६, पृ. २८.
७. जोशी लक्ष्मणशास्त्री, **मराठी विश्वकोश खंड दुसरा**, पूर्वोक्त, पूर्वोक्त, पृ. २५.
८. जोशी महादेवशास्त्री, **भारतीय संस्कृती कोश-खंड एक**, भारतीय संस्कृती कोश मंडळ, पुणे, प्र. आ. १९६२, पृ. ४२६.
९. तुमराम विनायक, पूर्वोक्त, पृ. ७.
१०. तत्रैव, पृ. ७.
११. तत्रैव, पृ. ८.
१२. तत्रैव, पृ. ८.
१३. गारे गोविंद, **भारतीय आदिवासी समाज आणि संस्कृती**, अमृत प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. १९९३, पृ. ८७.
१४. भोईर भगवान (संपा.), **उद्ध्वस्त पाखरे**, स्वप्नील प्रकाशन, भिवंडी, प्र. आ. १९९८, पृ. १२७.
१५. मोरे माधव, **आदिवासी बोलू लागला**, सुगावा प्रकाशन, पुणे, पृ. १.
१६. जाधव सुदाम, **आदिवासी साहित्य**, सुलबा प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. १९९९, पृ. २६.
१७. चौधरी सोपानदेव, ''आदिवासींचे लोकगिते'', **हाकारा** (त्रैमासिक- संपा. रामचंद्र मुटाटकर), जुलै-डिसेंबर १९८२, वर्ष ३रे, अंक ३ व ४, पृ. १३.
१८. जोशी लक्ष्मणशास्त्री, पूर्वोक्त, पृ. २४२.
१९. लिंबाळे शरणकुमार (संपा.), **मराठी वाङ्मयातील नवीन प्रवाह**, मधुराज पब्लिकेशन्स प्रा. लि., पुणे, प्र. आ. १९९३, पृ. १४५.
२०. भोईर भगवान, पूर्वोक्त, पृ. २४.
२१. लिंबाळे शरणकुमार, पूर्वोक्त, पृ. १४८.
२२. तत्रैव, पृ. १५२-५३.
२३. भोईर भगवान, पूर्वोक्त, पृ. १०८.
२४. तत्रैव, पृ. १२७.
२५. लिंबाळे शरणकुमार, पूर्वोक्त, पृ. १५४.
२६. मडावी भाऊसाहेब, ''वणी येथील दुसरे आदिवासी साहित्य संमेलन (वृत्तांत), **हाकारा** (संपा.-रामचंद्र मुटाटकर), जुलै-डिसेंबर १९८२, वर्ष ३रे, अंक ३ व ४, पृ. ३२.
२७. जोग सुधीर, ''आदिवासी साहित्य आणि समाजकार्य परस्परसंबंध व वाटचाल'', **हाकारा** (संपा.-रामचंद्र मुटाटकर), ऑक्टोबर-डिसेंबर १९८३, वर्ष ४थे, अंक ४, पृ. ६-७.

# विभाग 'ड'
# लोकसाहित्य

# मराठी लोकसाहित्यात लमाण (बंजारा) लोकसाहित्याचे स्थान

प्रा. डॉ. अनिल गर्जे

**लोकसाहित्याचे स्वरूप :-**

लोकसाहित्याचे स्वरूप हे एखाद्या नदीच्या प्रवाहाप्रमाणे अनेक अज्ञात प्रवाहांच्या एकरूपतेतून निर्माण होते. सांस्कृतिक जीवनाची अखंड परंपरा त्यात असते. लोकसाहित्य हा समाजमनाचा सहजपणे झालेला आविष्कार असतो. या प्रवाहाने लोकजीवन घडविले जाते, त्याला आकार दिला जातो. अशा या वाङ्मयाचे निर्माते अज्ञात, अनामिक असतात. या वाङ्मयाचे कर्तृत्व कुणालाही, एका व्यक्तीला देता येत नाही. अशा या लोकसाहित्याचे स्वरूप विशाल, व्यापक, मनोहर, ह्रदयंगम आहे. जीवनातील विविध रूपेरी कडा लोकसाहित्याने दीप्तिमान झालेल्या आहेत. एक प्रकारचे स्वाभाविक जीवनदर्शन घडविणारा तो महान कल्पवृक्षच होय. लोकगीते या कल्पवृक्षाची अमृतफळे, बुंधे आहेत, तर लोककथा बुंध्यातून सरळ, मजबूत व ताठ असे उंचावत जाणारे सत्त्व खांब, कणे आहेत. लोकनाट्य, लोकनृत्य, लोकगीत आदी रसपूर्ण प्रकार त्याच्या विशाल फांद्या आहेत, तर विविध बोली, वाक्प्रचार, म्हणी, उखाणे आदी हवेवर लवलवणारी पिवळी-हिरवी पर्णे आहेत. उदात्त भावभावना ह्या त्या वृक्षाला लागलेली मोहक व सुगंधित पुष्पे आहेत, तर सत्त्वबीजे असलेली धर्म, कर्तव्य व संस्कृती ही त्यावर डौलाने थरथरणारी रसाळ फळे आहेत.

लोकसाहित्याच्या स्वरूपाचा विचार करताना असे वाटते की, लोकसाहित्य म्हणजे लोकमानसाचा व समाजजीवनाचा लोकभाषेतून सहज झालेला जीवनाविष्कार होय. हा आविष्कार घडविणारे लोक म्हणजे विशिष्ट परंपरा असलेले, लोकसंस्कृतीचे दर्शन घडविणारे लोकसाहित्याचे प्रवर्तक, उपासक आणि जनक; ते अशिक्षितच. यांनीच हा वारसा जोपासला. लोकसाहित्याची निर्मिती अशिक्षितातच झाली. अशा साहित्याला त्या-त्या जीवनाच्या परंपरा, रूढी, प्रथा आणि संस्कृती यांचा स्पर्श झालेला असतो. लोकजीवनात जी भाषा बोलली जाते त्याच भाषेत लोकसाहित्य असते.

पाश्चात्त्य लोकसाहित्याच्या अभ्यासकांनी लोकसाहित्य हे परंपरागत चालत आलेल्या लोकजीवनाचा आविष्कार आहे, या जाणिवेने त्यांनी लोकसाहित्याचा समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून अभ्यास केला आहे. मॅक्झिम गार्कीसारख्या थोर रशियन साहित्यिकाने तर असे म्हटले आहे की, लोकगीते, लोककला यांचा अभ्यास केल्याखेरीज जुन्या काळच्या समाजजीवनाचा अभ्यास करता येणार नाही.

लोकसाहित्य या शब्दाचा अर्थ व्यापक असून, ते अलिखित अक्षर वाङ्मय आहे. त्याचे स्वरूप विशाल आहे. या साहित्याचे पैलू विविध आहेत. ते जीवनस्पर्शी, जीवनाविष्कार घडविणारे समाजजीवनाचे एक महत्त्वपूर्ण अंग आहे. लोकजीवनात परंपरागत चालत आलेल्या लोकजीवनातून त्याचा सहजाविष्कार होतो. लोकसाहित्य हे खऱ्या अर्थाने देशाचे मूलधन आहे. यात खेड्यातील जीवनाची, संस्कृतीची नानाविध उत्कृष्ट चित्रे रेखाटलेली आहेत. लोकसाहित्याचे स्वरूप इतके विशाल आहे की, त्याचे दर्शन घराघरातून, कुटुंबाकुटुंबातून आणि भूतलावरील प्रत्येक भाषेतून घडत असते.

लोकसाहित्य पारंपरिक लोकजीवनाला व्यापते. परंपरेने चालत आलेले जीवन जगणाऱ्या जीवनसमूहाची जीवनविषयक चिंतन प्रणालीची विविध रूपे आणि जीवन जगण्याची रीत, जसे आचार-विचार, रूढी-प्रथा, संस्कार, श्रद्धा, जादू-टोणा, मंत्र-तंत्र, निसर्गदृश्य घटनांविषयींचे चिंतन, त्याचबरोबर जीवन जगण्याचा एक अविभाज्य भाग म्हणून लोककथा, लोकगीते, उखाणे, म्हणी यासारख्या मौखिक रूपातील शाब्दिक आविष्कार इत्यादींचा समावेश लोकसाहित्यात होतो. लोकसमूहाच्या मानसिक संपन्नतेतून जे जे निर्माण झाले ते ते लोकसाहित्याच्या क्षेत्रात समाविष्ट होते. लोकसाहित्य हा त्या त्या लोकसंस्कृतीचा एक स्वाभाविक प्रवाह असतो. जेव्हा एखाद्या लोकसमूहाची लोकसंस्कृती, लोकश्रद्धा, आचार-विचार, रूढी-प्रथा, रीती-रिवाज, कथा, गीत, नृत्य, संगीत, कला इत्यादी पारंपरिक माध्यमातून अभिव्यक्त होते, तेव्हा या माध्यमांना लोकसाहित्याचे रूप लाभते.

लोकसाहित्याची निर्मिती लोकजीवनात होते व लोकसाहित्यातून जीवनाला आकार येत असतो. त्यातूनच पुढील जीवनाची जगण्याची पद्धती सिद्ध होत असते. जीवन जगणाऱ्या लोकसमूहाला जीवन विशेषांचे एक वेगळेपण प्राप्त होत असते. लोकसाहित्याच्या जडणघडणीत लोकजीवनाचा महत्त्वाचा वाटा असतो. तसेच लोकजीवनाला आकार देण्यात लोकसाहित्यही महत्त्वाचे ठरते. लोकसाहित्य आणि लोकजीवन यांच्यातील परस्पर संबंध

अतूट असतात. त्यामुळे लोकजीवनाचा अभ्यास करण्याचे एक महत्त्वाचे स्थान म्हणजे लोकसाहित्य असे म्हणता येते.

लोकसाहित्याचे स्वरूप पाहता, परंपरा हे लोकसाहित्याचे प्रमुख तत्त्व असल्याचे स्पष्ट होते. ही परंपरा प्रामुख्याने मौखिक रूपातील असते. ही परंपरा केवळ कथा, गीत यासारख्या शाब्दिक आविष्कारापुरतीच मर्यादित असत नाही. तर जीवन जगण्याच्या अनेक बाबतीत ही परंपरा असते. जीवनाला उपयुक्त असणाऱ्या वस्तूत, कौशल्यात, व्यवसायातील औजारात, घराच्या गावाच्या रचनेत मनोरंजनाच्या-खेळाच्या प्रकारात, कलेच्या क्षेत्रात, विधी-उत्सव इत्यादीतही परंपरा असते. त्यामुळेच पारंपरिक लोकजीवन पद्धती म्हणजे लोकसाहित्य असे म्हटले जाते.

आज समाजजीवनात प्रचलित असलेल्या काही परंपरा हजारो वर्षांपूर्वीच्या आदिम जीवनात निर्माण झालेल्या असल्याचे अभ्यासाने सिद्ध झालेले आहे. परंपरांचा असा दीर्घ प्रवास, हजारो वर्षापासूनचे त्याचे लोकजीवनातील अस्तित्व लोकसाहित्य जिवंत ठेवण्यास महत्त्वाचे ठरते. आदिम जीवनात, आदिमकाळी किंवा लोकजीवनात कोणत्यातरी काळात निर्माण झालेल्या सर्वच परंपरा पुढच्या काळात टिकून राहतील असे म्हणता येत नाही. परंपरा जतन करण्यात, प्रचलित ठेवण्यात लोकसमूहाची मान्यता, लोकसमूहाने त्या स्वीकारण्यावर अवलंबून असते आणि यात लोकमानस महत्त्वाचे असते. समूहमनाला भावलेल्या, समूहमनाने स्वीकारलेल्या समूहमनाची मान्यता मिळालेल्या परंपरा अधिक काळ टिकून राहतात. यासाठी प्रत्येक पिढीतील लोकसमूह, लोकमन महत्त्वाची भूमिका पार पाडीत असते. त्यामुळेच काही परंपरा दीर्घजीवी असतात तर काही परंपरा अल्पजीवी.

परंपरा सातत्यामुळे प्राचीन जीवनातली संस्कृती-विशेष पुढच्या काळात प्रवेश करतात. अशा परंपरांचा स्वीकार, संपादन आणि विकास व नंतर पुढच्या पिढीच्या स्वाधीन अशी ही परंपरा सातत्यची प्रक्रिया स्वाभाविकपणेच चालू राहते. त्यामुळेच आदिमकाळातील काही जीवनविशेष, संस्कृतिविशेष, अवशेष रूपाने आजही ग्रामीण लोकजीवनात, सुसंस्कृत शहरी जीवनातही काही प्रमाणात प्रचलित असल्याचे पाहावयास मिळते. यांची उदाहरणे म्हणून प्राणिपूजा आणि बऱ्याच लोकश्रद्धा, लोकसमजुती, विधी-विधाने, देता येतील. लोकजीवनात प्रचलित असलेल्या या स्वरूपाच्या परंपरा म्हणजे लोकसाहित्य. त्यामुळेच परंपरागतता हा एक महत्त्वाचा विशेष म्हणून लोकसाहित्याचा सांगता येतो.

लोकसाहित्य 'लोकां'चे असते. समूहाचे असते. त्यात व्यक्तित्वाचा अभाव असतो. लोकजीवनातील एखादे तत्त्व, एखादी बाब, परंपरा, प्रथा, आचार-विचार लोकसमूहाने स्वीकारून त्यास मान्यता दिली तरच त्याचा समावेश लोकसाहित्यात होते. यादृष्टीने लोकसाहित्याच्या निर्मितीत आणि प्रचलनात लोकसमूहाचा मोठा वाटा असतो. याचाच अर्थ लोकसाहित्य हे समूहनिर्मित असते. परंपरा समाजाच्या, समूहाच्या असतात. व्यक्तींच्या त्या असत नाहीत.

लोकसाहित्य हे आदिमानव निर्मित असून त्याची मालकी समूहाची असते. लोकसमूहाच्या पारंपरिक जीवनाचा आविष्कार त्यात झालेला असतो. तसाच लोकमानसाचाही आविष्कार त्यात असतो. परंपरा सातत्यामुळे लोकसाहित्याचे प्रचलन एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत होत असते. लोकसाहित्य जतन करून ठेवण्यात, त्यात कमी-अधिक भर घालण्यात लोकस्मृती, लोकमानस महत्त्वाची भूमिका करते. लोकसाहित्यातील विविध स्वरूपी ज्ञान हे परंपरा प्राप्त असते.

लोकसाहित्याचे प्रचलन प्रामुख्याने अशिक्षित, असंस्कृत, शहरी संस्कृतीपासून दूर राहत असलेल्या ग्रमीण लोकजीवनात असते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे हा लोकसमूह परंपरा प्रिय असतो. परंपरेने चालत आलेल्या अनेक बाबी हा लोकसमूह स्वाभाविकपणेच स्वीकारत असतो. त्यामुळे आजही शहरी समाजजीवनापेक्षा ग्रामीण लोकजीवनात लोकसाहित्याची सामग्री अधिक प्रमाणात उपलब्ध होऊ शकते.

लोकसाहित्य हा लोकसंस्कृतीचा एक पैलू असतो. लोकांच्या जीवन जगण्याच्या पद्धतीतून लोकसंस्कृतीला विविध पैलू लाभत असतात. लोकसाहित्याची निर्मिती आणि प्रचलन लोकजीवनातच होत असल्याने लोकसंस्कृतीच्या जडणघडणीत लोकसाहित्याचाही वाटा असतो. म्हणूनच लोकसाहित्याला समाज व संस्कृतीच्या इतिहासाच्या अभ्यासात महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. लोकसाहित्य म्हणजे लोकजीवनाचा इतिहास असेही म्हणता येते. लोकसाहित्याच्या आधारे प्राचीन काळातील समाजजीवन विशेषांचा शोध घेता येऊ शकतो.

परंपरागत जीवन जगणाऱ्या लोकांचा केवळ मौखिक रूपातील शाब्दिक आविष्कार म्हणजेच लोकसाहित्य असे नसून, त्यात शाब्देतर अन्य आविष्कारांचाही समावेश असतो. याचाच अर्थ असा की, लोकसाहित्याची सामग्री शाब्द कल्पना वस्तुरूप असंते. भौतिक आणि मनोमय रूपातून लोकसाहित्य सिद्ध होत असते. लोकसाहित्य ही समाजाची अभिव्यक्ती

असते. त्यात समाजजीवनाचे अनेकविध पैलू पाहावयास मिळतात. समाजमनाचे विविध भावतरंग त्यात असतात. तसेच आचार-विचार, रूढी-प्रथा, लोकश्रद्धा, लोकविश्वास, लोकभ्रम, विधी-विधाने, कथा, गीत, नृत्य, संगीत, कला इत्यादी बाबीही त्यात असतात. पारंपरिक जीवन जगणाऱ्या समाजजीवनाचे स्पष्ट प्रतिबिंब लोकसाहित्यात असते.

**मराठी लोकसाहित्यात लमाण (बंजारा) लोकसाहित्याचे स्थान :**

लोकसाहित्याची परंपरा आदिमानव काळापासून चालत आलेली दिसून येते. हजारो वर्षापासून चालत आलेली ही परंपरा बदलत्या काळाप्रमाणे या परंपरेचा अभ्यास होत आलेला आहे. परंपरेनुसार अखंडपणे चालत आलेली ही परंपरा साहित्याकडे पाहण्यात येत आहे. पारंपरिक लोकजीवनाचे संदर्भ यात पाहायला मिळतात. लोकमनाचा नितळ मनाच्या भावभावनांचा नितळ आविष्कार यात होतो. लोकसाहित्याच्या लोकसाहित्य अभ्यासकांनी आपापल्या परीने आपले मत, विचार मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. डॉ. प्रभाकर मांडे, डॉ. शरद व्यवहारे, सरोजनी बाबर, म. मो. दत्तो, वामन पोतदार, अशा प्रकारे केवळ भारतीयांनी लोकसाहित्याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला नाही तर पाश्चात्त्य लोकसाहित्य अभ्यासकांनी अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहेच आणि यांच्या अभ्यासाच्या प्रयत्नातून लोकसाहित्याचा अनमोल ठेवा त्यांनी भावी पिढीसमोर ठेवलेला आहे. मराठी वाङ्मयामध्ये लोकसाहित्य एक अनमोल साहित्य आहे. त्यात लोककथा, लोकगीते, म्हणी, उखाणे यांचा विचार केल्याविना ते लोकसाहित्य पूर्णत्वाकडे जात नाही. त्याचप्रमाणे लमाण (बंजारा) लोकसाहित्याचेही आहे. मराठी लोकवाङ्मयात लोकसाहित्याला मानाचे स्थान आहे. याचप्रमाणे लमाण (बंजारा) लोकसाहित्यात त्याच घटकाचा विपुल प्रमाणात साठा आहे. असा महत्त्वाचा असलेला जो साठा आहे, तो आजही केवळ परंपरेनुसार चालत आलेला आणि आजही हे साहित्य मौखिकच दिसून येते. लमाण (बंजारा) भाषेलाच मुळात भाषेचा दर्जा देण्यात आलेला नाही. पण त्या भाषेतील जे लोकसाहित्य आहे ते महत्त्वाचे आहे आणि आज वाचकांच्या समोर येणे गरजेचे आहे असे वाटते. म्हणून तेच साहित्य समाजासमोर प्रस्तुत लेखात आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. कारण रूढी, परंपरेतून हे साहित्य समोर आलेले आहे. आजपर्यंत ज्या ज्या लमाण (बंजारा) साहित्यिकांनी साहित्य लिखाण केलेले आहे ते जास्त समाजशास्त्रीय पद्धतीने लिखाण केलेले दिसून येते. साहित्याच्या दृष्टीने कमी प्रमाणात लिखाण झालेले दिसून येते. केवळ लमाण (बंजारा) लोकसाहित्याचा भाग म्हणून 'भजन' या प्रकारावर लिखाण

हव्या त्या प्रमाणात दिसून येते. कारण की, मनोजरंजन आणि समाजप्रबोधन या माध्यामाद्वारे करता येते म्हणून 'भजन' या प्रकारावर लिखाण जास्त प्रमाणात झालेले दिसून येते.

बंजारा समाजास बंजारा अथवा लमाणी असे नाव का पडले असावे या विषयी तर्क वितर्क केले जातात. जसे जंगलात भ्रमंती करणारा त्यासाठी 'बनजारी' कुणी म्हणतात संस्कृतमधील 'वाणिज्य' म्हणजे 'व्यापार' या शब्दावरून 'बनज' हा शब्द तयार झाला व त्यावरून 'बंजारा' असे नाव पडले तसेच 'लवण' म्हणजे मीठ आणि मिठाला वाहून नेणारा म्हणजे 'लमाणी'. लमाण (बंजारा) समाजाच्या व्युत्पत्ती विषयी एक आख्यायिका सांगितली जाते. त्या विषयी श्री मांगीलाल राठोड म्हणतात, भगवान शंकराने अनेक प्रकारच्या मानव गणाची सृष्टी निर्माण केली त्या गणातून पाच गण सुंदर, गौरवर्णी, पराक्रमी, तेजस्वी, हाताबाण, भाला, बरछी, गदा, कृपणधारी प्रकट झाले. त्यांना भगवान शंकर प्रसन्न झाले. शंकर भगवानाने त्या गणांना गौर पदवी देऊन आली नंदीश्वर व साहित्याची देखरेख घरातील महत्त्वाची कामे, वस्तूंचे संरक्षण या कामावर सोपवून सर्व मानव गणात त्यांना नायक बनवून दिले, ही पदवी दिली. हे पाच गण गौर भगवान शिव गौरची सुचविलेली कामे तन, मनाने गुणगान गात विश्वासाने करू लागले.

एकदा इंद्राच्या अप्सरा शंकर भगवानाच्या आश्रमात येऊन आश्रमातील सरोवरात स्नान करू लागल्या, हे पाहून या पाच गणांनी त्यांना अंग धुण्यास मनाई केली. परंतु अप्सरांनी गणाच्या सांगण्याकडे दुर्लक्ष करून स्नान करीतच राहिल्या शेवटी या गणांनी त्यांना पकडून शंकर भगवानासमोर उभे केले आणि घडलेल्या प्रकाराची माहिती दिली. शंकर भगवानाने पहिला गुन्हा म्हणून त्यांना माफ केले आणि सोडून दिले. काही दिवस लोटल्यानंतर त्याच अप्सरा पुन्हा आल्या आणि सरोवरात स्नान करू लागल्या. पुन्हा त्या गणांनी अप्सरांना धरून भगवानासमोर हजर करून सांगितले, महाराज ह्या त्याच अप्सरा आहेत. त्यांनी आपल्या दिलेल्या आज्ञेचा अवमान केला म्हणून त्या प्रसंगी भगवान शंकराने लाकडी खिळी मंत्रून प्रत्येक अप्सरेचा सत्त्व भंग केलेला आहे. या पाच गणांच्या सांगण्यावरून शंकर भगवानांना खूप राग आला, त्यांनी अप्सरांचे लग्न आपल्या आश्रमात असलेल्या पाच गणांबरोबर लावून डोक्यावरील बुचड्यात काऊ बांधून दिली. त्यामुळे त्या अप्सरा पाच गणाबरोबर राहू लागल्या. तेव्हापासून लमाण (बंजारा) समाजाच्या स्त्रियांच्या डोक्यावर 'चुंडो' लावण्याची प्रथा पडली असावी. हा चुंडो लमाण (बंजारा)

समाजातील नववधूला लग्नामध्ये सौभाग्यवतीचे प्रतीक म्हणून आजही डोक्यावरील केसात लावले जातात.

लग्नानंतर गौरगणाचा परिवार वाढू लागला हे पाहून भगवान शंकराने या गणाला स्वतंत्रता दिली व प्रत्येकाला एक बैल दिला. दिलेल्या बैलाच्या साहाय्याने व्यवसाय करा व उपजीविका करा. हा महामंत्र व भगवानांचा आशीर्वाद घेऊन हे पाचही गण आपल्या परिवारासह वनात जाऊन राहू लागले. वनातील त्यांच्या वास्तव्यामुळे बनजारहा म्हणजे बनजारा यानावाने ओळखले जाऊ लागले. [१५]

लमाण (बंजारा) समाजातील रूढी, परंपरा, लग्नातील विधी, शंकर भगवानाला गौरीशंकर का म्हणतात यावरून लमाण (बंजारा) समाजाची उत्पत्ती ही शंकर भगवानानेच केलेली आहे असे दिसून येते. भगवान शंकर आणि पार्वती यांना 'शिवगौरी' या नावानेही संबोधले जाते. शंकर भगवानांची पत्नी आदिमायाशक्ती पार्वतीला गौराही म्हणतात. गौराई म्हणजे गौराणी, गोरची राणी, गोर गोरणी, लमाण (बंजारा) समाजात पुरुषांना गोर आणि स्त्रियांना गोरणी म्हणतात. जे पाच गण गौर शंकर भगवानाने निर्माण केलेले आहेत तेच शिव गौरीची परंपरा समजतात. कारण इतर समाजात गोर-गोरणी म्हणत नाहीत. तसेच भगवानाचे वाहन बैल त्यावर मालाची वाहतूक करणे, लाल भगव्या रंगाचे कपडे वापरणे, शंकराच्या जटा प्रमाणेच मनुष्याच्या डोक्यावर केश ठेवणे, प्रत्येक कार्यात भांग, घुगरीना महत्त्व देणे, लग्नकार्यात नवरदेवाच्या शेंडीवर पाणी टाकून वधुची माता शंकराच्या जटातील गंगा समजून पाणी पिणे, वधुला लग्नाला बैल व गोणी देणे अशा अनेक गोष्टींचा विचार करता शिव-गौरी पासून लमाण (बंजारा) गणाची उत्पत्ती झाली आहे असे दिसून येते.

लमाण (बंजारा) समाज अगदी सुरुवातीपासून ते आजतागायत आपली वैशिष्ट्ये सांभाळून असलेला दिसून येतो. लमाण (बंजारा) समाजाचे तांड्यातील वास्तव्य, स्वतंत्र बोली, पेहरावाची वेगळी ओळख अशा प्रकारची काही वैशिष्ट्ये लमाण (बंजारा) समाजाची दिसून येतात. लमाण (बंजारा) समाज भ्रमंती करता करता व व्यापार बंद पडल्यावर हा समाज शेती करू लागला आणि स्वत:च्या गोधनाचे संरक्षण करता यावे म्हणून हा समाज दऱ्याखोऱ्यात वसलेला दिसून येत आहे. यामुळे त्या त्या प्रांताचा परिणाम या समाजावर झालेला पाहावयास मिळतो आहे.

लमाण (बंजारा) समाजाचा जर खरा अभ्यास करायचा झाला तर मूळ संस्कृती शोधावी लागेल आणि त्यासाठी तांड्यातील व्यक्तीकडील जे

बोलीभाषेतील साहित्य आहे, ते शोधावे लागेल त्यात कथा, म्हणी, उखाणे, भजन, गीत इत्यादी घटकांचा अभ्यास केल्यावरच आपण पूर्णत्वाकडे जाऊ शकतो असे वाटते. या साहित्याचा अभ्यास केल्याशिवाय मराठी लोकसाहित्य परिपूर्ण होणार नाही असे वाटते.

मराठी बोलीभाषेला जसे एक परिपूर्ण स्थान आहे, आणि त्याचप्रमाणे लमाण (बंजारा) बोली एक परिपूर्ण बोली आहे. कारण मराठी लोकसाहित्यात ज्या ज्या घटकांचा अभ्यास करावा लागतो त्याचप्रमाणे लमाण (बंजारा) लोकसाहित्याचा अभ्यास करीत असताना देखील तशाच प्रकारच्या घटकांचा अभ्यास करावा लागतो. म्हणून लमाण (बंजारा) बोली किंवा बोलीभाषेतील लोकसाहित्य हे किती महत्त्वाचे आहे, हे दाखविण्यासाठीच या विषयावर संशोधन करणे हा ही हेतू आहेच. ज्याप्रमाणे अहिराणी भाषेला किंवा बोलीला एक स्वतंत्र भाषेचा दर्जा आहे. त्याचप्रमाणे लमाण (बंजारा) बोलीलाही स्वतंत्र दर्जा दिल्याशिवाय मराठी लोकसाहित्याला परिपूर्णता येऊ शकणार नाही, असे वाटते. लमाण (बंजारा) भाषेतील लोकसाहित्य हे एक परिपूर्ण लोकसाहित्य वाचकासमोर ठेवणे हा हेतू आहे.

आतापर्यंत अशा महत्त्वाच्या लोकसाहित्यावर जास्त प्रमाणात लिखाण झालेले दिसून येत नाही. कारण की, लमाण (बंजारा) समाज हा मुळात जंगलात राहणारा, पोटाची खळगी भरण्यासाठी आज इथं तर उद्या तिथं अशा प्रकारे जीवन जगणारा आहे. याच महत्त्वाच्या कारणामुळे त्यांचे स्थायी वास्तव्य आढळून येत नाही. त्यामुळे शिक्षणाचे वारे या समाजापर्यंत पोहचू शकले नाही. पण आज ती स्थिती पालटलेली आहे आणि आज हा समाज झपाट्याने साक्षर होत आहे, असे दिसून येते.

शिक्षणाची खरी ज्योत तेवत ठेवण्याचे कार्य खऱ्या अर्थाने स्व. वसंतरावजी नाईक यांनी केले. कारण हा नेता खरोखरच समाजहितासाठी लढणारा होता. समाज बदलण्याची ताकद त्यांच्या शब्दात आणि वृत्तीत होती. अशा प्रकारच्या विचाराने प्रेरित होऊन समाज जागा झाला. शिक्षणाचे खरे महत्त्व त्यांनी पटवून दिलेले आहे. शिक्षणामुळे समाजात कशा प्रकारे बदल होतो. शिक्षण का गरजेचे आहे, हे त्यांनी पटवून दिलेले आहे. याच प्रेरणेने समाज प्रेरित झाला आणि जो तो आपल्या मुलांना शिक्षणांकडे वळवताना दिसून येतो आहे. याचे फल स्वरूप आज समाजाचा जे इतिहास लिहितात हे केवळ त्या महान व्यक्तिमत्त्व, दूरदृष्टी असणाऱ्या स्व. वसंतरावजी नाईक यांच्यामुळेच घडलेले दिसून येते आणि याचे कारण आज प्रत्येक क्षेत्रात लमाण (बंजारा) समाज दिसून येतो. सामाजिक कार्य, राजकीय कार्य अशा

विविध क्षेत्रात हा समाज आज परिपूर्ण दिसून येतो आहे. या परिपूर्णतेचे श्रेय आज स्व. वसंतरावजी नाईक यांनाच द्यावे लागते.

लमाण (बंजारा) बोलीभाषेतील साहित्य हे अनमोल ठेवा आहे आणि हे साहित्य लिपिबद्ध करण्याचे काम आज या समाजातील काही विचारवंत, काही लेखक, काही कवी करीत आहेत. यात कथा, लोकगीते, उखाणे, म्हणी, भजन या प्रकारात लमाण (बंजारा) समाजाची खरी संस्कृती दडलेली आहे आणि हीच संस्कृती समाजासमोर यावी यासाठी एक संशोधक या नात्याने प्रयत्न करीत आहे.

सामाजिक कार्य, रीतिरिवाजाप्रमाणे चालण्यासाठी लमाण गोर बंजारांनी आपल्या मधूनच काही लोकांना सोनार, भाट, धाडी, ढालिया, न्हावी इत्यादी जाती निर्माण करून सामाजिक कामाची अडचण निर्माण होऊ नये म्हणून कायम व्यवस्था करून ठेवली आहे. घोषित केलेले सोनार, न्हावी, ढालिया, ही स्वत:ला लमाण (बंजारा) म्हणवून घेतात. यांची बोलीभाषा, वेशभूषा, सण-उत्सव, खाण-पान लमाण (गोरबंजारा) प्रमाणेच आहेत. फरक एवढाच की, या समाजातील पुरूषांना नायक, कारभारी या पदव्या नसतात. तसेच रोटी, बेटी, हुकापाण्याचा समान अधिकार त्यांना नसतो. तांड्यातून प्रत्येकी याची दोन-तीन किंवा वस्तीनुसार घरे असतात. त्यांच्या कामावरून त्यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आलेली असते.

वरील प्रमाणे मराठी लोकसाहित्यात लमाण (बंजारा) लोकसाहित्याचे स्थान आहे. कारण लमाण (बंजारा) बोली ही एक स्वतंत्रपणे अभ्यासता येऊ शकते त्यात मराठी लोकसाहित्यापेक्षाही भारदस्त तोलामोलाचे साहित्य असलेले दिसून येते. त्या साहित्यात गहनतेवर आधारलेली वैचारिक परंपरा आढळून येते. म्हणून असे वाटते की, लमाण (बंजारा) लोकसाहित्याला वगळून मराठी लोकसाहित्य पूर्ण होऊ शकत नाही.

# बशीरभाई मोमीन यांच्या काव्यातील विविधता

प्रा. डॉ. दिलीप कसबे

प्रास्ताविक -

लोककवी बशीरभाई मोमीन यांनी विविध विषयावर काव्यलेखन केले. त्यांच्या काव्याच्या विषयात विविधता आढळते. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, कौटुंबिक धार्मिक, व्यसनमुक्ती, कुटुंबनियोजन, आरोग्य, प्रौढशिक्षण, अशा अनेक प्रकारचे विषय त्यांनी आपल्या काव्यातून हाताळले.

ग्रामीण जीवनातील राजकारण, हा प्रामुख्याने त्यांच्या राजकीय काव्याचा विषय आहे. गावातील ग्रामपंचायतची निवडणूक, सहकारी सोसायटीची निवडणूक यांच्यातील गावातील हेवेदावे, मतभेद, स्त्रियांच्या संबंधी राजकर्त्यांची असलेली भूमिका पुरुषी अहंकार अशा अनेक विषयावर त्यांनी कवने केली आहेत.

गावात खासदारापासून ग्रामपंचायत आणि गावातील विविध संस्था संघटना सोसायटी यांचे राजकारण चालते. वरच्या पातळीवरील नेते आपले भांडण विसरतात. पण गावात राजकारणातील भांडणे विकोपाला जातात. गावाच्या या राजकारणात सामान्य माणूस उगीच मरतो त्याचे वाटोळे होते. गोरगरिबांचे कल्याण कोणी करीत नाही. आणि कल्याणकारी योजनाही राबवित नाहीत.  कुणी म्हणतात इंदिरा गांधी जेव्हा होत्या, तेव्हा त्यांनी सर्वसामान्यांच्या हिताचे निर्णय घेतले.

१. राजकीय -

२० कलमी योजना नामी । राबुन गेलीं
रोजगारा मिळे रोजगार हमी घेतली
बेघर होती त्यांना घरे भेटली
शेतकरी अधिक धान्य पिकवू लागली

सुशिक्षित बेकार आता कामी लागली
सावकारी कीड गरिबांची पार हटली
भूमिहीन शेतकऱ्यांना जमीन भेटली[१]

इंदिराजी सत्तेवर असताना त्यांनी वीस कलमी कार्यक्रम राबविला सर्व सामान्याच्या गोरगरिबांच्या प्रश्नांचा विचार केला शेतकरी कष्टकरी कामगार शेतमजूर यांच्यासाठी रोजगार हमी योजना चालू केली. संजय गांधी योजनेतून निराधार व गरीब लोकांना राहण्यासाठी घरे मंजूर केली. सावकाराच्या पाशातून मुक्त होण्यासाठी आणीबाणी जाहीर केली. आणि गोरगरिबांना आपली संसारिक उपजीविकेची भांडी पुन्हा मिळाली. हा इंदिराजींचा काळ चांगला होता. त्याचा फायदा गोरगरीब दलित, पद-दलित सर्वसामान्य बहुजन आणि शेतकरी वर्गाला मिळत होता. पण त्यांच्या नंतर हे चित्र पालटले. राजकारणात काय होईल? हे सांगता येत नाही. कुणाचं नशीब कसं उजाडतं हे सांगता येत नाही, कुणी नशिबाने तर कुणी पक्षश्रेष्ठींच्या वरदहस्तामुळे निवडून येतो पण तो काम करू शकत नाही.

'नशीब फळाल तिकीट मिळाल पक्ष म्हणोनी निवडून आल'[२]

असे दुसऱ्याच्या पुण्याईवर निवडून आलेले सत्तेचा कारभार किती चांगल्या पद्धतीने करतील; याबद्दल शंकाच घ्यायला नको. निवडणुकीच्या काळात दारात आलेला हाच पुढारी परत कधी दारात येत नाही. निवडणुकीच्या काळात मात्र दार झिजवतो. कवी म्हणतात

'निवडणुकीची करतो घाई । रोज पुढारी दारी येई'

अशा या पुढाऱ्यांना गरिबांच्या प्रश्नाकडे लक्ष द्यायला वेळ नसतो. फक्त घोषणाबाजी असते, हे सगळे काळा बाजार करण्यात दंग असतात. यांना जनतेची गोडी नसते फक्त हे एकमेकांची खुर्ची ओढतात, मतदारांना दैनंदिन गरजा सुद्धा पूर्ण करण्यास त्यांना फुरसत नसते. काळाबाजार, महागाई, टंचाई अशा अनेक गोष्टीतून सामान्यांची लूट करतात आणि स्वत:चे खिसे भरतात.

देशाच्या व राज्याच्या राजकारणाचे स्वरूप जसे कवी आपल्या काव्यातून मांडतात. तसेच सहकार सोसायटी, मार्केटयार्ड आणि गाव पातळीवरील ग्रामपंचायत निवडणुकीतील राजकारण यांचेही चित्र ते उभे करतात. (भारतीय घटनेनुसार दिलेल्या हक्काचा प्रभाव राजकारणावर पडतो)

'स्त्री' आरक्षणामुळे स्त्रिया निवडून येतात. आणि सुशिक्षित स्त्री निवडून आल्यावर ती कशाप्रकारे गावचा गाडा चालवते. याचे वर्णन ही त्यांच्या काव्यात दिसते.

जिल्ह्यात जाऊन नव्या योजना ती आणि
लाचार नव्हती ती होती स्वाभिमानी
रात्रीच्या शाळेला जाऊनी भगिणी
'सुशिक्षित केल्या बघा बाया त्या अडाणी'[३]

पण तुमच्या हातातली पुरुषाच्या हातातली सत्ता बाईकडे गेल्यावर पुरुष कसा स्वस्थ बसेल? त्याचा स्त्रीकडे पाहण्याच्या दृष्टिकोण हा परंपरावादी पुरुष श्रेष्ठ. स्त्री ही कनिष्ठ अशी पुरुषी अहंकाराची भावना त्याच्या मनात असतेच, तो तिला नेहमी विरोध करतो. स्त्रियांना अक्कल कमी असते असे, म्हणतो. आणि स्वत: निवडून आल्यावर साऱ्या गावाचं वाटोळं करतो.

**२) सामाजिक –**

कवी मोमीन कवठेकर यांनी सामाजिक काव्य लिहिले. समाजात असलेले समाज जीवन, एकमेकांशी असलेले नातेसंबंध, समज, गैरसमज समाजाची मानसिकता, समाजातील लोकांच्या प्रवृत्ती, माणसांचे स्वभाव त्यांचे रुसवे, फुगवे, हेवेदावे तरीही असा समाज काही कारणांसाठी एकत्र येतो, एकत्र राहत असतो. वेगवेगळ्या प्रकारचा समाज असतो. ग्रामीण, शहरी, आदिवासी इ. प्रत्येक समाजाचे रीतिरिवाज चालीरीती असतात. एकमेकांच्या बद्दल समज गैरसमज असतात. मनात इच्छा आकांक्षा असतात. अनेक घटना घडत असतात. त्याचा समाजावर परिणाम होतो.

समाजात स्त्री, पुरुष, मुले, म्हातारे असे घटक असतात. स्त्रीपुरुषांचे सामाजिक संबंध असतात, जे समाजमान्य असतात. समाजमान्य व्यतिरिक्त संबंध ठेवले की समाज व्यवस्था बिघडते. भारतीय समाज हा पुरुषसत्ताक समाज आहे. त्यामुळे पुरुषांच्या मनात स्त्रियाबद्दलची जी भावना असते, त्याचे चित्रण मोमीन यांच्या काव्यात दिसते. स्त्री ही फसवी आहे. पुरुषाला ती आपल्या जाळ्यात अडकविते. त्याला बरबाद करते. त्याची इज्जत घालविते. त्याला देशोधडीला लावते. अशा प्रकारची भावना पुरुषांच्या मनात नेहमी असते. पुरुष हा स्वत:ला श्रेष्ठ व स्त्रीला कमी प्रतीचा दर्जा देतो.

नारीजातीचा नाही भरवसा
दगा देऊन हो धोका देवून
जाईल कुठे आण कसा
नारी जातीचा नाही भरवसा[४]

अशा फसवणाऱ्या स्त्रीच्या चित्रणाबरोबरच तिला प्रत्युत्तर देणारा पुरुषही त्यांच्या काव्यात दिसतो.

लावूनी लळा ह्या कापिती गळा

ह्यांच्या नजरेत भरलय पाप
हिचं काढू का जराशी माप

माप काढणारा मार्ग सांगणारा एखादा व्यक्तीही त्यांच्या काव्यात आहे. अनेक स्त्रिया काही कारणांनी एकत्र येतात. तेव्हा त्या गप्पा मारतात. त्या त्यांच्या घरातल्या कुटुंबातल्या आणि त्याचा मुख्य विषय असतो नवऱ्याचा. अशा स्त्रिया एकत्र आल्यावर प्रत्येक स्त्री आपल्या नवऱ्याचे वर्णन कसे करते? याचेही उदाहरण त्यानी आपल्या गीतातून मार्मिकपणे मांडले आहे.

नवरा माझा आहे इंजिनिअर
हिशेब याला ना जुळला जर
जागत बसतो हा रात्रभर
कॅल्क्युलेटरचा नासकरी
हात सदा ह्याचे बटनावरी [५]

अशाच प्रकारे मास्तर, पेंटर, कंडक्टर, न्हावी यांचेही स्वभाव त्यांनी या काव्यात मांडले आहेत.

स्त्रीपुरुषांच्या प्रेमाचे चित्रणही काही काव्यातून दिसते 'चल चल सरू नको घाबरू' किंवा 'हाय कसं वाटतयं' ही गीते सांगता येतील.

स्त्रीपुरुषांच्या मधील लटक्या रागाचे वर्णन त्यांच्या काव्यात आहे.

ती - कुणी सांगा ह्या पोराला । आला हा जोराला
उगी गोष्ट जाईल । भलत्या थराला
तो - कुणी सांगा बाईला । आली ही घाईला
हिनं दनका माझा ना अजून पाहिला

दैवाने आणि नियतीने अकाली वैधव्य आलेल्या मुलीचे वर्णन येते आणि आता आपले जीवन जगून काय उपयोग? समाजात ज्याच्यामुळे स्त्रीला किंमत आहे. तोच नसेल तर समाज तिला व्यवस्थित जगू देत नाही. तिला सर्व ठिकाणी मानहानीला सामोरे जावे लागते. हे त्यांनी आपल्या 'देवा दैवगती कसली' गीता मधून मांडले आहे.

समाजात गरीब श्रीमंत ही दरी आजही कायम आहे. गरीब सर्व सामान्य माणूस आजही पिचला जातो त्याच्यावर अन्याय होतो. सत्ताधारी दबाव गट व उच्च वर्ग आणि वर्ण हा गरिबांच्यावर आजही अन्याय अत्याचार करीत आहे.

जगामध्ये नाही कुणी गरिबांचा वाली
पैसे वाला चार वेळा तूप पोळी खाई

गरिबाला एक वेळचे अन्नपाणी नाही[६]

वरील काव्यपंक्तीतून त्याचे स्वरूप लक्षात येईल. गरिबाच्या रोजी रोटीचा प्रश्न समाजात कठीण आहे. तर दुसरीकडे देश विकत घेणारी माणसे आज समाजात आपल्याला दिसतात. ही विषमता त्यांच्या काव्यात दिसते. 'कुणी तुपाशी खातो तर कुणी उपाशी राहतो.' कुणाच्या घरी अन्न फेकले जाते तर कुणाला फेकलेले अन्न खावे लागते. असा हा आजच्या समाजाचा न्याय आहे. कलियुगात सारच बदललं आहे. कलियुगात बदलेल्या समाजाचे चित्रण ही कवी आपल्या काव्यात वापरतात. नातीगोती आपला तुपला हे माणूस विसरला आहे. पूर्वीच्या काळी मुलामुलींची लग्न ठरवायची असतील तर बापाला जोडा झिजवावा लागत असे. आज शाळा कॉलेज फॅशनमुळे मुले, आई बापाच्या आज्ञेत राहिली नाहीत आईबापांना न विचारता लग्न करतात. हे समाजातील चित्र त्यांनी आपल्या काव्यातून मांडले आहे.

महागाईने मेली । खयात गेली रक्तान
काळा बाजार करतो । तोच वागतो तोऱ्यान

इथ खऱ्याची दुनिया राहिली नाही. सत्याने वागणार खयात जातो त्याच वाटोळ होत पण काळाबाजार करणार तोऱ्यान वागतो. 'चोर असून साव बनतो' ही आजच्या समाजाची परिस्थिती त्यांच्या काव्यात दिसते.

समाजात घडणाऱ्या विविध प्रकारच्या घडामोडी नीती अनीती गरीब श्रीमंत दरी स्त्रीपुरुष संबंध नात्यागोत्यातील संबंध अशा अनेक प्रकाराच्या सामाजिक परिस्थितीचे स्वरूप बशीरभाई मोमीन यांनी त्यांच्या शब्दात शब्दबद्ध केले आहे.

**३. धार्मिकता –**

महाराष्ट्रातला माणूस श्रद्धाळू आणि धर्मभोळा आहे. तो सर्व देवदेवतांची पूजा करतो. पुराण ग्रंथातील देवदेवतांपेक्षा लोकदेवतेला त्याच्या जीवनात जास्त महत्त्वाचे स्थान आहे.

बशीरभाई मोमीन ज्या गावात राहतात. त्या गावातील देवीची पूजा हा लोकांचा धर्म आहे. त्या देवतांना शब्दबद्ध करणे, त्यांचे गुणवर्णन करणे, त्यांच्या लीला, त्यांचे चमत्कार, आख्यायिका, आपल्या काव्याच्या माध्यमातून सांगणे, हा त्यांचा धर्म आहे. त्यांच्या गावातील देवी यमाई तिचे वर्णन ते आपल्या काव्यात करतात. ही देवी भक्तांना पावते, ही साक्षात आंबा माता आहे. दर मंगळवारी तिची पालखी निघते. लाखो लोकांची गर्दी असते. चैत्र पौर्णिमेला या देवीची यात्रा भरते. देवीचा भक्त गुरव हा तिची पूजा करतो बायापोरं यात्रेच्या दिवशी गर्दी करतात. सनई तुतारी वाजवली जाते. शोभेची

दारू उडविली जाते. ठिकठिकाणाहून भक्त मंडळी धार्मिक भावना मनात घेऊन इथे येतात.

नगरवाले हिचं गुणगाई । कान्हूर पठारहुन कुणी येईल
नाशिक संगमनेरची बाई । भक्त जत्रेला हजर ऱ्हाई
चरणावरी हे नवस करी । म्हणजे माफ कर आई गुन्हा ।।

वरील काव्यपंक्तीवरून देवीची धार्मिक महती किती आहे? हे आपणाला कळते प्रत्येकजण देवीचा ओलांडा घेतो. तिला हळद कुंकू वाहतो. चोळी लुगड घेत असतो. आणि तिची विधिवत धार्मिक पूजा करतो. सगळीकडे तिचा उदोउदो होतो. नारळ, गुळ, खोबरे पेढे धार्मिक पूजा झाल्यानंतर प्रसाद म्हणून वाटला जातो. अशा या देवतांचे वर्णन मोमीन आपल्या गीतातून करतात, ते जगदंबा मातेला नमन करतात.

**४. सांस्कृतिक -**

महाराष्ट्राला प्राचीन संस्कृती आहे. ह्या संस्कृतीचा ठेवा महाराष्ट्राने जतन करून ठेवला आहे. हा सांस्कृतिक वारसा वेगवेगळ्या संस्कारातून व्यक्त होतो तो माणसाच्या कृती आणि उक्तीतून साकार होतो. महाराष्ट्रात अनेक प्रकारचे संस्कार करण्याची परंपरागत प्रथा आहे. उदा. लग्न, मुंज, बारसे, मृत्यू, जन्म तसेच वेगवेगळया देवतांची पूजा, विधी, सण, उत्सव इ.

महाराष्ट्रात प्रत्येक सणाला काही एक सांस्कृतिक महत्त्व आहे. उदा. नागपंचमी हा सण सर्व महाराष्ट्रभर साजरा करतात. प्रामुख्याने हा स्त्रियांचा सण आहे. त्याला सांस्कृतिक महत्त्व आहे. प्रत्येक भागात हा सण वेगवेगळ्या पद्धतीने साजरा होतो.

तसेच जागरण व गोंधळ हा धार्मिक विधी आहे. त्याचे सर्व सामान्याच्या जीवनात अजून स्थान टिकून आहे. जागरण खंडोबाचे व गोंधळ देवीचा असतो. खंडोबा हा लोकदैवत महाराष्ट्राच्या संस्कृतीत रुजलेला आहे. प्रत्येक माणूस हा खंडोबाला चुकत नाही त्याच्यावर सर्वांची नितांत श्रद्धा आहे. रविवारी त्याची तळी भरली जाते. लग्न कार्य पार पडल्यानंतर रात्री वरात झाल्यानंतर नवरी नवरदेव घरात जाण्याआधी तळी भरली जाते. त्याला ध्याडगा नाचवणे असे म्हटले जाते. लग्नकार्याच्या आधी किंवा नंतर जागरण घालावेच लागते. लग्न झालेले नवरी नवरदेव लग्नानंतर खंडोबाला जातात नव्हे जावेच लागते. नवरीला घेऊन नवरदेव खंडोबाच्या मंदिराच्या कमीत कमी पाच पायऱ्या तरी चढतो. त्याला पाचपावली असे म्हणतात. तळी भरताना सुद्धा पाच पावली असेच म्हटले जाते. प्रत्येक जण खंडोबाला घाबरतो. त्याचा विधी करतो (पण मुरुळीला घाबरत नाही. जी खंडोबाची

बायको असते. (ती सर्वांची असते) प्राचीन काळापासून खंडोबाचे सांस्कृतिक जीवनात महत्त्वाचे स्थान आहे. त्याचा महिमा प्रत्येक माणूस गात असतो. या खंडोबाच्या जीवनावरील त्याची महती सांगणारी अनेक काव्य बशीर भाई यांनी लिहिली आहेत.

हा खंडोबा जेजुरी गडावर आहे. त्या गडाला नवलाख पायरी आहे. सर्व भोळे भक्त त्याच्या दर्शनाला जातात. कोणी बैलगाडी जुंपून जातो. (पूर्वीच्या काळीची ही प्रथा अजून आहे पण ती संपत चालली आहे) तर कुणी मोटार गाडीने जातो. तिथे गेल्यावर सुखशांती लाभते. संकटे दूर होतात. आपल्या भक्तांना तो तारतो. तो सुखाचा सागर आहे. तिथे गेल्यावर डोईवरचा भार कमी होतो. त्याचे सत्त्व थोर आहे लाखो लोक तिथे येतात. पूजाअर्चा करतात. बेलभंडार वाहतात. आणि येळकोट करतात.

खंडोबाचे महत्त्व त्याचा महिमा आपल्या काव्यातून बशीरभाई यांनी सोप्या आणि नेमक्या शब्दात मांडला आहे. तो ही लोकांच्या भाषेतून.

धनी ओंदा जायाच मी ऐकणार नाय हो
जेजुरी जाऊन धरू खंडोबाचे पाय हो
भोळा खंडेराय बघ नवसाला पावतो
अंतरीचा शोध त्यालाच धावते
भक्तांच्या हाकेसाठी संकटात धावतो
दुष्टांची घडोघडी वाट हा लावतो
भक्तासाठी देवान ह्या केलं काय काय हो[१४]

वरील काव्यातून एक स्त्री आपल्या पतीला खंडोबाच्या भक्तीचा महिमा सांगते. मी मनात खंडोबाला नवस केला होता आणि तो नवस मला लग्नानंतर फेडायचा आहे. म्हणून ती आपल्या पतीकडे जेजुरीला खंडोबाच्या दर्शनासाठी जाण्याचा हट्ट धरते. खंडोबा ज्या गडावर राहतो तो गड सुद्धा महत्त्वाचाच त्याला नऊ लाख पायऱ्या आहेत एवढया पायऱ्या चढून खंडोबाच्या दर्शनाला जाणे मोठे जिकिरीचे काम आहे, त्या गडाचे वर्णनही काव्यात येते.

चढायाला जरा अवघड
हा जेजुरीचा गड
बसू विसाव्याला मधी थोड
मनी लागली देवाची ओढ

या जेजुरी गडावर खंडोबाचे ठाणे आहे. त्याच्या शेजारी बानू आणि म्हाळसा दोघी बसलेल्या आहेत. त्या दोघी दोन खंडोबाच्या बायका आहेत. त्याही काव्याचा विषय होतो.

आठा दिसाच्या ऐतवारी । भक्त जाती बघ जेजुरी
बानू म्हाळसाई सुंदरी । दिसे उभ्या तिथ शेजारी
देव दोघींच्या चक्रात धावला

बानू ही धनगराची म्हाळसाई वाण्याची खंडोबा हा बानूच्या रूपावर भाळला आणि त्याच्या मनात सारखाच तिचा ध्यास लागला त्याला तिच्या वाचून काही सूचेना अन्नपाणी गोड लागेना. बानुसाठी तो वेडा पिसा झाला. तिला जिंकून आणण्याचा चंग त्याने बांधला आणि तिला जिंकली यांची सुंदर मांडणी त्यांनी आपल्य गीतामधून केली आहे.

तिच्या रूपाची पुरती पडली भुरळ
रूप डोळ्यात नाचे सरळ सरळ
जशी विषाची पडते गुणा गरळ
तिन्ही लोकीचा स्वामी बनला झुरळ

बानूच्या प्रेमापोटी वेडा झालेला खंडोबा किती सामान्य पातळीवर येतो याचे उदाहरण वरील काव्यातून दिसते. तिच्यासाठी धनगराचे रूप घेतो. मेंढ्या सांभाळतो पण जिंकतो आणि बानूला आपले करतो. अशा अनेक घटना प्रसंग खंडोबाच्या जीवनातील बशीरभाई मोमीन यांनी आपल्या काव्याच्या माध्यमातून साकार केले आहेत.

बानू आणि म्हाळसा याचेही वर्णन त्यांनी आपल्या गीतामधून मांडले आहेत. बानू आणि म्हाळसा दोघींच्यावर प्रेम करणारा खंडोबा त्याहीपेक्षा भक्तावर प्रेम करतो. भक्ताच्या हाकेला धावून जातो गड सोडून निघून जातो. भक्तासाठी गेलेल्या देवाला बानू आणि म्हाळसा शोधतात. दोघींनाही कोडे पडते. देव गेला कुठे आम्हा दोघींनाही सोडून तो कुठे आहे त्याचा शोध घेतात.

बानू म्हाळसा शोधिती दोघी
देव कुठं हाय रं
सोमोतीला आंघोळीला मल्हारी नाय रं

अशा ह्या भोळ्या सांबाचे दर्शन घेऊन लोक आनंदाने मागे फिरतात. याची अनेक ठिकाणी ठाणी आहे. त्या ठाण्याची वर्णने त्यांनी केली आहेत. धामणीला खंडोबा आहे. दावडी निमगावचा खंडोबा आहे. अशा अनेक

ठिकाणच्या खंडोबाची वर्णनही त्यांच्या काव्यात दिसतात. पण ती त्यांच्या परिसरातीलच.

बशीरभाई मोमीन यांनी आपल्या काव्यातून सण, उत्सव, विधी, परंपरा यांना सांस्कृतिक जीवनात कसे व किती महत्त्वाचे स्थान आहे हे त्याच्या भाषेत मांडण्याचा प्रयत्न केला आहे. आणि ग्रामीण शब्दांची मांडणी करून तो त्याच संस्कृतीचे दर्शन घडवण्याचा त्यांचा मानस आहे.

**५. आर्थिकता :**

आर्थिकता हा माणसाच्या विकासात महत्त्वाचा भाग आहे. माणसाला पैशामुळेच सुबत्ता येते. त्याच्या दैनंदिन गरजा भागवायच्या असतील तर पैशाशिवाय काहीच होऊ शकत नाही. पैसा हा आधुनिक काळात प्रमुख गरज आहे. अगदी पूर्वीच्या काळी दैनंदिन गरजेसाठी पैशाची गरज भासत नसे. पण आज कोणतीच गरज पैशाशिवाय भागत नाही. पैशामुळे दुनिया बदलते पैशासाठी माणूस माणसाचा शत्रू होतो. पैशामुळे कुणी उपाशी राहतो तर पैशामुळे कोणाला झोप येत नाही. पैशासाठी कोणी कोणाचा खून करतो तर पैशामुळे कोणी मोठा घोटाळा करतो.

खून दरोडे रोजच घडती । हत्याकांड हे गुणास नडती
कुठवर चालेल हे सांगा । पांडुरंग थांबव बा दंगा[१६]

कवी मोमीन म्हणतात, पैशापाईच माणूस लयाला जातो. पैशातून सत्ता, सत्तेतून पैसा आणि पुन्हा सत्ता, असे पैशाचे स्वरूप आजच्या काळात पैशापाई नातीगोती विसरली जातात. प्रत्येक ठिकाणी स्वार्थी आणि मतलबी दुनिया पैशाच्या मागे धावते आहे. पैशासाठी भाऊभावाचा वैरी होतो. बापलेकाचे भांडण होते. बायको नवऱ्याला आणि नवरा बायकोला फसवितो. कारण 'दाम करी काम' असेच दुनियाचे स्वरूप आहे. मराठीतील एक म्हण इंग्रजीत आहे. 'नो मनी तर पुसेना कोणी एस मनी तर हजार जणी' अशी आजची स्थिती आहे. अशी आज समाजाची स्थिती आहे.

अशा परिस्थितीत सर्व सामान्य माणसाचे हाल होतात त्याला या महागाईच्या काळात कुटुंब चालविणेही अशक्य होते. कुठेही गेलो तरी महागाई मागेच आहे आपली सावली जशी आपल्याबरोबर असते. तशी महागाई पिच्छा सोडत नाही याचे वर्णन मोमीन कवठेकर आपल्या काव्यात करतात.

जाई मी हो जिथ । महागाई उभी तिथं
लाज हिन सारी सोडली
लै महागाई महागाई वाढली

एखाद्या बिनलाज्या माणसासारखी ती पाठ सोडत नाही. महागाई किती निर्लज्ज आहे. ह्याचे स्वरूप त्यांच्या काव्यात दिसते. अशा या महागाईत सामान्य माणसाचा तुटपुंजा पगार पुरत नाही. पगार झाला की लगेच संपतो. आणि उसनवारी सुरू होते. त्यात घर खर्चही भागत नाही. म्हणून पुढील कवनात कवठेकर म्हणतात,

किती वाढली ही महागाई - महागाई
संसाराला सखे माझा सारा
पगार पुरत नाही[१७]

महागाईने त्रस्त झालेल्या एका कामगाराची व्यथा ते वरील कवनातून मांडतांना दिसतात. तो आपल्या पत्नीशीच संवाद करतो. महागाईचे चटके कसे सोसावे लागतात. याचे सुंदर उदाहरण त्यांनी या काव्यात मांडले आहे. आजच्या महागाईच्या काळात नोकरी करून भागत नाही नोकरीचा पैसा संसाराला पुरत नाही म्हणून आपण काहीतरी व्यवसाय केला पाहिजे. व्यवसायाशिवाय आपले कुटुंब चांगले चालणार नाही. आपली प्रगती सुधारणार नाही. म्हणून काव्यातील गंगाराम हा धंदा करण्याचे ठरवितो. याचे उदाहरण खालील काव्यपंक्तीच्या आधारे सांगितले आहे.

गंगाराम बघ धंद्याला निघाला
१०० राचे २०० करतो म्हणाला[१८]

अशा पद्धतीने पैसा, महागाई या मुळे होणारी सर्वसामान्यांची कोंडी, त्यांचे हाल, त्यांचे दारिद्र्य, याचबरोबर पैशाची धुंदी आणि मस्ती असलेले धनधांडगे यांचेही चित्रण कवी मोमीन कवठेकर यांनी आपल्या कवनांच्या आधारे मांडले आहे.

**६) कौटुंबिक जीवन :**

भारतीय समाज हा एकत्र कुटुंबप्रधान समाज आहे. आज कुटुंबसंस्था विसकळीत झाली असली तरी छोटे कुटुंब पूर्वीच्या कुटुंबासारखेच अजूनही आहे. कुटुंबातील पती पत्नीचे संबंध त्यांचे रुसवे फुगवे त्यांचे प्रेम त्यांचा राग लोभ आई मुलीचे संबंध, सासरी जाणाऱ्या मुलीची भावना, लाडाच्या बायकोमुळे होणार हाल, नवऱ्याचा नाकर्तेपणा अशा कितीतरी भाव-भावना कौटुंबिक जीवनात असतात. त्यांची यथायोग्य मांडणी मोमीन कवठेकरांनी आपल्या गीतांमधून केली आहे. महाराष्ट्रातील समाजात नातेसंबंधांना अतिशय महत्त्व आहे. प्रत्येक जण आपली नाती जपत असतो. ते टिकून ठेवण्यात त्यांना आनंद वाटतो.

प्रत्येक कुटुंबात मुले मोठी होतात. त्यांची लग्न होतात. मुलगी हे परक्याचे धन तिचे वय झाले की, तिचे लग्न ठरले जाते. लहानपणापासून ती आई वडिलांच्या घरी वाढलेली असते. कुटुंबात रमलेली असते. आणि असे हे समाधानाचे दिवस लग्न होताच संपतात. तिला आईवडिलांचे घर सोडून सासरी जावे लागते. ज्या घरात ती लहानची मोठी होते. त्याच घराला लग्नानंतर ती परक्याची होते, तिचे हे घर संपते. सासरी जाणाऱ्या मुलीचे वर्णन मोमीन कवठेकरांनी आपल्या गीतात मांडले आहे.

सासरी जाताना तिला हुंदका आवरत नाही. कारण या घरचे प्रेम मायेने वाढविणारी आई प्रेम करणारे वडील, लाडके भाऊ या सर्वांच्या मायेने तिचे डोळे भरून येतात. आपल्या ताईला दुसऱ्या घरी जाताना पाहून रडणारी छोटी बहीण तिच्या जिवाभावाच्या मैत्रिणी हे सर्व संपणार आहे. हे माहेर आता परके होणार आहे, म्हणून हुंदका देऊन रडणारी मुलगी त्यांच्या काव्यात दिसते.

आज परक्याची झाले मी बाई
मला हुंदकाच आवरेना बाई[१९]

आईवडिलांची माया सोडून संसारी चाललेल्या तरुणीचे भावनिक मन ते वरील गीतातून मांडतात. माहेरच्या माणसांना सोडून तिचा पायच निघत नाही पण आता हे घर सोडून तिला जाणे भाग पडते पण तिची इथल्या लोकांच्या वरची माया तिला सोडत नाही ती म्हणते.

मी सासरी निघाले
सोडूनी तुला ग आई
माय तुझी न सोडी[२०]

हे घर इथे प्रत्येक गोष्टीत गुंतलेलं मन त्याची आठवण मन खेचून घेते. पण थांबताही येत नाही अशी अवस्था व्यक्त करताना मोमीन पुढील काव्यात म्हणतात,

नांदायला जाया आई ।
माझा निघेना पाई
लग्नाची माझ्या तूच
केली का ग घाई[२१]

आपल्या आईला ती मुलगी म्हणते तू माझ्या लग्नाची खूप घाई केली एवढ्या लवकर तू मला परक्याला देऊन टाकलेस. तू मला जीवनातील सर्व गोष्टी शिकवल्यास कसे वागावे, याचे ज्ञान दिले. लहानाचे मोठे केले. आज

एवढी निष्ठूर का झालीस? असे म्हणून आईच्या गळ्यात पडणारी नववधू आहे.

तसेच जन्माला आलेल्या प्रत्येक मुलीला लग्न झाल्यानंतर आपल्या आईवडिलांचे घर सोडून जावच लागत. हा भारतीय संस्कृतीचा रिवाज आहे. परंपरेने समाजात चालत आलेली ही रीत आहे. प्रत्येक आईवडील आपल्या मुलीला दु:खी अंत:करणाने सासरी पाठवत असतात म्हणून सासरी जाणाऱ्या आपल्या मुलीला म्हणते,

'कंठ दाटला सूचेना शब्द मजला
पोरी परक्याची झालीस आजला
किंवा
कंठ दाटे जरी । हुंदका येई जरी
जाणे चुकते का सांग मुली सासरी'[२२]

असा प्रेमळ संदेश, उपदेश आई आपल्या मुलीला करते. कुटुंब व्यवस्थेतील अतिशय गोड नाजूक आणि मनाला भावणारा प्रसंग मोमीन कवठेकर आपल्या काव्यातून व्यक्त करतात. या सुखदु:खाच्या प्रसंगाबरोबरच पती पत्नीच्या रुसव्या फुगव्याचे स्वरूपही त्यांच्या काव्यात येते.

रुसवा फुगवा सोड थोड ऐकतरी माझ ऐक तरी
येत्या पगारी घेतो साडी भरजरी[२३]

संसारातील लटक्या भांडणाचे स्वरूप कवी वरील गीतामधून व्यक्त करतात. संसार हा असाच असतो. क्षणात गोड तर क्षणात भांडण त्या भांडणाचे स्वरूपही फार मोठे असते असेही नाही. आपल्या पतीला संसारात साथ करणाऱ्या पत्नीच्या किरकोळ गोष्टीवरून होणारे भांडण असे त्याचे स्वरूप असते.

प्रत्येक स्त्रीला हौस मौज करावी वाटते. आपल्या पतीने आपल्याला दागिने घ्यावे. चांगल्या साड्या घ्याव्यात. आपण चार चौघीत ते घालावेत. त्यांच्यात मिरवावं. असं प्रत्येक संसारी स्त्रीला वाटत असते. आणि म्हणून आपल्या पतीने निदान आपल्याला चांगली चार चौघीत वापरता येईल. घालता येईल. अशी साडी आणावी. म्हणून ती आपल्या पतीकडे हट्ट करते. हा हट्ट पुरवण्यासाठी तिचा पती तिला म्हणतो,

भांडू नको ग मैने आता बोल गोडीन
तालुक्याला जाऊ चल जावू ग जोडीन[२४]

(ग्रामीण भागात मैना, हरिणी, कारभारीण असे काही ठरावीक शब्द पत्नीला उद्देशून वापरले जातात) पती म्हणतो, 'चाल तालुक्याला जाऊन

तुला तुझ्या पसंतीची चांगली भरजरी साडी घेतो.' मुला बाळांनाही कपडे घेतो पण संसार हा भांडून होत नाही त्यात गोडी असावी समजुतीने वागले तर संसार सुखी होतो. नाहीतर संसारात नेहमी अडचण येते. एकाने एका बाजूला आणि दुसऱ्याने दुसऱ्या बाजूला ओढून चालत नाही. कारण संसाराची दोन चाकांपैकी एक जरी निकामी झालं तरी संसार बिघडतो.' हे पुढील गीतात मांडले आहे

'तुला सांगून समजून थकलो फार गं
मला सोसना संसाराचा भार ग'[२५]

संसार चालायचा असेल, कुटुंब चालायचे असेल, तर कोणाचे पीठ कोणाचे मीठ असे एकत्र असेल तर तो चालतो. एकाने कमवायचे आणि दुसऱ्याने उधळायचे, असे झाले तर संसाराची घडी विस्कटते. मामाची पोरगी हौशेने बायको केली तर तिच्यामुळे नवऱ्याचे होणारे हाल पुढील गीतात मांडले आहेत.

'पोर ही मामाची केली
वेळ पस्ताव्याची आली'

किंवा

'केली बायको बघा मुंबईची महाराणी
भरतो मुकाट मी मुकाट घरच पाणी'[२६]

मामाची मुलगी बायको केल्यामुळे तिचे लाड पुरविण्यात तिची मौजमजा शान शौक पुरविण्यासाठी कशी तारंबळ होती. हे वरील गीतांमधून व्यक्त झाले आहे.

कौटुंबिक जीवनात पतीच्या भांडणामुळे पत्नी माहेरी जाते. सासरी येण्याचे नाव घेत नाही घरची सर्व कामे करताना पतीची दमछाक होते. म्हणून तो तिला घेऊन येण्यासाठी पंच मंडळी जमा करतो आणि भांडणाचा निवाडा करतो जे काय झाले असेल एकमेकांच्या चुका सुधारून पुन्हा गोडीन संसार करावा. अशी इच्छा व्यक्त करतो. दोघांच्या भांडणात मुलांचे हाल नको. त्यांची आबाळ नको म्हणून तो पंच मंडळीच्या समोर सांगतो की झाल गेलं सर्व विसरून गोडीन संसार करण्याची मी ग्वाही देतो. तुम्हीच आता न्याय करा. पंचाना तो म्हणतो.

'पंचमंडळी करूनी न्याय
सांगा हो गठूड बांधायला
येत नाही बघा ही नांदायला हो
येईना बघा ही नांदायला'[२७]

संसारातले भांडण हे लहान मुलांच्या भांडणासारखे असते. त्या भांडणाचा जर विचार केला तर संसार चालत नाही. या काळात गल्ल्री पंचविशी असते. त्यासाठी थोरा मोठ्यांच्या सल्ल्याने संसाराचा गाडा पुढे न्यावा लागतो.

**७. कृषिविषयक जीवन :**

भारत हा शेतीप्रधान देश आहे. म्हणूनच गांधीजीनी 'खेड्याकडे चला' अशा प्रकारची हाक दिली. महाराष्ट्र हे सुद्धा शेतीप्रधान राज्य, शेती पिकली नाही तर माणसं उपाशी मरतात. उद्योग बंद झाला तर फारसा फरक पडत नाही. पण पाऊस पडलाच नाही, शेती पिकलीच नाही, तर माणसं जगतील कशी? माणूस सर्व काही पोटासाठीच करतो त्याचे पोट भरणे, हे सर्वात महत्त्वाचे. पोटासाठी लागणारे धान्य हे शेतीत पिकते.

म्हणून ही शेती करणारा शेतकरी हा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. या शेतकऱ्याच्या जीवनाचे त्याच्या कष्टाचे त्यांच्या सुखदु:खाचे क्वचित प्रसंगी त्याच्या आनंदाचे त्याच्या पत्नीच्या प्रेमाचे आणि मनातील प्रेमभावनेचे वर्णन मोमीन कवठेकर यांनी केले आहे.

हा शेतकरी दादा साधा आहे, भोळा आहे त्याच्या मनात शेती आणि कष्ट या शिवाय दुसारा विचार नसतो. रात्रंदिवस तो शेतात राबतो. काळ्या आईची सेवा करतो. तिची मशागत करतो. धान्य पिकवतो. या त्याच्या कष्टाचे चीज होत नाही. त्याच्या श्रमाचे वर्णन कवी मोमीन कवठेकर यांनी खालील ओळीत मांडले आहे

> 'शेतकरी दादा माझा हा साधा । रक्ताच पाणी करी
> तो कोंबडं आरवल्यावरी । आपल्या शेतात नांगर धरी'[३०]

पहिलं कोंबड आरवल्यावर आपल्या बैलांना घेऊन शेतावर नांगर धरण्यासाठी जातो. पहिलं कोंबड हे साडेतीन वाजता आरवतं एवढ्या सकाळी गेलेला शेतकरी आपल्या शेतावरून संध्याकाळी गडात पडल्यावरच घरी येतो. त्याचे काम हे कष्टाचे असते. रक्ताचे पाणी करणारे असते. पाऊस वेळेवर पडला नाहीतर तो हवालदिल होतो. त्याचे डोळेसारखे पावसाकडे आकाशाकडे लागलेले असतात. रात्रंदिवस तो पाऊस कधी पडेल, या चिंतेत असतो. अशा चिंतातूर शेतकऱ्याला कवी मोमीन कवठेकर दिलासा देतात. त्याचा आत्मविश्वास जागा करतात. हे त्यांच्या पुढील गीतात त्यांनी मांडले आहे.

> 'शेतकऱ्या तू पुस हे डोळे । घाबरण्याची वेळ नव्हे
> अंध:कार हा संपत आहे – उष:काल तोच जवळ आहे'[३१]

वरूण राजाचा कोप संपणार आहे. पाऊस पडणार आहे. तुझ्या मनातील चिंता दूर होणार आहे. तू काळजी करू नको असा धीर ते आपल्या काव्यातून शेतकऱ्यांना देतात.

मग अचानक ढग कोसळतात. धो धो पाऊस पडतो. वेळेवर पाऊस पडल्यामुळे सृष्टीतील सर्व प्राणी पात्र आनंदी होतात. या आनंदात शेतकरी असतो. शेतकऱ्याचा आनंद ओसंडून वाहतो. त्याचा चेहऱ्यावर खुशी दिसते. त्या खुशीचे नेमके वर्णन मोमीन कवठेकर करतात.

'औंदा झालाय वेळेवर पाऊस पाणी
हिरवा शालू जशी न्हालीय आता धरणी'[३२]

पाऊस पडल्यामुळे धरणी हिरवीगार झाली आहे. तिने आताच अंघोळ करून हिरवा शालू घातला आहे, अशी ती वाटते. पाऊस जोरात आल्यावर धरणीमाता सुखावते आणि पेरणीला सुरूवात होते. पेरणी अतिशय महत्त्वाचे काम पेरणीच्या वेळी सर्व कामे बंद ठेवली जातात. पेरणी केल्यावर धरणीमाता आपल्याला प्रसन्न होईल. ती आपल्या कष्टाचा घाम फुकट जाऊ देणार नाही. ती दयाळू आहे मायाळू आहे.

शेतकऱ्याची शेती त्याच्या बैलाच्या जोडीवर अवलंबून असते. बैलाच्या जीवावर त्याची शेती अवलंबून असते. वरूणराजाने कधी धोका दिला किंवा रब्बी पिकासाठी विहिरीवर मोट धरली जाते. आज इलेक्ट्रिक मोटार आल्यामुळे मोट कालबाह्य झाली आहे. मोटेवरचे गाणे ही संपले आहे. पण पूर्वीच्या काळी पिकाला पाणी मोटेद्वारे दिले जात असे. मोट ही कातड्याची होती. हे पाणी पाटापाटाने शेतात जात असे. मोट हाकताना शेतकरी सुद्धा गाणे म्हणत असे. त्याचे वर्णन कवठेकरांनी पुढील गीतातून केले आहे.

'शेतकरी दादा शेतावरी । जाई शेतावरी
गातोय गाणे मोटेवरी'[३३]

पुढील गीतात शेतकरी आपल्या कारभारणीला उद्देशून म्हणतो,

'चल कारभारणी शेतावर जावू
ढवळ्या पवळ्याला संगती घेवू
मोटेवर गाणे गाऊ'[३४]

शेतकरी आपल्या कारभारणीला सांगतो की मी मोटेवर गाणे गातो. पिकाला पाणी देतो. तू न्याहारी घेऊन ये. आपण शेतावर शेताच्या बांधावर बसून आनंदात जेवण करू.

शेतकऱ्याच्या या सुखी संसाराचे चित्रण कवठेकरांनी आपल्या कृषिविषयक गीतांच्या मधून मांडले आहे. शेतकरी हा कृषीचा राजा आहे

त्याने जर पिकविले तरच सर्व समाज जगेल. त्याने आळस केला तर खायला अन्न मिळणार नाही. असा हा भोळा भाबडा मनाने मोकळा असणारा शेतकरी त्यांनी आपल्या गीतांमधून उभा केला आहे.

ग्रामीण भागातील अस्सल शेतकरी जीवन आणि त्याचे शब्द वैभव कवठेकरांच्या काव्यात दिसते.

निष्कर्ष :

मोमीन कवठेकरांनी राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, कौटुंबिक आणि कृषिविषयक अशा वेगवेगळ्या रचना केलेल्या आहेत. मोमीन कवठेकर यांनी राजकीय रचनांमधून राजकारणातील पुढाऱ्यांचा गुण गौरव केलेला दिसून येतो.

त्याचबरोबर राजकारणातील कुरघोडी करणाऱ्या व्यक्तीवरही प्रकाश टाकला आहे. मोमीन कवठेकर यांच्या गीतरचनेत व्यक्तिसापेक्षता आणि व्यक्ती गुण-गौरव या बाबींचा प्रकर्षाने विचार जाणवला आहे. विशेषत: ग्रामीण भागातील राजकारण त्याचबरोबर ग्रामीण भागातील स्त्रीचा राजकारणातील सहभाग यावरही आपल्या रचनेतून प्रकाश टाकतात.

बी.के. मोमीन कवठेकर आपल्या गीतातून राज्यकर्त्यांचे गुणगान गातात. परंतु त्याचबरोबर या राजकर्त्यांनीच समाजाचे वांटोळे केले. हे सांगायलाही कचरत नाही. म्हणूनच सर्व सामान्य माणूस राजकरणामध्ये कसा भरडला जातो. हे ही आपल्या गीतातून समाजापर्यंत पोहोच करण्याचे महनीय कार्य करतात. असेच म्हणावे लागते. सामाजिक रचनांद्वारेडॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजासाठी केलेल्या कार्याचाही ते उल्लेख करतात.

सामाजिक रचनेतून प्रत्येक मनुष्य जातीला ते उपदेशपर आणि प्रबोधनपर सल्ला देताना दिसतात. एवढेच नव्हे तर सामाजिक शैक्षणिकता ही कशी महत्त्वाची आहे हे ही स्पष्ट करतात. समाजामध्ये गरीब आणि श्रीमंत यांच्यामध्ये निर्माण झालेल्या दरीचाही विचार करायला ही त्यांची सामाजिक कविता कारणीभूत ठरते.

धार्मिक रचनेतून पंढरपूर, आळंदी, त्याचबरोबर कवठ्याची यमाई जगदंबा, आंबा यांच्याबद्दलही ते गौरवोद्‌गार काढताना दिसतात. सांस्कृतिकतेचा विचार करताना यात्रा उत्सव त्याचबरोबर सामान्य माणसाला मनात असलेल्या परमेश्वराविषयीचा आदरभावही त्यांच्या कवितेतून ओसंडून वाहताना दिसतो. महागाईमुळे सर्वसामान्य माणसाची कशी आर्थिक घुसमट होते त्यांचे सुंदर विवेचन मोमीन कवठेकरांनी केले आहे.

तर कौटुंबिक रचनेतून त्यांची कविता नातेसंबंध तर स्पष्ट करतेच पण त्याचबरोबर कुटुंबातील प्रत्येकाचे नाते एकमेकांशी कसे असावे याचाही निर्देश त्यांची कविता करते. एवढेच नव्हे तर शेती, मळा, गुरं, ढोरं, मोट हे कृषी संस्कृतीशी निगडित घटकांचा ही उल्लेख प्रकर्षाने त्यांच्या गीतातून व्यक्त होतो. याचाच अर्थ मोमीन कवठेकर यांची कविता नानाविध विषय हाताळून सर्वसामान्य माणसांचे प्रश्न ऐरणीवर आणण्याचे महत्त्वाचे कार्य करते.

# विभाग 'ऊ'

# आधुनिकता/स्त्रीवादी साहित्य

# आधुनिकतेचे स्वरूप

**प्रा. डॉ. शशिकांत साळवे,**

आधुनिकतेची नेमकी, नेटकी आणि आटोपशीर व्याख्या करणे अवघड आहे. आधुनिकतेची संकल्पना युरोपात धर्मसुधारणा आणि प्रबोधन यांच्या चर्चेतून पुढे आली. आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या वाढत्या वर्चस्वातून तिचा समाजावर होणारा परिणाम यांचा अभ्यास होऊ लागला. कालांतराने आधुनिकतेची संकल्पना समाजाने निर्माण केलेल्या सर्वच बाबींना लावून बघण्यात आली. कला, साहित्य संस्कृती, समाजकारण, राजकारण, अर्थकारण या सारख्या जीवनाच्या सर्वच क्षेत्रात आधुनिकतेची चर्चा सुरू झाली.

विज्ञान, तंत्रज्ञानामुळे संपूर्ण समाज ढवळून निघाला व त्याची मानसिकता आधुनिकतेकडे वळू लागली. या कालावधीत आधुनिकतेचा स्वीकार सर्वत्र झालेला दिसून येतो. आधुनिकतेमध्ये परंपरेतील कुचकामी गोष्टींवर प्रहार करणे, रूढ संकल्पना नव्याने तपासून घेणे, धर्मग्रंथाचा कालानुरूप नवा अर्थ लावणे, विवेकबुद्धीच्या आधारे व्यक्तिगत व सामाजिक व्यवहार करणे, परंपरा, धर्म, चालीरीती, व रूढी यांची बुद्धिजीवी चिकित्सा करणे, मानवाच्या बुद्धीवर व त्याच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवणे, बौद्धिक निकषांवर उतरेल तेच खरे ज्ञान, आपल्या नैतिक मूल्यांची चिकित्सा करणे, सामाजिक संस्थांची पुनर्रचना करता येते, समाजाची प्रगती होत असते व त्यासाठी मानवी समूहाने जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजे असे मानणे, ऐतिहासिक दृष्टीचा अंगीकार, ऐतिहासिक जाणिवेचा विकास, वैज्ञानिक दृष्टिकोणाचा स्वीकार करून अविवेकी शक्तीवर मात करण्याचा प्रयत्न करणे. विज्ञान आणि अनुभवजन्य ज्ञानावर विश्वास ठेवणे या सर्व घटकांचा आधुनिकतेत विचार होत होता. पुनरुज्जीवन, धर्मसुधारणा, प्रबोधन व औद्योगिक क्रांती या सर्वांचा परिपाक म्हणजेच आधुनिकता होय.

**आधुनिकतेची भारतीय परंपरा :**

भारतीय परंपरेतील आधुनिकतेची बीजे शोधण्याचा प्रयत्न केला तर आपल्याला इ.स. पूर्व सहाव्या शतकापर्यंत मागे जावे लागते. खऱ्या अर्थाने स्त्रीला निर्मितीचा अवकाश उपलब्ध करून देण्याचे श्रेय तथागत भगवान बुद्धांकडेच जाते. ''बौद्ध धर्माचे संस्थापक असलेल्या गौतम बुद्धांनी स्त्रियांना सर्वप्रथम निर्वाणाची संधी उपलब्ध करून दिली. स्त्रीमुक्तीच्या संदर्भातील पहिले क्रांतिकारी पाऊल उचलले. तसेच संस्कृतप्रमाणे विशिष्ट वर्गाची मक्तेदारी नसलेली पालिभाषा त्यांना त्यांच्या भावनांची अभिव्यक्ती करण्याचे साधन म्हणून उपलब्ध करून दिली. बौद्ध संघात प्रवेश केलेल्या भिक्षुणींनीही या साधनाचा योग्य तो वापर करून आपल्या भावनांना काव्यबद्ध केले. त्यांनी केलेले हे काव्य म्हणून थेरीगाथांचा गौरव केला. तर ती नक्कीच अतिशयोक्ती होणार नाही. गौतम बुद्धांनी स्त्रियांना निर्वाणाचे द्वार खुले केले आणि जणू काही इतके दिवस कोंडून राहिलेल्या स्त्रियांच्या भावभावनांना तसेच अनुभवांना नवे कोंब फुटले. इतकी वर्षे समाजाच्या चौकटीत घुसमटत, गुदमरत असलेल्या त्यांच्या श्वासाला मोकळे अवकाश मिळाले. एका वेगळ्या अनुभवाची अनुभूती त्यांना आली.''[१]

तथागतांनी स्त्रियांना भिक्षुणी संघात प्रवेश देण्याचे धोरण स्वीकारल्याने गृहस्थाश्रमाच्या चौकटी पलीकडचे आत्मभान त्या व्यक्त करू शकल्या. विश्वातील सर्व वस्तूंना सत्य स्वरूपात पाहण्याची जागृतावस्था तिला प्राप्त झाली. ही जागृतावस्था स्त्री स्वत:च्या ज्ञानशक्तीने प्राप्त करू शकते. या प्रक्रियेत तिचे स्त्री असणे लक्षात न घेता तिला एक विचारशील मानव म्हणूनच मानले पाहिजे. बौद्ध धम्मात सर्व प्रकारच्या स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीने स्वातंत्र्य, समता आणि आत्मविश्वास ही मानवी जीवनाची मूल्ये गौतम बुद्धाच्या काळातच स्त्रीला प्राप्त झाली म्हणून त्या काळातच भारतात आधुनिकतेची बीजे रुजलेली दिसतात.

भारतीय स्त्री आई-पत्नी-गृहिणी या भूमिकेतच पूर्णपणे अडकलेली होती. कुटुंब आणि घर हेच तिचे कार्यक्षेत्र होते. सामाजिक प्रवाहांपासून पुरुषप्रधान संस्कृतीने तिला जाणीवपूर्वक बाजूला ठेवले होते. परंतु शिक्षणामुळे स्त्रीला स्वत्वाची जाणीव झाली व ती आपले हक्क मिळविण्यासाठी झगडू लागली.

''मध्ययुगीन कालखंडात महानुभाव पंथामध्ये श्रीचक्रधर स्वामींनी आपल्या शिष्य परिवारात अनेक स्त्रियांना सहभागी करून घेतले होते. अनेक स्त्रियांनी पंथदीक्षा घेतली होती. महानुभाव पंथाचे आद्य प्रवर्तक चक्रधर स्वामी

होते. ते स्त्रियांची माणूस म्हणून प्रतिष्ठा सांभाळणारे व स्त्रियांचा जीव पुरुषांसारखाच आहे हे मानणारे होते. महानुभाव पंथाने स्त्रियांना एका मर्यादेपर्यंत मोकळीक दिली व आध्यात्मिक अधिकाराचा मार्ग मोकळा करून दिला.''[२]

यावरून असे लक्षात येते की, या काळातही आधुनिकता डोके वर काढताना दिसते. स्त्रीकडे माणूस म्हणून पहावे हा विचार येथे अभिप्रेत होता. वारकरी संप्रदायातही स्त्री आपल्या हक्काविषयी जागृत दिसते. मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई या स्त्रियांनी आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवलेला होता.

''तुकारामासारख्या शूद्र संताला गुरू करणाऱ्या बहिणाबाईने पतिव्रता धर्माची चौकट अधिकच व्यापक केली. ज्ञानेश्वराची धाकटी बहीण मुक्ताबाई स्वत: महायोगिनी होती आणि तिने चांगदेवासारख्या हठयोग्याला स्त्री देहाकडे किती सहजपणे पाहिले जावे हे शिकवले आहे. जनाबाईने तर स्त्री म्हणून व शूद्र म्हणून देवाच्या दारात आपल्याला मिळणाऱ्या विषम वागणुकी विरुद्ध आवाज उठविला.''[३]

स्त्रियांची परिस्थिती जर सुधारायची असेल तर शिक्षणाशिवाय तरुणोपाय नाही, हे त्या काळातील समाजसुधारकांना जाणवले होते. याच जाणिवेतून इ.स. १८४८ मध्ये महात्मा जोतिराव फुले यांनी पुण्यात पहिली मुलींची शाळा काढली. स्त्री जशी शिकू लागली, सुशिक्षित होऊ लागली तशी ती स्वत: विचार करू लागली. तिला आपल्या स्वतंत्र अस्तित्वाची जाणीव निर्माण झाली. महात्मा फुले यांना कार्यात सावित्रीबाई फुलेंनी मदत केली. सावित्रीबाईना विद्येचे व शिक्षणाचे महत्त्व कळले होते. त्यांनी भारतीय स्त्रियांना ठणकावून व विश्वासपूर्वक सांगितले की, विद्या देणारा धैर्यशील निर्भय बनतो, तरी विद्या घेणारा सामर्थ्यशाली शहाणा बनतो. अशी शिकवण सावित्रीबाईंनी भारतीय 'स्त्री'समाजाला दिली. सावित्रीबाईंनी शिक्षणाचे स्त्रीजीवनातील महत्त्वाचे स्थान व त्याबद्दल करावयाच्या चळवळीबाबत स्त्रियांना जागृत केले. म्हणूनच त्या भारतीय स्त्रीमुक्तीच्या आदर्श ठरल्या आहेत. कारण आज जी स्त्री सुशिक्षित व पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून समाजात पुरुषाच्या बरोबरीने कार्य करतात ते केवळ सावित्रीबाईमुळेच. महात्मा फुल्यांची 'सत्यशोधक चळवळ' यादृष्टीने महत्त्वाची आहे.

गांधीजींनीं असहकाराच्या, नागरी शिस्त भंगाच्या चळवळीमध्ये खऱ्या अर्थाने स्त्रियांना सहभागी करून घेतल्याने स्त्रियांमध्ये एक प्रकारचा आत्मविश्वास निर्माण झाला व त्यांना आपल्या सामर्थ्यांची व शक्तीची

जाणीव झाली. महाराष्ट्रात समाज सुधारणा चळवळीत लोकहितवादी, बाळशास्त्री जांभेकर, विष्णुशास्त्री पंडित यांनी विधवा पुनर्विवाहाला अनुकूल मत निर्माण करण्याचे अविरत प्रयत्न केले. यातून १८५६ मध्ये विधिमंडळात पुनर्विवाहाला मान्यता मिळाली व त्या संदर्भातला कायदा करण्यात आला.

१८८२ साली ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री पुरुषः तुलना' हे पुस्तक लिहिले. स्त्री वर्गाचे सर्वच स्तरावरील शोषण आणि पुरुषप्रधान संस्कृतीचा पगडा या संदर्भात वरील पुस्तकात विचार मांडले आहेत. त्या म्हणतात, - "स्त्री धर्म म्हणजे काय? निरंतर पतीची आज्ञा पाळणे, त्याचे मर्जी प्रमाणे वागणे, त्यांनी लात मारिल्या, शिव्या दिल्या, दुसऱ्या रांडा ठेवल्या, नवरोजी दारू पिऊन, जुवा खेळून, कफल्लक होऊन, शंख करीत, चोरी करून, कोणाचा प्राण घेऊन, फितुरी, चाहडी, खजिना लुटुन, लाच खाऊन जरी घरी आले; तरी स्त्रियांनी आपले हे कोणी जसे काही कृष्ण महाराजच गौळ्यांचे दही-दूध चोरून चंद्रवळीला कलंक लावून आलेत असे समजून; परमात्मा सारखेच त्यांची मोठी हसत मुखाने देवा सारखी पूजा करावी, सेवेत हजर रहावे हा स्त्री-धर्म?" आपल्याकडे पती हा परमेश्वर अशी संकल्पना रूढ असल्याने भारतीय परंपरेत पतीला परमेश्वराचे स्थान लाभले आहे. परंतु त्या पतीची वागणूक परमेश्वरासारखी आहे का? या संदर्भात ताराबाई शिंदे आपले मत परखडपणे मांडतात -

"जर बायकोला नवराच देव तर नवऱ्याची वागणूक देखील देवाप्रमाणेच पाहिजे. बायकांनी भक्ताप्रमाणे जशी भक्ती करावी तशी नवऱ्याने देखील त्यांजवर देवाप्रमाणेच ममता करून त्यांचे सुख दुःख जाणावे की नाही? जसे देव भक्ती पाहून सदा प्रसन्न राहतात. भक्तांचे गुणदोष आढळले तर ते कसे तेव्हाच खरे खरे कारण सांगून त्यांचा अपराध त्यांचे पदरात घालून ममतेंने शासन करतात, तसे यांनी करू नये. तर नवरा कसाही दुर्गुणी असला तरी त्याला देवाप्रमाणेच मानून कोण वागेल बरे."[४]

यावरून असे दिसते की पुरुषाचे स्वातंत्र्य म्हणजे बाईची पराधीनता अशी स्थिती नसावी. या काळात ताराबाई शिंदें पुरुषी वर्चस्वाला विरोध करताना दिसतात. स्त्री आणि पुरुष या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहे हे स्पष्ट करतात. या काळात जहाल विचार मांडतात म्हणून त्या आधुनिक ठरतात. स्त्री-पुरुषांमधील विषमता त्यांनी दाखवून दिली. १८९१ मध्ये संमती वयाच्या बिलाच्या निमित्ताने जो वाद झाला त्यावेळी अनेकांनी विरोध केला. परंतु पंडिता रमाबाईनी स्त्रियांच्या लग्नाचे वय १६ असावे असा नवा विचार मांडला. १८८२ मध्ये नेमलेल्या हंटर कमिशनला 'स्त्री' शिक्षणाची गरज,

'स्त्री' शिक्षकांची गरज, स्त्रियांना वैद्यकीय महाविद्यालयामध्ये प्रवेश मिळणे, यासाठी रमाबाईनी आग्रह धरला. स्त्री शिक्षणाचे व स्त्री मुक्तीचे कार्य करण्यात पं. रमाबाईचे योगदान खूप मोठे आहे.

गोपाळ गणेश आगरकरांनी आपल्या साहित्यामधून, बालविवाह, जरठकुमारी विवाह, विधवा विवाह, घटस्फोट, बहुपत्नीत्व, संमतिवय यासारख्या समाजातील स्त्रियांविषयीच्या अनिष्ट रूढीविषयी प्रक्षोभ व्यक्त करून स्त्रियांमध्ये जागृती घडविण्याचा प्रयत्न केला. समाजाच्या उन्नतीसाठी पुरुषांप्रमाणेच स्त्रीला समान अधिकार मिळाले पाहिजेत अशी आग्रहाची भूमिका त्यांनी घेतली. स्त्रियांवर होणारा अन्याय जळजळीत शब्दांत समाजासमोर मांडला. स्त्रीवर अन्याय करणाऱ्या हिंदू धर्मातील दृष्ट प्रथांवर कोरडे ओढले. स्त्रीला सर्व हक्क मिळाले पाहिजेत म्हणून आग्रह धरला. या सर्वांचा परिणाम म्हणजे आगरकरांच्या काळापासून स्त्री जागृतीचे दुसरे पर्व सुरू झाले.

महर्षी कर्वे यांनी बालविवाहाच्या गंभीर समस्येने हेलावून जाऊन त्यांच्यासाठी हिंगणे स्त्री शिक्षण संस्था उभी केली. स्त्रियांचे स्वतंत्र विद्यापीठही स्थापन केले. व्यक्तिविकासाची संधी मिळताच कितीतरी क्षेत्रे स्त्रीला खुणवू लागली. आपल्या दुर्दम्य इच्छाशक्तीने तिने मोकळ्या अवकाशात झेप घेतली. तिला जखडून ठेवलेल्या साऱ्या रूढी-बंधनातून तिने सुटका करून घेतली.

१९५४-५५ या कळात हिंदू विवाह कायदा, हिंदू वारसा कायदा असे स्त्रीला उपयुक्त कायदे करण्यात आले. स्त्रीला मतदानाचा हक्क प्राप्त झाला. शिक्षण घेण्यास मुभा मिळाली. स्त्रियांना राजकारणात सहभागी होण्याचा अधिकार प्राप्त झाला. यावरून असे निदर्शनास येते की, १९६० पर्यंत स्त्री ही अंशत: आधुनिक होती.

१९६० नंतर नव्याने स्त्रिया स्वत:च्या अस्तित्वाचा विचार करू लागल्या. आपल्या हक्काविषयी त्या जागृत झाल्या.

भारतामध्ये तथागत: भगवान बुद्ध, महानुभाव संप्रदाय, वारकरी संप्रदाय, यांच्या काळापासून आधुनिकतेची बीजे दिसत असली तरी खऱ्या अर्थाने भारतामध्ये १९७५ नंतरच आधुनिकतेची सुरुवात झाली. "१९७५ हे वर्ष संपूर्ण आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून साजरे करण्यात आले".[५] तेव्हा पासून भारतामध्ये आधुनिक विचारांना चालना मिळाली असे विचार अश्विनी धोंगडे यांनी मांडले आहेत.

भारतामध्ये इंग्रजाचे आगमन झाले आणि मुद्रणकलेचा शोध लागला. अनेकजण लेखन करू लागले. साहित्यातून स्त्रीजीवनाचे पदर उलगडण्याचे महत्त्वाचे कार्य तत्कालीन लेखकांनी केले.

बाबा पद्मनजी यांनी 'यमुनापर्यटन' या कादंबरीतून हिंदू विधवांच्या दुस्थितीचे वर्णन केले आहे. ही कादंबरी प्रचारकी थाटाची असली तरी वस्तुस्थितीचे दर्शन घडविणारी आहे. समाजपरिवर्तनाबद्दलची उत्कट आकांक्षा त्यांच्या कादंबरीत दिसून येते.

१९ व्या शतकाच्या अखेरीस सामाजिक कादंबरीचे नवे युग सुरू झाले. तत्कालीन महाराष्ट्राचे कुटुंबदर्शन सर्वार्थाने जर कोणी घडविले असेल तर ते हरिभाऊ आपटे यांनी, एकत्र कुटुंबपद्धती, स्त्रीला कुटुंबात कुठलेच स्थान नाही, बालविवाह, बालवृद्ध विवाह केशवपनासारख्या रूढी विधवाचे लाचार जिणे या साऱ्याचे सूक्ष्म अवलोकन हरिभाऊंनी आपल्या 'पण लक्षात कोण घेतो' या कादंबरीत केले आहे. म्हणून त्यांना स्त्रियांचे कैवारी असे म्हटले जाते.

स्त्रीमुक्तीच्या दृष्टीने विचार करताना वामन मल्हार जोशींच्या १९३० साली प्रसिद्ध झालेल्या 'सुशीलेचा देव' ही नव्या स्त्रीचे दर्शन घडविणाऱ्या कादंबरीला विशेष महत्त्व आहे. या कादंबरीमधील सुशीला ही अधिक आधुनिक वाटते. तिला पतीच्या आचार-विचारांशी जुळते घेणे अशक्य झाल्यावर ती विवेकाने घर सोडते. स्त्रीजीवनाचे व्यापक दर्शन घडविणारे कादंबरीकार डॉ. केतकर हे होत. त्यांनी 'ब्राह्मणकन्या', 'विचक्षणा', 'भटक्या', 'गावसासू' या सगळ्याच कादंबऱ्यामधून स्त्रीजीवनाचाच विचार केला.

भारतामध्ये आधुनिकता खऱ्या अर्थाने १९६० नंतरच अवतरली. वैचारिक पातळीवर छाया दातार, विद्या बाळ, शांता किर्लोस्कर यांनी स्त्रियांच्या गुलामगिरीचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. ''छाया दातार यांनी कुटुंबसंस्था हे स्त्रीच्या सुरक्षिततेचे कोंदण की स्त्री स्वातंत्र्याची कबर असा प्रश्न उपस्थित करून कुटुंबसंस्थेला पर्याय शोधण्याची गरज असल्याचे सांगितले. स्त्रिया-स्त्रियांमध्ये भिंती निर्माण करण्याचे काम पुरुषसत्ताक कुटुंबसंस्थेने निर्माण केले आहे. त्यामुळे स्त्रीमुक्तीचा विचार करताना केवळ आर्थिक स्वावलंबनाचा विचार करून चालत नाही, तर कुटुंबसंस्थेला पर्याय शोधण्याचा, स्त्री - पुरुष संबंध वैयक्तिक पातळीवर, खाजगी क्षेत्रात कसे असावेत''.[६] असे विचार मांडून एक नवी दिशा दाखवून देतात.

भारतामध्ये १९६० साला पासूनच आधुनिकतेने चांगलाच जोर धरलेला दिसून येतो. आधुनिकतेचा या काळात सर्वत्र प्रसार होऊन स्त्रीमध्ये नवचैतन्य, आत्मविश्वास निर्माण होऊन सर्व स्त्रियांनी आपल्या हक्कांसाठी लढा दिला. याचा परिणाम आज भारतामध्ये स्त्री - पुरुष समानतेचे वारे वाहताना दिसू लागले. आत्मभानातून स्त्री आत्मशोध घेऊ लागली.

**आधुनिकतेचे नवे भान :**

अठराव्या, एकोणिसाव्या शतकात युरोपात आधुनिकतेच्या विचाराला सुरुवात झाली. कला, साहित्य, संस्कृती, समाजकारण, राजकारण यासारख्या क्षेत्रात आधुनिकतेच्या चर्चेला सुरुवात झाली. आधुनिकतेचा सर्व क्षेत्रात प्रसार होऊ लागला. १९व्या शतकात विज्ञानाचा प्रभाव मोठ्या प्रमाणात वाढला. विज्ञानाचे मानवी मनावर दूरगामी परिणाम होऊ लागले. समाजावर आधुनिकतेचा कोणता परिणाम होतो याचा चिकित्सकपणे विचार होऊ लागला.

रूढी, परंपरा, संकेत, रीतिरिवाज, देव-धर्म या सर्वच बाबींचा नव्याने विचार होऊ लागला. आधुनिकतेच्या अंगाने प्रत्येक परंपरा तपासून घ्यायला सुरुवात झाली. समाजाने निर्माण केलेली जुनी मूल्ये, लक्षणे यांच्या गुणवैशिष्ट्यांचा विचार आधुनिकतेत होऊ लागला. आधुनिकतेच्या अनेक घटकात-उपघटकात वर्तमान काळातील गेल्या अडीच शतकातील नव्या कल्पना, प्रतिमा, प्रतीकव्यवस्था, वर्तनबंध, मूल्यबंध, शैली याबाबतचा विचार होऊ लागला.

''विश्वातील सगळया घटनांचे, सगळ्या कार्यांचे कारण हे त्या घटनेतच त्या कार्यातच शोधले पाहिजे. असे एक नवे प्रमेय पुढे आले. प्रत्येक गोष्ट आपल्या अनुभवावर घासून-पुसूनच स्वीकारली पाहिजे. विश्वातील सगळे घटक आणि सगळ्या घटना एकातून दुसऱ्या अशा पद्धतीने जन्मल्या आहेत. त्या गतिशील आहेत. त्यांच्यात बदल होणे अनिवार्यच आहे. याचा अर्थ त्या उत्क्रांत होणार आहेत. यामुळे निसर्गात अविनाशी असं काहीच नाही; चिरंतन, चिरस्थायी असं काहीच नाही; ऊर्जा अविनाशी असली तरी तिचे रूप चिरस्थायी नाही. ती एका रूपातून दुसऱ्या रूपात बदलणारी गोष्ट आहे''[७] असे चंद्रकांत पाटील आधुनिकतेच्या बाबत म्हणतात.

प्रत्येक घटनेच्या संदर्भात वस्तुनिष्ठ भूमिका घेणे आधुनिकतेत महत्त्वाचे मानले गेले. ''इहवादी भूमिकेतूनच मानवी जीवनाचा विचार करणे आणि जगण्यावर नितांत श्रद्धा ठेवणे, जगणे समृद्ध करण्यासाठी भौतिक समृद्धीवर लक्ष केंद्रित करणे, मानवावर विलक्षण प्रेम करणे, व्यक्तींची प्रतिष्ठा

सर्वोच्च मानणे, आध्यात्मिक स्वायत्तता मानणे, वर्णविरहित, वंशविरहित, जातिविरहित, लिंगविरहित समतेवर आधारित समाजाच्या निर्मितीसाठी झगडणे, समानसंधीचा आग्रह धरणे, असतेपणा ऐवजी होणे किंवा सम्भवन याला महत्त्व देऊन त्या आधारे वास्तवाच्या खऱ्या स्वरूपाची कल्पना करणे किंवा खरे स्वरूप समजावून घेण्याचा प्रयत्न करणे. कायम नव्या नव्या मूल्यांचे सर्जन करणे आणि प्रमाणमूल्ये घासून पुसून घेऊनच मग स्वीकारणे.''[८] अशा प्रकारे आधुनिकतेमुळे मानवी समाजाला एक नवे भान प्राप्त झाले.

स्त्रियांनी आणि पुरुषांनी एकमेकांच्या विरोधात वर्तन न करणे, पुरुषांनी स्त्रियांचा द्वेष न करणे या बाबींना आधुनिकतेत विशेष महत्त्व प्राप्त झाले. स्त्री-पुरुष हे मुळात माणसेच आहेत. माणूस या मूल्यातून त्यांनी स्वत:कडे पाहायला शिकले पाहिजे. या गोष्टींना आधुनिकतेत महत्त्व प्राप्त झाले. स्त्री-पुरुष यांनी परस्परांचा आदर करायला शिकले पाहिजे. त्यातूनच त्यांच्या जीवनाला अर्थपूर्णता प्राप्त होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. स्त्री-पुरुष या मानवीय जोडीतूनच नवसमाज निर्मिती होत आहे. हे आधुनिकतेत जगाला शिकायला मिळाले.

स्त्रीशिवाय पुरुषाला पूर्णत्वच येऊ शकत नाही आणि पुरुषाशिवाय स्त्रीला पूर्णत्व येणार नाही. दोघेही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. दोघांनाही समान पातळीवर जीवन जगणे 'माणूस' म्हणून एकमेकांकडे पाहणे हे विशेष महत्त्वाचे आहे. स्त्रीने पॅन्ट-शर्ट घालणे, सिगारेट ओढणे, चित्रपटाला जाणे, पुरुषांच्या विरोधात बोलणे, बिअर पिणे, पत्ते खेळणे, गाडी चालविणे, फॅशन करणे म्हणजे आधुनिकता नव्हे किंवा नवऱ्याच्या विरोधात बंड पुकारणे किंवा स्त्रीवादी चळवळी करणे म्हणजे आधुनिकता नाही. तर आपले बाईपण झटकून आपण समाजशील माणूस असायला हवे असे आधुनिकतेत अभिप्रेत आहे. हेच आधुनिकतेचे नवे भान होय.

आधुनिकतेकडे अनेक बाजूंनी, वेगवेगळ्या दृष्टिकोणातून पाहता येते. अनेकजण आधुनिकतेकडे सकारात्मक नजरेतून पाहतात. अनेकांना आधुनिकतेची नेमकी समज आलेली दिसते. तर काही लोक तिथंपर्यंत विचारांच्या पातळीवर पोहचलेले दिसत नाहीत. हे प्रकर्षाने जाणवते. अनेकजण गोधंळात दिसतात. ते तसे असणे हे अपेक्षितही आहे. तरी इतकी वर्ष हा विषय अनेकविध माध्यमातून त्यांच्यापर्यंत कुठवर झिरपला आहे याचाही अंदाज येतो.

स्त्री-पुरुषांमध्ये समानतेचा अनुभव त्यांच्या वयोमानानुसार बदलत जातो. शाळकरी वयात आई मुलामुलीत भेदभाव करीत नाही. तिने घरातील ताटवाटी मांडणी करणे ते सायकलवरून दुकानातून एखादी वस्तू आणून देणे असा विचार करता मुलगामुलगी भेदभाव काही प्रमाणात कमी झालेला दिसतो. पण याच मुलामुलींची वये वाढत गेली की त्यांच्यावर काही बंधने लादली जातात. मुलींना कमी स्वातंत्र्य दिले जाते. मुलांना अधिक स्वातंत्र्य दिले जाते. उदा. गणपतीच्या दिवसात गणपतीची आरास बघायची तर रात्री जावे लागते. तेथे मुलीला जाता येत नाही. कारण टपोरी मुले तेथे असतात. टपोरी मुले सोडा पण कित्येकदा मित्रही बेभरवशाचे दिसतात. त्यामुळे सहजीवनातील स्त्रीमुक्ती, स्त्री-पुरुष समानता शेकडो मैल दूरच राहते. स्त्रीवर अनेक घटकाकडून अन्यायच होतो. एक तर स्त्री स्वत:च स्वत:वर करत असलेला अन्याय. दुसरे म्हणजे एक स्त्री दुसऱ्या स्त्रीच्या स्वातंत्र्यावर आणत असलेली गदा. तिसरे म्हणजे पुरुषांकडून स्त्रियांवर होणारा अन्याय, घातली जाणारी बंधने, दिली जाणारी दुय्यम वागणूक. अनेक स्त्रियांनाही असे वाटते की या परिस्थितीला स्वत: स्त्रीनेही बराच हातभार लावला आहे. स्वत:च स्वत:ला विरघळून टाकण्यात जोपर्यंत स्त्रीला भूषण वाटते अभिमान वाटतो, तो पर्यंत स्त्रीमुक्तीचे खरे संदर्भ तिला समजणारच नाहीत. स्वजाण विसरून त्याग करण्याच्या भूमिकेचे उदात्तीकरण होणे थांबवले पाहिजे. त्यासाठी व्यक्तिकेंद्री, स्वार्थी होण्याची भीती बाळगण्याची गरज नाही. कारण जेव्हा सामाजिक परिवर्तन होते. तेव्हा त्याबाबत आधी गैरसमजच जास्त पसरवले जातात. म्हणून स्वत:चा विचार करताना व्यक्तिमत्त्व फुलवताना 'हा आपला मूलभूत हक्क आहे' अशी धारणा मनात ठेवणे व न्यूनगंड निर्माण होऊ न देणे, अशीच आधुनिकतेची नवी मांडणी करता येईल.

'स्त्रीकडून स्त्रीवर अन्याय' या मानसिकतेचा फायदा पुरुष घेताना दिसतात किंबहुना स्त्रियाच आपल्या वागण्याचे हे हत्यार पुरुषाच्या हातात देतात. त्यातून एखादा सहृदयी माणूस वेगळं समंजस वागायला गेलातर त्याला 'ताटाखालचं मांजर', 'जोरूका गुलाम' अशा पदव्या देण्यात स्त्रियांच अग्रभागी असतात.

काही वेळा स्त्री स्त्रीत्वाचा अपमान करते कधी कधी स्त्रीकडूनच 'स्त्रीभ्रूणहत्येचे पातक घडते. आपली मुलगी या वासना, व्यभिचाराने बरबटलेल्या समाजात कशी घालायची असा विचार तर आजच्या माता करत नसतील ना? असाही विचार पुढे येतो. स्त्रियांच्या मनातील हीच असुरक्षितता दिसून येते की काय असेही दिसून येते. आपली सून आपल्या मुलावर

अधिकार गाजेवल, आपल्यापासून त्याला हिरावून नेईल की काय? तसेच स्त्रीने विशिष्ट चाकोरीबद्ध क्षेत्र, नोकरी व्यवसाय निवडून सुखी व्हावे असेही अनेकांना वाटते. आव्हानात्मक क्षेत्रात स्त्रीने प्रवेश करू नये असेही काहींना वाटते. कारण तिला तेथे पुरुषी अहंकार, वर्चस्व, दबावाचा सामना करावा लागेल. संघर्षाला सामारे जावे लागेल अशीही भावना दिसते. संघर्षापेक्षा बंधने बरी असेही अनेक स्त्रियांना वाटू लागते. स्वातंत्र्य हे जन्मजात प्रत्येक माणसाला असतेच. मुक्ती करावी लागते. ती स्वत:च स्वत:वर घातलेल्या बंधनातून. हजारो वर्षापासून स्त्रीला कायम दुय्यमस्थान दिले गेले. स्त्रीमुक्तीची व्याख्या - ''जर स्त्रीला माणूस म्हणून वागवले गेले. माणूस म्हणून प्रत्येक व्यक्तीला जे हक्क अधिकार आहेत ते तिला मिळणे, तिला स्वत:चे व्यक्तिमत्त्व विकसित करण्याची संधी, स्वातंत्र्य मिळणे ही असेल. तर स्त्रीने प्रथम स्वत:ला बाईच्या जोखडातून बाहेर काढून एक माणूस म्हणून स्वत:कडे बघितले पाहिजे. स्वत:चा मान स्वत:च ठेवला पाहिजे. आपल्या मतांविषयी तिला अभिमान हवा. आत्मविश्वास हवा. कुणी तिला गृहीत धरणार नाही याची तिने काळजी घ्यावी. तिच्या मनाचा आदर तिने केला नाही तर घरच्या-दारच्या अनेक निर्णय प्रक्रियेतून ती डावलली जाईल. या संदर्भात विभावरी शिरूरकर 'स्त्रीवादी आकलन' या पुस्तकात उषा शिंदे म्हणतात ''वंशसातत्य टिकविण्याचे एक साधन म्हणून आणि वंशाचा दिवा देणारी एक मादी म्हणूनच तिला कुटुंबसंस्थेत स्थान असते. स्थावर जंगमाच्या कुठल्याही महत्त्वाच्या आर्थिक व्यवहारात तिला निर्णायक स्थान नसते. राजकीय प्रक्रियेत आणि नोकरी व्यवसायात तिला आज थोडे बहुत जे स्थान मिळू लागले आहे, त्यातही तिला दीर्घकाळ झगडावे लागले आहे. 'चूल आणि मूल' यांच्या पलीकडे स्त्रीत्वाचे अस्मितामूल्य प्रस्थापित करण्याकरिता स्त्रियांना सतत झगडावे लागले आहे.''[१]

यावरून असे लक्षात येते, आजही घरातल्या कित्येक महत्त्वाच्या निर्णयात तिचे मत विचारात घेतले जात नाही. किंमती वस्तूची खरेदी-विक्री, घर घेणे, नातेवाईक व मित्रांशी होणारे व्यवहार, कर्ज घेणे, देणे मुलांच्या बाबतीतील सर्व बाबी, शाळा, शिक्षणाचे माध्यम, लग्न इ. अशा सर्व निर्णयात स्त्रीने आपल्या मताशी ठामपणे, खंबीरपणे उभे राहायला हवे. त्यासाठी तिचे आर्थिक स्वातंत्र्य महत्त्वाचे आहेच. पण सर्वांत कळीची गोष्ट आहे ती स्त्रीची स्वत:च्या स्वातंत्र्याच्या कल्पनांबद्दलची स्पष्टता. स्त्री सर्वदृष्ट्या स्वावलंबी असणे ही आधुनिकतेची स्त्रीच्या संदर्भातील कल्पना असेल तर आजकाल स्त्रिया जरी अनेक दृष्टीने स्वावलंबी झालेल्या दिसतात. पण प्रत्यक्षात ते

दिसत नाही. अनेक क्षेत्रात त्या प्रगती करत असल्यातरी वैचारिक पातळीवर त्या कुठे आहेत हे त्यांचे त्यांनीच तपासून घ्यावे लागेल आणि नव्याने ते आधुनिकतेत रूजेल.

मुलामुलींची लग्न जमताना स्त्रियांही शेवटी कशा चाकोरीतच अडकतात. अनेक स्त्रियांना आपला नवरा आपल्यापेक्षा जास्त शिकलेला, पदात, पगारात वरचढ असलेला हवा असतो. अनेक मुली स्वत:चा जोडीदार निवडताना आईवडिलांवर अवलंबून असतात. आपले निर्णय आपण घेण्याचे, ते स्वत:च्या जबाबदारीवर निभावून नेण्यांच बळ हवं, आत्मविश्वास हवा. तो किती स्त्रियांमध्ये दिसतो? असे सतत कोणावर तरी अवलंबून असणे आधुनिकतेच्या विरोधात आहे. एकीकडे आधुनिकतेची भाषा करताना आपल्याच घरात कामाला असणाऱ्या नोकर बायकांचे स्वातंत्र्य हिरावून घेणाऱ्याही स्त्रिया समाजात दिसून येतात.

'आपल्या भोवतीच्या सगळ्या बायकांशी माणुसकीने वागणे' अशी आधुनिकतेची साधी व्याख्या करता येईल. तरी सुद्धा प्रत्येक स्त्री वैयक्तिक पातळीवर ही गोष्ट पाळते का ? न्याय स्वातंत्र्य प्रत्येकाला हवे असते. पण तेच दुसऱ्याला द्यायची वेळ आली की अवघड जाते.

"स्त्रीला स्वत:च्या सामर्थ्याबद्दल विश्वास हवा. स्वत:ला मिळणाऱ्या दुय्यम स्थानाचा निषेध करण्याची मानसिक तयारी हवी, घर ते बाहेरचे जग या मोठ्या उडीत स्वत:चे सामर्थ्य व क्षमता नाकारणाऱ्या कोणत्याही घटकाशी दोन हात करण्याची तयारी हवी. तिने 'स्त्रीत्वाचा' वापर करून कोणतेही फायदे मिळवता कामा नयेत. तिच्याबद्दलच्या पूर्वग्रहदूषितेबद्दल, व दुजाभावाशी तडजोड नको, कारण तडजोड ही बहुतेकवेळा स्त्रीच्या बाजूने शरणागती असते. दुय्यम नागरिकत्वाची भूमिका टाकून 'समान' स्थान मिळविण्यासाठी तिनेच लढायला हवे. वेतन, संधी वागणूक इ. बाबतीत जिथे स्त्रियांवर अन्याय होतो तिथे स्त्रीनेच आवाज उठवायला हवा. पुरुषांशी माणूस म्हणून निकोप स्पर्धा हवी. स्त्री म्हणून नको. राजकारणातही गृहिणी म्हणून नव्हे तर नागरिक म्हणून तिला स्थान मिळायला हवे, घरात व समाजातही कमी महत्त्वाच्या जागा व निर्णय स्त्रियांवर सोपवून त्यांची तोंडे बंद करण्याच्या वृत्तीला कृतीने उत्तर द्यायला हवे"[१०] असे अश्विनी घोंगडे यांना वाटते.

या संदर्भात असे म्हणता येईल की, आधुनिकता म्हणजे स्त्रीचे व्यापक अर्थाने आर्थिक स्वातंत्र्य, आचारविचार स्वातंत्र्य, निर्णय स्वातंत्र्य, शिक्षण तसेच नोकरी-व्यवसायाचे, विकासाचे स्वातंत्र्य, अभिरुची स्वातंत्र्य, पाठ्यपुस्तकी शिक्षणाच्या पलीकडे जाऊन स्त्रीने आपल्या ज्ञानात वाढ करणे,

आपली विचारशक्ती वाढविणे, आपल्या आयुष्याचे निर्णय स्वत: घेणे, कुठल्याही वाईट परिस्थितीतून स्वबळावर बाहेर पडणे. आपले काही निर्णय जरी चुकीचे असले तरी घाबरून न जाता ती यशाची पहिली पायरी मानणे. घराबाहेर स्वत:चे काहीतरी स्वतंत्र विश्व उभे करणे ज्यातून स्त्रीचा आत्मविश्वास वाढेल आणि लग्नानंतरही लग्नापूर्वीचे सर्व उद्योग उपक्रम चालू ठेवणे म्हणजेच आधुनिकतेचे नवे भान आहे.

स्त्रीला स्वत:च्या अस्तित्वाची असणारी जाणीव व त्याद्वारे तिने आपला घडविलेला व्यक्तिमत्त्व विकास ही आहे. प्रत्येक व्यक्तीला स्वत:ची अशी एक स्पेस हवी असते. ती न मिळाल्यास तिची घुसमट व्हायला लागते. म्हणून या 'स्पेस' वर आक्रमण न होऊ देणे ही आधुनिकतेची एक बाजूच आहे. आधुनिकतेच्या बाबत सरळ साध्या शब्दात सांगायचे तर ज्या ज्या गोष्टी पुरुष करतात त्या गोष्टी स्त्रियांनी करण्यास मुभा असणे म्हणजेच स्त्री-पुरुष समानता होय.

लहानपणापासून स्त्रीला बाहेर अवेळी न फिरणे, घरकामात लक्ष देणे, नरमाईने बोलणे याबद्दलच्या वेळोवेळी सूचना करण्यात येतात. तर या गोष्टी मुलांना सुद्धा बंधनकारक झाल्या तर ती सुद्धा आधुनिकतेची पायरी म्हणता येईल. शिक्षणात, नोकरीत पदोन्नतीच्या वेळीही संधीत भेदभाव नसावा. लग्नानंतर घरातून, घरकामातून सुटका, स्वत:चा पैसा खर्च करण्याची मुभा, तिच्या मताचा आदर, निर्णयप्रक्रियेत समप्रमाणात सहभाग, स्वत:चे छंद - आवडी निवडी यासाठी पुरुषांप्रमाणे बाहेर जाण्याची, फिरण्याची मुभा असावी. पुरुषांच्या बरोबरीने स्वातंत्र्य हा आधुनिकतेचा नवा अर्थ आहे.

पुष्कळदा स्त्रियांना जरी समान अधिकार, इतर स्वातंत्र्य दिलेले असले तरीही बहुतांशी ते कागदोपत्री किंवा देखाव्याचे असतात. प्रत्यक्ष वास्तवात स्त्रीचा विचार फार कमी प्रमाणात होतो. त्यात आमुलाग्र बदल होणे आवश्यक आहे. काही प्रमाणात हा बदल झालेला दिसून येतो. आजही अनेक जातिजमातीत स्त्रीला खूप कमी स्वातंत्र्य दिले जाते. आधुनिकता म्हणजे नेमकं काय, याबाबत समाजात, स्त्रियांच्या मनातच संभ्रम आहे. स्त्रियांच्या भावविश्वात तसेच आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक बाबीवर स्वत:च्या मतानुसार काळानुरूप, सुसंगत व सारासार विचार करून घेतलेला अचूक निर्णय म्हणजे आधुनिकता होय.

मुळातच फसव्या पद्धतीने अंमलात आणलेल्या या संकल्पनेचे मूळ हे स्त्रियांच्या वैचारिक आणि सामाजिक दास्यत्व पत्करण्यात आहे. स्त्रीला मुक्ती देणे ही व्याख्याच त्यांचे आपल्या एकांगी आणि दांभिक समाजरचनेत,

समाजपरंपरेत असलेले हजारे वर्षाचे दुय्यमस्थान अधोरेखित करते. विशेषत: स्त्रियांचे क्रोमोझोम्स हे पुरुषापेक्षा कितीतरी वरच्या दर्जाचे असतात. हे आधुनिक बायोजेनेटिक्सने सिद्ध केल्यावर सुद्धा जर स्त्रियांना समान विचार, समान अस्तित्व, वैयक्तिक, सामाजिक, आर्थिक अशा अनेक अंगानी तिच्या स्वत:च्या अस्तित्वाला मान्यताच नव्हे तर त्याचा पुरस्कार आणि पाठपुरावा हे आधुनिकतेचे अंतिम उद्दिष्ट असणे आवश्यक आहे. 'आधुनिकता' या विषयाकडे एका वेगळ्या अंगाने पाहणे आवश्यक आहे.

स्त्रीमुक्ती म्हणजे स्त्रीला एक व्यक्ती म्हणून असलेले अधिकार, योग्य अयोग्याची जाण व भान ठेवून स्वत:च्या मनाप्रमाणे वागण्याची मुभा. पुष्कळ वेळा असे दिसते की, स्त्रीमुक्तीमध्ये महत्त्वाची अडचण स्त्रीच आहे. तिची स्वत:च्या स्वातंत्र्याची व्याख्या अजून स्पष्ट नाही. पुरुषांचा वरचढपणा अयोग्य असेल तिथे तो मान्य न करता स्त्रियांनी स्वत:ची मते परखडपणे मांडली पाहिजे.

"बौद्धिकदृष्टया स्त्री पुरुषांपेक्षा अजिबात कमी नाही. पण तिला बौद्धिक विकास करण्याची संधी दिली जात नव्हती. तरीही क्रित्येक स्त्रियांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. उदा. अगदी प्राचीन काळापासून जरी पाहिले तरी पुरुषांबरोबर तत्त्वज्ञानाच्या प्रांतात वाद घालणाऱ्या गार्गी, मैत्रयी आपल्याला दिसून येतात."[११]

स्त्रीला जर संधी प्राप्त झाली तर ती निश्चित प्रगती करू शकते. स्त्री-पुरुष शारीरिक-बौद्धिक बाजूत जरी समान असलेतरी स्त्री मात्र मानसिक क्षमतेत पुरुषापेक्षा वरचढ आहे हे यावरून सिद्ध होते.

"स्त्रियांचे स्वातंत्र्य म्हणजे पुरुषांची गुलामगिरी असे मानणे खुळेपणाचे ठरेल. स्त्रीमुक्ती म्हणजे स्त्रीपुरुषांना समान दर्जा होय. तो अनिष्ट व अनारोग्य स्पर्धेचा बाजार नसून, वैचारिक बैठक असलेली वाटचाल होय. स्वैरता कुरघोडी, माजोरीपणा म्हणजे स्वातंत्र्य नव्हे, तर समानता आणि स्वातंत्र्य ही एकमेकांपासून अलग न करता येणारी अंगे आहेत. हे लक्षात घेऊन केवळ स्त्रियांनीच नव्हे तर पुरुषांनीही ह्या स्त्रीमुक्ती लढयात भरीव कार्य करण्याची जिद्द बाळगली पाहिजे."[१२] असे डॉ. लीला पाटील स्पष्ट करतात.

यावरून मला असे वाटते की, आधुनिकता म्हणजे पुरुषापासून फारकत घेऊन स्वत:चा वेगळा प्रपंच थाटणे नव्हे तर दोघांनीही एकमेकांकडे माणूस म्हणून पाहणे जास्त इष्ट ठरेल. हेच आधुनिकतेचे नवे भान आहे.

'आधुनिकता' या विषयाकडे एका वेगळ्या अंगाने पाहणे आवश्यक आहे. नैसर्गिक नियामांनुसार अनंत काळ दबलेली ऊर्जा मोकळी झाली तर त्याचा एक प्रखर तारा होतो किंवा अणुस्फोट होतो. एकीकडे ग्रामीण अर्धविकसित भागांमध्ये स्त्रियांच्या गुणात्मक अस्तित्वात फारशी प्रगती नसतांना, विशिष्ट प्रगत समाजात, शहरात मात्र स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा गैरनिष्कर्षसुद्धा पाहायला मिळतो. उदाहरणच पाहायचे झाले तर कामाच्या ठिकाणी वैचारिक, शारीरिक, छळाला स्त्रियांना सामोरे जावे लागते यामुळे आधुनिकतेच्या मार्गाने जाणारा प्रवास काही पावले मागे येण्याची शक्यता असते.

तर आपण आपल्या स्त्रीपुरुष समानतेविषयीच्या संकल्पना, अपेक्षा त्या प्रत्यक्षात उतरवण्यासाठी मनात असलेल्या योजना सविस्तरपणे स्वीकारणे. प्रत्येक विचार समतेच्या पातळीवर करावा. स्त्रीपुरुष दोघांनाही एकमेकांना पूरक आचार-विचार करून परस्परांचे स्वातंत्र्य आनंदाने मान्य करून आपले जीवन सुंदर व समृद्ध करण्याचा जाणीवपूर्वक विचार करणे म्हणजेच आजची नव्याने मानलेली 'आधुनिकता' होय.

## संदर्भ आणि टीपा


१. छत्रे लता दिलीप : बौद्ध धर्मातील स्त्रीविचार. सुगावा प्रकाशन, पुणे ३० २००५ पृष्ठ क्र. ३८.
२. पाटील शोभा : स्त्रीवादी विचार आणि समीक्षेचा मागोवा : स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे-३०, २००७ पृष्ठ क्र. ४२.
३. भागवत विद्युत, रेगे शर्मिला, पलसाने वंदना 'स्त्री जीवनांची गुंतागुंत', प्रकाशन विकास अध्ययन केंद्र, मुंबई १९९४ - पृष्ठ क्र.१२.
४. शिंदे ताराबाई : महात्मा फुले पुरस्कृत स्त्री पुरुष : तुलना : मैत्रिका प्रकाशन वर्धा: २००२- पृष्ठ क्र. ७,९.
५. धोंगडे अश्विनी : स्त्रीवादी समीक्षा : स्वरूप आणि उपयोजन : दिलीपराज प्रकाशन, पुणे- १९९३- पृष्ठ क्र. ९२.
६. वरखेडे मंगला : स्त्रीवादी समीक्षा : संकल्पना व उपयोजन : का.स.वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे. १९९९ पृष्ठ ८,९.
७. पाटील चंद्रकांत : लेख- आधुनिकता, कादंबरी आणि काही मराठी लेखिका, अनुष्टुभ्- जाने-फेब्रु.२००१ पृष्ठ क्र. १४.
८. उ.नि. पाटील चंद्रकांत, पृष्ठ क्र. १५.
९. शिंदे उषा - विभावरी शिरूरकर यांचे वाङ्मय : स्त्रीवादी आकलन. अमृत प्रकाशन, नाशिक - १९९५ पृष्ठ क्र. १२
१०. धोंगडे अश्विनी : स्त्रीवादी समीक्षा : स्वरूप आणि उपयोजन : दिलीपराज प्रकाशन, पुणे- १९९३- पृष्ठ क्र. २२
११. इंगोले प्रतिमा : स्त्रीचे भावविश्व आणि आधुनिकता : सोनल प्रकाशन, अमरावती-२९९८ पृष्ठ क्र. १२.
१२. पाटील लीला : भारतीय स्त्रीजीवन : मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे १९९०.पृष्ठ क्र. १७०

# अरुण साधू यांच्या कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखा

प्रा. संदीप घोडे

एकोणीसशे सत्तरच्या दशकातील एक महत्त्वाचे प्रभावी आणि लोकप्रिय कादंबरीकार म्हणून अरुण साधूंना ओळखले जाते. मूळचे विज्ञान शाखेचे पदवीधर असलेल्या अरुण साधूंनी १९६२ पासून १९८७ पर्यंत विविध मराठी आणि इंग्रजी वृत्तपत्रांतून काम केले असल्याने वर्तमान राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक घडामोडींचे, त्यामागे कार्यरत असणाऱ्या व्यक्ती आणि त्यांच्या प्रेरणांचे, हितसंबंधाचे, बऱ्यावाईट हेतूंचे आतून बाहेरून निरीक्षण करण्याची संधी त्यांना मिळू शकली, त्यातून मिळालेल्या अनुभव सामग्रीचा उपयोग त्यांनी आपल्या लेखनासाठी मुक्तपणे केला आहे.

अरुण साधू यांच्या कादंबरीत स्त्री जीवनाचे विविधांगी चित्रण येते. त्यांच्या कादंबरीतील स्त्री ही प्रामुख्याने नागरी जीवनमान जगणारी स्त्री आहे. त्यामुळे साधूंची कादंबरी महानगरीय जीवनातल्या उच्चवर्गीय समाजव्यवस्थेतील स्त्रीविषयक जीवन जाणिवांच्या वेगवेगळ्या पैलूंचे दर्शन घडविते.

अरुण साधू यांच्या कादंबरीत उच्चमध्यवर्गीय स्त्रीजीवनाचे चित्रण मोठ्या प्रमाणात येते. ''मुंबई दिनांक'' मधील मिसेस खान, विनिता देशमुख ''सिंहासन'' मधील कमला दाभाडे, डोरोथी जाधव, नीलावती पठारे, ''त्रिशंकू'' तील ताई, ''शोधयात्रा''तील शशी अशा काही स्त्रियांचा या संदर्भात निर्देश करता येण्यासारखा आहे.

या सर्व स्त्रियांची आर्थिक परिस्थिती उंचावलेली आहे. त्यामुळे सर्वसामान्य संसारी स्त्रियांना भेडसावणाऱ्या समस्या या स्त्रियांच्या जीवनात निर्माण होत नाहीत. किंबहुना आर्थिक समस्यांपासून या स्त्रिया कितीतरी योजने दूर आहेत. पण म्हणून या सर्वच स्त्रियांचे जीवन कोणत्या ना कोणत्यातरी समस्यांनी ग्रासलेले आहे. त्यामुळे आर्थिक सुबत्ता असूनही या स्त्रिया वैफल्यग्रस्त जीवन जगताना दिसतात. त्यांचे मन असमाधानाने भरलेले आहे. त्यामुळे त्याही अंतिमत: प्रवाहप्रतित झालेल्या दिसतात.

या स्त्रियांच्या जीवनात ज्या समस्या निर्माण होतात त्यामागे त्यांची स्वत:ची महत्त्वाकांक्षा कारणीभूत ठरते.

''सिंहासन'' मधील कमला दाभाडेला राजकीय महत्त्वाकांक्षा आहे. तिचा सासरा (विश्वासराव दाभाडे) अर्थमंत्री आहे. त्यांच्यावर आपल्या सौंदर्याची भूरळ पाडून ती आपली राजकीय आकांक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न करते. पण तिच्या अशा बदफैली वृत्तीमुळे तिचा नवरा (वसंतराव दाभाडे) तिच्यापासून दुरावतो. साहजिकच तिच्याही संसारात वादळे निर्माण झालेली आहेत. कौटुंबिक सुखापासून ती वंचित आहे. याच कादंबरीतील मनोरमा, नीलावती पठारे या स्त्रियाही अशाच समस्यांनी ग्रासलेल्या आहेत. पतीकडून कामपूर्ती होत नसल्यामुळे याही स्त्रिया सैल वर्तनाच्या बनलेल्या आहेत.

''त्रिशंकू'' तील ताईंना वैधव्याचे दु:ख भोगावे लागते. त्यावर उपाय म्हणून त्या समाजकार्यात स्वत:ला गुंतवून घेतात. मनाला विरंगुळा शोधतात. वरकरणी त्यांचे आयुष्य सुखासमाधानाचे दिसत असले तरी त्याही मनातून दु:खी आहेत. जीवनातला वसंत निघून गेल्यामुळे त्यांचेही जगणे नीरस बनलेले आहे. या अतृप्तीची सल त्यांना छळते.

वैशाली पंडित घटस्फोटीत आहे. तिला कुणाची गुलामगिरी नको आहे. स्वच्छंदी जगण्याच्या हव्यासापोटी ती स्वत:चा संसार मोडते. ''शोधयात्रा'' तील शशी आई-वडिलांच्या प्रेमाला मुकलेली आहे. वसुंधराचा प्रेमभंग झालेला आहे. त्यामुळे त्यांच्याही जीवनात वादळे निर्माण झालेली आहेत.

अरुण साधू यांच्या कादंबऱ्यांतील उच्चवर्गीय स्त्रियांची ही प्रातिनिधिक उदाहरणे बघितली तर असे दिसते की या सर्वच स्त्रिया वैफल्यग्रस्त आहे. आर्थिक सुबत्तेमुळे येणारी सुखे त्यांच्या दारात आहेत.

पण त्या सुखांचा त्यांना उपभोग घेता येत नाही. कारण त्यांच्या व्यक्तिगत आकांशा त्यांना स्वस्थ बसू देत नाहीत.

यासर्वच प्रमुख स्त्री पात्रांच्या जीवनकथेत एक महत्त्वाचे समान सूत्र दिसते. ते म्हणजे त्यांच्या जीवनातील अपूर्णता व अशांतता हे होय. यातील बहुतेक स्त्रिया या जीवनात लौकिक अर्थाने बघितल्या तर यशस्वी आहेत. पण तरीही त्या अशांत आहे. समाधानाचा, बेदरकारपणाचा त्या आव आणतात. पण अंतर्यामी या सर्व स्त्रिया तळमळताना, झुरताना दिसतात. कोणत्या ना कोणत्यातरी एका लोभापायी त्या अध:पतीत झालेल्या आहेत.

अरुण साधू यांच्या कादंबरीत मध्यमवर्गीय स्त्रियांचे येणारे चित्रणही लक्षणीय आणि अर्थपूर्ण आहे. उच्चमध्यमर्गीय स्त्रियांच्या तुलनेत मध्यमर्गीय

स्त्रियांच्या जीवनात एक मूलभूत फरक आहे. यातील बहुतेक स्त्रिया नोकरी करणाऱ्या असून नुकत्याच त्या कुठे आपल्या आयुष्याची आर्थिक घडी बसवू पाहात आहेत.

या वर्गात ''त्रिशंकू'' मधील वैशाली पंडित, इंदू कोलटकर, ''मुंबई दिनांक'' मधील शालन केळकर, नीला कास्टा, ''शोधयात्रा'' तील लोर्ना, ''तडजोड'' तील पल्लवी शिरवाडकर, ''सिंहासन'' मधील लीला मर्कळे अशा काही नोकरी करणाऱ्या स्त्रियांचा समावेश होतो.

सुनंदा पानिटकर (मुंबई दिनांक), मिसेस प्रधानबाई (त्रिशंकू), सुमित्रा कुलकर्णी (बहिष्कृत), वृंदा, प्रतिक्षा (तडजोड) सीमा मुंगळे (मुखवटा) अशा काही स्त्रियांचाही समावेश याच वर्गात करता येण्यासारखा आहे. रूढ अर्थाने या स्त्रिया नोकरी करीत नाहीत. मात्र त्यांचे नवरे नोकरी करणारे आहेत. त्यामुळे त्यांचेही जगणे मध्यमवर्गीय जाणिवांनी युक्त असेच आहे.

या सर्वच स्त्रियांच्या प्रातिनिधिक चित्रणातून अरुण साधूंनी मध्यमवर्गीय स्त्रियांच्या जीवनातील अस्वस्थता नागर पार्श्वभूमीवर मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. या स्त्रियांचे जगणे कनिष्ठ वर्गीय स्त्रियांच्या तुलनेत काहीसे पुढारलेले - उंचावलेले असले तरी ते मूलत: फारसे भिन्न नाहीच. त्यामुळे रोजच्या जीवनात त्यांनाही वेगवेगळे प्रश्न भेडसावतात. त्यांच्याही मूल्यांची अंतिमत: अधांतरीच अवस्था झालेली दिसते.

या सर्वच प्रमुख स्त्रियांच्या जीवनगाथा बघितल्या तर त्या सर्वच स्त्रिया आपापल्या मुळापासून तुटलेल्या मध्यमवर्गीय व्यक्तिरेखा आहेत. ही अवस्था केवळ या स्त्रियांचीच नाही, तर एकूणच मध्यमवर्गीयांचीच (पुरुष आणि स्त्रिया या दोघांचीही) ही अवस्था आहे.

वास्तविक या स्त्रियांच्या वाट्याला येणारे आयुष्य त्या स्वत: समजतात त्याप्रमाणे संभ्रमावस्थेचे नक्कीच नाही. कारण त्यांना थोड्याफार प्रमाणात का असेना, परंतु आर्थिक स्थैर्य आहेत. मात्र ते पुरेसे नाही अशी त्यांची स्वत:ची समजूत आहे. खरे म्हणजे तो त्यांचा स्वत:चा न्यूनगंड आहे. कारण अस्वस्थ, असमाधानी होण्यासारखे त्यांच्या आयुष्यात फारसे काही घडत नाही. तरीही त्या अस्वस्थ, असमाधानी आहेत.

मात्र कादंबरीत येणाऱ्या या स्त्रियाच ह्या अवस्थेच्या बळी नाहीत. त्या ज्या मध्यमवर्गातून आल्यात, त्या संपूर्ण मध्यमवर्गाच्या जिण्यातच अशी व्यवस्था आहे. सारा मध्यमवर्गच आज अशा अवस्थेचा बनलेली आहे. त्याला स्वत:चा चेहरा नाही. किंवा सहअनुभती व्यक्त करावी अशी स्वत:ची जागा नाही. त्यामुळे या स्त्रिया एकट्या - एकलकोंड्या बनलेल्या आहेत.

साधू यांच्या कादंबरीत कनिष्ठ वर्गीय स्त्रीचेही मोठ्या प्रमाणात चित्रण आले आहे. शहरी भागात झोपडपट्टीत राहणारी स्त्री, वेश्या व्यवसाय करणारी स्त्री आणि ग्रामीण भागातील शेतमजुरी करणारी स्त्री अशा स्त्रियांचा कनिष्ठ वर्गीय स्त्रियांमध्ये समावेश करता येतो.

''मुंबई दिनांक'' मधील सॅली, मंजुळाबाई ''सिंहासन'' मधील ईला खुरमांडे, शेवंती गाडेकर, मथुरा, ''बहिष्कृत'' मधील देशमुखबाई, सुमित्रा कुलकर्णी, ''शापित'' मधील नानी, सारजा, रुक्मिणी, ''शोधयात्रा'' मधील रामी, ''तडजोड'' मधील सुमन शिंदे, वेणुबाई आणि ''मुखवटा'' मधील नानी, शोभा, भुलीबाई, शांताबाई अशा काही स्त्रियांचा येथे प्रातिनिधिक म्हणून उल्लेख करता येण्यासारखा आहे.

या सर्वच स्त्रियांचे जीवन भव्य आणि झगमगीत नसले तरीही ते मानवी जीवनच आहे. अटळ विनाश हा त्याचा स्थायिभाव आहे. पोटाच्या रूपाने उभ्या राहिलेल्या प्रश्नांभोवती या स्त्रियांचा मुख्य झगडा सुरू होतो. प्रतिकूल परिस्थिती त्यांच्या वेदनेला बळ देते. पुरुषी भोगवासनेलाही याच स्त्रिया मोठ्या प्रमाणावर बळी पडलेल्या आहेत. मथुरा, शेवंता गाडेकर (सिंहासन), यांच्या चित्रणातून साधूंनी कनिष्ठवर्गीय स्त्रियांच्या दु:खाला वाचा फोडली आहे.

अरूण साधू हे सामाजिक बांधिलकी मानणारे कादंबरीकार आहेत. त्यांचा पिंड समाजचिंतकाचा आहे. ते स्वत: दलितेतर समाजातील असले तरी दलितांच्या जाणीव-नेणिवांशीही त्यांचे जवळचे नाते आहे. म्हणूनच ते दलितेतरांबरोबरच दलित समाजातील स्त्रियांच्या स्थितिगतीचाही सहजपणे वेध घेऊ शकतात. (''त्रिशंकू'', ''बहिस्कृत'') समाजाचा एक अविभाज्य घटक या नात्याने समाजातील या स्त्रियांची सुख-दु:खे, त्यांच्या व्यथा- वेदना, अगतिकता, लाचारी साधूंना चांगलीच अवगत आहे. सामाजिक प्रश्नांना वाचा फोडण्याची क्षमता साधूंमध्ये सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेमुळेच निर्माण झालेली आहे.

सामाजिक बांधिलकीमुळे अरूण साधूंच्या चिंतनाला एक निश्चित दिशा मिळाली आहे. ती त्यांच्या कादंबरीतून ठळकपणे प्रत्ययास येते. समाजचिंतकाची विचारशीलता आणि कलावंताची सहृदयता यांचा सुरेख समन्वय त्यांच्या व्यक्तिमत्त्वास झालेला आहे. ज्वलंत सामाजिक प्रश्नांची ते आपल्या कादंबऱ्यांतून सर्वांगीण मीमांसा करतात. जीवनाचे दाहक वास्तव त्यांच्या कादंबऱ्यांतून प्रकटते. व्यक्तिगत दु:ख हे समाजाचेही दु:ख असते.

याची जाणीव साधूंनाही आहे. म्हणूनच ते या स्त्रियांच्या दु:खाची कारण परंपरा शोधण्यासाठी प्रवृत्त होतात.

साधूंच्या कादंबरीत पारंपरिक जीवन जगणाऱ्या स्त्रिया व परंपरेला छेद देणाऱ्या स्त्रिया असे दोन वर्ग दिसून येतात. त्यापैकी यातील पारंपरिक जीवन जगणाऱ्या स्त्रिया पुरुषसत्ताक जीवनपद्धतीत स्वत्व गमावून बसलेल्या, पुरुषी अहंकाराने दबून गेलेल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या वाट्याला पारंपरिक जीवन येते. त्यातील बहुतेक जीवनात खालावलेल्या असून त्या पुरुषीवर्चस्वाच्या बळी ठरलेल्या दिसतात.

साधूंच्या कादंबरीत नागरी जीवनाबरोबरच खेड्यातील ग्रामीण जीवनाचेही चित्रण येते. खेड्यात शेतकरी व शेतमजूर असे दोन कृषिनिष्ठ घटक आहेत. यातील शेतमजूर या घटकावर साधूंची कादंबरी अधिक लक्ष केंद्रित करते. त्यामुळे त्यांच्या कादंबरीत शेतमजूर स्त्रियांचे जगण्याचे चित्रण येते. या स्त्रिया दारिद्र्याने गांजलेल्या असून पुरुषी भोगवासनेला बळी पडतात. त्यादृष्टीने ''सिंहासन'' कादंबरीतील महादू गाडेकर या शेतमजुराच्या कुटुंबातील शेवंता गाडेकर या शेतमजूर स्त्रीच्या आयुष्याची झालेली परवड पाहण्यासारखी आहे.

प्रियकर-प्रेयसी मधील परस्परसंबंधाची अनेक रूपेही साधूंच्या कादंबरीत दिसतात. त्यांच्या कादंबरीतील प्रेयसीची भूमिका निभावणारी स्त्री ही प्रामुख्याने प्रणय करणारी, प्रियकराची वाट पाहणारी, त्याच्या भेटीसाठी व्याकूळ होणारी, अशा रोमँटिक वृत्तीने जगणारी आहे. ती स्त्री-पुरुष नातेसंबंधाचे विविधांगी दर्शन घडविते.

आपल्या कादंबऱ्यांतील स्त्रीपात्रांना अरुण साधू त्यांच्या रूपागुणांचा निर्देश करून आकार तर देतातच. शिवाय प्रसंगी संवाद, स्वगत, भाष्यातूनही त्या पात्राला अधिक वास्तव रूप देतात. अशा अनेक तपशीलांतून आणि वर्णनातून उभं राहिलेलं त्यांच्या कादंबरीतील स्त्री पात्रं अधिक रेखीव आणि जिवंत भासतं.

पात्रांची सूचक स्वभाववैशिष्ट्ये नोंदवून त्याच्या हातून घडणाऱ्या कृतींना अधिक बळकटी देणे हे अरुण साधूंच्या व्यक्तिरेखाटनाचे एक ठळक वैशिष्ट्य दिसून येते. शिवाय त्या स्त्री पात्राची एखादी, लकब, एखादा मनोव्यापार, चेहऱ्या-मोहऱ्याचा एखादा विशेष, शरीराची ठेवण याचाही ते अचूक निर्देश करतात. त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यांतील स्त्रीपात्रांना स्वत:चे असे खास व्यक्तिमत्त्व लाभते.

अरुण साधूंच्या कादंबऱ्यांमधील एकूणच स्त्री वर्णनांना महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले दिसून येते. वेगवेगळ्या समाजस्तरातील, वेगवेगळ्या वृत्ती-प्रवृत्तीच्या स्त्रिया अरुण साधूंच्या कादंबऱ्यात कथानकाच्या संदर्भात महत्त्वाच्या भूमिका पार पाडताना दिसतात. या सर्वच स्त्रियांची व्यक्तिचित्रणे अरुण साधूंनी कौशल्याने केलेली आहेत.

व्यक्ती आणि तिचे भावविश्व हे अरुण साधूंच्या कादंबरीचे केंद्र आहे. व्यक्तिव्यक्तींमधील सामाजिक, मानसिक नाती व स्थित्यंतराच्या प्रक्रियेचा शोध ते त्यांच्या कादंबऱ्यांमधून घेतात. त्यांच्या कादंबऱ्यातील सर्वच लहान-मोठ्या व्यक्तिरेखांना विशिष्ट अर्थाने एक वलय चिकटलेले असते. ही माणसं आपल्या वर्तनासह कादंबऱ्यांत वावरतात. साधू यांच्या वर्तनाची विशिष्ट तऱ्हा दाखवून त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे ठळक चित्र आपल्यापुढे उभे करतात. असे प्रत्येक पात्राचे वर्णन बारकाव्यासह केल्यामुळे त्या पात्राच्या हातून घडणाऱ्या घटितांचा अन्वयार्थ लावण्यास मदत होते.

समाजाच्या निरनिराळ्या स्तरातील परस्परविरोधी आणि परस्परसंवादी अशा स्त्रियांचे चित्रण साधूंच्या कादंबऱ्यात येते. त्यांच्या जगण्या-भोगण्याच्या तऱ्हा वेगवेगळ्या आहेत. त्यांच्या नैतिकतेच्या व मूल्यव्यवस्थेविषयीच्या संकल्पनाही वेगवेगळ्या आहेत. व्यक्ती जीवनाच्या निरनिराळ्या अवस्थांचे प्रकटीकरण केले गेल्यामुळे साधूंच्या कादंबऱ्यात समाजाच्या व्यापक पटाचे वास्तवनिष्ठ चित्रण येते.

आपल्या कादंबऱ्यामधून तरुण स्त्रियांची एक प्रदीर्घ अनुभव यात्रा साधूंनी मोठ्या कौशल्याने चित्रित केली आहे. (''बहिष्कृत'' सुमित्रा कुलकर्णी, ''त्रिशंकू'' वैशाली पंडित, इंदू कोलटकर, ''तडतोड'' पल्लवी भांडारकर, ''शोधयात्रा'' शशी) या स्त्रियांचे जीवन जगण्याचे पर्याय निरनिराळे आहेत. त्यांच्या जीवनाचे भव्य अनुभव पट साधू विस्ताराने मांडतात. व्यक्ती आणि समष्टीच्या प्रदीर्घ चिंतनाबरोबर मानवी मूल्यांचीही साधू कठोर चिकित्सा करतात. आध्यात्मिक चिंतना बरोबरच आदिम भावनांना आवाहन करण्याची साधूंची हातोटीही विलक्षण आहे. समाजाचे सडलेपण या स्त्रिया उघड करतात.

या स्त्रियांचे स्वतंत्र असे समांतर मार्ग, सामाजिक चालीरीतीविरुद्ध त्यांनी पुकारलेले उघड व मानसिक बंड, त्यांची नैतिकता, प्रामाणिकपणा आदिमुळे साधूंच्या कादंबऱ्यांना आशयाचे व्यापक परिमाण लाभते. साधूंनी आपल्या कादंबऱ्यातून वैफलग्रस्त, नैतिक, अनैतिक मार्गाने जाणाऱ्या सामान्य स्त्रियांचे जीवन चित्रण ज्या वास्तव शैलीने घडविले आहे ते लक्षणीय आहे. साधूंच्या कादंबऱ्या लोकप्रिय होण्याचे हे एक महत्त्वाचे कारण आहे.

आपल्या कादंबऱ्यामधून अरुण साधू स्त्रियांच्या जीवनानुभवाची नैतिक गाथा मांडतात. या स्त्रिया लेखकाच्या नैतिकतेचीही जाणीव करून देतात. विशेष: तरुण स्त्रियांच्या जीवनजाणिवेचा वास्तव पातळीवरील आलेख साधूंच्या कादंबऱ्या समर्थपणे उभा करतात. साधूंच्या कादंबऱ्यातील स्त्रिया अनेक मूलभूत प्रश्न निर्माण करतात. हे सर्व प्रश्न मानवी जीवनाशी निगडित आहेत. अनेक प्रश्न रोजच्या जीवनाशी संबंधित आहेत. काही प्रश्न आध्यात्मिक क्षेत्रातले आहेत. या सर्व प्रश्नांचं वास्तव रूप साधूंच्या कादंबऱ्यातील स्त्रिया उभे करतात.

मनोविश्लेषण आणि संज्ञाप्रवाह यांचा संयुक्त वापर करून अरुण साधू आपल्या कादंबऱ्यातील स्त्री व्यक्तिरेखांचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करतात. त्यासाठी रचनेचे वेगवेगळे प्रयोगही त्यांनी हाताळलेले आहेत. स्वप्नरंजन, दिवास्वप्ने, नेणिवेच्या पातळीवरील सुप्त जाणिवा, अमूर्त विचार - कृती, भाव-भावना इत्यादी अनेक बाबी त्यांच्या कादंबरीतून आविष्कृत होतात.

साधूंच्या कादंबऱ्यातील तरुण स्त्रिया आदर्श मूल्यांची सुरू झालेली पडझड ठळकपणे अधोरेखित करतात. सभोवतालचा सामाजिक जीवन - व्यवहार पाहून निरर्थकतेची भावना त्यांच्या मनात निर्माण होते. या स्त्रिया वीस ते तीस या वयोगटातील आहेत. या दरम्यानच्या काळात त्यांच्या वाट्याला जी माणसं आणि अनुभव येतात, त्याचा वास्तवनिष्ठ आलेख साधूंच्या कादंबऱ्यातून व्यक्त होतो. मानवी जीवनाच्या प्रेरणाशक्तीचे व चैतन्यशक्तीचे एक प्रमुख केंद्र म्हणून तरुणांकडे पाहिले जाते. अरुण साधूंनाही ह्याचे भान आहे. या सामाजिक वास्तवाची प्रखर जाणीव ठेवूनच साधूंनी आपल्या कादंबऱ्यातील तरुण स्त्रियांना आखीव-रेखीव रूप दिलेले आहे.

पात्रांच्या अंतर्मनातील सूक्ष्म विरोध व नाजूक स्पंदने अरुण साधू हळुवारपणे उलगडून दाखवितात. अंतर्मनाबरोबरच पात्रांच्या बाह्य संघर्षाला मूर्तरूप देत जीवनातील करुण गंभीर, नाट्यपूर्ण, मिष्किल, हळुवार, साधेसोपे, गुंतागुंतीचे अनुभवही समर्थपणे व्यक्त करतात. या विरोधलयीत माणसाचा एकटेपणा, रितेपणा, अगतिकता व दुरावलेपणाही तितक्याच समर्थपणे उभा करतात.

उच्च नैतिक मूल्यांसाठी सामाजिक बंडखोरी करणारे तरुण नायक साधूंच्या कादंबऱ्यात जसे तुलनेने अधिक आढळतात, तशा स्त्रिया आढळत नाहीत. उलट प्रियकराच्या आयुष्यातल्या दुबळ्या जागा भरून काढण्यासाठी स्वतःच्या सौंदर्याचा साधन म्हणून वापर करणारी स्त्री साधूंच्या कादंबऱ्यात मोठ्या संख्येने दिसते. (''तडजोड'' मधील पल्लवी, ''त्रिशंकू'' मधील वैशाली

पंडित, ''शापित'' मधील रुक्मिणी, ''मुंबई दिनांक'' मधील लीना, ''स्फोट'' मधील वसुंधरा, ''सिंहासन'' मधील कमला, ''मुखवटा'' मधील सीमा) अशा स्त्रियांचे शरीर भोगमूल्यातून जन्मलेल्या पुरुष वासनायुक्त सौंदर्यदृष्टीतून तपशीलवार वर्णन करण्यावर साधू अधिक भर देतात. त्यामुळे साधूंची कादंबरी काहीसी रंजकतेकडे झुकते.

विविधतेबरोबरच स्त्री व्यक्तिमत्त्वाविषयी अधिक सखोल जाणीव साधूंच्या कादंबऱ्या प्रकट करतात. नेणिवेतील तरल, सूक्ष्म जाणिवांना छेद देत साधूंनी आपल्या कादंबऱ्यातील स्त्री व्यक्तिरेखांना एक नवे परिमाण प्राप्त करून दिलेले आहे. एकाच वेळी परस्परविरोधी आणि परस्पर संलग्न असलेल्या अनेक भिन्न आणि असंबद्ध वाटणाऱ्या पातळ्यांवर वावरत असलेल्या गुंतागुंतीच्या आणि अजाणतेपणात ज्यांची पाळेमुळे खोल गेलेली आहेत. अशा अनेकविध प्रवृत्ती आणि प्रतिक्रिया यातून माणसांचे एकसंध व्यक्तिमत्त्व घडते. या जाणिवेचा ठळक प्रत्यय साधूंची स्त्री पात्रे आणून देतात. साधूंच्या कादंबऱ्यातील स्त्री व्यक्तिदर्शनाचा हा ठळक विशेष होय.

# विभाग 'ए'
# संज्ञाप्रवाह

# 'संज्ञाप्रवाहा'ची पार्श्वभूमी व संकल्पना

प्रा. डॉ. अनिल उगले

**१. मानसशास्त्राचा प्रभाव :-**

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मानसशास्त्रामध्ये काही महत्त्वाचे शोध लागले. त्यापैकी महत्त्वाचा शोध म्हणजे फ्रॉईडच्या मनोगाहन शास्त्राचा (Psycho-analysis) होय. ''शास्त्रीय वाङ्मयामध्ये 'मनोगाहन' हा पारिभाषिक शब्द मानसशास्त्रात फ्राईडने निर्माण केलेल्या विशिष्ट पंथाला उद्देशून वापरला जातो. येथे 'मनोगाहनशास्त्र' हा शब्द याच पारिभाषिक अर्थाने वापरला आहे''[१] १८८० च्या सुमारास 'हिस्टेरिया (Hysteria) या रोगावर इलाज शोधताना व्हिएन्ना येथील डॉक्टर जोसेफ ब्रायर व फ्रॉईड यांना मनोगाहन शास्त्राचा शोध लागला. विस्मरण पावलेल्या पूर्वीच्या तीव्र भावना, आठवणी यांचा हिस्टेरिया झालेल्या रोग्याला अनुभव करून दिल्यास रोगी बरा होतो असा शोध या दोघांनी लावला. फ्रॉईड व ब्रायर यांनी १८९५ साली 'Studies in Hysteria' नावाचे मनोगाहनाविषयी पहिले पुस्तक प्रसिद्ध केले.

१९०२ पासून ॲडलर आणि युंग हे शास्त्रज्ञ फ्रॉइडला येऊन मिळाले. त्यांनी एकत्र येऊन 'सायको ॲनॅलिटिकल काँग्रेस' (Psycho-analytical congress) व 'सायको ॲनॅलिटिकल असोसिएशन' (psycho-analytical Association) या संस्था स्थापन केल्या तेव्हापासून मनोविश्लेषणशास्त्राची खूप वाढ झाली. पुढे ॲडलर व युंग यांचा फ्रॉईडशी मतभेद झाला आणि त्यांनी पुढे आपापले निराळे पंथ स्थापन केले''२ त्यामुळेच फ्रॉईडच्या पुढील संशोधनाला चालना मिळाली.

फ्रॉईडचा महत्त्वाचा शोध म्हणजे बोध (नेणीवयुक्त) मनाचा होय. फ्रॉईडने मनाचे तीन भाग केले आहेत. १. बोध conscious २. उपबोध Pre-conscious ३. अबोध unconscious यालाच नेणीव असे म्हणतात. फ्राईडने असे म्हटले आहे की, ''ज्या गोष्टीची मनाला प्रत्यक्ष जाणीव होत

असते. त्या गोष्टी 'जाणिवे'च्या कप्प्यात (The conscious) असतात; विसर पडल्यामुळे ज्याची मनाला प्रत्यक्ष जाणीव होत नाही; पण त्या गोष्टी थोड्याफार प्रयत्नाने मनास आठवतात त्या 'सुप्त जाणिवेत' (The pre-conscious) असतात. ज्या गोष्टीची जाणीव तर नसतेच शिवाय कितीही प्रयत्न केला तरी ज्या विसरलेल्या गोष्टी जाणिवेत आणंता येत नाहीत त्या नेणीव (The unconscious) या तिसऱ्या कप्प्यात असतात''३ या तीन भागानुसार मनाचे कार्य चालते.

अबोध मनाला 'अंतर्मन' किंवा 'असंज्ञ' असेही शब्द वापरले जातात. ना.ग. जोशी यांनी असे म्हटले आहे की, ''फ्रॉईडने मानसिक व्यक्तित्वाची शरीररचना (Anotomy of the mental personality - New Introductory Lectures p.p. 100-101) समजावून देताना ज्या तिहेरी अंत:प्रवाहांची चर्चा केलेली आहे त्या 'ससंज्ञ' (conscious) 'संज्ञापूर्व (Pre-conscious) व 'असंज्ञ' (Unconscious) या मानसिक व्यापारांचे विश्लेषण केले आहे ''४ ते पुढील प्रमाणे मांडले आहे.

फ्रॉईडने आपल्या 'The Ego and the Id' या ग्रंथात मनोव्यापार कसे चालतात ते सांगितलेले आहे. ''बाह्यजगताच्या ज्ञान शिकविणाऱ्या, भोवतालच्या परिस्थितीची वागणूक शिकविणाऱ्या मनाच्या भागाला फ्रॉईडने 'अहंम' (Ego) असे नाव दिले. प्रवृत्तीपरशक्तींचा साठा व सर्व वासनांचे उत्पत्तिस्थान असलेला भाग 'अिड'(Id) अगदी लहानपणी मनावर झालेल्या संस्कारांना अनुरूप वागणूक शिकविणारा व सेन्सॉरला आदेश देणारा मनाचा भाग म्हणजे 'परमाह्म', (Super Ego) असे म्हणतात. 'इगो', 'सुपरइगो', आणि 'इड' या तिघांमध्ये 'इगो'ची परिस्थिती कठीण असते. १. सभोवतालची परिस्थिती २. 'इड' मध्ये उगम पावणाऱ्या वासना ३. सुपरइगो च्या कडक नीतिकल्पना या तिन्हींचा मेळ घालण्याचे अवघड कार्य 'इगो' ला करावे लागते. हे कार्य करण्यास 'इगो' असमर्थ ठरल्यास सुपर 'इगो' व 'ईड' यांचा गोंधळ उडून ते मोकाट सुटतात अशा परिस्थितीला मनोविकृती म्हणतात.''[५] ही मनोविकृती अबोधमनातील दाबलेल्या अतृप्त इच्छामुळे होते. ती संपूर्ण मनावर परिणाम करते.

मानवीमनाच्या तीन भागांपैकी जाणीवयुक्त मनाने एक अष्टमांस भाग व्यापला आहे. तर नेणीवयुक्त मनाने सात अष्टमांस भाग व्यापलेला आहे. या नेणीवयुक्त मनात अनेक प्रकारच्या भावभावना, वासना, इच्छा दडलेल्या असतात. दोन विभागांच्या मध्यावर सद्सद्विवेक बुद्धीच्या रूपाने एक

नियंत्रक सेन्सॉर वावरत असतो त्याच्या साह्याने नेणिवेतून वर येणाऱ्या ऊर्मी प्रकट मनात येऊ नयेत म्हणून सेन्सॉर दाबून टाकतो. त्याला 'दमन' (Repression) म्हणतात. या प्रक्रियेत ''प्रेरणांची, वासनांची, भावनांची प्रामाणिकपणे दखल घेऊन त्यांची जाणीवपूर्वक व विधायकरीत्या वासलात लावण्याऐवजी कधीकधी व्यक्ती त्यांचा विचारच करण्याचे टाळते. व्यक्तीने जे नैतिक आदर्श जाणता-अजाणता आत्मसात केलेले असतात व जी सद्सद्विवेक बुद्धी (Super Ego किंवा conscience) संपादन केलेली असते तिच्याशी विसंगत असलेल्या प्रेरणांची, वासनाची, विचारांची वा भावनांची तिला लाज वाटते. त्या न शोधणाऱ्या प्रेरणांच्या आहारी आपण कदाचित जाऊ अशी भीती वाटते व त्यामुळे ते विचारच मनात येऊ देत नाही'' ६ या ऊर्मी अबोधनात अडवून धरल्या जातात.

या अंतर्मनात सेन्सॉरच्या साहाय्याने दाबून टाकलेल्या ऊर्मी, इच्छा, वासना या व्यक्ती झोपेत असताना सद्सद्विवेक बुद्धीचा डोळा चुकवून स्वप्नरूपाने येण्याचा प्रयत्न करतात व झोपेत व्यक्तीला स्वप्ने पडतात किंवा व्यक्ती दिवास्वप्न (Fantasy) देखील पाहू लागते. ''दिवास्वनात वास्तवजगात तृप्ती न पावलेल्या प्रेरणा दिवास्वप्नांना जन्म देतात व व्यक्ती कल्पनाविलासात रमू लागते. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वच दिवास्वप्नात विशेष रंगतात. दिवास्वप्न म्हणजे वास्तवापासून क्षणभर सुटका किंवा सुटी होय'७ ''वास्तवापासून मनाला बाजूला घेऊन त्याला दिलेली एक प्रकारची विश्रांतीच होय. परंतु अबोधमनात जागृतमनावर परिणाम करून थांबून राहिलेल्या ऊर्मी नकळत काही संदर्भाने वरती येतात तेव्हा उपबोधमनाला त्यांचे नियंत्रण करावे लागते. अबोधमनात साठविलेल्या ऊर्मी सामाजिक, धार्मिक, कौटुंबिक नीतिसंकेतामुळे दाबून ठेवून किंवा त्यांचे निरोधन करून, बोधमनात त्यांचा प्रवेश न झाल्यामुळे त्या नेणिवेत दबा धरून बसतात, त्यांना मोकळेपणा मिळत नाही बोधजीवनाचा दाब थोडा ढिला झाल्याची संधी सापडताच अबोधातील निरोधित भाव व प्रवृत्ती बोधजीवनात प्रवेश मिळवून तेथे शारीरिक व मानसिक बिघाड उत्पन्न करतात'[८] त्यामुळे मनोविकार निर्माण होतात. मानसिक जीवनात दाबलेल्या भावनांचा हा परिणाम दिसतो.

म्हणून सिग्मंड फ्रॉईड यांनी अबोधमनाचा अभ्यास करून मनोरुग्णासाठी 'मनोविश्लेषणात्मक मानसोपचार' पद्धती शोधून काढली. तेच या पद्धतीचे जनक आहेत. ''मनोरूग्ण व्यक्तींचा दीर्घकाळ अभ्यास केल्यानंतर त्यांनी व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीविषयी एक उपपत्ती (Theory) तयार केली. त्या उपपत्तीतील तत्त्वांच्या आधारे 'मनोविश्लेषण' तंत्र विकसित केले.

अबोधमनात काय चालले हे शोधण्यासाठी फ्रॉईड यांनी काही कल्पना विकसित केल्या या कल्पना उपयोगी ठरंल्यावर त्यांची तंत्रे बनली. अबोधमनापर्यंत पोहोचण्यासाठी त्यांनी 'मुक्त साहचर्य' (free-association) स्वप्नविश्लेषण, विरोधाचे विश्लेषण, भावांतराचे विश्लेषण अशी काही तंत्रे सांगितली - त्यापैकी मुक्तसाहचर्य या तंत्रात व्यक्तीला तिच्या मनातील सर्व विचार मुक्तपणे सांगावयास प्रवृत्त केले जाते'[९] आणि व्यक्ती आपल्या मनातील विचारांचे विश्लेषण करत जाते.

सिग्मंड फ्रॉईड यांनी अंतर्मनात दडलेली प्रबळ भावनाही कामभावना (Libido) आहे असे प्रतिपादन केले. यातून भावगंड संकल्पना निर्माण झाली. मुलाचा वडिलांविषयी द्वेष व आईविषयी प्रेम या प्रवृत्तीला पितृभावगंड (oedipus complex) असे म्हणतात. तर मुलीचे वडिलांवर प्रेम व आईविषयी द्वेष या प्रवृत्तीला मातृभावगंड (electra complex) असे म्हणतात.

फ्राईडचे पूर्वीचे सहकारी ॲडलर व युंग यांनी पुढे वेगळे होऊन स्वतंत्र सिद्धांत मांडले. ॲडलरचे कार्य 'व्यक्तिनिष्ठ मानसशास्त्र' (Individal Psychology) म्हणून ओळखले जाते. ॲडलरच्या मतानुसार व्यक्ती प्रमुख आहे. व्यक्तीचा सामाजिक विकास होणे आवश्यक आहे. व्यक्तीचा विकास होऊन ती पूर्णत्वाला पोहचली पाहिजे असे तो मानतो. त्याने न्यूनगंड व अहंगंड या कल्पनांची भर घातली.

फ्राईडचा दुसरा सहकारी युंग फ्रॉईडशी मतभेद झाल्यामुळे वेगळा होऊन त्यांनी काही सिद्धांत मांडले. 'युंगच्या मतानुसार संपूर्ण व्यक्तिमत्त्व सहा भागांचे बनलेले असते.

१. अहम (Ego)
२. व्यक्तिगत अबोधमन
३. सामूहिक अबोधमन
४. पर्सोना किंवा व्यक्तिगत आवरण
५. एनिमा व एनिमस
६. छाया (Shado)
७. आत्मा (Self)

असे व्यक्तिमत्त्वाचे सहा भाग सांगितले.' १०सामूहिक अबोध ही युंगची संकल्पना असून हा मनाचा अत्यंत प्रभावी शक्तिमान भाग आहे. विशिष्ट संस्कृती आणि प्रजाती
मधील सर्व लोकांचे सामूहिक अबोधमन सारखे असते असे तो मानतो.

### ३. संज्ञाप्रवाहाचे स्वरूप :-

'संज्ञाप्रवाह' हा पारिभाषिक शब्द 'Stream of consciousness' या संकल्पनेला मराठी पर्याय म्हणून समीक्षा व्यापारामध्ये योजलेला दिसतो. "Stream of consciusness" हा शब्द प्रथम १८८४ मध्ये विल्यम जेम्स या मानसशास्त्रज्ञाने आपल्या 'Principels of Psychology' या ग्रंथात उपयोजिला होता. तेव्हा 'संज्ञा (संस्कृत : सम् + ज्ञा = जाणणे) याचा अर्थ शुद्धी, चेतना असा आहे. (महाराष्ट्र शब्दकोश ७ वा) संज्ञाप्रवाह म्हणजे चेतनेचा ओघ होय'१५ किंवा कॉन्ससनेस म्हणजे संज्ञा किंवा चेतना आणि स्ट्रीम म्हणजे ओघ किंवा प्रवाह' एकूण 'संज्ञाप्रवाह म्हणजे 'चेलनेचा ओघ किंवा प्रवाह होय.'१६ तेव्हा संज्ञाप्रवाह हे एक लेखनाचे तंत्र किंवा पद्धती आहे. तिचा वापर करून लेखक व्यक्तीच्या किंवा पात्रांच्या अंतर्मनाचा शोध घेतो ''माणसाच्या अंतर्मनातील गुहेत नेणिवेत (१) चाललेली विलक्षण खळबळ जाणिवेच्या पातळीवर आणण्याचा प्रयत्न करून ती जशीच्या तशी मांडण्याचा प्रयत्न 'संज्ञाप्रवाह या नावाने ओळखला जातो'[१७] वरील व्याख्यांमधून संज्ञाप्रवाह ही संकल्पना स्पष्ट होते.

'Consciouness' म्हणजे संज्ञा किंवा चेतना या शब्दाविषयी एन्सायक्लोपिडिया मध्ये म्हटले आहे, 'The fact of being aware, or the sum total of the experiences of which one is aware at any given to indicate that it is continuous rather than static. A person is usually more vividly aware of certain experiences, at any time than of other, The former are said to be in the focus of consciousness. The latter in the margin or in the sub-conscious to be conscious is to have sensation, feelings memories or other mental process' [१८] वरीलप्रमाणे संज्ञा किंवा चेतना ही अनुभवांची निर्मिती असते. त्या संज्ञा व्यक्तीच्या अबोधमनात साठलेल्या असतात त्यांचा एक सुप्त प्रवाह वाहत असतो. त्यामध्ये जुन्या स्मृती, भावना संवेदना असतात. हा संज्ञा प्रवाह लेखक लेखनात पकडण्याचा प्रयत्न करतो.

संज्ञाप्रवाहाविषयी बा.सी.मर्ढेकर आपल्या 'रात्रीचा दिवस' या कांदबरीच्या प्रस्तावनेत म्हणतात. ''जन्मल्यापासून मरेपर्यंत व्यक्तीची जीवनयात्रा म्हणजे एक अखंड आणि अप्रतिहत संज्ञाप्रवाह असतो. हा संज्ञाप्रवाह अनंत मनोव्यापारांनी व त्यांच्या गुंतागुंतीच्या परस्परसंबंधांनी बनलेला असतो. त्यापैकी काही मनोव्यापार व त्यांचे संबंध जागृतपणे दुसऱ्याला ऐकू येतील अशा स्वरूपात प्रगट होत नाहीत पण त्यांची जाणीव

मात्र प्रत्येक व्यक्तीला असते आणि उरलेले मनोव्यापार व त्यांचे संबंध असे असतात की, ते कुठल्याही इंद्रियगोचर बाह्य स्वरूपात प्रगट होत नाहीत, इतकेच नव्हे तर त्यांची जाणीव ही व्यक्तिमनाला बहुधा नसते; किंवा असलीच तर अगदीच अस्पष्ट आणि संदिग्ध आणि क्वचित दिशाभूल करणारीही असते'[१९] मर्ढेकरांनी व्यक्तीच्या मनाच्या तीनस्तरांची नोंद घेताना त्याचे मनोव्यापार काही स्पष्ट तर काही अस्पष्ट असतात, हे मर्ढेकरांचे वरील भाष्य अबोधमनातील संज्ञाप्रवाहाविषयीच आहे. 'अप्रकट मनाच्या खोल गाभ्यात अराजक असते, त्या अराजकात व्यवस्था व संवादित्व निर्माण करण्याचा आपण निश्चयाने प्रयत्न करत असत्तो. आपण जे जाणतेपणाने बोलतो ते हा प्रयत्न केल्यावर. परंतु एक जाणत्या बोलाच्या मागे अप्रगट मनाच्या अराजकाची मोठीच पार्श्वभूमी असते. आपल्या बुद्धीत जे असते त्यातले शेकडा नव्याण्णव हे अव्यक्तच राहते व व्यक्त होते ते केवळ एक टक्का. कलावंताला संपूर्ण सत्याचे व वास्तवतेचे दर्शन करून घ्यायचे असेल तर त्याला या अप्रगट मनाचा ठाव घेतलाच पाहिजे; व्हर्जिनिया वुल्फने 'आधुनिक कादंबरी' या विचारपरिप्लुप्त प्रबंधात संज्ञाप्रवाहासंबंधी मार्मिक विचार प्रकट केले आहेत, ती लिहिते "जीवन म्हणजे काही सुव्यवस्थित दीपमाळ नाही.... जीवन एक तेजाळलेले वलय आहे, एक प्रकारचे पारदर्शक वस्त्र आहे..... त्या पारदर्शक वस्त्रांनी आम्ही गुंडाळलो गेलो आहोत. आमच्या बुद्धीच्या जाणिवेच्या पृष्ठभागावर येणाऱ्या अणूंचे ज्ञान आपण करून घेतले पाहिजे. या अणूंची साखळी शोधली पाहिजे.[२०] अशा प्रकारची विचार, भावनांची गुंतागुंत अबोधमनात असते. त्याचा बोधमनावर वेळोवेळी परिणाम होत असतो. त्यासाठी संज्ञाप्रवाही तंत्राद्वारे मनातील अराजक शोधणे हितकारक आहे. म्हणून संज्ञाप्रवाही तंत्र लेखनासाठी उपयोगी पडते.

**संज्ञाप्रवाही कादंबरीचे वेगळेपण :-**

संज्ञाप्रवाह हे एक तंत्र म्हणून कादंबरीत येते किंवा निवेदनाच्या ओघात मध्ये मध्ये संज्ञाप्रवाह कादंबरीत येत असतो. संज्ञाप्रवाहाने प्रत्यक्ष घटनांचे सविस्तर चित्रण न करता व्यक्तीच्या मनाची गतिशीलता दाखविता येते. अनुभवाचे सत्यदर्शन आणि स्मृती यांचे मिश्रण संज्ञाप्रवाहात आले तर ते लेखन परिणामकारक होऊ शकते. संज्ञाप्रवाह या पद्धतीचा उपयोग योग्य प्रमाणात केला तरच तो हितकारक ठरतो. कारण अतिरेकी अवास्तव स्वरूपात संज्ञाप्रवाह पद्धती कादंबरीला हानिकारक ठरते. "एखादा उत्कट अनुभव जेव्हा येतो त्यावेळीच माणसाला तो जतन करून ठेवावासा वाटतो. आपल्या सुख दु:खाच्या आठवणी अशाच जमा होतात. पण जे आपल्याला उत्कट वाटले ते

दुसऱ्याला सांगावे म्हणून पुनःप्रत्ययाचा, पुनर्जीवनाचा अनुभव येतो. फ्रॉईडच्या मताप्रमाणे दु:खाचा उत्कट अनुभव सांगण्यात आनंद असतो तो याच अर्थाने. हे सारे अनुभव जागृत मनातून जाताना संपूर्णपणे जात नाहीत. काही वेचक-वेधक अनुभव तिथे जमतात. जीवनातली विफलता अगर विजय यांच्या बरोबरच कल्पनारंजनाचे नवे विश्व मनापुढे तरळू लागते. सुप्त मनातले अनुभव बाहेर येताना कल्पनारंजनाचे नवे नवे रंग घेऊन येतात''[२१] लेखक अनुभव घेताना काही अनुभव साठले जातात तर काही अनुभव उडून जातात. साठलेल्या अनुभवांना कल्पनांचे रंग तो देत असतो. अशा वेळी सुप्तावस्थेतीत अनुभव उपयोगी पडतात. हे अनुभव व्यक्त करण्यासाठी भाषा अधुरी पडू लागल्याने कादंबरी लेखकांनी शब्दांची मोडतोड, नवे शब्द निर्मिती, विशिष्ट प्रकारची वाक्यरचना अवलंबिली, गतिमान क्षण स्थिरशब्दांनी पकडावा कसा हा त्यांचा प्रयत्न होता.

आजच्या कादंबरी लेखकांचा भर मनाचे वास्तवस्वरूप दर्शविण्यावर असतो. मानवी मनात एकाचवेळी भूतवर्तमान व भविष्य काळातील भावभावना, कल्पना यांची कशी सरमिसळ झालेली असते हे दाखविले जाते. व्यक्तीच्या मनाचे खोल थराचे दर्शन संज्ञाप्रवाहातून दाखविण्याचा प्रयत्न असतो. व्यक्तीच्या अबोधातील दाबलेला निरोधित भावना, वासना स्वप्नरूपाने प्रकट होतात. अशी स्वप्ने संज्ञाप्रवाही कादंबरीत दाखविली जातात. या स्वप्नातून अबोधमनाची कल्पना आपणास येते. संज्ञाप्रवाही कादंबरीविषयी भालचंद्र फडके यांनी (आलोचना फेब्रु.१९७१) या अंकात म्हटले आहे '' कादंबरीत येणारे संज्ञाप्रवाहाचे चित्रण कादंबरीला जीवन दर्शन करण्याच्या दृष्टीने कितपत मदत करते? संज्ञाप्रवाहाची नोंद ही खरोखरीच वास्तव आहे का? संज्ञाप्रवाही लेखन निरर्थक म्हणून त्याज्य तर नव्हे? संज्ञाप्रवाहाचे वर्णन करता यावे म्हणून भाषेतील शब्द व व्याकरण यांची मोडतोड कृत्रिम नाही का? हे व असे कितीतरी प्रश्न आज चर्चिले जातात. पण या कालखंडात संज्ञाप्रवाही लेखनाने मराठी कादंबरीला झपाटून टाकले होते. संज्ञाप्रवाहाचा वापर करून मनाचा शोध घेण्याचा कानेटकर, बिवलकर, गाडगीळ, मनमोहन इ. काही कादंबरीकारांचा प्रयत्न म्हणजे 'उडत्या पाखरांचे पंख' मोजण्याचा प्रयत्न होता. असा प्रा.ल.ग.जोगांचा अभिप्राय आहे. तो काही खोटा नव्हे! ... संज्ञाप्रवाहाचे रूप स्पष्ट करण्यामागे कादंबरीकाराला माणूस यथार्थतेने जाणावा ही इच्छा असली पाहिजे. व्यक्ती सामान्य असो की, असामान्य असो तिच्यातील माणूस पाहण्याची शक्ती कादंबरीकाराजवळ असायला हवी''[२२] असा प्रयत्न बेडेकर, कानेटकर, नेमाडे, खानोलकर या

कादंबरीकारांचा दिसून येतो. त्यांच्या कादंबऱ्यांचा यादृष्टीने अभ्यास केलेला आहे.

संज्ञाप्रवाही लेखनाविषयी वि. बा. आंबेकर म्हणतात, 'सहृदयक्रियेइतकाच चोवीस तास मेंदू थरथरत असतो आणि प्रत्येक क्रियेच्या मागे या मेंदूच्या प्रतिक्रियेचे लोण खोलवर रुजलेले असते. ही मेंदूची संज्ञा भासवून घेण्याची क्रिया, मानसशास्त्राला अनुसरून कशी चालते हे ज्या लेखकाला नीट उमगले आणि ज्याने नीट प्रत्यक्ष अनुभवाने, प्रयोगाने त्याबद्दलची वस्तुस्थिती अनेकविध मार्गांनी पारखलेली आहे त्यालाच हे काम साधेल. शब्दात त्याची अभिव्यक्ती तो अशारीतीने करतो की त्यातुळे वाचकाला सर्व परंपरेची पुनरावृत्ती, तर्काने नव्हे तर मनाच्या संवेदनांच्या मार्गाने पुन्हा अनुभवता यावी, आम्ही तुम्हाला केवळ शब्द देतो, अन्वयार्थ देत नाही. तो लावण्याचे कार्य ज्याने त्यानेच करावे असाच जणू काही या नवीन संप्रदायाचा संकेत आहे''[२३] वरीलपमाणे आशयाच्या अंगाने लेखनपद्धतीच्या अंगाने, तंत्राच्या अंगाने संज्ञाप्रवाही लेखनपद्धतीचे वेगळेपण स्पष्ट करता येते.

**संदर्भ टीपा :-**


१. सह्याद्री, एप्रिल १९४०, फ्रॉईडचे मनोगाहनशास्त्र: केळकर श्री.वि. पृष्ठ ३०८.
२. तत्रैव, पृष्ठ ३०९
३. तत्रैव, पृष्ठ ३०९
४. महाराष्ट्र साहित्य पत्रिका, जुलै १९४२ जोशी मा.ग. पृष्ठ ३०१
५. सह्याद्री एप्रिल १९४० फ्रॉईडचे मनोगाहनशास्त्र : केळकर श्री.वि. पृष्ठ ३१०
६. अकोळकर व.वि. आणि गोगटे, 'सामाजिक मानसशास्त्र' कॉन्टिनेटल प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती १९७१ पृष्ठ ८२
७. तत्रैव, पृष्ठ ८०
८. नवभारत माहे १९७४ फ्रॉईडचे मनोविकलनशास्त्र : गडकरी म.शं. पृष्ठ ५६
९. 'मनोविज्ञान विविधा (मासिक) डिसें. १९९६ 'मनोविश्लेषणात्मक मानसोपचार' प्रा. राजहंस, मानसी, पृष्ठ १६
१०. देशपांडे चं.ग. 'मनोविकृतिशास्त्र' कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती १९७८ पृष्ठ ५२
११. प्रतिष्ठान सप्टेंबर १९५५'कादंबरी आणि संज्ञाप्रवाह', शहाणे वसंत अनंत, पृ.१५
१२. कुलकर्णी वा.ल. 'साहित्यसमीक्षा परिभाषा कोश, महाराष्ट्र शासन मुंबई प्रथमावृत्ती १९८७.
१३. आलोचना ऑगस्ट १९६८ 'संज्ञाप्रवाह आणि मराठी साहित्य' बांदिवडेकर चंद्रकांत पृष्ठ ९
१४. Colliers. P.F. 'Encyclopedia' son carporation Newyork Editor W.Couch.

१५. मर्ढेकर बा.सी. 'मर्ढेकरांच्या कादंबऱ्या' मौज प्रकाशन, मुंबई, द्वितीयावृत्ती १९९४, पृष्ठ २१९
१६. उनि. शहाणे वसंत अनंत, पृष्ठ१६
१७. प्रा. रा. श्री. जोग, गौरव ग्रंथ, संपा. द.न. गोखले, स.शि. भावे, स.कृ.पाध्ये (लेख-'श्लील आणि अश्लील साहित्य', हे वि. इनामदार) व्हीनस प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती १९६४ पृष्ठ ३२९.
१८. आलोचना फेब्रुवारी १९७१ 'मराठी कादंबरीची वाटचाल' १९४५-१९६० भालचंद्र फडके पृष्ठ ४२.
१९. 'महाराष्ट्र साहित्य प्रत्रिका' जाने-मार्च १९५२, 'आजची कादंबरी, वि.बा. आंबेकर पृष्ठ १७.

# विभाग 'ऐ'
# चरित्र वाङ्मय

# संत गाडगेबाबांची विज्ञाननिष्ठा

प्रा. नितीन भालेराव

संत गाडगेबाबांनी आपल्या कीर्तनातून संपूर्ण महाराष्ट्राला जाग आणली. गाडगेबाबांची कीर्तनातील भाषा अतिशय सोपी, ओघवती, बाळबोध तळमळीची आणि मार्मिक दृष्टातांची असे. गाडगेबाबांनी ४० ते ५० वर्षे महाराष्ट्राच्या गावा-गावात भ्रमंती केली. दीन दुबळ्यांची, दु:खितांची मनोभावे सेवा केली. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात मुलांच्या शाळा, मुलींच्या शाळा, मुला-मुलींची वसतिगृहे, आदिवासी मुलांच्या आश्रमशाळा वारकऱ्यांना धर्मशाळा, म्हाताऱ्या माणसांसाठी वृद्धाश्रम, लहान मुलांसाठी संस्कार केंद्रे, जनावरांसाठी गोरक्षण शाळा, दवाखाने अशा कितीतरी समाज विकासाच्या योजना बाबांनी जाणीवपूर्वक राबविल्या व यशस्वीपणे सांभाळल्या.

डोक्यावर खापर, हातात खराटा आणि अंगावर चिंध्या नेसून बाबांनी समाजकार्य, समाजजागृती व लोकशिक्षणाचे व्रत अखंडपण चालू ठेवले. ताईतवाले, मांत्रिकवाले, गंडेवाले, दोरे-लिंबू बांधून चमत्कार करणारे अशा भोंदूगिरी, चमत्कार, अस्पृश्यता, अंधश्रद्धा या विषयी बाबांनी समाजशिक्षणाचे कार्य महाराष्ट्रात केले. कीर्तनातून बोलणारे बाबा सगळ्यांना भारावून टाकीत, निरक्षर, अंगठेबहाद्दर बाबा स्वच्छता, शिक्षण, व्यसने भोंदुगिरी यावर प्रहार करीत व समाजाला शिक्षित करण्याचे कार्य करीत असत. अज्ञानी लोकांमध्ये असलेली अंधश्रद्धा व त्यातून सर्वसामान्यांची होणारी होरपळ, परवड याचा दाखला देत शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही व विज्ञानविषयी आपल्या कीर्तनातून प्रबोधन करीत व या सर्वातून गाडगेबाबांनी आयुष्यभर जोपासलेला विज्ञानवादी दृष्टिकोण, लोकशिक्षण व लोकजागृती आणि अखंड लोकसेवेचे व्रत तसेच मानवतावाद या मूल्यांची केलेली जोपासना अशा बाबांच्या जीवनविषयक दृष्टिकोणांचा या प्रस्तुत प्रकरणात आढावा घेतला आहे.

महाराष्ट्रात अनेक थोर समाजसुधारक, संत महात्मे, बाबा महाराज होऊन गेले. परंतु संत गाडगेबाबांच्या जीवन कार्याची उंची एकाही विभूतीला

साधता आली नाही. संत गाडगेबाबा फक्त संत नव्हते तर रूढी परंपरा नाकारणारे, कर्मकांड नाकारणारे, देवधर्माच्या पलीकडे वागणारे लोकशिक्षक होते. देव दगडात नाही, देव मूर्तीत नाही, देव देवळात नाही तर देव गोरगरीब, दीनदलित, रंजले-गांजले यांच्यात आहे. त्यांची सेवा हीच ईश्वर सेवा आहे. असे सांगणारे संत गाडगेबाबा काळाच्याही पुढे शंभर वर्षे आहेत असेच म्हणावे लागेल. ज्या काळात बाबांनी समाज प्रबोधनाचे कार्य केले. आजही एखादे महत्त्वाचे काम करायचे ठरले तर ज्योतिषाच्याद्वारें शुभ दिवस शोधतात. परंतु बाबा कीर्तनातून नेहमीच सांगायचे की, ''तुमचे भवितव्य तुमच्या कुंडलीत नाही, ते मनगटात आहे. तुम्ही करणाऱ्या कर्तृत्वात आहे. चालून आलेल्या संधीचा योग्य वापर करण्यात आहे. तुम्ही निर्माण करण्याऱ्या संपत्तीत आहे. आकाशातला कोणताही ग्रह दुराग्रह न करता तुमच्या पुरुषार्थाचा आग्रह धरत असतो यावर तुम्ही विश्वास ठेवा. विश्वास स्वत:वर असावा. इतरांच्या फसव्या शब्दांवर नसावा या स्वरूपाचे लोकशिक्षण आपल्या कीर्तनातून दिल्याने ही अपप्रवृत्ती पूर्णत: लोप पावली नाही, तर थोपली-थोपवली गेली यात शंका नाही''.[१]

गाडगेबाबा मनुष्य मात्रातील 'स्व'ला अनन्यसाधारण महत्त्व देतात. बुवाबाजी, लफंगेपणा यांना भुलू नये असा ते सल्ला देतात. आजही समाजामध्ये मोठ मोठे पैसेवाले, निपुत्रिक, पदवीधर, शिकलेले, संसारात पिकवलेले आणि दैववादाला विकलेले उल्लू बुवाच्या साधुपणाचा व अवतारीपणाचा डांगोरा पिटतात. साहजिकच भाबडी जनता देखील स्वत:चा कामधंदा सोडून या बुवांच्या नादी लागतात. बुवाबाजीमुळे होणारा तोटा म्हणजे आपला बहुसंख्य समाज दैववादी, नियतीशरण बनतो. दैववाद माणसाला पशू बनवितो. त्याच्यातल्या शक्ती आणि साहस यांचा अंकुर खुडून काढतो, कर्तृत्वाला पायबंद घालतो आणि माणसाचे परावलंबित्व वाढवितो. दैव नावाच्या खुंटीला साऱ्या गोष्टी टांगून तो निष्क्रिय आयुष्य जगतो. आपले सर्व आयुष्य देवाच्या हाती असते त्याच्या इच्छेशिवाय काहीच घडत नाही. त्याची अनुकूलता असेल तर काही तरी घडणार नाही तर नाही. त्यामुळे तो देवाची भक्ती तरी करतो नाही तर फरशीवर सांडलेल्या पाण्यासारख्या थोडाफार पसरून जागच्या जागी सुकून तरी जातो. त्यातूनही जे हालचाल करतात ते भविष्य जाणण्यासाठी ज्योतिषाकडे धावतात. मग हा ग्रामजोशी साडेसाती सांगतो. सत्यनारायणाची पूजा, देवाला कोंबडे, भटांना भोजन यावर भर देऊन या भक्तांना पार नागवतो. गाडगेबाबांनी या साऱ्यांचा निषेध केला आहे. माणसाला सांगितले जाणारे भविष्य खोटे, नवसपूर्तीचे फल खोटे,

सत्यनारायणाची पूजा खोटी आणि त्याच्या भाकड कथा पूर्णत: खोट्या आहेत अशी बाबांची शिकवण होती. नवस करून माणसाच्या इच्छा आकांक्षा पूर्ण झाल्या असत्या, नवस करून माणसाला मुले बाळे झाली असती तर विवाहसंस्थात अस्तित्वात आल्या नसत्या असे गाडगेबाबा तुकारामांचा त्या संदर्भातील एका अभंगाद्वारे स्पष्ट करतात.

''नवसे कन्या पुत्र होती। तरि का करणे लागे पति।।
अंगी दैवत संचरे। मग तेथे काय उरे।।''[२]

बाबांनी लोकांच्या धार्मिकतेला आवाहन करून सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला लोकांना विज्ञानवादाचे महत्त्व कीर्तनाच्या माध्यमातून पटवून दिले. गाडगेबाबा विज्ञानवादी दृष्टिकोण मांडत असताना बुद्धिवादाला विशेष प्राधान्य देतात. कर्मकांडात्मक धर्माला त्यांनी कडाडून विरोध केला. कडधान्य, तूप यांच्या बेसुमार अपव्ययांतून होणाऱ्या यज्ञाला त्यांनी विरोध केला असे कर्मकांड म्हणजे जनतेची धार्मिक आणि आर्थिक लूट करण्याचीच प्रक्रिया आहे असे त्यांना वाटत होते. अंगारे, धुपारे, नवस, जादूटोणा या सर्व अंधश्रद्धा व दृष्ट प्रवृत्त्व विधींना त्यांनी प्रभावी विरोध केला. या सगळ्या विधीतील फोलपणा त्यांनी पटवून सांगण्याचा प्रयत्न केला आणि त्यांच्या सांगण्याचा प्रभावही असा जबरदस्त होता की, लोक हजारोंच्या संख्येने त्यांच्या कीर्तनाला जमायचे व मनाशी खूणगाठ बांधून परतायचे, चमत्कार व सिद्धी यांच्या अस्तित्वाला त्यांनी नेहमीच विरोध केला. पंढरपूरला महारोग्यांची, अपंगाची सेवा करणाऱ्या गाडगेबाबांनी 'अठ्ठावीस युगे' विटेवर असणाऱ्या 'विठोबा'ला त्यांनी सांगितले, 'तू बस देवळात, मी या देवळाबाहेरची घाण काढतो, या रोग्यांच्या पट्या बांधतो' पण याचा अर्थ असा नाही की, ते निरीश्वरवादी होते. त्यांना चराचरात, सामान्य माणसामध्ये ईश्वर दिसत होता, म्हणूनच मूर्तिपूजेचे स्तोम त्यांना पसंत नव्हतें.

''एका हाती विज्ञाननिष्ठेची आणि दुसऱ्या हाती बुद्धिवादाची पताका घेऊन निघालेला ह्या मराठी मुलखातील एकमेव संत म्हणजे निष्काम कर्मयोगी गाडगे महाराज. आजच्या कितीतरी साक्षर सुधारकांना झपाटून टाकणारा तो निरक्षर झंझावात होता''.[३] हे मधुकर वाकोडे यांचे निरीक्षण खऱ्या अर्थाने समर्पक वाटते. गाडगेबाबांनी लोकशिक्षणातून, कीर्तनाच्या माध्यमातून ग्रामीण माणसाच्या हाडीमासी खिळलेला 'अंगात येणे' या सारख्या लोकभ्रमावर कडाडून टीका केली. प्रचंड स्वरूपाचे अज्ञान, खोलवर गेलेली निरक्षरता, ओसंडून वाहणारे दारिद्र्य, धर्मांला आलेले अधर्माचे स्वरूप, नाना प्रकारचे शोषण यातूनच अंधश्रद्धा जन्माला येते. या अंधश्रद्धेतून जादूटोणे व

चमत्कारांची निर्मिती होते. ''की दुपारच्या जेवणासाठी लागणारे पसाभर डाळ-तांदूळ त्याला निर्माण करता येत नाहीत. तो हवेतून मोहरांचा वर्षाव करू शकतो, पण त्या पर्जन्याच्या धारांचा वर्षाव करून दुष्काळ हटवता येत नसतो. रोगांच्या साथीत पटापट मरणारी लक्षावधी माणसे त्याला जिवंत करता येत नाहीत. असल्या या चमत्कारांवर गाडगेबाबांचा जराही विश्वास नव्हता. लोकशिक्षणाचा वसा घेतलेल्या बाबांनी आपल्या कीर्तनातून या प्रकारावरही प्रहार केलेले आहेत''.[४]

बाबा आपल्या कीर्तनातून चमत्कार, जादूटोणे या विषयी विनोदी पद्धतीने लोकांना पटवून देत, ''जादूटोणे करून अथवा मूठ मारून हवा त्याचा धुव्वा माणसाला उडवता येतात तर मग तो देवापेक्षाही मोठा म्हटला पाहिजे. लढायांत असले आठ दहा मूठ मारणारे सोडले का काम भागले. कशाला हव्यात बंदुका तोफा नि ते आटम बांब?''[५] गाडगेबाबांनी आपल्या लोकशिक्षणाला विज्ञानाची जोड दिली. आपल्या प्रवचनामध्ये या निरूपणामध्ये विज्ञानदृष्टीचा, वैज्ञानिक गोष्टीचा वापर करणारा कदाचित ते एकमेव महाराज असावेत, धर्माच्या नावाखाली चाललेल्या अनेक चालीरीतींना त्यांनी विरोध केला. त्यात आंधळ्या समजुती दूर करणे हा जसा एक भाग होता, तशी माणुसकीची कणक होती. उदा. मुलगा व्हावा म्हणून नवस करणे, सत्यनारायण घालणे, तीर्थक्षेत्री जाणे, कोंबडे बकरे कापणे, आजार बरा व्हावा म्हणून पशुबळी देणे, यांना त्यांनी जोरदार विरोध केलेला दिसतो. हा विरोध करताना त्यांनी धर्मसुधारणा तर केलीच पण त्याच बरोबर वैज्ञानिक दृष्टिकोणाचा व भूतदयेचा प्रसार केला. पशुबळी देणे व आजार बरा होणे याचा कार्यकारण सबंध नाही हे त्यांनी ओळखले होते. त्यामुळे आजारी माणसाला देवऋषीकडे न नेता डॉक्टरकडे न्या, असा सल्ला ते देत. लोकांच्या पवित्र धर्मश्रद्धेला धक्काही न लावता त्या श्रद्धेला विज्ञाननिष्ठ व बुद्धिवादी वळण लावून अंतत: ती श्रद्धा सत्कार्यात लावण्याचा आग्रह त्यांनी सतत धरला.

**कीर्तनातून लोकशिक्षण आणि लोकजागृती :**

संत गाडगेबाबांनी कीर्तन परंपरेतून लोकशिक्षणाचे प्रभावी कार्य केले. आपल्या विचारातून नवा आधुनिक विचारसरणीचा समाज उभा केला. विज्ञानाने साधने दिली परंतु गाडगेबाबांनी अंधश्रद्धा, कर्मकांड, रूढी परंपरा, दैववाद, यांच्या विरुद्ध आवाज उठवला. समाजातील अनिष्ठ रूढी नष्ट केल्या. थोडक्यातच बाबांनी समाजाला एक नवा विचार बहाल केला आणि समाजाची सामाजिक उन्नती करण्याचे महत्त्वाचे पाऊल उचलले असे म्हणावे लागते. गाडगेबाबांचे समाजसेवेचे व्रत म्हणजे एक ठरावीक गाव नव्हते किंवा एक

ठरावीक समाज नव्हता अगदी खेड्या पाड्यात जाऊन दीनदलितांची, दुबळ्यांची त्यांनी सेवा केली. जेव्हा खेड्यापाड्यातला सारा समाज शिक्षणापासून वंचित होता, कर्जात बुडाला होता, लोकप्रथेच्या जीवघेण्या प्रसंगात गुरफटला होता, दंभाचाराने बरबटला होता आणि भेदाभेदाच्या कलहांनी वेढलेला होता तेव्हा सर्व समाजाला दीपस्तंभाप्रमाणे बाबा सदाचाराचा समन्वयाचा, सद्‌भावाचा, समतेचा, सत्कार्याचा आणि सौजन्याचा मार्ग दाखवित होते. देव देवळात नसून दीन दुबळ्यात आहे हे सर्वांना पटवून देत होते. गाडगेबाबा निरक्षर पंडित होते. पण समतेचा विचार ते ठासून सांगत असत. कीर्तनातून लोकांना जागे करीत होते. माणसा-माणसामधील भेदाभेदाच्या भिंती नष्ट करीत होते.

गाडगेबाबांचे शिक्षण नव्हते. त्यांना कोणी उपदेश केला नाही. म्हणावे असे वाचन श्रवण नव्हते. तरी देखील मरताना बापाने "घरातले सगळे देव नदीत फेकून दे. त्यांनी आपले काही सुद्धा भले केले नाही. असे म्हणताच सर्व देवांना नदीमध्ये बुडवून टाकतो. ती गोष्ट मोठी अर्थपूर्ण आहे. क्रांतिकारक आहे. जिथे पाटावर ठेवलेल्या देवांना ओलांडून जाणे म्हणजे विलक्षण गोष्ट मानली जाते, अशा समाजात पाटावरचे देव नदीत सोडणे किती विलक्षण मानले गेले असेल! वैतागाने बोललेल्या माणसाचे फारसे मनावर घ्यायचे नसते, ही आपली रीत असताना बाबांनी परीट समाजाची मनोधारणा आणि तो काळ यांच्या पार्श्वभूमीवर केलेली ही एक नवलपूर्ण गोष्ट होय."[६]

देव धर्म अंधश्रद्धा या संदर्भात गाडगेबाबांनी सामाजिक प्रबोधन केले. परंतु त्यांची सुरुवात स्वत:च्या घरापासून केली. ही घटना म्हणजे समाजाच्या धार्मिक कल्पनेला आव्हान होते. बाबांनी कर्मकांडाचा निषेध केला. मूर्तिपूजेला विरोध केला व अंधश्रद्धेचा अव्हेर केला. पोथिनिष्ठ संस्कृतीचा धिक्कार केला. एवढेच नव्हे तर दगडातील देवाच्या उपासनेला नकार दिला. गाडगेबाबांची देवाविषयीची मजेशीर भूमिकाही ध्यानात घ्यावी अशीच आहे, "ते मूर्तीतला देव नाकारतात. पारंपरिक देवकल्पना नाकारतात, पण त्याचबरोबर भाविकांच्या वारकऱ्यांच्या सोयी-गैरसोयींवरही लक्ष देतात. त्यांनी जी समाजोपयोगी विविध कामे केली त्यात भक्तांच्या सोयीसाठी धर्मशाळा बांधण्यावर अधिक भर दिलेला आढळतो. दोन ठिकाणी नव्याने मंदिरेही बांधलेली आपणास दिसून येतात. एक लक्ष्मीनारायणाचे मंदिर बांधले. दुसरे मारुतीची मूर्ती सापडली म्हणून त्याचे मंदिर बांधले. साफसफाई करताना ते अधिकांशाने मंदिराभोवतीचा परिसर स्वच्छ करायचे. नदीचा घाट स्वच्छ करायचे. शिवरात्रीच्या निमित्ताने किंवा यात्रेच्या निमित्ताने देवदर्शनाला येणाऱ्या

भाविकांची अधिकाधिक सोय करण्याकडे त्यांचा कल असायचा. म्हणजे एकीकडे पूजा-विधी कर्मकांडावर टीका करत होते आणि दुसरीकडे भक्तांची सोयही बघत होते.'' [७]

गाडगेबाबांच्या आचारात-विचारात विरोधाभास वाटत असला तरी गाडगेबाबांनी कधीच माणसाच्या श्रद्धेवर आघात केला नाही. मात्र देवाविषयी आंधळ्या श्रद्धेवर आघात केला. हे निरीक्षण लेखक येथे नोंदवितात. अर्थातच गाडगेबाबा निधर्मी निरीश्वरवादी होते असे म्हणता येत नाही. त्यांच्या कीर्तनामधून त्यांनी ईश्वराचे अस्तित्व मानलेले दिसते. पण धर्मातले हे महत्त्वाचे तत्त्व मानत असताना त्यांनी काही तत्त्व नाकारली याची यादी मोठी आहे. देव एकच असताना लोक वेगवेगळे मानतात व त्यांची मंदिरे बांधतात हे अयोग्य आहे असे गाडगेबाबांना वाटते. मूर्तीत-दगडात देव नाही ही गोष्ट गाडगेबाबा आपल्या कीर्तनरूपी संवादातून पटवून देण्याचा प्रयत्न करीत होते.

''द्येव किती हायेत तानाजीराव?''
''आपुन म्हनतायसा की योकच हाय''. - तानाजीराव
''पुरानं काय म्हनताय?''
''तेहतीस कोटी''
''गवासले का कोनासनी?''
''न्हाय बा'' - बरीच डोकी हालली.
''तानाजी, तुमच्या गावात मारुती हाये का?''
''हाय योक येशीपाशी''
''आन गनपती''
''त्यो तर बसलाय बाभुळ टेकडावर''
''मंजी द्येव दोन झाले. बरं खंडोबा?''
''गावकुसात हाय बघा''
''मंजी तीन झालं, बरं इटोबा?''
''त्या नव्हं का बाजारात''
''आनं म्हसोबा?''
''पिंपळाच्या पारावर''
''आरं म्हंजी पाच झाले''
''व्हय जी'' पाच बोटं दुमडीत तानाजीराव बोलले. [८]

उपरोक्त संवादातून गाडगेबाबा लोकांना पटवून देतात की देव दगडात नाही ती तुमच्या अंत:करणात आहे. त्याच्या कीर्तनाविषयी डॉ. मधुकर अष्टीकर म्हणतात, ''संत गाडगेबाबांचे कीर्तन म्हणजे माणुसकीचा हुंकार होय.

व्यसनांच्या, अंधश्रद्धांच्या, अज्ञानाच्या आणि अत्याचाराच्या अंधारात अडकून पडलेल्या जनजीवनात खऱ्या ज्ञानाचा प्रकाश पसरविण्याचे कार्य बाबांच्या कीर्तनातून चालत असे''.[९] संत गाडगेमहाराजांची केवळ देवधर्म यांच्याच बाबतच जाणीव जागृती आणि समाज प्रबोधन केले असे नव्हे तर त्या काळातील आणि आजच्या काळात सुद्धा समाजाला घेरणाऱ्या इतर गोष्टीवर टीका केली. ''बाप्पांनो, तुम्ही तुमचा प्रपंच नेकीने आणि काटकसरीने करावा. विवाह साध्या व कमी खर्चामध्ये आयोजित करावा. मुलांच्या शिक्षणाकडे तुम्ही दुर्लक्ष करू नका. आपल्या प्रपंचातूनही अवती-भवतीच्या उपेक्षितांना मदतीचा आधार द्या. लग्नकार्यात कुणी कुणाला हुंडा देऊ नये - घेऊ नये. व्यसनांच्या वाऱ्यालाही फिरू नका. स्त्रिया किंवा पत्नी यांना मान देत चला. तिला कमी लेखू नका''.[१०] अशा प्रकारचे लोकप्रबोधन त्यांनी केलेले आहे. संत गाडगेबाबा केवळ देव, धर्म, रूढीपरंपरा, अंधश्रद्धा, कर्मकांड यालाच महत्त्व देतात असे नव्हे तर स्त्रीचा आत्मसन्मान जपण्याला आणि तिच्या कर्तृत्वावर निष्ठा ठेवण्याला विशेष महत्त्व देतात. त्यांना तिचा आत्मसन्मान आणि प्रतिष्ठा महत्त्वाची वाटते. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये गाडगेबाबा स्त्रीची प्रतिष्ठा जपताना दिसतात. ज्या स्त्रीच्या संदर्भात आज अनेक प्रवाद निर्माण होतात. तिच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होते. परंतु गाडगेबाबा स्वातंत्र्योत्तर काळात सांगतात की स्त्रीला प्रतिष्ठा मिळावी. म्हणून गाडगेबाबा हे द्रष्टे विचारवंत म्हणून पाहिले पाहिजे.

गाडगेबाबांनी केवळ मनोरंजन म्हणून कीर्तन परंपरा चालविली नाही तर कीर्तन परंपरेतून गाडगेबाबांनी लोकप्रबोधन, लोकपरिवर्तनाची चळवळ उभी केली होती. सामाजिक परिवर्तनाचा विचार घेऊन केलेले ते एक वैचारिक आंदोलन होते. त्यांच्या चळवळीला मोठा पाठिंबा होता त्यांची ही परिवर्तनाची चळवळ एक नवा विचार घेऊन आलेली नव्या पद्धतीने जनतेला जिंकून घेणारी लोककल्याणकारी लोकशिक्षणाची चळवळ होती असेच म्हणावे लागेल. बाबांनी केलेल्या लोकशिक्षणाच्या चळवळीमुळे सामाजिक उत्थापनाच्या दृष्टीनेही प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष फायदे झालेले दिसतील. चळवळीमुळे सामाजिकस्वरूपाचे अभिसरण वेगाने सुरू झाले. आज अंधश्रद्धा निर्मूलनाच्या चळवळीमुळे जे व्यापक रूप धारण केलेले आहे, तिला आज जी मान्यता लाभली आहे त्याचे मूळही गाडगेबाबांच्या लोकशिक्षणामध्ये दडलेले दिसून येईल. कालपरवापर्यंत एकटे बाबा अंधश्रद्धेविरुद्ध चाललेल्या लढाईत खांद्यावर पताका घेऊन तुटून पडतो आहे. त्याचे मूळ अधिष्ठान बाबांच्या कीर्तनात तयार झालेले दिसत आहे. बाबांनी लोकशिक्षणाच्या चळवळीतून

सामाजिक बांधिलकीचे भान, सामाजिक समतेचा आग्रह, जातीयतेचा केला जाणार निषेध, वर्णीयश्रेष्ठतेचा केला जाणार धिक्कार. सामूहिक विवाहाचे पसरत चाललेले कार्ये, ग्रामस्वच्छतेचे पटत चाललेले महत्त्व या साऱ्या गोष्टींचे बीज बाबांच्या प्रबोधनपर चळवळीत दडलेले सापडते. गाडगेबाबांनी सुरू केलेली चळवळ म्हणजे माणसाची आणि माणुसकीची नव्या अधिष्ठानावर साकारलेली निर्मिती आहे.

**गाडगेबाबा यांचे जीवनविषयक तत्त्वज्ञान :** संत गाडगे महाराज आजही महाराष्ट्रामध्ये एक थोर समाजसुधारक वैचारिक प्रबोधन घडवून आणणारे द्रष्टे, कृतिशील विचारवंत म्हणून गणले जातात. गाडगेबाबा यांचे राहणीमान साधे, स्वभाव देखील साधा, रोख ठोक व्यवहारांच्या प्रश्नांना भिडणारं बोलणं. एकूणच गाडगेबाबांच्या संदर्भात असे म्हणता येईल की, साधी राहणी आणि उच्च विचारसरणी. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य दीनदुबळ्यांची सेवा करण्यात व्यथित केले. जीवन जगताना कुठेही स्वार्थ ठेवला नाही. बाबा अनेकांना सावली म्हणून उभे राहिले. परंतु स्वत: मात्र सावली विना उभे राहिल्यासारखे होते. बाबांनी शिक्षणाचे महत्त्व जाणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शिक्षण संस्थेसाठी पंढरपूरची धर्मशाळा दिली. त्यांनी महाराष्ट्रात २९ धर्मशाळा बांधल्या. परंतु स्वत: मात्र झोपडीत राहिले. अशा या महान समाजसुधारकाने, ''अस्पृश्यता निवारण, मद्यपानबंदी, कर्मकांडांचा निषेध, अंधश्रद्धेवर प्रहार, गोरक्षणाची कल्पना, कुष्ठरोग्यांना आधार, भुकेकंगालांना अन्नदान, ग्रामसफाई, सणसभारंभ - विवाह याच्यावेळी साधेपणाचा आग्रह, श्रमप्रतिष्ठेचा पुरस्कार, स्त्री-पुरुष समानता, चमत्कार, भूतबाधा, मंत्रतंत्र याचा त्यांनी केलेला निषेध आणि समाजातल्या शेवटच्या माणसाच्या जीवनात सुखासमाधानाचे चार क्षण निर्माण करण्यासाठी त्यांनी केलेले निरलस सेवाकार्य. त्यांचे कार्य निस्वार्थी मानवतावादी सेवाकार्य आहे.'' [११]

'मानवसेवा हीच ईश्वर सेवा' या उक्तीप्रमाणे गाडगेबाबांनी अहोरात्र 'मानवता' या ध्येयाने प्रेरित होऊन समाजाची रात्रंदिवस सेवा केली. गाडगेबाबा हे संतपुरुष होते. परंतु लौकिक-अलौकिकाच्या पलीकडे जाऊन आजच्या काळाला सुसंगत विज्ञाननिष्ठ तत्त्वज्ञानाची मांडणी यांनी आपल्या भजन, कीर्तनातून केली. आपली संपूर्ण हयात त्यांनी माणसातील माणूस शोधण्यास घालवली बाबांचे जीवनविषयक तत्त्वज्ञान जर शोधायला गेले तर त्यांच्या कीर्तनातूनच हे आपल्याला समजेल. कीर्तनातून संदेश देताना बाबा नेहमी म्हणत-

''१. भुकेलेल्यांना ... अन्न द्या.

२. तहानलेल्यांना .... पाणी द्या.
३. उघड्या-नागड्यांना .... वस्त्र द्या.
४. अनाथ आणि बेघरांना .... आसरा द्या.
५. बेकारांना .... काम द्या.
६. दु:खी आणि निराश उपेक्षितांना .... प्रेम आणि हिम्मत द्या.
७. गरीब मुला-मुलींना .... शिक्षण द्या.
८. अंध-पंगू रोग्यांना .... औषधपाणी द्या.
९. पशु-पक्षी मुक्या प्राण्यांना .... अभय द्या.
१०. गरीब तरूण-तरूणींना ..... संसार थाटून द्या.

हाच खरा रोकडा धर्म आहे। ही खरी देव पूजा आहे।''[१२]

अशा पद्धतीने संपूर्ण हयातील बाबांनी समाजाची सेवा केली. स्वत: मात्र अगदी साध्या पद्धतीने जीवन जगले. अंगावर ठिगळांची बंडी परंतु तीच गाडगेबाबांच्या अंगावरची ठिगळांची बंडी गरीब लोकांच्या जीवनाची प्रतीक बनली. ज्या समाजात परिवर्तन करायचे त्याच समाजाप्रमाणे गाडगेबाबांनी राहणीमान ठेवले. इथल्या समाजाची गरज काय? हे गाडगेबाबांनी ओळखले होते. गाडगेबाबांनी समाजाचे उन्नयन करण्याचे प्रयत्न केले. म्हणून गाडगेबाबांविषयी तुकडोजी महाराज म्हणतात, ''सत्पुरूषाने लाखोची संपत्ती मिळविली पण गाडगे सोडले नाही, कवड्या टाकल्या नाहीत. चिंध्या फेकल्या नाही. हा होय खरा अनासक्ती योग. गाडगेबाबा म्हणजे त्यागाचे होमकुंड होते. ध्यैर्याचे हिमालय होते.''[१३]

गाडगेबाबांनी स्वत:जवळ ज्या वस्तू बाळगल्या होत्या त्या वस्तूंनाही प्रतीकात्मक अर्थ प्राप्त झालेला होता. त्यांना वाटत असे, ''आपल्या बहुसंख्य समाज फुटलेल्या मडक्यासारखा टाकाऊ, धांदोट्या निघालेल्या चिंधीसारखा क्षुद्र आणि किंमत नसलेल्या कवडीसारखे मातीमोल आयुष्य जगतो याचे स्मरण राहण्यासाठी त्यांनी या वस्तू स्वीकारल्या होत्या.''[१४]

यातूनच गाडगेबाबांच्या साधेपणाची, राहणीमानाची व जीवनविषयक दृष्टिकोणाची साक्ष पटते. समाज उद्धाराच्या तळमळी पोटी गाडगेबाबांनी अनेकांच्या लाथ्या-बुक्क्या, काठ्या खाल्या परंतु समाजपरिवर्तनाची आस मात्र त्यांनी सोडली नाही. कमालीची सहनशीलवृत्ती गाडगेबाबांच्या रोमारोमात भिनली होती. सहनशीलवृत्तीबरोबरच क्षमाशील वृत्ती त्यांच्यात दिसते. ज्या गावकऱ्यांनी बाबांना चोप दिला होता त्या गावकऱ्यांनी आपली चूक कबूल केल्यावर बाबा त्यांना क्षमा करतात. असा हा क्षमाशील वृत्तीचा माणूस या संपूर्ण चरित्रलेखनात आपल्याला ठायी-ठायी भेटतो.

बाबांनी समाजाची निरपेक्ष सेवा केली. महाराष्ट्रात गेल्या शंभर वर्षाचा हिशोब केला तर सुमारे १०० तरी साधुसंत, मठाधिपती, महर्षी, आचार्य होऊन गेले असतील पण गोरगरिबांसाठी बांधत असलेल्या एका सार्वजनिक धर्मशाळेच्या बांधकामावेळी त्या धर्मशाळेचा प्रवर्तक, संस्थापक, गवंड्याच्या हाताखाली दगड विटांची घमेली वाहतो आहे व निरपेक्ष सेवा करतो आहे. असे दृश्य अपवादानेच पाहायला मिळेल. या दृष्टिकोणातून विचार करता श्रमप्रतिष्ठा मूल्य, निरपेक्ष सेवावृत्ती म्हणजे काय हे प्रस्तुत चरित्र अभ्यासताना लक्षात येते.

गाडगेबाबांनी आयुष्यभर समाजकार्य तर केलेच परंतु स्वच्छतेलाही अनन्यसाधारण महत्त्व दिले. सतत हातात खराटा घेऊन मैदाने नि मैदाने आणि गावं नि गावं खराट्याच्या साह्याने स्वच्छ केली. म्हणूनच प्र.के. अत्रे गाडगेबाबांना "खराट्याने बादशहा"[१५] समजतात.

बाबांनी श्रमातच परमेश्वर शोधला, श्रमाला प्रतिष्ठा मिळवून दिली. कोणतेही काम वाईट नसते. त्याकडे बघण्याची आपली दृष्टी वाईट असते. शरीराचे श्रम ही सर्वात श्रेष्ठ आणि सर्वात मौल्यवान गोष्ट आहे. अशा पद्धतीने श्रमशक्तीचे महत्त्व बाबांनी समाजाला आपल्या कार्यातून पटवून दिले. गाडगेबाबांनी श्रमाला सेवा मानले आणि म्हणूनच गाडगेबाबांच्या हातातील खराटा हे श्रमशक्तीचे प्रतीक बनले. श्रमप्रतिष्ठेचा अलंकार बनला. निरपेक्षवृत्तीने श्रम करा. सेवावृत्तीने श्रम करा. कोणत्याही श्रमाला हलके मानू नका. अशा पद्धतीने गाडगेबाबा श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त करून देतात. ते असेही म्हणतात, "श्रम म्हणजे ईश्वराची केलेली सर्वश्रेष्ठ स्वरूपाची पूजा होय".[१६] बाबांनी श्रमाला प्रतिष्ठा तर मिळवून दिलीच परंतु त्याचबरोबर समाजात असणाऱ्या अनिष्ठ गोष्टींवर प्रहार देखील केला. भारतीय समाजाची सुधारणा कशी करावी याचा नेमका विचार गाडगेबाबांना सापडला होता. म्हणूनच एक निस्वार्थी, कोणत्याही गोष्टींची आसक्ती षड्रीपूंवर मात करणारा एक सोशीक, क्षमाशील वृत्ती धारण केलेला, निरपेक्ष सेवावृत्ती असलेला, स्वच्छतेचे संस्कार झालेला, श्रमशक्तीचे महत्त्व जाणणारा अनिष्ठ गोष्टींवर प्रहार करणारा, भूतदयावादी महान कर्मयोगी म्हणजेच संत गाडगेबाबा होय.

सारांश, गाडगेबाबांनी आपल्याला दिलेला हा संदेश म्हणजे केवळ पोकळ उपदेश नाही. 'आधी करावे मग सांगावे' असा बाबांचा शिरस्ता होता. उपदेशातून विचार प्रकट होतात. परंतु आचाराशिवाय विचारांना मूल्य प्राप्त होत नाही. यासाठी बाबांनी प्रथम आंधळ्या पांगळ्यांसाठी सदावर्ते उघडली. धर्मशाळा बांधून निराश्रितांसाठी आसरा दिला. दुष्काळग्रस्तांना अन्न पुरविले.

गरिबांची लग्ने लावून दिली. निरक्षरांसाठी शाळा काढल्या, जनावरांना पाणी पिण्यासाठी हौद बांधले, पशुहत्याबंद केली. हुंड्याविरूद्ध आवाज उठविला. जुन्या रूढी विरूद्ध बंड पुकारले. विज्ञाननिष्ठ जीवनाबद्दल प्रेम वाढविले. गोरगरिबांना औषध पुरविले. उघड्या नागड्यांना वस्त्र दिले. बाबांचे हे सामाजिक कार्यच त्यांच्या कीर्तीचा सुगंध आहे. थोडक्यात असे दिसून येते की, हेच गाडगेबाबांच्या जीवनाचे तत्त्वज्ञान आहे.

निष्कर्ष :

१. गाडगेबाबांच्या कीर्तन, प्रवचनांचा गाभा विज्ञाननिष्ठ, डोळस, श्रद्धांची प्रस्थापना, अनिष्ट रूढी-परंपरा व कर्मकांड निर्दालन आणि निखळ निरामय माणुसकीचा उद्घोष हा होता.

२. जीवनदर्शी तत्त्वज्ञान, विचारांना आचाराची जोड देऊन लोकशिक्षकाची भूमिका घेऊन लोकशिक्षण घडविणारे गाडगेबाबा ही केवळ एक व्यक्ती नव्हती तर एक महान प्रबोधनकारी विद्यापीठ होते.

३. जर नवविचारांचा समाज घडवावयाचा असेल तर जननायक गाडगेबाबांची शिकवण आजच्या समाजातील युवकांसमोर गाडगेबाबांचे आदर्श व नि:स्पृह जीवन, प्रेरणा म्हणून उभे राहिले तर भावी पिढी त्याग, तपस्या, सद्भावना व कर्तृत्वाच्या पायावर प्रगती करू शकेल.

४. गाडगेबाबांना द्रष्टे म्हटले पाहिजे कारण कालप्रवाह बदलतो, माणसे बदलतात पण सत्य, सदाचार, सेवानीती, मानवता ही बाबांची तत्त्वे त्रिकालबाधित व अविनाशी अशीच आहेत.

५. माणुसकीच्या भावनेने ओथंबलेले संत गाडगेमहाराज दलित संवेदनेचे एक श्रेष्ठ प्रवक्ते होते.

६. माणसानं माणसावर प्रेम करावं, माणसाने माणसाशी माणुसकीने वागावे हाच खरा मानवता धर्म आहे. या विचारांचा जागर प्रस्तुत चरित्रपर लेखनातून डोकावताना दिसतो.

७. शिक्षणाच्या माध्यमातून अपेक्षित समाजपरिवर्तन घडून येईल या गोष्टीवर निष्ठा ठेवून गाडगेबाबांसारख्या निरक्षर माणसाने शिक्षण प्रसारासाठी केलेल्या भगीरथ प्रयत्नांची जाणीव वाचकाला होते.

८. दारिद्र्य आणि अज्ञान, जातिप्रथा आणि अंधश्रद्धा, शोषकता, व्यसनाधीनता, स्वच्छता आणि आळस दूर करणारी समाजव्यवस्था

निर्माण करण्यात जेव्हा आपण यशस्वी होऊ तेव्हाच गाडगेबाबांच्या तत्त्वज्ञानाचा विजय होईल.

**संदर्भ :**


१. भोसले द.ता. 'लोकोत्तर-गाडगेबाबा : जीवन आणि कार्य', ग्रंथाली प्रकाशन, दादर, मुंबई, प.आ. १९ जानेवारी २००७, पृष्ठ १४०.
२. भगत रा.तु. (संपा.), 'संत गाडगे महाराज स्मारक ग्रंथ', चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, प.आ. २० डिसेंबर, २००४, पृष्ठ ६९.
३. उ.नि. पृष्ठ १६१.
४. भोसले द.ता. 'लोकोत्तर-गाडगेबाबा : जीवन आणि कार्य', ग्रंथाली प्रकाशन, दादर, मुंबई, प.आ. १९ जानेवारी २००७, पृष्ठ १५१.
५. ठाकरे प्रबोधनकार, 'श्री गाडगेबाबा', श्री गाडगे महाराज प्रकाशन समिती, मुंबई, पंचमावृत्ती सप्टेंबर २०००, पृष्ठ ७२.
६. भोसले द.ता. 'लोकोत्तर-गाडगेबाबा : जीवन आणि कार्य', ग्रंथाली प्रकाशन, दादर, मुंबई, प.आ. १९ जानेवारी २००७, पृष्ठ १०२,१०३.
७. उ.नि. पृष्ठ १०४.
८. भगत रा.तु. (संपा.), 'संत गाडगे महाराज स्मारक ग्रंथ', चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, प.आ. २० डिसेंबर, २००४, पृष्ठ ४५,४६.
९. उ.नि. पृष्ठ ३५६.
१०. भोसले द.ता. 'लोकोत्तर-गाडगेबाबा : जीवन आणि कार्य', ग्रंथाली प्रकाशन, दादर, मुंबई, प.आ. १९ जानेवारी २००७, पृष्ठ १५३.
११. उ.नि. प्रस्तावना.
१२. उ.नि. पृष्ठ २४६.
१३. भगत रा.तु. (संपा.), 'संत गाडगे महाराज स्मारक ग्रंथ', चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, प.आ. २० डिसेंबर, २००४, पृष्ठ ३०१.
१४. भोसले द.ता. 'लोकोत्तर-गाडगेबाबा : जीवन आणि कार्य', ग्रंथाली प्रकाशन, दादर, मुंबई, प.आ. १९ जानेवारी २००७, पृष्ठ ३६.
१५. भगत रा.तु. (संपा.), 'संत गाडगे महाराज स्मारक ग्रंथ', चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, प.आ. २० डिसेंबर, २००४, पृष्ठ ५९.
१६. भोसले द.ता. 'लोकोत्तर-गाडगेबाबा : जीवन आणि कार्य', ग्रंथाली प्रकाशन, दादर, मुंबई, प.आ. १९ जानेवारी २००७, पृष्ठ ९२.

# विभाग ‘ओ’

# व्यक्तिविशेष

# डॉ.भास्कर शेळके - एक व्यक्ती आणि वल्ली

प्रा.एस.ई.दरेकर

**जन्म ,बालपण व शिक्षण -**

विद्यार्थीदशेत आयुष्याला वळण देणारे महत्त्वाचे घटक म्हणजे आई-वडील, शिक्षक व सभोवतालचा परिसर. सुदैवाने तिन्ही घटक सरांना पोषक मिळाले. मध्यम परंतु सुसंस्कृत शेतकरी कुटुंबात जन्म. प्रामाणिकपणा, कष्ट व आत्मविश्वास जीवनात सर्वस्व मिळवून देतात ही शिकवण आई वडिलांकडून लहान वयातच मिळाली. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण छोट्या गावात परंतु मोठ्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले. महाविद्यालयीन शिक्षण डॉ. कौंडिण्य सर प्राचार्य असलेल्या संगमनेर महाविद्यालयात पूर्ण करण्याची संधी मिळाली. बालपण लोणी प्रवरा परिसरात पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखेपाटील व त्यांचे पुत्र खासदार बाळासाहेब विखेपाटील यांच्या कर्तृत्वाने सुजलाम सुफलाम झालेला परिसर की, ज्यांच्या परिश्रमातून आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना उभारून सहकाराची मुहूर्तमेढ प्रवरा परिसरात रोवली गेली. या घराण्याशी सरांची जवळीक. सरांचे आजोळ व सासरवाडी संगमनेर येथील शिंदेपाटील की ज्यांचे संबंध सहकारमहर्षी मा. भाऊसाहेब थोरात व त्यांचे सुपूत्र मा. नामदार बाळासाहेब थोरात यांच्याशी. सरांची जडणघडण व सहकाराची भावना वृद्धिंगत होण्यासाठी या दोन्ही घरांचा मोठा प्रभाव पडला. थोडक्यात सुसंस्कृत घराण्यात जन्म,नामांकित शिक्षकांचे मार्गदर्शन आणि सहकाराचे बाळकडू देणारा परिसर हा आदर्श घेऊन सरांनी पुढील जीवनाचे ध्येय निश्चित करून वाटचाल चालू ठेवलेली आहे.

**कौटुंबिक जीवन-**

सरांचे कौटुंबिक जीवन एक अपवाद वगळता अतिशय आनंदाचे व परिपूर्ण आहे. सरांच्याजीवनात एक दुःखद प्रसंग येऊन गेला. त्यांच्या मुलीचे अगदी लहान वयात निधन झाले. सरांनी अनेक संस्थांना मुलीच्या प्रीत्यर्थ देणग्या देऊन या सोनपरीच्या स्मृती चिरंतन ठेवल्या आहेत. त्यांचा मुलगा

वैद्यकशास्त्रात एम.डी. करत आहे. सुविद्य पत्नी सौ. तारादेवी- विद्या आणि संपत्तीचा ठेवा सरांना लाभला आहे. पाहुण्यांचे आदरातिथ्य, मराठमोळी प्रेमळ वाणी आणि माणुसकी जपण्याचा खानदानीपणा वहिनीसाहेबांकडून शिकण्यासारखा. सरांचा आधारस्तंभ, प्रेमाचा महामेरू आणि प्रेरणास्त्रोत - यशस्वी पुरुषाच्या मागे स्त्री असते ही म्हण सार्थ करणारी साथ.

**प्राध्यापकी :**

उत्तम समन्वयक, संवेदनशीलता, सामाजिक भान, वेळेचे व्यवस्थापन, प्रशासकीय कौशल्य,नि:पक्षपातीपणा आणि विषयकुशलता ही सरांची ठळक वैशिष्ट्ये सांगता येतील. विद्यार्थी दशेत अनेक गुणवंत शिक्षकांच्या शिकवणीने प्रेरित होऊन सरांनी ज्ञानदानाच्या क्षेत्रातच कार्य करण्याचा निश्चय करून जुन्नर येथे श्री शिवछत्रपती महाविद्यालयात १९८४ साली मराठी विभागात प्रवेश करून आपल्या शैक्षणिक कार्याचा प्रारंभ केला. त्यावेळचे प्राचार्य व्ही.डी.कासार यांच्या नंतर मराठी विभाग प्रमुख म्हणून सरांवर जबाबदारी आली. शिक्षक कसा असावा? उत्तम शिक्षक म्हणजे काय? त्याला आवश्यक गुणसंपदा कोणत्या? यावर लक्ष केंद्रित करून शिकवण्याबरोबरच स्वत:ची शैक्षणिक गुणवत्ता वाढवून विद्यार्थी व शिक्षकांपुढे एक आदर्श निर्माण केला. अतिशय तरुण वयात एम.फिल. आणि पीएच.डी पूर्ण करून महाविद्यालयात पहिले डॉक्टर होण्याचा मान मिळविला.

**डॉक्टर ऑफ डॉक्टर्स :**

सरांनी पीएच.डी पूर्ण केल्याबरोबर महाविद्यालयात एम.ए.मराठी अभ्यासक्रम सुरू केला आणि ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना एम.ए. करण्याची संधी उपलब्ध करून दिली. दरम्यान त्यांना एम.फिल. व पीएच.डी साठी पुणे विद्यापीठाची गाईडशीप मिळाली आणि त्यांच्या ज्ञानाच्या व अनुभवाच्या कक्षा रुंदावत गेल्या. महाराष्ट्रातील कानाकोप-यातून विद्यार्थी पीएच.डी साठी त्यांच्याकडे येऊ लागले. कठोर परिश्रम, प्रचंड इच्छाशक्ती आणि सहकारी वृत्ती यामुळे आत्तापर्यंत सरांच्या मार्गदर्शनाखाली २० विद्यार्थ्यांनी एम.फिल व पीएच.डी. पूर्ण केलेली आहे हा एक उच्चांकच म्हणावा लागेल. सरांचा संशोधनाचा विषय ग्रामीण साहित्य आहे परंतु त्यांनी संत साहित्य, दलित साहित्य, लोककला, आदिवासी साहित्य इ. विषयावर मार्गदर्शन करून सर्वांगीण ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या प्रिय विद्यार्थ्यांनी व सहकारी शिक्षकांनी आणि मित्र परिवाराने त्यांना बहाल केलेली 'डॉक्टर ऑफ डॉक्टर्स' ही पदवी त्यांच्याबाबतीत सार्थ ठरते.

**ग्रंथसंपदा :**

पदवीपूर्व आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांना नियमित शिकविणे, महाविद्यालयातील अभ्यासेतर विविध विभाग सांभाळणे आणि एम.फिल, पीएच.डी. साठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे, याबरोबरच त्यांनी पुस्तकलेखन सुद्धा चालू ठेवलेले आहे आत्तापर्यंत त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. मराठी कादंबरीतील प्रादेशिकता, समीक्षा- संकल्पना आणि स्वरूप, व ग्रामीण साहित्य-स्वरूप व चिकित्सा ही त्यांची प्रकाशित झालेली प्रमुख पुस्तके होत. त्यांनी संपादित केलेल्या अनेक ग्रंथांचा विविध विद्यापीठात संदर्भग्रंथ म्हणून समावेश झालेला आहे. विविध पुस्तके, नियतकालिके व अनियतकालिकांतून त्यांचे अनेक लेख प्रसिद्ध झालेले आहेत तसेच त्यांच्या ग्रंथांना अनेक पुरस्कारही मिळालेले आहेत.

**माणसे जोडणारा मित्र :**

स्वत: काय मिळविले, स्वत:साठी काय केले यापेक्षा इतरांसाठी काय केले यावरच माणसाचे मोठेपण आणि आनंदही अवलंबून असतो,हे सरांचे तत्त्वज्ञान. प्रा.अनंत कानेकर यांच्या ''दोन मेणबत्या या निबंधातील तत्त्वज्ञानाशी जुळणारे. 'स्वत:साठी जगला तो मेला आणि इतरांसाठी मेला तो जगला'. सरांचा मित्र परिवार संपूर्ण महाराष्ट्रभर पसरलेला आहे.अनेक विद्यापीठात व्याख्याने व विविध कमिट्यांमधून काम करण्याच्या निमित्ताने अनेक व्यक्तींशी परिचय झाला आणि परिचयाचे रूपांतर चिरंतन मैत्रीत. तरुणांपासून वृद्धांपर्यंत त्यांनी मित्र परिवार तयार केलेला आहे. डॉ. द. ता. भोसले, प्राचार्य रा. रं. बोराडे, नटरंगकार आनंद यादव, डॉ. यशवंत मनोहर, माजी कुलगुरू डॉ. नागनाथ कोतापल्ले गुरुजी तसेच नवकथाकार, नवकवी सर्वांशी स्नेहाचे संबंध निर्माण करून त्यांच्याशी नियमित संपर्क ठेवलेला आहे. हे संबंध केवळ औपचारिक नसून अगदी घरगुती स्वरूपाचे आहेत. अनेक व्यक्तींना व संस्थांना केवळ शैक्षणिक मदतच नाही तर आर्थिक मदत सुद्धा सर निरपेक्षपणे करीत असतात. या उक्ती प्रमाणे प्रत्येक गोष्टीची सुरुवात सरांची स्वत:पासून असते. विद्यापीठ स्तरीय, राज्यस्तरीय, राष्ट्रीयस्तरीय चर्चासत्रांचे आयोजन करून सतत प्रवाहात राहणे. तसेच युजीसीचे मायनर, मेजर प्रोजेक्ट मिळवून सतत संशोधन वृत्ती जोपासणे, विद्यापीठाच्या विविध समित्यांवर काम करून माहिती अद्ययावत ठेवणे, सतत वाचन- चिंतन करून ग्रंथलेखनाद्वारे आपले अनुभव इतरांपर्यंत पोहचविणे यामध्ये ते सतत व्यस्त असतात.

**सन्मान :**

विद्यार्थी शिक्षक यांच्यातील समन्वयक, नि:पक्ष मूल्यांकन कार्य, कुशल व्यवस्थापक, शिस्तप्रिय प्रशासक, उत्तम चिकित्सक आणि कुशल संघनेता इ. गुणांमुळेत्यांना काही काळ याच महाविद्यालयात प्राचार्य म्हणूनही संधी मिळाली. उत्तम शिक्षकाला सामाजिक भान असणे अत्यंत आवश्यक असते.शिक्षकाच्या गुणवत्तेत भर घालणारा हा सर्वात महत्त्वाचा गुण आहे आणि याच गुणामुळे सरांनी अल्पकाळात खूप लोकप्रियता मिळविली. त्यांच्या काळात महाविद्यालयाचे प्रथमच मूल्यांकन होऊन B+ ग्रेड मिळाली. त्यांच्या गुणांचा गौरव म्हणून त्यांना महाविद्यालयाचा सहकार महर्षी दादासाहेब काळे आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला तसेच पुणे विद्यापीठाने सुद्धा त्यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित केले. महाविद्यालय तसेच विद्यापीठ पातळीवर अनेक समित्यांमध्ये व पुणे विद्यापीठ मराठी अभ्यास मंडळ सदस्य म्हणून त्यांना काम करण्याची संधी मिळालेली आहे तसेच साहित्य अकादमी पुरस्कार निवड समिती सदस्य म्हणून त्यांची निवड केली गेली हा त्यांचा बहुमानच आहे.सरांची ही यशस्वी वाटचाल अशीच चालू राहो, हीच सदिच्छा!

# प्रा. डॉ. भास्करराव शेळके

**प्रा. सयराम शेळके**

प्रा.डॉ. भास्करराव शेळके हे माझे ज्येष्ठ बंधू. मी सर्वात धाकटा, मध्ये तीन बहिणी, आम्ही सर्व भावंडे त्यांना अण्णा म्हणतो, ते संगमनेर येथे शिक्षणासाठी राहत असायचे. मला बालपणी त्यांचा सहवास लाभला नाही. मी. इ. ८वी मध्ये शिक्षण घेत होतो. त्यावेळी त्यांचं लग्न झालं. ते शिवछत्रपती कॉलेज, जुन्नर येथे त्यावेळी प्राध्यापक पदावर नोकरीस रुजू झाले. वहिनीला घेऊन ते आडगांव (आमचे मूळ गाव) येथे आलें तेव्हा पाचटाने शेकारलेले दोन खोल्यांचे घर होते. त्यांनी कुटुंबाकडे पूर्ण लक्ष दिले. त्यानंतर दोन बहिणींचे लग्न झाले. त्यामध्ये जवळपास सर्व आर्थिक भार त्यांना सांभाळावा लागला. जिरायत शेती व उत्पन्नाचे वेगळे काहीच साधन वडिलांकडे उपलब्ध नव्हते.

त्यांचे नोकरीचे पहिले किमान १२ वर्षे ते वहिनींसाठी व मुलांसाठी कुठलीही हौस पुरवू शकले नाहीत. दरम्यान मी इ. १० वी पास झाल्यानंतर मला शिक्षणासाठी ते जुन्नर येथे त्यांच्याच महाविद्यालयात घेऊन गेले. तेथून पुढे माझे एम.एस्सी. बी.एड. पर्यंतचे पूर्ण शिक्षण त्यांनीच केले. मी खेडेगावातून शहरात गेलो पण मला कधीच त्यांच्याकडून रितेपणाची जाणीव झाली नाही. त्यांना दोन मुलं झाली. मोठा अभि (दादू) व छोटी तेजू. दोघे ही माझे खूप लाडके. अभि मी रागावल्यानंतर घाबरत असे, तेजू मात्र कधीच घाबरली नाही. मला काकाचा अपभ्रंश करून चिडवायची. जेवण मात्र माझ्याच ताटात एकत्रच करणार. तेजूमुळे कुटुंबात खऱ्या अर्थाने आनंदाची लयलूट झाली. वहिनी त्यांना आम्ही आक्का म्हणतो, त्या मामाची मुलगी आहेत. त्यामुळे त्यांनी कधी परकेपणा येऊच दिला नाही. मुलाप्रमाणे सांभाळले. कॉलेजात असल्यामुळे भरपूर मित्र घरी येत असत. सर्वांनाच आवडीने खाऊ-पिऊ घालत. माझे मित्र घरी येण्यास त्यामुळे फारच उत्सुक असत. चार वर्षे तेथे महाविद्यालयीन शिक्षण घेतल्यानंतर मी ओतूर येथे भौतिकशास्त्र विषय स्पेशल घेण्यासाठी गेलो. अण्णा तेथे एम.ए.साठी एक विषय शिकवण्यास येत.

बरोबर वहिनींनी बनवून दिलेला माझ्यासाठी व मित्रासाठी डबा असे. आयुष्यात अण्णा वहिनींनी संधी तर दिलीच त्याचबरोबर चांगले संस्कारही दिले व आरामी जीवनाची सवय लागणार नाही याची पुरेपूर काळजी घेतली.

वयाच्या सोळाव्या वर्षापासून आजपर्यंतचा माझा जीवनपट पूर्णपणे अण्णांबरोबर गुंफलेला आहे. ओतूर येथून बी.एस्सी. पूर्ण करून पुढील शिक्षणासाठी मला पुणे विद्यापीठात पाठवले. एम.एस्सी. पूर्ण करण्यासाठी. हे शिक्षण खूपच खर्चिक होते. जेवण, राहणे, शैक्षणिक शूल्क, पॉकेटमनी इ. साठी खूपच खर्च येत होता. परंतु अण्णांकडून पैसे देताना कधीच कमतरता आली नाही. मी एम.एस्सी. द्वितीय वर्षामध्ये असताना ते पीएच.डी. साठी एक वर्षाची पगारी रजा घेऊन पुण्यात आले. कुटुंब सांगवी येथे राहत होते. त्यांचे पुण्यात येणे माझ्यासाठी व मित्रांसाठी पर्वणीच ठरले. जेवणाची खास व्यवस्था झाली. फिरण्यासाठी त्यांची दुचाकी मिळाली. पुणे शहर पूर्णपणे दुचाकीवरून धुंडाळले. असा कोणताही विभाग नाही जो बघितला नाही. काही गमतीशीर प्रसंगही आले. तत्कालीन राष्ट्रपती पुणे विद्यापीठात आले असता मी माझ्या मित्रासह वेगाने दुचाकी वरून चाललो असता पोलिसांनी पकडले. पालक आल्याशिवाय सोडणार नाही असे बजावले. मग बंधू त्यांच्या एका मित्राला घेवून आले व आमची सुटका झाली. अण्णा पीएच.डी. झाल्यानंतर लोकनेते मा. खासदार बाळासाहेब विखे पाटील यांच्या शुभहस्ते आमच्या गावात त्यांचा भव्य सत्कार झाला. त्यानंतर त्यांनी यशाचे एक एक शिखर गाठले. आज ते त्यांच्या महाविद्यालयाच्या एल.एम.सी. चे सदस्य आहेत. पतसंस्थेचे चेअरमन आहेत, शिवाजी मराठा शिक्षण संस्थेचे सदस्य तसेच पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे सलग १० वर्षे सदस्य आहेत. विविध क्षेत्रातील १३ विद्यार्थी पीएच.डी. झाले.

बी.एड.ला ॲडमिशन असताना लोकसेवा आयोगाच्या परीक्षेचा अभ्यास सुरू केला. पुढे लगेच चाचणी परीक्षा व मुख्य परीक्षा प्रथम प्रयत्नात पास झालो. हा काळ प्रचंड तणावाचा होता. अण्णा वहिनी भक्कमपणे पाठीशी होते. पुस्तकांसाठी खर्च खूप येत होता. मुलाखतही चांगली झाली. परंतु सहा गुण कमी मिळाल्यामुळे संधी गेली. मी खूप निराश झालो. अण्णांकडून योग्य पाठबळ व मार्गदर्शन मिळाल्यामुळे पुन्हा जीवनात सक्षमपणे उभा राहिलो. आज कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापक व उप-प्राचार्य म्हणून काम करतो. बंगला, चारचाकी गाडी, या गोष्टीचा हव्यास कधीच नव्हता तरी सर्व काही मिळाले.

अण्णांमुळे हे आयुष्य सुखात व्यतित करत आहे. जेव्हा पाठीमागे वळून जीवनाकडे पाहतो तेव्हा असे वाटते की, आपल्याला ही शिक्षणाची सुवर्णसंधी मिळाली नसती तर काय झाले असते. व मी कुठे असतो.

आज ग्रामीण कुटुंबातली काही मुले चांगल्या नोकऱ्यांमध्ये / व्यवसायात गेल्यानंतर कुटुंबाकडे लक्ष देत नाहीत. गावाकडे येण्याचे टाळतात. गावाकडील गावंढळ माणसे नकोशी वाटतात. स्वत:ची बायको मुलेच त्यांना सर्वस्व वाटतात. स्वत:साठी सुख सोयी निर्माण करण्यात धन्यता मानतात. आपल्या माणसांना पूर्णपणे विसरून जातात. अण्णा वहिनींनी असे केले असते तर मला वाटते आमचे आई वडील, मी, बहिणी आज जे सुखाचे आयुष्य जगतो ते कदाचित शक्यच झाले नसते. रोजी रोटीसाठी संघर्ष करण्यातच आयुष्य गेले असते. प्रतिष्ठित शाळेत मुलांचे शिक्षण झाले नसते. पत्नीची हौस कधीच पूर्ण होऊ शकली नसती. आई वडिलांना उतारवयात कष्ट करावे लागले असते.

अण्णांचे गुण दोष शोधण्याइतका मी मोठा नाही. तरी सुद्धा शिक्षणामुळे जी थोडीसी प्रतिभा आहे. त्याद्वारे जेव्हा मी पाहतो. त्यावेळी मला त्यांच्या व्यक्तिमत्त्वात अतिशय जलद निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी कितीही कष्ट पडले तरी करणे हा गुण ठळक दिसतो. त्यामुळेच ते कमी वयात एम.फिल. पीएच.डी. झाले. अनेक पुस्तके लिहून झाली. प्रतिष्ठित संस्थांचे पुरस्कार मिळाले. त्यांच्या कष्टांचे चिज झाले.

अण्णांच्या स्वभावात असणारे ग्रामीण शहाणपण त्यांनी घेतलेल्या निर्णयामध्ये मला दिसून येते. महाविद्यालयात प्राचार्य म्हणून दोन वर्षे त्यांनी काम पाहिले. तत्कालीन व्यवस्थापन मंडळाला त्यांच्या सोयीच्या असलेल्या प्राचार्यांची नेमणूक करावयाची होती. संबंधित व्यक्तीने पीएच.डी. सुद्धा केलेली नव्हती. अण्णांची निवड विद्यापीठाच्या तज्ज्ञ समितीने केलेली होती. तरी सुद्धा अण्णांनी प्राचार्यपदाचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतला.

माझी जेव्हा उप-प्राचार्य पदी निवड झाली तेव्हा पद स्वीकारण्यासाठी माझी मानसिकता नव्हती. मी नकार कळविण्याचा विचार करत होतो. त्यांनी मला माझ्या निर्णयापासून परावृत्त केले. जेव्हा आपल्याला काम करण्याची संधी मिळते तेव्हा उत्कृष्ठ काम सर्वांच्या स्मरणात राहील असे करावे. जेव्हा मतभेद होतील तेव्हा पदत्याग करावा असे सांगितले. त्यांचा सल्ला मला निश्चितच लाभदायक ठरला.

माझी पुतणी तेजू हिचे झालेले आपत्कालीन निधन हे आमच्या कुटुंबावर व अण्णा-वहिनींवर आलेले सर्वात मोठे संकट. काही काळ सर्वजण

पूर्णपणे खचून गेलो होतो. वहिनींची अवस्था तर खूपच बिकट होती. सर्वांना सावरण्याचे काम अण्णांवरच होते. स्वत:ची कन्या कायमस्वरूपी ह्या जगातून गेलेली असताना त्यांनीच कुटुंबाला सावरले. एक छान समाधी मंदिर बांधले. श्री शिवछत्रपती महाविद्यालय इमारत बांधकामासाठी १,२५,०००/- देणगी दिली तसेच असंख्य संस्थांना देणग्या दिल्या पद्मश्री विखे पाटील वाङ्मय पुरस्कारची रक्कम आमच्या आडगावच्या शाळेसाठी स्वत:ची रक्कम घालून दिली. माझ्या मुलाचे खूप लाड करून, त्यांना खूप प्रेम देऊन त्यांनी मनातल्या दु:खाला विसरण्याचा प्रयत्न केला.

माझा पुतण्या अभि अभ्यासाकडे दुर्लक्ष करतो आहे, हे लक्षात आल्यानंतर मी त्याला माझ्याकडे ठेवण्याचा निर्णय घेतला. जुन्नरला अण्णा, वहिनी दोघेच राहिले. एकटेपणा आला. तरी सुद्धा त्यांनी होकार दिला. आज तो चांगल्या मार्कांनी पदवीधर होऊन लवकरच एम.डी. पूर्ण होईल. लवकरच तो शिक्षण पूर्ण करून सेवाभावी व्यवसायात उतरेल. माझी थोडीसी कडक शिस्त अभिने चालवून घेतली. कधी तक्रार केली नाही. कारण त्याच्यावरती झालेले चांगले संस्कार.

कुटुंबात पैसे देत असताना किंवा पैसे मागितल्यानंतर अण्णा सांगतात घे खिशातून हवे तेवढे. मी विद्यार्थी होतो तेव्हा मला नेहमी वाटायचे की ते असे का करतात. नंतर मला कळले की, ते जबाबदारीची जाणीव निर्माण व्हावी म्हणून असे करतात. त्यामुळे मी कमवायला लागल्यानंतर हीच पद्धत चालू ठेवली. कुटुंबात ज्यांना पैसे हवे असतील त्यांनी स्वत:च्या हाताने घ्यायचे जेवढे हवे असतील तितके.

अण्णांच्या स्वभावात मुळातच प्रांजळपणा आहे. जेव्हा दोघे बंधू गप्पांमध्ये असतो तेव्हा म्हणतात मला असे कधीच वाटले नव्हते की, आपल्याला व आपल्या कुटुंबाला इतके चांगले दिवस पाहायला मिळतील. आपण कष्टाने सधन झालो असतो, तरी आपल्याला संधी मिळावी म्हणूनच बंगला, गाडी ह्या गोष्टी आपल्याला मिळाल्या असे ते मानतात.

त्यांच्या मित्रांबरोबर/सहकाऱ्यांबरोबर बोलत असताना असे जाणवते की, अण्णांचा स्वभाव थोडासा उतावीळ आहे, असे सांगण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. मला असे कधीच जाणवत नाही. कारण अतिशय जलद विचार करण्याची कुवत त्यांच्यामध्ये मी पाहिलेली आहे. कदाचित त्वरित निर्णय घेण्याच्या त्यांच्या पद्धतीमुळे बरोबरच्या माणसांची थोडीशी धावपळ होत असेल, कोणतेही उद्दिष्ट्य, निर्णय प्रलंबित ठेवून पूर्ण होत नसतात हे अधिकारी पदावर काम करताना मी स्वत: अनुभवले आहे.

कुटुंबवत्सल व प्रेमळ स्वभाव, मुलांचे खूप लाड करणे, मुले सांगतील तसे बिनधास्त करणे, आवश्यक तेवढी धावपळ करण्याची कायमस्वरूपी तयारी यामुळे कुटुंबात व नातेवाईकांमध्ये ते खुप प्रिय आहेत. सर्वांसाठी खर्च करण्यात ते व वहिनी आघाडीवर असतात. त्यामुळेच आजपर्यंत कुठलीही रक्कम त्यांच्या बँक खात्यामध्ये शिल्लक नसते. मी त्यांना नेहमी सांगतो कमीत कमी सेवानिवृत्ती नंतर मिळणारी रक्कम तरी स्वत:साठी व वहिनींसाठी शिल्लक ठेवा. नेहमीच देण्याची सवय असल्यामुळे कुठपर्यंत ऐकतील याबाबत मी साशंक आहे.

उमेदीच्या काळात खूप कष्ट केल्यामुळे पन्नाशीनंतर डोकावणारे शारीरिक आजार त्यांच्यामध्ये दिसून येतात. विशेषत: रक्तदाबाची समस्या त्यांना जाणवते. त्यामुळे योग्य ते औषधपाणी त्यांना घ्यावे लागते. त्यांनी चारचाकी वाहन स्वत: जास्त अंतर चालवू नये यासाठी आमच्याकडूनही त्यांच्यावर थोडेसे बंधन घातले जात असते. त्यांना चालण्याचा व्यायाम करण्याचा आग्रह धरला जातो आहे. जास्त काही विरोध न करता ते सुद्धा आवश्यक ती काळजी घेतात असे दिसते.

मी ज्या नामांकित संस्थेमध्ये नोकरी करतो त्या संस्थेकडून नेहमी त्यांना व्याख्यानासाठी आमंत्रित केले जाते. असेच एका शाखेत भाषणात आपण पद्‌मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांच्या सारख्या थोर व्यक्तींची जयंती का साजरी करतो हे विशद करत असताना त्यांनी श्रोत्यांना विचारले की, ''वाळू तस्करांची जयंती साजरी केली तर आपणांस चालेल का?'' आज काल नदीकाठच्या गावी वाळू तस्करांची दादागिरी चालू असते. त्या गावातील ग्रामस्थ, शिक्षक व विद्यार्थी आजही अण्णांच्या निर्भीडपणाचे व विषयाचे निरूपण करण्याचे विशिष्ट पद्धतीने कौतुक करतात.

अण्णांच्या आयुष्यामध्ये आलेल्या प्रत्येक संकटातून पुढे जाताना त्यांना फिनिक्स पक्षासारखी भरारी घेताना मी पाहिले आहे. प्राचार्य पदाचा राजीनामा दिल्यानंतर पुढे लगेच पुणे विद्यापीठाचा ''आदर्श शिक्षक'' पुरस्कार मिळाला हे त्यांचे एक उत्तम उदाहरण. हा पुरस्कार मिळणारे ग्रामीण भागातील ते पहिले प्राध्यापक आहेत. पुरस्काराच्या रक्कमेइतकी स्वत:ची रक्कम घालून मुलीच्या नावाने 'आदर्श प्राध्यापक पुरस्कार' त्यांच्या कॉलेजमध्ये २००८ पासून सुरू केला.

त्यांना फिरायला खूप आवडते त्यांच्याबरोबर ते आम्हालाही घेऊन जातात. त्यामुळे माझ्या ११ वर्षांच्या वैष्णव याने अर्ध्यापेक्षा जास्त महाराष्ट्र आत्ताच पाहून घेतला आहे. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले डॉ. रा.रं. बोऱ्हाडे, डॉ.

द.ता. भोसले, डॉ. मनोज तायडे, डॉ. प्रतिमा इंगोले यांच्या सारखे थोर व्यक्तीच्या सहवास वैष्णव यास बालपणीच लाभला. त्यांचेकडून प्रेरणा मिळाली ती केवळ अण्णांमुळेच.

आज माझे व अण्णांचे आई वडिलांसहित एकत्रित कुटुंब आहे. मी माझ्या लग्नाच्या वेळीच निर्णय घेतलेला आहे की, हे कुटुंब आमच्या दोन बंधुच्या ह्यातीत एकत्रित राहील. आमचे दोन्ही कुटुंब कधीच विभक्त करणार नाही. पैसा व संपत्तीचा जास्तीचा हव्यास नसल्यामुळे ते आम्हाला शक्य होईल असे मनोमन खात्री वाटते.

आमच्या लाडक्या अण्णांसाठी मी देवाकडे दीर्घायुष्य मागून त्यांचा कुटुंबप्रमुख म्हणून आम्हाला नेहमी सहवास लाभावा अशी प्रार्थना करतो. त्यांच्याकडून उत्तरोत्तर आणखी संशोधन कार्य होईल व अनेक विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होईल याबद्दल मला खात्री आहे.

अण्णांच्या भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

# अभिचे पप्पा

सौ. तारादेवी भास्कर शेळके

१९८५ साली लग्न होऊन शेळके पाटलांची सून झाले. आत्याच्या घरातच दिलेले असल्यामुळे सर्व माणसं अगोदरपासून माहीत होती. सासूबाई म्हणजे दुसरी आईच. पुढे १९९८ मध्ये धाकटी बहीण जाऊबाई झाली. धाकटे दीर जुन्नरलाच आमच्याकडे शिकले. सर्व कसे ओळखीचे, परिचयाचे. हे शिकलेले, मी कमी शिकलेली. पण त्यांच्या सहवासात आल्यानंतर त्यांच्यापेक्षा जास्त पुस्तके वाचली. यांचे शिक्षण सतत चालू. लग्न झाल्यानंतर एम.फिल., पीएच.डी.चा अभ्यास केला. तो संपतो न संपतो, तोच दिल्लीहून प्रोजेक्ट मंजूर झाला, दुसरा झाला, तिसरा मंजूर झाला. मेजर, मायनर, बी.सी.यु.डी. प्रोजेक्टचे काम सतत चालूच. वेळ म्हटलं तर तोळामासा. जे करायचे ते मनापासून. मग घरात लक्ष कसे राहील? कधी पिशवी घेऊन बाजारात नाही, कधी दळण नाही, मुलांना सांभाळणं नाही. शिस्त खूप, पण ती बाहेर. घरात १००% बेशिस्त. कपडे कुठे, तर पुस्तके कुठे. मी आपली आवरायची. थोडं काही म्हटलं की चिडचिड. आता सवय झाली. कशाचच काही वाटत नाही. पूर्वी खूप भीती वाटायची. अलीकडे बहुतेक त्यांनाच भीती वाटत असावी.

जेवढे शिस्तीचे तेवढेच हळवे, मुलांवर प्रचंड प्रेम. त्यात मुलगी गेल्यापासून तर अधिक हळवे झालेले. मुलगा बाहेर गेला तर त्याच्या येण्याकडे डोळे लावून बसणार. आत बाहेर करणार. घालमेळ, घालमेळ.

बाईच्या जातीला सवत खपत नाही. पण मला एक ना दोन, डझनभर सवती. गैरसमज नको. पण संशोधन, शिक्षण या माझ्या प्रमुख सवती. तर संशोधक विद्यार्थी-विद्यार्थिनी या माझ्या आणखी सवती. माझ्यासाठी वेळ नाही. संशोधन, शिक्षणासाठी आहे. विद्यार्थ्यांचे प्रबंध तपासण्यासाठी वेळ आहे. वाचनाचं-लेखनाचं वेड अफाट. पण घरातल्यांसाठी वेळ मर्यादितच. तक्रार नाही, पण आता पुरे झालं. अपेक्षेपेक्षा जास्त मिळालं. प्रकृतीकडे लक्ष

दिलं पाहिजे, डोळ्यांना विश्रांती दिली पाहिजे, शांतपणे राहिलं पाहिजे असे वाटते. पण ते या जन्मी शक्य दिसत नाही.

काय मिळायचं राहिलं. अल्पवयातच लग्न, एम.फिल.,पीएच.डी. झाले, प्राचार्य झाले, सर्वोच्च आनंदाचा क्षण म्हणजे पुणे विद्यापीठाने 'आदर्श प्राध्यापक पुरस्कार' देऊन सन्मानित केले. दादासाहेब काळे यांच्या नावाचा 'गुणवंत आदर्श पुरस्कार' लाभला. रोहमारे पुरस्कार, पद्मश्री विखे पाटील पुरस्कार मिळाले. १०-१२ पुस्तके प्रकाशित झाली. पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळावर दोन वेळा निवडून आले. निरपेक्ष वृत्तीने काम केल्यामुळे शिवाजी मराठा शिक्षण संस्थेवर निमंत्रित म्हणून काम करण्याची संधी मिळाली. बाकी लोकांसाठी काम करायला, पुरस्कार मिळायला जागा हव्यातच ना? आपल्याच झोळीत सगळे कशाला? दुसऱ्याला मिळणे बाकी, त्यांच्यासाठी त्याग हवाच!

घरातल्यांबरोबर मी देखील त्यांना 'अण्णा' म्हणते. अलीकडे त्यांच्या कामाचा पसारा खूपच वाढला. मुलीच्या स्मरणार्थ वेगवेगळ्या ठिकाणी देणग्या दिल्या, पुरस्कार ठेवले. पण घरात माहिती नाही. या वर्षी तिच्या नावाने 'शब्दश्री प्रकाशन' सुरू केले. नवोदितांचे लेखन प्रस्थापित प्रकाशक छापत नाहीत. त्यात व्यवहार आला. मग त्यांचे कोण छापणार. मग सुरू केले प्रकाशन. दिल्लीला नोंदणी, पत्रव्यवहार, रोजची गडबड. थांबणे माहिती नाही. सांगून थांबणार नाही. बरं चाललंय, चारचौघांसारखा संसार आहे. घर, गाडी. घोडं सर्वच मिळालं. विमानप्रवास झाला. बेंगलोर, म्हैसूर, उटी, बालाजी, दिल्ली, आग्रा, हरिद्वार, ऋषीकेश, हैद्राबाद झालं. महाराष्ट्रभर भ्रमंती झाली. युरोप दौरा करावं वाटतं. पण बघुया, नशिबात असेल तर नाहीतर राहिलं. काय हवय मला? मुलगा एम.डी. होतोय. खर्च करायला, कर्ज काढायला मागे हटत नाहीत. घरच्यांची-नातेवाईकांची सर्व जबाबदारी माझ्यावर टाकून त्यांचे 'उद्योग' चालूच आहेत. बस त्यांच्या भावी वाटचालीस माझ्या हार्दिक शुभेच्छा!

# माझे पप्पा, माझे फ्रेंड, फिलॉसॉफर आणि गाईड

डॉ. अविनाश शेळके

मी डॉ. अविनाश शेळके, घरी मला सर्वजण अभि/दादू म्हणतात मी आज माझे वडील डॉ. भास्कर शेळके यांच्याविषयी थोडेसे हितगुज करणार आहे, परंतु शेळके सर म्हणून नव्हे, तर माझे वडील (पप्पा) म्हणून.

पप्पांचा जन्म अत्यंत सर्वसाधारण कुटुंबात झाला. आजी-आजोबा काबाडकष्ट करत असे. पप्पा घरात सर्वात मोठे, त्यानंतर तीन बहिणी (विमल, तारा, जिजा) आणि सर्वात छोटे भाऊ सयराम अशी ही पाच भावंडे.

पप्पांचे पहिली ते सातवी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण आमच्या गावी आडगाव येथे झाले. त्यानंतर पुढील शिक्षणासाठी संगमनेर येथे आले. संगमनेर येथे त्यांनी एम.ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. पप्पांचे मामा संगमनेरचेच मेससाठी पैसे नसल्यामुळे जेवणाचा डबा सकाळी मामांच्या घरून येत असे. सकाळी आलेला डबाच पुन्हा ते सायंकाळी खात असत. सायंकाळच्या जेवणात भाजी नसे म्हणून एस.टी. स्टँड च्या कॅन्टीनमध्ये उरलेली भाजी आणत. अशाप्रकारच्या हलाखीच्या परिस्थितीत एम.ए. चे शिक्षण पूर्ण केले.

पुढे त्यांना जुन्नर येथे १९८४ साली प्राध्यापक म्हणून नोकरी लागली. १९८५ साली लग्न झाले. नोकरीत कायम होण्यासाठी एम.फिल. करणे गरजेचे होते. सकाळी कॉलेज करून पुण्याला जाण्यासाठी परस्पर एस.टी. स्टँड वर जात. मम्मी जेवणाचा डबा करून एस.टी. स्टँड वर पोहचवत असे. पप्पांनी चिकाटीने एम.फिल. पूर्ण केले.

१९८६ ला माझा जन्म झाला. माझ्यापेक्षा ३ वर्षांनी लहान माझी बहीण होती, घरात सर्वांचीच खूप लाडकी होती, परंतु ३ वर्षांची असताना तिचा आकस्मिक मृत्यू झाला. या दुर्घटनेनंतर आम्हा सर्व कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला. आम्ही सर्वचजण Collapse झालो. परंतु पप्पांनी सर्वांना धीर दिला, सर्व कुटुंबीयांना सांभाळले.

पुढे पप्पांनी हे सर्व दु:ख विसरण्यासाठी पीएच.डी. करण्यासाठी पुण्याला जाण्याचा निर्णय घेतला. आम्ही सर्वजण पुण्यात स्थायिक (काही काळासाठी) झालो. जीवन पुन्हा एकदा पूर्वपदावर येऊन सुरळीत झाले. परंतु ताईच्या जाण्याने सर्वांच्या अंत:करणावर खोलवर जखम झाली, ती कधीही भरून येण्यासारखी नव्हती.

पप्पांचे पीएच.डी. पूर्ण झाल्यावर आम्ही पुन्हा-जुन्नर येथे राहण्यास आलो. तेव्हा मी चौथी इयत्तेत शिकत होतो. सातवी पर्यंतचे शिक्षण प्राथमिक शाळेत पूर्ण केले. ८ वी ते १० वी पर्यंतच्या शिक्षणासाठी मी आवटे शाळेत जाऊ लागलो. तो पर्यंत माझे काका (सयराम शेळके) शिक्षण पूर्ण करून प्रवरानगर येथे नोकरी निमित्त पी.पी.एस. ला रुजू झाले. १० वी ला मला मार्क कमी पडले म्हणून पप्पांनी मला काकांकडे शिक्षणासाठी पाठवण्याचा निर्णय घेतला. ११, १२ वीचे शिक्षण प्रवरानगर येथून पूर्ण केले. पप्पांना अभ्यासात किंवा शिक्षणास कामचुकारपणा केलेला चालत नाही, म्हणून त्यांनी मला काकांकडे पाठवले. पप्पा स्वत: उच्चशिक्षित असल्यामुळे माझ्या शिक्षणासाठी ते नेहमी तत्पर असतात आणि वेळप्रसंगी कठोर निर्णय ही घेतात. पण त्यावेळी त्यांनी योग्य निर्णय घेतला नसता, तर कदाचित आज मी उच्चशिक्षण घेऊ शकलो नसतो.

पप्पा पीएच.डी. झाल्यावर त्यांच्या प्राथमिक शाळेत गावकऱ्यांच्या वतीने मा. लोकनेते खा. बाळासाहेब विखे पाटल्यांच्या हस्ते सत्कार झाला. ''मराठी ग्रामीण कादंबरीतील प्रादेशिकता'' या पुस्तकासाठी रोहमारे पुरस्कार १९९८ साली प्राप्त झाला. त्यानंतर पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील पुरस्कार १९९८ साली मिळाला, त्यानंतर त्यांना अनेक पुरस्कार मिळत गेले. त्यांच्यामुळे हे सुखद अनुभव आम्ही सर्व कुटुंबीय अनुभवत गेलो.

मोठ्यांसाठी आदर, लहानांसाठी प्रेम, तत्परता, एखाद्या गोष्टीसाठी स्वत:ला वाहून घेण्याची पद्धत, आत्मविश्वास, सखोल विचार करण्याचा दृष्टिकोण, चिकाटी, प्रेमळपणा, श्रम करण्याची इच्छाशक्ती आदी गुण त्यांच्या अंगी ठासून भरलेले आहेत, त्यामुळे मला जर कोणी विचारले ''तुमची आदर्श व्यक्ती कोण?'' तर माझे उत्तर निश्चितच ''डॉ. भास्कर शेळके'' असेल.

त्यांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेत २००८ मध्ये पुणे विद्यापीठाने त्यांना ''आदर्श शिक्षक'' पुरस्कार देऊन यशोचित गौरव केला. सलग दोन वेळा पुणे विद्यापीठाच्या अभ्यास मंडळाच्या कार्यकरिणीवर ते निवडून गेले.

पुणे विद्यापीठाकडून पीएच.डी. मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळाली, आज त्यांचे १३ विद्यार्थी पीएच.डी. पूर्ण झाले आणि ५ विद्यार्थी पूर्ण होण्याच्या मार्गावर आहेत ही बाब आम्हा सर्व कुटुंबीयांच्या दृष्टीने गर्वाची आहे.

प्राचार्यपद भूषविण्याची संधी मिळाली. समर्थपणे पूर्ण केली. प्राचार्य पद सोडावे लागले याचे दु:ख ते करीत बसले नाहीत. उपक्रमशीलता त्यांच्या रक्तात असल्यामुळे यु.जी.सी.चे तीन मेजर प्रोजेक्ट, एक मायनर प्रोजेक्ट व पुणे विद्यापीठाचा प्रोजेक्ट पूर्ण केला.

पप्पांचा हा सर्व शैक्षणिक, सामाजिक आलेख उंचावत असताना त्यांना यशायोग्य आणि मोलाची साथ दिली, ती माझ्या मम्मीने हे विसरून चालणार नाही. मम्मी म्हणजे मायेचा, प्रेमाचा सागर आहे. कधीही कोणाला दु:खवणार नाही. सर्वांना प्रेमाने जवळ करणार. कधीही कोणत्याही गोष्टीचा हव्यास केला नाही. मम्मीने सर्व कुटुंबाचा गाडा ओढण्यात पप्पांना यथोचित साथ दिली.

लग्नावेळी परिस्थिती हलाखीची होती. पप्पांचा जेमतेम पगार, त्यातच सर्व कुटुंब चालवणे, काकांच्या शिक्षणासाठी पैसे देणे आणि उरलेल्या पैशातून घरखर्च भागविणे. त्यामुळे स्वत:साठी कधी पैसे उरत नसत, पण मम्मीने कधीही कुरकुर केली नाही.

घरात मला सगळ्यात जवळ कोणी असेल, तर ती आहे मम्मी. मी एकटाच असल्यामुळे सर्व हितगुज मम्मीजवळ सगळ्या घरातल्या प्रकरणात मध्यस्थी मम्मी, त्यामुळे ती आई म्हणून प्रेमाने जवळ पण घेते आणि कधी मैत्रीण म्हणून समजून पण घेते. अशाप्रकारे माझ्याबाबतीत आई आणि मैत्रीण असे दोन्ही पात्र ती वठवते.

पप्पांच्या सर्वांगीण विकासात महत्त्वाचा वाटा आहे, तो म्हणजे माझ्या आजी-आजोबांचा. निरक्षर आजी-आजोबा दोघेही निरक्षर पण त्यांना शिक्षण काळाची गरज याची जाण होती. हलाखीची परिस्थिती असतानाही पप्पांना शिक्षणासाठी बाहेर पाठविले. शिकविले, मोठे केल्याने ते आज समाधानी आहे.

त्यामुळे आजी-आजोबांनी हा उदार दृष्टिकोण दाखवला नसता, तर सुखासीन जीवन जे आज जगतो आहे ते मिळाले नसते, त्यामुळे मी आजी-आजोबांसमोर नतमस्तक आहे. माझ्या आईचे आईवडील म्हणजे माझे बाबा आजी आणि मामा यांनी प्रेमाने आश्रय दिला म्हणूनच पप्पांचे शिक्षण झाले, त्यांच्याबद्दल आमच्या सर्वांच्या मनात कृतज्ञतेची भावना आहेच. मामांच्या

किंवा आजोबांच्या सहकार्याची भावना मा. लोकनेते खा. बाळासाहेब विखे पाटील यांना समजली तेव्हा पप्पांच्या सत्कार प्रसंगी मा. विखे पाटील म्हणाले, "आजच्या काळात आधी मदत करणारे, दुसऱ्यास मदतीचे हात पुढे करणारे माणसं आहेत. ही अतिशय आनंदाची बाब आहे, त्यांचे सर्वांना मी धन्यवाद देतो."

वडील म्हणून माझ्या मनात सदैव आदरयुक्त भीती असते. परंतु त्यांच्या प्रेमळ स्वभावामुळे ते मला कधीच कोणत्याही गोष्टीत नाही म्हणत नाही, परंतु त्याचबरोबर मला जबाबदारीची आठवण करून द्यायला विसरत नाही.

माझ्या काका-मावशीचे माझ्यावर खूप प्रेम आहे. त्यांचा मुलगा वैष्णव सर्वात लहान आणि सर्वांचाच खूप लाडका आहे. तो फार हुशार आहे, त्यामुळे पप्पांची इच्छा आहे, त्याने योग्य शिक्षण घेऊन मोठे व्हावे.

# बाप माणूस

**श्री. विठ्ठल पांडे, तेजेवाडी, जुन्नर**

काही माणसं पहिल्याच भेटीत जाम का आवडतात आणि पुढेही भलतीच का आवडत राहतात हे एक कोडंच. डॉ. भास्करराव शेळके ही मला कायमच आवडतं आलेली एक भन्नाट व्यक्ती! तसा 'रूढ' अर्थानं मी काही डॉ. शेळकेंचा विद्यार्थी नाही. म्हणजे त्यांच्या पुढ्यात लेक्चरला मांड वगैरे ठोकून बसलेला. पण त्यांच्याकडून 'शिकलेला' मात्र खूपच.

डॉ. शेळकेंशी माझी पहिली भेट झाली ती कॉलेज कँटिनात. म्हणजे ते प्राध्यापकांच्या घोळक्यात. त्यांची साहित्यावर काहीतरी गरमागरम चर्चा चाललेली. डॉ. शेळके आपला मुद्दा ठासून मांडत होते. नेहमीच्या खर्ज्याच्या आवाजात. सोबतीला सिगारेटचे बेदरकार झुरके. काहीसा 'नगरी' जोश! मधूनच एखाद्या 'तास बुडव्या' पोराला आडवा-उभा तासत होते. शेळके एकदम 'अँग्री यंग मॅन' वाटले....... वाटत राहिले. मी त्या वेळी नुकताच डी.एड. चा दोन वर्षाचा कोर्स पूर्ण करून 'पुणे रिटर्न' झालेलो. म्हणजे कोणत्याही विषयावर आपण आपलं मत नोंदवलेच पाहिजे असा फुकाचा आत्मविश्वास घेऊन. जिथे तिथे 'साहित्यिक' आगाऊपणा करू लागलेलो. मी काहीबाही बोलून त्यांच्या गप्पांत चंचू प्रवेश केला. मनात म्हटलं, हा अपने काम की चीज है! (पुढे शेळकेंकडची अक्षरश: शेकड्यांनी पुस्तके वाचताना ही गोष्ट खरीही ठरली.)

मग डॉ. शेळकेंशी भेटी होत राहिल्या. कला मंडळात राडे करताना, कट्टवाचनात पाडगावकरांची 'सलाम' वाचून धमाल उडवून देताना. त्यांच्या घरच्या कादंबऱ्या पळवताना (कादंबरी म्हणजे शेळकेंचा जणू प्राणच!) त्या वेळेत परत केल्या नाहीत म्हणून ओरडा खाताना, साहित्यिक चर्चासत्रांत स्वयंघोषित स्वयंसेवकगिरी करताना (यात साहित्यिकांच्या 'बॅगा' उचलण्यापासून सर्व काही आलं.) एक मात्र खरं शेळकेंच आम्हां पोरांवर खरोखर प्रेम होतं. एखाद्या सहभागी प्राध्यापकाला समोर तासनतास उभे

करणाऱ्या शेळकेंची आमच्यावर मात्र मेहरनजर असायची. मग आम्हांलाही डॉ. शेळकेंचा कार्यक्रम म्हणजे घरचं कार्य वाटायचं.

पुढे आम्ही नोकरीला लागून पार वाया गेलो. भयानक पोटापाण्याच्या उद्योगाला लागून खलास झालो. एकदम बातमी कळली, डॉ. शेळके प्राचार्य झाले. आनंद वाटला. भेटायला गेलो. म्हटलं, चला आपले शेळके सर प्राचार्यांच्या खुर्चीत कसे दिसतात बघू. तर सर म्हणाले, बोल कोणाला चिठ्ठी देऊ? बहुतेक ओळखीचे लोक सरांच्या केबीनमध्ये येईना. एन.एस.एस., एन.सी.सी. व नॅक कमिटी. सरांपुढे बारा भानगडी. एकूण एका उत्तम साहित्यिकाला एका बिझी प्रशासकानं खाऊन टाकलेलं. दरम्यान त्यांचे मॅनेजमेंट वाल्यांशी काहीतरी खटके उडालेले. नाही तरी विहिरी खणून इथवर पोहचलेल्या स्वाभिमानी माणसाला नसत्या तडजोडी वगैरे स्वीकारणं मानवणारं नव्हतंच. डॉ. शेळके राजीनामा देऊन मोकळे झाले!

पण त्याने काय फरक पडतो. आम्हांला तरी शेळके प्राचार्य होते म्हणजे काय होते अन् प्राचार्य नाहीत म्हणजे काय नाहीत याच्याशी काही देण घेणं नाही. शेळके म्हणजे 'बाप' माणूस! ते १४-१४ तास मराठवाड्यात स्वत: ड्रायव्हींग करत जातील, परतून न थकता एखाद्या विद्यार्थ्यांच्या लग्नात हजेरी लावतील, नवीन लेखकाला शब्द टाकून प्रकाशक गाठून देतील, विद्यार्थ्यांच्या कविता मग त्या त्याच त्याच प्रेमकविता असल्या तरी डिटेक्ट करून देतील, सहकारी प्राध्यापकाच्या वैयक्तिक आयुष्यातला एखाद्या नाजूक प्रश्न सोडवतील, कामावर हजर नसलेल्या शिपायापर्यंत सेवक पतसंस्थेची भेट पोहचवतील. किती न काय काय.

राष्ट्रीय चर्चासत्रात साहित्यिकांच्या गराड्यातही जेव्हा सर नजरेनंच दखल घेतात तेव्हा खरंच खूप बरं वाटत. जेव्हा मी जरा फुशारकीनच 'नेमाडेंची मुलाखत घेतोय' असं सरांना सांगतो तेव्हा सर हसत. 'नाही रे बाबा, माझ्या एवढ्या मोठ्या लोकांशी ओळखी नाहीत' म्हणत मला जमिनीवर आणतात. शब्दश्रीच्या उल्लेखाने गहिवरतात. माळ्यावरची पुस्तकं मुलगा वाचणार नाही म्हणून खंतावतात.'

फोनवर 'बोल विठ्ठल' म्हणतात तेव्हा सर डॉक्टर नसतात, मराठी विभाग प्रमुख नसतात, विद्यापीठ अभ्यास मंडळ सदस्य नसतात तेव्हा सर फक्त आमचे शेळके सर असतात. अस्सल.......... 'बाप' माणूस!

# छायाचित्रे
# व
# परिचय


प्राचार्य डॉ.भास्कर शेळके
एम्.ए. एम्. फिल्. पीएच्.डी.



आई सौ. दुर्गाबाई आणि वडील श्री. त्रिंबक शेळके नातवंडांसमवेत




चिरंजीव डॉ. अविनाश व पत्नी सौ. तारादेवी समवेत डॉ. भास्कर शेळके



बंधु प्रा. सयराम शेळके पत्नी सौ. मिनाक्षी व चिरंजीव सुनीतसह



पीएच.डी. पदवी संपादन केल्याबद्दल आदरणीय गुरुवर्य प्रा. डॉ. आनंद यादव यांच्याहस्ते सत्कार स्वीकारताना (सन १९९५)



मौजे आडगाव, ता. राहाता, जि. अहमदनगर येथे डॉ. भास्कर शेळके यांनी पीएच.डी. कार्य पूर्ण केल्याबद्दल पद्‌मविभूषण खा. बाळासाहेब विखेपाटील यांच्याहस्ते सत्कारप्रसंगी आभार व्यक्त करताना (सन १९९५)



डॉ. वासुदेव मुलाटे, डॉ. द. ता. भोसले, प्राचार्य रा. रं. बोराडे व श्री. शिंदे कुटुंबीयासमवेत डॉ. भास्कर शेळके व सौ. तारादेवी शेळके



सन १९९८ साली डॉ. नागनाथ कोतापल्ले व श्री. अशोकराव रोहमारे यांच्या हस्ते रोहमारे पुरस्कार स्वीकारताना



डॉ. गंगाधर पानतावणे यांच्या हस्ते पद्मश्री विठ्ठलराव विखेपाटील पुरस्कार स्वीकारताना डॉ. भास्कर शेळके (सन १९९८)



डॉ. नरेंद्र जाधव (कुलगुरू, पुणे विद्यापीठ) यांच्या हस्ते पुणे विद्यापीठ आदर्श प्राध्यापक पुरस्कार स्वीकारताना (सन २००८). डावीकडून ॲड. संजय काळे, सौ. तारादेवी शेळके. उजवीकडून डॉ. विद्याधर पंडित आणि श्री. मोहन धारिया



पुणे विद्यापीठ आदर्श प्राध्यापक (सन २००८) पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल तत्कालीन मुख्यमंत्री (महाराष्ट्र राज्य) ना. श्री. विलासराव देशमुख यांच्याहस्ते सत्कार. सोबत आमदार वल्लभशेठ बेनके, गृहमंत्री आर.आर.पाटील व ॲड. संजय काळे सो.



पुणे विद्यापीठातर्फे आदर्श प्राध्यापक पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल डॉ. भास्कर शेळके यांचा सत्कार करताना श्री. शिवाजीराव काळे (संस्थापक अध्यक्ष, जुन्नर तालुका शिवनेर शिक्षण प्रसारक मंडळ, जुन्नर) आणि प्रा. अजित कोष्टी



डॉ. भास्कर शेळके यांच्या 'ग्रंथवेध' व 'मराठी प्रादेशिक कादंबरी' या ग्रंथांचे प्रकाशन करताना सुप्रसिद्ध विचारवंत श्री. भाई वैद्य आणि डॉ. नागनाथ कोतापल्ले (माजी कुलगुरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद).



## डॉ. भास्कर शेळके

१. नाव :- डॉ. भास्कर त्रिंबक शेळके
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख,
श्री शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर, जि. पुणे

२. जन्मदिनांक :- १ जुन १९६१

३. शैक्षणिक अर्हता :- एम.ए., एम.फिल., पीएच.डी.

४. सेवा कालावधी :- १९८४ पासून महाविद्यालयीन शिक्षक म्हणून मान्यता - पुणे विद्यापीठ पदव्युत्तर शिक्षक आणि एम.फिल., पीएच.डी. मार्गदर्शक

५. प्रशासकीय अनुभव :- श्री शिवछत्रपती महाविद्यालयात दि. १४/५/२००३ ते १३/३/२००५ पर्यंत प्राचार्यपदी नियुक्ती - प्राचार्य पदावर असताना कॉलेजला नॅक मूल्यांकनाचा बी + दर्जा

६. पुणे विद्यापीठ, पुणे :- प्राध्यापक निवड समितीवर कामकाज

७. चर्चासत्र आयोजन सहभाग व निबंध वाचन :-

| अ.क्र. | स्तर | आयोजन | सहभाग | निबंध वाचन |
|---|---|---|---|---|
| १ | विद्यापीठस्तरीय | ५ | २५ | ११ |
| २ | राज्यस्तरीय | ५ | २० | १२ |
| ३ | राष्ट्रीय | ३ | २२ | १० |
| ४ | आंतरराष्ट्रीय | -- | १ | १ |
| ५ | नवलेखक शिबिर (महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई) | १ | -- | -- |

८. पुणे विद्यापीठ मेजर / मायनर रिसर्च :- मायनर रिसर्च पूर्ण वर्ष २००९-२०११
विषय : 'ग्रामीण साहित्याचा इतिहास'

९. यु.जी.सी. मेजर / मायनर रिसर्च :-
अ. मायनर - 'स्वातंत्र्योत्तर प्रादेशिक कादंबरी' - पूर्ण
ब. मेजर - १. 'ग्रामीण साहित्य स्वरूप आणि चिकित्सा' - पूर्ण
२. 'साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त पुस्तकांचा अभ्यास' - पूर्ण वर्ष २००९ ते २०११

१०. पुरस्कार :- १. आदर्श प्राध्यापक पुरस्कार, पुणे विद्यापीठ, २००८
२. मा. शिवाजीराव काळे गुणवंत व आदर्श प्राध्यापक पुरस्कार, श्री शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर, २००८
३. पदम्श्री विखेपाटील राज्य ग्रंथ पुरस्कार, १९९८.
४. के.बी. रोहमारे ग्रंथ राज्य पुरस्कार, १९९८.
५. वाङ्मय सेवा पुरस्कार, २००९.
६. नक्षत्रांचे देणे काव्य मंच पुरस्कार, पुणे २०१०.

## ११. मार्गदर्शक म्हणून केलेले कार्य व एम.फिल., पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थ्यांची सूची

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | विषय | शेरा |
|---|---|---|---|
| पुणे विद्यापीठ, पुणे | | | |
| १ | डॉ. विलास थोरात, मनमाड | शरणकुमार लिंबाळे : व्यक्ती आणि वाङ्मय | पीएच.डी. पूर्ण |
| २ | डॉ. दत्तात्रय डुंबरे, ओतूर | जुन्नर तालुक्यातील वारकरी परंपरा | पीएच.डी. पूर्ण |
| ३ | डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर, घोडेगाव | आदिवासींचे जीवन चित्रण करणारे मराठी साहित्य : एक चिकित्सक अभ्यास | पीएच.डी. पूर्ण |
| ४ | डॉ. वंदना डोंगरे (नढे), नारायणगाव | देवदासींचे जीवन चित्रण | पीएच.डी. पूर्ण |
| ५ | डॉ. सीताराम निघुट, अहमदनगर | वि.शं. पारगावकर : व्यक्ती आणि वाङ्मय | पीएच.डी. पूर्ण |
| ६ | डॉ. अनिल उगले, आळे | मराठी संज्ञाप्रवाही कादंबरी | पीएच.डी. पूर्ण |
| ७ | डॉ. शशिकांत साळवे, घोडेगाव | मराठी लेखिकांच्या कादंबरीतील आधुनिकता | पीएच.डी. पूर्ण |
| ८ | डॉ. ज्ञानेश्वर थोरात | संत ज्ञानदेव, संत एकनाथकृत हरिपाठावरील उपलब्ध साहित्याचा अभ्यास | पीएच.डी. पूर्ण |
| ९ | डॉ. बाळासाहेब सोनवणे, पुणे | दलित कादंबरी : स्वरूप आणि चिकित्सा | पीएच.डी. पूर्ण |
| १० | डॉ. अनिल गर्जे, कडा आष्टी | लमाणांचे लोकसाहित्य | पीएच.डी. पूर्ण |
| ११ | प्रा. डॉ. दिलीप कसबे, चाकण | शाहीर मोमीन कवठेकर : व्यक्ती आणि वाङ्मय | पीएच.डी. पूर्ण |
| १२ | डॉ. श्रीप्रकाश वाघमारे | गौतम बुद्धांच्या विचारांचा मराठी साहित्यावरील प्रभाव | पीएच.डी. पूर्ण |
| १३ | प्रा. डॉ. धनंजय वाघमारे | यशवंत मनोहरांची समीक्षा | पीएच.डी. पूर्ण |
| १४ | प्रा. सचिन काकड | ग्रामीण साहित्याची समीक्षा | संशोधन कार्यरत |
| १५ | प्रा. राजेश्वर दुडुकनाळे | अण्णाभाऊ साठेंच्या साहित्यातील क्रांतिकारक विचार | संशोधन कार्यरत |
| १६ | प्रा. गणपत हराळे | सा.अ.पु.प्रा. कादंबऱ्यांचे मूल्यमापन | संशोधन कार्यरत |
| १७ | प्रा. सुवर्णा खोडदे, पुणे | सदानंद देशमुखांचे कथाविश्व | एम.फिल. पूर्ण |
| १८ | प्रा. प्रल्हाद शिंदे, राजेवाडी | इडा पिडा टळो | संशोधन कार्यरत |

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | श्री. नितीन भालेराव, गंगापूर बु.।। | लोकोत्तर गाडगेबाबा : जीवन आणि आणि कार्य एक अभ्यास | एम.फिल. पूर्ण |
| २० | सौ. सुनिता पारे (पावडे) | अप्पासाहेब खोतांची सावलीची सोबत | संशोधन पूर्ण |
| **य.च.म.मु.वि. नाशिक** | | | |
| २१ | प्रा. संदीप घोडे, प्रवरानगर | अरुण साधूंच्या कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखा | प्रबंध सादर |
| २२ | प्रा. वाव्हळ, अहमदनगर | कृषी साहित्य आणि राजन गवस | एम.फिल. पूर्ण |
| २३ | प्रा. रामदास धोंडीबा टेकाळे | तुका आकाशा एवढा | एम.फिल. पूर्ण |
| २४ | प्रा. जाधव, अहमदनगर | राहुरी तालुक्यातील लोकदैवत कथा गीते | संशोधन कार्यरत |

**टिप्पणी :** मार्गदर्शक ग्रामीण साहित्याचे अभ्यासक असूनही विषय बंधन विद्यार्थ्यांवर लादले नाही. शिवाय वेगवेगळे विषय हाताळून सर्वांगीण ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न केला आहे.

**१२. ग्रंथसंपदा :-**

१. मराठी कादंबरीतील प्रादेशिकता, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, दु.आ., २००५.
२. समीक्षा : संकल्पना आणि स्वरूप, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २०१०.
३. ग्रामीण साहित्य, स्वरूप आणि चिकित्सा, कर्मवीर प्रकाशन, २०१०.
४. मराठी प्रादेशिक कादंबरी : स्वरूप आणि विश्लेषण, शब्दालय प्रकाशन, २०१२.

**संपादन :**

१. चळवळ आणि साहित्य, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २०१०.
२. कथा गौरव, डॉ. भास्कर शेळके व डॉ. बाळासाहेब गुंजाळ, २००९.
३. काव्यकस्तुरी, डॉ. भास्कर शेळके व डॉ. बाळासाहेब गुंजाळ, २००९.
४. अधिष्ठान अभ्यासक्रम, डॉ. भास्कर शेळके व टिळक.
५. वाङ्मय प्रकार कविता, डॉ. भास्कर शेळके व मेदककर.
६. विज्ञान वेध, डॉ. देवरे व डॉ. भास्कर शेळके, स्नेहवर्धन प्रकाशन.
७. प्रसार माध्यमे आणि मराठी भाषा, डॉ. भास्कर शेळके, कर्मवीर प्रकाशन.
८. ग्रंथवेध, शब्दालय प्रकाशन, २०१२.

**१३. विविध पुस्तके, नियतकालिके व नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या संशोधनात्मक लेखांची सूची**

अ. पुस्तके :

| अ.क्र. | पुस्तक | संपादक | प्रकाशन | लेखाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | हल्या हल्या दुधू दे आणि तृतीय रत्न | डॉ. तुषार चांदवडकर | बजाज पब्लिकेशन, अमरावती, २०१० | हल्या हल्या पुस्तक दुधू दे - एक प्रादेशिक कादंबरी पृ.क्र. २९ ते ३५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | पाटलांची लंडनवारी काही दृष्टिक्षेप | डॉ. शैलेश त्रिभुवन | सुविद्या प्रकाशन जाने. २००४ | पाटलांची लंडनवारीमधील प्रतिमा, पृ.क्र. ३०. |
| ३ | १९९१ नंतरचे ग्रामीण साहित्य | डॉ. जयद्रथ जाधव | प्राचार्य शिवाजी कॉलेज रेणापूर | नव्वदोत्तर काळातील ग्रामीण कादंबरी पृ.क्र.९ |
| ४ | तहान : स्वरूप आणि समीक्षा | डॉ. कैलास सार्वेकर | प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, २००३ | तहान कादंबरीतील वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिरेखा, पृ.क्र. १२० |
| ५ | लोकसाहित्य दर्शन | डॉ. रमेश देवरे | कर्मवीर प्रकाशन, पुणे | लोकसाहित्य आणि ग्रामीण साहित्य साम्यभेद, पृ. १९९ |
| ६ | विठ्ठल वाघ गौरवग्रंथ | | अकोला | नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरी |
| ७ | डॉ. द. ता. भोसले | भास्कर चंदनशीव | स्नेहवर्धन, पुणे | रंजनवादी मराठी साहित्य |

**ब. नियतकालिके**

| नाव | प्रकाशन महिना व वर्ष | विषय |
|---|---|---|
| लोकविद्या पत्रिका | ऑक्टो/नोव्हें/डिसेंबर १९९९ | लोकसाहित्य आणि ग्रामीण साहित्य, पृ. १४ ते १८. |
| आनंदोत्सव | | १९८० नंतरची कविता |
| अक्षर वैदर्भी | सप्टें. २००९ | आधुनिक मराठी ग्रामीण साहित्याची भूमिका, पृ. ४१ |
| अक्षर वैदर्भी | जाने. २०१० | बदलती राजकीय, आर्थिक स्थिती आणि साहित्य, पृ. ५५. |
| मराठा मार्ग | सप्टें. २०१० | ग्रामीण कादंबरीतील स्त्रीचे चित्रण, पृ. २० ते २३ |
| मराठा मार्ग | डिसेंबर २०१० | या शतकाचा सातबारा होईल कोरा, पृ. १९ ते २१ |
| सर्वधारा | मार्च २०११ | मराठी साहित्य आणि मानसशास्त्र : परस्परसंबंध, पृ. २५ ते ३५ |
| अक्षरगाथा | २०१० | कथा संपादन दृष्टिकोण पृ. २९ ते ३१ |

**क. अनियतकालिके**

| नाव | प्रकाशन महिना व वर्ष | विषय |
|---|---|---|
| राजश्री शाहू महाविद्यालय, लातूर राष्ट्रीय चर्चासत्र, मराठी संशोधन पद्धती | १९, २० डिसेंबर २००८ | साहित्याचे मानसशास्त्रीय संशोधन, पृ. २७. |
| डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज, राष्ट्रीय चर्चासत्र, समकालीन मराठी साहित्य स्वरूप आणि समीक्षा (१९७५-२०००) | ३,४,५ फेब्रुवारी २०१० | ग्रामीण जीवनाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या, पृ.क्र. ८ |
| आत्मप्रत्यय डॉ. सावंत (लोहा) शंकरलाल खंडेलवाल आर्टस, सायन्स आणि कॉमर्स महाविद्यालय, अकोला Interrelationship of Literature & Social Sciences | संपादक मंडळ सदस्य २०, २१ फेब्रुवारी २०००९ | मानवशास्त्र आणि साहित्य परस्परसंबंध, पृ. ५ |

**सन्मान** : साहित्य अकादमी पुरस्कार समिती तज्ज्ञ परीक्षक, २०११

**सदस्य** : श्री शिवछत्रपती महाविद्यालयीन सेवक वर्ग पतसंस्था, जुन्नर सन २०११ ते २०१६

**१४. विविध संस्था, मंडळे, शासकीय समितींवर नियुक्ती :-**

अ. पुणे विद्यापीठ (२०१६ पर्यंत) : १. मराठी अभ्यास मंडळ सदस्य
२. ३२.५ सदस्य
३. अभ्यासक्रम उपसमिती चेअरमन

ब. महाराष्ट्र शासन : पुस्तक शिफारस समिती (तज्ज्ञ, परीक्षक म्हणून कार्यरत)

क. शिवाजी मराठा शिक्षण संस्था (जुन्नर) : सल्लागारपदी ५ वर्षांसाठी निवड

१५. महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांमध्ये एम.फिल., पीएच.डी. चे परीक्षक म्हणून कामाचा प्रदीर्घ अनुभव

**१६. विस्तार / सामाजिक कार्य** :- कन्या कै. शब्दश्री भास्कर शेळके यांचे स्मरणार्थ
१. श्री शिवछत्रपती महाविद्यालयास देणगी रु. १,२५,०००/-

RDCS
2 MAY 2017
9 MAY 2018
2 2 APR 2024

२. महाविद्यालयातील आदर्श शिक्षक / कर्मचारी पुरस्कारासाठी रक्कम रु. ११,०००-/ कायम ठेव ठेवून त्यातून प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह
३. रोख रकमेचा पुरस्कार ठेवला. विविध विद्यालयात रोख स्वरूपाची बक्षिस ठेव योजना रु. ३,०००/-
४. प्रवरा विद्यालय, आडगाव बु.।। ता. राहाता रु. ५०००/- देणगी

- विविध शाळा, महाविद्यालये, गणपती उत्सव आदी ठिकाणी व्याख्याने दिली.
- माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या विविध उपक्रमांमध्ये प्रमुख पाहुणे, मार्गदर्शक म्हणून सहभाग.
- जीवन विमा निगम, शाखा नारायणगाव ५३ वा वर्धापनदिनानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन

**१८. कॉलेज कामकाज** :- स्मरणिका, माहितीपत्रक, विविध प्रस्ताव, नॅक, संस्था अहवाल, स्नेहसंमेलन अहवाल इत्यादी कामामध्ये सक्रिय सहभाग प्रसार माध्यमे आणि मराठी भाषा राष्ट्रीय चर्चासत्र २७,२८ मार्च २०१० रोजी स्मरणिका संपादन करून प्राध्यापक व विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली.

**१९. संपादन सल्लागार** :- १) आत्मप्रत्यय (नांदेड) - आंतरराष्ट्रीय त्रैमासिक
२) शोधांकन (अहमदनगर) - आंतरराष्ट्रीय त्रैमासिक
३) कॉऊन्टर व्ह्यू (लातूर) - राष्ट्रीय त्रैमासिक
४) लोकसंस्कृती विकास (नारायणगाव) - त्रैमासिक
५) साहित्यवाद (घोडेगाव) - त्रैमासिक



महाराष्ट्रातील प्रादेशिक साहित्याचे ख्यातनाम अभ्यासक आणि ग्रामीण साहित्य चळवळीचे भाष्यकार डॉ. भास्कर शेळके यांचे मराठी साहित्य समीक्षा व्यवहारात विशेष योगदान सर्वश्रुत आहे. संशोधन आणि साहित्यप्रवाह याही संदर्भात त्यांचा नावलौकिक आहे. त्यांच्या या कार्याबद्दल कृतज्ञताभाव व्यक्त करणारा हा ग्रंथ आहे.

डॉ. भास्कर शेळके यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेकविध पैलू हा ग्रंथ उलगडून तर दाखवतोच. शिवाय त्याचबरोबर संशोधन प्रक्रिया आणि साहित्यप्रवाह संदर्भात संशोधक अभ्यासकांनी या गौरवग्रंथात मूलगामी विवेचन केले आहे.

साहित्य संशोधन आणि साहित्यप्रवाह यांचा अभ्यास करणाऱ्या अभ्यासक, संशोधकांना हा ग्रंथ उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरेल, यात शंका नाही.

ISBN 978-81-924997-0-3

9 788192 499703

शब्दश्री प्रकाशन, जुन्नर